# स्मरणसांखळी

कमलाबाई देशपांडे

SNDT W.U. Library, Churchgate
M923.7 006944
Des

M923.7
Des
6944

मूल्य सहा रुपये

मनोहर ग्रंथमाला, प्रकाशन ३१ वें

कधीं पुनव उजळे, कधीं आवस काजळे।
सर्यांतूनी सई! माझे, सुख मिळे विख मिळे।

# स्मरणसांखळी

6944

ऑक्टोबर १९४३

SNDT W.U. Library, Churchgate
M923.7 006944
Des

मूल्य रुपये ६

[illegible] शपांडे

प्रकाशक
मनोहर महादेव केळकर,
मनोहर ग्रंथमाला,
१९६/८५ टिळक रोड, पुणे २.

[ या आवृत्तीखेरीज सर्व हक्क लेखिकेचे स्वाधीन ]

मुद्रक
श्रीपाद रघुनाथ राजगुरु,
'राजगुरु प्रेस,'
४०५ नारायण पेठ, पुणे २.

# दोन शब्द

'स्मरणसांखळी' गुंफून वाचकांपुढें ठेवतांना आनंद वाटत आहे. पहिल्यानें कांहीं आठवणी लिहिण्यास सुरवात केली ती करमणूक म्हणून. आजारीपणांत स्वतःचा वेळ घालविण्यासाठीं लिहीत गेलें. मध्यंतरीं प्रकृति जास्तच नादुरुस्त होऊन अगदींच निजून रहावें लागलें व इतपतही मानसिक श्रमांचें काम होईना. तेव्हां कराचीस 'चिमण्या' आठवल्या, व दोन दिवसांत एक चित्र या क्रमानें निजल्यानिजल्याच त्या पुऱ्या चितारल्या. त्या वाचकांना आवडल्या असें पाहून मग पहिल्या अर्ध्या लिहून पडलेल्या आठवणी पुढें घेऊन त्या पुऱ्या करावयाला उमेद आली. 'आत्मचरित्र' म्हणून लिहावयाला बसलें नव्हतें; पण गेल्या पंचवीस वर्षांत माझें सर्व लक्ष व शक्ति शिक्षणकार्याकडे केंद्रित झाली होती, व त्यांतीलच या आठवणी! यामुळें त्याला अजाणतां आत्मचरित्राचें स्वरूप आल्यासारखें वाटतें खरें.

या पुस्तकाला 'स्मृतिबंध' किंवा 'स्मरणानुबंध' असें नांव देण्याचें मनांत येत होतें. पण त्या नांवाइतकी माझी भाषा संस्कृत-प्रचुर नाहीं. तेव्हां 'स्मरणसांखळी' हें नांव माझ्या लेखनपद्धतीशीं जास्त सुसंगत वाटून शेवटीं तेंच कायम केलें.

सराव नसल्यामुळें मुद्रितें शुद्ध करतांना, कसोशी करूनहि शेवटीं, अनेक अशुद्धें राहिलेलीं आहेत व मागाहून डोळ्यांत भरत आहेत. त्याबद्दल वाचकांना 'क्षमस्व' म्हणण्यापलीकडे काय करणार!

'पुष्करणी',
प्रभात रोड, पुणें ४.
१ ऑक्टोबर १९४३

कमलाबाई देशपांडे

# स्मरणसांखळी


| अनुक्रम | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| प्रास्ताविक | | | १ |
| प्रकरण | १ लें | योगायोग | २ |
| ,, | २ रें | लामणदिव्यांची लांवण | १३ |
| ,, | ३ रें | वातावरणांतील पडसाद | २४ |
| ,, | ४ थें | स्वप्नरहस्य | ३९ |
| ,, | ५ वें | तपोवनांत | ४८ |
| ,, | ६ वें | ध्येयदर्शनाची भूल | ७२ |
| ,, | ७ वें | स्त्रीशिक्षण, साक्षरताप्रसार, कीं परदेशगमन ! | ९८ |
| ,, | ८ वें | आजन्मसेविका | १२५ |
| ,, | ९ वें | कन्याशाळा भाग १ ला पार्श्वभूमि | १४९ |
| ,, | १० वें | ,, ,, २ रा कल्पना व स्थापना | १६६ |
| ,, | ११ वें | ,, ,, ३ रा वाढदिवस | १७८ |
| ,, | १२ वें | ,, ,, ४ था साहाय्यक | २०८ |
| ,, | १३ वें | ,, ,, ५ वा कन्यादान | २३१ |
| ,, | १४ वें | प्रयागक्षेत्रीं | २५८ |
| ,, | १५ वें | 'एरंडवनांत' | २९२ |
| ,, | १६ वें | एरंडवनांतील फलश्रुति। भाग १ ला—पार्श्वभूमि | ३२० |
| ,, | १७ वें | ,, ,, भाग २ रा—फलश्रुति | ३४८ |
| ,, | १८ वें | अखेर | ४०६ |
| | | पुरवणी | ४१७ |

★ ★ ★

# स्मरण–सांखळी

"O memories! that bless and burn,"
"O barren gain and bitter loss!"

"काय म्हणतात मा तशांतली गत!" म्हणतात काय व त्यांतली गत कशी! म्हणतात "दुःखं दुःखानुबंधि च" व त्यांतलीच गत म्हणजे "स्मरणं स्मरणानुबंधि च". एका गोष्टींतील एकाद्या धर्मावरून तशीच दुसरी समानधर्मीय गोष्ट आठवते. शिक्षण म्हटलें कीं, अध्ययन व अध्यापन यांत गेलेले कालखंड डोळ्यांसमोर येतात. वर्तमानकाल मोकळा असला म्हणजे भूतकाळांतील गोष्टी आठविण्यास वेळ मिळतो व पुष्कळ दिवसांनीं पुन्हा पाहिलेल्या जुन्या चित्रपटांप्रमाणें विस्मृतीच्या रिलावर गुंडाळून ठेवलेल्या गोष्टीही मनोरंजक वाटतात. प्रभातमध्यें नाहीं का नवीन चित्रपट तयार नसला म्हणजे जुने चित्रपट दाखवीत? अगदीं तसेंच!

★ ★ ★

# योगायोग : : १

अथांग अफाट धोधावे संचित। प्रवाहपतित मी तो एक।
नेई तेथें जाई कशा विचारावें। सुखासुख त्यांत कांहीं ना सामावें॥

खरोखर योगायोगाचा अगदीं राग आला मला त्या दिवशीं! ही युनिव्हर्सिटी अगदीं त्याच वर्षी कां निघावी? दोन वर्षे उशीरा निघती तर मग हा अभ्यासक्रम कीं तो अभ्यासक्रम हा प्रश्नच उद्भवला नसता. रात्रीं तात्या अंगणांत जेवावयास बसले होते व मी वाढीत होतें. इतक्यांत प्रो. कर्वे तात्यांना भेटावयास आले व दोघांच्या गोष्टीं, युनिव्हर्सिटी व सिंडिकेटची सभा, याबद्दल चालू झाल्या. "तुमची मुलगी यंदा मॅट्रिक झाली. आतां ती कोणत्या कॉलेजांत जाणार?" असा प्रश्न साहजिकच आण्णांनीं काढला. तात्या म्हणाले, आम्ही विचार करतों आहों. निदान माझी तरी इच्छा तुमच्या विद्यापीठाकडे तिनें जावें अशी आहे." आण्णा गेल्यावर तात्या म्हणाले, "काय जाणार का हिंगण्याच्या कॉलेजांत?" "मला कांहीं जावंसं वाटत नाहीं. अजून तेथें सगळीच सुरवात असणार." "तूं असं कर. हिंगण्यास जाऊन चार दिवस राहा व पाहून ये सर्व. मग विचार करूं."

असें म्हणून तात्या आपल्या उद्योगाला लागले. मीही काम उरकून अंगणांत फेऱ्या घालूं लागलें. फेऱ्या घालीत विचार करीत हिंडण्याची सवय घरीं आम्हां बहुतेक सर्वांनाच आहे म्हणा ना? यावरून कृष्णा खरे मला म्हणे, "काय हो! तुमच्या घरीं आलें म्हणजे आपली सर्व माणसें फेऱ्या* घालतांना दिसतील नाहीं!"

विचारांची एकदम उसळी येण्याचें कारण असें झालें: सकाळपासून वेगळ्या विचारांत होतें मी; व आतांचा प्रश्न अगदीं विरुद्ध दिशेचा वाटला मला! मॅट्रिकची परीक्षा होणें म्हणजे शाळेच्या जगांत अगदीं स्वर्गाला हात पोंचल्याप्रमाणें वाटतात नाहीं? सातवींत आल्यापासून 'सर्व शाळेंतील मोठ्या मुली' म्हणून खालच्या वर्गांतील मुली जरा अदबीनेंच पाहत होत्या आमच्याकडे. प्रत्येक शिक्षक जास्त काळजीनें शिकवी. नेहमीं रागीट व तिरसट ठरलेल्या शिक्षकांचे मुद्रेवर सुद्धां मुलींच्या यशाबद्दल काळजी व मुली जाणार याबद्दल दुःख दिसून येई. मॅट्रिकचा निकाल प्रसिद्ध झाला. पास झाल्याचें कळून आम्ही आनंदानें शाळेंत गेलों तों, प्रत्येकाचें अभिनंदन स्वीकारतां स्वीकारतां दमून गेलों होतों अगदीं. पण अकराची घंटा झाली व शाळेंतील एक शिक्षिका मिस् डेव्हिड म्हणाल्या, "चला, जा आतां बाहेर. आतां आमचा वर्ग सुरू होणार." सर्व वर्ग सुरू झाले पण आम्हांस त्यांत कोठेंच स्थान नाहीं! आतां शाळा आपली नव्हे, आपण पाहुण्या झालों शाळेच्या, ही जाणीव उत्पन्न होतांच एक प्रकारचें औदासीन्य निर्माण झालें व तशाच आम्ही शाळेंतील बागेंत एका झाडाखालीं जमलों. 'पुढें काय करावयाचें?' याची चर्चा सुरू झाली व सर्वांनीं असें ठरविलें कीं, सर्वांनीं कॉलेजांत तर जावयाचें, पण जावयाचें तेंही

*आणि ही सवय परंपरागत झाल्यासारखी वाटते. कारण माझा तीन वर्षांचा नातू अभिजित यालाही अंगणांत फेऱ्या घालावयास आवडतें. तो म्हणतो, "चल अक्का, आपण अंगणांत फेऱ्या मारूं या."

फर्ग्युसनमध्यें. कोणते विषय, अर्थात् बी. ए. ला, ऐच्छिक घेणार इत्यादि फार दुस्तीही चर्चा करून व बेत ठरवून आम्ही आपापल्या घरीं गेलों, पण रात्रीं मजपुढें वेगळाच प्रश्न तात्यांनीं उपस्थित केला!

काय करावें बरें? हें कॉलेज् कीं तें कॉलेज्? शिक्षणाचा प्रश्न माझा फार जिव्हाळ्याचा. पुष्कळ शिकावें, क्लास मिळवावा, बक्षिसें स्कॉलर-शिपा मिळवाव्या, ही माझी फार उमेद. पण नव्या युनिव्हर्सिटींत गेल्यानें हें जमावें कसें? पुन्हा कांहीं तरी वेगळा मार्ग लागणार नाहीं का? नाहीं तरी माझ्या शिक्षणाची गाडी अशीच दर दोन मैलाला धक्के खात जात होती. व्यवस्थित सुरुवात करावयाची व मध्येंच कांहीं तरी प्रसंगानें तें सरळ आक्रमण सोडून वळणें-वांकणें घ्यावयाचीं असा माझा क्रम.

अलीकडे दोन-तीन वर्षें माझ्या एक नातलग बनुताई अहो यांचेमुळें माझें हिंगण्याला जाणें होई. ती संस्था मीं पाहिली होती व तेथील वातावरण मला आकर्षक वाटे; परंतु तेथें कॉलेज निघून त्या कॉलेजांत शिकावयास जाण्याचा प्रश्न नवीन होता. त्या दृष्टीनें तात्यांच्या सांगण्याप्रमाणें मी पुन्हा चार दिवस हिंगण्यास राहावयास गेलें, तेथील एकंदर वातावरण मला उत्साहपूर्ण वाटलें. नवीन युनिव्हर्सिटी नुकतीच सुरू होत होती. त्यासाठीं एन्ट्रन्सची पहिली परीक्षा नुकतीच झाली होती. त्या मुलींच्यामध्येंसुद्धां ही युनिव्हर्सिटी, का ती युनिव्हर्सिटी, अशी चर्चा चाले. आपण एका नवीन कल्पनेचे जनक आहों व ती कल्पना यशस्वी करून दाखविण्याचें काम आपलें आहे असें सर्वांस वाटे. संध्याकाळीं दादा दिवेकर प्रार्थना घेत तीही मला परिणामकारक वाटली. एकंदरींत सर्वच वातावरण एक प्रकार-च्या ध्येयप्रधान भावनेनें भारावलेलें होतें.

तरी पण घरीं परत आलें म्हणजे पुन्हा मन मैत्रिणींच्याबरोबर फर्ग्युसन कॉलेजांत जाण्यासाठीं ओढे. द्वारका व गोदूबाई म्हणत, "हें काय बरं कमळाबाई, आपण सर्व एकदम पास झालों. आतां एकदमच

कॉलेजांतही जाऊं या ना!" मलाही पण तसेंच वाटे. तात्या या वेळीं होमरूल चळवळीचे कामानिमित्त मद्रासला गेले होते. नांवें नोंदविण्याची वेळ आली तेव्हां शाळेंतील मैत्रिणींबरोबर मीं फर्ग्युसन कॉलेजांत नांव घातलें व तीन दिवस लेक्चर्सही ऐकून आलें.

तात्या मद्रासहून परत आल्यावर त्यांनीं चौकशी केली तेव्हां मीं फर्ग्युसन कॉलेजांत जाऊं लागल्याचें त्यांना सांगितलें. संध्याकाळीं जेवणाचे वेळीं त्यांनीं मला हाक मारून चर्चेला सुरुवात केली. माझ्या आठवणींत असें मला आठवत नाहीं, कीं तात्यांना कधीं स्वस्थपणा मिळाला आहे. आम्हां मुलांशीं बोलणें, गप्पा मारीत बसणें तर राहोच, पण जरूर ती चौकशी करण्यासही कधीं वेळ पुरत नसे. केव्हांही पहा कांहींतरी काम व दहापांच मंडळी आलेली असावयाचीच! आम्हांस कांहीं विचारणें असेल तर त्याला वेळा म्हणजे दुपारचें व संध्याकाळचें जेवण. जेवतांना जो काय वेळ असेल तो. संध्याकाळीं त्यांनीं हाक मारून विचारलें,

"तूं फर्ग्युसन कॉलेजांत जाते म्हणतेस? हिंगण्याचे कॉलेजांत कां जात नाहींस?"

"तें काय सर्वच नवीन आहे. आतां तर पहिलें वर्ष संपलें आहे. दहा बारा मुली. ही कसली युनिव्हर्सिटी! अशा स्थितींत तेथें जाण्यांत काय अर्थ आहे!"

"असें करूं नको. एक एक गोष्टींचा विचार करीत चल. या युनिव्हर्सिटीला चालना देणारी मंडळी कोण आहेत? भांडारकर चॅन्सेलर आहेत. केशवराव कानिटकर, रँग्लर परांजपे, हरिभाऊ लिमये, आदि मंडळी आहेत. मुंबई युनिव्हर्सिटींत सेनेट-सिंडिकेटवर येण्याच्या योग्यतेचे लोक हे आहेत का नाहीं? भांडारकरांची योग्यता मुंबई युनिव्हर्सिटींत चॅन्सेलर होण्याची आहे कीं नाहीं?"

"होय आहे."

"म्हणजे या स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीची कल्पना उचलून धरणारी

मंडळी विद्वान् व शिक्षणतज्ज्ञ आहेत, कोणीतरी लोकांनीं काढलेली ही कल्पना नाहीं, हें तर खरें? आतां दुसरा प्रश्न. तूं फर्ग्युसनमध्यें गेलीस तर काय करशील? बी. ए. होशील. ऐच्छिक काय घेशील?"

"संस्कृत." मीं सांगितलें.

"मग असें पहा, बी. ए. पर्यंत जितके विषय तूं शिकली असतीस तितके विषय, कांहीं आवश्यक, कांहीं ऐच्छिक असे मिळून तुला येथेंही शिकतां येतील कीं नाहीं?"

"येतील. एकंदर गोळा बेरीज तितकी होईल."

"आतां शिकविणारी मंडळी. फर्ग्युसन कॉलेजमध्यें प्रत्यक्ष शिकविणारे अगर त्यांच्या तोडीचे प्रोफेसर तुम्हांस शिकविण्यास आले तर? प्रो. राजवाडे इंग्लिश शिकवावयास व प्रो. लिमये इतिहास शिकवावयास आले तर काय होईल? (त्या वेळीं प्रो. राजवाडे व लिमये शिकवावयास येणार असें बोलणें चालू होतें. पैकीं लिमये यांनीं कांहीं लेक्चर्स दिलींही असें आठवतें.) म्हणजे फर्ग्युसनमध्यें शिकली असतीस व ते विषय ज्यांनीं शिकविले असते त्या दर्जाची मंडळी शिकवावयास मिळतील. पण नुसती शिकविणारी मंडळी चांगली असून चालत नाहीं. फर्ग्युसन कॉलेजांत पांचशें मुलें जातात तीं काय सगळींच का उत्कृष्ट निघतात? त्यांत पुन्हा जो विशेष अभ्यास करील व कर्तबगारी दाखवील तोच पुढें येतो. तुला अभ्यास करायला तर कोणी आडवणार नाहीं ना?"

"पण पांचशें मुलांत वर नंबर येणें व दहा मुलांत येणें यांत फरक नाहीं का? जितकी कॉंपिटिशन् जास्त तितका अभ्यास जास्त चांगला होतो."

"आधीं दहांत तरी पहिली ये. पण थोड्या मुलींत पहिला नंबर आला व लोक पहिली म्हणाले तरी आपण विद्वान् झालों अशी कल्पना करून घेऊं नको म्हणजे झालें. शिवाय मुंबई विद्यापीठांतही दरवर्षी कोणी तरी पहिला येतोच. त्या सगळ्या पहिल्या नंबरांनीं पुढें

आयुष्यांत कांहीं केलें आहेच असें म्हणतां येणार नाहीं. परीक्षांत पहिले नंबर आले किती व त्यांपैकीं पुढच्या आयुष्यांत कोण टिकले किती याची एक जंत्री तयार कर."

"पण हें जरी असलें तरी बी. ए. चा जो दर्जा आहे तो जी. ए.ला कसा येणार? मुंबई युनिव्हर्सिटीच्या डिग्रीला इतके वर्षांची पुण्याई मागें आहे." मी म्हणालें.

"नुसत्या युनिव्हर्सिटीच्या पुण्याईनें काय होणार? तूं जर कांहीं चांगला ग्रंथ लिहिलास तर काय जी. ए. म्हणून लोक नाकारतील? हरिभाऊ आपटे बी. ए. आहेत का? नाहींत. पण आज ते एम्. ए.चे परीक्षक आहेत. तसा दर्जा तुला वाढवून घ्यावयाला कोणती अडचण? उद्योगच केला नाहीं तर बी. ए. होऊनही दर्जा वाढणार नाहीं. पैशाच्या दृष्टीनें नुकसान होईल हें खरें. पण तुला सरकारी शाळाखात्यांत नोकरी करावयाची आहे का? तसें असेल तर मात्र येथें कमी पडेल."

"तें मात्र माझें ठरलें आहे. सरकारी नोकरी करावयाची नाहीं व शक्य तितक्या जास्तींत जास्त स्वतंत्र व राष्ट्रीय स्वरूपाच्या संस्थेंत अगर शाळेंत काम करावयाचें." मीं सांगितलें, "तरी पण मला असें वाटतें कीं, प्रथम बी. ए. व्हावें व मग अशा कामांत पडावें."

"तूं असा विचार कर. समज, तूं इकडे गेलीस व पुढें हें सर्व निष्फळ झालें. जी. ए. पदवि फुकट गेली तर तूं काय उरशील? एक मॅट्रिक्युलेट्. मॅट्रिक्युलेट म्हणून कोठें नोकरी केलीस तर काय मिळेल? तीस रुपये. शिवाय तुझे व्याजाचे दहाबारा रुपये येतील. म्हणजे महिना चाळीस-पन्नास रुपयांत राहण्याची तुझी तयारी आहे का? कमींत कमी येवढें मिळेल. जास्तींत जास्त किती मिळवावयाचें याला कर्तबगारीची मर्यादा. चाळीस-पन्नास रुपये आपल्याला पुरतील इतकी तुझी तयारी आहे का? सध्यांची शिक्षणपद्धति सदोष आहे असें आम्ही म्हणतों. त्यांत मातृभाषेला स्थान नाहीं, मातृभाषा हें शिक्षणाचें माध्यम नाहीं, इत्यादि तक्रारी आम्ही

बातमी सांगून, असें घडल्यास आपल्या कार्यास फार जोर येईल वगैरे सांगूनही ठेवलें होतें, व सर्व मंडळी जणूं कांहीं माझी वाट पाहत होती. अर्थात् ही गोष्ट मला पुढें सुमारें वर्षानें कळली.

मी कॉलेजमध्यें गेल्यानंतर एक दिवशीं कै. बापूसाहेब चिपळूणकर घरीं तात्यांना भेटावयास गेले. आमचे तात्या घरीं नव्हते पण गोखले तात्या त्या सुमारास परगांवाहून घरीं आले होते. बापूसाहेब म्हणाले, "तात्यासाहेबांचें अभिनंदन करावयास आलों होतों. कारण त्यांनीं कमळाबाईंना आमचे कॉलेजांत पाठविलें." गोखले तात्यांचा स्वभाव असा कीं, समोर बोलणारा मनुष्य जी बाजू घेऊन बोलेल त्याच्या बरोबर उलटी बाजू घेऊन चर्चा चालू करावयाची; व चिपळूणकरांचा स्वभाव असा कीं, दुसऱ्या माणसाच्या मतांशीं शक्य तोंवर जमवून घ्यावयाचें. दुसऱ्या दिवशीं मला गोखले तात्या हसत म्हणाले, "काल चिपळूणकर आले होते तात्यांचें अभिनंदन करण्यास. मी म्हणालों, नवी प्रयोगावस्थेंत असलेली ही संस्था, जी मुलगी इकडे सहज बी. ए., एम्. ए. होऊन गेली असती तिला तेथें पाठवून तात्यांनीं तिचें Chances घालविले. करावयाचीच युनिव्हर्सिटीला मदत, तर प्रथम तिनें इकडे ग्रॅज्युएट होऊन मग तिकडे जायला हवें होतें इ. इ., आणि मौज अशी कीं, शेवटीं चिपळूणकर जातांना कबूल करून गेले, कीं "कमलाबाईंना हिंगण्यास पाठविलें ही केळकरांनीं चूक केली!"

## परिशिष्ट

**[प्रस्तुत प्रकरणीं निवडक पत्रांतील उतारे.]**

ता. २१-६-१७ चे पत्रांत ती. थोरले मामंजी लिहितातः—

"I quite appreciate your intelligence and work. I entertain hopes of your continuing to work as steadily as you did so far. It is not our object that the education you will receive should provide you with means of maintenance. Your education

will serve to educate your lovely and only child in whom I have great hopes. I do not know whether I shall live to see these hopes of mine realized.

*P. S.*—Since I write this, I learnt from Vagbhat that Tatyasaheb having gone to Madras you did not see the letter Vagbhat wrote to him, and that you are still in suspense as to what you are to do. You may jion the Famale University at Hingne; but how shall you manage about Shridhar ? ”

—N. G. Deshpande

ता. १८–६–१७ चे पत्रांत ती. धाकटे मामंजी लिहितात : “ जें करणें तें तुझे वडील रा. रा. तात्यासाहेब केळकर यांचे विचारानें करावें. तसेंच ती. नानासाहेब व चि. वाग्भट यांचा सल्ला घेऊन करावें. रा. रा. तात्यासाहेबांस योग्य माहिती दोन्ही कॉलेजांची आहे. सर्व परिस्थिति व तुझें कल्याण कशांत अधिक आहे हें त्यांना अधिक कळेल. जें अधिक श्रेयस्कर असेल तसें करावें येवढेंच मीं सांगू शकेन. ती. नानासाहेब व चि. वाग्भट यांना कळवून रा. रा. तात्यासाहेबांचे विचारानें निश्चय करावा. या त्रिवर्गांच्या विचाराबाहेर मी नाहीं.”

रा. घाणेकरांनीं लिहिलें (४।७।१७) : “ तुमचें २४ तारखेचें पत्र पावलें. त्यावरून तुमच्या मनांत हिंगण्यास जाण्याचेंच दिसलें व त्याप्रमाणें पुढें लवकरच तुम्ही तिकडे गेलांत हें चांगलें झालें. मागें एकदां मी, तुम्हीं विचारलें होतें त्या वेळेस, म्हणालों होतों कीं, तुम्ही फर्ग्युसनमध्येंच जा. त्याला कारण येवढेंच होतें कीं, प्रो. कर्वे असें आपल्या भाषणांत म्हणाले होते, ‘आमच्या युनिव्हर्सिटींतील ग्रॅज्युएट बॉंबे

युनिव्हर्सिटीच्या पास ग्रॅज्युएटच्या योग्यतेची होईल. Honours Graduate इतकी होणार नाहीं. तरी पण मराठींतून शिकतां येतें हा मोठाच फायदा आहे. शिवाय तीन वर्षांत शिक्षण पुरें होतें व पुढें अभ्यास चालविणें प्रत्येकाच्या हातांत आहे. तुमच्या इच्छेप्रमाणें झालें हें फारच योग्य झालें, व तात्यांनीं आपण काढलेल्या युनिव्हर्सिटींत तुम्हांला घालवें हेंच उचित आहे. परंतु तुमच्या मामंजींना हें पसंत नाहीं. ते म्हणाले तुम्हांस prospects काय? हिंगण्यासच राहावें लागणार. सरकारी नोकरी नाहीं. पण यांत औषधावांचून खोकला गेला असेंच तुम्हांला वाटत असेल."

त्याच सुमारास सौ. शांताबाई कशाळकर वाग्भटांना व मला लिहिलेल्या पत्रांत लिहितात—

"I should very much like to know what Kamala-bai has decided. She is likely to shine if she were to take up the Bombay University Arts course. I am under the impression that she is to join the Hingne College."

## लामणदिव्यांची लांबण : : २

फार फार जुन्या आठवणी व स्मृतिरूप लामणदिव्याच्या प्रकाशांत त्यांची लांबण फारच भासते. नव्हे स्मृतिभूत गोष्टी भिंतीवरील लामण-दिव्यानें दिसणाऱ्या सांवल्यांप्रमाणें जास्तच मोठ्या वाटतात. म्हणून वरील प्रसंगाच्या पूर्वींची गोष्ट सांगते.

माझे शिक्षणास सुरुवात करतांना तात्यांनीं मला हुजुरपागेच्या मराठी शाळेंत पहिलींत नेऊन बसविलें. हुजुरपागेंत महाराष्ट्र शिक्षण मंडळाची हायस्कूल फॉर इंडिअन् गर्ल्स ही इंग्रजी शाळा असून, शिवाय सरकारी ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन ही संस्था होती. तिच्यासाठीं प्रॅक्टिसिंग् स्कूलही मराठी तीन इयत्तांपर्यंत असे. पण या सर्व शाळा हुजुरपागा या नांवानेंच ओळखल्या जात. या प्राथमिक शाळेचें वातावरण फार मनोरंजक. वर्गांतील कपाटांत मांडलेले खेळ, बाहुल्या, रंगीत चित्रें, ड्रिलसाठीं काठ्या कर्डी आदि साधनें, व गोड गोड बोलणारे गोगटे मास्तर; समोरची गर्दछाय बाग व त्यांतील झाडांखालीं बसून मधल्या सुट्टींत 'डबा खाणें'. 'किंडरगार्टन्' शब्द आम्हांस माहीत नव्हता. पण शाळेंत येणें म्हणजे उपवनांत सहल करावयास आल्यासारखें वाटे खरें.

उपवनांतील मोठें संकट म्हणजे खाण्याचा डबा विसळतांना खालच्या पाण्याच्या पिपांत पडणें. मग सरूबाई, राधाबाई अशी कोणी आम्हांस शाळेंत न्यावयास येणारी मोलकरीण जणूं देवतेच्या रूपानें अवतीर्ण होई व डबा काढून देऊन संकट निरसन करी. ट्रेनिंग कॉलेजसाठींच प्रॅक्टिसिंग् स्कूल ठेवलेलें. त्यामुळें सारखीं पाठाला बोलावणीं येत. जरा तासाला सुरुवात होते न होते तों सोनूबाई भालेराव किंवा दुसऱ्या कोणी शिक्षिका मुलींना न्यावयास येत. तेथील पाठही गमतीचे वाटत. 'लोखंडाचा' पाठ शिकवितांना पळी दाखवीत. खेळांतील आग-गाडी दाखवून शिवाय ठोकळ्यांची आगगाडी करून दाखवीत. 'नारळाचे झाडाचा' पाठ शिकवितांना शिकविलेलें पुढील पदः—

**पहा झाड नारळिचें । फार उंच दीसतें ॥ ध्रु० ॥**
**त्याचिया फळासि असे, नांव नारळ खरें**
**त्या फळामधूनि आम्ही, काढितों हें खोबरें ॥ १ ॥**

हें आज जरी नीरस वाटलें, तरी त्या वेळीं फार सरस वाटे. पाठाचे शेवटीं प्रत्यक्ष खोंबरेंच खावयास देत म्हणूनही असेल!

लवकरच त्या शाळेच्या जगांत मी पूर्ण रंगून गेलें व शाळेंत होणाऱ्या खडान्‌खडा सर्व गोष्टी घरीं येऊन सांगूं लागलें. सुरुवातीला म्हटलें जाणारें 'वाजे घण घण घंटा । ऐका कैशी एकल जमण्याला' हें पद, मिस् रोज व मिस वेरुळकर यांनीं दिलेले कवायतीचे हुकूम, पाठाला गेलों असतांना तेथें दिसणारे कारखाननीस मास्तर, रोज वर्गांत फेरी घालणाऱ्या आमच्या 'मदर'–मिस् सोराबजी–( यांना मुलींनीं 'मदर' म्हणावयाची प्रथा असे ) व रोज वर्गांत हजेरीचे वेळीं उच्चारलीं जाणारीं 'बबी धुमाळ'–'हजर' इत्यादि भाषणें मला सर्व मुखोद्‌गत होतीं. या माझ्या शाळेच्या वेडाबद्दल सर्व घरीं थट्टा करीत माझी! कारण सकाळीं उठलें म्हणजे शाळेंत जाण्याच्या गोष्टी व घरीं आल्यावर शाळेंत झालेल्या गोष्टी यांतच मी गुंगत असे. पण एकदां या वेडाला उलटी कलाटणी मिळावयाची वेळ आली. वर्ष नक्की आठवत

नाहीं, पण स्वदेशी चळवळीचे, वंगभंगाचे ते दिवस असावे. स्वदेशी, परदेशी मालावर बहिष्कार, शिवाजी-उत्सव इत्यादि गोष्टी वातावरणांत दुमदुमत होत्या व मजवरही त्याचा परिणाम होऊन मी स्वतःला देशभक्त म्हणवत असें. एक दिवस घरांतील सर्वांनीं थट्टा केली माझी. वेणुमावशी म्हणाली, " तूं येवढी देशभक्त म्हणवितेस व मग साहेबाचे शाळेंत जातेस कशी; व मडमेला मदर म्हणतेस कशी ?" मलाही तें खरें वाटूं लागलें. वाच्यार्थानें शाळा साहेबाची नव्हती व मिस सोराबजी मडम नव्हत्या. पण शाळेमध्यें वातावरण सरकारी व 'मदर' म्हणण्याची पद्धत मिशनरी. त्यामुळें तत्त्वार्थानें तें खरेंच होतें. संध्याकाळीं गोखले तात्या आले त्यांना ही तक्रार मीं सांगितली.

प्रिन्सिपल् तात्यासाहेब गोखले हे त्याच वर्षीं मॅट्रिक होऊन शेतकी कॉलेजांत जाण्याठीं पुण्यास आले होते. आमचे नातेवाईकच ते. पण नातें सांगण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण माझ्या चुलत बहिणीचे ते मावसभाऊ; तेव्हां माझे चुलत-मावसभाऊ म्हणावयाचे. पण मला आठवतें तसें तात्या आमच्या घरीं राहण्यास येत, त्यामुळें मधली चुलत-मावस ही सांखळी विसरून एकदम ते भाऊच वाटत. मॅट्रिक झालेले तरी वय चौदा कीं पंधरा व लहान मुलांत मिसळावयाची आवड. आमचेबरोबर सागरगोटे खेळतील, तसेंच कपबशांचीं झाडें उगवावीं म्हणून कपबशांचे फुटके तुकडेही कुंड्यांत पुरून द्यावयास तयार. त्यामुळें आम्हांस ते एक बरोबरीचे खेळगडी वाटत व त्यांच्या मताला आम्हां मुलांच्या जगांत फार मान असे.

आमचे तात्या व हे तात्या या नांवाचा घोटाळा होई, म्हणून त्यांना गोखले तात्या म्हणण्याची पद्धति पडली होती. गोखले तात्या म्हणाले, " बरोबर आहे. साहेबाची शाळा हें तर खरेंच. देशभक्त म्हणवितेस व जातेस कशी त्या शाळेंत ? आपण कांहीं देशभक्त नाहीं. पण आपण सुद्धां साहेबाच्या कॉलेजांत जात नाहीं. आमचे प्रिन्सिपल् तर रॅंग्लर परांजपे आहेत." त्यांचा हा विनोद अर्थातच मला कळला नाहीं, व

साहेबाची शाळा सोडण्याचा माझा निश्चय ठरला. संध्याकाळीं आमचे तात्या घरीं येतांच दुसऱ्या दिवसापासून शाळा सोडण्याचा माझा निश्चय मीं त्यांना जाऊन सांगितला.

तात्यांनीं—लहान मुलांशीं सुद्धां चर्चा करून त्याला पटवून द्यावयाच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें— माझी समजूत घातली. “ कोण म्हणतें शाळा साहेबाची म्हणून,” ते म्हणाले, “ ज्या वेळीं आपण प्रथम त्या शाळेंत गेलों तेव्हां ऑफिसांत कोण लिहीत बसलें होतें ? “ तर पाळंदे ! ” त्यांना मीं सांगितलें कीं माझ्या मुलीला मला या शाळेंत पाठवावयाची आहे. तेव्हां त्यांनीं मग ‘मदरना’ बोलावून आणलें व वर्गात घेऊन जाण्यास सांगितलें. तेव्हां शाळा ही पाळंद्यांची नव्हे का ?”—रा. पाळंदे हे त्या वेळीं क्लार्क होते व त्यांची गोरीपान घवघवीत खुर्चीभर मूर्ति पाहून, कारकुनाऐवजीं प्रमुख म्हणून त्यांच्याबद्दल कल्पना होणें अशक्य नव्हतें. “ एकट्याला सगळें काम कसें होणार; म्हणून त्यांनी हाताखालीं मडमा नेमल्या आहेत. आपण साहेबाच्या हाताखालीं काम करणें वाईट. पण साहेबाला व मडमांना आपल्या हाताखालीं नोकरीवर ठेवणें कांहीं वाईट नाहीं ! म्हणजे आपण मोठे होतों व साहेब ल्हान होतों.” ह्यानें माझी समजूत पटली व मीं पुन्हा शाळेला जावयाला सुरवात केली. पुढें पुष्कळ दिवस मी खरोखरच असें समजे व लोकांनाही सांगे कीं, “ आमची शाळा साहेबाची नव्हे, ती पाळंद्यांची आहे.”*

---

*कोणत्या सालची ही गोष्ट असावी हें ठरविण्यासाठीं मी हें छापीत असतां—गोखले तात्यांना विचारलें, “ तुम्ही कोणत्या सालीं फर्ग्युसन् कॉलेजांत होता ? ” “ मी फर्ग्युसन कॉलेजांत केव्हांच नव्हतों.” ते म्हणाले, “ मी होतों शेतकी कॉलेजांत व पुढें एंजिनिअरिंग कॉलेजांत. परांजपे होते फर्ग्युसनचे प्रिन्सिपल्. पण तुला त्यांतला फरक कळत नव्हता व तुला चिडविण्यासाठीं वाटेल तें सांगत होतों इतकेंच.”

शाळा ही साहेबाची नसून पाळंदे यांची आहे हें पटलें! माझ्या शिक्षणाचा कार्यक्रम व्यवस्थित सुरू झाला व मराठी तिसरी पास होऊन मराठी चौथी व इंग्रजी पहिलींत मी गेलें. त्या वेळीं चौथींतच इंग्रजी शिक्षण सुरू होई. दोन-तीन महिने व्यवस्थित गेले. पण हळूहळू माझ्या शाळेच्या आवडींत शैथिल्य उत्पन्न झालें. वर्गामध्यें एकदम सुरू झालेलें इंग्रजी समजेना, किंवा त्या वेळच्या एकंदर जहाल राजकारणी वातावरणाचा परिणाम माझे मनावर होता, हें नक्की माझें मलाच सांगतां येणार नाहीं. मला वाटे, " पण स्त्रियांनीं जास्त शिकून काय करावयाचें, त्यांना नोकरी थोडीच करावयाची आहे ? मराठी भाषा आली पुष्कळ झालें!" या सुमारास माझ्याबरोबरीच्या आमच्या आळींतील मैत्रिणींची विचारसरणी अशीच होती त्याचेंही कदाचित् प्रतिबिंब पडलें असावें माझ्या मनांत! त्याही म्हणत आम्ही चार इयत्ता शिकलों. मराठी चांगलें लिहितां वाचतां येतें, पुष्कळ झालें! त्यांतून हुजुरपागा. ती काय बाटगी शाळा. मडमा शिकविणार, धर्म सोडावयाला लावावयाच्या त्या. कांहीं तरी सुधारकी चाळे आहेत ह्या शाळा म्हणजे!

शेवटीं एके दिवशीं मनाशीं शाळा सोडावयाचा निश्चय ठरविला व तात्या दहा वाजतां बाहेरून आल्यावर, 'तात्या आज मी शाळेंत जात नाहीं' म्हणून जाऊन सांगितलें. त्यांनीं सांगितलें, 'कंटाळा आला असला तर जाऊं नको एकदोन दिवस.'

" तसें नाहीं. मी आजपासून मुळींच कधीं शाळेंत जाणार नाहीं. माझें नांव काढून टाका." मीं सांगितलें.

" दोन दिवस जाऊं देत मग पाहूं." म्हणून तात्यांनीं तो प्रश्न त्या वेळीं तसाच सोडला.

चार दिवस गेल्यावर पुन्हाही माझा शाळेंत अजीबात न जाण्याचा निश्चय ऐकून त्यांनाही आश्चर्य वाटलें; व शाळेशिवाय मुळींच चैन न पडणाऱ्या मला एकदम शाळेचा तिटकारा कां यावा याचा त्यांनाही

२

प्रश्न पडला. मला घेऊन ते शाळेंत आले व आमच्या वर्गशिक्षक मिसेस् हॅरिएटबाई गोरे यांना बोलावून मला शाळेचा इतका वीट येण्यास कांहीं कारणें झालीं कीं काय याची त्यांनीं चौकशी केली. शाळेंत मजवर कोणी रागावलें अगर मुलींचीं भांडणें झालीं यापैकीं कांहींच प्रकार नव्हता. उलट वर्गांतील सर्वांत ल्हान मुलगी म्हणून कौतुकच होई. मिसेस् गोरे यांनींही माझी पुष्कळ समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण माझी समजूत पटेना व शेवटीं निराश होऊन सर्वांनीं मला शाळेंत जाण्याचा आग्रह करणें सोडून दिलें.

मीं येवढें मात्र कबूल केलें होतें कीं, मी घरीं अभ्यास करीन व मराठी वाढवीन. त्याप्रमाणें वाचन त्या वयाचे मानानें पुष्कळ झालें; इतकें कीं, अमुक दिवस वाचावयाला इतकीं पुस्तकें पुरविलीं पाहिजेत असें उलटें बंधन तात्या मजवर घालीत व वाचलेल्या पुस्तकांचे गोषवारे सांगितल्याखेरीज पुढचें पुस्तक आणून देणार नाहीं असें सांगत. हें एक वर्ष माझें फार चमत्कारिक गेलें. कारण घरांतील मंडळीही मला प्रत्येकजण वेगवेगळ्या प्रकारें शाळेंत जाण्याबद्दल आग्रह करीत. कोणीही घरांत पाहुणे आले कीं, शाळेंत जाण्याजोगी मुलगी असून शाळेंत कां जात नाहीं हा प्रश्न निघे व सर्वांचे मतें मी वेडी व हट्टी ठरे. मीही पण वेडी व हट्टी खरीच, कीं एकदां केलेला हुजुरपागेंत न जाण्याचा निर्णय मला बदलवयास नको होता. आम्ही साहित्य-संमेलनाचे निमित्तानें (१९०९ सालीं) बडोद्यास गेलों होतों त्या वेळीं तेथील शाळेच्या हेडमिस्ट्रेस् सौ. काशीबाई हेर्लेकर यांनीं सौ. ताईस (माझ्या आईस) शाळा पाहावयास बोलाविलें. क्रमप्राप्त मी तिज-बरोबर जावयाची, पण तेथें गेलें कीं माझे शाळेचा प्रश्न निघावयाचा, काशीबाईही मला शाळेंत जा म्हणून उपदेश करावयाच्या! तेव्हां ती भानगडच नको म्हणून मीं ताईबरोबर जाण्याचें नाकारलें. घरांतील सर्व मंडळी शाळा पाहून आली. मी एकटी घरीं वाचीत बसलें होतें.

कै. बाबासाहेब देवधर हे मात्र माझेपेक्षां जास्त हट्टी निघाले.

देवधरांना आम्ही घरांत 'होम' म्हणत असूं. हें नांव पडण्याचें कारण असें घडलें: आम्ही त्या वेळीं प्लेगचे दिवस असल्यामुळें सर्व्हंट्स ऑफ इंडियाच्या आमराई कॅंपमध्यें राहत होतों. एके दिवशीं संध्याकाळीं देवधर आमचे झोपडीकडे आले. काका, बापू, अण्णा, विठ्ठल व मी अशीं *आम्ही पांचजणें झोपडीसमोरच्या अंगणांत दाराशींच खेळत होतों.

"केळकर आहेत का?" त्यांनीं प्रश्न केला.

"बाहेर गेले आहेत." आमच्यापैकीं एकानें उत्तर दिलें.

"मग त्यांना घरीं आल्यावर सांगा कीं देवधर तुम्हांला उद्यां 'होम'मध्यें भेटतील."

'सर्व्हंट्स ऑफ इंडियाची' मुख्य इमारत पलीकडेच होती व त्या इमारतीस 'होम' म्हणण्याचा प्रघात होता असें दिसतें. पण आम्हांला तें कांहीं माहिती नव्हतें. 'घरीं' भेटेन सांगावयाचें त्याऐवजीं 'होम'-मध्यें भेटेन असें सांगितलें असें आम्हांस वाटलें. कारण तेवढेंच इंग्रजी आम्हांस कळत होतें. काका सर्वांत मोठा. तो इंग्रजी दुसरींत, माझें एक प्रायमर झालेलें व अण्णा, विठ्ठल मराठी पहिलींत कीं दुसरींत. 'होम' शब्दाची मौज वाटलीच. आणखी वाटलें कीं काय यांना

---

*अण्णा, बापू व मी सख्खी भावंडें. विठ्ठल हा माझे चुलते कै. नारायण चिंतामण केळकर यांचा मुलगा. काका (आतां प्रो. द. के. केळकर) म्हणजे माझा चुलत चुलता. आम्ही पांचजणें कमी-अधिक समवयस्क, दोन-तीन वर्षांच्या अंतरानें एकाखालीं एक वय असलेलीं मुलें. विठ्ठलला तीन वर्षें पूर्ण होण्यापूर्वींच त्याचे आई-वडील वारले. त्याला ताई-तात्यांखेरीज दुसरे आई-वडील आठवतच नाहींत. काका हा थोडा मोठ्या वयाचा, म्हणजे सुमारें नऊ-दहा वर्षांचा असतां, मिरजेहून पुण्यास आमचे घरीं आला. आमच्या एवढाच तो, म्हणून आम्ही त्याला 'अरे काका'च म्हणत असूं.

आपल्या इंग्रजीची ऐट आहे! त्यांचें पाऊल दाराबाहेर पडण्याचा अवकाश; समोर ताई चुलीजवळ कांहीं करीत होती तिला हाक मारून काकानें सांगितलें कीं, " ताई, यांना आपल्या इंग्लिशची फार ऐट आहे. नाहीं तर घराबद्दल 'होम' शब्द कशाला वापरला?" त्या दिवशीं संध्याकाळीं जेवतांना त्या शब्दाचा विषय आम्हांला पुरून उरला; व 'राइस', 'करी', 'सॉल्ट', 'बटर-मिल्क्' इत्यादि आम्हांस येणाऱ्या इंग्लिश शब्दांची आम्हीं उजळणी केली. देवधरांनीं दारांतून पाऊल बाहेर टाकतांच काकानें ताईला सांगितलें तें त्यांना ऐकूं गेलेंसें दिसतें. कारण दुसरे दिवशीं संध्याकाळीं देवधर आले आणि तात्यांच्या व त्यांच्या गप्पा सुरू झाल्या. बोलतां बोलतां 'अहो मी इंग्रजी शब्द फार वापरतों म्हणून तुमचीं मुलें मला काल हसलीं' अशी सुरवात करून कालची हकिगत त्यांनीं तात्यांना सांगितली. आतां कांहीं तरी बोलून घ्यावें लागेल म्हणून मनांतल्या मनांत आम्ही चूर झालों होतों. पण तें सर्व वर्णन ऐकून तात्या व देवधर दोघेही भरपूर हसले; व देवधरांनीं काकाला हाक मारून तूं कोणत्या शाळेंत जातोस, काय शिकतोस वगैरे चौकशी केली. त्यानंतर देवधर बहुतेक रोज आमचे घरीं येत व तात्या घरीं आले नसले तर ते येईपर्यंत आम्हां मुलांना हाक मारून आमच्याशींच गप्पा मारीत बसत. भाजलेल्या शेंगा खावयास मागून घेत. आमचीही त्यांचेबद्दलची भीति कमी झाली होती, व त्यांनीं गप्पा मारीत बसावें म्हणून त्यांच्यासाठीं भाजलेल्या शेंगा आम्ही मुद्दाम तयार ठेवीत असूं. अशाच एका संध्याकाळीं पुढील प्रसंग घडला—

एकदां माझ्या शाळेच्या गोष्टी निघाल्या. तात्या म्हणाले, "आम्हीं पुष्कळ विचारलें पण शाळा कां नको याचें कारण ती सांगत नाहीं व शाळेंतही जात नाहीं."

"मग मी विचारतों कारण" असें म्हणून देवधरांनीं माझेपुढें सत्याग्रहच आरंभिला. तूं कारण सांगितल्यावांचून मी उठणार नाहीं

असें म्हणून ते बसून राहिले. शेवटीं दीड-दोन तासांनीं कंटाळून "त्या शाळेंत बाटवितात, धर्माची शिकवण नाहीं" इत्यादि कांहीं गोष्टी माझ्या कल्पनेप्रमाणें मीं सांगितल्या, पण त्यानें कोणाचेंच समाधान झालें नाहीं.

पुढें आणखी कांहीं महिन्यांनीं पुन्हा शाळेंत जाण्यास मीं सुरवात केली; पण ती हुजुरपागेंत नव्हे तर म्युनिसिपालिटीच्या शाळेंत. आमचे घरीं बिऱ्हाडांत राहणारे परांजपे यांची भाची पुण्यास शिक्षणासाठीं आली व तिला म्युनिसिपालिटीचे चार नंबरचे शाळेंत पाठविण्याचें तिच्या घरच्या माणसांनीं ठरविलें. तें पाहून मलाही पुन्हा शाळेंत जावेंसें वाटूं लागलें. तात्यांना जाऊन त्याप्रमाणें मीं सांगितलें कीं, "तात्या, मला यमूबरोबर म्युनिसिपल शाळेंत जाऊं द्या." "म्युनिसिपल शाळेंत कां? पुन्हा हुजुरपागेंत जा." तात्या म्हणाले. "तसें नाहीं, हुजुरपागा नको. हीच शाळा हवी." मीं सांगितलें. "हुजुरपागेपेक्षां या शाळेंत जास्त काय आहे?" तात्यांनीं विचारिलें. "या शाळेंत मातृभाषेला महत्त्व आहे. चौथीमध्यें मराठी भाषा मुख्य आहे. इंग्लिशला फाजील महत्त्व नाहीं. हुजुरपागेंत चौथी म्हणजे इंग्रजी पहिली आहे. मराठीला तेथें मान नाहीं तेव्हां ती शाळा मला नको." मीं माझी कारणपरंपरा सांगितली.

तात्यांनीं शाळेंत जा म्हणून सांगितलें. मीं शाळेंत जाण्यास सुरवात केली. एक दीड महिन्यांत वार्षिक परीक्षा झाली व मी चौथी पास झालें. म्युनिसिपल शाळेंत इयत्ता त्या वेळीं चारच. तात्या म्हणाले, आतां पुन्हा हुजुरपागेंत जा!"

मीं सांगितलें, "आमच्या बाई पांचवी इयत्ता काढण्याची खटपट करताहेत. कारण कमींत कमी चार मुली असल्या तर नवीन वर्ग काढण्याची परवानगी मिळते. येथें पांचवी निघाली तर मी येथेंच पांचवी करतें. म्हणजे 'मराठी' चांगलें होईल."

सौ. अनसूयाबाई गाठे या आमच्या हेडमिस्ट्रेस. त्यांच्या मनांत पांचवी इयत्ता काढण्याचें फार होतें. त्यांनीं आम्हांस तसें आश्वासनही दिलें होतें. आज नाहीं उद्यां पांचवी इयत्ता निघेल या आशेवर आम्ही शाळेंत जात होतों. पण परवानगी मिळाली नाहीं व मीं तें वर्ष पास होऊन पुन्हा चौथींतच घालविलें. पुढच्या वर्षीं पांचवी इयत्ता निघून त्या शाळेंत मीं पांचवी पुरी केली !

येथेंही एक उल्लेखनीय प्रसंग आठवतो. १९०८ सालीं पुण्यास तेव्हांचे मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यावयाचे होते; व पुण्यांतील सर्व म्युनिसिपल शाळांचा बक्षिस-समारंभ त्यांचे हस्तें व्हावयाचा होता. या समारंभाची तयारी सर्व शाळांतून जोरानें चालू झाली होती. कांहीं मुलींचेकडून संवाद करवून घ्यावयाचे होते व त्यांत मलाही काम मिळालें होतें. प्रत्येक शाळेंतील पहिल्या तीन तीन मुलींना गव्हर्नर-साहेबांचे हस्तें बक्षिसें देण्यांत यावयाचीं होतीं. इकडे टिळकांचा खटला नुकताच संपून त्यांना शिक्षा झाली होती व तात्यांच्यावरील खटल्याच्या नोटिसा लागल्या होत्या.

एके दिवशीं *चिंतू गोखले आला असतां शाळेंतील संभाषणाची गडबड मीं त्याला वर्णन करून सांगितली व मलाही त्या संभाषणांत भाग आहे, मलाही पहिलें बक्षिस मिळणार आहे, इत्यादि गोष्टी त्याला वर्णन करून सांगितल्या.

"हें तुला शोभतें का ?" चिंतू मला म्हणाला. ज्या तारखेस तुमचा बक्षिससमारंभ त्याच तारखेस मुंबईस तात्यांच्यावर खटला सुरू. मुंबई सरकारनें टिळकांना शिक्षा दिली, तात्यांच्यावर खटला केला, आणि

* रा. चिंतोपंत गोखले हे पुढें म्युनिसिपल शाळेंत शिक्षक झाले, हे आमचे घरीं वारंवार येत. आमच्यापेक्षां वयानें फारसे मोठे नसल्यानें व त्यांच्या विद्यार्थिदशेंतील बरींच वर्षें आमचे घरीं गेल्यानें, आम्हांस ते आताप्रमाणें वाटत. त्या वेळीं आम्ही त्यांना चिंतूच म्हणत असूं.

त्या गव्हर्नरपुढें, म्हणजे मुंबई सरकारपुढें, जाऊन तूं भाषण करणार व त्याच्या हातून बक्षिस घेणार ?”

या भाषणाचा माझे मनावर फार परिणाम झाला व दुसऱ्या दिवशीं शाळेंत जातांच आमच्या थोरल्या बाई सौ. अनसूयाबाई गाठे यांचेकडे जाऊन मला भाषणांत भाग घ्यावयाचा नाहीं व गव्हर्नरचे हस्तें बक्षिसही कां घ्यावयाचें नाहीं हें सकारण सांगितलें. त्यांनाही तें पटलें व त्यांनीं दोन्ही ठिकाणांहून माझीं नांवें कमीं केलीं. या सर्व वातावरणांत मला एक गोष्ट दिसून आली कीं, या स्त्रीशिक्षिकांना टिळक, केळकर वगैरे मंडळीबद्दल सहानुभूति वाटे, पण नोकरींत असल्यानें त्यांना शिस्तीप्रमाणें वागावें लागे.

ठरल्याप्रमाणें बक्षिससमारंभ पार पडला. मी अर्थात् गैरहजर राहिलें. पण त्या वेळीं शाळेंत शिकवीत असत तें एक पद मात्र आजही आठवतें. तें असें—

[ दिण्डी ]

**बहु असती सर जॉर्ज क्लार्क थोर।**
**शिरीं धरिलासे बहुत कार्यभार।**
**परी स्वीकारुनि विनति आमुची या।**
**समारंभा पातले तोषुनीया॥**

# वातावरणांतील पडसाद : : ३

शाळेच्या बाबतींत असणाऱ्या माझ्या आवडीनिवडी व त्या वेळीं मजवर प्रभुत्व दाखविणारी कारणपरंपरा पाहूं गेलें असतां येवढें वाटतें कीं, इतर मुलांचेपेक्षां ही कारणपरंपरा जरा भिन्न आहे. माझा प्राथमिक शिक्षणाचा काळ म्हणजे सुमारें १९०५ ते १९१० हा होता. वयाच्या ७ ते १२ वर्षांपर्यंतचा हा कालखंड. या वेळीं साहेबाची शाळा नसावी, साहेबी शिक्षणानें धर्मभ्रष्टता येते, मातृभाषेचें शिक्षणांत महत्त्व असावें, स्त्रियांना इंग्लिश शिक्षण कशाला ? इत्यादि जे कांहीं विचार मला सुचत अगर जीं माझीं मतें समजून इतरांच्या विरुद्ध जाऊनही मी धरून बसे त्याकडे पाहतां आज अनेक विचार मनांत येतात. विचार करून ठरलेलीं हीं मतें नव्हत. मातृभाषेचें शिक्षणांत महत्त्व, राष्ट्रीय शिक्षण म्हणजे काय, शिक्षणाचा व धर्माचा संबंध काय इ. गोष्टींचें आकलन होण्याचें माझें वय तेव्हां नव्हतें. पण त्या वेळीं भोंवतालीं जी परिस्थिति होती तिचे पडसाद न कळत माझ्या विचारांत येत असावे. १९०५ सालची वंगभंगाची चळवळ, त्याबरोबर महाराष्ट्रांत पसरलेली स्वदेशी, बहिष्काराची लाट, १९०८ चा टिळकांचा खटला व त्या वेळीं सुरू असलेली

दडपशाही, तसेंच या सर्व गोष्टींचा मेळयांनीं केलेला सुलभ बालबोध प्रचार, वसति पुण्यांत व टिळकांच्या राजकारणाची चर्चा रोज कानावर पडेल इतकी त्यांच्या निकट; टिळकांना पकडून नेलें, शिक्षा झाली, वगैरे प्रसंग आत्मौपम्यानें अनुभवलेले; यामुळें हवेंतील हे पडसाद इतरांचेपेक्षां माझे मनावर जास्त जोरानें आघात करूं शकले व मनाची ठेवण भावनाप्रधान आणि नादिष्ट, त्यामुळें त्यांचे परिणाम जास्त खोलवर पोंचले.

शाळा सोडली तरी वाचनाची आवड कांहीं कमी झाली नव्हती. शिवाय कविता लिहिण्याचा नाद लागला होता व वाढत होता. इंग्रजांची भाषा म्हणून इंग्रजीचा तिटकारा येई. संस्कृत म्हणून भाषा आहे व ती मराठी भाषेच्या अभ्यासाला आवश्यक असते हें मला माहीतच नव्हतें. मराठी चार इयत्तांपेक्षां शालेय शिक्षण मला आवश्यक वाटत नव्हतें पण वाचनानें आपण सर्व करूं शकूं असें वाटे; व महत्त्वाकांक्षा होती मोरोपंताप्रमाणें 'रामायण' लिहिण्याची.

**दशरथ म्हणुनी होता राजाही धन्य त्या अयोध्येला ।**
**सर्व सुखें असति परी नाहीं म्हाळें पुत्रसूख हो त्याला ॥**

अशा तऱ्हेनें सुरवात करून मीं दहापंधरा आर्या लिहिल्याहि. पण पुढें तें मागें पडलें. माझी पहिली कविता मीं टिळकांचे खटल्यावर लिहिली. टिळकांना पकडून नेलें होतें. मुंबईस खटला चालू व त्यामुळें तात्यांच्या सारख्या मुंबईस खेपा चालत; घरांतहि सगळ्यांचें लक्ष टिळकांच्या खटल्याकडे. रोज ज्ञानप्रकाश आल्या-खेरीज आम्हां मुलांना चहा सुचत नसे. कारण त्यांतली खटल्याची हकिगत वाचल्यावर कार्यक्रम सुरू. तेव्हां कविता लिहावयास मीं सुरवात केली. टिळकांच्या खटल्याची सर्व हकिगत घालून गाणीं केलीं व एक दिवस केसरींत प्रसिद्ध करावयास म्हणून तात्यांना नेऊन दिलीं. तात्यांनीं तीं पाहून परत दिलीं व हीं कांहीं केसरींत प्रसिद्ध करतां येत नाहींत म्हणून मला सांगितलें. संध्याकाळीं जेवणाचे

वेळीं माल मला हाक मारून 'तूं कविता लिहितेस तर गणमाला तरी मोजून लिही' असें सांगून 'प्रातःकाळीं थंडगारसा वारा झुळझुळ येतो' ही साकी घेऊन त्यावरून ह्रस्वदीर्घ अक्षरांच्या मात्रा कशा मोजावयाच्या हें शिकविलें. माझ्या कविता नाकारल्यामुळें माझा अतिशय विरस झाला. आमच्या आमराई कँपांत मात्र मैत्रिणींच्या घरीं गेलें म्हणजे माझें कौतुक होई. त्यांचे आईवडील म्हणत 'येवढीशी मुलगी पण पद्य गाणीं कशी करते' व मजकडून सर्व म्हणवून घेत. "स्वतः केसरीचे संपादक असून, आपल्याच मुलीच्या कविता छापीत नाहींत म्हणजे काय?" मला अगदीं राग आला होता. पण वरील प्रश्न मी त्यांना विचारावयास धजलें नाहीं येवढें खरें. गंमत अशी कीं, माझ्या कविता केसरींत प्रसिद्ध करावयाच्या योग्यतेच्या आहेत काय याबद्दल मला शंकाच नव्हती! शंका येत होती ती तात्यांनीं घेतलेल्या निर्णयाची. आपल्याच मुलीच्या कविता नाकारून– त्याही टिळकांच्यावर लिहिलेल्या– त्यांनीं देशभक्तीला उत्तेजन देण्याची ही संधि घालविली नव्हती का? माझा गाणीं करण्याचा नाद चालूच होता, व सर्व दडपशाहींत सांपडलेल्या वीरांचीं चरित्रें पद्यांत गुंफावयाचें मीं योजिलें होतें. केसरी आठवड्यानें यायचा. ज्ञानप्रकाशमध्यें रोजच्या धरपकडीच्या बातम्या यावयाच्या त्या सहज समजत. खरें म्हणजे अग्रलेख व स्फुटें आम्हांला कळतच नसत. पण एकादे वेळीं 'केसरी-ज्ञानप्रकाशनें एकमेकांना शिव्या दिलेल्या असल्या तर त्या वाचतांना गंमत वाटे. सुरतेला काँग्रेस मोडली, खुर्च्यांची फेकाफेकी झाली वगैरे ज्ञानप्रकाशांतील वर्णन आमचें वाचून मुखोद्गत झालें होतें, व तात्या काँग्रेसहून परत येतांच 'आम्हांला माहीत आहे तिथें काय झालें' असें म्हणून त्यांना आम्हीं तें तोंडपाठ म्हणून दाखविलें होतें. राजद्रोहाच्या खटल्यांत सांपडलेल्या प्रत्येक देशभक्ताची माहिती मजजवळ माझ्या डायरींत–अशीच एक घरांत रद्दींत सांपडलेली कोरी–नोंदलेली होती. व त्यांतील बऱ्याचजणांवर मीं गाणीं रचलीं होतीं. सुदैवानें ती डायरी

पुढें कोठें हरवली. नाहीं तर त्यांतील ओळी उद्धृत करण्याचा मोह मला झाला झाल्याखेरीज राहता ना. एकदोन गाणीं जीं मी केसरींत छापावयास देणार होतें तीं मात्र आठवतात :

## गाणें १ लें : केसरीचा खटला

भगिनींनो तुम्हि सार्थी वचनें दोन ही परिसा ।
देशामध्यें हाहाःकार माजला कैसा । जाहला कैसा । ध्रु०
भगिनींनो० ॥
एके दिवशीं झडप घालुनि धरी केसरीला । धरी केसरीला ।
खटला येथें चालत नाहीं । सेशना नेला ।
जामीनाचा अर्ज नामंजूर हो कैसा । नामंजूर कैसा ॥ १ ॥

## गाणें २ रें : टिळक

सुमती भगिनी काळचि खडतर आला ।
नेले आपुल्या देशबंधुला ॥ ध्रु०
या टिळकांनीं राजद्रोह केला ।
हा आरोप त्यांना दिधला ।
चाल । चोवीस जूनच्या दिवशीं ।
नेलें धरून आपुल्या टिळकांशीं ।
चाल पहिली । सर्वचि वदति शोभा नाहीं देशाला ॥ १ ॥
येथील किंहो कोर्टामधें ते येती ।
नाहिं चालत सेशना नेती ।
चाल । किंमत देति कार्डीत ।
त्यामुळें व्यर्थ श्रम घेत ।
चाल पहिली । त्यां कार्डांचा दण्ड हि हजाराला ॥ २ ॥
चौकशीमध्यें चार लेख ते धरिती ।
नऊ जून कडक बहु म्हणती ।
चाल । त्यामुळें आवेशहि चढला ।
पांच दिवस भाषण करण्याला ।
चाल पहिली । त्याचियामुळें भाषणलाभ सर्वांला ॥ ३ ॥

दावर आहे अन्यायमूर्ति पदवीचा ।
खटलाहि त्याच्या मर्जीचा ।
चाल । सहा वर्षे काळेपाणी ।
त्याला वाटे जातिल क्षणीं ।
चाल पहिली । म्हणुनि शिक्षा देतो सहा वर्षाला ॥ ४ ॥
देवा ! काय कथूं आमुच्या देशाचे हाल ।
झाले त्यानें सुजनही लाल ।
चाल । परि राजा उलट्या बुद्धीचा ।
मोर्लेहि त्यांत कुबुद्धीचा ।
चाल पहिली । देवा सोडिव रे लवकर देशवीराला ॥ ५ ॥

या टिळकभक्तीच्या अनुषंगानें उत्पन्न झालेली दुसरी भावना म्हणजे गोखल्यांच्या कार्याबद्दल हेटाळणी. मनुष्य संतापला व स्वतःच्या हातांत प्रतिकाराचें सामर्थ्य नसलें म्हणजे आपल्या मित्रांवरच राग काढतो. तीच स्थिति जनतेची. टिळकांना शिक्षा झाली, हाल भोगावे लागले आणि गोखले मात्र साहेबाच्या बंगल्यावर जाऊन गोष्टी बोलतात. टिळक तुरुंगांत व गोखले व्हाइसरॉयचा पाहुणचार घेऊं शकतात. जणूं कांहीं गोखल्यांनीं या गोष्टी करविल्या होत्या ! A short-sighted man is angry with his spects अशी स्थिति लोकांची झाली होती. १९०८ सालच्या गणपति-उत्सवाचे वेळीं या जनमनरोषाच्या लाटा अनिवार उसळलेल्या मेळ्यांमध्यें दिसून आल्या, व त्या वर्षीचीं मेळ्यांचीं पदें टिळकांचे भक्तीचे बाबतींत जितकीं हृदयस्पर्शी तितकींच गोखल्यांचे बाबतींत अकारण विषारी होतीं. मेळ्याच्या ध्येयाचा पुढें अधःपात होऊन गणेशभक्ति (माझ्या समजुतीनें ती मुळांतच थोडी होती) व स्वमतप्रचार हीं मागें पडलीं व परमतनिंदेलाच प्राधान्य आलें. तरी पण स्वमतप्रचाराच्या बाबतींत व देशभक्तीची जाणीव प्रत्येक सामान्य व्यक्तीच्या अंतःकरणापर्यंत नेऊन पोंचाविण्याच्या बाबतींत, मेळ्यांनीं प्रशंसनीय कामगिरी केली असें मला अजूनही म्हणावेंसें वाटतें. सन्मित्र समाज

मेळ्याचे कवि कोण असतील ते असोत पण त्यांची कवित्वशक्ति प्रतिभाशाली व प्रसादयुक्त होती.

( १ ) बाळ लाडका । कुणी पाहिलात का !
कुणी देखिलात का ?
न्यायभूमिची सभा । तेथ वीरसा उभा ।
फांकली मतिप्रभा । राष्ट्रदीपका ॥ १ ॥

*       *       *

आर्यमाय ओरडे । फोडुनी घसा रडे ।
न्या मला तयाकडे । भेटवा सखा ॥ २ ॥

*       *       *

किंवा ( २ ) बाळ नाहीं ना । थाट त्याविना सुना ॥ १ ॥
'नाहीं' म्हणुनि बोलतां । वदन खालीं घालितां ।
काय अश्रु ढाळितां । मजसमान ना ॥ २ ॥

इत्यादि त्या वर्षींचीं पदें ऐकून डोळ्यांतून पाणी काढलें नाहीं असे श्रोते विरळा! आजही हीं पदें आठवलीं म्हणजे मन कांहीं वेळ वर्तमानकाळ विसरून 'तदानींतन' होऊन जातें.

स्वमतप्रसार बालबोध भाषेंत करणें या दृष्टीनें दडपशाहीवरील पदें व १९०७ सालच्या कॉंग्रेसवरील पदें हीं अशीं प्रासादिक वाटतात.

इतिहास पुराणीं लिहिला । कीं भरतखंड हा पहिला ॥ ध्रु० ॥
गेलि दिल्लीची पादशाही । पेशवे ही ब्राह्मणशाही ।
आतां आले फिरंगी पाही । लोकांत दरारा राही ।
चाल । पहा तेहतिस कोटीवरती ।
एकछत्री शिक्का सुरती ।
शाबास सवाई छाती । टोपीवाला ॥ १ ॥

इत्यादि सुरुवात करून पुढें

अठराशें सत्तावन्न । मोर्लेला पडलें स्वप्न ।
गेलें रे हिंदुस्थान । दे सुळीं लठ्ठसा छान ।

गोखल्यांची उज्ज्वल कामगिरी शिल्लक राहिली व नवीन पिढीला तीच कळणार आहे. पण 'ज्याचं करावं बरं तो म्हणतो माझंच खरं' या न्यायानें जनतेच्या रोषाची आग, ज्या वेळीं गोखल्यांना सहन करावी लागली तो काळ त्यांना फार तापदायक गेला असला पाहिजे. मेळ्यांतील त्या वेळचीं पद्यें अशींच लिहिलीं होतीं—

**आई बघ हा माझा बाळ गे। पाहि तुझा गोपाळ।**
**कुठें हिरा हा, कुठें हीर तो। त्याच्यावरती भाळ गे॥ १॥** इ०

त्या वेळीं बहुधा दरवर्षी प्लेगचें आगमन असे व गणपति झाले कीं लोक झोपडींत राहावयास जाऊं लागत. शाळा बंद, मोकळा वेळ, व नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या पद्यमाला— त्यामुळें त्या वाचून पदें म्हणण्यांत फार मौज वाटे. कांहीं वेळीं रामभाऊ गोखलेहि (म्हणजे भूगोलकर्ते रा. ज. गोखले) तेथें आमचे घरीं राहावयास येत व सुट्टीचे गोखले तात्या येत. हे दोघे एकत्र जमले म्हणजे मेळ्यांचा अनिष्ट प्रचार यावर बोलणें सुरू व्हावयाचेंच. ते अगदीं रागावून बोलूं लागले म्हणजे आम्हां मुलांस आश्चर्य वाटे व इतक्या चांगल्या पदांवर तुम्हीं रागावतां कां? असें विचारावेंसें वाटे. आम्हीं बाल-मंडळानें— म्हणजे काका, बापू, अण्णा, विठ्ठल व मीं— ठरवून टाकलें होतें कीं तुम्ही गोखल्यांचा इतका कैवार घेतां याचें कारण तुम्ही दोघेही 'गोखले' आहांत हेंच! 'गोखले गोखले मिळाले व गोखल्यांना सोडवायला निघाले!'

आम्ही गोखले तात्यांबरोबर नेहमीं चर्चा करीत असूं कीं गोखले मोठे कीं टिळक मोठे? गोखले तात्या मुळीं सुरवात करीत ती टिळक ढोंगी आहेत येथपासून; त्यामुळें आमच्या टिळकभक्तीस धक्का बसून आम्हांला वाद घालण्यास जास्तच चेव येई. हा टिळक-गोखले वाद पुष्कळ वर्षें चालला. निकाल कधींच लागला नाहीं. पुढें आमच्यांतच दोन मतें होऊन कांहीं टिळकांच्या बाजूला व कांहीं गोखल्यांच्या बाजूला असें होत असे. एक दिवस अगदीं भांडाभांडीवर प्रकरण

आलें व तात्यांच्याकडे निर्णय मागण्यास आम्ही गेलों. तात्यांनीं प्रत्ये-काला प्रश्न केला. 'तुला काय वाटतें? दोघांपैकीं कमी मोठा कोण?'

"गोखले." एकानें उत्तर दिलें.

"मग तूं निदान गोखल्याइतका मोठा होशील का?" अर्थात् याचें जोरानें उत्तर कोणाला देतां येणार! आम्हीं सांगितलें ही नुसती सारवासारवी झाली. आम्ही गोखल्यांइतके मोठे होऊं शकलों नाहीं तरी खरे कोण मोठे हें आम्हांला कळावयास नको का? मुख्य प्रश्न तसाच राहिला. नक्की सांगा टिळक जास्त मोठे का गोखले जास्त मोठे!"

"गोखल्यांच्या परीनें गोखले मोठे व टिळकांच्या परीनें टिळक मोठे! यांत तुलना कशी होईल?" हा शेवटीं तात्यांनीं निर्णय दिला.

आज हसूं असें येतें कीं, टिळकांचें कार्य जास्त महत्त्वाचें, कीं गोखल्यांचें कार्य जास्त महत्त्वाचें? टिळक जास्त बरोबर कीं गोखले जास्त बरोबर? अशा तऱ्हेनें चर्चा करण्याचें केव्हांच सुचलें नाहीं. मोठे-पणा म्हणजे काय? योग्य कामगिरी करणाराला नेहमीं मोठेपणा मिळ-तोच का? आणि मोठेपणाची खूण कोणती? लोकप्रियता ही दरवेळीं मोठेपणाची खूण असतेच का? या बाबतींत माझा मुलगा श्रीधर यानें 'सहारा' कादंबरींत उपयोगिलेली एक उपमा फार समर्पक वाटते. "राजकारणाच्या घड्याळांत त्यांचें आतांपर्यंतचें कार्य Balance **wheel** म्हणजे तोल-चक्राप्रमाणें होतें. त्यांची खरी महती राजकारणांत मुरलेल्यालाच कळणार. अर्थात् केवळ अज्ञ मुलाप्रमाणें असणाऱ्या समाजाला घड्याळाच्या रचनेंत गजराची घंटाच जास्त महत्त्वाची वाटावी यांत मुळींच नवल नाहीं."

समाजाची स्थिति लहान मुलासारखीच असते. त्याला ढोबळ कल्पनांचें ग्रहण होतें व कार्यकारणभाव बरोबर कळतोच असें नाहीं. चांगला व वाईट, शहाणा व वेडा हीं सर्वव्यापी विशेषणें आहेत. लहान मुलाची समजूत करतांना, "चाळ, तूं शहाणा ना" म्हटलें कीं, शहाणा याचा अर्थ कांहींही होतो. औषध न रडतां घेणें, धाकट्या

भावाला आपलें खेळणें देणें, न ओरडतां गप्प बसणें, अंधारांत झोपावयाला न भिणें, सर्व कांहीं गोष्टींचा समावेश 'शहाणा' या विशेषणांत येतो.

आठ सालीं टिळकांना पकडलें त्या प्रसंगावर काव्यनिष्पत्ति झाली. त्याच्याच अनुषंगानें टिळकांच्या सत्याण्णव सालच्या पहिल्या खटल्यावरही कवनें रचिलीं गेलीं. टिळकांच्याबद्दल काय मिळेल तें शिकावयाचें. तेव्हां तेंही गाणें मीं पाठ केलें होतें. टिळकांना शिक्षा झाल्यानंतर तात्यांच्यावरचा खटला सुरू व्हावयाचा होता व त्यानिमित्त माझे चुलते आप्पासाहेब पुण्यास आले होते. संध्याकाळीं दोघांच्या गोष्टी चालू असतां तात्यांनीं हाक मारून मला टिळकांवरचीं गाणीं म्हणावयास सांगितलें. मीं स्वकृत गाणीं म्हटलीं; नंतर इतर म्हटलीं. त्यांत हें गाणें होतें:

**एक बाळ टिळकाविण । किं सर्वहि जगत् दिसत सून ।**
**जसा कुडींत नसतों प्राण । तशी गत झालि । तशी गत झाली।**
**सत्ताविस जुलई सन सत्याण्णव सालीं ॥ ध्रु० ॥**

हें पालुपद असून पुढच्या कडव्यांत टिळकांना पकडल्याचें वर्णन आहे. व पुढें त्यांना जामिनावर सोडल्याचें कवयित्री वर्णन करतें—

**तिथं जज्ज महादेव रानडे । किं त्यांनीं खटला घेतला आपल्याकडे।**
**दिला बदलून दुसरियेकडे । बद्रुदिनाकडे । बद्रुदिनाकडे ।**
**हिंदुचा राखिला मान । किं जातीचे असून मुसलमान ।**
**लाखाचा घेऊन जामीन । सोडिलें टिळकांला । सोडिलें टिळकांला ।**
**आनंद झाला अखिल महाराष्ट्राला ॥ २ ॥**

याप्रमाणें टिळकांना जामिनावर सोडल्याचें वर्णन करून पुढें काय झालें याची माहिती अशी—

**चैत्र शुद्ध शनिवार । किं झाली दुपार तिसरा प्रहर ।**
**गांवांत दवंडि मग देती । दवंडि मग देती । दवंडि मग देती ।**
**आतां चापेकराला फांशी खरोखर होती ।**

मोठमोठे शेट सावकार। किं तैसे वकील बॅरिस्टर।
दामूची मजा पाहणार। लोक बहु जमति। लोक बहु जमती।
त्या वेळीं घेतली हातिं गीतेची पोथी।
उपदेश जगाला केला। किं सावध असा राज्यकर्त्याला।
वेळेवरी फास हा आला। राम राम बोला। राम राम बोला।
टिळकांसाठीं चाफेकर फांसावरी तो गेला।

शेवटची ओळ ऐकून दोघेजण हसूं लागले. तात्या म्हणाले, "घ्या! आम्ही सरकारशीं भांडतों व अग्रलेख लिहितो कीं, रँडसाहेबाच्या खुनाचा राग सरकारनें टिळकांवर काढला तें चुकलें. पण सामान्य भोळी समजूत मात्र अशी कीं, चाफेकर टिळकांसाठीं फांशी गेला. यावरून तर्कदुष्ट विपर्यस्त समजुती समाजांत कशा पसरतात याबद्दल त्यांचें बोलणें सुरू झालें. मला तें कांहीं फारसें कळलें नाहीं. पण टिळकांचें गाणें ऐकून भक्तिभावानें डोलायचें सोडून ते हसावयास लागले याचेंच आश्चर्य वाटलें. बायकांच्या समाजांत ज्या वेळीं हें गाणें म्हटलें जाई तेव्हां बायका भाविकपणें डोलत, अश्रु ढाळीत व "असाच आहे बरं तो दुष्ट इंग्रज! आमच्या टिळकांना छळतो!" असें म्हणून कळवळून बोटें मोडीत.

* * *

आम्हां सर्वांना भेंड्या लावण्याचा फार नाद; व त्यासाठीं कठीण अक्षरांनीं सुरू होणाऱ्या व कठीण अक्षरांत संपणाऱ्या कविता आम्ही शोधून पाठ करीत असूं. काव्यरत्नावलीचे अंक काढून त्यांतील कठीण अक्षरांच्या कविता आम्हीं पाठ केल्या होत्या. याच सुमारास सुरतेच्या कॉंग्रेसवर 'मेथाजींची मजलस' म्हणून विनोदी आर्यासंग्रह प्रसिद्ध झाला होता. या कविता मीं मुकाट्यानें सर्व पाठ करून टाकल्या होत्या. विषय माझे आवडीचा व शिवाय भेंड्याला उपयुक्त! जहाल-मवाळवादालाही उपयोगी. कोणी गोखल्यांचे अगर नेमस्त पक्षाचे बाजूनें बोललें कीं, लागलीच,

**रडलें स्वराज्य त्यांचे, अर्जही कचऱ्यांत जाउनी पडले**
**त्याच्यामुळेंच लवही देशाचें कार्य हो नसे घडलें ॥**

असें अधिक्षेपात्मक उत्तर देतां येई.

तुम्ही काय करणार, तर

**" झगडुनि भांडुनि शौर्यें सर्व जगाला करोनिया थक्क**
**आम्ही जहाल म्हणुनी हिसकुनि घेणार आमुचे हक्क ॥ "**

असें सांगतां येई. 'झ' हें अक्षर फारसें न येणारें, तेव्हां प्रतिपक्षास 'झ' ची कविता येत नसे व मीं ही कविता म्हटली कीं, शेवटीं अक्षर 'क्क' येई.

पुन्हा अक्षर द्या. 'द्र'

**'द्रव शेटजींस आला जवळी होतेच गोखले वाच्छा**
**म्हणती तयांस चेष्टा नावडती या मला टवाळांच्या ॥ '**

'च्या' अक्षर आलें; दुसरें अक्षर द्या, कीं 'स्म' घ्या.

**'स्मरुनि खुन्या मुरलीधर तो भांग्या मारुतीही संस्मरुनी'**
**घेऊं राशबिहारी घोष चला या प्रसन्न तो करुनी ॥ '**

अक्षर 'न'

**न कळत परंतु कपटें घालुनि डोळ्यांत आमुच्या धूळ।**
**त्या भूपेंद्रसुरेंद्रीं दादाभाईस धाडिलें मूळ ॥**

'ळ' येत नाहीं; तर अक्षर 'म्ह'

**म्हणतील राज्य तुमचें आम्हां नलगे तुम्हीच तें घ्याहो।**
**इकडे आम्हां मागुनि फक्त तराज्यचि आमुचें राहो ॥** इत्यादि.

अशा तऱ्हेनें कवितांची सांखळी योजून एकदां का प्रतिपक्षी एकाद्या अक्षरावर अडला, कीं त्याच्यावर ओळीनें खूपशा भंड्या चढविल्याखेरीज मी सोडीत नसे.

टिळक हें आम्हां मुलांना दैवत वाटे. 'आपले टिळक' म्हणण्यांत

जो कांहीं आनंद व अभिमान वाटे तो सांगतां पुरवणार नाहीं. टिळकांना पकडल्यानंतर रोजची घरांत चालणारी खटल्याची चर्चा व टिळकांना शिक्षा झाली तो दिवस यांचें विस्मरण होणें शक्य नाहीं. त्याच दिवशीं त्यांच्या पत्नीचे समाचारास ताई दुपारीं गेली. मला म्हणावयाची एकाद वेळ, तुला मुलीला तेथें येऊन काय करावयाचें आहे? पण मी अगदीं तिचें मन वळवून तिचे-बरोबर गेलें. तेथील भयाण उदास शांतता, त्यांच्या पत्नीचें निःशब्द दुःख व गंभीरपणा इत्यादि गोष्टींचा जो ठसा मनावर उठला आहे, तो अजूनही आठवण झाली म्हणजे दुःखदायक वाटतो. तें सर्व वर्ष आमचे घरीं जणूं सुतकांत गेलें. सण नाहीं, वार नाहीं, प्रत्येकाचे तोंडावर निराशा व उदासपणा. केसरीचा जामीन भरला तोही दिवस असा आठवतो. पांच हजार जामीन भरावा लागला. पैशाची कशी सोय केली वगैरे कांहीं त्या वेळीं मला कळलें नाहीं. आतां याच्या पुढची पायरी म्हणजे केसरी एकदम बंद पडावयाचा व केसरी कचेरीचीं माणसें हीं उघडीं पडावयाचीं. तात्या जेवून उठले इतक्यांत बाबा विद्वांस आले व दोघे मिळून जामीन भरण्यास जावयास निघाले. ताईही उदास चेहरा करून तेथें उभी होतीच. त्या वेळीं तात्यांनीं तिला एक वाक्य सांगितलेलें आठवतें. "पंधरावीस कुटुंबें एका नावेंत बसलों आहोंत. बुडेल किंवा तरेल. जें काय होईल तें सर्वांचें." दिवाळी नुकतीच झाली होती. टिळक तुरुंगांत गेल्यावर ही दुसरी दिवाळी. माझी एक मराठी शाळेंतील मैत्रीण आली होती. ती, तिची बहीण, तिचा भाऊ व मी— चतुःशृंगी-च्या रानांत त्यांच्या झोपड्या होत्या— त्यांच्या अंगणांत बसलों होतों. टिळकांच्या गोष्टी निघाल्या, व कशीं जाणार सहा वर्षें? हें इंग्रजांचें राज्य जाणार नाहीं का? आपण काय केलें म्हणजे इंग्रजांचें राज्य जाईल इत्यादि बोलून आमच्या कल्पनांप्रमाणें पुष्कळ बेत केले.

त्यांपैकीं एक बेत पुढीलप्रमाणें होता. साधा तोंडचा हिशेब होता तो !

"हे इंग्रज परदेशांतून येऊन आपल्या देशावर राज्य करतात कसे व आपल्या टिळकांना तुरुंगांत टाकतात कसे ? किती आहेत रे हे इंग्रज आपल्या देशांत ?"

"सारे चार लाख."

"आणि आपण लोक किती ?"

"बत्तीस कोटि."

"अरे इतके पुष्कळ असलों तरी आपल्याजवळ तरवारी, बंदुका कुठें आहेत त्यांच्याबरोबर लढायला ?"

"मग नसेनात! दहा माणसांनीं एकदम हल्ला केला तर काय एक साहेब पकडतां येत नाहीं ? ते चार लाख आहेत; चार दाही चाळीस. आपले चाळीस लाख लोक पुरेत. म्हणजे काय अर्धी कोटि सुद्धां होत नाहींत कीं !"

तेव्हां असं करायचं. प्रत्येक गांवांत साहेब आहेत किती याच्या मुकाट्यानं याद्या करायच्या. आणि जितके साहेब एका गांवांत त्यांच्या दसपट आपले लोक त्या गांवांत तयार करायचे. अगदीं मुकाट्यानं हं ! त्यांच्याखेरीज इतर कुण्णा कुण्णाला कळूं द्यायचं नाहीं. आणि अगोदर ठरवून एक दिवशीं रात्रीं बरोबर बाराच्या ठोक्याला आपआपल्या गांवांत जिथं साहेब निजला असेल तिथं जायचं व एकदम दहाजणांनीं त्याला करायचं गिरफदार ! काय करतो एकटा साहेब ! आणि त्याचं काम करायला आपल्या दहांपैकीं द्यायचं एकाला नेमून ! दुसरे दिवशीं सकाळीं सहा वाजतां लोक जों उठतात तों काय ? राज्य आपलं हिंदुस्थानचं ! किती किती छान होईल रे असं केलं तर ! मग टिळकांना सोडवून आणायचं व कॉंग्रेसचे मुख्य करायचं एकदम !

शेवटीं 'देवा ! कधीं रे टिळक आमचे सुटणार ?' म्हणून गर्हिवरून

सर्व रडलों. इतक्यांत आकाशांत एक ढगाचा लांबच लांब पांढरा पट्टा दिसला. तेव्हां बाबू-चगीचा भाऊ-डोळे पुशीत म्हणाला, “ तो पहा एकाचा पट्टा. देवानें आपलें म्हणणें ऐकलें. आपले टिळक आणखी एक वर्षानें खास सुटणार.” आणि जणूं कांहीं देवानें आपल्याला आश्वासन दिलें आहे अशा आनंदांत आम्ही तेथून उठलों. आज ही गोष्ट वाचून माझ्याप्रमाणेंच कित्येकांना कदाचित् वाटेल कीं,

“ It was a childish ignorance,
But now ’tis little joy,
To know I am further off from Heaven
Than when I was a boy.”

## स्वप्नदृश्य : : ४

"I slept and dreamt that life was beauty
I woke and found that life was duty."

एकादें गोड स्वप्न पडावें. तें किती तरी मोठें होतें असें वाटतें; पण शास्त्रज्ञ म्हणतात कीं, तें खरोखर कांहीं क्षणच असतें. कांहीं क्षण असोत कीं कांहीं तास असोत, त्या स्वप्नाची गुंगी दीर्घकाळ टिकते हें खरें नाहीं का? पुन्हा त्या अभासामध्येंच गुंगून राहावेंसें वाटतें माणसाला! गोड स्वप्नाच्या कांहीं क्षणांनीं असाच माझ्या आयुष्याचा दिवस मोहरून गेल्यासारखा वाटतो; पण स्वप्नाचं वर्णन स्वप्नगत शब्दांनींच होणं बरं, नाहीं बरं!

*   *   *

**दर्शने स्पर्शने वापि स्मरणे भाषणेऽपि वा।
यत्र द्रवत्यन्तरंगं स स्नेह इति कथ्यते ॥**

डेक्कन कॉलेज, पुणें, १-९-१०

दररोज नियमानें थोडा तरी अभ्यास करण्याचा सराव ठेवावा. थोड्या ओळी का होईनात, पण एकाद्या पुस्तकांतून लिहाव्या म्हणजे

अक्षर सुधारेल व शुद्धलेखनहि चांगलें होईल. मात्र हें सर्व करीत असतांना एक गोष्ट मात्र अवश्य ध्यानांत धरली पाहिजे ती ही कीं, ह्या लिहिण्यावाचण्याच्या गोष्टी करावयाच्या त्या घरांतील सर्व काम आटोपल्यावर करावयाच्या. घरांतील काम अर्धेंच टाकून वाचीत अगर लिहीत बसणें चांगलें नव्हे. दुपारचे वेळेस सर्व कामें संपलीं व आपल्यास स्वस्थता मिळाली म्हणजे निरुद्योगीपणांत वेळ घालविण्या-ऐवजीं मग हा अभ्यास तुम्हीं करावा.

तुझ्या पत्रांतील कांहीं चुका सुधारून परत पाठवीत आहे. विशेष हा शब्द 'विषेश' लिहिणें चूक आहे. तसेंच परीक्षा शब्द पाहिजे 'परिक्षा' बरोबर नाहीं.

*　　*　　*

डेक्कन कॉलेज, पुणें, १५-९-१०

तुला शाळेंत न धाडण्याविषयीं ती. नानाकाकांना लिहिण्याबद्दल तूं लिहितेस; पण माझ्या हातांत ह्यासंबंधानें विशेष काय आहे बरें? 'माझ्या पत्नीला तुम्ही शाळेंत पाठवूं नये' असें मला कसें म्हणतां येईल? अशानें वडील माणसांची अमर्यादा केल्यासारखें नाहीं का होणार? एकादे वेळीं आपल्या मनांत नसूनही एकादी गोष्ट वडील माणसांसाठीं करणें जरूर असतें. याबद्दल ती. रा. तात्यासाहेबांचें मत घेण्याबद्दल तुझ्या मामंजींनीं ती. नानाकाकांस लिहिलें आहे.

*　　*　　*

डेक्कन कॉलेज, १९-९-१९१०

तूं आतां माहेरीं आल्यावर लिहिण्यावाचण्याचा चांगला अभ्यास कर. अशी अभ्यास करण्याची संधि तुला वरचेवर मिळणार नाहीं. दररोज लिहिण्याचा सराव ठेवून आपलें अक्षर व शुद्धलेखन सुधार. अजून तुझा मराठीचा अभ्यास पूर्ण झाला नाहीं तो तूं चांगला पुरा केलास तर इतर कांहीं शिकविण्यास मला उमेद वाटेल. स्त्रियांना

हिशेब करणें, जमाखर्च लिहिणें आलें पाहिजे. यापुढें तुला संस्कृत व इंग्लिशही यावें असें मला वाटतें. तुला वाचण्याची जी हौस आहे त्यानें मला फार आनंद होतो. शाळेंत न जातां तेथें जाऊन येणारी विद्या तूं घरींच अभ्यास करून शिकशील असें जें तूं आपल्या पत्रांत लिहिलें होतेंस तें खरें करून दाखीव. आतां तुला शाळेंत जाण्याची जी संधि आली आहे तशी फिरून येणार नाहीं. तर तूं ही संधि विनाकारण गेली असें मला वाटण्यास जागा ठेवूं नको.

* * *

सातारा-शहर, ९-१०-१०

तुझ्या पत्रांतील मजकुरही मला आनंददायकच होता. तूं आतां संस्कृत शिकत असून आतांपर्यंत विभक्त्या झाल्या व पहिल्या भाषांतर-पाठमालेचे १० धडे झाले हें वाचून बरें वाटलें. तुला संस्कृत शिकणें आवडतें हें समजून मला फार बरें वाटलें. मला, मी संस्कृत शिकावयास लागल्यापासून, ती भाषा फारच आवडूं लागली व हल्लींसुद्धां मला संस्कृतइतका दुसरा विषय फारसा आवडत नाहीं. संस्कृतमध्यें येवढें मात्र आहे कीं, प्रथम प्रथम आपणांस ही भाषा फार त्रासदायक वाटते. परंतु आपण हा त्रास न जुमानतां जर आपले प्रयत्न कायम ठेविले तर पुढें आपणांस तितका त्रास होत नाहीं व मग गोडीही वाटूं लागते. माझ्या पत्नीनें संस्कृत चांगलें शिकावें अशी माझी पहिल्यापासून इच्छा होती व आहेही. त्याप्रमाणें तूं संस्कृत उमेदीनें शिकत आहेस व माझ्याप्रमाणें तुलाही गोडी लागत आहे हें समजून माझी वर लिहिलेली इच्छा पूर्ण होणारसें दिसतें.

* * *

डेक्कन कॉलेज्, २-४-११

पायांत जोडा घालणें म्हणजे अगदीं सुधारकीपणाचें लक्षण व सुधारक म्हणजे कोणी तरी मोठा वाईट मनुष्य असें कांहीं नाहीं. तुझे

अशा तऱ्हेचे गैरसमज असूं नयेत येवढीच माझी इच्छा आहे. कोणी आम्हांस सुधारक म्हणणें म्हणजे आम्हांला नांवें ठेवणें असें मला वाटत नाहीं. खरोखर पाहतां सुधारक ह्याचा अर्थ कांहीं वाईट नाहीं. आपल्यांतील दोष असतील ते काढून टाकून आपली सुधारणा करणें यांत कांहींही वाईट नाहीं.

*   *   *

मला लिहावयास वाईट वाटतें कीं, आजपर्यंत तुझ्या कोणत्याही बाबतींत व्यवथिस्तपणा मला दिसला नाहीं. अव्यवस्थित व गबाळ्या माणसाबद्दल मला कधींही सहानुभूति वाटत नाहीं, व तोच गुण आपल्या माणसांत दिसला म्हणजे कसें वाटेल बरें. याबद्दल आज थोडेंच लिहिलें आहे; पण तूं पुष्कळ समजशील अशी आशा आहे.

*   *   *

डेक्कन कॉलेज, पुणें, ४-९-११

चि. वाग्भटाचे सांगण्यावरून तूं परीक्षेंत पास झालीस व त्यांत चांगले मार्क मिळून नंबर वर आला व एक स्कॉलरशिपही मिळाली हें समजून आनंद झाला. एकंदरींत लग्न झाल्यावर मध्यें बऱ्याच अडचणी येऊनही तुमचे शाळेंत एक वर्ष पुरें झालें तर!

हें तुझें शिक्षण चाललें असतांना कित्येक वेळां तरी आतां तें थांबणार असें दिसून मनाला वाईट वाटण्याचे प्रसंग आले. परंतु शेवटीं शाळेंत तुझी दुसरी इयत्ता तरी पूर्ण झाली. पुढील वर्षीं तुमचें शाळेंत जाणें होईल कीं नाहीं याबद्दल मला खात्री नाहीं. निदान इंग्रजी ४ इयत्तांपर्यंत तरी शिक्षण शाळेंत व्हावें अशी फार इच्छा आहे. मग पुढें मीच स्वतः तुला शिकवीन.

*   *   *

सातारा शहर, ७-९-१९११

तूं आपल्या त्या लिहिण्याला चर्पटपंजरी म्हणून नांव दिलेंस, परंतु मला ती चर्पटपंजरी अगदींच वाटली नाहीं.

लग्नाचे अगोदर तूं शाळेंत जर सारखी गेली असतीस तर सध्यां तूं इंग्रजी ५-६ व्या इयत्तेंत असतीस हें खरें; व तुला त्याचें आतां वाईट वाटतें हें साहजिकच आहे. तुला जेव्हां प्रथम मीं साताऱ्यास 'तुला शाळेंत जाणें आवडेल का?' म्हणून विचारलें त्या वेळेस तुझी इच्छा फारशी शाळेंत जाण्याची दिसली नाहीं व त्यांतल्या त्यांत हुजुरपागेंतील शाळेबद्दल तर तुझा वाईट ग्रह पाहून मला आश्चर्य वाटलें. मला ती. तात्यासाहेबांनीं तर सांगितलें होतें कीं 'चंद्राला लिहिण्यावाचण्याचा फार नाद आहे व तिला शिकण्याची फार हौस आहे' व मला तुझी शाळेंत जाण्याची नाखुषी कां असावी याचा यामुळेंच कांहीं तर्क होईना. असो. तुला आतां त्याबद्दल पश्चात्ताप झाला आहे व तुझा शाळेसंबंधानें जो पूर्वीं वाईट ग्रह याला होता तोही आतां दिसत नाहीं हें पाहून मला फार आनंद झाला. आपण केलेल्या एकाद्या चुकीबद्दल मनापासून वाईट वाटणें व पश्चात्ताप होणें हें एक पुढें सुधारणा होण्याचें चिन्हच आहे. आतां तूं फिरून आपलें शिकण्यासंबंधीं जर कांहीं वाईट मत असलें तर तें सोडून देऊन मन लावून अभ्यास केलास तर तुझ्या वाईट वाटण्यापासून फायदाच होईल. आपल्या हातून प्रथम चूक झाली अशी खात्री झाल्यावर मग आपण ती तशी होऊं न देण्याबद्दल प्रयत्न करतोंच. तुला जितकी शिकण्याची हौस असेल तितकें शिकविण्यास मला किती तरी आनंद वाटेल. मीं तुला वरचेवर सांगितलें आहेच, कीं तूं स्वतः घरीं अधिक वाचीत जा. शाळेंत चार-पांच इयत्तांपर्यंत इंग्रजी शिकण्यानें साधारण लिहिण्यावाचण्यापुरतें सुद्धां इंग्रजी येत नाहीं.

* * *

डेक्कन कॉलेज, ४-११-११

इंग्रजींत लिहिलेलीं दोन्ही पत्रें पोंचलीं. प्रथमच लिहिलेलीं पत्रें ह्या दृष्टीनें तीं बरीं आहेत. पण त्यांत चुका बऱ्याच झाल्या आहेत. सर्वच पत्र इंग्लिशमध्यें लिहिलें तर तुला अजून समजणार नाहीं म्हणून

नमुन्यासाठीं एक पत्र लिहून पाठविलें आहे. त्याच्याशीं तुझें पत्र ताडून पहा म्हणजे चुका कळतील.

ता. क.—इंग्रजींत वर Shreeram वगैरे पत्रांत लिहीत नाहींत. पत्राचे शेवटीं 'ही विनंति' असेंही ल्याहावयाचें नाहीं. 'विनंति' बद्दल शब्द 'रिक्वेस्ट'. त्याचें स्पेलिंग recuct नाहीं, खरें स्पेलिंग् request असें आहे. प्रयत्न मात्र चांगला साधला आहे.

* * *

सरदारगृह, मुंबई, ८-२-१९१२

पुण्याच्या प्लेगमुळें तुझी शाळा महिनाअखेर उघडेलसें वाटत नाहीं. तुला इंग्रजी चौथ्या इयत्तेंत जाण्याची हौस आहे तर प्रयत्नही विशेष केला पाहिजे. खरोखर पाहतां ह्या वेळेस, सर्व सुटीच असतांना तूं आपलें तिसरें रीडर पुरें करावयास हवें होतें. वर्गांतील मुलींपेक्षां आपणांस थोडेंसें जास्त येतें म्हणून थांबूं नकोस. तुला गोष्टी लवकर समजतात व तुझ्या ध्यानांतही सांगितलेली अगर वाचलेली गोष्ट लवकर राहते हें खरें. पण त्याचा पूर्ण फायदा करून घे.

* * *

१४-२-१२

तूं ती. नानाकाकांचेजवळ इंग्लिश शिकतेस हें समजून आनंद झाला. आतां अभ्यासांत येणाऱ्या अडचणी कोणास विचाराव्या हाही प्रश्न राहिला नाहीं. सर्व अडचणी मनमोकळेपणानें त्यांना विचारीत जाव्या. त्यायोगें त्यांना आनंदच होईल. तुम्हांला जितकी प्रेमळ सासरची मंडळी मिळाली आहेत तितकी फार थोड्या मुलींना मिळत असतील. याची प्रचीति अनुभवानें तुला आली आहे व आणखीही येईल.

यंदा एम्. ए. चा अभ्यास न करतां नुसत्या एल्एल्. बी. चा अभ्यास करून त्याच परीक्षेस बसावें असा माझा विचार आहे. एम्. ए. ची परीक्षा द्यावी ही कल्पना सोडावयाची नाहींच; पण यंदा बसावयाचें तें जरा पुढें येवढेंच. ती. तात्यासाहेबांचें म्हणणें असेंच आहे.

* * *

सरदारगृह, मुंबई, ७-३-१९१२

मी वरचेवर लिहीत आलों आहें कीं, शिक्षण मिळविण्याच्या उल्हासांत गृहकृत्यांकडे दुर्लक्ष होऊं नये. घरांत पुष्कळदां वडील मंडळी आम्हांस म्हणतात कीं, तुमच्या या शिक्षणाच्या फाजील आवडीनें तुमचे प्रपंचाची दुसरी बाजू लंगडी पडेल, गृहकृत्यांत स्त्रियांचें लक्ष राहणार नाहीं, घरांतील वडील मंडळीची अवज्ञा होईल व एकंदरींत शिक्षण सुखावह होणार नाहीं. व असें होणार नाहीं असें उलट आम्ही सांगत असतों.

तुला व सौ. शांताबाईला शाळेंत पाठविण्याचे विरुद्ध घरांतील बरीच मंडळी आहेत. त्यांचे मनाविरुद्ध केवळ आमच्या हट्टानें व ती. नानाकाकांची संमति त्यास आहे म्हणून, तुम्ही सध्यां शाळेंत आहां. तर तूं हें नेहमीं ध्यानांत बाळगून शाळेंतील अभ्यास उत्तम करून तेथील मिळणाऱ्या मानसिक व व्यावहारिक शिक्षणाचा चांगला फायदा करून घे व 'मी घरांतील मंडळींच्या मनाविरुद्ध उगीच गेलों' असें माझ्या मनाला वाईट वाटण्याचा प्रसंग आणूं नकोस.

* * *

महाबळेश्वर, १५-५-१९१२

एक दोन दिवसांपूर्वींच ती. नानाकाकांचें व आमचें तुमच्या शिक्षणाबद्दल बोलणें झालें. ते सर्व तुझी भेट झाल्यावरच तुला कळवीन. पण त्यांतील सारांश थोडक्यांत असा : तुझ्या मामंजींचें म्हणणें असें आहे कीं, एकदां तुमच्या अंगावर संसार पडला व एकदां का मुलाबाळांची काळजी तुमच्यामागें लागली, कीं तुमचें शिक्षण वगैरे सर्व शिथिल पडेल. माझें व वाग्भटाचें त्यांस असें आश्वासन होतें कीं, ज्या अर्थीं आतां शिक्षणाची गोडी तुम्हांस लागली आहे, त्या अर्थीं कितीही अडचणी मध्यें आल्या तरी त्यांतल्या त्यांत वेळ काढून तुम्ही आपलें ज्ञान वाढविण्याचा प्रयत्न करालच, व ही गोष्ट ती. नानाकाकांनीं आठवणीकरितां म्हणून आमचेकडून लिहून घेतली आहे.

च्यार वर्षांचे अवधींतच आम्ही म्हणतों ह्याची सत्यता तुम्हांस दिसून येईल असें आश्वासन आम्हीं त्यांस दिलें आहे. तर हें माझें म्हणणें तूं सत्य करून दाखविलें पाहिजेस. कोणतीही मोठी अडचण असली तरी ती न जुमानतां आतां हातीं घेतलेलें तूं आपलें शिक्षण पूर्ण करण्यास झटलें पाहिजेस. तुला कोणतीही मदत करण्यास तुझा पति अतिशय आनंदानें तयार आहे.

* * *

सरदारगृह, मुंबई, २१-१-१९१३

तूं नुकतेंच रीडर वाचण्यास आरंभ केला आहेस हें पाहून बरें वाटलें. मूल संभाळून वेळांत वेळ काढून दोन वर्षांत मॅट्रिकचे परीक्षेस बसण्याची तुझी इच्छा व उत्साह पाहून फार आनंद वाटतो. ह्या इच्छेस व उत्साहास जर दृढ प्रयत्नाची जोड मिळेल, तर इच्छित गोष्ट होणें अगदीं अवघड नाहीं. मूल झाल्यावरही मोठमोठ्या परीक्षांचा अभ्यास करून त्यांत उत्तम रीतीनें पास झाल्याचीं उदाहरणें आपल्याकडे आहेत. डॉ. आनंदीबाई जोशी यांनीं, दृढ प्रयत्न केल्यास स्त्रियांना कितीही अडचणी आल्या तरी उत्तम विद्यार्जन करतां येईल याचें उदाहरण घालून दिलें आहे. तद्वतच सध्यां पुण्यासच सौ. सीताबाई परांजपे— रँगलर परांजपे यांच्या पत्नी— ह्यांचेंही उदाहरण आहे. त्या दोन्हीही स्त्रिया कांहीं श्रीमंत परिस्थितींत असलेल्या नाहींत. पण आपल्या दृढनिश्चयानें त्यांनीं आपलें कार्य घडवून आणलें. तुझाही तसा दृढनिश्चय व जोराचा प्रयत्न होईल तर तुलाही मॅट्रिकसारखी परीक्षा पास होणें अवघड नाहीं.

स्वतःच्या बालकाचें वर्णन त्याचे मातेनें केलेलें वाचून कौतुक वाटलें. मातेच्या हृदयाची ओढ बालकाकडे असणें हा सृष्टिनियमच आहे. मला वाटतें कमले! आतां तुला पूर्वींइतकी माझी आठवण होत नसेल! असो.

* * *

सरदारगृह, मुंबई, २९-१-१९१३

या महिन्याच्या मनोरंजनचा अंक तुझा लेख वाचण्यासाठीं मोठ्या औत्सुक्यानें उघडून पाहिला, पण संपादकानें ह्या अंकांत तो न दिल्यानें मला त्याचा फारच राग आला. असो.

* * *

सरदारगृह, मुंबई, ८-३-१९१३

सध्यां तुला वाचण्याजोगीं काय पुस्तकें आहेत हें समजून घेण्याचें मला वेडच लागलें आहे. माझ्या मित्रमंडळींत कोणाला एकादें सोपें व चांगलें पुस्तक माहीत आहे का म्हणून वरचेवर चौकशी करीत असतों. तुझें पुष्कळ इंग्रजी वाचन व्हावें व तुला उत्तम इंग्रजी यावें ह्याबद्दलच्या माझ्या अत्युत्कट इच्छेमुळें मी सध्यां पुस्तकें जमविण्याच्याच नादांत असतों व तसें पुस्तक दिसल्याबरोबर तें मी स्वतः वाचून टाकतों. तूं पुस्तकें वाचून काढण्यांत हार घेतेस, कीं मी तुला पुस्तकें देण्यांत हार जातों तें पाहूं. Oliver Twist तुला समजेल असें वाटतें. Pride and Prejudice ही समजेल तितकें वाचून काढ. दोन वर्षांत मॅट्रिक होणें हें मनाशीं ठरविलें आहेस ना! ह्या सुटींत दररोज तुला मी एक तासभर इंग्रजी शिकवीत जाईन. परंतु तुझा स्वतःचा प्रयत्न मात्र चालू ठेव. इंग्लंडचा इतिहास मॅट्रिक परीक्षेला आहे. बापूजवळ Empire History of England आहे ती घेऊन वाच. ती फार सोप्या इंग्रजी भाषेंत लिहिली आहे. तुला सहज समजेल. गणित व विशेषतः संस्कृत यांजकडेही आठवड्यांतून तीन-चार वेळां लक्ष द्यावें. माझ्याकडून इतका अभ्यास कसा होईल अशी भीति मनांतून अगदीं काढून टाकावी. तुझ्यापेक्षां मंदबुद्धीचीं मुलें सुद्धां प्रयत्न करून बी. ए. पर्यंत येतात तर तुझ्याकडून मॅट्रिक परीक्षेपर्यंतचा अभ्यास होणार नाहीं असें मला शक्यच वाटत नाहीं. तुझ्या प्रयत्नांत मात्र कमतरता होऊं देऊं नको; व मॅट्रिकच काय पण बी. ए., एम्. ए. पर्यंतही जितकी तुझी हौस असेल तितकें शीक.

# तपोवनांत

५

दूर सिंहगड आणि तोरणा,
मुठा नदीच्या पाटाखालीं
बागमळ्यांची दाटी झाली,
सदैव वस्त्रें हिरवीं ल्याली
अशी वनश्री खुले शोभना ॥

साक्ष सविस्तर अबलास्थेची
पाहुनी खुडे मन आल्हादीं,
पहा एक पण खोली साधी,
आण्णा तेथें शिकवित आधीं
मुहूर्तमेढच ती संस्थेची ॥

माधवराव पटवर्धनांनीं आश्रमाचें वर्णन मोठ्या रसिकपणानें केलें आहे. आश्रम खरा आहेच तसा. वनदेवाच्या देवळापाशीं वळलें कीं दूरवर कालव्याच्या पलीकडे तांबडीं कौलें असलेल्या इमारती झाडीं-तून उठून दिसूं लागतात व जसजसें जवळ जावें तसतशी तेथील जीवनाची हालचाल डोळ्यांत भरूं लागते. आधीं शिक्षणसंस्था म्हटल्या म्हणजे त्यांतील जीवन हें थोडेंसें ध्येयप्रधान असतें

अशी लोकांची कल्पना असते. त्यांतून आश्रम ही संस्था विशिष्ट ध्येयानें प्रेरित होऊन काढलेली. त्यामुळें त्यांत आदर्श वातावरण असलें तर आश्चर्य नाहीं. प्रत्येकालाच आपला शिक्षणाचा काल रम्य बालपणाप्रमाणें रम्य व आदर्शभूत वाटत असतो. पण त्यांतल्या त्यांत आमच्या शिक्षणाचा काल जास्तच तसा होता असें मला म्हणावेंसें वाटतें. मुख्य म्हणजे आण्णांचा येणारा प्रत्यक्ष संबंध व त्यामुळें मुलींना वाटणारें आण्णांबद्दलचें प्रेम व आदर. आण्णांच्या कार्याचा पसारा त्या वेळीं आतांपेक्षां लहान. युनिव्हर्सिटीच्या पसाऱ्याला तर तेव्हां नुकती सुरवात झालेली. त्यामुळें आण्णांचा विद्यार्थिनींशीं प्रत्यक्ष संबंध जास्त येई. मुलींना आण्णा ही एक व्यक्ति वाटे. पाठीवर धान्याचें ओझें घेऊन दररोज चार मैल चालत येणारे आण्णा हा आजच्या मुलींना 'Jach with the Lantern' प्रमाणें नुसता कविसंकेत वाटतो. कारण आण्णांच्या संस्थांचा पसारा अखिल भारतीय झाला. त्यामुळें अण्णा सर्वांचेच झाले; म्हणजे पर्यायानें कोणाचेच नव्हेत. पूर्वींच्या विद्यार्थिनींना आण्णांचे गुणदोष जास्त माहिती. आण्णा मुलींची काळजी किती घेतात, शिकवतात कसे, रागावतात केव्हां व कसे, त्यांच्यांत विनोदबुद्धि किती आहे, गाण्याची आवड किती आहे, एकदां निश्चय ठरला म्हणजे निष्ठुरही कसे होतात हें जुन्या विद्यार्थिनी जसें अनुभवानें सांगूं शकत, तसें आतांच्या त्यांच्या विद्यापीठांतील विद्यार्थिनींना सांगतां येणार नाहीं. गणित शिकवितांना विद्यार्थिनीला कळेनासें झालें म्हणजे 'दगडे, आतां किती सांगूं तुला' म्हणून आण्णा कसे रागावले, तसेंच 'प्रिलिमिनरी परीक्षेचे वेळीं घंटा झाली व विद्यार्थिनी जास्त वेळ मागूं लागली तेव्हां "काय वेळ पाहिजे? मरेपर्यंत वेळ घे. पण काय पेपरांत लिहितेस व किती मार्क मिळवितेस तें पाहूं दे" असें म्हणून विद्यार्थिनींना भरपूर वेळ आण्णांनीं सुपरवायझर असतांना कसा दिला इत्यादि व्यक्तिवैशिष्ट्यनिदर्शक आठवणी जशा

पूर्वीच्या विद्यार्थिनींना सांगतां येतील तशा आतांच्या विद्यार्थिनींना सांगतां येणें शक्य नाहीं. उलट असेही क्वचित् प्रसंग घडतात.

प्रिन्सिपल् असतां माझी पद्धति असे कीं, सातारच्या कन्याशाळेंतील ज्या मुली पुण्यास एंट्रन्स् परीक्षेस येतील त्यांना घरीं फराळास बोलवावयाचें. एक वर्षीं अशाच कांहीं मुलींना मीं बोलाविलें. आण्णा त्या दिवशीं कॉलेजवरच होते. मुलींना स्वाभाविक इच्छा असते कीं आण्णांचा आपला परिचय व्हावा. आण्णांची भेट होणें व त्यांच्याशीं बोलावयास मिळणें व युनिव्हर्सिटीच्या गुणदोषांबद्दल त्यांचेबरोबर चर्चा करतां येणें, ही एक स्वतःच्या सन्मानाची बाब वाटत असते; म्हणून मीं मुलींचेबरोबरच आण्णांनाही फराळास बोलाविलें. सातारचे रा. पंढरीनाथ घाणेकर हेही त्या दिवशीं फराळास होतेच. स्वाभाविक अशी अपेक्षा, कीं मुली त्यांच्याशीं संभाषण करतील, शिक्षणविषयक चर्चा होईल इ. आण्णांचा स्वभाव आपण होऊन संभाषण सुरू करण्याचा नाहीं. तेव्हां ते बोलेनात व आण्णा आपल्या पंक्तीला आहेत या गोष्टीकडे विद्यार्थिनींनींहीं पूर्ण दुर्लक्ष करून आपापसांत थट्टाविनोद करण्यास सुरुवात केली. संभाषणाला योग्य वळण कसें द्यावें या विचारांत मी पडलें. मुलींना दिलेली सूचनाही कळेना. असें होतां होतां आण्णा व घाणेकर फराळ आटोपून विडा घेण्यास दुसऱ्या खोलींत गेले.

तेथें तरी कांहीं संभाषण होईल अशा समजुतीनें मी तिकडे गेलें तों मुली हात धुऊन परस्पर निघून गेल्या. मला याचा अत्यंत राग आला. संध्याकाळीं त्यांपैकीं कांहीं मजकडे आल्या असतां त्यांच्या या व्यवहारशून्येबद्दल मीं त्यांची भरपूर हजेरी घेतली.

"एक आदर राहूं दे. पण साधा व्यवहार तरी आहे कीं नाहीं, कीं आपल्या पंक्तीस जें कोणी मोठें मनुष्य असेल त्याचेबरोबर संभाषण करावयाचें. लोकांना आण्णांची ओळख व्हावी असें वाटतें व तुम्हीं ते तुमच्या पंक्तीला असतां त्यांचेकडे दुर्लक्ष केलेंत ? तुमची ओळख व्हावी म्हणून मीं मुद्दाम त्यांना बोलाविलें.

" आम्हांला काय माहीत आमच्यासाठीं तुम्हीं त्यांना बोलाविलें ? " विद्यार्थिनी.

" मग तुम्हांला काय वाटलें कीं लहान मुलांना पंक्तीला आणून बसवितात तसें त्या दोघांना तुमच्या पंक्तीला बसविलें होय ? "

पण हें उदाहरण अपवादात्मक होय. सर्वच मुली आण्णांचेबद्दल इतक्या उदासीन असतात अगर इतक्या शिष्ट व व्यवहारशून्य असतात असें नाहीं. तरी पण आजच्या विद्यार्थिनींना प्रत्यक्ष परिचयाच्या अभावीं आण्णा ही व्यक्ति वाटत नसून एक कविसंकेत वाटतो.

हिंगण्यास सर्व संस्था म्हणजे शाळा, कॉलेज वगैरे एकत्र होत्या त्या वेळीं आण्णांचा विद्यार्थिनींशीं जास्त संबंध येई. आण्णा हिंगण्यास असले व कांहीं कारणानें त्यांच्याशीं संभाषणाचा प्रसंग आला, त्यांचेबरोबर फिरावयास मिळालें तर तो दिवस जास्त आनंदाचा वाटे. आणि म्हणून 'ज्याला त्याला आपले शिक्षणाचे दिवस उत्कृष्ट वाटणारच' हा येणारा आक्षेप सहन करूनही म्हणावेंसें वाटतें कीं, " छे! पण आमच्या वेळेसारखा हिंगण्याच्या इतिहासांतील कालखंड दुसरा चांगला क्वचितच असेल." त्या कालखंडांत घडलेल्या गोष्टी म्हणजे युनिव्हर्सिटीची स्थापना व आण्णांची साठ वर्षांची ज्युबिली. कारण आण्णांच्या सर्व कामगिरींत सर्वांत मोठी कामगिरी म्हणजे युनिव्हर्सिटी. साठावी ज्युबिली म्हणजे पहिली ज्युबिली. पुढें मग असल्या महोत्सवांची सवय त्यांना झाली व सवयीनें अपूर्वता कमी होते. तेव्हां आण्णांचे आयुष्यांतील अत्यंत महत्त्वाच्या ज्या दोन गोष्टी, त्या, त्या वेळीं घडत होत्या व म्हणून तो कालखंड उत्कृष्ट होता असें म्हणावेंसें वाटतें.

अण्णा बहुतेक वेळ फिरतीवर असत. पण जे काय थोडे दिवस आश्रमांत असत त्या वेळीं बहुतेक प्रार्थना घेत. आण्णा आले म्हणजे मुलींना उत्साह वाटे. एकदां गॅदरिंग वगैरे असाच समारंभ होता. आण्णा सकाळींच आले होते व म्हणून समारंभासाठीं मुलींनीं विशेष पद तयार केलें.

6844

शिशुच्या प्रेमयोगें । झणिं धांव घाली ।
या बालिकांचें । कौतुक करण्यास ।
प्रिय माय आण्णाही । धांवुनी आली ॥

या पद्यांत ग्रथित केलेली कल्पना 'प्रिय माय आण्णा' ही सार्थ होती. मुलींना आण्णा म्हणजे 'माय' वाटे. आण्णांच्या आश्रमाचे अभावीं आपली काय स्थिति झाली असती तें विद्यार्थिनींना कळे व सुकून गेलेलें—निर्माल्य झालेलें फूल पुन्हा टवटवीत व्हावें त्याप्रमाणें आपलें आयुष्य आण्णांच्या प्रेरणेनें पुन्हा विकसित होत आहे, त्यांनीं आपणांस जीवदान दिलें आहे असें वाटे. लोकांचे घरीं स्वयंपाक करीत, मोलमजुरी करीत, निदान कोणा नातेवाइकाला भारभूत होऊन अडगळीप्रमाणें आयुष्याचे दिवस काढण्याचा ज्यांना प्रसंग आला असतां, त्यांच्या कर्तबगारीच्या विकासाला संधि मिळाली आणि स्वाभिमानानें व स्वावलंबनानें आयुष्य घालवितां आलें तेव्हां त्यांना आण्णांचेबद्दल जिव्हाळा वाटला नाहीं तरच आश्चर्य.

माझा जो प्रथम आश्रमाचा संबंध आला तो बनुताईमुळें. आप्त-संबंधामुळें त्या सातारला येत व त्या वेळीं बोलतां बोलतां आश्रमाच्या कार्याचा उल्लेख येई; एकोणीसशें तेरा व चौदा हीं दोन वर्षें सातार-ला असतांना स्वाभाविकच पुढें काय करावयाचें याचा सारखा विचार माझे मनापुढें उभा असावयाचा. शिक्षण पुरें करावयाचें ही पहिली गोष्ट. परंतु शंभर वजा पंधरा वर्षांच्या उरलेल्या आयुष्याचा उपयोग काय करावयाचा हा प्रश्न मला पुष्कळदां वेड लावी. आतां-पर्यंत 'आहे जीवित काय हो पलिकडे हें काय त्याच्या असे' असा प्रश्नच कधीं माझेपुढें आला नव्हता. आयुष्य ही एक एका आनंदां-तून दुसऱ्या आनंदाकडे नेणारी पुष्पवाटिका आहे असेंच जणूं मला वाटे. पण आतां आयुष्याचा उपयोग काय हाच प्रश्न माझेपुढें येई. या वेळीं ज्या कांहीं पुस्तकांचा मला उपयोग झाला तीं म्हणजे अहल्या-बाईचें चरित्र. हें पुस्तक तेव्हां नुकतेंच प्रसिद्ध झालें होतें. शिवाय

ताई घरांत वेदान्त विषयावरील पुस्तकें वाची. गीता, विशेषतः गीता-मृतशतपदी, ताई आवडीनें वाची व तिच्यासाठीं म्हणून हीं पदें मला पुष्कळदां उतरून घ्यावीं लागत त्यामुळें लिहितां लिहितां पाठ होऊन जात. त्यांत येणारे आत्म्याच्या अविनाशित्वाबद्दल विचार, कार्या-कार्यविवेक इ. माझ्या विचाराला चालना देत. 'हें भ्याड ढिलेपण येथ नये कामा। हें सकल सांडुनी उठि रे संग्रमा।' इ. पाठ असलेल्या ओळींचा विचार मी करूं लागे व एकंदरींत बराचसा त्या विचारसरणीचा मनावर परिणाम होता. आयुष्य हें फुकट जाण्यासाठीं नाहीं. दुःखाचे प्रसंग माणसावर आणण्यांत कांहीं तरी गूढ हेतु असेल. भोंवतालीं पसरलेली स्त्रियांची— विशेषतः विधवांची— स्थिति आतां जास्त डोळ्यांत भरे व वाटे आपलीं माणसें जास्त विचारी व उदारमतवादी आहेत म्हणून; नाहीं तर समाजांतील आपलें आजचें जिणें असेंच केविलवाणें आहे. तेव्हां भोंवतालच्या दुःखद परिस्थितीची जाणीव आपल्याला स्वतःच्या अनुभवानें का होईना जर होते आहे, तर ती सुधारण्याकडे उरलेल्या आयुष्याचा विनियोग कां करूं नये? पण हें व्हावें कसें? एकेका दुःखी स्त्रीला मदत करावयाचें म्हटलें तरी, मनुष्य किती करूं शकेल. पण यापेक्षां समाजाची विचारसरणीच अशी पालटतां येणार नाहीं का, कीं ज्या योगानें अशी परावलंबी व केविलवाणी स्थितिच होणार नाहीं. वैधव्य हें पूर्वजन्मीच्या पातकाचें फल, विधवा स्त्री देवपूजा इ. पवित्र गोष्टींत मदत करण्यास निषिद्ध व एकंदरींत घराला व समाजाला भार. ही स्थिति जाऊन समाजांतील एक व्यक्ति या नात्यानें जगण्याचा तिला अधिकार येणार नाहीं का?

या वेळीं मनांत उडालेली खळबळ पुष्कळदां कवितेचे रूपानें बाहेर येई. अनेकांपैकीं एक कडवें आठवतें:

**सुखदुःखीं सहभागी आपण पतिच्या जर सहचरी।**
**लोटितां कर्तव्या कां दुरी।**

**कार्य पतीचें या जगतीं जें अर्धस्फुट राहिलें।**
**पाहिजे आपण तें पुरविलें।**
**आत्मा हा अविनाशी त्याला अंत कधींही नसे।**
**स्थूल हा देह मात्र जातसे।**
चाल **हें सत्य मानुनी परोपकारा करी**
**तव विफल जन्म हें मानुं नको क्षणभरी।**
**तव चित्तवित्त दीनांना अर्पण करी।**
चाल प. **देश आपुला सदन मानुनी तव कर्तव्या करी।**
**दीन ते समज लेंकरें खरीं॥**

'देश आपुलें सदन' मानून काम करावें हें ठीक. पण आचरणांत यावें कसें? का देश हें घर समजून प्रथम सर्व देशाचा केर काढावयाचा? कामाला सुरवात करावयाची ती एकादा प्रश्न हातीं घेऊनच करावयास पाहिजे. करावयास पाहिजेत अशा अनेक गोष्टी आहेत. कोणती करावयाची? बाजारांत गेलेला मनुष्य पुढें मांडलेल्या अनेक सुंदर वस्तु पाहून प्रथम सर्वांत उत्तम जी गोष्ट असेल तिजकडे आकृष्ट होतो. पण शेवटीं प्रत्यक्ष विकत घेतांना आपल्या खिशांतील पैशाच्या ऐपतीप्रमाणेंच बेताची वस्तु घेऊन येतो. देशसेवेचें तसेंच आहे. करावयाचें म्हटल्याबरोबर इतकीं पर्वतप्राय कामें पुढें पडलेलीं दिसतात, कीं काय करावें हें बरोबर कळत नाहीं. पण शेवटीं उपयुक्त काम व आपली पात्रता या दोन रेषांचा जेथें छेद जाईल तें काम आपलें समजून केलें तर कांहीं तरी करतां येतें.

अशा तऱ्हेचे प्रश्न पुष्कळदां निघत. वाग्भट, घाणेकर बंधु व मी या विषयावर चर्चा करीत असूं. असाच एकदां विचाराचा प्रश्न आला त्या वेळीं बनूताई अहो सातारला होत्या. आश्रमाचीं थोडीं माणसें, वारूबाई, सीताबाई, गंगूबाई, मावशी वगैरे मीं पाहिलेलीं होतीं. पण आश्रमाच्या कामाची मला विशेष माहिती नव्हती. स्त्रियांना शिक्षण देऊन स्वावलंबी करण्याचा असा प्रयत्न आण्णांनीं चालविला आहे, आपणही त्यांच्या विद्यार्थिनींपैकीं एक असून, आपलाही त्यांचे संस्थेंत

काम करण्याचा विचार आहे वगैरे गोष्टी त्या वेळीं बनूताईंनीं मला प्रथमच सांगितल्या व अशा रीतीनें त्या संस्थेकडे माझें लक्ष वेधलें. मला वाटतें एका संमेलनाचे निमित्तानें मी प्रथम हिंगण्यास गेलें व तीनचार दिवस तेथें राहून तेथील कार्यक्रम पाहिला. कु. कृष्णाताई ठाकूर (आतां श्री. सरलाबाई नाईक) त्या वेळीं सुपरिंटेंडेंट होत्या. हुजुरपागेचें वातावरण सरकारी व हिंगण्याचे घरगुती. ताई, मावशी, काकू, आण्णा, दादा, तात्या, नाना इ. नांवें ऐकून एका मोठ्या कुटुंबांत आपण आहों असें वाटे. सुपरिंटेंडेंट कितीही चांगली असली तरी युरोपिअन व त्यांतल्या त्यांत 'जित-जेते' असा संबंध असलेल्या देशांतील, त्यामुळें तिजबद्दल इतका जिव्हाळा उत्पन्न होणें आणि शिक्षक व विद्यार्थी एका ध्येयानें प्रेरित झालेले असणें शक्य होत नाहीं. साताराच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्यें मी एक वर्षच होतें; पण चालक जर विशिष्ट ध्येयानें प्रेरित झालेले असतील तर शाळेच्या वातावरणांत कसा फरक होतो हें अनुभविलें होतें. हिंगण्याचे बाबतींतही मला तसेंच वाटलें. निवळ सरकारी व निवळ घरगुती वातावरण यांतील कोणतेंही एक पूर्ण निर्दोष नाहीं. दोहोंतील फायदेतोटे आज मला दिसत आहेत. पण त्या वेळीं या घरगुती वातावरणाची व त्यांतील ध्येयनिष्ठ दृष्टीची छाप माझे मनावर बसल्याखेरीज राहिली नाहीं. या वेळींही माझी भूमिका प्रेक्षकाचीच असून इकडे मी कधीं प्रत्यक्ष ओढली जाईन असें मनांत येण्याचें कारण नव्हतें. हिंगण्यास शिक्षणक्रम त्याच वर्षीं मॅट्रिक्युलेशनपर्यंत सुरू झाला होता. पण पुण्यास घरीं राहून मी बी. ए., एम्. ए.पर्यंत सहज शिकूं शकत होतें. युनिव्हर्सिटीची कल्पना तेव्हां नव्हतीच. ती पंधरा सालच्या (सामाजिक परिषदेमध्यें) डिसेंबर महिन्यांत आण्णांनीं अध्यक्ष या नात्यानें पुढें मांडली, योगायोग असा कीं १९१६ सालीं विद्यापीठाची कल्पना दृश्य स्वरूपांत येऊन आश्रमाची शाळा महिला विद्यापीठाला जोडली गेली व पहिली एन्ट्रन्स परीक्षा होऊन कॉलेजचें पहिलें वर्ष सुरू झालें.

तात्या या विद्यापीठाच्या कल्पनेला सर्वस्वी अनुकूल व पहिल्या सिंडिकेटचे सभासद. मीही या वर्षीं मॅट्रिकला जाणार होतें म्हणून आण्णांचें लक्ष स्वाभाविक मजकडे, ओढलें जाऊन मी पुढें कोणता अभ्यासक्रम घेणार याची चौकशी त्यांनीं सुरू केली व त्याचा परिणाम मीं हा शिक्षणक्रम स्वीकारला.

हिंगण्यास आलें त्या वेळीं श्रीधर लहान—चार वर्षांचा होता व अजून मला दूर सोडून राहणें शक्य नसल्यामुळें, त्याला मजबरोबरच हिंगण्यास आणला. आठपंधरा दिवसांत तो तेथें मिसळला व मी तासाला गेलें तरी वसतिगृहांत खेळूं लागला. आणखी एक वर्षानें तो गांवांत ताईजवळ राहूं लागला आणि नंतर सातारला राहूं लागला. सुरवातीला कांहीं महिने असे वाटे: सरळ चाललेला अभ्यासक्रम सोडून हा अगदीं नवीन मार्ग आपण स्वीकारतों हें चुकत तर नाहीं ना? परंतु लवकरच तेथील विद्यार्थिनी व शिक्षक यांची माहिती झाली आणि मी त्यांत पूर्णपणें मिसळलें. हिंगण्याबद्दलच्या सुरवातीच्या माझ्या कल्पना फार मोठ्या होत्या. या ठिकाणीं हेवेदावे नाहींत, मत्सर नाहीं, प्रत्येक गोष्ट येथें परोपकाराचे दृष्टीनें केली जाते. फार काय पूर्वींच्या तपोवनाप्रमाणें वाघ, सिंह व हरिणी एकत्र पाणी पितात असें हें ठिकाण असणार असें मला वाटे. पण अनुभवानें तें चुकीचें ठरलें. शेवटीं वाघसिंह ते वाघसिंहच राहतात व हरिणी त्या हरिणीच! सिंहाचा वाटा ( Lion's share ) शेवटीं बहुमताचा सिंह ताब्यांत ठेवणारालाच मिळतो. पण बहुमतराज्यपद्धतीचा भस्मासुर एकदां उत्पन्न केल्यावर —त्याहून जास्त चांगली पद्धति अमलांत येईपर्यंत —तो ज्याचे ज्याचे डोक्यावर हात ठेवील त्याला मुकाट्यानें भस्मसात् व्हावें लागतें. हें थोडें अप्रासंगिक खरें, तरी पण प्रसंगानुसारच होय!

इतर सामान्य म्हटल्या जाणाऱ्या ठिकाणांप्रमाणें हेंही एक मनुष्य-कृत क्षेत्र आहे. येथें हेवेदावे, मत्सर, भांडणें सर्व कांहीं आहेत. कदाचित् इतर ठिकाणांपेक्षां जास्त तीव्रही असतील. मीं कल्पनासृष्टींत रंग-

विल्याप्रमाणें हें रामराज्य नव्हतें व हल्लीं तर मला असें रामराज्य कोठें असूं शकेल काय अशी शंका येते. मानवाची प्रमादशीलता जरी या संस्थेंत होती, तरी कांहीं उपयुक्त कार्य करण्याची इच्छा इतर ठिकाणांपेक्षां जास्त तीव्रतर होती. विशिष्ट गुणांनीं युक्त, अत्यंत ध्येयनिष्ठ अशा कांहीं थोड्या व्यक्ति प्रत्येक ठिकाणीं असतात व त्यांच्या व्यक्तिमत्वाची छाया पडून वातावरणाला तो रंग चढत असतो. मी मात्र वेडी. कल्पनेंतील रामराज्य येथें सापडेल व न सापडलें तेव्हां आपण तें निर्माण करूं शकूं अशा आशेनें प्रयत्न करीत अनेक वर्षें काढलीं.

पण ही शेवटची मनःस्थिति झाली. सुरवातीला हें वातावरण मला फार आशादायक वाटलें; नव्हे होतेंच तसें. नवनिर्मितीचा उत्साह तेथें मूर्तिमंत वावरतो आहे असें दिसे. नवीन कोणत्याही उपक्रमाची सुरवात झाली म्हणजे आण्णा त्या वेळीं मुलींना त्याची माहिती देत व मुलींनाही त्यामुळें वाटे कीं, या नव्या उपक्रमांत आपला हातभार आहे. विद्यापीठाची कल्पनाही तशीच मोठी मोहक होती. त्यामुळें जणूं कांहीं अत्यंत मोठी घटना घडून येत आहे, अण्णा ती घडवून आणीत आहेत व त्यास आपण हातभार लावला पाहिजे असें प्रत्येकाला वाटे. नवीन शिक्षणक्रम घेणाऱ्या विद्यार्थिनी गमतीनें म्हणत, “आम्ही आण्णांचे चालते बोलते विचार आहोंत.” जेव्हां जेव्हां वाढदिवस, संमेलन व इतर कांहीं निमित्तानें सभा होत त्या वेळीं आण्णा इतर सर्व सांगून शेवटीं दोन गोष्टींवर येत. “नवीन विद्यापीठ यशस्वी होतें कीं नाहीं याबद्दल लोकांना शंका येते. पण तुम्ही विद्यार्थिनी जर हें काम हातीं घ्याल, आपली कर्तबगारी दाखवाल तर लोकांच्या शंका दूर होतील; व या विद्यापीठांतील विद्यार्थिनी दुसऱ्या विद्यापीठापेक्षां कोणत्याही तऱ्हेनें कमी नाहींत हें त्यांना पटेल. प्रत्येकीनें असें ध्येय ठेविलें पाहिजे, कीं या माझ्या विद्यापीठासाठीं ‘मी कांहीं तरी करीन. दुसरी भीति अशी कीं तुम्हांला कोणी बी. ए. च्या बरोबरीनें नोकरी देणार नाहीं; कारण सरकारमान्यता नाहीं. प्रथम

कांहीं वर्षें हा त्रास होणार हें खरें. पण तुम्ही जास्त पैशाच्या नोकरीची अपेक्षा ठेवून लोकांकडे ती मागूं लागतात म्हणजे असें होणारच. प्रत्येक बी. ए.ला तरी मोठ्या पगाराची नोकरी मिळणारच कशा-वरून? सरकारी शाळांची संख्या मर्यादित आहे व कांहीं दिवसांनीं अशी वेळ येणारच कीं, बी. ए. होऊनही नोकरी मिळत नाहीं. तेव्हां बी. ए. झालों कीं स्वर्गाला हात पोंचले, पुढें सुखानें आयुष्य घालवितां येतें ही कल्पना सोडून द्या. पुणें-मुंबई सोडून जिल्ह्याच्या व तालुक्याच्या जागीं जा. अशा ठिकाणीं शिक्षणप्रसाराला वाव आहे आणि थोडे कमी पैसे मिळाले तरी चालेल पण काम चांगलें करूं, या विद्यापीठाची कल्पना लोकप्रिय करूं, असा निश्चय करा. आपलें विद्यापीठ अखिल भारतीय आहे व विद्यापीठाचा विस्तार होण्यास बाहेरगांवीं शाळा निघणें जरूर आहे. पूर्वीं मराठ्यांनीं उत्तरेकडे जाऊन अटकेवर झेंडा लावला. आजच्या विद्यार्थिनींनीं सर्व हिंदुस्थानांत जाऊन शाळा काढून शिक्षणाच्या बाबतींत अटके-वर झेंडा कां लावूं नये? तुम्ही काम करा व आपली उपयुक्तता पटवा म्हणजे लोक तुम्हांला आपोआप बी. ए.च्या तोडीच्या समजतील. मातृभाषेंतून शिक्षण असणें ही अगदीं सरळ कल्पना आहे. पण पराज्यामुळें ती क्रांतिकारक वाटते. तेव्हां तुम्ही असा निश्चय करा, व्रत घ्या, कीं ही कल्पना लोकप्रिय करण्यासाठीं आम्ही आमच्या आयुष्यांतील काळ खर्च करूं. नाहीं मिळणार फार तर मोठ्या पगारांची नोकरी. आधीं आम्हांला बी. ए.बरोबर माना म्हणून मान मागावयास लोकांकडे जातांच कां?"

अशा व्याख्यानांचा अत्यंत स्फूर्तिदायक परिणाम झालेला दिसे. एकदां असें भाषण आण्णा करीत होते, आम्ही ऐकत होतों. अटके-वर झेंड्याचें वर्णन होतांच माझे शेजारीं बसलेली एक माझी वर्ग-भगिनी मला हळूच म्हणाली, "माझं ठरलं. मी मराठीण होऊन उत्तर हिंदुस्थानांत शाळा काढावयास जाणार."

अशा या विचारसरणीमुळें कांहीं उलटही परिणाम होत. दोहोंपैकीं एकाद्याची अत्यंत स्तुति झाली कीं दुसऱ्याची निंदा गर्भित वाटते; आणि माणसांना बोलतांना व विचार करतांना पोंच न राहून त्यांतून दुसऱ्याचा अकारण अधिक्षेप होत आहेसें वाटून भांडणें आणि वाद निर्माण होत. असाच एक वाद म्हणजे बी. ए. जास्त कर्तबगार कीं जी. ए. जास्त कर्तबगार हा त्यांतून निघाला. चालकांची खटपट कीं, कांहीं मॅट्रिक झालेल्या मुली इकडे येऊन जर हा अभ्यासक्रम घेतील तर तो लवकर लोकप्रिय होईल. पण या अभ्यासक्रमाबद्दल हुजुरपागेच्या वातावरणांत व विद्यार्थिनींच्या मनांत पूर्ण तेढ. स्त्रियांना वेगळे विषय व मराठींतून शिक्षण; आणि मराठींतून शिक्षण म्हणजे इंग्लिश कमी, आणि इंग्लिश कमी म्हणजे काय नव्हेंच तें शिक्षण. अशी त्यांची विचारसरणी; यामुळें जी. ए. व बी. ए. यांच्यांतील सलोखा पुष्कळदां बिनसे. याचें एक उत्तम उदाहरण घडलें. १९२६।२७ साल असेल. आपला शिक्षणक्रम फर्ग्युसन कॉलेजच्या विद्यार्थिनींस समजावून द्यावा म्हणून त्यांना कॉलेजवर बोलाविलें होतें. अभ्यासक्रम समजावून सांगितल्यानंतर जी. ए. ही बी. ए. पेक्षां कमी कर्तबगार नाहीं हें सांगतांना आण्णांनीं उदाहरणें घेऊन नांवें सांगितलीं. परिणाम असा झाला म्हणतात, कीं मुलींना आपणांस आमंत्रण करून आपल्यावरच टीका केली असें वाटलें व त्या रागावून निघून गेल्या. पुढें आण्णांच्या आत्मवृत्ताच्या दुसऱ्या प्रतींत जी. ए. व बी. ए.ची तुलना करणारें एक कोष्टकच छापलें गेलें. त्यामुळें त्या मुलींचा राग जास्तच वाढला.

एकोणीसशें-अठ्ठावीस सालीं कन्याशाळेचा वाढदिवस झाला. आण्णांची पद्धति अशी असे कीं, भाषण करतांना आतांपर्यंत झालेल्या जी. ए. नीं काय कामगिरी केली तें सांगून, मग हा अभ्यासक्रम कर्तव्यक्षम करणारा आहे तेव्हां मुली इकडे पाठवा, अशी पालकांना व श्रोत्यांना विनंति करावयाची. त्याप्रमाणें आभार मानतांना आण्णांनीं सर्व वर्णन केलें.

पूर्वीच्या तुलनेनें बी. ए. विद्यार्थिनी आधींच रुष्ट झाल्या होत्या. या वर्णनानें त्या जास्तच रागावल्या. तुमच्या मुलींचें वर्णन करणें झालें तरी संमेलनप्रसंगीं आभारांत त्याचा समावेश करणें अप्रासंगिक होतें असें त्यांचें म्हणणें. अशाच एका संतप्त बी. ए. विदुषीला काव्य-स्फूर्ति होऊन पुढील 'जी. ए.'ची भूपाळी अगर प्रातःस्मरण लिहिलें गेलें.

### प्रातःस्मरण

(तारीख अंदाजें २८।२९।३० डिसेंबर १९२८ असावी. त्या प्रसंगीं गुरुवर्य आण्णा यांनीं कन्याशाळेच्या संमेलनाच्या वेळीं मानलेले "पाहुण्यांचे आभार." ह्या ओव्या ३१ डिसेंबरला बडबडतांना व नवीन वर्षाच्या घंटा ऐकण्याकरितां बसलें असतांना तयार झाल्या.—लेखिका)

**दिशा उजळल्या, पळाला काळोख, रविराय मुख,**
**दाखविल, आतां दाखविल ॥ १ ॥**
**स्मर माझ्या मना, दिव्य विभूतींना,**
**पंचकन्यकांना झडकरी—मना झडकरी ॥ २ ॥**
**अहल्या द्रौपदी, सीता मंदोदरी,**
**तारा ती बिचारी, पडे मागें—आतां पडे मागें ॥ ३ ॥**
**स्मरूं कोणा तरी, रामाच्या प्रहरीं,**
**स्मरा गोदावरी कोकणची, बाळ केतकीची ॥ ४ ॥**
**नाट्यशास्त्रावरी, लिहिला प्रबंध,**
**चारशें सबंध, पानें त्याचीं, अहो—पानें त्याचीं ॥ ५ ॥**
**नाट्यभूषणांनीं, मराठी वाग्देवी,**
**पी. ए. ही सजवी, पहिल्यानें—आज पहिल्यानें ॥ ६ ॥**
**अलंकार करीं, घेउनी दुसरी;**
**ठाकलीसे दारीं, बाळूबाई—खरे बाळूबाई ॥ ७ ॥**

---

१ कु. गोदावरी केतकर, पी. ए. २ कु. बाळुताई खरे, पी. ए.
(सौ. मालतीबाई बेडेकर)

गेली इंग्लंडास, काय तो आवेश,
सहजीं प्रवेश, कॉलेजांत-तिला कॉलेजांत ॥ ८ ॥
गंगा[1] आली घरा, निघाली मथुरा[2],
पॅरिस शहरा; गांठण्यास-शीघ्र गांठण्यास ॥ ९ ॥
मनाचे उदार, विद्वान तेथले,
द्वार होई खुलें, शिक्षणाचें-ऐका शिक्षणाचें ॥ १० ॥
शाळा सरकारी, शिकवी संस्कृत,
मॅट्रिकचे क्लासांत, कृष्णाबाई[3]—खरे कृष्णाबाई ॥ ११ ॥
भाटवडेकर, जालंदरीं शांता[4],
मिळवीते आतां, दीडशेंतें—अहो दीडशेंतें ॥ १२ ॥
विखरी 'द्विदला*', विदुषी कमला[5],
स्वार्थत्यागी बाला, केळकरांची—N. C. केळकरांची ॥ १३ ॥
(तात्या ,, )
पांच वरुषांवरी, पंचप्राणांपरी,
वाढवी सातारीं, कन्याशाळा—प्रिय कन्याशाळा ॥ १४ ॥
आजन्मसेविका, बनूबाई[6] अहो,
बेळगांवीं जाहो, पाहण्याला—त्वरें पाहण्याला ॥ १५ ॥
करूनी प्रवास, विश्वविद्यालय,
स्थापण्याचें श्रेय, कोणा[7]लागीं—सांगा कोणालागीं ॥ १६ ॥
गृहीतागमा ही, पहिली शेवडे[8],
अण्णांना आवडे, वारूबाई—†बो. सु. वारूबाई ॥ १७ ॥
नवीन गाइले, दहा अवतार,
माझा नमस्कार, तयांलागीं—असो तयांलागीं ॥ १८ ॥

---

१ सौ. गंगुबाई पटवर्धन, बी. ए. २ कु. मथुराबाई केतकर, जी. ए. ३ कु. कृष्णाबाई खरे, जी. ए. (सौ. कृष्णाबाई मोटे) ४ श्री. शांताबाई भाटवडेकर, जी. ए. ५ श्री. कमलाबाई देशपांडे, जी. ए. ६ श्री. बनुबाई अहो, जी. ए. ७ श्री. सीताबाई अण्णेगिरी, जी. ए. ८ श्री. वारुबाई शेवडे, जी. ए. * द्विदल = 'गीत द्विदल' † बो. सु. = बोर्डिंग सुपरिंटेन्डेन्ट्.

नित्य स्मरणानें, जोडे पुण्यठेवा,
हाच भाव देवा, वसो मनीं—देवा वसो मनीं ॥ १९ ॥
पुण्य-देवतांचें, गुरुमुखांतुन,
ऐकिलें वर्णन, येथ दिलें—सर्व येथ दिलें ॥ २० ॥
प्रेम जगतीचें, आंधळें म्हणती,
त्याची ये प्रचीति, आज मला—खरी आज मला ॥ २१ ॥

आण्णांच्या खालोखाल मुलींच्या मनावर परिणाम करणारी व्यक्ति म्हणजे दादा दिवेकर. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांना आवडेल व समजेल अशी प्रार्थना दादांनींच घ्यावी. तुकारामाचे अभंगांचा त्यांचा विशेष व्यासंग. सुरवात तुकारामाचे अभंगांनीं करून, गूढ प्रवचनांत न शिरतां अत्यंत सोप्या व मार्मिक भाषेंत त्यांचें विवरण करण्याची त्यांची हातोटी असे. जातां जातां वेगवेगळे अनुभव त्यांत सांगावयाचे, प्रचलित विषयांची माहिती त्यांत यावयाची, कांहीं मार्गदर्शक तत्त्वें त्यांत असावयाची व तें ऐकतांना विद्यार्थिनी रंगून जावयाच्या. मुलींच्या खेळाचें वर्णन करीत 'तुझी माझी गट्टी तूऽट्टी' हें 'गडी फू'चें धोरण, असें म्हणून त्यांतच त्यांनीं असहकारितेची व्याख्या मोठ्या मजेदार तऱ्हेनें सांगितली होती. त्यांनीं प्रसंगानुसार सांगितलेली वाक्यें केव्हां केव्हां विद्यार्थिनींना मार्गदर्शक होत. त्यांच्या आईची ते एक गोष्ट सांगत. तिला ज्या वेळीं वाटलें कीं, आपण या दुखण्यांतून जगत नाहीं तेव्हां तिनें दादांना जवळ हाक मारली व सांगितलें "मी कांहीं आतां जगत नाहीं. तूं लहान आहेस, तेव्हां दोन गोष्टी लक्षांत ठेव. जेवणांत खोडी ठेवूं नकोस. तुला आवडीनिवडी फार. माझ्यामागें कोण तुझ्या आवडी ओळखून तुला खाऊं घालील. दुसरें, खूप काम करीत जा. माणूस हवें असतें असें नव्हे, तर माणसाचें काम हवें असतें." आणि हा उपदेश त्यांचे वर्तनांत बिंबलेला दिसे खरा. एकदां त्यांनीं सांगितलें कीं, मनुष्याचें आयुष्य हें गुलाबाच्या ताटव्यासारखें असावें. स्वतःला जरी दुःखाचे काटे बोचत असले, तरी त्याचा प्रयत्न

फुलांच्या योगानें हसून लोकांना आनंद देण्याचा असतो. उपमेची अर्थात् ओढाताण करावयाची नसते; पण स्वतःच्या दुःखाचें प्रदर्शन न करतां शक्य तितकें आनंदी राहावयाचें ही शिकवण त्यांच्या वागणुकींत बिंबलेली दिसे. त्यांच्या प्रार्थनेंतून दोन गोष्टी मला मिळाल्या. एक तुकारामाचे अभंगांची आवड: सातारला मामंजी भजन करीत त्या वेळीं तुकारामाचे अभंग कानीं पडत असत व मला ते आवडत. पण दादांच्या प्रार्थनेनें त्यावर आणखी एका वेगळ्या दिशेनें प्रकाश पडला व ती आवड द्विगुणित झाली. पुढें आयुष्यांत अनेक प्रसंग असे आले कीं, त्या वेळीं मनाची स्थिरता राखण्यास मला त्या अभंगांचा उपयोग झाला. दुसरी गोष्ट स्वतःच्या दुःखाचें प्रदर्शन न करणें. या वेळीं माझी वृत्ति उदासवाणी असे; नव्हे जणूं दुःखांत राहणें हें आपलें कर्तव्य आहे असें मला वाटे. ती विचारसरणी बदलली. विचारसरणी बदलली म्हणजे आचरणांत बाणली असें नव्हे. त्या दिशेनें प्रयत्न सुरू झाला एवढेंच. कॉलेजांत एकदां यासंबंधीं निबंध लिहिण्याचा प्रसंग आला असतां 'दुःखानें गांजून व मृत्यूला भिऊन मनुष्यानें कर्मत्याग करणें इष्ट आहे काय?' असा जाडा मथळा देऊन सुखदुःख दोहोंच्या पलीकडे जावें, सुखच मानूं नये म्हणजे दुःखही येत नाहीं इ. विवेचन केल्याचें स्मरतें. पण तशी विचारसरणी वाढतां वाढतां सुख नको तशीच आशाही नको; जें काय कठोर सत्य असेल तेवढेंच हवें,* असें वाटूं लागे. पण या कठोर सत्याच्या कडवटपणानें

---

*या सुमारास एका इंग्लिश कवीची Rose-coloured Spectacles ही कविता माझे वाचनांत आली. कवितेचा भावार्थ असा होता : " तुमचा मार्ग खडतर व खरखीत वाटत असेल तर 'आशा आणि मंडळीनें' ( Hope the maker's name ) तयार केलेला हा गुलाबी रंगाचा चष्मा लावा. हा जादूचा आहे. या योगानें तुम्हांला 'काळजी'चे ठिकाणीं 'आशा', 'दुःखा'चे ठिकाणीं 'सुख'

सर्वच आयुष्य व वातावरण कडू कां करावें? जगांत अनेक सुखदुःखें आहेत. प्रत्येकाचीं कांहीं सुखदुःखें, निराशा असणारच; पण प्रत्येकानें आपल्या दुःखाचें प्रदर्शन मांडावयाचें ठरवलें तर जग हें एक स्मशान होऊन जाईल. खरें धैर्य स्वतःच्या दुःखाचें प्रदर्शन न करण्यांत

---

वाटूं लागेल व एकंदरींत स्वर्गीय आनंदाची प्राप्ति होईल." पण त्यांतील आशायुक्त विचारसरणीशीं मी समरस होऊं शकत नसे. जगांत निराशा व दुःखें आहेत; मग खोटी सुखाची भूल कशाला? अशी माझी विचारसरणी. म्हणून तिला उत्तरादाखल मीं गमतीनें पुढील ओळी लिहिल्या होत्याः—

## The Rose-Coloured Remedy !

Seems the future shrouded !
The path closely barred !
And problems of today
Do press on, so hard.
Oh ! could I try the magic
Of Hope's rosy-glasses ?
The charm, whence ensuing
May light the mountain passes
But will it change the sight ?
Or will it change the scene ?
No ! No ! it's simply a charm
That brings about a dream.
Enough of these visions
That are hollow in the end
They are but mystic glasses
" To the Real " I myself must bend.

असून प्रत्येकानें आनंदी होऊन जगाच्या आनंदांत भर घालण्यांत आहे ही विचारसरणी मला पटूं लागली व ती माझी इच्छा 'जीवित-कोडें' या कवितेंत चित्रित झाली.

दादांच्यासारखी प्रार्थना आपणांस घेतां यावी अशी माझी महत्त्वाकांक्षा होती. त्याप्रमाणें हिंगण्यास बोर्डिंग सुपरिंटेंडेंट असतां मी क्वचित् प्रार्थना घेत असे. सातारच्या कन्याशाळेला जेव्हां वसतिगृह जोडलें त्या वेळीं तेथें मी रोज संध्याकाळीं प्रार्थना घेऊन तुकारामाचे अभंगांचे मदतीनें उपयुक्त गोष्टी समजावून देत असे. दोन तीन वर्षें हा कार्यक्रम चांगला चालला. पण पुढें एक असा प्रसंग आला कीं माझ्या विद्यार्थिनींपैकीं एक विद्यार्थिनी, जिच्यासाठीं मीं पुष्कळ परिश्रम केले होते, तिनेंच कांहीं कारणानें मला विचारिलें कीं, " तुम्हीं आजपर्यंत माझ्यासाठीं काय केलेंत ? तुम्ही करतां तें आमच्यासाठीं थोडेंच करतां ? तुम्हांला त्यायोगें मोठेपणा मिळणार म्हणून करतां." या उत्तराचा माझे मनावर फार परिणाम झाला. जिच्यासाठीं श्रम केले किंवा नाहीं याची शंका सुद्धां येऊं नये तीच हा प्रश्न विचारणार ! तेव्हां 'आपण जर विश्वासच निर्माण करूं शकलों नाहीं तर पुढें उपदेश कसला व त्याचा काय परिणाम होणार' असें वाटून मीं प्रार्थना बंद केली. त्या विद्यार्थिनीनें पुन्हा मला प्रार्थना सुरू करा म्हणून विनंति केली; पण माझा स्वतःचाच जेथें मजवरचा विश्वास ढळला तेथें एकरूप होऊन प्रार्थना शक्य नाहीं, म्हणून मीं ती सोडली ती कायमची. प्रार्थना घेण्यासारखी आत्मविश्वासाची स्थिति येईल तर मला अजूनही आवडेल. पण अजून गेलेला विश्वास आला नाहीं खरा !

कॉलेजांतील तीन वर्षांचा काल खरोखरच मोठा आनंदाचा गेला. विद्यार्थी ज्या गोष्टी करतात त्या सर्व केल्या. अभ्यास केला, तास चुकविले, प्रोफेसरांच्या नकला केल्या, नियम मोडले व त्यासाठीं बोलून घेतलें. आमच्या वेळीं कॉलेजांत विद्यार्थिनींचे स्वाभाविकपणेंच दोन

गट पडत. कांहीं मोठ्या, सुखदुःखांचा अनुभव घेऊन मग शिकावयास आलेल्या, म्हणजे खऱ्या आश्रमाच्या विद्यार्थिनी; व कांहीं कुमारिका अगर बालविधवा—अगदीं मराठी पहिली दुसरीपासून तेथें शिकलेल्या म्हणजे महिला विद्यालयाच्या विद्यार्थिनी. पहिला गट स्वाभाविकच जास्त संथ व विचारी असे. दुसरा गट जास्त पोरकट, दंगेखोर पण आनंदी असे. पण दुसऱ्यांशीं भांडणें करतांना—विशेषतः प्रिन्सिपल्शीं भांडावयाची वेळ आली म्हणजे— दोन्ही एकजूट होत. मी दुसऱ्या गटाइतकी पोरकट व आनंदी होऊं शकत नसे. तरी पण मला त्यांचा दंगा आवडे व शक्य तितका मी त्यांच्यांत मिसळण्याचा प्रयत्न करी.

आम्ही जी. ए. च्या वर्गांत होतों. दुसऱ्या सहामाहींत टेनिसकोर्ट प्रथम तयार झालें, तेव्हां खेळावयास पुढें मिळणार नाहीं म्हणून खेळावेंसें वाटे. मार्च-एप्रिलचे दिवस. एकदां अशाच चौघी-पांचजणी दुपारीं बारा वाजतां टेनिस खेळावयास गेलों. अर्थात् आमचे प्रि. नानासाहेब आठवले यांचेकडे ती बातमी कुठून तरी गेली. आदल्या दिवशीं दुपारीं शेजारच्या शेतांत वाचावयास जाऊन बसलों तें त्यांना कळलें होतें त्यांत ही भर. त्यांनीं आम्हांला बोलावणें पाठविलें व रीतीप्रमाणें सटकवावयाचें तें सटकावलें. मग त्यांनीं चर्चा करावयास सुरवात केली. मी त्यांतल्या त्यांत समजूतदार अशी त्यांची कल्पना.

"काय हो" ते म्हणाले, "हें ठीक केलेंत का? तुम्ही सगळ्या आतां ग्रॅज्युएट होणार. लवकरच जबाबदारीचीं कामें करूं लागाल. तुम्हीच उन्हांत खेळूं लागलांत तर शाळेच्या मुलींना तें उदाहरण होत नाहीं का? समजा, उद्यां एकाद्या शाळेच्या मुख्य झालांत आणि तिथल्या मुलींनीं असें केलें तर काय कराल?" "नक्की काय करीन तें आज सांगतां येत नाहीं" मीं म्हटलें, "पण कदाचित् न रागावतां admire ही करीन." शिक्षक या नात्यानें पुढें काम करतांना अशा गोष्टींबद्दल मला रागावण्याचा प्रसंग अनेकदां आलेला आहे. तरी पण त्या वेळींही अंतर्यामीं मला कौतुक वाटे. असा थोडासा अवखळपणा हा विद्यार्थ्यांनीं

करावयासच हवा असें वाटायचें. अगदींच मोजूनमापून वागणारे यंत्रासारखे ते विद्यार्थी कसले!

आश्रमाच्या वातावरणांत समाजसेवेचें वारें असे. इतर शाळांप्रमाणें वसतिगृहांतील कामें, संमेलनांतील कामें, मुली उत्साहानें करीतच, पण आश्रमाला पैशाची मदत मिळवून देण्याचें कामही त्या करीत. भाऊबीज-भेटीची कल्पना कै० चिपळूणकरांनीं प्रथम १९१९ सालीं काढली. त्या फंडाच्या मी व दुर्गाबाई जोशी पहिल्या सेक्रेटरी होतों. पैशाची थैली आण्णांना अर्पण करतांना दुर्गाबाईनीं आपला एक अनुभव सांगितला. त्या आगगाडींतून जात असतां एक गरीब मराठ्याची बाई त्यांना भेटली. तिला त्यांनीं आश्रमाची माहिती सांगितली तेव्हां ती कळवळून म्हणाली, "बाई, मजजवळ हा एक पैसा आहे. पुरे का तुम्हांला? हा घ्या." व म्हणून त्या वर्षी भाऊबीज भेट अमुक रुपये अमुक आणे व तीन पै येवढी झाली. दुसऱ्या एका स्वयंसेविकेला एक म्हातारी बाई कोकणांत भेटली. ती म्हणाली, "काय ग! अग तो कर्वा का डर्वा आहे ना! त्यानं एवढा पसारा मांडला आहे शाळेचा. त्याला किती ग फायदा पडतो वर्षाचा! आणखी शिवाय तुम्ही भिक्षा कशाला मागतां?"

पुण्यास १९१८ सालीं इन्फ्ल्युएंझाची पहिली सांथ आली व ती हिंगण्यासही पोंचली. सकाळपासून संध्याकाळपर्यंत सुमारें ऐंशी मुली आजारी पडल्या. चालकांनीं शाळा व कॉलेज् बंद केलें व बाकीच्या मुलींना ताबडतोब घरीं पाठविलें. शाळेचें हॉस्पिटल बनलें. कॉलेजच्या मुलींपैकीं ज्या कांहीं मुलींना ही सांथ बाधली नव्हती त्या आम्ही स्वयंसेवक म्हणून वरिष्ठ मंडळींना मदत करीत होतों. या सांथींत 'मुसळे' नांवाची एक विद्यार्थिनी दगावली. गंगुताई लेले व मी शेवटपर्यंत तिच्याजवळ शुश्रूषेला व जाग्रणाला होतों.

आश्रमांत आल्यामुळें जे अनेक फायदे झाले त्यांपैकीं एक म्हणजे श्री. दुर्गाताई जोशी यांची ओळख होय. बऱ्याच उशीरा यांनीं शिकावयास सुरवात केली, व निश्चयानें शिक्षण तडीस नेलें. पण

वाचन-विचाराचे आधारावर झालेली त्यांची आधींची तयारी विशेष होती. शिवाय कांहीं तरी विधायक काम देशाला उपयोगी होईल असें करण्याची त्यांना तळमळ असे. एक कादंबरी त्यांची हिंगण्यास येण्या-पूर्वींच लिहून झाली होती; त्याबद्दल व इतर कार्याबद्दल बोलूं लागलों म्हणजे आमच्या गोष्टी अगदीं भरांत येत. पहाटे उठून आम्ही चहा घेऊन अभ्यासाला बसावयाच्या. गोदू केतकर मला एकटें वाटूं नये म्हणून चहापुरती उठून पुन्हा झोप घेई. दुर्गाताई गोष्टीही मोठ्या विनोदी पद्धतीनें सांगावयाच्या, त्यामुळें कांहीं वेळां अभ्यास मागें पडे व दुर्गाताईच्या गोष्टींतच आम्ही गुंगत असूं. समोर रेवतीबाई झोप-लेल्या असत त्या उठून येत व म्हणत, " हा काय ग तुमचा गोंधळ! आपण अभ्यास करीत नाहींत व आम्ही सुखानें झोप घेऊं म्हटलें तर दिवे लावतात व झोप घेऊं देत नाहींत." पण विद्यालयाच्या माडीवरील खोल्यांतील— म्हणजे रेसिडेन्सींतील— दिवस आनंदाचे खरेच!

१९३८ सालीं आण्णांची ८० वर्षांची ज्युबिली झाली. १९१८ सालीं ६० वर्षांची ज्युबिली झाली त्या वेळीं आम्ही स्वयंसेविका होतों. १९३८ सालीं ज्युबिलीचे आधीं एक दिवस मी आश्रमांत गेलें. जुन्या जेवणघरासमोर म्हणजे आतांच्या डोमेस्टिक सायन्सच्या हॉलसमोर एकटीच उभी होतें. एक स्वयंसेविका मजकडे आली. ती नवीनच शाळेंत आली असावी, कारण मी तिला ओळखीत नव्हतें व ती मला ओळखीत नव्हती. तिची कल्पना ज्युबिलीसाठीं मी पाहुणी आलें आहे म्हणून तिनें रीतीप्रमाणें सर्व चौकशी केली व " तुम्हांला संस्था दाखवितें चला " म्हणाली. मलाही मौज वाटली व मी तिच्याबरोबर पाहुणी म्हणून सर्व विद्यालय हिंडलें! पुढें माडीवर गेलों. गच्चीवर उभें राहिल्यावर मग मात्र मला राहवेना. ती सांगूं लागली, " येथें लहान मुली राहतात." तिची मौज करण्यासाठीं मीं म्हटलें, " आमच्या वेळीं येथें कॉलेजच्या मुली राहत असत."

" म्हणजे तुम्ही होतां येथें?"

"होय. विद्यार्थिनी म्हणून इथें राहत होतें व सुपरिंटेंडेंट म्हणून कोपऱ्यावरच्या खोलींत राहत होतें."

"म्हणजे? अय्या—" करून ती जी पळून गेली ती पुन्हा दिसलीच नाहीं.

दुर्गाताई जोशी, गंगुताई लेले, रुक्मिणी अम्मा आदि आठदहा-जणींनीं मिळून १९१८ सालीं पाडव्याच्या दिवशीं 'भारतसेविका-समाजा'ची स्थापना केली. वर्ष-दोन वर्षें पद्धतशीर काम झालें पण पुढें सर्व सभासद दूरदूर पांगल्यामुळें एकत्र येणें जमेना. त्या वेळीं गोळा केलेले पैसे सुमारें रु. १३२–७–० आश्रमामध्येंच शिल्लक होते ते १९३८ सालीं, इचलकरंजीकर हॉलमध्यें स्टेज केलें तेव्हां, पडद्याला व सतरंजीला दिले. समाजाची रूपरेषा पुढीलप्रमाणें होती :

श्री

# भारत-सेविका-समाज

## आरंभ कसा झाला

पुष्कळ दिवस मला वाटत होतें कीं सर्व भारतवर्षांत परोपकाराचें कार्य करणारी एक स्त्रियांची संस्था असावी. आज सहज परीक्षा आटोपल्यावर सर्वजणी जमून घरीं जातांना कोण कसे दिवस घालविणार असा प्रश्न निघाला तेव्हां मी सर्वांपुढें एक भारत-स्त्री-मंडळ-संस्थेची कल्पना मांडली. आश्चर्याची गोष्ट ही कीं, एका क्षणांत सर्वजणी हें काम करण्यास तयार झाल्या. लागलीच आम्ही कार्याची दिशा ठरवून, पाडव्याच्या निमित्तानें 'भारत-सेविका-समाज' स्थापिला. परमेश्वर करो आणि ह्या कार्यांत आम्हांला भारतसेवा घडो. खरोखरच आम्हां सर्वांच्या आयुष्यांत आजचा पाडवा विशेष आहे.

ता. १२-४-१९१८.

## भारतसेविका समाजाचे उद्देश

१ साधेल त्या मार्गानें भारत वर्षाच्या उन्नतीप्रीत्यर्थ झटणें.

( अ ) लोक साक्षर करणें, ( आ ) वाचनाची गोडी लावणें, ( इ ) ठिकठिकाणीं वाचनालयें उघडणें, ( ई ) देशी मालाचीं दुकानें उघडणें, ( उ ) होम क्लासेस उघडणें, ( ऊ ) बालोद्यान शाळा काढणें, ( ऋ ) स्त्रीवर्गाची स्थिति लोकांपुढें मांडणें, ( ॠ ) शिक्षणाकरितां फंड गोळा करणें, ( ऌ ) सोप्या भाषेंत पुस्तकें लिहून तीं थोड्या किंमतीस विकणें, ( ॡ ) हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रांतांमध्यें ज्या स्त्री-शिक्षणसंस्था काम करीत आहेत त्या सर्व संस्था भारत-सेविका Sisterhood नें एक करणें, ( ए ) त्या सर्वांमध्यें स्नेहभाव वाढवून देशकार्य करणें.

" सदसद्विवेकबुद्धीला अनुसरून मीं हें व्रत घेत आहें. योग्य व अपरिहार्य कारणावांचून मी ह्या कार्यापासून पराङ्मुख होणार नाहीं."

( यापुढें सभासदांच्या सह्या असून त्यापुढें प्रत्येक सेविकेनें स्वतः-साठीं त्या वर्षापुरतें ठरवून घेतलेलें काम नोंदलें होतें. )

१ रुक्मिणीबाई चिंतामण भटलः—वर्षाचे रु. २५ मिळवून देणें.

२ कु. बालगौरी ठाकूरः—वर्षाचे रु. १०० मिळवून देणें.

३ कु. सोनुबाई सुळेः—पांच मुलींच्या दोन इयत्ता वाढवून देणें. पांच स्त्रियांना परकर, पोलकें, कशिदा इ. शिकविणें.

४ कु. प्रेमाबाई लोटलीकरः—पांच मुलींना दोन इयत्तेपर्यंत शिकवीन.

५ गंगूबाई अत्रेः—दोन मुलींना दोन इयत्तांचा अभ्यास शिकवीन व एखाद्या प्रायव्हट शिकवणीचे पैसे आपल्या संस्थेच्या कार्यास देईन.

६ दुर्गाबाई जोशीः—२०० रु. संस्थेला मिळवून देईन व स्त्रियांच्या स्थितीसंबंधानें पांच लेख लिहीन.

७ I, Mrs. Kamalabai Banarji hereby promise to do anything in this year, which I am able to do.

८ कमलाबाई देशपांडेः—दोन बायकांचीं मनें शिकण्याकडे वळवीन, पांच लेख लिहीन.

९ गंगूबाई लेलेः—५ रु. वर्गणी व दोन पुस्तकें देईन.

आयुष्य भारभूत नव्हे तर सारयुत आहे, व पुन्हा तें आनंदानें घालविणें हें आपलें कर्तव्य आहे, हीं दोन तत्त्वें पटून तपोवनांत माझ्या आयुष्याची पुनर्घटना झाली. इतरही अनेक स्त्रियांना असेंच मार्गदर्शन झालें असणार, नव्हे झालें आहे. तेव्हां आज जरी आश्रमाच्या किती उणीवा मला दिसत असल्या, आण्णांचा किती जरी राग आला असला, तरी याचें सर्व श्रेय आण्णांना व आश्रमालाच आहे. हें ऋण नाकारून चालणार नाहीं.

# ध्येयदर्शनाची भूल : : ६

हायस्कूलमध्यें सातव्या इयत्तेंत गेले म्हणजे असें वाटतें कीं, भोंव-तालच्या जगांत अतिशय विद्वान् व महत्त्वपूर्ण व्यक्ति कोणी असतील तर आपणच. पण कर्मधर्मसंयोगानें पास होऊन कॉलेजांत जातांच महत्त्व राहतें बाजूला, व त्याच व्यक्ति 'फर्स्ट इअरचीं बावळटें' बनून बी. ए. च्या वर्गांतील मुलांचीं विनोदस्थळें होतात. कारण त्यांनाही आपल्यापरीनें वाटत असतेंच कीं, "आतां आपण ग्रॅज्युएट होणार. भोंवतालच्या जगांत अतिशय विद्वान् व महत्त्वपूर्ण व्यक्ति कोणी असतील तर आपणच. या फर्स्ट इअरच्या बावळटांना काय कळतें!" ही भूल जर नेहमींच राहील तर किती बरें होईल. पण तें कसें शक्य आहे? एकदां पास होऊन बाहेरच्या जगांत प्रवेश केला व प्रत्येक नोकरीच्या जागीं लोक म्हणूं लागले कीं, "हा काय नवा पदवीधर! याला काय अनुभव असणार!" म्हणजे कळतें कीं, "आपण कोऽऽणी नाहीं!"

हें खरें असलें तरीही वाटतें कीं, या स्वप्नाचा अनुभव माणसाला आलेला असावा. हुजुरपागेंत असतांना वनितासमाजांत एकदां

चर्चेला विषय होता "आयुष्याच्या तीन अवस्थांतील सुखकर अवस्था कोणती?" रूढ कविकल्पनेप्रमाणें बहुतेकींनीं वर्णन केलें कीं बाल्यावस्था. कारण 'रम्य तें बालपण देई देवा फिरुनी' इ. कविकृत वर्णनें. पण चर्चेमध्यें जेव्हां सुखाची व्याख्या होऊन, मग कल्पनेप्रमाणें सुख प्राप्त करून घेण्याचें सामर्थ्य ज्या अवस्थेंत असेल ती सुखकर अवस्था मानावी, असें ठरलें तेव्हां आपोआप तारुण्य ही सुखकर अवस्था ठरली आणि सभेचा निर्णय तसाच झाला. तारुण्य ही तर सुखकर अवस्था खरीच पण त्यांतही कॉलेजांतील शेवटचीं वर्षें ही सुखकरतम अवस्था होय. नवोनव कल्पना बुद्धीला सुचतात व त्या पुऱ्या करूं शकूं असें वाटविण्याजोगा उत्साह व सामर्थ्य स्वतःच्या ठिकाणीं आहे असें वाटत असतें. फार अनुभवाचा कडवटपणा अजून साचूं लागलेला नसतो. वाटतें कीं हें जग आपलें आहे व जशी त्याची घडी आपण बसवूं तशी बसेल. 'पद्यपंक्तिची तरफ आमुच्या करीं विधीनें दिली असे। टेकुनिया जनताशीर्षावरि जग उलथुनिया देऊं कसे।' इ. उद्गार अशाच विश्वासांतून बाहेर पडलेले नव्हत काय? विद्यार्थिदशेंतील स्वतःच्या कर्तृत्वशक्तीवरील विश्वास असाच कल्पनातीत असतो. १९२२ सालीं गंगुबाई पटवर्धन यांचा विवाह झाला. त्या प्रसंगीं मीं मंगलाष्टकें लिहिलीं होतीं. त्यांतील एक श्लोक पुढील होता :

> **अज्ञानांधतमांत गाढ दडली, दारिद्र्यपंकीं फसे।**
> **लागे फांस गळीं अहर्निश तिच्या मुक्तीस याचीतसे।**
> **थांबे, धीर धरीं, अगे भरतभू ! ही पातली दंपती।**
> **उद्धारार्थ तुझ्या सदैव झटण्या, देईं शुभाशीप्रती ॥**

अर्थात् दोषज्ञ रसिक वाचकांनीं तिची चेष्टा करावयाची सोडली नाहीं. एकजण म्हणाले, काय हा भलता आत्मविश्वास! "मातृभूमीच्या उद्धारार्थ ही दंपती स्वतःचें आयुष्य खर्च करतील" ही कल्पना थोड्या वेगळ्या तऱ्हेनें मांडतां मांडतां इतकी मजल गेली कीं, "बाई

ग! हिंदभू, जरा थांब. ही दंपती काम करूं लागली कीं तुझी सुटका झालीच." ही अलंकारिक अतिशयोक्ति म्हटली तरी पूजनीय विभूतीला कमीपणा येतो याची वाट काय? याला अनुकूल इतकेंच बोलतां येईल कीं, यांतील स्वतःच्या कर्तृत्वाची झेप गरुडाची आहे असें वाटणें पुढें असत्य ठरलें, तरी इष्टकार्यांत स्वतःचें शक्तिसर्वस्व खर्चं करण्याची उत्कंठेची गरुडझेप कांहीं असत्य नसते.

देशाची उन्नति करण्यासाठीं सुधारणा पाहिजे. पण सामाजिक सुधारणा आधीं कीं राजकीय सुधारणा आधीं? टिळक-आगरकर या जोडीनें केलेला हा वाद वर्तमानपत्रीं जुना झाला असला तरी, त्या चर्चेतून उत्पन्न झालेल्या दोन पंथांचा जोर अजून कमी नव्हता. राष्ट्रीय अगर जहाल व नेमस्त अगर मवाळ हे पंथ पाहतां असें दिसे कीं, एका पक्षाचा अनुयायी म्हणजे दुसऱ्या पक्षाचा विरोधी असावयाचाच. परंतु नवीन पिढी अशी तयार होत होती कीं, तिला दोन्हीकडे सुधारणा एकदम करावीशी वाटे. मला राजकीय चळवळीची पहिल्यापासून भक्ति खरी. पण कोणत्याही एका पंथांत—त्याच्या आहे त्या स्वरूपांत—मन समरस होईना. शिवाय हिंगण्यांतील शैक्षणिक वातावरणानें म्हणा, कीं आण्णांच्या प्रेरणेनें म्हणा, शिक्षणाचा प्रसार ही मूलभूत गोष्ट आहे, तिच्या प्रसाराखेरीज पुढील कोणतीही राजकीय वा सामाजिक सुधारणा जोरानें होणार नाहीं असें वाटूं लागलें. नुकतेच वर्गांत प्रो. जोशांनीं प्रो. आगरकरांचे निबंध शिकविले होते. चर्चात्मक विवेचनपद्धति व प्रत्येक प्रश्नाच्या अनेक बाजू तितक्याच कुशलतेनें डोळ्यांपुढें मांडणें हें त्यांच्या शिकवण्याचें वैशिष्ट्य होतें. "इष्ट असेल तें बोलणार व शक्य असेल तें करणार" इ. वचनें कशीं जिभेवर खेळत! तीं आचरणांत आणावीं असें वाटे, आणि अशी आयुष्यक्रमाची आखणी करावीशी वाटे कीं, निदान आपल्या आयुष्यांत आपण प्रत्येक पाऊल असेंच टाकूं; आणि असाही मोह पडे कीं, देशाचें भवितव्य जणूं आपल्या कृतीवर अवलंबून आहे!

"एकदां ही कल्पना मनांत शिरली म्हणजे मनुष्य प्रत्येक गोष्ट त्या अभिनिवेषानें करीत असतो व आप्तस्वकीयांच्याकडूनही त्याच कृतीची अपेक्षा करतो. माझ्या मतें वाटणारी अशी विसंगति कोठें दिसली की, त्याचा प्रतिकार केल्याखेरीज माझ्यानें राहवत नसे. याच सुमारास पटेल बिलाची चळवळ पुण्यास चालू झाली. प्रागतिक अगर नेमस्त पक्ष हा पटेल बिल् सर्वस्वी उचलून धरणारा होता, तर जहाल पक्षाचा त्याला विरोध होता. आणि दोन्ही पक्षांचे वर्तमानपत्री वाद व सभा चालू होत्या. किर्लोस्कर थिएटरांत एक सभा या बिलाला उचलून धरण्यासाठीं भरली होती. विद्यार्थि-वर्गाला असल्या सभांत नेहमींच मौज वाटते. हिंगण्याहून चारपांच मैल चालून या सभांस आम्ही येत असूं व पुन्हा चालत परत जात असूं. तात्या या बिलास अनुकूल होते व यापूर्वीच्या सभेस जाऊन अनुकूल बोलले होते. या दुसऱ्या सभेसही तात्या जातील अशी माझी कल्पना. पण त्या दिवशीं तात्या सभेस आले नव्हते. जहाल पंथांत मोडणाऱ्यांपैकीं एक अण्णासाहेब भोपटकर आलेले दिसले. पहिल्या सभेचे शेवटीं मारामारी होऊन रस्त्यानें परत जाणाऱ्या सभेच्या कांहीं नेत्यांना 'जोड्यां'चा प्रसादही मिळाला. सभा संपली व मी हिंगण्यास न जातां घरींच राहावयास गांवांत आलें. तात्या जर अनुकूल आहेत तर त्यांनीं सभेस जाणें टाळावें हें मला पटेना व मी जी घरीं गेलें ती त्यांच्यावर खूप रागावलें. "तुम्हांला जर पटत होतें तर तुम्हीं यावयास पाहिजे होतें."

तात्या म्हणाले, "मला पुष्कळ गोष्टी पटत असतील. मी पहिल्या सभेला गेलों होतों ना? पण प्रत्येक पटणारी गोष्ट करावयाची असा आग्रह कां? हा पुढें पार्टीचा प्रश्न बनतो. प्रागतिकांशीं माझें पटतें असा हा एक प्रश्न आहे. पण त्यांच्याबरोबर पटत नाहीं असे दुसरे दहा प्रश्न आहेत. या एका प्रश्नाचे बाबतींत त्यांच्याशीं सहकार्य करून ज्या इतर दहा प्रश्नांवर ज्यांच्याशीं माझें जमतें त्यांना मीं कां दुखवावें? मला वाटतात अकरा गोष्टी. मग त्यांपैकीं दहा कशा नीट

होतील तें मी पाहूं, का एकच कशी नीट होते तें पाहूं? ती दुसरी मंडळीही एका प्रश्नाबद्दल त्यांचें माझें जमतें म्हणून इतर बाबतींत मला दोष द्यावयास सोडतील का?"

बराच वेळ त्यांचा व माझा वाद झाला. या वादाचे वेळीं वाग्भटही हजर होते. कारण नुकतेच ते साताऱ्याहून आले होते व तात्यांशीं त्यांची या बिलाबद्दलच चर्चा चालू होती. तो वाद झाल्यानंतर, त्याचा विचार करतां, आपण फार रागावून बोललों, तात्यांच्या म्हणण्यांतही अर्थ होता, असें मला वाटलें व तसें मीं त्यांना पत्रानें कळविलें. तेव्हां त्यांचें पुढील उत्तर मला आलें.

पुणें, १७-१-१९१९

आशीर्वाद विशेष. तुझें पत्र पोंचलें. उत्तररूपानें का होईना पण असें पत्र कदाचित् मी तुला पहिलेंच लिहीत असेन. माझा सर्व आळस घरच्या माणसांवर निघतो. त्यांना पत्रें पाठवून विचारपूस किंवा चर्चा करण्यांत मी इतका मागासलेला आहें कीं, त्यांना त्यांच्याविषयीं मी बेफिकीर आहे असेंही वाटेल. तुझें पत्र वाचून आनंद झाला. तुझें वर्तन या कामीं राग येण्यासारखें नसून उलट भूषणास्पदच वाटलें; व त्याचें खरें कारण असें कीं, मुलांशींही वडीलकीच्या अधिकारानें न वागतां मित्रत्वाच्या नात्यानेंच वागणें मला आवडतें. मुलांना झालें तरी दटावून किंवा रागावून निरुत्तर करण्यापेक्षां त्यांनाही जर युक्तिवादानेंच निरुत्तर करतां आलें तर तें अधिक चांगलें असें मला वाटतें. दुसऱ्या सभेला न जाण्याचीं माझीं कारणें तुला पटतील अशी मला आशा नव्हती पण पटलीं तें पाहून आनंद झाला.

मी सरळपणानें वागतों याचे मला फार वेळां तोटे सोसावे लागतात. तरी पण मला अखेर तेंच धोरण बरें वाटतें. तूं पत्रांत व्यक्त केलेले विचार फार योग्य आहेत, व तूं ते निरंतर असेच बाळगावेस अशी माझी इच्छा आहे. तूं कोणत्याही प्रकारचा कुढेपणा मनांत न

ठेवतां मला सरळ विचारलेंस तेंच मला आवडलें, व तुला प्रथम राग आला तो चांगल्याच मनोवृत्तीचा होता म्हणून मला त्याचें कांहीं वाटलें नाहीं. फार काय पण त्या दिवशीचा वाद मी विसरूनही गेलें होतों. मी करीन तें पुष्कळ वेळां चूक असेल. पण तें केवळ आपलपोटेपणानें, दुष्टपणानें, किंवा खोट्या भीतीनें केलें असें कोणास म्हणण्यास जागा राहूं नये एवढीच माझी इच्छा असते. कळावें, हे आशीर्वाद.

—तात्या केळकर

ही पटेल बिलाची करमणूक पुण्याच्या लोकांना महिना दोन महिने पुरवली व त्याची माहिती लहान मुलांनाही झाली. सौ. कमलाबाई गांधी यांनीं एक मौजेची गोष्ट सांगितली. गायआळींत आमचे घरासमोरच त्यांचें घर. तेव्हां त्यांच्या बाळकडे आमचा श्रीधर दररोज खेळावयास जाई. आमचे घरीं चर्चा चाले, तशी त्यांच्या घरींही चर्चा चाले. कमलाबाई म्हणाल्या, "एक दिवशीं आमचा बाळ व तुमचा श्रीधर ओटीवर खेळत होते. माजघरांतून मीं सहज डोकावून पाहिलें तों हातांत चपला घेऊन दोघे एकमेकांस मारावयास लागले. खेळतां खेळतां एकदम मारामारी व तीही चपला घेऊन कां? म्हणून मी पुढें गेलें व कां भांडतां वगैरे विचारूं लागले. दोघेजण हसून म्हणाले, "छे हो! आम्ही भांडत नाहीं कांहीं. आम्ही 'पटेल बिल सभा' खेळतों आहों."

पण याहीपेक्षां मोठी करमणूक पुणेकरांना पुढें मिळावयाची होती. पुणें म्युनिसिपालिटीनें प्राथमिक शिक्षण सक्तीचें करावयाचें असा विचार केला. पण खर्चाचा प्रश्न उपस्थित झाला तेव्हां म्युनिसिपालिटींतील जहाल गटानें असा ठराव मांडला कीं, शिक्षण सक्तीचें करावें पण प्रथम मुलांना शिक्षणाची सक्ती करावी, व मागाहून दोन वर्षांनीं मुलींचें शिक्षण सक्तीचें करावें. मवाळ पक्षानें याला विरोध करावयाला अशी सुरवात केली कीं, "हे पहा स्त्रीशिक्षणाचे द्वेष्टे! यांना स्त्रियांचें शिक्षण मागें राहावयास पाहिजे."

जहाल गट म्हणे, "हा व्यावहारिक प्रश्न आहे. सर्व शिक्षण एकदम मोफत होणें शक्य नाहीं. निम्में निम्में करावयास पाहिजे. अर्थात् मुलींचें शिक्षण हें मुलांच्या शिक्षणापेक्षां थोडें कमी महत्त्वाचें आहेच. व तसें म्हणावयास चोरी कसली?"

"हेंच तें" मवाळ पक्ष चिडून म्हणे, "अजून तुम्हांस स्त्रीशिक्षणाचें महत्त्व पटत नाहीं. अहो स्त्रिया सुशिक्षित झाल्या कीं पुढील पिढी सुशिक्षित आपोआप होईल. जिच्या हातीं पाळण्याची दोरी तीच जगातें उद्धारी"

"दोन वर्षें मुलींना सक्तीचें शिक्षण मागाहून सुरू केलें तर अगदीं पातक घडतें असें नाहीं. हा अंदाजपत्रकाचा प्रश्न आहे. सर्व मोफत शिक्षणाचा खर्च एकदम परवडणार नाहीं. तेव्हां प्रथम मुलांचें शिक्षण सक्तीचें होऊं द्या."

"तुम्हांला निम्या मुलांचे शिक्षणाचा खर्च परवडतो ना? मग प्रथम मुलींचेंच शिक्षण सक्तीचें करा. मागाहून दोन वर्षांनीं मुलांचें सक्तीचें शिक्षण करा." मवाळ पक्ष हा प्रश्न विचारून अडवणूक करून जहाल पक्षास पेचांत धरण्याचा प्रयत्न करी.

"पण मुलांचें शिक्षण जास्त महत्त्वाचें. त्यांना पुढें नोकरी मिळवावयाला त्याचा जास्त उपयोग होईल. मुलींच्या शिक्षणामुळें प्रत्येक मुलगी नोकरी मिळविते असें नाहीं. इ." जहाल पक्ष मुलांचें शिक्षणच आधीं सक्तीचें कां केलें पाहिजे याचें असें समर्थन करी.

"हें खरें नाहीं. तुम्ही स्त्रीशिक्षणाचे द्वेष्टे आहांत म्हणून कांहीं तरी सबबी काढून तो प्रश्न दूर ढकलतां." अशी शंका जहालांच्या प्रामाणिकपणाबद्दल मवाळ घेत.

यामुळें जहालही चिडून म्हणत, "आम्हांला अप्रामाणिक म्हणतां, तुम्ही काय प्रामाणिक आहांत? आमचें म्हणणें व्यवहाराला जास्त धरून आहे, तेव्हां नाहींच तुमचें ऐकणार."

म्युनिसिपालिटीच्या सभेंतील दोन पक्षांतील हा वाद हळूहळू वर्तमानपत्रांनीं उचलला व सर्व पुणें शहराचे दोन भाग होऊन वादास रंग चढला. टिळकमताचे सर्व अभिमानी " स्त्रियांचें शिक्षण मागाहून सक्तीचें करा " असें म्हणूं लागले. परांजपे आदि गोखले पक्षाचे सर्व अनुयायी दुसऱ्या पक्षास उचलून धरूं लागले. सेवासदन, आश्रम इ. स्त्रीशिक्षण-संस्थांची सहानुभूति अर्थात् परांजपे पक्षास. कारण या संस्था काढण्यांत पुढाकार घेणारे व पाठीराखे मवाळ पक्षाचे लोक. जहाल पक्षाचे लोक स्त्रीशिक्षणास फारसें महत्त्व न देणारे. कर्वे यांच्या कामगिरीलाही फारसें महत्त्व ते देत नसत. आणि मी स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीच्या कॉलेजांत गेल्याचा आण्णांना जो विशेष आनंद झाला, त्याचें कारण हेंच होतें. त्यांना वाटे, " एका प्रबल विरोधी पक्षाची सहानुभूति त्यामुळें आपल्या कार्याला मिळूं शकेल." १९३८ सालीं केसरीनें प्रो. कर्वे यांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त मुद्दाम विशेष-अंक काढला. पण ६० व्या वाढदिवसाला हें शक्य नव्हतें. टिळकांनीं आण्णांच्या कार्याला फारसें उचलून कधीं धरलें नाहीं, व त्यामुळें आश्रमाच्या कार्यकारी मंडळांत बहुमत टिळक पक्षाला अनुकूल नसे. टिळक व तात्या १९१९ सालीं इंग्लंडहून परत आल्यानंतर त्यांचे जागोजागीं सत्कार होत. कर्वे यांच्या संस्थेंत गेलें तरी टिळकांबद्दल माझा जिव्हाळा होताच. असें वाटे कीं " टिळक आमचें स्त्री-शिक्षण कां उचलून धरीत नाहींत ? टिळक आमच्या हिंगण्यास कां येऊं नयेत ? " पण पूर्वींचे त्यांचे नकार ऐकलेले होते त्यामुळें शंका येई. एक दिवस मीं तात्यांना विचारलें " आम्हांला टिळकांना बोलवावेंसें वाटतें. पण ते येतील का ? तुम्ही सांगाल का त्यांना ? " मला फार वाटे कीं जिला मी राष्ट्रीय समजतें ती संस्था टिळकांनीं कां पाहूं नये ?

" खरं म्हणजे त्यांनीं हिंगण्यास जावें. संस्था पाहावी. पण तेही असे आहेत कीं, आधीं जावयाचे नाहींत. बरें, शब्द टाकून नेले

तर शेरा द्यावयाचे नाहींत. कशाला तूं त्या भानगडींत पडतेस?" तात्या म्हणाले. "आणि तुम्हांला तरी कांहीं स्वाभिमान नाहीं का? टिळक आले तर चांगलें हें जरी खरें, तरी ते न आल्यानें तेथील कार्याची किंमत कांहीं कमी होणार नाहीं."

अशा तऱ्हेची तेढ दोन्ही पक्षांत असल्यानें हा वाद जोरांत सुरू झाला. मुलींचें सक्तीचें शिक्षण मागें पडलें म्हणजे काय? हा स्त्रियांच्या हक्काचा प्रश्न आहे, तेव्हां स्त्रियांनीं यांत भाग घ्यावा व स्त्री-शिक्षण-संस्थांनीं त्यांत पुढाकार घ्यावा. अशी कल्पना निघून सेवासदन, आश्रम येथील स्त्रियांनीं यांत पुढाकार घेतला. पेठोपेठीं सभा करून तेथील स्त्रीवर्गाचें मत प्रदर्शित करावयाचें ठरून अशा सभांना सुरुवात झाली. आण्णा, आण्णांच्या सुना सौ. रेवतीबाई व सौ. मालतीबाई, तसेंच वारूबाई शेवडे, बापूसाहेब चिपळूणकर व सौ. गंगूबाई खेडकर- या त्या वेळीं आमच्या कॉलेजांत शिकत होत्या—या सर्व मंडळींनीं यांत पुढाकार घेतला होता. रेवतीबाई, मालतीबाई व वारूबाई या अगोदरच ग्रॅज्युएट होऊन शिक्षिकेचें काम करीत होत्या. मी बी. ए. चे वर्गातील विद्यार्थिनी होतें; तेव्हां त्या चळवळींत मी पडेन अगर पडावें अशी कोणाची अपेक्षाही नव्हती. उलट तात्या व टिळक जहालमतवादी, मुलींचें शिक्षण मागाहून सक्तीचें करा म्हणणारे, तेव्हां माझी सहानुभूति त्यांचेकडेच साहजिक असणार असें समजून मला त्याबद्दल कोणी विचारीत असत. पण रोज चोहींकडे हे वाद ऐकून व वर्तमानपत्रांत वाचून माझी मात्र तळमळ होऊं लागली. घरीं आलें असतां दोनतीन वेळां तात्यांच्या बरोबर चर्चा झाली व त्यांना मीं सांगितलें कीं, "कांहीं झालें तरी मुलींचें सक्तीचें शिक्षण दूर टाकूं नका."

"आम्ही कोठें दूर ढकलतों? दोन वर्षांनीं मागाहून सक्ती करूं म्हटलें तर असें काय बिघडतें तें मला कळत नाहीं. शिवाय पार्टीचें धोरण एकदां ठरलें म्हणजे ठरलें." तात्या म्हणाले.

"मग तुमचा व माझा उघड मतभेद होईल." मीं म्हटलें, "समजा,

आज मी कन्याशाळेची सुपरिंटेंडेंट असतें व मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न म्हणून कन्याशाळेच्या मंडळानें म्हणजे हिंगण्यानें त्याविरुद्ध मोहीम काढली असती तर सुपरिंटेंडेंट या नात्यानें माझें काम ती मोहीम उचलून धरण्याचें झालें नसतें का ?"

"झालें असतें. असें चालवयाचेंच." तात्या म्हणाले.

दोन वर्षे शिक्षण मागें पडेल. हा कालखंडही इतका महत्त्वाचा नव्हता. पण मुलींचें शिक्षण मागें पडलें तरी चालेल म्हणत तें मला पटत नव्हतें. मला ती स्त्रियांच्या हक्काची अवहेलना वाटे. शिवाय शिक्षणकार्य, विशेषतः स्त्रियांचें शिक्षणकार्य, हें जर माझें पुढच्या आयुष्यांतील ध्येय व्हावयाचें तर तें कार्य पुढें ढकलण्याची संधि मीं कां जाऊं द्यावी ? ही चळवळ आणखी दोन वर्षांनीं होती तरी जहाल पक्षाला विरोध करण्याचा प्रसंग येता, किंवा मी आज जी. ए. होऊन काम करीत असतें तरी येता. अप्रियपणा टाळण्यासाठीं आज मी जी. ए. नाहीं– आणखी चार महिन्यांनीं होणारच– या सबबीवर काय म्हणून गप्प बसावयाचें ? जें वाटतें तें बोलणें कां टाळावयाचें ? हा भ्याडपणा आहे. अशी माझी विचारसरणी. आम्हांला एकदां वर्गात दादांनीं निबंधाला विषय दिला होता— त्या वेळीं जी. ए. चें मराठी प्रो. दिवेकर घेत असत– "जगांतील उत्कृष्ट वाङ्मय वेड्यांनींच निर्माण केलें आहे." हा निबंध लिहितांना मीं उपन्यास केला होता कीं, "आजपर्यंत शहाण्यांनीं जगांत केलेंच आहे काय ? प्रत्येक गोष्ट जर मनुष्य तोलूनमापून करील तर कोणत्याच गोष्टींत तो जास्त करूं शकणार नाहीं. कोणतीही नवीन कृति निर्माण करतांना त्या गोष्टीशीं इतकें एकरूप व्हावें लागतें कीं, इतर व्यवधानें सुटून तो मनुष्य वेड्यांत जमा होतो. पण त्या कार्याचा असा नाद लागून तंद्रींत गुंगून मनुष्य वेडा झाल्याखेरीज त्याच्या हातून पराकाष्ठा होत नाहीं. तुम्हांला यश किती येतें यापेक्षां तुम्ही 'कोणत्या भावनेनें एकादी गोष्ट करतां याला खरें महत्त्व आहे. इ. इ."

६

या वेळीं आपणांस काय वाटतें तें स्पष्टपणें बोलणें हें आपलें कर्तव्य आहे असें मला वाटलें. दर पेठेमध्यें एकेक स्त्रियांची सभा घेऊन या प्रश्नावर मतप्रदर्शन केलें जात होतें. एका शनिवारीं मालतीबाई व वारूबाई सभेस जाऊं लागल्या तेव्हां त्यांचेबरोबर सभेस जाण्याची माझी मनीषा मीं त्यांना सांगितली. ती सभा बहुतेक जेधे मॅन्शनमध्यें होती. सरासरी तीस-चाळीस बायका जमविलेल्या होत्या. तेथें या स्त्रियांना एकंदर प्रश्न समजावून सांगितला. त्या वेळीं मीही बोलण्याची इच्छा दर्शवून भाषण करण्याची अनुज्ञा अध्यक्षांस मागून भाषण केलें, व दुसरा दिवस रविवार तेव्हां हिंगण्यास परत न जातां घरीं राहावयास गेलें.

माझें मत मीं एकदां स्पष्टपणें बोलून दाखविलें व माझ्यापुरता तो प्रश्न संपला. पण खरी चालना येथूनच मिळाली. दुसऱ्या दिवशीं दुपारीं दोन वाजतां बापूसाहेब चिपळूणकर मजकडे आले व आज किर्लोस्कर थिएटरमध्यें होणाऱ्या जाहीर सभेंत तुम्ही बोलाल काय म्हणून विचारूं लागले. ही जाहीर सभा सक्तीच्या शिक्षणाबद्दल नागरिकांचें मत दिग्दर्शित करण्यासाठीं भरविलेली होती. दोन्ही पक्षांचे लोक हजर राहून आपल्या पक्षाला अनुकूल असा ठराव पास करून घेण्याची खटपट करीत होते. लोकमान्य टिळक या सभेस हजर राहणार म्हणून प्रसिद्ध झालें होतें, व टिळकांच्या भाषणानें सभेचें पारडें दुसरीकडे कलूं लागल्यास कलाटणी देण्यासाठीं विरुद्ध पक्षाची कांहीं मंडळी दंगल करण्याच्या उद्देशानें जागा धरून बसणार अशी वार्ता होती. सभेस मी प्रेक्षक म्हणून जाणार होतें पण बोलण्याचा विचार नव्हता. बापूसाहेबांनीं बोलण्याचा प्रश्न विचारला तेव्हां पांच मिनिटें विचार करून त्यांना 'होय' म्हटलें. आतां माल मी थोडासा अव्यापारेषु व्यापार करीत होतें. जावें कीं जाऊं नये हा प्रश्न पडला. माझी विचारसरणी तात्यांना माहीत होतीच. परंतु घरीं वाद करणें वेगळें व जाहीर विरोध करणें वेगळें. पुन्हा मी कोण अशी

जबाबदार व्यक्ति होतें कीं, माझें मत लोकांना कळलेंच पाहिजे? माझें हें करणें बेजबाबदार विद्यार्थ्यांच्या वाह्यात कृत्यांत जमा होण्याजोगें होतें. पण मीं एक तासभर स्वतःशीं विचार केला व बापूला हाक मारली. तात्या परगांवीं गेले होते. ताईही जळगांवीं 'आजोळीं' गेली होती. बापूला बोलावून मीं आपला विचार सांगितला व म्हटलें—"पुढें मला शिक्षणकार्यास वाहून घ्यावयाचें आहे, शिक्षणाचा प्रसार होणाऱ्या प्रत्येक गोष्टीस हातभार लावावयाचा, म्हणून मी हा निश्चय करीत आहें. खरोखरच माझ्या आजच्या इच्छेप्रमाणें पुढें मी शैक्षणिक कार्य करूं शकलें तर हें माझें पाऊल त्या कार्याची सुरवात ठरेल; पण माझे हातून कांहींच कार्य झालें नाहीं तर हा एक अविचार केला असें ठरेल. जें असेल तें पुढें ठरेल. लोक आज मला असेंच म्हणणार कीं, शिक्षणामुळें मुलगी वाह्यात बनली व बापाचे विरुद्ध बोलावयास उभी राहिली. तात्यांच्या आजपर्यंतच्या विचारसरणीवरून त्यांना निदान असें वाटणार नाहीं असें वाटतें. पण कुणी सांगावें? एकादे वेळीं हा आपला अपमान झाला असें त्यांना वाटण्याचा संभव आहे. पण मीं बोलावयाचें व त्याचे जे कांहीं परिणाम होतील ते पत्करावयाचें ठरविलें आहे. पण सभेंत प्रत्यक्ष बोलण्यापूर्वी माझी मनःस्थिति काय होती हें कोणाला तरी माहीत असावें म्हणून तुला सांगतें."

बापू काय माझाच भाऊ व थोडासा जास्तच भावनाप्रधान. तो म्हणाला, "खरें आहे आक्का तुझें म्हणणें. मुलांच्या शिक्षणाला विरोध झाला असता तर मला सुद्धां असेंच वाटलें असतें. तूं जा. पाहूं पुढें काय काय होतें तें. तात्या बहुतेक रागावणार नाहींत. पण रागावले तरी तुझे आजचे विचार मी त्यांना पुढें-मागें सांगूं शकेन."

घरीं आई (आजी) होती तिलाही मी सभेस जातें असें सांगून मी सभेस निघालें. पण ताई जर घरीं असती व ही सर्व चर्चा ऐकून मला म्हणाली असती कीं, "पण तूं बोलण्यावांचून आज अगदीं

सभा अडणार आहे का? तुला काय करावयाच्या ह्या मानगडी?"
तर तिचा शब्द मोडून तात्यांच्या पक्षाविरुद्ध बोलण्यास मी गेलें असतें का? असा प्रश्न जेव्हां मी मनाला विचारतें तेव्हां मात्र त्याचें निश्चित उत्तर मला देतां येत नाहीं.

थिएटर माणसांनीं फुलून गेलें होतें. पाय ठेवावयास रीघ नव्हती. स्टेजही तसेंच भरून गेलें होतें. पण बोलणाऱ्या एकदोघी स्त्रियांसाठीं स्टेजवर जागा राखून ठेविली होती तिकडे बापूसाहेब मला घेऊन गेले. टिळकही योग्य वेळीं आले व सभेस सुरवात झाली. सभा मोडावयाचीं लक्षणें सुरवातीपासूनच दिसत होतीं. हशा, टाळ्या, जयघोष सर्व कांहीं थोड्या थोड्या अंतरानें चालू होतें. सभेच्या सेक्रेटरींनीं सभेचा कार्यक्रम मला दाखवून माझी कोणत्या वेळीं भाषण करण्याची इच्छा आहे तें विचारलें. मुलांच्या शिक्षणाबरोबरच मुलींचें शिक्षण सक्तीचें करावें अशी उपसूचना मूळ ठरावावर प्रि. आप्पासाहेब परांजपे आणणार होते तेव्हां त्या ठरावाला अनुमोदन मी देतें असें सांगितलें. मूळ ठराव मांडला गेला. त्यावर परांजपे यांनीं उपसूचना मांडली व मी अनुमोदन देण्यास उभी राहिलें. गलका हळूहळू वाढत होता तरी परांजपे यांचें भाषण लोकांनीं ऐकलें. मीही पांच-सात मिनिटें बोललें. "प्रथम मुलांचें व पाठोपाठ मुलींचें शिक्षण असें आम्ही होऊं देणार नाहीं. इतके दिवस स्त्रिया तुमच्या पावलावर पाऊल टाकीत होत्या. तरी त्या आतां मागें राहणार नसून तुमच्या पावलाबरोबर पाऊल टाकीत पुढें येतील. इ. इ." माझ्या भाषणालाही मधून मधून दुसऱ्या तिसऱ्या मजल्यांवरील प्रेक्षकवर्ग आपलीं पुरवणी-वाक्यें जोडीत होता. "आम्हांला कशाला सांगतां? केळकरांना सांगा!" "तुमचीं पावलें आमच्याबरोबरीनें पडणार नाहींत. इ." तरी पण माझें भाषण पुरें झालें. यानंतर या उपसूचनेविरुद्ध बोलावयास टिळक उठून उभे राहिले. पण टिळकांना बोलूं न द्यावयाचा निश्चय जणूं अगोदर ठरला होता. अनुकूल टाळ्या प्रतिकूल आरोळ्या वाढूं लागल्या व स्टेजवरील

कडेच्या दोन रांगा एकदम स्टेजवरील लोकांचे अंगावर कलंडूं लागल्या. त्याबरोबर तेथील लोक उठूं लागले. ते उठूं लागतांच दंगा जास्तच वाढून कोणाचा शब्द कोणाच्या कानीं पडेना. शेवटीं सभा बंद करीत आहोंत असें अध्यक्षांनीं जाहीर केलें; व दंगा वाढतो आहे तुम्ही दोघी प्रथम बाहेर पडा असें म्हणून विठ्ठल रामजी शिंदे मला व गंगूबाई खेडकर यांना स्टेजवरून रस्त्यापर्यंत पोंचवावयास आले.

सभेंत भाषण करतांना आपलें मत व्यक्त करून शिक्षणविषयक प्रश्नाला चालना देण्याचें आपलें कर्तव्य करावयाचें असें मी समजत होतें. पण तो प्रश्न तेवढाच न राहतां तो एक पक्षाच्या शिस्तीचा प्रश्न झाला.

या सभेनंतर सुमारें आठ दिवसांनीं म्युनिसिपालिटीची दुसरी सभा होती व तेथें ह्या प्रश्नाचा निकाल लगावयाचा होता. जहाल पक्षाचें बहुमत होतें. परंतु सक्तीचें शिक्षण करतांना करवाढ करावी लागणार होती त्याला तीनचतुर्थांश सभासदांचें बहुमत व्हावें लागतें. मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न जहाल पक्षानें बहुमताचे जोरावर मागें टाकला त्यामुळें मुलांचें शिक्षण सक्तीचें करण्यास जरूर ती करवाढ करण्याला मवाळ पक्षानें विरोध केला, व तीनचतुर्थांश बहुमत होऊं दिलें नाहीं. आणि त्या वर्षी मुलें व मुली कोणाचेंच शिक्षण सक्तीचें न होतां तो प्रश्न दोन वर्षें पुढें ढकलला गेला!

म्युनिसिपालिटीच्या सभेचे दिवशीं एक स्त्रियांची मिरवणूक निघून ती रे मार्केटांत म्युनिसिपालिटीच्या सभेचे वेळीं जाऊन पोंचली. कांहीं चर्चा झाली पण प्रश्नाचा निकाल न लागतां तो प्रश्न पुढल्या सभेवर ढकलला गेला. या म्यु० सभेचे दिवशीं तात्या पुण्यांत असून सभेस हजर होते. मी मिरवणुकींत भाग घेतला होता. सभा संपून घरीं आल्यावर मागल्या माझ्या जाहीर भाषणानंतर तात्यांची व माझी प्रथमच धूळभेट झाली. तात्या शांतपणें येवढेंच म्हणाले, “ तूं मत प्रदर्शित करतेस यांत कांहीं चूक नाहीं. पण पुष्कळदां यांत फसगत होते. तुम्हांला असें वाटतें, मग तुम्ही असें बोलत कां नाहीं असें म्हणून पुष्कळदां मलाही लोक

बोलावतात व मग पक्षाचे दृष्टीनें त्याचा गैरफायदा घेतला जातो. माझी पुष्कळदां अशी फसगत होते. तुझा विचार तूं कर."

या माझ्या जाहीर मतप्रदर्शनाबद्दल नापसंतीपासून अभिनंदनापर्यंत सर्व प्रकारचीं मतें प्रकट झालीं.

( १ ) कांहीं म्हणत, "हें घ्या स्त्री-शिक्षणाच्या दुष्परिणामाचें ढळढळीत उदाहरण. आज मुलगी बापाविरुद्ध बोलते, उद्यां बायको नवऱ्याविरुद्ध मतप्रचार करील." अभ्यंकरशास्त्री आदि सनातनी मंडळीची विचारसरणी अशी.

( २ ) कांहीं म्हणत, "असेल कमलाबाईचें वेगळें मत या प्रश्नाबद्दल. पण आज ह्या वादविवादांत तें जाहीरपणें पुढें मांडण्याचें औचित्य काय ?"

( ३ ) कांहीं याहून जास्त सहानुभूति दाखवून म्हणत, "तुम्हीं जाहीरसभेंत बोलतां येतें कीं नाहीं हें पाहिलेंत हें ठीक— कारण हें माझें पहिलेंच जाहीर भाषण होतें— पण तुमचें मत नाहीं आम्हांला पटत."

( ४ ) विरुद्ध परिस्थितींत स्पष्टपणें बोललें हें मनोधैर्य समजून अभिनंदन करणारेही कांहीं होतें.

आण्णांनीं हिंगण्यास भरलेल्या सभेंत याबद्दल जाहीर अभिनंदन करून, अशा विद्यार्थिनी जर कॉलेजांत येतील तर युनिव्हर्सिटीची भरभराट होईल असें सांगितलें. पुढील दोन पत्रेंही भिन्न मतप्रवाह दिग्दर्शित करणारे नमुने म्हणतां येतील.

पहिलें पत्र रा. पंढरीनाथ घाणेकर यांचें सातारहून लिहिलेलें आहे.

सातारा, ११-२-२०

कमलावहिनी !

"कालच्या लोकसंग्रहांत किर्लोस्कर थिएटरांत भरलेल्या सभेची हकिगत वाचली. त्या सभेत रँ. परांजपे यांच्या सूचनेला अनुमोदन देण्याकरितां तुम्ही बोललां. एवढ्या सभेंत बोलण्याच्या संधीचा तुम्हीं

फायदा घेतला व आपले विचार लोकांना शांतपणें सांगितलें हें फार चांगलें झालें.

"पुण्यास कोणत्या विषयाला महत्त्व येणार नाहीं असें नाहीं. शिक्षण सक्तीचें करावें याबद्दल इतका वाद! धन्य आहे तुम्हां पुणेकरांची! शिक्षणासारख्या विषयांत एकमेकांचीं डोकीं फोडण्याचा प्रसंग यावा? एकंदरीनें पाहतां तात्त्विकदृष्ट्या कोणाचाच मतभेद नाहीं. आजच्या आज मुलामुलींचें शिक्षण सक्तीचें व मोफत करावें का नाहीं एवढाच प्रश्न आहे. पैशाच्या अडचणींत कांहीं राम नाहीं. हळूहळू करूं असें म्हणण्यांतही कांहीं अर्थ नाहीं. तुम्ही म्हणालांत कीं मुलामुलींची शिक्षणाची तरतूद एकदम करावी. आज सवड नसल्यास कोणालाच सक्ती करूं नका. पैशाची सोय झाल्यावर एकदम करा. मी म्हणतों असें तरी कां? आजच्या आज दोघांची करा. पैशाची अडचण सरकार सांगतें तेव्हां आपली समजूत पटत नाहीं. आतां म्युनिसिपालिटी तीच अडचण सांगते. पण आमच्या हातांत सत्ता असल्याचा फायदा काय? 'कर वाढवावयाचे नाहींत' तत्त्व योग्य आहे, पण केव्हां? चैनीकरतां वाढवीत असाल तर! आवश्यक गोष्टींची तरतूद करण्याकरतां कर वाढवणेंच शहाणपणाचें असतें. अडीच शेरांवर धारण आली तरी खाण्याचें सोडून भागत नाहीं. त्याचप्रमाणें खाण्याइतकें महत्त्वाचें शिक्षण वाढविण्याकरतां थोडासा चट्टा बसला तरी सोसला पाहिजे. आतांचे कर उद्यांचें भांडवल होणार. भांडवल घालावयालाच व्यापारी भ्यावयास लागला तर व्यापार कसला करणार? आज दीडदमडीच्या कराला भिऊन पुण्याच्या निम्म्यापेक्षां जास्त मुलांना अडाणी ठेवायला म्युनिसिपालिटी तयार आहे कीं काय? आज कराची व्यवस्था केल्यास पुण्याचे अंगीं केवढी शक्ति येणार आहे? बायकापुरुष सर्व शिकलेले. लोकांना खूष करण्याचा त्यांच्यावर कर न बसविणें हा मार्ग नसून त्यांना पुढच्या पायरीस नेणें हा होय, व या दृष्टीनें पाहतां कर बसविण्याला भिणें योग्य नाहीं. पैसा खर्च न करतां लोकांनीं शिकून तयार

व्हावें असें म्हणत बसल्यास शंभर वर्षे देखील पुरणार नाहींत. आजच्या आज इष्ट साधण्याची हौस धरली तर उद्यां तरी साधेल. याच लवाट्यांना आज होमरूल पाहिजे आहे. तो कां? तिकडे जी दृष्टि तीच सगळीकडे ठेवावी. ना. परांजपे वगैरे मंडळींनीं चालविलेला प्रयत्न स्तुत्य आहे. तुम्हीही धिटाईनें पुढें आलां हें वाचून आनंद झाला. परंतु—

"परंतु काय? वहिनी! या ठिकाणीं पक्षपाती स्वभाव आड आला. ना. परांजपे यांचें म्हणणें पटलें. परंतु त्यांच्या अग्रणीत्वाखालीं तुम्हीं जावें असें वाटत नाहीं. कारण कीं ते आमच्या द्वेष्ट्यांना सामील होऊन आमच्या विरुद्ध येत आहेत. ब्राह्मणांचा व ब्राह्मणेतरांचा सलोखा करण्याऐवजीं ते वितुष्ट वाढवीत आहेत. टिळकांना बोलूं दिलें नाहीं. यांत मोठें पुरुषार्थाचें काम झालें नाहीं. दोन टारग्यांनीं मनांत आणल्यास वाटेल ती सभा मोडण्याचें पुण्य त्यांना संपादितां येईल. तुम्हांला लोकांनीं बोलूं दिलें यावरून टिळकपक्षीयांनीं दाखविलेल्या चांगुलपणाची साक्ष रँ. परांजप्यांना पटेल. आज एक सभा मोडली. उद्यां दुसरी मोडणार असा रिवाज पडण्याचें परांजप्यांना फायद्याचें वाटत असल्यास कोणाचेंच म्हणणें नाहीं. आरडाओरडा करून टिळकांना खालीं बसविलें यावरून टिळकांचा पराजय झाला असें होत नाहीं. त्यांच्याविरुद्ध बहुमत केल्यास तें श्रेय मिळेल. चिखलांत धोंडा टाकायला एकटा पुरे होतो, व अशा एकाद्या टाकणाऱ्याची मदत घेऊन टिळकांचा मोड करण्याचा प्रयत्न करणें हास्यास्पद आहे. व म्हणूनच तुम्ही रँ. परांजप्यांच्या छत्राखालीं न येतां स्वतंत्र रीतीनें पुढें आला असतां तर माझ्या मतें फार बरें झालें असतें. हरएक बाबतींत टिळकांशीं विरोध करणाऱ्यांशीं, त्यांच्याशीं आपलें एवढ्या बाबतींत जमतें म्हणून, संगनमत करणें योग्य नाहीं. त्यानें आपल्या पुढाऱ्याचा अपमान आपण केल्याचा दुर्लौकिक पदरीं येतो. म्हणून तुम्ही स्वतंत्र रीतीनें प्रयत्न करा. टिळकांचे पाय धरा, पाय धरून त्यांचें मन वळवा,

रुसून वळवा, पण त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांत मिळून त्यांचेवर आघात करूं नका."

—पंढरिनाथ

दुसरें पत्र गोखले तात्यांनीं कराचीहून लिहिलें.

कराची, १६-२-२०

अनेक आशीर्वाद विशेष.

पुण्यांतील जहाल मित्रांसमोर त्यांना अप्रिय असें भाषण करण्यास धैर्य लागतें. परवां टिळकांचे मानपत्राचे बाबतींत मागाहून फुसकुल्या सोडण्यापेक्षां रँगलरनीं जर तुझ्याइतपत शौर्य दाखविलें असतें तर-प्रथम जरी थोडासा मार खावा लागला असता तरी पण, टिळकांचें लोकमान्य-पद रे मार्केटमध्यें त्यांस सोडून रँगलर यांचेकडे खात्रीनें गेलें असतें. त्या परीक्षेंत ते नापास झाले—बिचाऱ्यांनीं माझेकडून एक फाउंटन् पेन मिळविण्याची संधि घालविली. नशीब त्यांचें!– पण तूं परवांचे परीक्षेंत पास झालीस हें वाचून फार आनंद झाला. तुझ्या या शौर्याबद्दल बक्षीस म्हणून नव्हे, तर शौर्याची आठवण कायम राहावी–कशाला तर फिरून प्रसंग आल्यास उपयोगाकरतां म्हणून— मी एक आठवण (फाउंटन् पेन) पाठवीत आहें. ती नेहमीं वापरावी. पेटींत ठेवूं नये. मीं नुकतेंच ती. तात्यांना 'केसरीस योग्य' अशा जहाल भाषेंत एक पत्र पाठविलें आहे. 'गळ्यांत दावें बांधून नेतील तिकडे गेलें पाहिजे अशी' तूं गरीब गाय त्यांचे विरुद्ध भाषण करतेस इतकी आपली शिकवणूक फळास आलेली पाहून, त्यांस एक तऱ्हेचा आनंदच झाला पाहिजे. अजून जरी *'मनु' पालटली नाहीं तरी 'मनु' पालटला खरा. नवीन मनूचा जयजयकार असो. कळावें. हा आशीर्वाद.

तुझा

—तात्या गोखले

---

*'मनु' म्हणजे तात्यांची पत्नी सौ. इन्दिराबाई गोखले.

या माझ्या भाषणाला नुसत्या पुण्यांतच नव्हे तर महाराष्ट्रभर प्रसिद्धि मिळून बरेच दिवस तो एक चर्चेचा विषय झाला. पुढें महिन्याभरानें ताई जळगांवाहून परत आली. ती म्हणाली, "आक्का, तूं हें भाषण केलेंस म्हणजे काय केलेंस? प्रत्येक ठिकाणीं सर्वांनीं मला विचारून विचारून पुरेवाट केली कीं, 'अहो तुमची मुलगी असें कसें बोलली! कोणी म्हणत बोलली असेल चांगली. पण असें वडिलांच्या विरुद्ध बोलणें शोभलें का?' इ."

म्युनिसिपालिटींतील बहुमतवाल्या पक्षाच्या विरुद्धच माझें भाषण झालें होतें. पण त्यांनींही त्या वर्षीच्या स्कूल बोर्डामध्यें मला संयुक्त सभासद ( Co-opted member ) करून घेऊन एक प्रकारें पसंती दाखविली. त्या वर्षीचे संयुक्त सभासद म्हणजे रा. ग. स. मराठे व मी. तेथें म्युनिसिपालिटीच्या शाळा तपासण्याचा थोडासा अनुभव मला मिळाला. पण पुढें कन्याशाळेसाठीं सातारला गेल्यामुळें मीं तें काम सोडलें. या भाषणाचा दुसरा परिणाम म्हणजे मला जाहीर सभांत बोलतां येऊं शकेल हा विश्वास आला. हुजुरपागेंत वनिता-समाजांत व हिंगण्यांत 'ज्ञानाभिलाषिणीं'त मी हौसेनें बोलत असे. पण ती गोष्ट सर्वच प्रकारें मर्यादित असे. श्रोत्यांनीं भरगच्च भरलेल्या व अवखळ मनःस्थितींत असलेल्या श्रोत्यांपुढें हें पहिलेंच जाहीर भाषण झालें. त्यामुळें दृष्टीची भीति मोडली. तरी पण श्रोतृसमुदाय लक्षांत घेऊन त्यांना मनोरंजक व परिणामकारक होईल असें कसें बोलावें हें कळा-वयास आणखी कांहीं वेळ व अभ्यास व्हावा लागला. त्याच वर्षीच्या मे महिन्यांत जी. ए. ची परीक्षा झाली व मी शिरवळास गेलें. आण्णाही त्याच वेळीं शिरवळास मुद्दाम आले होते. आण्णांचा व्याख्यानाचा दौरा होता तो. पण शिवाय मी जी. ए. झालें. तेव्हां माझ्याशीं व वाग्भटांशीं बोलून माझें मन आश्रमाची आजन्मसेविका होण्याबद्दल वळवावें हीही दृष्टि त्यांत होतीच. आण्णा आल्यामुळें त्यांचें व्याख्यान शिरवळच्या विठोबाचे मंदिरांत करावयाचें ठरलें. माझ्या

भाषणाची जाहिरात झाली होतीच. तेव्हां शिखळकरांनीं मला व सुशिलाबाईंना भाषण करावयाची विनंति केली. मी होकार देऊन भाषणाची अगदीं आवर्जून तयारी केली. आण्णांचे नंतर आम्ही दोघी थोडें थोडें बोललों. प्राचीन स्त्रियांची परंपरा, 'गृहिणी सचिवः सखी मिथः' इ. कालिदासाचें वचन, त्याचप्रमाणें कांहीं इंग्लिश अवतरणें

"Perfect woman nobly planned
To rule to comfort and command"

इत्यादि योजून मीं भाषण सजविलें होतें. पण घरीं आल्यावर वाग्भट म्हणाले, "तुमचें पहिलें भाषण कांहीं लोकांना परिणामकारक वाटलें नाहीं. घेतलेल्या आक्षेपांवर उत्तर देण्यास ज्या वेळीं तुम्ही उभ्या राहिलांत व 'सगळी साळयाची, अर्धी माळ्याची, ऋणकरीण ब्राह्मणाची' इत्यादि म्हणींचा उपयोग करून बोललांत त्याचाच परिणाम जास्त झालेला दिसला." श्रोतृसमुदायाला कळेल अशा भाषेंत बोलल्याखेरीज तें परिणामीं होत नाहीं हें प्रथम मला कळलें नव्हतें व बऱ्याच नवशिक्या वक्त्यांना कळत नाहीं. यापुढचें माझें भाषण त्याच वर्षी मे महिन्यांत साताऱ्यास झालें. विविधव्याख्यानमालेचे तेव्हांचे चिटणीस रा. बावडेकर वकील यांनीं पाठक हॉलमध्यें ही योजना केली. मींही व्याख्यानाचा विषय मनाशीं योजून त्याला नावीन्यपूर्ण 'नथ' असें नांव सांगितलें. आधींच स्त्रियांचीं व्याख्यानें क्वचित् होत, त्यांतही किर्लोस्कर थिएटरांत बोलून मला प्रसिद्धि मिळालेली व 'नथ' हा विषय. नथेवर ह्या तासभर काय बोलणार? कुतूहलानें सर्व समाज जमला होता. पण थोडीशी काव्य-इतिहासप्रचुर अशी माझी विचारसरणी, ती समजून घेऊन त्यांत रंगणारा श्रोतृसमाज व नानासाहेब आगाशे यांचेसारखे इतिहासरसिक अध्यक्ष, यामुळें तें माझें व्याख्यान फार यशस्वी झालें. मराठ्यांच्या इतिहासावरील तें एक रूपक होतें. शिवशाही व पेशवाई हे दोन पहिले चौकडे कल्पून, स्वराज्याच्या मध्यवर्ती कल्पनेभोंवतीं ते

गुंतून राहिल्यानें नथेची सुरवात झाली. पण पेशवाईचे उत्तरकालांत सखाराम बापू, महादजी शिंदे, नाना फडणीस अशीं तेजस्वी मोत्यें असूनही मध्यवर्ती सत्तेच्या अभावानें चौकडा जमला नाहीं, जोड्याच राहिल्या, शेवटीं बापू गोखल्यासारखे तेजस्वी मोती असूनही त्यांना झिळमिळयाप्रमाणें लोंबत राहावें लागलें आणि गुलामगिरीचा फांस बसला अशा भाषेंत हें रूपक सजविलें होतें.

भाषणास सुरवात केली. पण प्रस्तावनेंतून विषयप्रवेश नीट जमेना व पांच मिनिटें मी जरा गोंधळलें कीं सर्वच फसतें कीं काय! पण दहा-पंधरा मिनिटांत शिवशाहीच्या वर्णनापर्यंत आलें व मग पुढें वाक्प्रवाह नीट चालू झाला, मी समरस झालें, श्रोतेही विषयांत रंगून गेले व तास संपलेला कळला नाहीं. आज बावीस वर्षांनींही तें व्याख्यान माझ्या चांगल्या व्याख्यानांपैकीं एक आहे असें मला वाटतें. सातारकर मंडळींवर या व्याख्यानाचा फार अनुकूल परिणाम झाला व हें पूर्व-संचित मला कन्याशाळेच्या कामांत पुढें उपयोगीं पडलें. संदेशनें ह्या व्याख्यानाचा सविस्तर वृत्तान्त 'कमळाबाईची नथ' हा मथळा देऊन दिला होता. (प्रत्यक्ष तो अंक मला पहावयास मिळाला नाहीं.) मात्र तात्यांना या मथळ्याचा फार राग आला. कारण उघड आहे! वृत्तान्त बराच जिज्ञासाप्रवर्तक असावा असें वाटतें. कारण पुढें एकदोन वर्षें कोणत्याही गांवीं गेलें तरी लोक मला ह्या व्याख्यानाबद्दल विचारीत.

टिळक हे सामाजिक सुधारणा व स्त्रीशिक्षण इ. गोष्टींना उचलून न धरणारे व सक्तीच्या शिक्षणाच्या चळवळीचे वेळींही त्यांचें विरुद्ध मत प्रकट झालेलें. तरी पण त्यांच्या मृत्यूनंतर हे सर्व मतभेद विसरले गेले व त्यांचेबद्दल असलेली स्त्रियांचे मनांतील भक्ति सभांच्या द्वारें उसळून आलेली दिसली. मात्र या स्त्रियांत तत्कालीन समाजसुधारक समजल्या जाणाऱ्या स्त्रियांचा पुढाकार फार थोडा होता. स्त्रीशिक्षण-संस्थाही जरा उदासीनच. पुण्यामध्यें एक स्त्रियांची जाहीर सभा करावयाचें ठरवून ती सर्व नागरिक स्त्रियांची प्रातिनिधिक सभा असावी

म्हणून आम्ही विनंतिपत्रकावर छापण्यासाठीं सह्या गोळा करण्यास हिंडलों. डॉ. आप्पासाहेब परांजपे यांच्या पत्नी सौ. सईबाई परांजपे यांनीं विनंतिपत्रकावर घालवयास आपली सही दिली पण त्या सभेस आल्या नव्हत्या. सौ. जानकीबाई परांजपे— कै. शिवराम महादेव परांजपे, काळकर्ते, यांच्या पत्नी— यांचेकडे सही मागितली तेव्हां त्यांनीं परांजप्यांना विचारून कळविलें कीं, "या तुमच्या बायकांच्या सभा वगैरे आम्हांस कांहीं पसंत नाहींत. तरी मी सही देत नाहीं." कै. श्रीमती रमाबाई रानडे यांनीं मात्र पुष्कळ मदत केली. सही तर त्यांनीं दिलीच, पण सभेच्या अध्यक्षही त्या झाल्या व सर्व काम पार पडे-पर्यंत सल्लामसलत देऊन मार्गदर्शनही त्यांनीं केलें. सभेच्या दिवशीं इतक्या बायका— जुन्या वळणाच्या— स्वयंस्फूर्तीनें बोलावयास पुढें येऊं लागल्या कीं सभेचा ठरलेला तास दीड तास संपला. यापुढें स्त्रियांना बोलावयास परवानगी देऊं नये कारण सभा ठरलेल्या वेळांत संपावयास हवी असें आमच्यापैकीं एकीनें सुचविलें. तेव्हां रमाबाई म्हणाल्या, "स्त्रियांना हवें तितकें बोलूं द्या. नको म्हणूं नका. स्त्रियांनीं धैर्यानें पुढें येऊन आपलें मनोगत व्यक्त करावें यासाठीं तर आपली स्त्रीशिक्षणाची चळवळ. आज त्या तेंच करीत आहेत तर त्यांना नको म्हणूं नका. त्यांच्या भावनेला विरोध करूं नका. लांबेल थोडी सभा. आणि मला वाटतें ती सभा साडेतीन चार तास झाली. खाडिलकरांची मुलगी सौ. शांताबाई याही या सभेंत येऊन छानसें बोलल्या असें आठवतें.

असहकारितेच्या दौऱ्यामध्यें महात्मा गांधी पुण्यास आले होते. त्या दिवशीं ते आमचे घरींच उतरले होते, व त्या वेळीं त्यांचेबरोबर प्रत्यक्ष संभाषणाचा योग आला. किर्लोस्कर थिएटरांत स्त्रियांची सभा झाली त्या वेळीं पहिलें प्रास्ताविक भाषण मीं केलें. पुढें गांधींनीं भाषण करून चळवळीसाठीं पैशाची मागणी केली व स्त्रियांनीं दागिनेही काढून दिले, वगैरे स्मरतें.

कै. लो. टिळक यांच्याबद्दलच्या दुखवट्याच्या सभा व स्मारकाच्या सभा या निमित्तानें माझा भाषण करण्याचा सराव जास्तच वाढला. टिळकांच्या बाबतींत बोलणें हें एक आपलें कर्तव्य आहे असें वाटे व त्या वेळीं सभेचें कोणतेंही निमंत्रण मी सहसा नाकारीत नसे. शिवाय स्त्रीशिक्षण व साक्षरता यांच्या प्रचारास व्याख्यानांची आवश्यकता आहे असेंही वाटे. आमंत्रणांना तर तोटा नव्हताच, पण या विषया-खेरीज इतर विषय व इतर कार्यें यांतही भाषण करावयास आमंत्रण येई. कारण त्या वेळीं सभेंत भाषण करणाऱ्या स्त्रिया थोड्या असत व यामुळें पुष्कळसा वेळ सभांत व भाषणांत जाई. लहान मुलाच्या हातीं कुऱ्हाड पडावी तशी थोडीशी ही स्थिति होती. प्रत्येक ठिकाणीं घाव घालावासा वाटे. पण बावीस कीं तेवीस सालीं एकदां नाशिकला सर्व-धर्मपरिषद् भरली होती त्या सभेचें आमंत्रण आलें. मलाही जावेंसें वाटलें व जाऊं का म्हणून विचारावयास तात्यांचेकडे गेलें.

"आतां मात्र तुला सूचना द्यावयाची वेळ आली." तात्या म्हणाले, "सर्व-धर्मपरिषदेंत भाषण करावयास जास्त व्यासंग पाहिजे. भरपूर व्यासंगाखेरीज भाषण एकादे वेळीं उपहासास्पद होईल. तेव्हां व्याख्यानें देण्याऐवजीं व्यासंग वाढीव. असा नियम कर कीं पांच वर्षें सार्वजनिक व्यासपीठावर चढून भाषण करावयाचें नाहीं."

"पण मी होऊन का भाषण करावयास निघालें होतें?" मीं म्हटलें, "अशा परिषदांस गेलें म्हणजे इतर शास्त्रीपंडितांनीं केलेली चर्चा ऐकावयास मिळतें. शिवाय मी आपण होऊन आमंत्रण लावून थोडीच जातें आहें. त्यांचें मुद्दाम आमंत्रण आलें म्हणून मी जावयाचा विचार करतें आहें."

"तुझा वेळ व पैसा खर्च करून तूं जाणार. लोकांचें काय जातें तुला नुसते आमंत्रण करण्याचे श्रम घेण्याला? प्रत्येक सभेचें आमंत्रण घेऊन त्यांत बोलण्यापेक्षां आपल्या स्वतःचा एकाद्या विषयाचा व्यासंग ठेवावा, व प्रसंगविशेषीं स्वतःच्या सोईप्रमाणें त्या विषयावर कोणी

व्याख्यान द्यावयास सांगितलें तर द्यावें. पण प्रथम नियम कर कीं पांच वर्षे जाहीर भाषण करावयाचें नाहीं."

विचारानें मलाही यांतील ग्राह्यांश पटला. बोलण्याची कला आली तरी माहितीपूर्ण व्याख्यानें भराभर देतां येणें शक्य नाहीं. एकपट व्याख्यान तर पाठीमागें दसपट व्यासंग असला पाहिजे व प्रचारकी व्याख्यानांत वेळ घालवून तो होणें शक्य नाहीं. त्याला जास्त स्वस्थता हवी. या वेळीं सातारची कन्याशाळा चालू झाली होती व शाळेच्या माहितीसाठीं व्याख्यानें देणें आवश्यक असे. कारण कोठेंही वर्गणी गोळा करावयास गेलें कीं प्रथम एक व्याख्यान दिल्यास, लोकांना माझी व माझ्या कामाची माहिती होऊन वर्गणी गोळा करणें सुकर होई. तेव्हां तात्यांच्या म्हणण्याप्रमाणें अजीबात व्याख्यान देणें थांबविणें शक्य नव्हतें. पण मीं स्वतःला येवढी मर्यादा घालून घेतली कीं कन्याशाळेच्या कामाखेरीज इतर बाबतींत व्याख्यानें द्यावयाचीं नाहींत.

# स्त्रीशिक्षण, साक्षरताप्रसार की परदेशगमन? : : ७

सक्तीच्या शिक्षणाचा प्रश्न संपतांच मीं माझ्या जी. ए.च्या परीक्षेच्या अभ्यासाकडे लक्ष केंद्रित केलें आणि मला परीक्षेंत चांगल्यापैकीं यशही मिळालें, पण खरा विचार येथूनच पुढें सुरू झाला. पुढें काय करावयाचें व कसें करावयाचें? आण्णा, नाना आठवले, चिपळूणकर आदि मंडळीची इच्छा व खटपट, कीं मी परीक्षा होतांच ताबडतोब आश्रमाचे आजन्मसेवक व्हावें. सातारच्या सर्व मंडळींची इच्छा तशीच. तात्यांची इच्छा मीं आण्णांचे मार्गदर्शकत्वाखालीं काम करावें अशी होती. कारण १९१९ सालीं इंग्लंडला जातांना ते मला हिंगण्यास भेटावयास आले त्या वेळीं मला ते म्हणाले, " मग काय, होणार ना part and parcel of the Institution?" पण मला मात्र अजून आजन्मसेवक व्हावें असें वाटत नव्हतें. तरी पण युनिव्हर्सिटीचा अभ्यासक्रम मला आकर्षक वाटे व त्यासाठीं काम करावें अशी माझी ओढ. द्वितीय वर्षाच्या संमेलनाचे वेळीं पुढें कोण कोण, काय काय काम

करणार याची चर्चा चालली असतां मींही आपली इच्छा सांगितली होती. अनाथ बालिकाश्रमाचे कार्यापेक्षां विद्यापीठाचें कार्यक्षेत्र व्यापक होतें. शिवाय स्वभाववैचित्र्य व विचारभिन्नता यामुळें आश्रमाच्या आजन्म सेवकांचें व माझें सहकार्य कितपत होईल याबद्दल शंका येई.

कॉलेजशिक्षणाला सुरवात करतांना डोळ्यांसमोर ठेवलेली पहिली गोष्ट म्हणजे स्वतः स्वावलंबी होणें; व दुसरी गोष्ट म्हणजे इतर स्त्रियांना स्वावलंबी होण्यास मदत करणें. मला जी सर्वांत चीड येई ती दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची. मनुष्याला जन्मतःच स्वावलंबी होतां येत नाहीं किंवा मागच्या पिढीनें केलेला खर्च जरी परत केला तरी घेतलेली काळजी परत करणें शक्य नाहीं. मागच्या पिढीचे उतराई होण्याचा मार्ग म्हणजे आपण दुसऱ्यास तितकें शिक्षण देणें. मी स्वतः मागचे पिढीचे मदतीनें जी. ए. होणार, तेव्हां आपण दुसऱ्या कोणास जी. ए. होईपर्यंत शिकवून स्वावलंबी करावें असें मीं योजिलें. याच वेळीं माझी मावसबहीण वारणाबाई हिजवर असाच प्रसंग आला. इन्फ्ल्युएंझाचे सांथींत अकरा दिवसांत नवरा व बाप दोन्ही गमावले व तिचें वय सारें पंधरा-सोळा वर्षांचें! तिला पत्र लिहून माझा मनोदय मीं कळविला व जी. ए. होतांच मी तुझें शिक्षण करतें तूं मजकडे ये असें लिहिलें. तिच्या चुलत्याची संमति होती; पण आजीचा विरोध होता. आईवेगळी मुलगी म्हणून आजीनें तिचें लहानपणापासून संगोपन केलें होतें. प्रथम मावशीकडे म्हणून तिनें तिला आमच्या घरीं ताई-कडे पाठविलें. पण ज्या वेळीं हिंगण्यास मजजवळ राहण्याचा व शिकण्याचा विचार तिला कळला तेव्हां ती ताबडतोब सांगलीहून पुण्यास आली. 'वारणे, तूं शिकावयास जाऊं नको', म्हणून म्हातारीनें जीव काढून ठेवला. शिकण्याची इच्छा वारणाबाईस होती व आतां जरी वाईटपणा घ्यावा लागला तरी परिणामीं तो हितावह होईल असा तिचा व माझा विश्वास होता. म्हातारी उपाशी राहून व रागारागानें 'वारणे, पुन्हा तुझं तोंड पाहणार नाहीं' म्हणून निघून गेली. पुढें

पुष्कळ वर्षें तिचा राग व अबोला होता. पण शेवटीं ज्या वेळीं नात आजारी पडली व वांचत नाहीं असें वाटूं लागलें तेव्हां तिचा राग मावळला व पहिली माया उसळून आली.

हिंगण्यास मी बिऱ्हाड करून राहूं लागल्यावर वारणाबाई मजजवळ राहत असे व शाळेंत शिकत असे. मराठी पहिलीपासून जवळ जवळ तिला शिकावें लागलें. माझ्या 'वारज्या'च्या ग्रामशाळेंत शिकविण्यास ती दररोज तीन मैल चालत येई व माझ्या उत्साही स्वयंसेवकांपैकीं ती एक होती. सातारला कन्याशाळेंत मी गेल्यावर तिला सातारला नेलें व इंग्लिश चौथीपर्यंत ती शिकली. स्वभाव प्रेमळ व कामसू. शिवाय शिकून तयार होऊन कन्याशाळा चालविण्यास मदत करण्याची तिची महत्त्वाकांक्षा. पण दुर्दैव आडवें आलें! ती संधिवातानें आजारी पडली व झिजून झिजून पांच-सात वर्षांनीं वारली. ती शिकत होती तोंपर्यंत तिचा खर्च मीं केला. पुढें तिची धाकटी बहीण तिला आपले घरीं घेऊन गेली. तिच्या सासरची कांहीं शेती होती व त्यांतून तिला थोडें तरी मिळावें म्हणून आम्ही खटपट करीत होतों. पण ती मरेपर्यंत त्या प्रकरणाचा निकालच झाला नाहीं. तिला शेवटीं सर्वांत दुःख झालें तें हें कीं, स्वतःचें कांहीं नाहीं. दुसऱ्यावर अवलंबून जगावें लागलें.

माझ्या बाळमैत्रिणींपैकीं कांहींच्यावर असेच प्रसंग आले. भिमाताई ही यांपैकीं एक. ती बारा वर्षांची असतां विधवा झाली. पण घरची मंडळी इतकी जुनी कीं बिचारी कधीं ओसरीवर आली नाहीं. लहान वयांत तिला प्रथम कांहीं कळलें नाहीं. पण जसजशी मोठी होत गेली तसतशी तिला ही जाणीव आली. ती मला म्हणे, "अक्का तूं सरळ शिकतेस फार चांगलें करतेस; माझा जन्म असाच जाणार! आजी जुन्या मताची व करड्या शिस्तीची; नात शिवल्यानें पाणी विटाळेल म्हणून दूर देवघरांत ठेवी व शंका नको म्हणून, दरवेळीं पुन्हा विचारी, 'भिमे शिवली नाहींस ना?' 'असा राग येतो' ती म्हणे, 'कीं वाटतं मुद्दाम जाऊन शिवावं' पण जुन्या माणसांना आपण दुसऱ्याचें मन दुखावतों

ही कल्पनाच नाहीं. पहिल्या इन्फ्ल्युएंझाच्या सांथींत ही मृत्यु पावली व तिला कांहीं मदत करावयाची माझी कल्पना तितकीच राहिली.

आणखी एक मैत्रीण ठकूताई. हिजवर ही बालवयांत असतांनाच वैधव्याचा प्रसंग आला. आई, बाप, बहिणी मोठें कुटुंब; पण जुन्या वळणाचें. सर्व माया करीत. पण हिनें घरांत सर्वांचें करावें व सर्वांनीं हिचें पोषण करावें म्हणजे आणखी हिला काय पाहिजे असें त्यांना वाटे. हिंगण्यास मी शिकत असतां एक दिवस ही मजकडे आली व सांगूं लागली कीं, अशा परावलंबी जिण्याला कंटाळलें. काय करूं तें सांग. तूं कशी मुलासारखी शिकलीस. मी काय शिकूं? माझें वय आतां बावीस-चोवीस झालें. याचेपुढें मराठी दुसरी-तिसरीपासून शिकून केव्हां होणार?"

दोघींनीं विचार करून नर्सिंगचा अभ्यास तिनें करावा असें ठरविलें. पुढें लागणाऱ्या खर्चांचें काय? सर्वांचें मन मोडून जावयाचें तर ते पैसे कसे देतील? मीं सांगितलें कीं मी तर अजून शिकत आहें. मलाच मिळत नाहीं, तर तुला काय देऊं! पण माझ्या खर्चांत कांहीं काटाकाट करून मी तुला पन्नास रुपये देतें. सुरवातीचा कपडयांचा खर्च भागेल. ती म्हणाली, "इतर मी आणखी खटपट करतें. पण घरीं या प्रश्नाची चर्चा करावयास तूं चल. मला जोरानें बोलतां येत नाहीं, पण तूं सांगितलेलें त्यांना पटेल; निदान तुला त्यांना विरोध तरी करतां येणार नाहीं."

आम्ही तिचे घरीं गेलों. तिची बहीण यमुताई म्हणाल्या, "अक्का, आम्हांला यांत कमीपणा वाटतो. आम्ही चौघी बहिणी. आम्ही दहा-दहा रुपयांचीं लुगडीं नेसलों तर हिला पांचाचें तरी घेऊं का नाहीं? हिनें आज शिकून पैसे मिळवावयाचे म्हणजे आम्हांला कमीपणा. आजपर्यंत घरांत कोणी केलें नाहीं तें होतें असें वाटतें. उरलेले आयुष्याचे दिवस शिक्षणाचे ढंग न करतां पोथी-पुस्तकें वाचून काढावे हिनें."

पण तिच्यांत निर्धार होता. ता. ३०-३-१८ च्या पत्रांत ती मला लिहिते :

"आक्का, विज्ञापना विशेष. पत्र ता. २१-३-१८ चें पोंचलें. तें वाचून फार धैर्य आलें. थोडाच पण अतिशय मोलाचा उपदेश करणारी माझी पाठिराखी तूंच. मला स्कॉलरशिप बहुतेक मिळेल; पण न मिळाल्यास कळवीन. दर महिन्यास दहा रुपये तूं पाठवूं शकशील का? दीड वर्ष पाठवावे लागतील. ह्याखेरीज रुपये १५ ची जरूरी आहे ती कशी तरी भागवीन. एकंदर खर्च ४॥ शें पर्यंत जातो. तूं स्वतःला फार अडचणींत टाकून करूं नकोस. मीं येथें राहून कोर्स पुरा करण्याचें ठरविलें होतें; पण प्रायव्हेट शिकण्यांत पूझीशिअन (मान) नाहीं असें डॉ. नागूताईचें म्हणणें आहे व मलाही तसेंच आढळून आलें. करितां कामा हॉस्पिटलमध्यें जात आहें. कोणी कांहींही म्हणोत; तूं सहानुभूति दिल्याप्रमाणें मी कोर्स पुरा करीन. ती. दादांना ह्या सर्व गोष्टी माहीत आहेत. पण ती. आईला नसतील.

चि. श्रीधर यास आशीर्वाद. तुझा उपदेश लक्षांत ठेवीन व धरलेली लाइन पुरी करीन. पत्र पुरे करते वेळीं मला तुझ्या व माझ्या लहानपणची आठवण झाली."

तुझी

**ठकू मराठे**

* * *

एका पत्रांत आपलें कसें चालतें याबद्दल ती लिहिते :

मुंबई

"प्रिय भगिनी श्री. आक्का केळकर यास,

आ. आ. बि. वि. फार दिवसांत तुला मीं पत्र लिहिलें नाहीं त्यामुळें माझी हवाल तुला कळली नसेल म्हणून थोडें सविस्तर लिहिण्याचा विचार केला आहे.

" तूंच सांगितल्यावर मी पास झाल्यानंतर मुंबईत दहा वर्षे राहण्याचा विचार नक्की केला, हें तुला ठाऊक आहे. त्याचप्रमाणें तुझ्या सांगण्याला चांगलें यश येत आहे हें तुला कळविण्यास मला फार आनंद वाटतो. मी पास झाल्याला आतां आठ महिने झाले. सुमारें १००० रुपये या नर्सिंगच्या धंद्यावर मिळकत झाली आहे. सर्वांचें देणें दिलें, त्याचप्रमाणें घरींही कांहीं रुपये पाठविलें, व थोडी शिल्लक ठेविली आहे. गेल्या दोन महिन्यांतच मला निराळी जागा भाड्यानें मिळाली आहे व मीं नवीन बिऱ्हाड केलें आहे. बिऱ्हाडाला लागणारें सर्व सामान विकत घेतलें त्यामुळें खर्च फार झाला; पण लोकांचें मागण्याची वेळ आली नाहीं. असो. मला रुपये तीस दोन खोल्यांचे भरावे लागतात. एकंदरींत सर्व ठीक चाललें आहे. माझा धाकटा भाऊ येथेंच नोकरीसाठीं मजजवळ आहे. त्याची बायको येथें आणण्याचा विचार आहे.

" मी दोन वेळ पुण्यास आलें पण तुझी भेट झाली नाहीं. ती. सौ. ताई मात्र भेटल्या. त्यांच्याजवळ तुझी चौकशी केली तेव्हां त्यांनीं सांगितलें, कीं तूं साताऱ्यास राहत असतेस व तेथील इंग्लिश शिक्षणाची जी गैरसोय होती ती दूर करण्याच्या विचारांत आहेस. आतां तूं ती महत्त्वाची कामगिरी केली असशीलच.

" तूं मुंबईला केव्हां येणार? मला कबुल केलें आहेस ना? किं मी येईन म्हणून, हें तुला आठवत असेलच. तूंच करून दिलेल्या माझे घरीं येण्यास तुला कसलीच हारकत नाहीं. करितां सारखी तुझ्या येण्याची वाट पाहत आहे. तूं माला कधींसुधा पत्र पाठवित नाहींस म्हणून माला तुझी परिस्थिति येण्याजोगी आहे का नाहीं तें कळत नाहीं. मी तुला भेटण्यास म्हणून पुण्यास आले तर तुझी भेट होत नाहीं. तूं जर हिंगण्यास असतीस तर मी तीकडे येऊन खास भेटले आसते. पण काय करु? तूं किती लांब साताऱ्यास गेलीस? आतां पत्राचे उत्तर लौकर पाठीव व केव्हां येणार ते कळीव.

6944

" चि. श्रीधर हल्ली कोठें आहे? तुझी व त्याची प्रकृति कशी आहे तें कळीव. कळावे हे आशीरवाद.

नेहमी तुझ्या ममतेची इच्छा करणारी तुझी
**ठकूबाई मराठे**

* * *

हिच्या बाबतींत प्रथम जरी विरोध होता तरी पुढें विरोधाची जागा कौतुकानें घेतली. परंतु दुसरेंही मला असें एक उदाहरण माहीत आहे कीं, मुलगी शिकावयास गेली तेव्हां घराला कमीपणा आणला म्हणून सर्वांनीं राग केला. परंतु ती शिकून तयार झाल्यावर पैसे घेतांना माल कमीपणाची कल्पना गेली! उलट अपेक्षा अशी कीं, तिनें आतां सर्व प्रपंच संभाळावा. कारण तिला एकटीला इतके पैसे काय करावयाचे आहेत? पुढील पत्र या दृष्टीनें नमुनेदार आहे.

* * *

" आक्का!

तुझें पत्र पावलें. मजकूर समजला. रीतीप्रमाणें वडील-मातुश्री समजून त्यांच्याच विचारानें घरांतील खर्चाचा आढावा काढला तो एकंदर ६० रु. निघाला. पैकीं मीं ३० रु. द्यावे व भावानें तीस द्यावे असे ठरलें. शिवाय आई-वडिलांचें कापडचोपड मीं घ्यावें व भावजयी-साठीं भावानें घ्यावें असेंही ठरलें. याप्रमाणें दहा-अकरा महिने व्यवस्थित गेले. पण वडील-मातोश्रींनीं सुखानें न खातां एका बाग-वाल्याचा बागेचा तुकडा गहाण घेऊन साठ रुपये दिले. एक भाकड म्हैस विकत घेतली. एक मोडकीतोडकी गाडी व बैल विकत घेतला. या सर्वांत नुकसान झालें. मुलांची शाळा बुडवून शेतावर जाऊन राहिले, व आतां शेताचें भांडण भांडण्यासाठीं पैसे जास्त मागत आहेत. मीं पैसे पाठविले पण त्यांनीं मागितले तितके पाठविले नाहींत म्हणून रागावून जीं चारपांच पत्रें त्यांनीं पाठविलीं तीं तूं भेटलीस म्हणजे दाखवीन.

शिकावयास जातें म्हटलें तो तुमच्या घराण्याला कमीपणा आला आणि त्या कमीपणानें मिळवलेले पैसे बरे चालतात. इ. इ."

उपरिनिर्दिष्ट मुलींची पद्गत निर्माल्याप्रमाणें स्थिति असल्यामुळें स्वावलंबी होऊन आईबापांना मदत करण्याची इच्छा होती. त्यांतही त्यांना आनंद वाटला असता. "बाबांचा संसार माझा कसा होईल?" असे 'निःश्वास सोडणाऱ्या कळ्यां'चा प्रश्न त्या वेळीं निर्माणच झाला नव्हता. पण मदत देणाराची इच्छा असली तरी घेणारानें ती तितक्याच चांगलेपणें घ्यावी लागते. पैशाची जरूरी व लोभ हीं सर्व काळीं सारखींच.

पण या मुलींच्या बाबतींत आणखी त्याला धार्मिक आधार दाखविला जाई याची मला चीड येई. जन्मभर पददलित होऊन स्त्रीनें राहावें व तसें झालें नाहीं कीं घराण्याला कमीपणा; कां? तर धर्म व रूढीविरुद्ध आचरण झालें म्हणून! यामुळें हा धर्म मुळांत आहे तरी काय हें पाहण्याची माझी जिज्ञासा बळावली. धर्माबद्दलची चर्चा आणखी एका निमित्तानें करण्याचा प्रसंग मला आला. श्री. लक्ष्मीबाई परांजपे या आमचे शेजारचे परांजप्यांच्या घराण्यांतील. ताईंचा व त्यांचा वेदांतविषयक आवडी-मुळें स्नेह जमला. अशी करारी, निःस्पृह बाणेदार स्त्री हजारांत एकादी. लहानपणीं वैधव्य आलें. घरांतील मंडळी अस्सल कर्मठ व जुन्या वळणाची, व स्वतः काकूंचाही परंपरागत आचारधर्मावर दृढ विश्वास. त्यामुळें बाई कधीं स्वयंपाकघर व देवघराबाहेर दिसली नाहीं कीं बोललेली कळली नाहीं. जें काय वाचन, तें देवधराच्या अंधाऱ्या खोलींत बसून होई. मराठी अगर संस्कृत कांहींच पद्धतशीर शिकलेल्या नव्हत्या. पण स्वतःच्या व्यासंगानें मराठी व संस्कृतही त्यांनीं आत्मसात् केलें होतें. अक्षर छान लिहीत. आवाज गोड. श्लोक वगैरे रचीत व एकादी ओवी अगर श्लोक घेऊन विवरण करूं लागल्या म्हणजे असें सुंदर विवरण करीत कीं बाहेरून माणसानें ऐकलें तर म्हणेल हा कोण पंडित आहे? वाद घालूं लागल्या म्हणजे पूर्वपक्ष उत्तरपक्षही जोरानें करीत. आम्ही थट्टेनें त्यांना 'आमच्या ताईंचे शंकराचार्य' म्हणत असूं. पण मौज अशी

कीं, सासूसासरे, दीरजावा यांना कळतही नसे त्यांचा अधिकार. घरच्या देवळांत कथेकरी व पुराणिक बोलावून कथाप्रवचनें चालत. मी रागावून म्हणे, "बाहेरचे पंडित बोलावतात, पण त्यांच्या घरांत एक पंडित पाणी भरतो आहे याची कल्पना तरी आहे का यांना ?"

स्त्री म्हणून त्यांची अवहेलना होते याचा मला राग येई, पण स्वतः त्यांना तसें वाटत नसे. त्या म्हणत माझा हा व्यासंग माझ्या स्वतः-साठीं आहे. वेदप्रणीत परंपरागत आचारधर्म जर सांगतो कीं स्त्रीनें पतिविरहित आयुष्य वडीलधाऱ्यांच्या सेवेंत घालविलें पाहिजे, तर तें मी करतें आहें.

सकेशा विधवा स्त्रीच्या हातचें पाणी घेणें निषिद्ध. त्यांच्या भाची-वर-म्हणजे माझे स्वतःवर-वैधव्याचा प्रसंग आला. त्यांचेसाठीं चुलीवर ठेवलेली लापशी तिनें चुकून-म्हणजे आपणावर आलेल्या प्रसंगानें आपण निषिद्ध ठरलों हें विसरून-खालीं उतरून ठेवली ! त्यांनीं त्या दिवशीं मुकाट्यानें उपास केला. याबद्दल त्यांचें माझें बरेंच भांडण झालें.

"तुम्ही फार तर या स्त्रीला दुर्दैवी म्हणा." मी म्हणे, "पण अपवित्र कां समजतां ?" इतकीं कीं तिचे हातचें पाणी देवधर्मास चालू नये ! हा न्याय कसा ? पुरुषाच्या बाबतींत हा प्रश्न तुम्ही काढतां का ?"

"पूर्वीच्या लोकांनीं, ऋषींनीं विचार करून हा नियम घालून दिला म्हणून. त्यानीं असें कां केलें हा प्रश्न आपण विचारावयाचा नाहीं. धर्मांत जें सांगितलें तसें वागावयाचें येवढें आपलें काम."

"माझ्यासारख्या सामान्य माणसालासुद्धां जी गोष्ट उघड अन्याय दिसते ती धर्मांत असेल तर धर्म न्याय्य नाहीं. किंवा धर्माचें स्पष्टीकरण करणारे तरी चुकत असावेत." मी संतापून उत्तर देई. "मी स्वतः संस्कृतचा अभ्यास वाढवून काय तुमचे स्मृतिग्रंथ आहेत ते वाचून पाहीन, कीं खरोखरच धर्म असा अन्यायी आहे का ?"

या वादविवादामुळें जुन्या संस्कृत वाङ्मयाबद्दलची माझी जिज्ञासा वाढली व त्यांत बराच वेळ मीं खर्च केला. आज असें वाटतें कीं, धर्माचें स्वरूप त्या समजत होत्या तसेंही नाहीं व मी समजत होतें तसेंही नाहीं. ईश्वरविषयक श्रद्धा ही स्वतंत्र गोष्ट आहे. ती असून अगर नसूनही, धर्मविषयक आचारसंभार असूं शकतो. आचारधर्म हा एक प्रकारचा ओघ आहे. नवीन गोष्टी त्यांत येत असतात. जुन्या मागें पडत असतात. फक्त हें काम असें सावकाश चालतें कीं सूक्ष्मदृष्टीनें न पाहणाराला हा प्रवाह न वाटतां एक स्थिर खडक वाटावा.

या आचारधर्मावरून घरांत ताईशीं माझा पुष्कळदां वादविवाद होई. 'वादे वादे जायते तत्त्वबोधः' असें मला वाटे. पण आज मात्र मी या वादविवादांना इतकी कंटाळलें आहे कीं, दोन माणसें समोरासमोर मोठ्यानें बोलूं लागलीं कीं मला तेथून निघून जावेंसें वाटतें !

चतुर्मासांत कांदा न खाण्याची सर्व घरांत पद्धत असते. विशेष धर्मनिष्ठ लोक, तसेच वैष्णव, तो मुळींच खात नाहींत. एकदां घरांत काकूंचें व ताईचें बोलणें चाललें असतां त्या ताईस म्हणाल्या, "तुम्हांला जर कांदा चांगला नाहीं, निषिद्ध आहे, असें वाटतें तर तुम्ही मुलांना कां खाऊं देतां ? या गोष्टीचें वळण तुम्हीं मुलांना कां लावूं नये ?" त्याप्रमाणें ताईनें तसें करावयाचें योजलें. पण आम्ही मुलें पडलों तिलाच वळण लावणारीं ! मीं ताईशीं याबद्दल पुष्कळ वाद घातला "पूर्वींची परंपरा चार महिने कांदे खाऊं नये. त्या वेळीं आम्ही मागत नाहीं. पण काकू म्हणाल्या म्हणून तूं एकएक नवीन नवीन नियम आमचेवर कां लादणार ? कांदे न खाल्ल्यानें पुण्य लागतें हें आम्हांस पटत नाहीं. त्यावर आमची श्रद्धा नाहीं. श्रद्धेनें केलेली गोष्ट सफल होते असें तूं म्हणतेस. आम्हांस प्रथम पटवून दे, श्रद्धा निर्माण कर, व मग नियमाची अंमलबजावणी कर." मीं पुढें असेंही सांगितलें कीं, "खरोखर मला कांदे इतके आवडतात असेंही नाहीं. मुळींच कधीं खाल्ला नाहीं तरी

माझें चालेल. पण धर्माच्या व पुण्याच्यासाठीं म्हणून नको म्हणशील तर मला मुद्दाम खावासा वाटेल."

ताई बिचारी काय करणार! कारण अशा गोष्टी पटवून, विशेषतः वादाच्या भरीला पडल्यावर, थोड्याच देतां येतात. "तुम्ही मुलें जास्त शाहणीं आहां" ती म्हणाली, "मला पटवून देतां येणार नाहीं. मी सांगतें म्हणून करावयाचें असलें तर करा. मी स्वतः तुम्हांस कांदा वाढणार नाहीं. तुम्हांस स्वतः खायचा असला तर खा."

ही गोष्ट १९१६ सालची. एकोणतीस सालीं मी इंग्लंडला जावयास आण्णांचे बरोबर निघाले त्या वेळीं याच्या बरोबर उलट क्रिया घडून आली. रावळपिंडी बोटीनें आम्ही निघालों. माझें सामान केबिनमध्यें जाऊन पडलें होतें तें पाहून घेण्यासाठीं मी केबिनमध्यें गेलें. बापूसाहेब चिपळूणकर, ताई, सासूबाई, वहिनी (सौ. गिरीजाबाई केळकर) आदि मंडळींना बोट दाखविण्यासाठीं घेऊन गेले होते. साडेबारा झाले होते व जेवणाच्या हॉलमध्यें लंचची सर्व सिद्धता- काटे, चमचे, सुऱ्या मांडून ठेवलेल्या- दिसत होती. बापूसाहेबांनीं त्यांच्या विनोदी पद्धतीनें सांगितलें, "हे पाहिलेत काटे-चमचे व सुऱ्या? याचा उपयोग करून कमलाबाई आतां सर्व कांहीं खाणार." ताईला या वेळीं इतका जोर कोठून आला कोणास माहीत! तिनें जोरानें त्यांना सांगितलें, "माझी खात्री आहे कीं माझी मुलगी असें कांहीं न खातां परत येईल." हें संभाषण करीत ती मंडळी पुढें जावयास व सामान पाहून मी केबिनमधून बाहेर पडावयास एक गाठ पडली. त्यांना मीं हें ऐकलें हें माहीतही नाहीं. पण मीं हें ऐकलें व त्याचा माझे मनावर कांहीं विशेष परिणाम झाला. आणि ताईचें म्हणणें खरें व्हावें म्हणून मी दोन वर्षें युरोपांत राहून तसें कांहीं न खातांच परत आलें. सर्व मंडळी मला म्हणत, 'तुम्ही शाकाहारी राहतां तुम्हांस थंडीचे दिवसांत विशेष त्रास होईल.' मीं मनांत येवढें योजून ठेवलें होतें कीं, प्रकृतीच बिघडली तर नियम

मोडूं. कारण प्रकृति सुधारावयास युरोपांत आलें ती जास्त बिघडवून जायचें नाहीं. पण घडलें तेंच असें कीं प्रकृति सुधारली व शाकाहार सोडण्याचें मला कारण पडलें नाहीं. हेंच तिनें मला सांगितलें असतें कीं, शाकाहार सोडूं नको तर मी तिच्याशीं हटकून वाद घालीत बसलें असतें कीं, 'ज्या गोष्टीची जरूर असेल ती कां करूं नये ? पण त्या वेळीं असें वाटलें खरें कीं बरोबर असो चुकीचें असो, तिला माझेबद्दल जर इतका अभिमान वाटतो आहे तर तो मीं कां मोडावा ? मुलें मोठीं झालीं म्हणजे आईबाप एक प्रकारें परस्वाधीन होतात. मुलांना अमुकच करा म्हणून सांगण्यांत अर्थ नसतो. पण मुलांनीं कांहीं केल्यास त्याचें सुखदुःख वाटल्याखेरीज राहत नाहीं.

जी. ए. होतांच हिंगण्यास हायस्कूलमध्यें शिक्षक म्हणून काम करण्यास मीं सुरवात केली. पण त्याहीपेक्षां आवडीचें काम म्हणजे साक्षरता-प्रसाराचें. पुण्यामध्यें रा. हरिभाऊ फाटक, प्रो. नाईक आदि मंडळींनीं साक्षरता-प्रसारक मंडळ काढून त्याचेमार्फत पेठापेठांतून लहान लहान शाळा काढून मुलांना साक्षर करण्याची योजना आंखली होती. म्युनिसिपालिटींतील सक्तीचें शिक्षणाचा प्रश्न दोन वर्षें तरी लांबणीवर पडला. तेव्हां पुन्हा प्रश्न निघेल त्यासाठीं ही पूर्वतयारी होती. मी राहणार हिंगण्यास; तेव्हां पुणें शहरच्या शाळां-साठीं काम करणें मला शक्य नव्हतें. पण हिंगण्याशेजारीं कोथरूड व वारजें हीं दोन खेडीं आहेत त्यांची पाहणी करून त्यांमध्यें शाळा सुरू करण्याचें मीं योजिलें.

पुण्यास ज्या शाळा सुरू करावयाच्या होत्या त्यांसाठीं स्वयंसेवक-सेविका मिळविण्याची जरूरी होती. शहरांतील प्रमुख ठिकाणीं व्याख्यानें करवून साक्षरतामंडळाच्या योजनेची माहिती लोकांस करून द्यावयाची व स्वयंसेवक मिळवावयाचें हें पहिलें काम होतें. या व्याख्यांनासही मीं मदत देण्याचें योजिलें.

मंडळाचे चिटणीस रा. हरिभाऊ फाटक त्याबद्दल लिहितात—

२८३ सदाशिव पेठ.

अ. आ. कृ. १३ शके १८४२ (१४-७-१९२०)

सा. न. वि. वि.

कन्याशाळेचा दिवाणखाना व्याख्यानास मिळतो किंवा कसें हें कळविण्याची कृपा करावी. आपलें व्याख्यान आदितवारीं करावें असें वाटतें. शनिवारीं कदाचित् सेवासदनांत व्याख्यान होईल. दर शनिवारीं त्यांचेकडे व्याख्यान असतें असें ऐकतों. व्याख्यानाची प्रसिद्धि 'लोकसंग्रह' व 'ज्ञानप्रकाश' या पत्रांतून आदितवारच्या अंकांतून करवितों.

आपणही हिंगण्यास तेथील चिटणिसांकडून बोर्डावर नोटीस लावावी. तरुण स्त्रियांच्यापुढें हा विषय आपणांस मांडून स्वयंसेवक मिळवावयाचे आहेत व लोकमत तयार करावयाचें आहे. तरी जेथें जेथें श्रोते लाभण्याचा संभव तेथें तेथें व्याख्यानांची खबर पोंहोचली पाहिजे. आपण रा. चिपळूणकर व रा. दिवेकर यांचेबरोबर या विषयासंबंधीं बोलणार होतां; तरी जरूर त्यांच्याबरोबर बोलून त्यांचें साहाय्य मिळवावें. कोथरूड व वारजें येथें या कामास सुरवात करण्यास हिंगण्याच्या मंडळींचा पुष्कळ उपयोग होईल. आदितवारीं पुण्यास येण्यापूर्वी शक्य असल्यास यासंबंधीं हिंगण्याच्या मंडळींचा विचार काय ठरतो तो पहावा.

आपल्या अज्ञान बंधुभगिनींना नेत्र देण्याची (कारण, लिहिण्यावाचण्यास शिकविणें म्हणजे दृष्टि देणेंच मी समजतों.) अत्यंत आवश्यक खटपट आपण केली पाहिजे. यासारखें दुसरें महत्पुण्य मला दिसत नाहीं. शेंकडा ९२ लोक आंधळे ठेवून आम्ही काय प्रगति करणार हें दिसतच आहे. आपल्या राष्ट्रास आपणांस झपाट्यानें पुढें न्यावयाचें आहे. तरी जितके मदतगार मिळतील तितके मिळवून आपण कार्याच्या वाढीस लागलेंच पाहिजे. आपली या कामांत मदत

होईल असा भरंवसा आहे. आपण जर आपल्या भगिनींच्यापुढें हा पुण्य-संपादनाचा खरा मार्ग वारंवार मांडलात, तर एका बाजूची कांहीं सोय लागण्यास प्रारंभ झाला असें मी समजेन. आदितवारीं पुण्यास येण्यापूर्वी आपल्या दहावीस मैत्रिणींचेपुढें खासगी रीतीनें चर्चा करून त्यांची सहानुभूति मिळविण्याचा यत्न व्हावा, व ज्या उत्साही दिसतील त्यांना व्याख्यानास येण्याची विनंति करावी. व्याख्यानाची वेळ सायंकाळीं ५ वाजतां ठेविली तर ६-६॥ पर्यंत व्याख्यान संपून ७॥ ला हिंगण्यास परत जातां येईल. कळावें.

आपला बंधु

**हरि गणेश फाटक**

ता. क. पूना कॉलेजांतील कांहीं विद्यार्थिनी या कामास स्वयंसेवक म्हणून मिळण्याचा संभव आहे. तसेंच रा. विनायकराव लिमये यांची पत्नी स्वयंसेवक म्हणून उपयोगी पडेल असें वाटतें.

* * *

याप्रमाणें पुण्यास कांहीं प्रचारकी स्वरूपाचीं व्याख्यानें दिलीं व वारज्याच्या शाळेची जबाबदारी मीं मजकडे घेतली. वारजें हिंगण्यापासून दीड मैलावर आहे. तेथील पाटील रा. रामभाऊ भराटे यांचेकडे मी, नाना पटवर्धन, जोशी वगैरे जाऊन शाळा चालू करण्याबद्दल विचारविनिमय केला आणि लवकरच ऑगस्ट महिन्यांत शाळेचा उद्घाटनसमारंभ केला. प्रो. नाईक, दामले, आदि साक्षरता मंडळाचे चालक समारंभास आले होते. शिवाय हिंगण्याची बहुतेक सर्व मंडळीही आली होती. शाळा चावडीवरच सुरू केली. कारण अस्पृश्य मुलें आलीं तर त्यांना घेण्याची अडचण येऊं नये अशी इच्छा होती. शाळेंत दोनचार महार विद्यार्थी होते. त्यांपैकीं 'बळी महार' नावाचा मुलगा चौथ्या इयत्तेपर्यंत शिकून तयार झाला. मला मदत करण्यास हिंगण्याची बरीच मंडळी तयार होती. विशेषतः सौ. गंगूबाई पटवर्धन, सौ. येसूबाई कुळकर्णी, श्री. वारूबाई शेवडे या आठवड्यांतून

कांहीं दिवस नेमानें येत. शिवाय दुर्गाताई जोशी, गंगूबाई लेले, आदि कॉलेजच्या विद्यार्थिनीही मधून मधून येत. पण दररोज नवीन शिक्षक असल्यानें शिक्षणांत एकसूत्रीपणा राहत नाहीं म्हणून एका शिक्षकाची नेमणूक करावी असें पुढें ठरविलें. शिवाय मदतीला स्वयंसेवक जात असूंच. त्या वेळचे युनिव्हर्सिटी ऑफिसांतील कारकून रा. मेहेंदळे यांनीं तें काम पत्करलें. त्यांना दरमहा दहा रुपये देत असूं. काम करूं लागल्यानंतर मला जो पन्नास रुपये पगार मिळूं लागला त्या पहिल्या पगारापासून दरमहा दहा रुपये शिक्षणविषयक कार्यांत खर्च करण्याचें मीं योजिलें होतें व तें १९२२ सालीं ऑक्टोबरमध्यें सातारला जाईपर्यंत चालू होतें. शिवाय तेथील पटवर्धन आदि मंडळी थोडी वर्गणीही दरमहा देत. दादा दिवेकर सांगत "शेवटीं मजकडे मागावयास या" व गेल्यावर विचारीत किती वर्गणी झाली व व्हावयास पाहिजे किती ? मला दहा रुपये जमावेत अशी इच्छा असे. तेव्हां कमी पडेल तितके घालून ते दहा रुपये पुरे करून देत. वर्गणीची अशी मदत होऊं लागल्यामुळें माझ्या दहा रुपयांपैकीं पांच रुपये गांवांतल्या शाळेसाठीं मी खर्च करूं लागलें. आमच्या आळींतच बरींच शाळेंत न जाणारीं मुलें होतीं. त्यांना आमचे घरीं गोळा करून त्यांच्या शिक्षणाची सोय ताईचे मार्फत केली होती. थोडे दिवस स्वतः ताईनें शिकविलें पण पुढें पांच रुपये देऊन म्युनिसिपल शाळेंतील एका मास्तरीणबाईची नेमणूक केली होती.

ही गांवांतील शाळा वर्षसहा महिने चालली. सातारला जाईपर्यंत वारज्याच्या शाळेची व्यवस्था मीच करीत असे. कन्याशाळेची सुरवात करतांना आण्णांनीं त्या शाळेची जबाबदारी स्वतः पत्करली व हिंगण्यास येऊन नाना पटवर्धन यांचे हवालीं तें काम केलें. पटवर्धन पुढें कांहीं वर्षें ती शाळा चालवीत असत. नंतर लोकल बोर्डाचे स्वाधीन ती शाळा करण्यांत आली व लोकल बोर्डानें कांहीं वर्षें चालविल्यावर ती बंद पडली.

शाळेचे पटावर सुमारें चाळीस-बेचाळीस नांवें असत. पैकीं पंचवीस-तीस मुलें हजर असत. कांहीं दिवस मुलांना बोलवावयास आणि पुढें कालव्यांवर तोंडें स्वच्छ धुण्यासही घेऊन जाण्याची जरूरी पडे. पण एकंदरींत मुलें येत व गांवकरीही जरूर ती मदत देत असत. चाळीस मुलांपैकीं मुलींचीं नांवें मात्र सात-आठ होतीं; व त्यांपैकीं हजर पांचसहाच असत. तात्यांनीं एकदां विचारलें, " तुझ्या वारज्याच्या शाळेंत मुली किती आहेत ? "

" पांचसहा आहेत." मीं सांगितलें.

" मुलें तीस-पस्ततीस, व मुली पांचसहा! तुमच्या शाळेंत मुलांच्या बरोबरीनें मुली कां नाहींत ?"

" तिथल्या लोकांना मुलेंच पाठविण्याची मुष्कील. लोकांना मुली पाठविण्याची जरूरीच पटत नाहीं. त्यामुळें आपोआप असें होतें. मुलें पुष्कळ पण मुली थोड्या."

" असें आपोआप होतें म्हणून जर आम्हीं म्हटलें कीं; मुलांना आधीं सक्ती करा व मागाहून मुलींना करा तर चुकलें कुठें ?"

" पण तुम्ही कायदा करणार होता; कायद्यांचे मागें सत्ता असते. आम्ही मन वळून काम करतों आहोंत."

" पण सक्ती करण्याची वेळ बरीचशी मंडळी त्याचा खुषीनें फायदा घेत असल्यानंतर येते."

अर्थात् या वादाचा निकाल लागला नाहीं. तें बोलणें तितक्या-वरच संपलें.

वारज्याच्या कामाबद्दल तात्या म्हणत, " या कामांत श्रम व फल यांत कांहीं प्रमाण आहे का ? उगीच energy आहे ती फुकट घाल-वितेस. दररोज एक तास चालत जाऊन एक तास तूं शिकविणार तें काय, तर धुळाक्षरें व पाढे. समज वर्षभर शिकवलेंस तर प्रगति किती ? व पुन्हा ती पुढें चालू राहिली तर ठीक, नाहीं तर केलेलें फुकट. एकाद दुसऱ्या माणसानें करून हें होण्याचें नव्हे. त्यापेक्षां

शिक्षकाचें काम करून उरलेल्या वेळांत अभ्यास करून एम्. ए. हो प्रथम." पण मला हें पटत नसे. मला एम्. ए.पेक्षां या शाळेचेंच जास्ती महत्त्व वाटे. तात्या आणखीही म्हणत, "तुला किती रुपयांत राहतां येईलसें वाटतें? तेवढी मी तुझी सोय करून देतों. हिंगण्याचा-ही पगार घेऊं नको. ऑनररी काम कर." पण मला हेंही पटत नसे. "आयता पैसा मिळाला म्हणजे त्याची किंमत नसते. मला स्वकष्टानें मिळविलेल्या पैशावर राहण्यांत जास्त बरें वाटेल."

तात्या कंटाळून म्हणत, "कर तुला काय हवें तें."

मला एम्. ए. व्हावेंसें इतकें वाटत नव्हतें. पण इंग्लडास जाऊन पुढील कांहीं अभ्यासक्रम पुरा करावा असें वाटे. हा विचारापेक्षां भावनेचाच प्रश्न होता. येथील शिक्षण पुरें झालें; आतां परदेशचा थोडा अनुभवही असावा असें वाटे. अर्थात् हें सर्वच प्रकरण 'बोला-चीच कढी बोलाचाच भात' असें आहे. परदेशगमनाचा जो मोह सर्वांना वाटतो तोच मलाही वाटे. तात्यांचे जवळ चर्चा करतां ते म्हणाले, "मला त्यांत अर्थ वाटत नाहीं. वैद्यक, सायन्स असें कांहीं असेल तर एक असो. पण आर्ट्स कोर्समध्यें मला अर्थ वाटत नाहीं. तुलनात्मक ज्ञान हवें म्हणावें तर त्याला खर्च किती व ज्ञान कितीसें? तिकडे आपणांस शिकावयाजोगें म्हणजे त्यांची काम करण्याची पद्धति व संघटनापद्धति. पण त्याला परीक्षा नको. सहा महिने हिंडून तिथल्या शाळा पाहून त्यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करतां येईल. पण त्याला आजच गेलें पाहिजे असें नाहीं. येथल्या कामाचा तरी काय अनुभव आहे तुला अजून?"

मी म्हणत असें, "अध्यापनविषयक शिक्षण तेथें घ्यावें, तेथें राहिलेंच म्हणजे भोंवतालच्या गोष्टी आपोआप बघतां येतील."

पण ही जाण्याच्या उपयुक्ततेबद्दलची नुसती चर्चा असे. १९१९ सालीं तात्या टिळकांचेबरोबर इंग्लंडला गेले होते त्या वेळीं मी त्यांना पत्र लिहून मला उपयुक्त अशा अभ्यासक्रमांची माहिती कळविण्या-

बद्दल लिहिलें होतें. पण त्या वेळीं माझी जी. ए.ची परीक्षाही व्हावयाची होती. परदेशगमनाचे बाबतींत एक मात्र मला वाटे कीं, घरच्या मंडळींनीं ग्रॅजुएट होईपर्यंत शिक्षण दिलें तें ठीक. इंग्लंडला जाणें वगैरे गोष्टी हौसेच्या आहेत. त्यासाठीं घरच्या मंडळीकडून पैसे घेणें बरोबर नाहीं. पण वरच्या दर्जाच्या अभ्यासासाठीं कांहीं स्कॉलरशिपा असतात त्यांची खटपट करावी. स्कॉलरशिप मिळतांच आजन्मसेवक होण्याचा मनोदय आण्णांना सांगून जावें व आल्यावर प्रत्यक्ष कामास सुरवात, हा विचार. Government of India च्या कांहीं स्कॉलरशिपा असतात. तिकडे खटपट करूं का म्हणून विचारतां तात्यांना तें पसंत नव्हतें. त्याच वेळीं Women's University कडे खटपट करण्याची कल्पना सुचली. या वेळीं ठाकरसी-देणगी आल्यामुळें युनिव्हर्सिटीची सांपत्तिक स्थिति सुधारली होती व आपल्या विद्यार्थिनींसाठीं अशी कांहीं शिष्यवृत्ति सुरू करणें अशक्य झालें नसतें. तात्यांना विचारतां ते म्हणाले, "तूं त्यांची विद्यार्थिनी आहेस. पहा खटपट करून देत असले तर." म्हणून मीं अर्जही केला, परंतु तेथें दुसऱ्याच कारणासाठीं तो अर्ज परत आला. मी शिकून परत आलें तर माझ्या कामाचा युनिव्हर्सिटीलाच फायदा मिळेल कशावरून? कारण मी तर अजून आश्रमाची आजन्मसेवक झालें नव्हतें. युनिव्हर्सिटीच्या मस्तकीं अभिषेक झाला तरी तो आश्रमाच्याच गोमुखांतून झाला पाहिजे हा आग्रह. मी आजन्मसेवक होत नाहीं याबद्दलची होणारी निराशा अशा स्वरूपांत व्यक्त होत होती. आजन्मसेवक आधीं होऊन मग हा अर्ज केला असतां तर कदाचित् जितक्या उदासीनपणें तो कडेला फेकला गेला तितक्या तऱ्हेनें तो गेला नसता. पण यामुळें आजन्मसेवक होण्याच्या इच्छेला मूर्त स्वरूप येण्याचें काम आणखी कांहीं महिने लांबणीवर पडलें. म्हणून मग मींही मनाशीं ठरविलें कीं, इंग्लंडला जाण्याची तजवीज झाल्याखेरीज आजन्मसेवक व्हावयाचें नाहीं. देवधरांनीं वाग्भटांचेजवळ जी सूचना केली होती ती याच सुमारास. एके

दिवशीं आगगाडींत दोघांची गाठ पडली व माझ्या इंग्लंडला जाण्याबद्दल गोष्टी निघाल्या तेव्हां देवधरांनीं सूचना केली, "आम्ही कमलाबाईंना इंग्लंडला पाठवून आणतों. पुढें दोनशें रुपये पगार देऊं पण त्यांनीं सेवासदनांत पांच वर्षें काम करण्याचें मान्य करावें." पण माझी महिलाविद्यापीठासाठीं काम करावयाची इच्छा आणि देवधरांना व सेवासदनला या विद्यापीठाबद्दल आस्था नाहीं, विद्यापीठाचा शिक्षणक्रम तेथें सुरू होणें शक्य नाहीं, म्हणून मीं तो विचार केला नाहीं.

बराच विचार करून शेवटीं स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारावयाचें ठरविलें. स्वतः श्रम करून पैसे मिळवून इंग्लंडला जाणारे विद्यार्थी कांहीं थोडे असतात का? मीही तसेंच काम करीत जाईन. शिवाय पार्वतीबाई आठवले नुकत्याच अमेरिकेला जाऊन आल्या होत्या. तें उदाहरण डोळ्यांसमोर होतेंच. त्यांच्यासारखी वयातीत बाई जर अमेरिकेला जाऊन येते तर मला कां जातां येऊं नये? मीं तर पहिली पंचविशीही अजून ओलांडली नाहीं. पण वयातीत नसणें हीच एक जास्त अडचण झाली असती. लोक कांहीं म्हणोत. पण पहिली पंचविशी ही मी उत्साहशक्तीचें व कर्तबगारीचें प्रतीक समजत असे. तेव्हां एक दिवशीं मी मनाचा निश्चय ठरवून रात्रीं जेवावयाचे वेळीं तात्यांना सांगितलें,

"तुम्हीं मला बी. ए.पर्यंत शिकविलें; पुष्कळ झालें. तुमच्याकडून कांहीं जास्त घ्यावेंसें मला वाटत नाहीं. आणि मला इंग्लंडला तर जावयाचें आहे. इंग्लंडला पोंचेपर्यंत लागणारा प्रवास खर्च तुम्ही मला कर्जाऊ द्या. पुढें मी कर्जफेड करीन व तेथें मी माझा मार्ग काढीन." माझा मार्ग मी कसा काढणार याबद्दलची माझी कल्पनाही सविस्तर सांगितली. तात्यांनीं तें सर्व ऐकून घेतलें आणखी सांगितलें, "तुला खरेंच इंग्लंडला इतकें जावयास हवें आहे तर जा. अमुक एक गोष्ट करावीशी वाटते पण करावयास मिळत नाहीं अशी रुखरुख तुला तरी कशाला वाटत राहावयास पाहिजे? तूं जें स्वावलंबन वगैरे म्हणतेस

तें कांहीं शक्य दिसत नाहीं मला. पण तुला जायचें तर जा. नुसता प्रवासखर्चच नाहीं तर सर्वच खर्च मी तुला देईन. तुला वाटलं तर कर्ज समज. पण मी कांहीं कर्ज म्हणून देत नाहीं. टिळकांनीं मला ५००० रुपये बोनस देऊं केले आहेत. कुणास माहीत कीं ते तुझ्याच दैवानें मिळत असतील! ते तुजवर खर्च करूं. तेव्हां पैशाची तजवीज झाली असें समज, व पुढें तुला कोठें जायचें, काय कोर्स घ्यायचा वगैरे सर्व व्यवस्था करावयास सुरवात कर."

हा प्रश्न अशा अकल्पित तऱ्हेनें सुटला व मी उत्साहानें पुढच्या तयारीस लागलें. जावयाचें म्हटलें तरी पांच-सात महिने अजून अवकाश होता. पहिली गोष्ट म्हणजे आजन्मसेवक होणें. दुसरे दिवशीं हिंगण्यास जाऊन आण्णांची भेट घेतली, आणि इंग्लंडला जाण्याचा व आजन्मसेवक होण्याचा असे दोन्ही मनोदय त्यांस कळवून म्हटलें, "प्रथम मी इंग्लडला जाऊन येतें व आल्यावर आजन्मसेवक होऊन काम करण्यास सुरवात करतें."

पण आण्णांची पद्धति 'शुभस्य शीघ्रम्'. जी. ए. होऊन मीं ताबडतोब आश्रमास मिळावें ही त्यांची इच्छा. 'वारज्याची शाळा' वगैरेसारखे उद्योग मीं करणें वाईट नसलें तरी आश्रमाचें काम करणें जास्त चांगलें, असें त्यांना स्वाभाविक वाटे. स्कॉलरशिप मिळविण्याच्या खटपटींत आजन्मसेवक होण्याचा प्रश्न आणखी लांबणीवर पडला होता. त्यामुळें निराश होऊन, 'पुन्हा तिला विचारणार नाहीं आजन्मसेवक हो म्हणून. तिला काय हवं तें करूं दे.' असे उद्गार त्यांनीं नुकतेच कंटाळून काढले होते. त्यामुळें आतां त्यांना अतिशय आनंद तर झालाच; आणि ते म्हणाले, "आधीं आजन्मसेवक हो व मग इंग्लंडला जा. तुझी बोट ठरली म्हणजे तुला मंडळी रजा देतील. तोंवर काम सुरू होऊं दे. पुढें वर्ष-दोन वर्षांनीं होऊं म्हटलें म्हणजे फाटे फुटण्याचा संभव असतो."

अर्थात् माझी त्या गोष्टीला हरकत नव्हती व लागलीच आठदहा

दिवसांत रीतीप्रमाणें आजन्मसेवक म्हणून मी रूजू झालें. पण प्रत्यक्ष प्रवासाचा योग त्या वेळीं नव्हता. मी अभ्यासक्रम आणविणें, माहिती काढणें इत्यादि उद्योगांत होतें तोंच १ जानेवारी १९२१ रोजीं असहकारितेची चळवळ सुरू झाली. या चळवळीचें आंदोलन फारच मोठें होतें. सरकारी पदव्या, नोकरी, वकिली इ. वर बहिष्कार घालणें व कॉलेजें ओस पाडणें इ. अभिनव कार्यक्रम त्यांत आले. कांहीं वर्षें महाराष्ट्रच नव्हे, तर अखिल हिंदुस्थान त्यानें हादरून गेलें. महाराष्ट्रांतील चळवळींची जबाबदारी स्वाभाविकपणें तात्यांचेकडे आली. चळवळीला सुरवात करावयाची तर स्वतःच्या घरापासून; हें त्यांचें तत्त्व ठरलेलें होतें. त्यामुळें माझे भाऊ आण्णा, विठ्ठल व बापू या तिघांनींही कॉलेजें सोडावीं असें ठरलें. मजपुढें स्वाभाविकच असा प्रश्न पडला कीं, आतां काय करावयाचें? परदेशगमन-बहिष्कार त्यांत नव्हता, पण स्वाभाविकच तो असावा असें सर्वांना वाटणार. मला स्वतःला असें वाटे कीं, हिंदुस्थानांतील शिक्षण सरकारी शाळा-कॉलेजांतून घेऊं नये, खाजगी संस्थांतून घ्यावें. पण त्यापुढील शिक्षण व विशेषतः तुलनात्मक ज्ञान येण्यास परदेशचा अनुभव कां नको? तात्यांचे पैसे घेऊन मी जाणार. म्हणजे मुळांत त्यांच्या माझ्या विचारांत फरक असला तरी चळवळीचे वेळीं हा विवेक कोण करतो? त्यांचे पदरीं विसंगतीचा दोष येईल अशी भीति वाटे. मीं तात्यांना एकदां तसें म्हटलेंही, कीं "तुमच्या या चळवळीला त्यानें कमीपणा येत असेल तर मी जात नाहीं."

"माझी परिस्थिति काय होईल याचा तूं विचार करूं नको." ते म्हणाले. "तुझें एकदां ठरलें आहे ना! जाऊन ये. माझी काळजी मी येथें घेऊं शकेन."

आणखी कांहीं दिवस असेच गेले. पण एक दिवशीं पहिल्या निश्चयाप्रमाणें दुसरा एक निश्चय मनाशीं केला. कारण आमचीं दोघांचीं मतें किती स्वतंत्र म्हटलीं तरी तात्याच जर मला पैसे देणार तर

त्यांची संमति लोक गृहीत धरणार. मतस्वातंत्र्याचे हे श्लेष, चळवळीच्या दंगलींत, लोकांना कळणारही नाहींत; व त्यांचे पैसे घेऊन पुन्हा त्यांनाच अडचणींत आणण्यास माझी ही विलायत कारण होईल. तेव्हां हें बरें नाहीं असें वाटलें व म्हणून ठरविलें कीं इंग्लंडास जावयाचें नाहीं. त्या दिवशीं पुन्हा तात्यांना जाऊन सांगितलें कीं, मला इंग्लंडला जावयाचें नाहीं व जे कांहीं पैसे त्यांनीं मला प्रवासाला उपयोगीं पडावे म्हणून दिले होते ते परत केले.

## परिशिष्ट

### [ प्रस्तुत प्रकरणासंबंधीं कांहीं पत्रें ]

पुणें, १९-५-२०

आशीर्वाद वि.— मी फिरतीवरून ता. १४ रोजीं परत आलों. तुझ्या परीक्षेचा निकाल लागून तूं सेकंड क्लासांत आल्याचें वर्तमानपत्रांत वाचलें. आनंद झाला. यापुढील कार्यक्रमासंबंधानें तेथील मंडळीशीं तूं चर्चा करीत असशीलच. चि. बापुराव देशपांडे हे पुण्यास उतरले नाहींत. परस्पर साताऱ्यास गेले असें वाटतें. चि. वाग्भट कोठें आहे ? चि. श्रीधरची प्रकृति कशी आहे ?

प्रो. कर्वे यांस एका धनिक गृहस्थानें १५ लक्ष रुपयांपर्यंत वर्गणी देणगी देण्याचें कबूल करून त्यांस जपानचे धर्तीवर हिंदी स्त्रियांकरितां विश्वविद्यालयाची रचना करण्यास सांगितलें असल्याचें समजतें. तसें झाल्यास कांहीं तरी अशाच बाबतींत Life work करण्याच्या तुझ्या निश्चयास आवडतें काम पायानें चालत वाहून आलें असेंच म्हटलें पाहिजे. अर्थात् तूं एम् ए. होईपर्यंत किंवा विलायतेला जाऊन येईपर्यंत या नव्या कामास अवकाश आहे. कारण नवी युनिव्हर्सिटी एकदोन वर्षें चालू होईलसें वाटत नाहीं. Indian Women's University लाही गव्हर्मेंट ग्रँट मिळविण्याची खटपट चालू आहे असें समजतें. सरकारी अधिकार कोणत्याही प्रकारें लादून न घेतां हें recognition मिळालें

तरच तें इष्ट हें उघड आहे. तिकडील हकिगत लिही. तुझी आई परवां सांगलीस वेणूचे मुलीचे-वारणीचे बहिणीचे-लग्नास गेली आहे. दोन-चार दिवसांनीं परत येईल. चि. आण्णा व विठ्ठल दोघेही मॅट्रिक पास झाले. क. हे आशीर्वाद.

**तात्या केळकर**

* * *

श्री.

सातारा.

वडिलांचे सेवेसी शिरसाष्टांग नमस्कार. तुझें पत्र ती. वासूकाकांना पोंहोचलें. तूं इंग्लंडला खुशाल जा. मी येथेंच राहीन. मी मोठा झाल्या-वर इंग्लंडला जाईन. माझे पाढे ३० पर्यंत झाले आहेत. आम्ही सर्व खुशाल आहोंत. तुमच्या सर्वांच्या प्रकृति कशा काय आहेत तें कळवावें कळावें हे विज्ञापना.

तुझा आवडता

**श्रीधर**

* * *

श्री.

सागर, ता. ७-१-२१

अनेक आशीर्वाद वि. तुमची इंग्लंडला जाण्याची इच्छा कळली. मे महिन्यांत तुमच्या मनांत महिला विद्यालयाचे लाइफ मेंबर होण्याचें नव्हतें. परंतु आतां होण्याचें नक्की झालें, हें वाचून आनंद झाला. हें आमच्या सर्वांच्या मनाप्रमाणेंच झालें. इंग्लंडला जाण्यांत माझी तशी कांहीं हरकत नाहीं. एकदां जावयाचें ठरलेंच म्हणजे खर्चाची व्यवस्था कशीही होईल. परंतु इतका खर्च करून त्यापासून फलनिष्पत्ति किती आहे याचा विचार करून मग काय तें ठरवावें असें मला वाटतें. धंदे-शिक्षण आपल्या देशांत चांगलेंसें होऊं शकत नाहीं व तें मिळविण्या-करतां, म्हणजे त्यांत चांगलें प्रावीण्य मिळविण्याकरतां, परदेशांत जाणें

जरूर आहे व त्यांत आपलाच काय, पण आपल्या देशाचाही फायदा होण्यासारखा आहे. तरी तें मिळविण्याकरतां कमीजास्ती खर्च परदेशांत जाण्याकरतां पडला तरी हरकत नाहीं. परंतु तशी स्थिति आर्ट्स कोर्सची नाहीं. केवळ आर्ट्स कोर्सकरतां इंग्लंडास इतका खर्च करून जाण्यांत आपला अगर राष्ट्राचा विशेषसा फायदा नाहीं. सुस्थितींत असलेल्या माणसांची गोष्ट वेगळी. त्यांस पैशाचा प्रश्न नसतो; व त्यामुळें खर्चाचे मनानें फल कितपत आहे या गोष्टीचा विचार करण्याचें कारण नसतें. परंतु आपल्यासारख्याची तशी स्थिति नाहीं. इंग्लंडांतील कोर्स घेतल्यानें ज्या संस्थेचे तुम्ही मेंबर होणार त्या संस्थेस कितपत फायदा होईल याची मला शंका आहे. तिकडील व इतर देशांतील संस्था पाहून येणें ही गोष्ट वेगळी व तेथें शिक्षणाकरतां—केवळ आर्ट्स कोर्सच्या—राहणें वेगळें. केवळ संस्था पाहण्याकरतां जाणें असल्यास तें केव्हांही करतां येईल. आणि तसें करणें असल्यास शिक्षणखात्यांत कांहीं वर्षें काम करून त्याचा अनुभव घेऊन मग जाणेंच जास्त फायदेशीर होईल व असें जाऊन यावें असें मलाही वाटतें. परंतु आर्ट्स कोर्सचें आणखी जास्त शिक्षण संपादन करण्याकरतां इतका खर्च करावा हें मला बरें वाटत नाहीं. तिकडील कोर्स पुरा करून इकडे मोठी सरकारी नोकरी मिळवावयाची असती तर गोष्ट वेगळी. परंतु तुम्हांस तसें करावयाचें नाहीं व तुम्हीं तसें करावें असें माझें मतही नाहीं. तरी या सर्व गोष्टींचा तुम्हीं शांतपणें विचार करावा. इंग्लंडास जाऊन आणखी जास्त शिकावें अशी इच्छा होणें साहजिक आहे. तुमच्या वयांत मला असेंच वाटत होतें. ती. तात्या व चि. आप्पा व वाग्भट यांनीं आपली संमति दिली आहे. परंतु या बाबतींत तुम्हीं ती. तात्यासाहेब यांस विचारावें व मग काय तें ठरवावें. मी तुमच्या जाण्याचे आड येत आहें अशांतला भाग नाहीं व तुम्ही तसें समजणार नाहीं अशी माझी खात्री आहे. फलनिष्पत्तीच्या मानानें खर्च विनाकारण जास्त होणार व पुढें हा खर्च चि. श्रीधरास एकादे धंदेशिक्षणा-

करतां परदेशीं पाठविण्यांत खर्च केल्यास विशेष उपयोगी होईल. तरी या बाबतींत प्रो. कर्वे व ती. तात्यासाहेब यांचा तुम्हीं विचार घ्यावा व त्यांचे मतें तुम्हीं आतांच इंग्लंडला जावें असें असल्यास माझी हरकत नाहीं. आपल्या गृहास्थितीचे मानानें मजला विशेष मदत करतां येणार नाहीं हें तुम्हांस माहीत आहेच. तरी तुमचें जाण्याचें ठरल्यास मी शक्य तितकी मदत देईन. तुमच्या नैसर्गिक इच्छेच्या विरुद्ध जरासें माझें लिहिणें आहे त्यामुळें कदाचित् तुम्हांस वाईट वाटेल. पण माझे विचार स्पष्टपणें कळविण्याबद्दल तुम्हीं लिहिलें म्हणून, मला जें वाटलें तें स्पष्टपणें लिहिलें आहे. तरी त्याचा राग मानूं नये, कळावें, हे आशीर्वाद.

तुमचा

**विष्णू**

* * *

श्री.

सातारा, २६-१-१९२१

वहिनी!

तुम्ही विलायतेला जाऊं नका. परवां पुण्यांत विद्यार्थ्यांची सभा भरली होती तींत तुमचे तात्या काय बोलले याचा विचार करा. "मीं माझें मत तुम्हांस सांगितलें नाहीं, असा माझ्यावर आरोप आहे. माझें मत तुम्हांस पाहिजे का? त्याच वेळेस, सभेंत बोलण्याच्या आधीं, मीं माझीं मुलें शाळांतून काढून प्रत्यक्ष उदाहरणानें माझें मत काय तें सांगितलें होतें." ते प्रथम कृति करून मग उपदेश करावयाला आले. आज पंजाब-बंगालकडे नुसती आग लागून राहिली आहे. महाराष्ट्राला जागे करण्याचा तात्यांचा प्रयत्न चालला आहे. अशा वेळीं तुम्ही—त्यांची मुलगी—विलायतला जाऊन त्यांचा पाय मागें ओढूं नका. त्यांचाच केवळ पाय मागें येत असता, तरी त्याची एवढी मातबरी नव्हती. त्यांच्या पायाशीं— केवळ त्यांच्याच पायाशीं— महाराष्ट्राचें पाऊल बांधलें गेलें असल्यामुळें त्यांच्याबरोबर महाराष्ट्राचें

पाऊलही मार्गे पडण्याचा संभव आहे. पुढाऱ्याच्या शब्दापेक्षां कृती-कडेच जनतेचें लक्ष जास्त असतें. जें जें म्हणून इंग्रजांचें आहे त्याच्या-वर बहिष्कार घालण्याची राष्ट्राची तयारी झाली असतां, पुढाऱ्याची मुलगीच जर इंग्रजांच्या गोटांत जाऊन बसूं लागली तर खरोखर देशाचें दुर्दैव. तुम्ही आपल्या स्वतःच्या जबाबदारीवर जाऊं लागला तरी लोक तुमच्या वडिलांची संमति आहे असें धरून त्यांच्यावर बेसुमार टीका करीत सुटतील. शिवाय तात्यांचें मन असावें तसें टणक नाहीं. खाजगी भाषणांतच काय परंतु ऑक्टोबर महिन्यांतील केसरी-च्या एका अग्रलेखांत ते म्हणतात कीं, अशा भयंकर टीका वाचून आमच्या मनाला वाईट वाटतें. आज त्यांच्यावर केवढी जबाबदारी आहे. अशा वेळीं तुम्हीं, त्यांच्या मुलीनें, त्यांच्यावर बाजू येईल असें कोणतेंही कृत्य करतां कामा नये. पुण्यांतील त्यांच्या प्रत्येक कृतीकडे काकदृष्टीनें पाहणारे मवाळ उद्यां काय वाटेल तें बोलूं लागतील. शिवाय राष्ट्रीय पक्षांतील मंडळीही त्यांना दोष दिल्याशिवाय राहणार नाहींत. इतक्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून तुम्ही गेलांत तर एवढें साध्य तरी काय आहे? महाराष्ट्रांतले—अठरा विश्वे दरिद्री महाराष्ट्रांतले—दहा हजार रुपये तुम्ही आमचा शत्रु इंग्लंड देश त्यांत जाऊन खर्च करणार? इतकेच तुमचे पैसे वर आले असतील तर, हिंगण्याच्या शाळेला त्याची आवश्यकता आहे तिला द्या. आजपर्यंत आपले महाराष्ट्रांतले इतके लोक विलायतला गेले त्यांपैकीं विशेष अशी कामगिरी कोणी केली आहे? हें काय वेड तुमच्या डोक्यांत शिरलें आहे? उद्यां ड्यूक ऑफ कॉनॉट परत गेल्यावर सरकार धरपकड सुरू करणार यांत शंका नाहीं. त्या सत्रांत तात्यांची, तुमच्या वडिलांची, आहुति पडणें कांहीं असंभवनीय नाहीं. अशा वेळीं विलायतेला ती बातमी ऐकून नुसत्या हात चोळीत बसणार, कां त्यांच्या मागोमाग त्यांची मुलगी आहे असें दाखविणार? ही वेळ परदेशांत— विशेषतः इंग्लंडांत— जाऊन बसायची नाहीं. प्रो. कर्व्यांसारख्या व्यक्तींचा सहवास, वहिनी! फार पुण्याईनें

मिळतो. त्यापेक्षां त्या इंग्लंडांतील बायकांचा सहवास तुम्हांला प्रिय वाटूं लागला म्हणजे काय म्हणावें ? तुम्ही नसल्यास तुमच्या साक्षरता-प्रसाराचें काम अडून पडणार. तुमचा स्वभाव हट्टी आहे मला माहीत आहे; पण एकच गोष्ट मनांत घेऊं नका. सारासार विचार करा. तरी तुम्ही तात्यांच्याकरतां– देशाकरतां– या असहकारितेच्या युगांत विलायतला जाण्याची गोष्ट काढूं नका. त्यामुळें तुमची मानसिक उन्नति थांबून राहणार नाहीं. देशसेवेंत खंड पडणार नाहीं. तरी वहिनी ! विलायतेला जाऊं नका.

पंढरिनाथ

* * *

श्री.

हिंगणें, २३-१-२१

भाओजी,*

तुमचें व घाणेकरांचें अशीं दोन्ही पत्रें पोंचलीं. तुम्हीं नीट विचार करण्याबद्दल सुचविलें आहे. पण पुन्हा विचार करूनही माझा तोच बेत कायम झाला. त्यांत थोडेंसें धाडस आहे हें खरें; पण तें करावयाचें.

मी शुक्रवारीं ता. २१ रोजीं दुपारीं गुरु. आण्णांना जाऊन भेटलें व माझा बेत त्यांना सांगितला. त्यांचीही त्याला हरकत नाहीं. जावयाचेंच तर आधीं जाऊन यावें, लांबणीवर टाकूं नये, व आजन्मसेवक होऊन जावें असें त्यांना वाटतें व मींही त्यांना संमति दिली आहे. आजन्म-सेवक या फेब्रुवारीच्या आरंभीं व्हावयाचें, कीं एप्रिलच्या शेवटीं व्हाव-याचें, तें ठरविणें मीं त्यांचेकडेच सोपविलें आहे. ते सांगतील तेव्हां मी आजन्मसेवक होणार.

तुम्हीं ज्या गोष्टींचा मला विचार करावयाला सांगितलात त्या गोष्टी

---

* रा. वाग्भट देशपांडे.

खऱ्या आहेत. आहेत नाहींत तेवढे पैसे येवढ्याशा कोर्ससाठीं खर्च करून टाकावयाचे. श्रीधरची कांहीं ठेव म्हणून रक्कम खर्च होऊन जाईल. ती. तात्यांचे पैसे खर्च करावयाचे. Sentiment नें सरसहा जगांत वागूं नये. पण मला याच्या उलट वाटतें. एकदां एकादें Sentiment चूक नाहीं अशी खात्री झाल्यास त्याप्रमाणें वागण्यास मुळींच चुकूं नये. पैशाच्या profit and loss च्या theory नें वागूं नये. शब्दाला अधिक किंमत आहे असें माझें Sentiment मला सांगतें व मी त्याप्रमाणें वागणार. पैशाला माझा शब्द विकणार नाहीं. माझा शब्द राखण्यास वाटेल ती किंमत माझी मी देईन. जगांत थोडेंसें धाडस पाहिजे. सदिच्छा मनांत ठेवून धाडस करणारें फसलें तर फसलें. Not failure but low aim is crime. जगांत अशीं पुष्कळ माणसें मोठमोठीं ध्येयें पुढें ठेवून फसलीं आहेत त्यांत एक भर पडेल. कार्य साधलें कीं नाहीं, यापेक्षां तें करणाऱ्याच्या मनोवृत्तीचें मला महत्त्व अधिक वाटतें.

म्हणून, आहे नाहीं तें खर्च करणार. ईश्वरी इच्छेनें परत आलें तर चि. श्रीधरची सर्व व्यवस्था मी करीन. ती. तात्यांनीं मला जेवढी मदत केली तेवढी त्याला करून मागच्या पिढीचें लोण पुढच्या पिढीवर नेऊन पोंचवीन. बरें, मी यशस्वी होऊन नाहीं आलें तर नाहीं. मला कर्तव्य टाळण्याची इच्छा नाहीं. तें करावयास मी तयार आहें. जगांत आहे तोंपर्यंत हरतऱ्हा करीन, पण कर्तव्यपराङ्मुख होणार नाहीं. इतके पैसे जमून कर्तव्यांतून मुक्त होण्यापूर्वींच मी मरणार असेन– अशीच ईश्वराची इच्छा असेल– तर मात्र सर्व गोष्टी तुमच्या म्हणण्या-प्रमाणें अपुऱ्या राहतील खऱ्या. पण त्याला मी जबाबदार नाहीं. ईश्वर आहे. ईश्वराला विचारा.

चि. श्रीधरला स्वावलंबी करून सोडावयाचें येवढें माझें कर्तव्य. तुम्ही म्हणाल कीं, तुम्ही त्याला टाकून जाणार तें तरी इतर मंडळी संभाळणारी आहेत म्हणून ना? अशीच जर स्थिति असती, कीं

माझ्याशिवाय त्याची काळजी घेणारें कोणीच नाहीं तर काय केलें असतें ? याचें उत्तर असें कीं, अशी स्थिति असती तर मी गेलें नसतें. त्या कर्तव्याला प्राधान्य देऊन त्याचें शिक्षण करीत बसलें असतें. पण आज तशी स्थिति नाहीं. मी नसल्यास त्याची आबाळ तर होणार नाहींच, पण उलट दुप्पट काळजी घेतली जाईल असा मला भरंवसा वाटतो.

मदत दोन प्रकारची असते : प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष. प्रत्यक्ष मदत पैशाची व अप्रत्यक्ष मदत म्हणजे ही आधाराची. प्रत्यक्ष पैशाची भरपाई होते. अप्रत्यक्ष गोष्टींना किंमत नसते. तेव्हां ही अप्रत्यक्ष मदत– वेळेस तुमचें सर्वांचें मन मोडून अगदीं स्वावलंबनाची ऐट मारून गेलें तरी जी मला होणार आहे ती– मला फेडतां येणार नाहीं. कांहीं गोष्टी फेडावयाच्या नसतात. त्यांच्या ऋणांत राहण्यांतच गोडी असते. तेव्हां त्याबद्दल मी कांहींच बोलत नाहीं. आणि म्हणून या अप्रत्यक्ष मदतीमुळें मी कांहीं मोठें साहस करीत आहें असें नाहीं. एकंदरींत हेंच करावयाचें मीं ठरविलें आहे, मात्र एप्रिलच्या शेवटीं या सर्व गोष्टी प्रसिद्ध करावयाच्या.

हेंच पत्रीं चि. सौ. सुशिलाबाई व चि. नानाकाका (मुकुंद) यांस अ. आशीर्वाद. क.

तुमची

**कमलावहिनी**

## आजन्मसेविका : : ८

आश्रमाची आजन्मसेविका व्हावयाचें ठरवून १२ फेब्रुवारी १९२१ रोजीं रीतसर ठराव होऊन मी मंडळांत दाखल झालें. सकाळीं मंडळाची सभा होती. त्या वेळीं मला बोलावून मला दाखल करून घेण्याचा ठराव अध्यक्षांनीं म्हणजे नाना आठवले यांनीं मला सांगितला, दादा व नाना या दोघांनीं मला प्राथमिक चार शब्द सांगितले. "संस्थेमध्यें येतांना मनुष्य स्वतःच्या इच्छेनें येतो; पण पुढें त्याला मंडळाच्या सूचनेनुसार वागावें लागतें, आपल्या मनाविरुद्धही गोष्टी पुष्कळदां घडतात. तेव्हां या सर्वांस मनाची तयारी ठेवून कार्य करावयाचें असतें. कै. प्रो. हरिभाऊ लिमये नवीन होणाऱ्या आजन्मसेवकांस पुष्कळदां सांगत कीं, "आपल्याला संस्थेचें सर्व काम करावयाचें आहे ही जाणीव ठेवा. पण आपल्यासाठीं संस्था कांहीं करील अशी जाणीव विसरा." इ.

मीं यावर केलेल्या भाषणांत सांगितलें कीं, "राजकीय दृष्ट्या मला टिळकांचें अनुकरण करावेंसें वाटे;पण सामाजिक दृष्ट्या नेमस्तांची सुधारक भूमिका मला पटते. यापुढें कार्यें व्हावयाचीं तीं या दोन्ही भूमिकांचें एकीकरण होऊन व्हावयास हवींत. आश्रमाचे कामांत स्त्रीशिक्षण व राष्ट्रीय शिक्षण या दोन गोष्टींचें एकीकरण होत आहे असें मला वाटतें."

यामुळें पुढील कामाची दिशा निश्चित झाली व त्या अभावीं होणारी मनाची धावाधाव 'हें काम करूं का तें काम करूं' ही थांबली व एक प्रकारचा शांतपणा आला. आजन्मसेवकांना एक बंधन असें असतें कीं त्यांनीं प्रत्यक्ष राजकीय चळवळींत पडूं नये. याचें मला पुष्कळ दिवस वैषम्य वाटे. राजकीय चळवळ ही सर्वांत महत्त्वाची; आणि त्यांत भाग घ्यावयाचा नाहीं म्हणजे काय जुलूम आहे! पण आज वीस वर्षांच्या अनुभवानंतर असें वाटतें त्यांत फारशी चूक नाहीं. चळवळींचा अभ्यास व सहानुभूति ठेवतां येते. सक्रिय मदत ही चळवळीच्या दृष्टीनें तात्पुरती असते. म्हणजे ज्या प्रमाणांत चळवळीला उपयोग होतो त्याच्या दुप्पट प्रमाणांत चालू शिक्षणकार्यांत अडथळे येण्याचा संभव असतो. 'शिक्षणसंस्थां'सारखीं कामें शांतपणें करावयाचीं असल्यानें त्यानें खळबळ कमी उडते, त्याची प्रसिद्धि कमी होतें हें खरें, पण कार्याकडे पाहिल्यास कार्य कमी होत नाहीं.

सांपत्तिक दर्जाही ठरला. पगाराबद्दल मीं फारसा विचारच केला नव्हता. शरीरप्रकृति ही एक सतत चालणारी यांत्रिक रचना आहे असेंच वाटे. पैशाची किंमत मला कळत नव्हती असेंही म्हणावयास हरकत नाहीं. आश्रमांतील कामांत पगार ठरवितांना लायकीपेक्षां जरूरीची दृष्टि तेव्हां असे. एका माणसाला लागेल किती? स्त्रियांच्यावर जबाबदाऱ्या कमी, तेव्हां त्यांना पगारही कमी व पुरुषांच्यावर जबाबदारी जास्त, तर त्यांना पगारही जास्त असे. पहिल्या आजन्मसेविका वेणूबाई नामजोशी, कृष्णाबाई आठवले, व काशीबाई देवधर या आश्रमांत जेवून पांच रुपये वरखर्चास घेऊन काम करीत. आजन्मसेवक मंडळांतील सभासदांची तशीच कांहीं पद्धति– जरूरीपुरतें घेणें— होती. परंतु अनुभवानें या गोष्टी अव्यवहार्य ठरल्यामुळें पुढें– म्हणजे वारूबाई मी वगैरे मंडळी काम करूं लागलें तेव्हांपासून– पगाराचीं कोष्टकें झालीं. ग्रॅज्युएट म्हणून मला पन्नास रुपये पगार ठरला. जून १९२० मध्यें शिक्षक म्हणून मी काम करूं लागलें तेव्हांही पन्नास रुपये

मला मिळत होते व त्यांतले मी दरमहा दहा रुपये म्हणजे प्राप्तीचा एकपंचमांश साक्षरता आदि कामावर खर्च करावयाचे ठरवून तशी सुरवात केली होतीच. त्यामुळें आजन्मसेवक झाल्यानें आणखी त्याग केला असें वाटण्याचें कारण नव्हतें. आज मी असें म्हणूं शकतें कीं, पैसे मिळवावयाला सुरवात केल्यापासून सेवानिवृत्त होईपर्यंत जेवढा मी पगार मिळवला त्याच्या एकपंचमांश शिक्षणाचे प्रसाराप्रीत्यर्थ खर्च केला. थोडा जास्तीच असेल, पण कमी नाहीं.

कपड्यांचे बाबतींतही हेंच धोरण मीं ठेविलें होतें. जी. ए. होई-पर्यंत मीं कपड्यांची आवड थोडी इतरांपेक्षां कमी दर्जाची विचार-पूर्वकच ठेविली होती. दहाजणांच्या घरांत वितुष्टाला कारण यावयाचें तें कपड्या-दागिन्यांवरूनच. तेव्हां शिकत आहे तोंवर आपली आवडच सर्वांच्यापेक्षां कमी ठेवणें बरें असें वाटे. जी. ए. झाल्यावर स्वतः मिळविलेल्या पैशाचीं म्हणून दोन लुगडीं स्वतःच्या आवडीनें घेतलीं. पुढें आश्रमांत काम करतांना ज्यांच्यासाठीं आपण काम करणार त्यांच्याशीं शक्य तितकें समरस झालेलें असावें या हेतूनें, कपडा सुती व लुगडीं सुताडेच घेत असे. स्वदेशीवर भर माझा प्रथमपासून होता. पण एकवीस सालच्या चळवळींत आणखी त्यांत वाढ झाली. एका लुगड्याच्या कारखानदाराशीं पत्रव्यवहार करून देशी गिरणींत काढलेलें सूत व देशी कारखान्यांत तयार होणारा रंग ज्यांत आहे अशींच लुगडीं मिळविण्याची व्यवस्था करून तीं वापरलीं. 'शुद्ध देशी' माल म्हणून त्या कारखान्याची एजन्सीही घेतली. पुढें सुमारें आठ वर्षांनीं 'शुद्ध स्वदेशी' लुगडीं म्हणून त्या लुगड्यांची जाहिरात मीं एका पुस्तकावर छापविली असतां त्या कारखानदाराचें पत्र आलें कीं, "तुम्हीं दिलेली जाहिरात पाहिली. पण तशी जाहिरात देऊं नये. पूर्वीं जरी आम्ही हिंदुस्थानांत तयार झालेलें सूत वापरीत होतों तरी अलीकडे तसें सूत न मिळाल्यानें आम्ही जपानी सूत वापरतों. तुम्ही 'शुद्ध स्वदेशी' म्हटल्यानें लोकांची फसगत होईल." यामुळें

माझा फार विरस झाला. त्यांचे शब्दावर विश्वसून मीं जवळ जवळ आठ वर्षें त्यांचा माल वापरला होता. पण त्यांपैकीं किती वर्षें माझ्या इच्छेप्रमाणें 'शुद्ध स्वदेशी' मला मिळालें कोणास माहीत! या व इतरही अनेक गोष्टींनीं अशा तऱ्हेच्या नियमांबद्दलची माझी भक्ति उडाली व त्या वर्षीं मी पुन्हा दुकानांत जाऊन सरळ चांगलीं दिसणारीं लुगडीं घेऊन आलें; व हल्लींही हिंदुस्थानांत विणलेलीं लुगडीं पण सुताची व रंगाची चिकित्सा न करतां खरेदी करतें. उलट्या टोकाला जाऊन स्वदेशी घ्यावयाचें नाहीं असा मीं नेम केला नाहीं. परंतु पूर्वीं अगदीं व्रत समजून ज्या गोष्टी करीत असे तसें व्रताचें महत्त्व आजच्या *घटकेला तरी मला वाटत नाहीं हें खरें!

सातारला कन्याशाळेंत काम करतांना शून्यापासून पस्तीस रुपयांपर्यंत मीं पगार घेतला. या वेळींही वागणुकींत हीच दृष्टि ठेवणें मला आवडे. इच्छा दर्शविली असती तर दोन्ही घरीं मला याहून मोलाचा कपडा व लुगडीं मिळूं शकलीं नसतीं असें नाहीं. पण जें आपण मिळवितों त्याशीं सुसंगत आपली राहणी असावी अशी इच्छा होती. कॉलेजमध्यें आल्यावर पगार जास्त घेतला व राहणीही जास्त वाढविली. हें सर्व विस्तृत लिहिण्याचें कारण एवढेंच कीं, माझ्या स्वार्थत्यागाचा गाजावाजा वाजवीपेक्षां फार झालेला. उलट घरांतून शंभर रुपयांचा खर्च मिळत असल्यावर पन्नास रुपये नको म्हणण्यांत कसला आहे स्वार्थत्याग असेंही म्हणतां येतें. स्वार्थत्यागाची कल्पना बरोबर असो चूक असो, ती होती तोंपर्यंत त्याच्याशीं विसंगतपणा येऊं न देण्याची व घरच्या परिस्थितीचा अकारण फायदा न घेण्याची मीं दक्षता घेतली.

आश्रमांतील पद्धति त्या वेळीं अशी होती: आजन्मसेवक पुरुष विवाहित असतात, त्यांच्यावर कुटुंबाची जबाबदारी असते, तेव्हां त्यांचा पगार जास्त. त्यांना पेन्शन व त्यांचा विमा उतरला जाई.

स्त्रियांवर या जबाबदाऱ्या नसत तेव्हां पगार त्या प्रमाणांत कमी. पेन्शन असे पण 'विमा' नाहीं. कन्याशाळेंत मी काम करूं लागल्यावर एक-दोन वर्षांनीं तात्या मला म्हणाले, "तूं पगार न घेतां काम करतेस हें सर्व ठीक. पण अडीअडचणीला तुजजवळ कांहीं शिल्लक आहे का?"

"नाहीं." मी.

"वेळप्रसंगीं अडचणी, दुखणीं, प्रवास यासाठीं एकाद वेळ एकदम रक्कम लागते. शिवाय तुझ्यावर मुलाची जबाबदारी आहे. चार वर्षें तूं काम करतेस तुजजवळ शिल्लक काय?"

आणि खरोखरच मजजवळ दोनशें रुपयांपेक्षां जास्त शिल्लक नव्हती. पैकीं सुमारें १२५ रु. जी. ए. मध्यें मिळालेलीं बक्षिसेंच होतीं. व्याजाचे वर्षाचे १८० रु. येत ते माझा कापड-खर्च व वारणाबाईचा सर्व खर्च शिक्षण-जेवण यांत जात. श्रीधरचे मुंजीची वेळ येईल तेव्हां इतरांवर भार पडूं नये म्हणून ते पैसे देण्याचा माझा मानस होता. पण सगळ्या दिरांनीं माझी मदत घेण्याचें नाकारलें व म्हणून पुढें ते पैसे मीं वारणीसाठीं खर्च केले. कन्याशाळेंत दोन वर्षांनंतर घेतलेला २० ते ३५ रु. पर्यंतचा पगार मी घरखर्चांत जमा करीत असे. कारण ऊंस जरी गोड झाला तरी मुळासकट खाणें बरें नाहीं. 'हें बरोबर नाहीं. तूं हिंगण्याची आजन्मसेवक म्हणून साताराला काम करतेस तर त्यांनीं तुला पगार द्यावा' तात्या म्हणाले.

पण हें शक्य नव्हतें. कारण शाळेची सुरवात करतांनाच अशा पद्धतीनें केली होती कीं, कोणतीही पैशाची घस आश्रमास लागूं नये. दोन्ही संस्था अगदीं वेगळ्या ठेवल्या होत्या. दुसरा उपाय तात्यांनीं सुचविला तो विमा उतरण्याबद्दल.

"तूं तुमच्या सभेंत प्रश्न काढ; स्त्रियांचा विमा उतरीत नसतील तर नियम करून घेऊन उतरण्याची पद्धति पाडावयास काय हरकत आहे? व हें कांहीं शक्य नसेल तर मग मी तुझे हप्ते भरीन तूं विमा उतर." तात्यांनीं मला सल्ला दिला.

सभेंत प्रश्न काढण्याचे पूर्वी आण्णांचे जवळ या प्रश्नाची चर्चा केली. आण्णांची दृष्टि एकच: "इतक्या आजन्मसेविकांचा विमा उतराबयाचा म्हणजे खर्चाचा बोजा वाढतो व अशी काय जरूरी आहे? मुलाच्याबद्दल तूं म्हणतेस, पण, नड पडली तर त्याचे चुलते त्याचें करणार नाहींत काय?"

"चुलते त्याचें करतील कीं नाहीं हा प्रश्न नाहीं. पण मी जर आज स्वावलंबी म्हणवितें तर माझ्या मुलाची तरतूद करावयाचा विचार मीं करूं नये का?"

"इतकीच वेळ आली कीं, त्याचे चुलते वगैरे कोणी त्याला मदत करीत नाहींत, तर मग आश्रम पाहील. हा प्रश्न आज महत्त्वाचा म्हणजे सर्वांच्या जरूरीचा नाहीं. आणि सभेंत निघाला तर मीच त्याला विरोध करीन."

मलाही राग आला होता व म्हणावेंसें वाटलें कीं, इतकीच वेळ येईल तेव्हां मुलाला सांगून ठेवीन कीं, "बाबा रे! इतर कोणाचीही मदत घे, पण या हिंदु बुइडोज़् होमच्या लोकांची घेऊं नको." पण विचारानें मी गप्प बसलें. आण्णाच विरोध करणार, तेव्हां हें अमलांत येणें शक्य नाहीं म्हणून सभेंत प्रश्नच काढला नाहीं. मीं १९२५ सालीं एक हजाराचा विमा उतरला व युरोपांतून परत येईपर्यंत त्याचे हप्ते तात्याच भरीत असत. पुढें १९३१ सालीं इरावतीबाई आल्या तेव्हां स्त्रिया व पुरुष यांना सारखे पगार झाले, व सीताबाई अमेरिकेस गेल्या तेव्हां स्त्रियांचे विमे उतरण्याचें ठरून सर्वांचे विमे पुरुषांप्रमाणें उतरविण्यांत आले.

पैशाचें व पुढील तरतूद करण्याचें महत्त्व मला त्या वेळीं कळत नसे. तसेंच आज जरी प्रकृति उत्तम आहे तरी उद्यां ती बिघडूं शकते, हेंही कधीं माझ्या ध्यानांत येत नसे. "आज भरपूर उमेद व उत्साह आहे ना! करूं या तर मग पुढें होऊन येवढें काम" असें मला वाटे. एकाद

वेळ चर्चेला प्रश्न निघाला तर मी म्हणे, “ हो समजा, उद्यां आम्ही आजारी पडलों आणि लोकांची मदत घेण्याची वेळ आली तर काय हरकत आहे ? आपण प्रसंगीं लोकांना मदत केली तर आपण लोकांची प्रसंगीं मदत घ्यावी.” पण आज हें बरें वाटत नाहीं. आज असें वाटतें कीं प्रसंगीं लोकांची मदत घेण्याची वेळच येऊं देऊं नये. याची जास्त कल्पना मला, मी अठ्ठावीस सालीं आजारी पडलें तेव्हां, आली. सुदैवानें मला त्रास पडला नाहीं. कोणाकडेही जाऊन मी वर्ष सहामहिने विश्रांति घेऊं शकेन असे दीर व माहेर मला होतें. पण हें नसतें तर वर्ष दोन वर्षांची विश्रांति, शिल्लक कांहीं नसतां, मला कशी मिळाली असती ? स्वतःवर स्वाभाविकपणें येणाऱ्या जबाबदाऱ्या अपुऱ्या ठेवून, उदा. आई, बाप, मुलें— सर्वस्वाचा स्वार्थत्याग करावयास जाणें बरें नव्हे. अठ्ठावीस सालच्या आजारांत आणखी दोनचार दिवसांत झोप लागली नाहीं तर मेंदूवर परिणाम होईल, अशी मजबद्दल सर्वांना भीति वाटूं लागली होती. तसें होऊन उरलेलें आयुष्य जर जीवन्मृत स्थितींत काढण्याचा प्रसंग येता, तर नातेवाइकांना कांहीं तरी करून माझी तरतूद तर करावी लागलीच असती. अशा वेळीं माझ्या स्वार्थत्यागानें मीं दुसऱ्याचे म्हणजे शिक्षणाचे कार्यांत केलेली मदत व त्या प्रयत्नांत माझ्या आप्तस्वकीयांना पडलेला भूर्दंड याचें काय प्रमाण पडलें असतें ? ज्याप्रमाणें स्वतःचे सदसद्विवेकबुद्धीचा अगर स्वाभिमानाचा मी त्याग करतें तो स्वार्थत्याग म्हणा असें म्हणणें टिकणार नाहीं, त्याप्रमाणें स्वतःच्या जीवितधारणवृत्तीचा त्याग हाही स्वार्थत्याग होऊं शकत नाहीं. “ जगांतला पहिला परोपकार म्हणजे घालूं नये स्वतःचा दुसऱ्यावर भार.” देशभक्तीप्रमाणेंच स्वार्थत्याग व परोपकार हे शब्द फार स्वस्त होऊं लागले म्हणजे त्यांतलें सामर्थ्य जातें. अमुकाच्या मुलाला शिक्षणाला मदत करा. कां ? तर त्याच्या वडिलांनीं स्वार्थत्याग केला होता किंवा “ मी अमुक काम सेवा म्हणून करणार, त्याबद्दल योग्य वेतन दिलेंत तर घेणार नाहीं, तरी पण माझा प्रपंच चालला नाहीं अगर मला

कर्ज झालें तर त्याची काळजी लोकांना; व न काळजी करतील तर ते कृतघ्न." अशा खरखरमुंड्या वृत्तीचे लोकसेवक पाहिले म्हणजे मात्र त्यांना म्हणावेंसें वाटतें कीं, 'परोपकार व लोकसेवा न करायला काय घ्याल?'

समाजामध्यें कुणाला तरी कांहीं तरी कमी पडणारच. असें कमी पडलें तर तत्कालीन राजसत्ता अगर जी कोणती दुसरी मुख्य केंद्रवर्ती सत्ता असेल तिनें तिकडे लक्ष पुरवून आपल्या त्या घटकांची ती उणीव दूर करावी. किंवा गृहस्थानेंही गृहस्थधर्म म्हणून आपण दहा माणसांचा संसार चालविला तर आणखी अकराव्या एखाद्या अशा घटकाला मदत करावी हें सयुक्तिक आहे. पण सर्वच दुःख-निवारणाचा व सुधारणांचा भर ज्या वेळीं सार्वजनिक काम करणारीं माणसें व फंड यांवर पडूं लागतो, त्या वेळीं मूळ समाजाच्या घडींत तर कांहीं चुकत नाहीं ना, अशी शंका येऊं लागते. एकदां एका वर्तमान-पत्रांत मोठी समर्पक टीका आली होती. बंगाल प्रांतांत सत्याग्रह सुरू झाला व इतके कैदी सत्याग्रह करून तुरुंगांत गेले कीं, कैद्यांना ठेवावें कोठें व काम काय द्यावें हा सरकारला प्रश्न पडला. मामुली तुरुंग पुरेनात तेव्हां सामानाच्या गोद्या आदि जागा तुरुंग करावयास मोकळ्या केल्या. वर्तमानपत्रकार पुढें म्हणतात, "आमच्या सरकार-जवळ साधनांची विपुलता आहे तशी कल्पकताही आहे. उद्यां गोद्या वगैरे सार्वजनिक जागा संपल्या म्हणजे माणसें तुरुंगांत गेलीं म्हणून मोकळीं पडलेलीं घरें आहेतच. राम्याच्या घरांत सोम्याला ठेवा व सोम्याच्या घरांत राम्याला ठेवा. राम्याचें काम सोम्यानें करावें व सोम्याचें काम राम्यानें करावें, व प्रत्येक घरावर तुरुंग म्हणून पाटी लावली कीं संपलें. मजुरी व तुरुंग दोन्ही प्रश्न सुटतील!" अशा तऱ्हेनें 'माझ्यावर उपकार करणारा तूं व तुझ्यावर उपकार करणारा मी!' त्या-पेक्षां प्रत्येकानें आपलें काम केलें तर आपण परोपकार करतों अशी ऐट न मारतां येण्याखेरीज जास्त वाईट काय होईल? स्वार्थत्याग व

परोपकार या साधनांचा उपयोग जितका ज्या समाजांत कमी करावा लागेल तितका तो समाज जास्त सुसंघटित आहे असें नव्हे काय ?

दुसरें असें. एकान्तिक वृत्तीच्या परोपकारी लोकांचीं उदाहरणें थोडीं, अपवादात्मक म्हणून वगळलीं तरी, या प्रकारच्या समाजसेवक झालेल्या वर्गाला एक याचनेचीच सवय लागून त्यांत कमीपणा वाटेनासा होतो. कामाला– विशेषतः वर्गणी मागण्याच्या– सुरवात करतांना प्रथम संकट वाटतें व दरवेळेला मनाला समजावून सांगावें लागतें कीं, "आपण काय स्वतःसाठीं याचना थोडीच करतों आहोंत; त्यांत कमीपणा कसला?" पण पुढें सवयीनें ही याचना इतकी वाढते कीं, संस्थेची जरूरी असो कीं वैयक्तिक असो, याचना ही करावयाचीच! याचना करून गरज भागली नाहीं तर मग विकत घ्यावयाचा प्रश्न. व्यक्तीनें आपल्या गरजा आपल्या स्वकष्टार्जित धनानें पुऱ्या करण्यांत एक प्रकारचें औचित्य आहे तसेंच संस्थेच्या बाबतींतही असावयास पाहिजे.

राजकीय कार्यक्षेत्रांत एक वेळ पुढील वाक्य उपहासभूत झालें होतें. "नाहीं ना इतर कांहीं जमत? मग होतों आतां देशभक्त व होतों संपादक अगर जातों तुरुंगांत!" त्याचप्रमाणें "नाहीं ना इतर कांहीं जमत? मग काढतों एक शाळा व करतों स्वार्थत्याग!" असें शिक्षण-क्षेत्रांत होऊं लागल्याची भीति वाटते!

तेव्हां स्वार्थत्याग व परोपकार हे शब्द आतां शिक्षणसंस्थांतून तरी कमी करून टाकण्याचा काळ आला आहे. एक वेळ या कल्पनांनीं शिक्षणक्षेत्रांत अविस्मरणीय कामगिरी केली हें खरें. बाल्यावस्थेंत कमी पडेल तेथें संभाळून घेणारी मायेची पांखर, तशी शिक्षणप्रसारा-च्या बाल्यावस्थेंत स्वार्थत्याग व परोपकार या कल्पनांची पांखर उप-योगी पडली. पण आतां स्वावलंबी तरुणांप्रमाणें 'लायकी' व 'चोख काम' या स्वतःसिद्ध गुणांवरच शैक्षणिक कार्य टिकलें पाहिजे.

जी. ए. झाल्याबरोबर मी व गंगू– गंगूबाई पटवर्धन– हिंगण्यास शिक्षिका म्हणून काम करीत होतोंच. शिवाय व्यवस्थापिकेच्या

कामाची थोडीशी माहिती असावी म्हणून मजकडे विद्यालय व गंगू-कडे आश्रमांतील मेट्रनचें काम दिलेलें होतेंच. मी आजन्मसेवक झालें त्या वेळीं मला जास्त काम काय द्यावें याचा विचार निघाला. त्याच वेळीं श्री. सीताबाई जोशी म्हणजे मावशी या एक वर्षाच्या रजेवर जात होत्या त्यांचेंच बोर्डिंग सुपरिंटेंडेन्टचें काम मला देण्याचा ठराव झाला. वयाच्या व अनुभवाच्या दृष्टीनें मी लहान, शिवाय नुकतीच विद्यार्थिनींमधून बाहेर पडलेली. तेव्हां लागलीच माझ्यावर सुमारें शंभर मुलींच्या बोर्डिंगची जबाबदारी कां टाकण्यांत आली, किंवा वारूबाईंना मुख्य बोर्डिंग सुपरिंटेन्डेन्ट करून मला त्यांची दुय्यम कां करण्यांत आलें नाहीं, हें मला नक्की कळत नाहीं. कारण मी आजन्म-सेवक होऊन मंडळाचे सभेंत समाविष्ट होण्यापूर्वींच तें धोरण निश्चित झालें होतें. पण चोराच्या हातीं जामदारखान्याच्या किल्ल्या द्याव्या या तत्त्वानुसार हें केलें असल्यास न कळे! दोन वसतिगृहांवर दोन सुपरिं-टेंडेंट. दोघींचा दर्जा सारखा, म्हणून आम्ही जॉइंट सुपरिन्टेन्डेन्टस्—सहव्यवस्थापिका. शिवाय नाना आठवले, वारूबाई, व मी अशी एक कमिटी असून, नाना तिचे अध्यक्ष व तिघांच्या मतानें सर्व गोष्टींचा निकाल करावयाचा असे.

आम्ही सहव्यवस्थापिका मतदानदृष्ट्या अगदीं सारख्या वजनाच्या. तरी विचारसाधर्म्यामुळें नानांचा व बहुमताचा पावशेर वारूबाईंच्या पारड्यांत पडे. आणि प्रत्येक बाबतींत त्या 'शेरास सवाशेर' होऊन 'फुटलेलें चित्र मनीचें!' अशी माझी स्थिति होई.

तेव्हांच्या गमती— हो आतां गमती नाहीं तर काय!—अनुभवतांना कडवटच वाटल्या त्या. त्यालाही वीस वर्षें होऊन त्या अनुभवानंतर त्या माणसांचा इतरही कामांत संबंध आला, इतर बऱ्या गोष्टीही अनुभवास आल्या, व एकंदरींत पूर्वींच्या अनुभवांकडे तटस्थतेनें पाहतां येऊं लागलें. त्यामुळें त्यांच्या स्मरणानें कटुत्वापेक्षां गंमतच अधिक वाटते म्हणून त्या गमती.

वसतिगृह-चालकाचें काम हें कोठेंही किचकट व अप्रियता उत्पन्न करणारें असतें. चोवीस तासांची घासाघीस ती. त्यांतही १९२० सालीं हें काम अत्यंत घासाघिशीचें होतें. हिंगण्याचे सर्व आजन्मसेवक तेथेंच काम करीत व राहत. शिवाय वातावरण घरगुती. त्यामुळें असें होई कीं, काम करणारा एक तर त्याची चर्चा करणारे दहा! शिक्षकांचा दृष्टिकोन एक, आजन्मसेवकांचा दुसरा, तर भावी आजन्मसेविका—म्हणजे ज्यांचें शिक्षण पुरें व्हावयाचें असल्यानें ज्यांना अद्याप कायदेशीर अधिकार नाहीं पण आपलेपणामुळें चर्चा करण्याचा हक्क वाटे—त्यांचा तिसरा.

मुलींच्यामध्येंही तीन प्रकार. हायस्कूलच्या मुली, ट्रेनिंगच्या मुली (ट्रेनिंग कॉलेजच्या मुलींना इतर मुलींनीं चेष्टेनें दिलेलें नांव), आणि कॉलेजच्या मुली. कॉलेजच्या मुलींचो धाव अशी कीं आम्ही आतां मोठ्या कॉलेजच्या मुली! आम्हांला थोडी जास्त स्वतंत्रता हवी! व कॉलेज नवीन निघाल्यामुळें चालकमंडळींनाही कौतुक होतेंच. त्यामुळें थोडी जास्त सूट त्यांना मिळे. सूट म्हणजे काय, तर कॉलेजच्या मुलींना अभ्यास असतो म्हणून त्यांना इतर कामाची पाळी नाहीं. त्यांनीं फक्त आठवड्यांतून एकदां वाढावें. फार तर भाजी निवडावी. अंग धुण्यासाठीं फरसावर गेल्या तर पहिली पाण्याची बादली त्यांना; शाळेच्या मुलींना मागाहून. रात्रीं जास्त वेळ जागून अभ्यासाची परवानगी त्यांना. पण शाळेच्या व ट्रेनिंगच्या मुलींना हेच हक्क फार वाटून आपली हेळसांड होतेसें वाटे. कारण, शेजारीं शेजारीं दोन खोल्या, पण एका खोलींतील मुलींनीं दहा वाजले कीं दिवे मालवावयाचे, तर दुसऱ्या खोलींतील मुलींनीं अकरापर्यंत जागावयाचें! हें अंमलांत यावयाला व योग्य वाटावयाला जरा कठीणच. कॉलेजच्या मुलींची धाव पुढें. त्यांना तरी हायस्कूलच्या मुलींची फिकीर करण्याचें कारण काय? यामुळें त्या आपल्या हक्काचा फायदा भरपूर घेत. 'बेजबाबदारपणा' याला दुसरा शब्दच जणूं 'कॉलेजची मुलगी',

असें हायस्कूलच्या मुली समजत व आपापसांत थट्टेनें म्हणतही. " तिनें काम चुकविलें ना! 'कॉलेजची मुलगी आहे' नुसती!" पण त्यांना हें कळत नसे कीं, आपणही उद्यां कॉलेजच्या मुली होणार व मग आपणही ते हक्क सोडणार नाहींत. पण इतका विचार करून प्रत्येक मुलगी वागली तर तें 'झुंडीचें मानसशास्त्र' (Mob Psychology चें बापूसाहेब चिपळूणकरांनीं केलेलें भाषान्तर) कसलें? गोष्टी क्षुल्लक खऱ्या, पण त्यामुळें वातावरणांत आंदोलनें उत्पन्न होत व व्यवस्थापकांना भरपूर काम मिळे. कॉलेज येरंडवण्यास गेल्या-मुळें, त्याचप्रमाणें प्रत्यक्ष काम करणाऱ्या दोन-तीन प्रमुख आजन्म-सेवकांखेरीज बाकीचे वेगवेगळ्या ठिकाणीं काम करण्यास गेल्यामुळें, आजचें तेथील काम पूर्वीच्या मानानें पुष्कळ सोपें झालें आहे.

मीं कामास सुरवात केली त्या वेळीं हे सर्व प्रवाह तर तेथें होतेच. शिवाय मी व वारूबाई ही जी कांहीं सांगड घातली गेली होती तीही कांहीं फारशी जमणारी नव्हती. वारूबाई तरी कांहीं फार अनु-भवी होत्या असें नव्हे; माझेआधीं एकच वर्ष जी. ए. होऊन त्यांनीं कामास सुरवात केली होती. पण त्यांनीं श्री. काशीबाई देवधरांसारख्या कडक शिस्तीच्या व्यवस्थापिकेच्या हाताखालीं शिक्षण घेतलेलें. त्यामुळें शिस्तीच्या तत्कालीन कल्पना, प्रकृतीही बेताबाताची, त्यामुळें बहुतेक थकलेल्या व प्रकृतीच्या सदा जिकिरींत. मी शिस्तवगैरेबद्दल त्यांच्या मानानें आधुनिक अगर पुस्तकी कल्पना बाळगणारी म्हणजे 'व्यवहारी अपूर्णांक' किंवा हल्लींच्या भाषेंत थोडीशी 'नवमतवादी'. शिवाय मुलींच्याबरोबरच तीन वर्षें राहिलेली. त्यामुळें जरी एकदम बोर्डिंग सुपरिंटेंडेंट झालें तरी, मला व मुलींना परस्परांबद्दल भीति उत्पन्न होण्यास जो थोडा परकेपणा अगर लहान-मोठेपणा वाटायला पाहिजे तो वाटणें शक्य नसे. वरिष्ठांनीं मुलींमध्यें बेतानें मिसळलें पाहिजे अशी एक कांहींची समजूत, तर शक्य तितकें जास्त मिसळलें पाहिजे ही माझी समजूत!

त्या वेळीं कॉलेजच्या मुलींना विद्यालयांतील माडीवरच्या दोन खोल्या दिल्या होत्या. यामुळें खालच्या हायस्कूलच्या विद्यार्थिनींपेक्षां थोडा जास्त मोकळेपणा त्यांना मिळे. आमच्यापैकीं सर्वांत लहान व पोरकट—त्या वेळीं, पण आतां नव्हे— म्हणजे मालती शेवडे, कमळ कुकडे, शांताबाई भाटवडेकर, बनूबाई देशपांडे, कृष्णा खरे इ. अगदीं मराठी इयत्तांपासून शिक्षण तेथें झालेलें. त्यामुळें सर्वांना त्या लहान पोरी वाटत व त्यांनाही घराप्रमाणें दंगा करावासा वाटे. दररोज कोठें तरी पोरकट उपद्याप करून यावयाच्या व बोलून घ्यावयाच्या. प्रोफेसरांच्या रागाच्या तडक्यांत सापडावयाचें व मग क्षमा मागत हिंडावयाचें! दुर्गाताई विचारीतच, "काय कमळे, मालती, अजून किती प्रोफेसरांची क्षमा मागायची आहे या आठवड्यांत?"

"अजून दोन" कमळी हिशेब करून सांगे, "मी किनी, दुर्गाताई, मोठी झालें कीं, शिक्षक होऊन परत या शाळेंत येणार, व ज्या ज्या 'सरां'नीं मला आतांपर्यंत त्रास दिला आहे त्यांच्या मुलांना शिकवून उद्धट काढणार!" आणि मग तिच्या कल्पनेप्रमाणें साऱ्या प्रोफेसरांनीं जे कांहीं तिचे अपराध केलेले असत त्यांची उजळणी होई. "प्रथम आमचे प्रिन्सिपल नानासाहेब. त्यांच्या मुलाशीं सदा वाकडें बोलणार. ते कसे मला टोचून बोलतात! 'कमळाबाई, मला वाटलं होतं कीं तुम्हीं थोरल्या बहिणीप्रमाणं समजूतदार असाल! इ. इ.' दिवेकरांच्या मुलावर मोठ्यानें ओरडून त्याला घाबरवून सोडणार. मायदेवांच्या मुलीनें कितीही चांगला निबंध लिहिला तरी तिला very good असा शेरा कध्धीं देणारच नाहीं. आणि लिखित्यांच्या मुलीला सबंध Physiology चें पुस्तक वहीवर उतरून घ्यायला सांगणार!"

"आणि आपले जोशी?– त्यांच्या मुलीला?" कुणी तरी प्रश्न करी.

"आपले जोशी? छे! 'आपली माय' आहे ती! त्यांच्या मुलीवर कांहीं सूड उगवायचा नाहीं."

मुलींनीं कांहीं तरी चुका करून मागाहून जोशी यांना क्षमायाचनेचें

पत्र लिहिलें होतें. उत्तरांत जोशांनीं लिहिलें होतें, "क्षमा केली आहे. राग अगोदरच गेला होता. कारण माय जशी मुलावर फार वेळ रागावूं शकत नाहीं तसाच शिक्षकही विद्यार्थ्यांवर फार रागावूं शकत नाहीं." आणि तेव्हांपासून कॉलेजच्या खोल्यांत ते 'आपली माय' म्हणून ओळखले जात. खरं म्हणजे आमच्या कॉलेजच्या दिवसांत जोशांना मुलींवर रागावतांच येत नसे! अलीकडे मात्र त्यांचे अडाखे जरा बसले आहेत कीं, विद्यार्थिनींवर केव्हां रागवायचें, किती रागवायचें, वर्गाकडे पाठ करून केव्हां शिकवायचें! इ.

चहाचा प्रसार तेव्हां कमीच होता म्हणावयाचा. संध्याकाळीं रात्रीं चहा घेणें वाह्यात वाटे. एकदां-दोनदां मालती, कमळी, शांताबाई यांनीं संध्याकाळीं सात वाजतां चहा केला. आम्हीं सर्व मुलींनींही त्यांना दोष दिला, अवेळीं चहा घेऊन जागत बसण्याबद्दल. सर्वांत व्यवस्थित व शिस्तीच्या गंगुताई लेले, रेसिडेन्सीच्या सासूबाई, यांनींही त्यांना सटकावलें. कमळीनें रीतीप्रमाणें "चुकलें, सासूबाई, पुन्हा चहा घेणार नाहीं इ." हात जोडून सांगितलें व ती गोष्ट विसरलीही. मागाहून आमच्या प्रिन्सिपलसाहेबांकडे कोठून तरी ही बातमी गेली व नानासाहेब रागावले. कमळी, मालती सायन्सच्या तासाला गेल्या त्या रीतीप्रमाणें बोलणीं खाऊनच आल्या. पण हें येथेंच न थांबतां चहा न घेणाऱ्या मुलींनाही बोलून घ्यावें लागलें, व आम्ही चहा घेत नाहीं म्हणून सांगितलेलें पुन्हा पटेना! मग मात्र 'झुंडीच्या मानसशास्त्रा'ला सुरवात झाली. 'एर्वी तेर्वी चहा अवेळीं घेतों म्हणतांच ना! मग घेऊं या तरी खरोखर!' असें म्हणून सर्वांनीं एकमतानें रात्रीं दहा वाजतां चहा घ्यावयाचें ठरविलें. मी, दुर्गाताई जोशी, गंगुताई लेले आदि मोठ्या समजल्या जाणाऱ्याही त्यांत समाविष्ट झालों होतों, व एक महिनाभर असा चहा घेतला. पण पुढें नानांनीं तिकडे लक्ष दिलें नाहीं, व त्यामुळें महिन्यानंतर आमचाही रात्रीं चहा घ्यावयाचा उत्साह मावळला.

अशा विद्यार्थिदशेच्या वातावरणांतून निघून एकदम त्यांचेवरच सुपरिंटेन्डेन्ट म्हणून येणें व त्यांना अशा गोष्टी करूं नका म्हणून उपदेश करणें जमावें कसें व परिणामकारक व्हावें कसें ? पण मुलींनींही मला मुद्दाम त्रास देण्यासाठीं म्हणून कांहीं केलें नाहीं व सवावर्षाच्या काळांत माझें म्हणजे सुपरिंटेन्डेटचे व मुलींचे परस्परसंबंध सलोख्याचे राहिले.

मी आजन्मसेवक होण्याच्या आदल्या रात्रीं मुलींनीं मला कॉलेज-च्या गच्चीवर उपाहारास बोलाविलें होतें. आतांपर्यंत आपण सर्व मिळून एकत्र वागलों, शिवाय एकमतानें ऑथॉरिटी ( अधिकारीवर्ग ) बरोबर भांडलों. आतां तुम्ही त्यांच्यांत मिसळून आमच्या सुपरिंटेन्डेन्ट होणार, तेव्हां भांडण क्रमप्राप्त आलें असें त्यांना वाटे. कॉलेज-कवयित्री बनू देशपांडे हिनें त्यांचे वतीनें मला त्या उपाहाराचे *पद्यबद्ध आमंत्रण पाठविलें होतें व त्यांत शेवटच्या सहींत ही भीति व्यक्त केली होती.

---

* प्रिय भगिनी !

बहुदिन झाले तव भेटीला उत्सुक मन नावरे<br>
भेट दे सखे चंद्रिके त्वरें ।<br>
स्वीकारी या निमंत्रणाला पदतल बहु खाजरें<br>
सुचवितें योग शुभद हा बरें ।<br>
चल उचल, अचलपद काय म्हणुनि जाहला ।<br>
वद काय म्हणुनि तव मनश्चंद्र रंगला ।<br>
आनंद मानसीं नसे काय पातला ? ।<br>
ये, ये, परि करि आस मनींची पूर्ण विदीर्ण न बरें ।<br>
मानसीं काल रम्य वावरे ॥ १ ॥<br>
शुक्लपक्ष परि अजुनी देई भेट रजनिपति तिला ।<br>
चंद्रिके भेट देइ भगिनिला ।<br>
चल प्रथम वसतिगृह सोड तुझे, मग निघे ।<br>
ओलांडुनि वृक्षा विद्यागृहिं साखि रिघे ।

[ पुढें चालू

व्यक्तिशः असलेल्या माझ्या परिस्थितीमुळें मी साहजिकच थोडी गंभीर असे व माझ्या पोरकटपणास आपोआप आळा बसे. तरी पण आपण आतां मुलींपैकीं एक नसून वरिष्ठ आहोंत हें मला आठवावें लागे. बरोबरीच्या मुलींनीं केलेला पोरकटपणा मला आवडे. कामाला सुरवात केल्यावर एकदां मी कालव्याचे कांठानें फिरावयास जात होतें. समोर वडाचें झाड कालव्यावर वांकलें असून त्याच्या पारंब्या खालीं हातानें धरण्या येवढ्या वांकल्या होत्या व विद्यालयांतील एक मुलगी त्याला लोंबकळून झोके घेत होती. मला हें आवडलें व थोडा वेळ मी तें

---

तव फिरवि मुखाला वाम हस्तिं मग बघे।
द्वार तुला जें दिसेल करणें प्रवेश त्या मंदिरें।
चालणें तसें पुढें मग बरें ॥ २ ॥
आयुष्याच्या तीन पायऱ्या चढण उतर जरि खरी।
पाहिजे चढलें तुजला तरी।
त्या पहा मनोमय दहा तीन मग सहा, ।
चढ उतार संपे; दिसेल तुजला अहा।
तव भगिनिसमुह छे! चुकलें चुकलें पहा।
आयुष्याच्या भविष्यकाळीं नातें बदलें त्वरें।
जाऊं दे! चर्वितचर्वण पुरे. ॥ ३ ॥
नत भगिनी तव सुगुणशालिनी मुदित अंतरीं करी।
वासना दुजी नसे हो बरी।
सांगतें, थांब, तुज काळ वेळ आमुची।
रात्रिचे नऊ, बहु वेळ सरस इंदुची।
त्वां प्रकटुनि पसरी प्रभा सुमंगल तुझी।
जास्त सांगणें तुला कशाला सुबुद्ध तूं, प्रभुवरें।
अर्पिलें ज्ञान तुला साजिरें ॥ ४ ॥

आपल्या

पूर्वकालीन भगिनी व
भविष्यकालीन XXX

पाहतच उभी राहिलें. पण मग आठवलें, 'अरे! मी बोर्डिंग सुपरिंटेंडेंट आहे! जर ही मुलगी खालीं कालव्यांत पडली अगर कांहीं दुखापत झाली तर त्याची जबाबदारी मजकडे येईल.' —आणि मग तिला रागें भरण्याची मला आठवण झाली!

प्रत्येक मुलगी ही विचारानें वागणारी असणार, तिजमध्यें सत्प्रवृत्ति असणारच, तेव्हां शिक्षा किंवा वाक्ताडन यापेक्षां तिला सूचना दिली तर ती लवकरच उमजते असा माझा विश्वास. मुलींनीं न्हाणींत्यांतला केर काढला नाहीं तर मी स्वतः तो जाऊन काढी. त्या सवावर्षांच्या अनुभवांत मला असें दिसलें कीं, याचा मुलींवर इष्ट परिणाम होतो. परंतु वीस वर्षांच्या अनुभवानें आतां असें उमगलें कीं मनुष्यस्वभावाचे असेही स्वयंभू नमुने सापडतात कीं, 'तुम्ही केर काढतां ना? काढा. माझें तेवढेंच काम कमी झालें!' तेव्हां सरसकट नियम न धरतां त्या त्या व्यक्तीची पारख करून कृति झाली पाहिजे. वारूबाईंची विचारसरणी माझ्याहून थोडीशी भिन्न. जर एकट्या त्याच काम करत्या, अगर एकटी मी काम करतें व इतरांनीं त्यांत लक्ष घातलें नसतें, तर थोड्या अनुभवानें माझ्या 'तत्त्वज्ञानां'त व्यवहारी दृष्टीची, व त्यांच्या व्यवहारी दृष्टींत माझ्या 'तत्त्ज्ञाना'ची, भर पडून दोघींची पद्धति योग्य बिंदूपर्यंत येती व वसतिगृहाचेंही कांहीं नुकसान झालें नसतें. पण मजवर एकटीवर सर्व वसतिगृह सोपविण्याएवढा मजवर बोर्डाचा विश्वास नाहीं, व मला मोकळी ठेवून दोन वर्षें नुसतें शिक्षकाचें काम द्यावें तर तीही तयारी नाहीं. कारण, कोणतीच जबाबदारी नसेल तर शिक्षकाला सवंग लोकप्रियता मिळवितां येते. जबाबदारी असली म्हणजे त्याला आपोआप दोन्ही दृष्टींनीं विचार करावा लागतो. एकंदरींत चोराच्या हातीं जामदारखान्याच्या किल्ल्या सोपविण्याचाच तो प्रकार होता!

समजूतदार मुलींप्रमाणें एका आडमुठ्या स्वभावाचाही अनुभव त्या वेळीं मला आला. बोर्डिंगांत एक मोठी २५।३० वर्षांची परित्यक्ता होती.

शिकावयाला तिला बुद्धि कमी, व इच्छा तर मुळींच नाहीं. नवऱ्यानें दुसरीकडे कोठें ठेवावयाची ती बोर्डिंगांत पाठविली येवढेंच! शिक्षण मराठी दुसरी-तिसरीचें व वय जास्त. तेव्हां स्वाभाविकच वसतिगृहांतील मोठीं म्हणजे जास्त वेळ लागणारीं कामें तिजकडे जात. दर सुटींत सर्व मुली घरीं जात. हिचें जाणें नवऱ्याच्या परवानगीवर, व तो दर सुटींत लिही कीं, 'तिला कोठें न पाठवतां तेथेंच ठेवून घ्या.' ती बिचारी कंटाळली व मला या सुटींत घरीं पाठवाच म्हणून हट्ट धरून बसली. पण आम्हांला तरी पालकाच्या परवानगीशिवाय तिला कसें पाठवितां येईल? समजावून सांगितलेलें कळेना व सुटी सुरू होण्यापूर्वी तीन दिवस, 'मला घरीं पाठवावयाचें कबूल करा तर जेवेन' असें म्हणून अन्नसत्याग्रहास तिनें सुरवात केली. माझी पद्धति अशी असें कीं सर्व मुली जेवल्या कीं नाहीं हें पाहून चौकशी करून मग जेवावयाचें. हिनें उपास केला तेव्हां मलाही जेवणें बरें वाटेना. तेव्हां तीन दिवस ती व तिच्यासाठीं मी उपाशी! चौथ्या दिवशीं १८ एप्रिल रोजीं आण्णांचा वाढदिवस. त्या दिवशीं मात्र दुपारीं तिला बोलावून खूप रागावलें व 'नाहीं जेवलांत तर सक्तीनें सर्वांच्या समोर पंक्तींत नेऊन बसवूं' असें सांगितलें. त्या दिवशीं दुपारीं आम्ही दोघी जेवलों. वारूबाई वगैरे सर्वजण म्हणत, "आम्ही म्हणतों, तुम्ही वाजवीपेक्षां मुलींचें जास्त कौतुक करतां तें हें! असे प्रत्येक मुलीबरोबर का तुम्ही उपास काढणार आहांत?" अर्थात् प्रत्येक मुलीबरोबर असा उपास करणें कठीण जाईल हें खरें; पण वसतिगृहांतील सर्व मुली जेवल्याखेरीज मला जेवण बरें वाटत नसे. हा जास्त भावनेचा प्रश्न होता. असे प्रसंग क्वचित् येतात. वीस सालापासून एकेचाळीस सालपर्यंत माझा मुलींशीं व वसतिगृहाशीं सतत प्रसंग आहे. पण हा सत्याग्रहाचा प्रसंग एकदांच आला.

एकदां खडकवासल्याची ट्रिप काढावयाचें ठरलें. वारूबाई, मी, कांहीं शिक्षक व सुमारें पन्नास मुली सकाळीं चालत तेथें गेलों. दुपारीं पिठलें भात करून जेवावयाचें व संध्याकाळीं परत यावयाचें असा बेत. पिठलें

भात करण्यास फार त्रास पडेल असें वाटल्यावरून तेथें तो बेत रहित केला. बरोबर फराळाचें पुष्कळ नेलें होतें त्यावर फराळ आटोपले व संध्याकाळीं परत आलों. आश्रमाच्या मुली आश्रमांत गेल्या व विद्यालयाच्या मुली विद्यालयांत आल्या. बरोबर सामान नेलेलें होतें तेंच काढून मीं पिठलें भात करावयास सांगितला व आमचीं जेवणें झालीं. पण आश्रमांत दुपारची आमटी उरली होती तिच्यावरच त्यांनीं भागवून पिठलें केलें नाहीं. गोष्ट साधी. पण या ट्रिपची चर्चा आमच्या सभेंत दुसऱ्या दिवशीं तासभर झाली. तक्रार अशी कीं, "कमलाबाई हें असें कांहीं तरी करतात त्यामुळें वारूबाई विनाकारण अप्रिय ठरतात. दुपारची आमटी असतांना ताजें पिठलें करावयाचेंच कशाला ? विद्यालयाच्या मुली म्हणतात, कमलाकाकींनीं आम्हांला ताजें पिठलें वाढलें व त्यामुळें आश्रमाच्या मुलींना वाटतें कीं आमचे मात्र हाल होतात. वारूबाईंची दृष्टि काटकसरीची तर कमलाबाईंची उधळेपणाची व सवंग लोकप्रियता मिळविण्याची." मी म्हणे, " आधीं यांत काय बिघडलें तें मला कळत नाहीं. मुली दमून आलेल्या त्यांना ताजें जेवण मिळालें तर त्यांत सवंग लोकप्रियता कसली ? दुपारीं त्यांना रानांत जेवण हवें होतें. पण आपण फराळावर उरकलें म्हणून घरीं आल्यावर ताजें जेवण घातलें यांत त्यांची मनधरणी कसली ? आणि मुली झाल्या म्हणून त्यांच्या मनाप्रमाणें करावयाचेंच नाहीं, तरच ती शिस्त राखली जाते, हें कसें तें मला कळत नाहीं. तेथें स्वयंपाक झाला असता म्हणजे ते तांदूळ व पीठ खर्च झालेंच असतें ना ! यांत उधळपट्टी कसली ? मला सुचलें तें मीं केलें. वारूबाईंनीं पिठलें कां केलें नाहीं असें मी विचारीत नाहीं. इतका फरक राहणारच." नाना म्हणत, 'जें काय कराल तें दोघी एका धोरणानें करा व आधीं विचारविनिमय करा.' विचारविनिमय करा हें ठीक, पण त्यासाठीं मींच वारूबाईंना विचारलें पाहिजे अशी थोडीशी सुप्त अपेक्षा. हेंही मीं मान्य केलें असतें. कारण एक वर्षानें त्या जास्त अनुभवी. पण मुलगी विचारावयाला आली, 'काय करावयाचा

स्वयंपाक' तर तिला सांगावयाच्या ऐवजीं धावत आधीं वारूबाईच्याकडे गेलें पाहिजे कीं काय हें मला कळत नसे. या बाबतींत व्यक्तीचा निर्णय वेगळा पडूं शकेल, व इतका फरक दोन स्वभावांत राहणारच. मी म्हणे कीं यापेक्षां मला दुय्यम नेमलें असतें म्हणजे प्रश्न नव्हता. सहव्यवस्थापिकांची कारकीर्द दोघींची विचारसरणी अगदीं एक असेल तरच यशस्वी व्हावयाची. शेवटीं खूपशी चर्चा खडाजंगी वगैरे होऊन बहुमत असें कीं, जरासें कमलाबाईंचेंच चुकलें. 'फुटलेलें चित्र मनीचें!' अशा सभा झाल्या म्हणजे मी त्या वेळीं अगदीं त्रासून जाई. तोंडावर तो त्रास पुष्कळदां दिसे. दुर्गाताई मला म्हणावयाच्या, "या सूनबाई! नांव बोर्डिंग सुपरिंटेंडेंट पण भूमिका सुनेची तुमची." पण बहुमतानें ठरेल तें ठरेल. त्याला कोणाचाच उपाय नव्हता!

काकू–पार्वतीबाई गाडगीळ–या, या वेळीं माझे हाताखालीं एक वर्ष मेट्रन म्हणून होत्या. जेवणाचा बेत चांगला ठेवणें, मुलींना हवें नको बघणें, व एकंदरींत मुलींना जेवणाखाण्याचे बाबतींत संतुष्ट ठेवणें, यांत त्यांचा हातखंडा असे. माझेपूर्वीं मावशी— सीताबाई जोशी— तेथें होत्या त्याही मुलींची खाण्यापिण्याच्या बाबतींत चांगली काळजी घेत असत. एकदां कांहीं सण आला. उभयतांच्या विचारानें आश्रमांत व विद्यालयांत दोन्हीकडे एकच पक्वान्न म्हणजे श्रीखंड करावयाचें ठरलें. दूध किती घ्यावयाचें? मागच्या श्रीखंडाच्या वेळीं किती घेतलें होतें तें पाहिलें, काकूंच्या सल्ल्यानें दूध आणविलें, आणि सण पार पडला. दुसऱ्या दिवशीं नाना मला सांगायला आले कीं, "कमलाबाई, हें तुमचें चुकतें. तुमच्याकडे श्रीखंड जास्त झालें, दुसऱ्या दिवसाला उरलें. मुलींना वाटतें विद्यालयांत श्रीखंड भरपूर मिळतें व त्यामुळें आश्रमाच्या व्यवस्थेला कमीपणा येतो. ही उधळपट्टी होते." मी म्हणे, "मला शंभर-एकशेंदहा मुलींच्या स्वयंपाकाच्या शिध्याची अजून कल्पना नाहीं. मागचे हिशेब पाहिले व काकूंचा सल्ला घेतला. त्यांतूनही उरलें त्याला काय करणार? टाकून नाहीं ना दिलें? मुलींनाच

वाढलें." "पण हें तुम्ही दोघींनीं ठरवावयाला हवें होतें. इत्यादि" नानांचें उत्तर.

या सर्वांमुळें मी कंटाळलें. तरी मुद्दाम कोणी मला त्रास देत आहे असें वाटत नसे. त्यांची आमची विचारसरणीच भिन्न व "Well friends! we are all brothers, but I'll be the eldest." या न्यायानें दोघी बहिणी बहिणी खऱ्या, पण वारूबाई वडील बहीण ही सर्वांची दृष्टि. याखेरीज पुढें ज्या एकदोन गोष्टी घडल्या त्या मात्र माझे मनाला लागल्या. आणि सहकार्यकारी मंडळींत नुसती विचार-भिन्नता आहे इतकेंच नव्हे, तर जेवढी सहानुभूति आवश्यक, तेवढी नाहीं हें दिसून आलें. आणि प्रथम वाटत असलेली भीति थोडीशी खरी ठरली. आश्रमाच्या कामाबद्दल माझी महत्त्वाकांक्षा व हौस कमी झाली, आणि येईल तें काम करावें व उरलेला वेळ वारज्याची शाळा वगैरे साक्षरताप्रसाराचे कामीं खर्च करावा, असे विचार मनांत येऊं लागले. आणि प्रथम एम्. ए. व्हावें म्हणून मीं एक वर्षाची बिनपगारी रजा घेतली.

वर्षाच्या सुट्या दोन. कोणी तरी जबाबदार मनुष्य वसतिगृहांत हजर पाहिजे. कारण दहाबारा मुली सुटींत तेथें राहत. तेव्हां साहजिकच एका सुटींत मी व एका सुटींत वारूबाईनीं राहावयाचें ठरलें. एका सुटींत राहण्याची पाळी माझ्यावर आली. श्रीधर या वेळीं पुण्याहून नुकताच सातारला शाळेसाठीं राहावयास गेला होता, व म्हणून सहा महिन्यांनंतर सुटींत तो पुण्यास आल्यावर मीं त्याला हिंगण्यास घेऊन गेलें. पण सुटींत त्याला तेथें करमेना. त्याला ताईही हवी व आक्काही हवी. म्हणून पुण्यास घरीं पोंचविला. तो म्हणे, "आक्का तूं घरीं रहा." ताई व तात्या म्हणत, "एकीकडे शाळेला सुट्टी आहे म्हणतेस व एकीकडे काम आहे म्हणतेस हें कसें? तो जर एवढा काकुळती येऊन म्हणतो तर राहत कां नाहींस. तुझें थोडें काम दुसरें कोणी पाहणार नाहीं का?" सीताबाई,

गंगूबाई, नाना वगैरे सर्व मंडळी सुटींत तेथेंच राहत असत. तेव्हां सीताबाईंना मी म्हणे, "मी गांवांत गेलें तर तुम्ही पाहाल जरा बोर्डिंगकडे?" प्रत्यक्ष काम करावयाचें कांहींच नसे पण तेथें असणें हेंच काम होतें. आणि अशा तऱ्हेनें एक दिवस हिंगण्यास व एक दिवस गांवांत असा मी घालवी. 'सह अनुभूति' नसली तरी 'सहानुभूति' असती तर यांत न कळण्याजोगें अगर ओझें वाटण्याजोगें कांहींच नव्हतें; पण तिचाच अभाव! याचा परिणाम असा झाला कीं, "कमलाबाईंचें कामांत लक्ष नाहीं. त्यांना बोर्डिंगसारखीं कामें आवडत नाहींत." पुढें आण्णांनीं एक दिवशीं स्पष्ट सांगितलें कीं, "त्यांचें कांहीं बोर्डिंगच्या कामांत लक्ष नाहीं तेव्हां त्यांना आपलें व्याख्यानाचें जें काय आवडेल तें काम द्या." दुसऱ्या दिवशीं मी हिंगण्यास आल्यावर बनुताईंनीं मला हें सांगून तुम्ही गांवांत जाणें कमी करा अशी सूचना केली. मी बोर्डिंगचें काम करूं लागल्यापासून आण्णा हिंगण्यास आलेच नव्हते व आले तेव्हां बोर्डिंग बंद. तेव्हां आण्णांचें असें मत झालें कसें हें मला कळेना. पण सगळ्याचा सारांश काढून मीं ठरविलें कीं माझ्या मुलासाठीं म्हणून का होईना या मंडळीकडे शब्द टाकावयाचा नाहीं. ही सेवा नव्हे नोकरी आहे! मौज अशी कीं, मनांत विचार ठरविला नाहीं तोंच त्याची प्रचीति पाहावयाची वेळ आली! व्यवस्थापक मंडळाचे सभेसाठीं गांवांत आलें व घरीं निरोप सांगावयास गेलें तों ताई म्हणाली, "सातारचें पत्र आलें आहे. श्रीधर सातारच्या मुलांबरोबर उद्यां सकाळीं जावयाचा आहे. तूं आतां रहा." राहावयाचें म्हणजे पुन्हा स्वतःचें काम दुसऱ्या कोणावर सोपवावयाचा प्रसंग. शेवटीं मन घट्ट केलें व श्रीधरला व ताईला 'मला काम आहे वेळ नाहीं' असें थोड्या शब्दांत सांगून, मागें वळूनही न पाहतां, वारूबाईंचे बरोबर हिंगण्यास निघून आलें. दुसऱ्या दिवशीं लक्ष्मीकांकी संध्याकाळीं मला म्हणाल्या, 'तुम्हीं घरीं जाऊन काल असा तिरसटपणा कां केलांत? श्रीधरची फार निराशा झाली. तात्यांनाही चमत्कारिक वाटलें. ते विनोदानें

श्रीधरला म्हणाले, "काय चिरंजीव! आई राहिलीसुद्धां नाहीं ना तूं उद्यां जाणार म्हणून?" त्याबरोबर त्याला रडूं येऊन तो ओक्साबोक्शीं रडला, त्यामुळें ताईही रडल्या व सर्वांनाच वाईट वाटले. मग मात्र आतांपर्यंत निश्चयाच्या दडपणाखालीं लपलेलें माझें दुःख उसळून आलें व तीन दिवस माझें डोळ्यांचें पाणी खळलें नाहीं. श्रीधरला दूर ठेवावयाची मला प्रथमपासून सवय होती. त्या नंतरही तो दूर राहिला. तो इंग्लंडला जाऊन आला व मीही परदेशीं जाऊन आलें. पण या प्रसंगाचा– म्हणजे तो 'राहा' म्हणत असतां 'नाहीं' म्हणून एकदम पाठ फिरवून चालूं लागलें त्या प्रसंगाचा— असा कांहीं ठसा मनावर उठला आहे, कीं आजही ती आठवण झाली तरी डोळ्यांना पाणी आल्याखेरीज राहत नाहीं!

## [ प्रस्तुत प्रकरणीं निवडक पत्रें. ]

ता. १९-१०-२१ च्या पत्रांत ती. मामंजी लिहितात:

चि. कमलाबाईस,

सप्रेम आशीर्वाद. तुझें कार्ड काल पोंहोचलें. तसेंच तुझें मागें एक पत्र आलें होतें तेंही पोंहोचलें. इकडील सर्व हकिगत चि. वाग्भटकडून कळते म्हणून मी स्वतः पत्र लिहिण्याचा आळस केला. मी तरी बहुतेक दुसऱ्याकडून पत्रें लिहवितों. तुम्ही संस्थेचे कार्यकारी मंडळींत असलेमुळें यंदा दिपवाळीचे सुटींत तुला कोठें जातां येत नाहीं याबद्दल मनाला बरें वाटत नाहीं. आतां तुम्ही आमचे नसून संस्थेचे आहांत. असो, हेंही एक बघण्यासारखें नवलच आहे. आतां तुम्हांस आमच्यापाशीं कोणच्याही सुट्टींत राहावयास सांपडणार नाहीं, हाही एक योगच आहे. तुम्हीं जें काम पत्करलें आहे त्यांत तुम्हांला यश व कीर्ति मिळावी. तुम्ही लोकप्रिय होऊन आपलें कर्तव्य दक्षतेनें करीत आहां हें ऐकण्यांत एक प्रकारचें सुखच आहे. आपलें कर्तव्य करीत असतां श्रीहरीला मात्र विसरूं नये. कर्तव्यदक्षता हीच श्रीहरीची सेवा आहे.

तथापि, मनुष्यप्राणी जसा एकदेशीय आहे, तशाच एकदेशीयत्वानें त्या श्रीहरीच्या व्यापक स्वरूपाला भजलें पाहिजे. असो, या गूढ परमार्थ-तत्त्वांत शिरून फारसा उपयोग तुम्हांस वाटणार नाहीं.

चि. श्रीधरची प्रकृति चांगली असून चि. राजा व तो मिळून एकीनें वागतात व अभ्यासही बरा करतात. आनंदांत आहेत. तुमच्या गॅदरिंग्करतां त्याला पुण्यास पाठवितां येत नाहीं; कारण त्याची सहामाही परीक्षा पांचचार दिवसांनीं सुरू होणार आहे. ती झाल्यावर दिपवाळीची सुट्टी मिळेल. चि. दादा व पंडित हे सुटींत आकोल्यास जाणार आहेत. तेव्हां त्यांचेबरोबर चि. श्रीधरला पुण्यास पाठवूं. ते आकोल्याहून परत येतील तेव्हां त्यांचेबरोबर त्याला परत पाठवावें. चि. बनूताई व सर्व मुली यांना माझा सप्रेम आशीर्वाद.

## कन्याशाळा भाग पहिला : : १

### पार्श्वभूमि

काय मीं पुण्य केलं । भ्रात्रासारखे ते दीर ।
कमळीं रघुवीर । पूजियेला ।
काय मीं पुण्य केलं । आईसारख्या सासूबाई ।
कमळीं आंबाबाई । पूजियेली ।

लहानपणीं झोपाळ्यावर बसून ओव्या म्हणतांना अनेक वेळां वरील ओव्या इतरांनीं म्हटलेल्या ऐकल्या असतील, स्वतःही म्हटल्या असतील. पण कन्याशाळेच्या स्थापनेचे वेळची परिस्थिति आठवून लिहितांना त्या जितक्या सार्थ वाटत आहेत तितक्या फारच थोड्या वेळीं वाटल्या असतील. सातारची कन्याशाळा पुढाकार घेऊन नुसत्या उत्साहाच्या जोरावर काढावयास मी सिद्ध झालें. पण त्या उत्साहाच्या पाठीमागें येणारा विश्वास ज्यांच्या मदतीवर होता तीं माणसें दुर्दैवानें आज राहिलीं नाहींत. त्यांच्याबद्दल बोललेला चांगला शब्दही त्यांना कळणार नाहीं. —स्वर्गीं गेलीं व सोन्याचीं झालीं!

देशपांड्यांचें घर चाळीस वर्षांपूर्वीं साताऱ्यांत सुधारकांमध्यें गणलें

जाई. मामंजी हे रानडे, गोखले यांचेबद्दल आदर बाळगणारे, सोवळें म्हणजे स्वच्छता म्हणणारे, व स्वतः ओवळ्यानें जेवणारे. स्त्रियांना शिकवावें म्हणणारे व सुनांना घरीं मास्तर ठेवून मराठी पांच इयत्तांपर्यंत शिकवणारे. पण यामुळें आमचें घर भलतेंच सुधारक समजलें जाई. सासूबाई नवीन सर्व वातावरणांत सामावलेल्या पण मनानें त्याहून जुन्या. त्या स्वतः कधीं ओवळ्यानें जेवल्या नाहींत, कीं घरांतील धार्मिक कृत्यें कसोशीनें करण्यांत त्यांनीं कधीं उणें पडूं दिलें नाहीं. त्यांचा मुख्य गुण सहनशीलपणा. मामंजींचा रागीट व करारी स्वभाव आणि यांचा सहनशीलपणा—अशी जोड जमल्यानें घरांत जम चांगला बसून सर्वांना सुख लागे. तरी पण स्त्रीशिक्षण वगैरे बाबतींत त्यांचीं मतें जुनींच. त्यांच्या सासूबाईंची— म्हणजे माझ्या आजे-सासूबाईंची—एक गोष्ट त्या सांगत. पंढरपुरांत राहत असतां खाजगीवाले यांचे घरीं कै. रमाबाई रानडे यांना एकदां जेवावयास बोलाविलें होतें. खाजगीवाले व देशपांडे कुटुंबाचा घरोबा फार, त्यामुळें रमाबाईंचे पंक्तीला देशपांडे यांच्या घरच्या सासुरवाशिणी स्त्रियांना आमंत्रण आलें. पण रानडे मंडळींच्या सुधारकपणाची प्रसिद्धि. तेव्हां आजेसासूबाईंनीं सांगितलें कीं, "हें पहा बाई! तुम्ही हवें तर रमाबाईला जेवणास बोलवा. पण त्या उलटा अंबाडा घालून येणाऱ्या बाईच्या पंक्तीला माझ्या सुना येणार नाहींत." लहान मुलांनीं भातकुली करण्यासाठीं खेळण-पीठ मागितलें व सुनांनीं सासूबाईंना न विचारतां पसापसा तांदूळ व एक एक पैसा दिला. आजेसासूबाई संध्याकाळीं देवाहून येतात तों वाड्यांतील सर्व मुलें अंगणांत झाडाखालीं जेवावयास बसून अंगतपंगत चाललेली! जेवणें उरकलीं. पण आपल्या नातवंडांना वर्गणी दिली कुणी याची चौकशी करतां सुनांनीं दिली असें कळलें. त्यांच्या तापट स्वभावाला ही भलतीच अमर्यादा वाटली.

"स्वतंत्रपणें कारभार करतां? सासू काय मेली होती?" असा प्रश्न विचारून त्यांनीं सासूबाईंना, धाकट्या तीन नातवांना घेऊन घरा-

बाहेर जावयाला सांगितलें. दिवे लागण्याचे सुमारास नानासाहेब खासगीवाले घरीं येतात तों सत्यभामा मुलांसह दिंडी दरवाजांत उभी. त्यांनीं चौकशी करून सुनेला आधीं घरांत नेलें व आजेसासूबाईंना रागावून सांगितलें कीं, "माई, हा काय प्रकार! गोष्ट कसली व शिक्षा केवढी! आधीं सुनेला घरांत घ्या पाहूं?"

अशा जुन्या विचारांत व जुन्या शिस्तींत वाढल्यामुळें सासूबाई सहनशील व शांत बनल्या. पण विचारांची घडण अस्सल जुनीच राहिली तर नवल कसलें? पहिल्या तीन सुनांना घरीं मास्तर ठेवून मराठी शिकविलें. येथपर्यंत त्यांचे मतें ठीक झालें. पण पुढच्या दोन सुनांचे वेळीं—म्हणजे मी व शांताबाई यांचे वेळीं—आम्हांस शाळेंत पाठविण्याचें ठरलें तेव्हां त्यांना तें थेरच वाटलें. परंतु थोरल्या मामंजीच्या संमतीनें आम्हांस शाळेंत पाठविण्याचें ठरलें त्यामुळें त्यांचें मत मागें पडलें.

मामंजींना सुनांस मराठी चांगलें यावें, इंग्लिशही आलें तर हवेंच, अशी हौस. पण त्यासाठीं लग्नानंतरही सुनांस शाळेंत पाठवून मॅट्रिकपर्यंत नेणें विशेष पटत नव्हतें. पितापुत्रांत यामुळें तीव्र मतभेद होऊन थोडी रागवा-रागवीही झाली. तरी कशीं तरी दोन वर्षें आमचीं हुजुरपागेंत पार पडलीं व मी इंग्लिश पांचवींत गेलें.

प्रथम जरी मामंजींना हें शिक्षण फारसें पटलें नव्हतें तरी मागाहून मात्र त्यांनीं माझ्या शिक्षणास पूर्ण पाठिंबा दिला. त्यांचा स्वभाव निश्चयी तर होताच, पण त्यांत आणखी पुत्रशोकाची भर पडून त्या निश्चयाला व्रताचें स्वरूप आलें. आणि त्यांनीं एखादें व्रत पुरें करावें त्याप्रमाणें माझ्या शिक्षणाकडे लक्ष पुरविलें. एकदां त्यांनीं मला सांगितलें कीं, 'मी तुला आपला मुलगा समजतों' व त्याप्रमाणें त्यांनीं शेवटपर्यंत मानलें.

मी सातारला जातांच तेथील अमेरिकन मिशनच्या स्त्रियांस बोलावून त्यांचेकडून आठवड्यांतून दोनदां मला इंग्लिश शिकवावयाची

त्यांनीं सोय केली. त्याप्रमाणें मिसेस हिवाळे येत. मिस् पेन यांचे, जवळ माझ्या पांचव्या रीडरला सुरवात झाली. ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्यें नवीन वर्षाच्या अभ्यासक्रमास सुरवात व्हावयाची होती. श्रीधरही आतां नऊ महिन्यांचा झाला होता व चार तास आई नसतांना त्याला संभाळणें शक्य झालें होतें. मामंजींनीं त्यावेळीं मला विचारलें, "कमला, तूं येथील न्यू स्कूलमध्यें जाशील का? म्हणजे मुलास येवढ्यांत परगांवीं आमचेपासून दूर पाठवावयास नको."

मींही होकार दिला व माझें शाळेंत जावयाचें निश्चित झालें. मामंजींनीं एकदां एक गोष्ट ठरविल्यावर पुढें बोलण्याची कोणाचीच प्राज्ञा नसे. सासूबाई कांहींच बोलल्या नव्हत्या पण त्यांना हें पसंत नव्हतें असें मला मागाहून दिसलें. "मुलांच्या शाळेंत जावयाचें त्यापेक्षां तूं पुण्यास राहून मुलींच्या शाळेंत कां जात नाहींस?" येवढेंच मला त्या एकदां म्हणाल्या. स्त्रियांनीं शाळेंत जाणें नापसंत, त्यांतून नवविधवा लहान वयाची सून मुलांच्या शाळेंत जाणें व लहान मुलास संभाळण्याचीं जबाबदारी सासूवर पडणें, या सर्वच गोष्टी त्या काळीं सातारा शहरांत अभूतपूर्व व म्हणून खळबळ उडविणाऱ्या होत्या. साताऱ्च्या न्यू इंग्लिश स्कूलचे संस्थापक देवधर यांच्या कन्या सखूबाई देवधर यापुढें १९१७ सालीं मॅट्रिक झाल्या. सातारा शहरांत ही पहिली मॅट्रिक झालेली मुलगी. या गोष्टींचें लोकांना येवढें महत्त्व वाटलें कीं, सातारा शहरवासीयांची जाहीर सभा भरून कु. सखूबाई देवधर यांचें अभिनंदन करण्यांत आलें. पण १९१४ सालीं माझें शाळेंत जाणें त्या वेळीं लोकांना जास्तच चमत्कारिक वाटावें यांत आश्चर्य नाहीं. भोंवतालच्या वातावरणांतून या वाटण्याचे पडसाद पुष्कळदां माझे कानीं येत. आणि आपण करतों तें बरोबर आहे ना? असा मला प्रश्न पडे.

प्लेगचे दिवस. आम्ही वकीलवाडींत राहत होतों. संध्याकाळीं मुलांचीं जेवणें होऊन उष्टीं काढावयाच्या नादांत मी होतें तों सासूबाईंनीं ताटें घासावयास घेतलीं. आमच्या स्वयंपाकाच्या बाई मैना-

बाई घाईघाईनें तेथें गेल्या व त्यांचे हातचीं भांडीं घेऊन म्हणाल्या, " काकी, आम्ही असतांना तुम्ही कां हीं कामें करतां ?"

" मैनाबाई, तुम्ही उद्यां जाल. हीं कामें मला नेहमींच करावीं लागतील. सुना असल्या तरी त्यांचा मला काय उपयोग! दुपारीं शाळेंत जातील. सकाळीं माडीवर जाऊन अभ्यास म्हणून पुस्तकें वाचीत बसतील! तेव्हां माझें काम थोडेंच चुकणार आहे ! " माझ्या शाळेला अजून सुरवात व्हावयाचीच होती, पण त्या शाळेबद्दल्ची नापसंती अशी व्यक्त होत होती. या सर्व गोष्टी मी ऐकत होतेंच. मींही मनांत योजिलें कीं, " पाहूं या; घरांतील कामाचा भार त्यांचेवर जास्त न पाडतां शाळेंत जाऊन शिकतां येतें का तें ! " बोललें मात्र कांहींच नाहीं. माझा एकच नियम होता, कीं काम भरपूर करावयाचें; पण बरें-वाईट, उलट-सुलट कांहींच बोलावयाचें नाहीं. पांच मिनिटें मिळालीं तरी अभ्यासांत घालवावयाचीं, व शाळेंत शिकणें या एका गोष्टीखेरीज इतर कोणत्याही बाबतींत त्यांचे मनाविरुद्ध जावयाचें नाहीं. त्यामुळेंच पंचवीस माणसांचे कुटुंबांत माझे दिवस निघाले. असो !

माझा मूळ स्वभाव असा, कीं स्वतःला एकादी गोष्ट खरी वाटली म्हणजे ती दुसऱ्याला तशी वाटेपर्यंत स्वतःला चैन पडावयाचें नाहीं. या माझ्या स्वभावाचा त्रास मी माहेरीं ताईला फार दिला. तिला मी सर्व जुन्या कल्पनांचें प्रतीक समजत असे; व मला न आवडणारी अशी कोणतीही गोष्ट जुन्या सनातनी वळणांत घडलेली घरीं दिसली कीं, त्याचा राग मी ताईवर काढी. कोठें एकाद्या घरांत बालविधवा सून सोवळी झालेली व इतर वयातीत धर्मनिष्ठ म्हणविणाऱ्या पुरुषानें लहान मुलीशीं केलेलें दुसरें लग्न पाहिलें कीं, माझें डोकें फिरे. आणि इतरही अशा अनेक गोष्टी दिसल्या कीं, " हा तुमचा धर्म ! " म्हणून मला आलेला राग मी ताईवर काढीत असे. ताईही मला सर्व नव्या कल्पनांचें प्रतीक मानी, आणि कोठें एकादा पुनर्विवाह, आन्तर्जातीय

अगर आन्तर्धर्मीय विवाह, किंवा इतर कांहीं तिचे मतानें स्पृहणीय नसणारी सुधारणा ऐकूं आली म्हणजे 'ही तुमची सुधारणा!' असें म्हणून तिला आलेला राग ती मजपुढें बोलून ओकून टाकी. हल्लीं या सर्व गोष्टींबद्दल पूर्वींप्रमाणें मीं स्वतःचा संताप करून घेणें सोडलें आहे. पूर्वीं असें वाटे कीं, एवढ्या सुधारणा झाल्या कीं जगांतील सौख्यांत एकदम भर पडून मानवजातीचें दुःख खास कमी होईल. या गोष्टीही आतां कमी झाल्या. शिवाय या गोष्टी गेल्या तरी नवीन घटना निर्माण होतात, त्यांतून नवीन दुःखें उद्भवतात, व एकंदरींत बेरीज-वजाबाकी होऊन जगांतील सौख्याचें प्रमाण तेंच राहतें असें वाटतें! ताई आतां पूर्वीपेक्षां जास्तच उदारमतवादी बनली आहे. तिनें स्वतः जुनेपणा सोडला नाहीं तरी इतरांच्या सुधारकपणाकडे ती सहानुभूतीनें पाहूं शकते. कुंकू लावणारी विधवा आली तरीही तिला घरांत घेऊन तिच्याशीं सहानुभूतीनें ती वागेल, व कोणाही माणसाला– विशेषतः ज्याचा कमी पक्ष आहे अशाला– संभाळून घेणें हा तर तिचा स्वभावच आहे.

पण ताईप्रमाणें माझें प्रत्येक मत पटावेंच अशी सासूबाईंचे बाबतींत माझी अपेक्षा नव्हती; व ज्या स्वभावाचीं सासरचीं माणसें भेटतील त्यांच्याशीं जमवून घेण्याच्या बुद्धीनेंच मी वागत असे. त्यामुळें ताई-सारखा त्रास मीं सासरच्या मंडळींना दिला नाहीं व स्वतःलाही करून घेतला नाहीं. पण परमतसहिष्णुतेचा प्रत्यक्ष पाठ मला या सासूबाईंच्या वागणुकींत मिळाला. माझी शाळा ही त्यांच्या अत्यंत मनाविरुद्ध घड-लेली गोष्ट होती. "मामंजींची सहानुभूति असली तरी ते माडीवर. चोवीस तास कामाकाजांत सारखा सासूबाईंचा व माझाच प्रसंग. जर त्यांनीं आदळआपट केली असती, घालून-पाडून बोलल्या असत्या, अगर अबोला धरत्या, तर प्रत्येक वेळीं मला मामंजींची मदत थोडीच मिळाली असती. पण वर उद्धृत केलेल्या एका उद्गाराखेरीज त्यांनीं आपली नापसंती केव्हांही दाखविली नाहीं. मींही 'त्यांचें मत बदलीन तेव्हांच

राहीन' अशा सुप्त निश्चयानें सुरवात केली होती व साताऱ्याहूनच मॅट्रिक व्हावयाचें मनांत ठरविलें होतें. वर्षाचे शेवटीं सासूबाईंनीं आपण होऊन बोलून दाखविलें कीं, "कमल शाळेंत गेली खरी, तरी पण तिनें घरकामांत कांहीही कमी पडूं दिलें नाहीं. वरकाम व संध्याकाळच्या स्वयंपाकासह सर्व तिनें संभाळलें."

वार्षिक परीक्षेंत मी चांगल्या तऱ्हेनें पास होऊन इंग्लिश सहावींतही गेलें. पण मामंजी, वाग्भट व तात्या सर्वांनीं विचार करून ठरविलें कीं, मी पुण्यास माहेरीं राहून शाळेंत जावें हेंच बरें. कारण, सासूनें किती जरी सांगितलें तरी सासूवर काम टाकून अभ्यास करणें होणार नाहीं. त्यापेक्षां आईवर काम टाकून मुलगी जास्त मनमोकळेपणानें अभ्यास करील. वरच्या इयत्तांचा अभ्यासही जास्त, तेव्हां पुण्यास माहेरीं राहून हुजुरपागेंत जावें हेंच श्रेयस्कर. सासूबाईंनीं मनमोकळेपणें आपलें मत बोलून दाखविलें होतें त्यामुळें माझा निश्चयही फलद्रूप झालाच होता. तेव्हां भरपूर अभ्यास करण्याची हौस पुरविण्यासाठीं मी श्रीधरसह पुण्यास आलें.

उन्हाळ्याचे सुटींत थोरले भाऊजी वऱ्हाडांतून येत आणि त्यांना भेटण्यासाठीं म्हणून बाकीची सर्व मंडळी जमत. मे महिनाभर एक कौटुंबिक संमेलनच भरे. भाऊजींचा स्वभाव विनोदी व लहानथोर सर्वांत मिसळण्याचा. त्यामुळें सर्व घर जणूं महिनाभर हसत असे. दररोज कोणाची तरी एकाची पाळी येई व सर्वजण त्याच्यापाठीमागें लागत. मोठें मनुष्य असल्यास चिडेपर्यंत व लहान असल्यास रडेपर्यंत ही चर्चा चालावयाची. एके दिवशीं कांहीं* कारणावरून सासवा-

---

* एकदां आमचे एक आप्त– आतेदीर– शास्त्रीबुवा महाबळेश्वरकर कांहीं कारणानें घरून रागावून आले होते व सासूबाईंना त्यांनीं सांगितलें होतें कीं, "मामी, सासवा तेवढ्या वाईट. सगळ्या सासवांना अंदमान बेटांत पाठवून दिलें पाहिजे." [ पुढील पानावर

सुनांचें भांडण हा सनातन विषय चर्चेला निघाला. रात्रीं सर्व मंडळी जेवावयास बसली होती. आई म्हणून किती चांगली असली तरी सासू म्हणून ती वाईट कां ठरते याची चर्चा सुरू झाली. स्वाभाविकपणें सासवांची बाजू सासूबाईंनीं घेतली व बाकी सर्वांनीं सुनांची बाजू घेतली.

" असं होतं खरं; पण कां व्हावं कळत नाहीं ! " मामंजी मुद्दामच म्हणाले, " सासवांच्या बाबतींत सुनांची अढी कां येते ? मी आतां इतका तापट आहे ना ? रागावतोंही सुनांवर. पण माझी खात्री आहे कीं, साऱ्या सुना माझ्यावर खूष आहेत. आतां ही सुशिलाच घ्या. नुकती लग्न होऊन घरीं आली आहे ना ! पण मी सांगतों, माझ्यावर ती संतुष्ट आहे."

या भाषणामुळें तर सासूबाईंचा पक्ष जास्तच रोडावला व समर्थनाचा सर्व भर त्यांचे एकट्यावरच पडला.

" नसतील खूष तर काय झालं ! " भात वाढतांना त्या जरा रागावून म्हणाल्या, " तुम्ही दिवसांतून दोनदां माडी उतरणार. सून समोर दिसली कीं विचारणार, जेवलीस का, खाल्लंस का, डोकं दुखतं का ? पण चोवीस तास त्यांना वागवून घ्यावं लागतं सासवांना. भांड्याला भांडं लागणारच ! आम्ही तुमच्याजवळ किरकोळ तक्रारी सांगत बसत नाहीं म्हणून ! सासू मध्यें असते वाईटपणाला म्हणून सासरा चांगला. 'मधें आहे लोड तर तुम्ही आम्ही गोड' व 'मधें नाहीं लोड तर रोजची माराझोड'."

---

याला उत्तर देण्याची सासूबाई वाटच पाहत होत्या. कांहीं दिवसांनीं आपल्या मुलाचें लग्न ठरविल्याचें ते सांगावयास आले. तेव्हां त्या म्हणाल्या, " लग्न ठरलं हो. पण मुहूर्त ठरवावयाचे आधीं अंदमानची बोट केव्हां निघते तें पाहिलंत का ? कारण तुमची बायको आतां सासू होणार, तेव्हां तिलाही अंदमानांत पाठविलें पाहिजे."

व्यक्तिशः माझ्या घरकामाबद्दल जरी सासूबाईंनीं समाधान दर्शविलें तरी एकंदरींत स्त्रीशिक्षण व त्याची उपयुक्तता त्यांना पुष्कळ दिवस पटत नसे. माझ्या शाळेंत जाण्याचा प्रश्न निघाला तेव्हां त्या पुष्कळ रडल्या. आतां हिला शिकून काय करावयाचें आहे? तिचे दीर काय तिला अन्नवस्त्राला कमी करतील काय, असें त्यांना वाटे. कारण स्त्रीनें शिकून स्वावलंबी होणें, नोकरी करणें, म्हणजे घरांतील इतर कर्त्या- माणसांना एक प्रकारचा कमीपणा आहे असें त्यांना वाटे. पण मामंजींनीं त्यांची समजूत घातली.

माझी मॅट्रिकची परीक्षा झाली. संध्याकाळीं परीक्षेच्या तारेची वाट पाहत होतों आम्ही. उन्हाळ्याच्या सुटींत सातारला घरांतील सर्व मंडळी जमली होती. वाग्भटांचा उत्साह माझ्या शिक्षणाच्या बाबतींत फार दांडगा. संध्याकाळीं ते मित्रासह (रा. टेंबे) फिरावयास गेले होते. "आज आमच्या कमलावहिनींच्या परीक्षेचा निकाल आहे. तुम्हांस पेढे देतों" असें सांगून रा. टेंबे यांना घेऊन ते घरीं आले व सासू- बाईंच्याकडे पेढ्यांची मागणी केली. पण त्या वेळीं कांहीं कारण सांगून पेढे आणण्याचा प्रश्न त्यांनीं दूर ढकलला. रात्रीं पुन्हा मोठ्या मंडळींत पेढ्यांचा प्रश्न निघाला. मामंजी म्हणाले, "अहो, पेढे आणवा कीं. परीक्षेस बसलेला तिचा भाऊ नापास झाला म्हणून हिचे पेढे का आणावयाचे नाहींत? बापू— तिचा भाऊ—जिवावरच्या दुखण्यांतून उठून परीक्षेच्या हॉलमध्यें जाण्याएवढा बरा झाला यांतच पेढे आले. तो नापास झाला याबद्दल वाईट वाटण्याचें कारण नाहीं. पुढील वर्षी तो पास होईल.

पण आतां माल खरें कारण सासूबाईंनीं सांगितलें. त्या म्हणाल्या, "बापू गेला म्हणून हिचें शिक्षण व ही परीक्षा! मग काय तो गेला म्हणून पेढे आणूं?" या उत्तरामुळें पेढ्यांचा प्रश्न सर्वांनीं सोडून दिला व ती मॅट्रिकची परीक्षा पेढ्याशिवायच झाली. पुढील वर्षीं माझ्या प्रथम वर्षाच्या परीक्षेचा निकाल कळला तेव्हां आम्ही

महाबळेश्वरीं होतों. "काकी, तुझी सून फर्स्ट क्लासांत पास झाली तेव्हां कांहीं तरी गोड दे करून" असें मागून वाग्भटांनीं त्यांच्याकडून सांजा करविलाच. जी. ए. च्या परीक्षेला सरळ पेढे आले. यापुढें शिक्षणाबद्दलचें कोणतेंही किल्मिष सासूबाईंचे मनांत राहिलें नसून पूर्ण कौतुक आहे. परिस्थितीनें असले प्रसंगही त्यांच्यावर जास्त आले, व त्या अनुभवानें झालें हें बरेंच असें त्यांना पुढें वाटूं लागलें. गोष्टी बोलत बसल्या म्हणजे आतां त्या मनमोकळेपणानें सांगतात कीं, "तुम्ही शिकूं लागलांत तेव्हां मला तो कमीपणा वाटे. पण आज असें वाटतें कीं झालें तें ठीक झालें. मला तुमची कोणाची काळजी राहिली नाहीं." कन्याशाळेच्या सुरवातीपासून त्यांनीं त्या उपक्रमाचें कौतुकपूर्ण स्वागतच केलें. मामंजी वारल्यानंतर बरेच दिवस त्या समाजांत समारंभाला वगैरे जात नसत. पण कन्याशाळेच्या वाढदिवसाचे दिवशीं मात्र त्या समारंभाला नेमानें येत. मी इंग्लंडला गेलें त्या वेळीं मला पोंचवावयास त्या बोटीवरही आल्या होत्या. आणि कॉलेजवर मजकडे राहावयास येत तेव्हांही कॉलेजांत कांहीं समारंभ झाले तर मुद्दाम येऊन बसत.

'कमला परीक्षेंत पास होते व हिंगण्याचें कामबीम काय करतें तें कांहीं तरी चांगलें करते' येवढेंच सासूबाई समजत. मी बी. ए. होऊन मोठी पगाराची नोकरी केली असती तर कदाचित् तो चांगलेपणा त्यांना आणखी थोडा जास्त पटला असता. पण शिक्षणाचें महत्त्व मामंजींना जास्त माहीत होतें व विद्येची अभिरुचीही त्यांचे ठिकाणीं स्वाभाविकपणेंच जास्त होती. सातारला मी न्यू स्कूलमध्यें जात असतां मला प्रत्येक परीक्षेंत व विषयांत मार्क किती पडतात याकडे त्यांचें लक्ष असे. परीक्षांचे पेपर घरीं आल्यावर पाहून एकाद्या प्रश्नावर Good असा शेरा असला तर तें प्रश्नोत्तर बारकाईनें वाचून पाहणें, व मार्क थोडे असले तर कां तें पाहणें, हेंही ते करीत. शाळेंत जाणाऱ्या सर्व मुलांवर त्यांची या प्रकारची देखरेख

असे. कारण माझे पुतणे आण्णा, विठ्ठल, दादा हे मजपेक्षां दोन-तीन वर्षांनींच लहान असून आम्ही सर्व एकदमच शाळेंत जात होतों. मला सासर व माहेर यांत सारखेपणा वाटण्यास हें एक कारण होतें. पुण्याचे माझे भाऊ याच वयाचे होते. फार काय नांवेंही तींच, व हीं मुलेंही मजबरोबर तशाच मनमोकळेपणानें वागत. त्यांच्या सर्व गोष्टींकडे ज्या काळजीनें व आपुलकीनें मामंजी लक्ष देत त्याच आपुलकीनें माझे शिक्षणाकडे त्यांनीं लक्ष दिलें. अभ्यास करतांना कांहीं कठीण स्थळें आलीं तर मी निःशंकपणें त्यांना जाऊन विचारी व ते मला आनंदानें समजावून सांगत. 'April Morn' ही कविता त्यांनीं मला समजावून सांगितलेली अजून आठवते. तसाच रघुवंशाचा दुसरा सर्गही आण्णा– माझा पुतण्या– व मी मिळून त्यांच्याबरोबर वाचला. मीं कांहीं कविता लिहिली तरीही त्यांना नेऊन दाखवीं व त्याबद्दल चर्चा करीं.

मी मॅट्रिक झालें त्या वेळीं त्यांच्या मजबद्दलच्या महत्त्वाकांक्षा मोठ्या होत्या. ते स्वतः यशस्वी डॉक्टर म्हणून सातार्‍यांत प्रसिद्ध होते. पुढें त्यांनीं जरी प्रॅक्टिस सोडलें– आमचे घरीं त्या वेळीं दवाखाना होता— तेव्हां मी एम्. बी. बी. एस. होऊन घरचा दवाखाना पुढें चालवावा असें त्यांनीं मला सुचविलें. पण माझी इच्छा वाङ्मयीन शाखेकडे जाण्याची होती. बी. ए., एम्. ए. व्हावयाची माझी आवड मीं त्यांना सांगितली व त्यामुळें डॉक्टर होण्याचा प्रश्न मागें पडला. पण मीं 'डॉक्टर' व्हावें ही त्यांची इच्छा निदान शब्दार्थानें तरी पुरी झाली म्हणावयाची! कारण पुढें १९३१ सालीं मी पीएच्. डी. झाल्याचें पत्र सातारला पोंचलें व घरांत सर्व मंडळी बोलूं लागली कीं, 'वहिनी डॉक्टरीची परीक्षा पास झाल्या.' तेव्हां आमचे पूर्वीचे कांपाउंडर रामभाऊ– आतां त्यांचाच खाजगी दवाखाना ते चालवीत असत– घरीं येऊन वाग्भटांना विचारूं लागले, "वासुकाका, वहिनी डॉक्टर झाल्या. त्या दवाखाना कोठें काढणार? पुण्यास कीं सातार्‍यास?

"तुम्ही काळजी करूं नका." वासूकाकांनीं सांगितलें, "वहिनी डॉक्टर झाल्या तरी दवाखाना उघडणार नाहींत."

मी मॅट्रिक होऊन पुढें बी. ए. व्हावें व सरकारी शिक्षणखात्यांत शिरावें हें मामंजींना आवडलें असतें. पण मी या राष्ट्रीय विद्यापीठाकडे वळल्यानें तो प्रश्नच निघाला नाहीं. तरी पण मी जी. ए. झाल्यावर पुढें काय करावयाचें हा प्रश्न निघाला. प्रपंचाचा पसरा मोठा. शिवाय कांहीं कर्जही पूर्वीं मामंजींचें होतें. ही सर्व जबाबदारी स्वाभाविकच थोरले भाऊजींच्यावर म्हणजे बापूसाहेबांवर पडे. कारण पहिला कर्ता व मिळवता मुलगा. एल्एल्. बी. झाल्याबरोबर एकदां जी प्रपंचाची जबाबदारी त्यांनीं अंगावर घेतली ती शेवटपर्यंत. पाठच्या सर्व भावांना बापूंबद्दल फार प्रेम व आदर असून त्यांना मदत करण्याची इच्छा होती. मला मामंजींनीं मुलाप्रमाणें मानलें, व त्यामुळें मुलानें पार पाडल्या असत्या त्या जबाबदाऱ्या आपण पार पाडल्या पाहिजेत ही जाणीव माझ्याही मनांत उत्पन्न झाली होती. स्त्रियांना मोठ्या पगाराची नोकरी मिळणें तेव्हां जी. ए. होऊनही अशक्य नव्हतें. आपली क्रमप्राप्त जबाबदारी पार पाडून मग आश्रम विद्यापीठ इकडे वळावें असा मनांतील हेतु. पण जी. ए. होण्याच्या वेळीं घरची परिस्थिति सुधारली होती. वाग्भटांनीं पुढाकार घेऊन उरलेलें सर्व कर्ज फेडून टाकलें होतें. घरच्या जबाबदारीपैकीं मीं कोणता भाग उचलावा म्हणून मीं मामंजींना विचारलें तेव्हां ते म्हणाले, "तूं आपल्या मुलाचें शिक्षण पुरें कर. तूं कांहीं मिळवून इतरांना द्यावें अशी आज जरूरी नाहीं."

याच वेळीं बाबासाहेब देवधरांकडून वाग्भटांच्यामार्फत मजकडे एक सूचना आली होती. माझी इंग्लंडला जाण्याबद्दलची इच्छा व खटपट त्यांचे कानीं गेली असावी. कारण, आगगाडींत दोघांची गाठ पडली असतां ते वाग्भटांना म्हणाले कीं, 'कमलाबाईंना इंग्लंडास जावयाचें असेल तर आम्ही म्हणजे सेवासदन त्यांना पाठवूं, व परत आल्यावर दरमहा दोनशें पगार देऊं. पण पांच वर्षें सेवासदनांत काम करण्याचें बंधन त्यांनीं

स्वीकारावें.' सार्वजनिक काम केलें तर तें स्त्रियांच्या विद्यापीठासाठींच करायचें अशी माझी मनोभावना होती;* व सेवासदनाच्या चालकांना या विद्यापीठाचे कार्याबद्दल आस्था आणि व्यवहार्यतेबद्दल विश्वास नसल्यानें, या बाबासाहेबांच्या सूचनेचा मीं जास्त लक्ष देऊन विचार केला नाहीं, व ती गोष्ट तशीच मागें पडली.

आजन्मसेवक व्हावें कीं काय ही चर्चा चालू असतां वाग्भट म्हणाले, "हें पहा कमलावहिनी! घराबद्दल तुम्ही काय करणार? कर्ज संपलें आहे. जो तो आपआपला प्रपंच करण्यास समर्थ आहे. तुम्ही कोणास कांहीं देण्याची जरूरी नाहीं. तुमच्या मुलाच्या शिक्षणाचा प्रश्न उरला. पुण्यास किंवा साताऱ्यास राहील तेथें त्याचें मॅट्रिकचें शिक्षण सहज होईल. मुख्य खर्च लागेल तो कॉलेजच्या शिक्षणास. पण नानाकाकांनीं त्याच्या जन्मापासून दरमहा दहा रुपये बँकेंत टाकण्यास सुरुवात केली होती व पुढें ती जबाबदारी वुइलमध्यें माझेवर टाकली आहे. तेव्हां तुम्ही या जबाबदारीचा विचार न करितां आजन्मसेवक व्हा. सर्वांनींच पैसे मिळवून काय करायचें? आम्ही असें समजूं कीं, आमचा एक भाऊ आम्हीं राष्ट्रकार्यास दिला."

श्रीधराच्या शिक्षणाची जबाबदारी इतक्या आपुलकीनें वाग्भटांनीं उचलल्यामुळें पैशानें त्याची फेड करणें शक्य नव्हतें. मीं मनाशीं असें ठरविलें कीं, पुष्कळशीं ऋणें अप्रत्यक्ष फेडायचीं असतात. पैशाखेरीज

* १९३१ सालीं हुजुरपागेच्या कौन्सिलच्या जबाबदार मंडळीकडून मी हायस्कूलचे सुपरिंटेंडेंटचें काम घेऊं शकेन काय अशी चौकशी झाली होती. या वेळीं आश्रमाकडूनही मला इकडे काम करण्यास परवानगी मिळणें अशक्य नव्हतें. पण माझी इच्छा विद्यापीठाचें कार्य करण्याची; शिवाय विद्यापीठाचा अभ्यासक्रम तेथें सुरू होण्याची शक्यताही झालेल्या चर्चेवरून वाटली नाहीं. म्हणून त्या वेळीं त्या विचारणेचा विचार मीं सोडून दिला.

श्रमानें मदत करतां येईल. इतर तऱ्हेनें जर कुटुंबाचे उपयोगी पडेन तर एका मुलाचे शिक्षणाची उतराई होऊं शकेन. मुलींच्या शिक्षणाकडे आपण लक्ष देऊं! आतांपर्यंत घरांतील सर्व मुलींच्या शिक्षणाची बरीचशी जबाबदारी मजकडे आली आहे. मी कॉलेजांत शिकूं लागल्यापासून कॉलेज-प्रिन्सिपलचें काम सोडीपर्यंत कोणी ना कोणी पुतणी मजजवळ आहेच व म्हणून तर मी 'कमलाकी!'

थोरल्या मामंजींचा कटाक्ष अमुकच विद्यापीठाचें शिक्षण मीं घ्यावें असा नव्हता. ते म्हणत शिकूं दे म्हणजे झालें. काय शिकावयाचें तें तात्यासाहेबांच्या मतानें ठरवा. तात्यांनीं माझे शिक्षणाचे सुरवातीस एकदां त्यांना लिहिलें कीं, "तुम्ही आक्काचे बाबतींत पैशाची वगैरे कांहीं सोय करणार आहांत काय? करणार असाल तर ती दिवसगतीवर न टाकतां आतांच करा. काय करणार तें मला कळवा. नाहीं तर ती माझा तिसरा मुलगा आहे असें समजून मला जी काय व्यवस्था करावयाची ती मी करीन." मामंजींनीं याला ताबडतोब रुकार देऊन तात्यांना शिरवळला बोलावून घेतलें, व लग्नाचे दिवशीं जे दागिने माझे अंगावर घातले होते तेवढ्यांची किंमत माझे नांवें बँकेंत टाकली. दोघांमध्यें हा व्यवहार झाला पण या कानाचा त्या कानासही कळला नाहीं. अर्थात् त्याबद्दल चर्चा, वाटाघाट व परस्परवितुष्ट येणें आदि गोष्टी घडण्याचें कारणच उरलें नाहीं. खरोखर असें वर्णन करणें अतिशयोक्ति होणार नाहीं—

"कन्यायाः किल पूजयन्ति पितरो जामातुराप्तं जनं।
सम्बन्धे विपरीतमेव तदभूदाराधनं ते मयि ॥"

घरांतील सर्वांत वडील मंडळींची ही भूमिका असल्यानें, त्यापुढील पिढी म्हणजे माझ्या जावा व दीर यांची वागणूक सहानुभूतीची असल्यास आश्चर्य नाहीं. माझ्या वन्सं श्री. मथुराबाई काथवटे या भक्तिमार्गी सुधारक समजल्या जात. विशेषतः विधवा स्त्रियांचा अपशकुन मानूं नये यावर त्यांचा कटाक्ष असे व मुद्दाम विधवा स्त्रियांच्याकडून त्या स्वतः

कुंकू लावून घेत. जावांचे संबंधही सहानुभूतीचेच राहिले. तरी पण येवढें म्हणावेंसें वाटतें कीं, शब्दांचा पसरा न पाडतां, मूक पण सक्रिय सहानुभूति घरांतील पुरुषांची जास्त. किंबहुना पुरुषांस तशी ती जास्त देतां येते. माझा पुतण्या दादा याच्या मुंजीचा प्रसंग. वैधव्यानंतर एक वर्षानेंच ही मुंज झाली. घरांतील मंडळींनीं, अर्थात् क्रमप्राप्त कर्तव्य समजूनच, हें कार्य केलें. आनंद वाटण्याजोगी मनःस्थिति कोणाचीच नव्हती. पण समारंभ म्हटला म्हणजे थोडासा उत्सव आलाच. मला हा प्रसंग फारच कठीण गेला. सर्व मुंजीचा कार्यक्रम उरकेपर्यंत माडीवर बसून अभ्यास करावा व अकरा वाजतां शाळेंत जावें असें योजून त्याप्रमाणें मी अभ्यास करीत बसलें होतें. ही गोष्ट माझे दीर आप्पाकाका यांच्या लक्षांत आली, व त्यांनीं चहा करण्यास मदत पाहिजे म्हणून मला खालीं बोलाविलें. त्यांनीं व मीं दहा वाजेपर्यंत त्या कामांत वेळ घालविला; व ते स्वतःही उठून समारंभांत गेले नाहींत. घरांतील स्त्रियांनीं शाब्दिक सहानुभूति पुष्कळ दाखविली, पण स्वतः समारंभांत न जातां मजबरोबर वेळ घालविणें कोणास सुचलें नाहीं. सौभाग्य हें एक दैवी पुण्याईनेंच मिळणारें आहे. तेव्हां तें आहे तोंवर त्यांतला कोणताही समारंभ टाळणें अशुभ होय, ही समजूत या वागणुकीच्या मुळाशीं असते. स्वतःच्या दुःखानें मनुष्यास समारंभांत भाग घेऊं नयेसें वाटेल तें वेगळें; पण सक्तीचें दुःख बरोबर नाहीं. शुभाशुभाची ही कल्पना मला असह्य वाटे, व म्हणून घरच्या सर्व शुभ समारंभांस मुद्दाम हजर राहण्याची प्रथा मीं पुढें स्वीकारिली.

१९२६ सालीं संकेश्वरमठाचे शंकराचार्य साताऱ्यांत आले व त्यांचीं प्रवचनेंही चालू झालीं. प्रवचनांचा रोख सुधारणाविरोधी असे. पण कोणीही महनीय व्यक्ति– मग ती जुन्या नव्या कोणत्याही मताची अगर पक्षाची असो– गांवांत आल्यावर त्यांना शाळा पाहावयास मी बोलावीत असे. त्याप्रमाणें श्रींची स्वारी शाळेंत येईल का याची मध्यस्थामार्फत मीं चौकशी करविली. मध्यस्थांनीं

सांगितलें कीं, " त्यांच्या आश्रमसंप्रदायाप्रमाणें विधवा स्त्री सामोरी आलेली त्यांना चालणार नाहीं. तुमच्या शाळेच्या दारांत श्रींची स्वारी येईल तेव्हां तुम्हीं मागें राहून इतरांनीं त्यांचें स्वागत करावें. असें होत असल्यास त्यांच्या येण्याचा योग आणूं." मीं सांगितलें कीं, " स्त्रियांनीं मागें राहायचें नाहीं म्हणून तर या शाळांची खटपट! मी शाळेची प्रमुख. मी तोंड दडवून मागें राहणार नाहीं. प्रथम मीच पुढें होऊन त्यांचें स्वागत करणार. तो त्यांना अपशकुन होत असेल तर नाइलाज आहे ! श्रींचा आशीर्वाद मिळता तर बरें होतें. पण त्या अभावीं आमच्याच पुण्याईवर शाळा चालली तर चालवूं." श्रींची शाळेस भेट झाली नाहीं; पण त्यांचेकडून शाळेस पांच रुपये देणगी आली.

करवीर मठाचे शंकराचार्य कुर्तकोटी हे जास्त प्रगतिपर मताचे असून ते कन्याशाळेंत व कॉलेजांतही येऊन गेले व कॉलेजांत मीच त्यांना सामोरी जाऊन त्यांचें स्वागत केलें.

## परिशिष्ट

### [ प्रस्तुत प्रकरणासंबंधीं कांहीं पत्रें ]

श्री.

शिरवळ, ता. ७-८-१७

चि. कमलाबाईस अनेक आशीर्वाद. तुझें ता. ५ चें पत्र आज सकाळीं मिळालें. माझेसंबंधानें आभार अगर कृतज्ञता मानण्याचें कारण नाहीं. तुझा नवरा अल्पवयांत वारला. जरी तुजला संभाळणारे आहेत तथापि तुझी व तुझे मुलाची भावी स्थिति चांगली व्हावी हें पाहण्यास तुझे माहेरचे श्रीमंत नाहींत; व तुझा सख्खा सासरा असे स्थितींत आहे कीं तुजकरतां कांहीं करूं शकत नाहीं. तुझे दिरांपैकीं कांहीं मदत करण्याजोगे तूर्त कोणी नाहींत. माझी स्थिति ईश्वरकृपेनें बरी आहे, सबब तुझे निरवाहाची तजवीज केली आहे. ज्या अर्थीं तूं मॅट्रिक

होऊन कॉलेजांत गेली आहेस त्या पक्षीं तुजला स्वल्प मदत करावी ह्या हेतूनें वाग्भटकडून पत्र लिहविलें. निरपेक्षबुद्धीनें हें केलें आहे याचें फल तुम्हांसच मिळावें. मजला कांहीं फायदा यश अगर कीर्ति नको आहे. चि. श्रीधर ह्याजला तूर्त कांहीं मदतीची जरूरी नाहीं. परंतु पुढें त्याजला उपयोग व्हावा म्हणून दरमहा दहा रुपये त्याचे नांवावर ठेवीत आहें. मी आतां मरणाचे द्वारीं टेकलेला आहे. जोंपर्यंत माझे हातून तुमचे उभयतांचा उपयोग होईल तो करावा हा हेतु आहे. माझे मागें तुमचे दिरांपैकीं अगर तुम्ही स्वतः त्याचा विद्याभ्यास करून त्यास रंगारूपाला आणाल असें मजला वाटतें. उभयतांचे प्रकृतीस जपत जावें. हिंगण्याची हवा चांगली नाहीं. क. हे आशीर्वाद.

**नारायण गणेश देशपांडे.**

## कन्याशाळा भाग दुसरा : : १०

### कल्पना व स्थापना

'संक्रांती'चें वर्णन नेहमीं पुढीलप्रमाणें करतात— 'ती पाहते एका दिशेकडे व जाते दुसऱ्या दिशेकडे.' माझ्या आयुष्यक्रमाचें वर्णन मला असेंच कांहींसें करण्याचा मोह होतो. माझ्या जीवितनौकेवरील होकायंत्र दिग्दर्शित करीत असते एक दिशा, व नौका जाऊन पोंहोचते दुसऱ्या दिशेला. पण असें होत असलें तरी शेवटीं त्याबद्दल मला वाईट वाटून घेण्याचा प्रसंग येत नाहीं. उलट वाटतें कीं, तें एक गुप्त वरदानच (blessing in disguise) झालें. अर्थात् प्रथम मात्र दुसऱ्या दिशेला लागल्याबरोबर अंतःकरणाचा तुकडा कापून टाकावा असें दुःख व्हावयाचें तें होतेंच.

आश्रमाची आजन्मसेविका होऊन सुमारें सव्वा-दीड वर्ष बोर्डिंग सुपरिंटेंडेंटचें काम केल्यावर पी. ए. व्हावयाची इच्छा बलवत्तर होऊं लागली. आणखी दोन-चार वर्षें अध्ययनाची सवय मोडली व नुसतें अध्यापन व व्यवस्थापिकेचें काम हेंच केलें, तर पुढें पी.ए. होण्याचें राहून जाईल. खूपसें वाचावयाची माझी हौस अजून शिल्लक होती. जी. ए.-

पर्यंतचा अभ्यास किती झालें तरी मर्यादित असतो. परीक्षेचे विषय व वेळ यांचा मेळ घालतांना विषयाची आवड नुसती उत्पन्न होते न होते तोंच परीक्षेच्या दृष्टीनें विषय गुंडाळावा लागतो. पण पी. ए.ला विषय एकच व वर्षें दोन; तेव्हां मनमुराद अभ्यास व वाचन करावें असें वाटे. दुसरें, हिंगणें येथील व्यवस्थेच्या दृष्टीनेंही मी रजा घेणें अनिष्ट नव्हतें. सर्व दृष्टींनीं विचार करून मीं एक वर्षाची रजा अभ्यासासाठीं मागितली व जून १९२२ पासून मला तशी रजा मिळाली. हिंगण्यासच राहून "The Status of Women in Ancient India" हा विषय प्रबंधासाठीं मनाशीं मुक्रर केला व दादांच्या मार्गदर्शकत्वाखालीं अभ्यासास सुरवात केली. पण मी पी. ए. व्हावयाचा योग नव्हता, इतकेंच नव्हे तर परीक्षेचा विचारच आठ वर्षें मागें पडावयाचा होता. अर्थात् पुढें पीएच्. डी. होतां आलें त्यामुळें पी. ए. न झाल्याचें दुःख राहिलें नाहीं हें खरें. पण त्या वेळीं अभ्यास सोडतांना वाईट वाटल्याखेरीज राहिलें नाहीं.

सातारला मे महिन्याचे सुट्टींत जमलों असतां अशा चर्चा होत असत कीं, शाळेंत जाणाऱ्या मुलींची संख्या वाढत आहे व म्हणूनच सातारला एकादी कन्याशाळा सुरू करण्याची वेळ आली आहे. घाणेकरांनींही एकदां 'अशी शाळा सुरू करावी व मीं तेथें जाऊन ती काढण्यांत पुढाकार घ्यावा' असें मला सुचविलें होतें. परंतु मीं जो माझा पुढील कार्यक्रम मनाशीं आंखला होता त्यांत सातारचें कार्यक्षेत्र नव्हतें. आश्रमाचें जें काम वाट्याला येईल तें करावयाचें व मुख्य लक्ष वारज्याच्या शाळेवर केंद्रित करून हळूहळू खेडेगांवीं शाळा वाढवावयाच्या आणि साक्षरता-प्रसार करावयाचा ही माझी मनांतील इच्छा होती.

आपले हातून कांहीं सामाजिक उपयुक्त कार्य होत नाहीं असें आप्पाकाकांना पुष्कळदां वाटे व मधून मधून सांगलीची नोकरी सोडून अशा कामांत पडावें असेंही त्यांना वाटे. त्यांची एकंदर मनःस्थिति

त्यांनीं ता. १९-१२-२० रोजीं मला लिहिलेल्या एका पत्रांत चित्रित झाली आहे. ते लिहितात—

"तुमचे पत्रांत तुमची स्वतःची प्रकृति बरी नसून मनास हुरूप वाटत नाहीं वगैरे मजकूर होता. तें वाचून बरें वाटलें नाहीं. आलेल्या संकटास न भितां व दुःखास न जुमानतां घेतलेलें काम धैर्यानें व समाधानानें करण्याची तुमची नेहमींची वृत्ति असून, त्यांत असा विघात कां झाला, तें कळण्याची इच्छा आहे. तुमच्या धीर, धीट, कार्यक्षम व आनंदी स्वभावामुळें आम्हांस सर्व गोष्टींत • तुमचा आधार वाटतो. पण तुम्हीच जर आमचेप्रमाणें melancholia ला बळी पडला तर पुढें कसें होणार? तुमच्या आयुष्यास आतांच आरंभ झाला आहे. याच वेळीं धैर्याची व मनःशांततेची जरूरी आहे. घरगुती प्रापंचिक काळज्या आमचेवर सोपवून तुम्ही आपलें ध्येय नेटानें चालू ठेवा अशी माझी विनंति आहे. सांपत्तिक अडचणी वाटत असतील तर त्या खुल्या मनानें आम्हांस कळवा. आम्ही त्रिवर्ग बंधु यथाशक्ति अडचणी दूर करूं. परंतु कोणत्याही कामांत संकोच करून स्वतःचे मनास त्रास करून घेऊं नका. सार्वजनिक कामाची मजला फार हौस आहे. परंतु तें माझे हातून होत नाहीं. तुमचे हातून तरी होऊन आपले घराण्याचें नांव वाढवा. सार्वजनिक कामांतील आतां माझी भिस्त चि. वाग्भट व तुम्ही या दोघांवर आहे. तुम्ही निराशा करणार नाहीं अशी फार आशा आहे."

अशाच विचारांनीं उचल घेतली व त्यांनीं प्रो. कर्वे यांना पत्र लिहिलें. ता. २२।९।२२ चे पत्रांत ते लिहितात : "लवकरच येथील नोकरी सोडून हिंगण्यासारख्या ठिकाणीं, त्यांतले त्यांत लोकोपयोगी काम होईल तेथें, जावें असें मनांत आहे. ती. बापू या बाबतींत स्पष्ट मत देणार नाहींत म्हणून त्यांस विचारलें नाहीं. स्वतःचेच मनाचा निर्धार करून मीं प्रो. कर्वे यांचेजवळ गोष्ट काढली. त्यांचेकडून काय उत्तर येतें तें पाहून मग नक्की ठरवूं."

जिल्ह्यांच्या गांवीं कन्याशाळा स्थापन झाल्या पाहिजेत, त्याखेरीज महिलाविद्यापीठाची वाढ होणार नाहीं, असें अलीकडे आण्णांचे मनांत येऊं लागलें होतेंच. त्यांत हें आप्पाकाकांचें पत्र— हिंगण्यास काम करावयास येण्याची इच्छा दिग्दर्शित करणारें पत्र—त्यांना मिळालें व त्यांच्या विचारास चालना मिळाली. ऑक्टोबरांत दिपवाळीचे दिवशीं दोघांनीं सातारला भेटावें, व या प्रश्नाचा ऊहापोह करावा असें त्यांनीं ठरविलें.

माझे अभ्यासास नुकतीच सुरवात झाल्यामुळें माझा दिपवाळीस सातारला जावयाचा विचार नव्हता. पण आण्णांनींच विचारलें कीं, "मी सातारला आप्पासाहेबांना भेटावयास जातों आहें, तुमचे घरींच उतरणार आहें, मग दोन दिवस तुम्ही माझेबरोबर कां येत नाहीं?" अर्थात् मला नाहीं म्हणतां येईना व म्हणून आण्णा, मी, बनुताई गेलों. सौ. ताईही दोन दिवसांसाठीं सासूबाईंना भेटावयास म्हणून आमचे-बरोबर आली होती. दिपवाळीचे पहिल्या दिवशीं सातारला गेलों. आप्पाकाका आधींच येऊन पोंचले होते. पण तेथें गेल्यापासून सर्वच गोष्टी बदलूं लागल्या. आप्पाकाकांनीं नोकरी सोडण्याची इच्छा दर्शवितांच चीफसाहेब यांनीं त्यांना नोकरी न सोडण्याबद्दल आग्रहानें सांगितलें, व त्यामुळें त्यांना त्यांचे इच्छेविरुद्ध नोकरी सोडणें बरोबर वाटेना. अर्थात् त्यांनीं 'सातारला येऊन काम करणें' अगर 'हिंगण्यास काम करणें' हे दोन्ही प्रश्न बाजूला पडून, सातारला इतर कोणत्या मार्गानें शाळा सुरू करतां येईल का, याची चर्चा सुरू झाली. या सर्व विचारांत आप्पाकाकांच्या बरोबरच वाग्भट, घाणेकर व डॉ. आगाशे यांनींही पुढाकार घेतला होता. आप्पाकाका येत नाहींत मग दुसरें कोण? हा प्रश्न निघाल्याबरोबर सर्व मंडळी मजकडे वळली. पण मीं माझी अनिच्छा सांगितली. आतांपर्यंत या चर्चेंतही मीं भाग घेतला नव्हता व सातारलाही केवळ अनिच्छेनें आलें होतें.

आण्णांची कल्पना अशी होती: प्रथम गांवांतील लोकांना विचारा-

वयाचें नाहीं. कारण, यापूर्वी नाशिक किंवा अशाच एका गांवीं त्यांना अनुकूल अनुभव आला नव्हता. तेथें प्रथम त्यांनीं जाहीर सभा भरवून कन्याशाळेच्या स्थापनेची उपयुक्तता लोकांपुढें मांडली, व लोक पैशाची मदत करतील तर अशा तऱ्हेची शाळा काढण्याची आपली इच्छा व्यक्त केली. पण सभेमध्यें त्यांचे कल्पनेला कोणी पाठिंबा देणाराच भेटेना व त्यामुळें तेथें शाळा काढण्याचें जमलें नाहीं. या अनुभवावरून त्यांनीं असें ठरविलें कीं, प्रथम शाळा सुरूच करावयाची. एक वर्षाची सोय आपण करावयाची व मग लोकांना ती गोष्ट जाहीर करावयाची. एक वर्षाचे शेवटीं लोकांची सहानुभूति मिळूं शकेल असें वाटलें तर प्रयोग पुढें चालू ठेवावा नाहीं तर बंद करावा.

एक वर्षाची तरतूद करावयाची कशी? शाळेला कमींत कमी काय पाहिजे? –एक शिक्षक, एक खोली व कांहीं मुली! 'कमलाबाईनीं या कामीं पुढाकार कां घेऊं नये' असा प्रश्न निघाला. वाग्भटांनीं लागलीच सांगितलें कीं, "वहिनींनीं एक वर्ष घरीं राहून काम करावें. घरीं राहिल्यावर पगार काय करायचा? म्हणजे एका शिक्षकाला दरमहा पन्नासप्रमाणें सहाशें रुपयांचा प्रश्न मिटला. घरांत ओसरी मोकळी आहेच. एका वर्षांत शाळेंत असे किती वर्ग होतील? फार तर दोन! मुली किती येतील– वीस-पंचवीस फार तर! अर्थात् आपली ओसरी वर्षभर शाळेला पुरेल. म्हणजे जागेच्या भाड्याचा प्रश्न मिटला. वरखर्च थोडा लागेल तो मुलींची फी व थोड्याशा वर्गणीनें भागवितां येईल."

वाग्भटांनीं हा प्रश्न अशा तऱ्हेनें सोडवून दाखविल्यानें आण्णांनाही उत्साह वाटला व मला हाक मारून त्यांनीं ही कल्पना माझेसमोर मांडली. जी. ए. होईपर्यंत मी पूर्णपणें परावलंबी होतेंच; पण यापुढें अशा तऱ्हेचें आर्थिक परावलंबन स्वीकारण्याची माझी इच्छा नव्हती. पण वाग्भटांनीं मीं कांहीं एक पगार न घेतां एक वर्ष काम करावें ही योजना इतक्या मनापासून पुढें मांडली होती व इतरांनींही ती इतकी

उचलून धरली होती कीं, त्या कारणासाठीं नकार देणें मला शोभून दिसलें नसतें. शिवाय पगार न घेणें हाही एक वर्षापुरताच प्रश्न होता. पण याशिवाय माझीं दुसरींही दोन कारणें होतीं. पी. ए.चा अभ्यास सोडणें मनास पटत नव्हतें व सातारला येण्यानें 'वारज्याची शाळा' व तिच्या पायावर पुढें व्हावयाच्या साक्षरताप्रसार व खेडेगांव-सुधारणा इ. कामाच्या ज्या कांहीं कल्पना होत्या त्या सोडून द्याव्या लागत होत्या.

विरोधाभास दिसतो खरा पण तो आहे. म्हणजे आण्णांना परीक्षांचें महत्त्व वाटत नाहीं. पी. ए. होण्याला ते इतकें महत्त्व देईनात. ते म्हणत, "पुढें केव्हां पी. ए. हो किंवा नाहीं झालीस तरी बिघडत नाहीं. मी शाळेच्या कामाला पी. ए.पेक्षां जास्त महत्त्व देतों." मागें मी आजन्मसेवक व्हावयाच्या वेळेला प्रथम मी इंग्लंडला जाऊन येतें व मग आजन्मसेवक होईन, असें सांगतांच त्यांनीं सांगितलें कीं, 'आधीं आजन्मसेवक हो व मग इंग्लंडला हवी तर जा.' दादा दिवेकरांचे बाबतींत असाच प्रश्न आला होता. त्यांना गव्हर्मेंट ऑफ इंडियाची शिष्यवृत्ति परदेशीं जाऊन अभ्यास करण्यासाठीं मिळाली होती, व त्याच वेळीं त्यांचें हिंगण्यास येऊन आजन्मसेवक होण्याचें निश्चित ठरलें होतें. आश्रमास त्या वेळीं माणसांची फार जरूरी होती. तेव्हांही आण्णांनीं त्यांना हेंच सांगितलें कीं, प्रथम आजन्मसेवक व्हा. परदेश-गमन व परीक्षा पुढें होईल किंवा नाहीं. त्याप्रमाणें मिळालेली स्कॉलर-शिप परत करून दादा आजन्मसेवक झाले. इरावती पीएच्. डी.साठीं जर्मनीस जावयास निघाली त्या वेळींही आण्णांचा दृष्टिकोन हाच होता. 'शिक्षणाचे प्रणेते व त्यांना शिक्षणाचें महत्त्व वाटत नाहीं' असें म्हणणें म्हणजे विरोधाभास दिसतो. पण तो आहे खरा.

पॅरिसला एकदां आम्ही दोघेचौघे फिरावयास निघालों व संध्याकाळीं सेन नदीच्या एका पुलावर उभे होतों. पश्चिमेचे बाजूला सेन नदीचा प्रवाह व प्रवाहाचे टोकाशीं दूर दिसणारा मावळता मोठा लाल लाल सूर्यगोल, हिरव्या झाडांच्या समुदायांत, मोठा उठून दिसत होता.

तें दृश्य पाहून आमच्यापैकीं एकजण– रा. प्रताप– पुढें झाले व जवळच्या कॅमेऱ्यानें या देखाव्याचा फोटो काढून घेण्यास योग्य जागा पाहून उभ राहिले. दहाएक मिनिटांत परत आले. आम्हीं सर्वांनीं विचारलें, " काय घेतलांत का फोटो ? "

" छे, हो ! " त्यांनीं वाईट तोंड करून उत्तर दिलें. " सूर्याचा फोटो घेणार होतों पण उजेड भरपूर नव्हता म्हणून तसाच परत फिरलों ! "

या उत्तरावर आम्हीं सर्वजणांनीं खूप हसून त्यांची चेष्टा केली. विरोधाभासात्मक असलें तरी उत्तर खरें होतें. त्याची आठवण मला 'आण्णांना परीक्षांचें महत्त्व वाटत नाहीं' असें म्हणतांना होत आहे.

वारज्याच्या शाळेबद्दल आण्णांनीं सांगितलें कीं, 'त्याबद्दल तूं काळजी करूं नको. ती शाळा चालविण्याची सोय मी करतों.' आणि त्याप्रमाणें त्यांनीं हिंगणें येथें काम करणाऱ्या आजन्मसेवकांस विनंति केली. नाना पटवर्धन यांनीं त्या शाळेची जबाबदारी आवडीनें घेतली व सुमारें दोन वर्षें शाळा चालवून मग लोकल बोर्डाचे ताब्यांत दिली. लोकल बोर्डानें घेतल्यानंतर मात्र कांहीं दिवसांनीं मुलांची संख्या कमी झाल्यामुळें ती शाळा बंद पडली !

ही सर्व चर्चा झाली तरी अभ्यास सोडावा असें मला वाटेना; व निदान एक वर्ष तुम्ही शाळेची तात्पुरती सोय करा, पी. ए. झाल्यावर मी येतें व सर्व लक्ष शाळेकडे देतें असें मीं सांगितलें व त्या वेळची चर्चा संपली.

परंतु पुन्हा आण्णांचे मनानें उचल खाल्ली. 'कांहीं तरी व्यवस्था करून शाळा एक वर्ष चालविणें जमणार नाहीं. कमलाबाई काम घेत नसतील तर शाळा काढण्यांत अर्थ नाहीं. तेव्हां माझें येथील काम संपलें. मी आलें तेव्हां कांहीं तरी लोकांची अपेक्षा निर्माण झाली होती ती आतां पुरी होणें शक्य नाहीं, मग येथें कशास राहूं ? उद्यां सकाळीं मी पुण्यास परत जातों. महिलाविद्यापीठाचा अभ्यासक्रम चालविणारी कन्याशाळा माझ्या हयातींत माझ्या दृष्टीस पडेलसें वाटत नाहीं.'

हे आण्णांनीं अतिशय गहिंवरून व वैतागून काढलेले उद्गार मीं ऐकले, व दिवसभर सर्वांच्या म्हणण्यापुढें न बदललेलें माझें मन डळमळलें. तासभर विचार केला व मग आण्णांना जाऊन सांगितलें कीं, 'तुम्हांला इतकें वाईट वाटत असेल तर माझी परीक्षा मी सोडतें व येथें येऊन शाळेच्या कामास सुरवात करतें.' मींही मनांत विचार केला कीं, खरो-खरच आपण एक वर्ष परीक्षा पुढें ढकलल्याच्या योगानें जर एक शाळा स्थापन होत असेल तर तसें कां न करावें ! कोणतीही गोष्ट सुरू करतांना कठीण असते. पण एकदां कार्य सुरू झाल्यावर तें चालू ठेवण्यास मदत देणें लोकांस इतकें कठीण वाटणार नाहीं.

शाळा सुरू होण्याची योग्य परिस्थिति म्हणजे प्रथम गांवांतील लोकांना त्याची जरूरी वाटावी, पैसा जमा करण्याची त्यांची तयारी असावी, शाळेची वाढ कशी करावयाची याचा पूर्ण आराखडा तयार करावा, व मग त्याप्रमाणें शिक्षकांच्या नेमणुका करून कामास सुरवात व्हावी. येथें सर्व परिस्थिति कोणास उलटी वाटल्यास आश्चर्य नाहीं. पण मुख्य विद्यापीठाची कल्पनाच अशा तऱ्हेनें पैशाचा विचार न करतां आपल्या मूठभर सहकारी मंडळींच्या आधारावर आण्णांनीं पुढें ढकलली होती. त्यांच्या पद्धतीनें 'माझी शाळा' म्हणून काम करणाऱ्या एका व्यक्तीचा आधार पुरेसा होता, व म्हणून मीं होकार देतांच आण्णांना अतिशय बरें वाटलें. आणि 'शुभस्य शीघ्रम्' या न्यायानें त्यांनीं आपल्या विद्युत्-युद्धपद्धतीच्या चढाईला सुरवात केली.

त्या दिवशीं आश्विन महिन्यांतील अमावास्या होती. मध्यें एक दिवस पाडव्याचा सोडून, भाऊबिजेचे दिवशीं शाळेची सुरवात करावयाची, व संध्याकाळीं जाहीर सभेंत लोकांना निवेदन करून भाऊबीज म्हणून मदतीची मागणी करावयाची असा बेत ठरला. मधला एक दिवस गांवांत हिंडून कांहीं मंडळींची खाजगी भेट घ्यावयाची व शाळेला दोन-चार मुली मिळतात काय तें पाहावयाचें. वार्षिक परीक्षा एप्रिलमध्यें, तेव्हां वर्षाच्या अर्धेमधें मुली शाळेंत येणें शक्य नव्हतें. पण

कांहीं शाळा सोडून घरीं राहिलेल्या मुली गांवांत असणारच. त्यांची माहिती मिळवून खटपट करण्याचें आम्हीं योजिलें. गांवांतील प्रमुख मंडळींना भेटून त्यांना हा विचार सांगावयाचा म्हणून प्रथम सुरवात दादासाहेब करंदीकरांचेकडे जाऊन करावी या हेतूनें रात्रीं जेवणें उरकून आण्णा, आप्पाकाका, वाग्भट, बनुताई व मी असे त्यांना भेटावयास गेलों. रावबहादुर काळे वगैरे मंडळी स्त्रीशिक्षणाची अभिमानी. त्यांनीं स्वतः सेवासदन चालविण्यांत पुढाकार घेतला होताच. त्यांची सहानुभूति मिळणें कठीण नव्हतें. दादासाहेब करंदीकर थोडे जास्त सनातनी समजले गेलेले, तेव्हां अशा मंडळींची सहानुभूति मिळाली तर आणखीही उपयोग होईल; म्हणून प्रथम दादासाहेब किती अनुकूल आहेत तें पाहावें हा हेतु होता.

दादासाहेबांना आपला विचार आण्णांनीं सविस्तर कळविला, व कमलाबाई वर्षभर येथें राहणार व शाळा चालविण्याची खटपट करणार वगैरे सांगितलें. दादासाहेब माझेकडे वळले व त्यांच्या नेहमींच्या शोधक दृष्टीनें त्यांनीं प्रश्न केला—

" तुमचा शाळा सुरू करण्याचा विचार स्तुत्य आहे. सातार्‍यांत अशा शाळेची जरूरीही आहे. पण काय हो, पैशाची सोय तुम्हीं काय केली आहे? शिक्षकांना पगार कोण देणार? तुला पगार किती व कोण देणार?"

" मला घरीं वर्षभर जेवावयास घालावयाचें भाऊजींनीं कबूल केलें आहे." मी म्हणालें, " घरीं राहून जेवणार व शाळेचें काम करणार. जागा आमच्या घराची ओसरी आहेच. तेथें शाळेचा वर्ग बसविणार."

" हें ठीक आहे," दादासाहेब म्हणाले, " वर्षभर जागेचीही सोय झाली. पण तुमच्या शाळेंत मुलीच आल्या नाहींत तर मग तूं काय करशील?"

" मग मी बाकांना शिकवीन. पण वर्षभर वर्गांत जाऊन बसत जाईन."

"मग तुझी शाळा चालेल!" दादासाहेबांनीं उद्गार काढले. "मग असें कर. या माझ्या घरांत शाळा चालव. ओसरी खूप मोठी आहे. तेथें दोन-तीन वर्ग बसतील. आणि इकडे घरींच राहावयास ये म्हणजे झालें."

देशपांडे व केळकर या दोन्ही घराण्यांशीं दादासाहेबांचा जो घरोबा होता त्या दृष्टीनें त्यांनीं मला त्यांचे घरीं राहावयास बोलाविलें असतें तरी तें योग्यच होतें. पण हें बरेंचसें विनोदाचें बोलणें होतें. शेवटीं चर्चेंत इत्यर्थ असा निघाला कीं, त्यांनीं आपल्या घराशेजारचे बंगल्यांतील माडी कन्याशाळेस द्यावयाची. भाऊबिजेचे दिवशीं तेथेंच कांहीं थोड्या मंडळीस आमंत्रण देऊन शाळेची सुरवात करावयाची. याच वेळीं कन्याशाळेस दरवर्षीं शंभर रुपयांप्रमाणें पांच वर्षेपर्यंत त्यांनीं एकूण पांचशें रुपये द्यावे अशी विनंतीही त्यांना केली. वाग्भट व डॉ. आगाशे यांनीं याप्रमाणें पैसे देण्याचा विचार आधींच बोलून दाखविला होता. दादासाहेबांनीं या योजनेसही रुकार देऊन पहिल्या वर्षीं शंभर रुपये देण्याचें मान्य केलें.

दादासाहेबांची अनुकूलता व मदत अपेक्षेपेक्षांही जास्त मिळाल्यानें आम्हां सर्वांसच फार उमेद वाटली. इतर मंडळींना भेटून त्यांची सहानुभूति व मदत मिळविण्यांत दुसरा पाडव्याचा दिवस खर्च केला. रावसाहेब काळे, भाऊसाहेब सोमण व वा. ग. चिरमुले यांनींही या योजनेचें स्वागत करून आनंदानें शंभर शंभर रुपये भाऊबीज म्हणून शाळेस देण्याचें मान्य केलें. अर्थात् या सर्व रकमा संध्याकाळच्या सभेंत जाहीर व्हावयाच्या होत्या. पैशाची याप्रमाणें तजवीज होत असतां मुलींचीही चौकशी आम्ही करीत होतों. वत्सला शाळिग्राम, आऊ चितळे, सीता उमराणी, दुर्गा महाबळेश्वरकर या त्या मुलींपैकीं कांहीं होत. यांपैकीं दोघीतिघी मराठी शाळेंत जात होत्या व जूनमध्यें नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीस इकडे येणार होत्या. याप्रमाणें कांहीं लागलीच शाळेंत येणाऱ्या, व कांहीं नवीन वर्षाचे सुरवातीस येणाऱ्या, अशा मिळून सहा

मुली भाऊबिजेचे दिवशीं सुरवातीस हजर राहिल्या. दादासाहेब करंदीकर यांचे बंगल्यांत सकाळीं आठ वाजतां हा उद्‌घाटन-समारंभ पार पडला व गुरुवर्य आण्णांच्या हस्तें विद्यार्थिनींना पहिला धडा देण्यांत आला.

संध्याकाळीं पाठक हॉलमध्यें जाहीर सभा होऊन कन्याशाळा सुरू केल्याचें लोकांना निवेदन करून, त्यांना मदतीची विनंति केली. रावसाहेब काळे यांच्या अध्यक्षतेखालीं सभा झाली व त्यामध्यें आण्णांनीं आपलें मनोगत सांगितलें :

" माझी ही शाळा काढण्याची पद्धति तुम्हांस चमत्कारिक वाटेल. पण मीं विद्यापीठाची स्थापना याच पद्धतीनें केली. मदत, पैसा वगैरे कांहींच तयार नसतां कांहीं सहायकारी मंडळींच्या आधारावर मीं त्या कामास सुरवात केली. मातृभाषेंतून शिक्षण देण्याची व स्त्रियांसाठीं वेगळें विद्यापीठ काढण्याची कल्पनाही पुष्कळांना चमत्कारिक वाटली. माझे पुष्कळ मित्रही या योजनेला अनुकूल नव्हते. पैकीं कांहींनीं सांगितलें कीं, "प्रो. कर्वे तुमच्या या ( Quixotic ideas ) 'विक्षिप्त कल्पना' आहेत. आतांपर्यंत शिक्षणाचे क्षेत्रांत जी कांहीं अब्रू तुम्हीं कमावली आहेत ती या प्रयोगानें घालवाल. मीं त्यांना उत्तर दिलें कीं, मनांत आलेली कल्पना मी कृतींत आणणार आहे. अपयश येऊन अब्रू जाण्याबद्दल म्हणाल तर ती मला मुळांतच नाहीं."

यानंतर मीं भाषण करून माझें मनोगत सभेस निवेदन केलें. मी म्हणालें, " पहिल्या प्रथम या शाळेचें काम अंगावर घेण्याची माझी तयारी नव्हती. कारण मीं सुरू केलेला पुढील परीक्षेचा अभ्यास त्यामुळें सोडून द्यावा लागणार आहे. परंतु अण्णांनीं जे उद्‌गार काढले कीं, महिलाविद्यापीठाचा अभ्यासक्रम शिकविणाऱ्या कन्याशाळा माझ्या हयातींत माझ्या डोळ्यांना दिसणार नाहींत, त्यामुळें वाईट वाटून हें काम मी करावयास तयार झालें. १९१८ सालीं एकदां आमच्या कॉलेजची एक सभा झाली. त्याच सुमारास आण्णांना साठ वर्षें पुरीं व्हावयाचीं होतीं. तेव्हां कांहीं वक्त्यांनीं सभेंत असा उल्लेख केला कीं, 'आण्णांना

आतां साठ वर्षें पुरीं होणार ते वयोवृद्ध होणार इ.' त्या वेळीं उत्तर देतांना आण्णांनीं सांगितलें कीं, 'दर वेळीं मला साठ वर्षें पुरीं होणार व मी म्हातारा होणार याची मला आठवण कां करून देतां. मला साठ वर्षें संपून आतां एकसष्टावें वर्ष लागणार नसून एकुणसाठावें लागणार आहे, व त्याचे पुढचे वर्षीं अठ्ठावन्नावें लागणार आहे. वयाबरोबर माझा कामाचा उत्साह वाढणार आहे.' ही गोष्ट मला आठवली व आयुष्याच्या तिसऱ्या पंचविशींत असणाऱ्या आण्णांचा हा उत्साह असतां, माझ्यासारख्या पहिली पंचविशी न उलटलेल्या व्यक्तीनें मला अमुक काम झेपेल कीं नाहीं याचा विचार करीत मागें सरावें याची मला लाज वाटली; व म्हणून परीक्षेचा विचार दूर करून आण्णांना कन्याशाळा चाललेली पाहण्याचा आनंद मिळावा म्हणून मी या कार्यास पुढें होत आहे." यानंतर कन्याशाळेसाठीं भाऊबिजेची मागणी मीं सभेपुढें केली व पूर्वयोजनेनुसार सहाशें रुपये व आणखी इतर मंडळींनीं स्वयंस्फूर्तीनें दिलेली आणखी कांहीं देणगी जमली व ती दादासाहेब करंदीकरांना खजिनदार नेमून त्यांचे ताब्यांत दिली. एका सल्लागार मंडळाचीही नेमणूक करून घेतली. अशा रीतीनें २२ ऑक्टोबर रोजीं शाळेची सुरवात केली. १ नोव्हेंबरपासून नियमित वर्ग सुरू करण्याचें जाहीर करून हिंगण्याचें सामानसुमान आवरून सातारला आणण्यासाठीं मी पुण्यास परतलें.

# कन्याशाळा भाग तिसरा : : ११

## वाढ-विस्तार

परदेशीं जाण्यासाठीं म्हणून बेत ठरवावा व धक्क्यावर जावें तेव्हां, आपल्या बेताचें स्वागत करणारी, आपणांस प्रवासास जरूर ती मदत करणारी व निरोप द्यावयास येणारी इतकी मंडळी भेटतात व बोटी-पर्यंत येतात, कीं परदेशगमन ही शेवटीं एकट्यानें करावयाची गोष्ट आहे याचीही बोट सुटेपर्यंत विस्मृति होते. बोट आणि बंदर यांना जोडणारी शिडी काढून घेतली, बोट हळूहळू धक्का सोडून मागें सरूं लागली, आणि आतांपर्यंत अदृश्य असलेला बोट व धक्का यांमधील समुद्राच्या पाण्याचा रुंदावत जाणारा पृष्ठभाग दिसूं लागला, तरीही समोर आप्तेष्टजनसमुदाय व त्यांचे उडणारे हातरुमाल दिसत असतातच. अर्थात् तोंपर्यंत ही एकाकीपणाची जाणीव इतकी तीव्र नसते. पण एकदां का बोट भरसमुद्रांत गेली, मुंबई बंदर दिसेनासें झालें, म्हणजे मात्र आतां आपण व आपली कर्तबगारी– हल्लीं मला यांत दैवाचीही भर घालवीशी वाटते– येवढेंच उरलों आहोंत ही जाणीव येते, मन उदास होऊन जातें, व जबाबदारी जाणवूं लागते. तशी स्थिति साताऱ्याहून परत येतांना माझी झाली.

कन्याशाळेच्या स्थापनेची कल्पना निघाल्यापासून मंडळींची तिला सहानुभूति मिळाली, सभा झाल्या, पैशाची मदतही मिळाली, त्यामुळें हें काम आपण एकट्याच जबाबदारी घेऊन करीत आहोंत याचीही थोडा वेळ विस्मृति पडली. शाळेचा मुहूर्त केला, आठ दिवस शाळेला सुटी देऊन १ नोव्हेंबरला शाळा व्यवस्थितपणें चालू होईल असें मुलींना सांगितलें, व हिंगण्याचें माझें सामान आवरून साताऱ्यास नेण्यासाठीं आण्णांचे बरोबर पुण्यास आलें. पण परत येतांना मात्र माझी स्थिति भरसमुद्रांत पडल्यासारखी झाली. अभिनंदन करणाऱ्यांचें, पैशाची व इतर मदत देऊं करणाऱ्यांचें काम आतां संपलें होतें. आणि त्यांच्या व माझ्यामधील अंतर रुंदावूं लागलें होतें. मनांत येत होतें कीं, आतां इतकी मदत मिळूनही जर शेवटीं शाळा चालली नाहीं, तर आपल्याला काम करतां येत नाहीं असें होईल. काम नीट होण्यासाठीं काय काय केलें पाहिजे याचाही बारकाईनें मनाशीं विचार केला, व स्टेशनवरून घरीं येतांना आण्णांना त्याप्रमाणें सांगितलें.

आण्णांचा दररोज फिरावयास जाण्याचा नेम. साताऱ्याहून निघालें त्या दिवशीं सकाळीं त्यांचें फिरावयास जाणें राहिलें होतें, तेव्हां पुण्यास स्टेशनवर उतरतांच टांगा न करतां पायीं घरीं जावयाचें आम्हीं योजिलें; म्हणजे पुन्हा फिरावयास जाणें नको. या वेळीं परत येत असतां मीं आण्णांना म्हटलें, "आण्णा, एकदां जबाबदारी घेतली म्हणजे मनुष्य आपोआप वेगळ्या दृष्टीनें विचार करूं लागतो. तुम्ही सर्व मला 'व्यवहारी अपूर्णांक' म्हणजे केवळ कल्पनासृष्टींत वावरणारी समजतां, व तशी कांहीं अंशीं मी आहेही. नेहमीं मी म्हणत असतें कीं, स्वतःला पटेल त्याप्रमाणें वागावें, लोकमताकडे त्या वेळीं पाहूं नये. पण आतां साताऱ्याला गेल्यावर मात्र मला लोकमताचा जास्त विचार करावा लागेल. केवळ लोकांच्या मदतीवर शाळा चालवावयाची, तेव्हां स्त्रीशिक्षणाकडे लोकांचें मन वळविणें हें माझें ध्येय ठेवून इतर बाबतींत

लोकमताशीं होणारे खटके टाळावे लागतील. सर्व शक्ति केवळ स्त्री-शिक्षण लोकप्रिय करण्याकडेच खर्च करावी लागेल. अर्थात् कांहीं ठिकाणीं स्वतःस पटेल तेथें लोकमताच्या विरुद्धही वागावें लागेल. पण प्रत्येक गोष्ट स्वतःस पटते म्हणून करून चालणार नाहीं."

याच धोरणानें पुढें सातारची शाळा मीं चालविली. कांहीं ठिकाणीं हे अडाखे चुकले, व जी गोष्ट आपण मोठ्या विचारानें करावी तीच अविचाराची ठरावी असेही कांहीं अनुभव आले. एकच लहान उदाहरण पुरेल. सातारचे लोक एकंदरींत जुन्या वळणाचे. पुण्याच्या व हिंगण्याच्या शाळांतून संमेलनप्रसंगीं ज्या प्रकारचे संवाद व नाट्यप्रवेश केले जातात त्यांना अनुकूल अशी जी नेपथ्यरचना केली जाते ती सातारकरांना मानवणार नाहीं हा विचार आला. अर्थात् संमेलन व त्यांतील नाट्यप्रवेश हीं शाळेच्या कार्यक्रमांतील फार गौण अंगें. या बाबतींत सातारकरांना दुखवावयाचें नाहीं असें मनानें ठरवून दोन-तीन वर्षें अगदीं साधे असे संवाद शोधून काढले. त्यांपैकीं एक कोळी व माशी यांचा संवाद होता. हुजुरपागेंत मराठी प्राथमिक इयत्तांच्या मुलींनीं तो बसविलेला मीं पाहिला होता व म्हणूनच अत्यंत निर्दोष म्हणून मीं तो पसंत केला. परंतु पुढें त्या संमेलनावर मोठा गहजब होऊन, संवादांची निवड नीट केली गेली नव्हती असें मला सांगण्यांत आलें. दोषास्पद संवाद कोणता? म्हणून विचारतां कळलें कीं, 'कोळी आणि माशी'. पाहणाराच्या दृष्टिकोनाप्रमाणें त्यांतून विकृत व्यंजनार्थ निघूं शकतो हें खरें; पण टीका झाल्यावर तो माझ्या ध्यानीं आला. आजच्याप्रमाणें त्या वेळींही तो संवाद मला निरागस व इंग्लिश पहिली-दुसरीच्या मुलींनीं करण्यास योग्य वाटला तरी, लोक-मताची नाडी मला बरोबर न कळल्यामुळें त्या वेळीं मी 'व्यवहारी अपूर्णांक' ठरलें. हा नुसता नमुना झाला. अशा अनेक प्रसंगांतून मला जावें लागलें. तें सांगण्याचा मोह होत असूनही औचित्याच्या दृष्टीनें तो भाग सोडून दुसरीकडे वळावेंसें वाटतें.

शाळेला सुरवात झाली ती दादासाहेब करंदीकर यांचे बंगल्यांतील दोन खणांच्या माडींत. ऑक्टोबर महिन्याचे दिवस. नवीन वर्षाची सुरवात व्हावयाची पुढील वर्षाच्या जूनमध्यें. तेव्हां मग मुली येऊन अभ्यासक्रमास सुरवात. पण लोकमत तयार करण्यास पहिले सहा महिने उपयोगी पडतील या दृष्टीनें ही सुरवात केली होती. त्यामुळें कांहीं कोणत्याच शाळेंत न जातां घरीं राहिलेल्या व दोघी राष्ट्रीय शाळेंतील, कन्याशाळेस मदत म्हणून आलेल्या, येवढ्या सहा सात विद्यार्थिनी १ नोव्हेंबर रोजीं शाळेंत आल्या. अभ्यासक्रमाप्रमाणें पारखून त्यांची तीन वर्गांत वाटणी केली; व पहिलींत तीन, दुसरींत तीन व पांचवींत एक अशीं विभागणी होऊन वर्ग चालू झाले. राष्ट्रीय शाळेनें दोन बैठे बाक व एक डेस्क आम्हांस दिलें होतें त्यावर हे वर्ग बसत. एक मोडकें टेबल करंदीकरांचे माडींत पडलेलें होतें तें शाळेचें ऑफिस! पाणी पिण्याच्या तांब्यावर ठेवलेलें भांडें ही घंटा! आणि स्वतः सुपरिंटेंडेंट् हीच घंटा देणारी व इतर कामें करणारी मोलकरीण! अशा थाटांत शाळा सुरू झाली. परंतु तीन वर्ग एका शिक्षकाला एकदम घेणें शक्य नाहीं म्हणून आणखी दोन शिक्षक मिळविण्याच्या खटपटीस मी लागलें, व सुदैवानें मला ते लाभलेही पण. सातारचे वयोवृद्ध मराठी शाळेचे हेडमास्तर रा. रा. वामनराव देशपांडे यांचा व आमच्या देशपांडे घराण्याचा फार जुना ऋणानुबंध. आमच्या घरच्या दोन पिढ्यांना त्यांनीं शिकविलेलें, व एकमेकांनीं एकमेकांचा शब्द कधीं खालीं पडूं दिलेला नाहीं. या वेळीं ते वयोवृद्ध व थकलेलेच होते. तरी पण मीं विनंति केली व त्यांनीं ती मान्य करून माझे शाळेंत कांहीं तास विनावेतन काम करण्यास सुरवात केली. त्यामुळें इंग्लिशखेरीज इतर विषयांची काळजी उरली नाहीं. दुसरे शिक्षक माझेच एक आप्त रा. वि. के. महाबळेश्वरकर. यांचें प्रीव्हिअसपर्यंत शिक्षण झालें असून हे मुंबईस आर्यन् एज्युकेशन शिक्षणमंडळाचे शाळेंत होते. प्रकृतिनिमित्त या वेळीं ते सातारला आले होते. त्यांचीही जोड या वेळीं शाळेस मिळाली ती आजतागायत चालू आहे. या-

शिवाय श्री. कमलाबाई भावे यांनींही दोन महिने मुद्दाम इंदुराहून येऊन शाळेंत शिकविलें.

पहिल्या सहामाहीची याप्रमाणें तरतूद झाली खरी; पण खरी सुरवात जून १९२३ पासून व्हावयाची. तेव्हां त्या वर्षाची तजवीज कशी करावी या विचारांत मी होतें. विद्यार्थिनी व पैसे दोहोंची भिक्षा मागावयाची! तेव्हां आपल्या बरोबरीनें भिक्षा मागणारे शिक्षक तरी असे असावेत, कीं जे आपल्या ध्येयाशीं समरस होतील, असें मला वाटे; व त्यासाठीं माझ्या सहव्यवसायी मित्रमंडळाकडे मी पाहूं लागलें.

कांहीं कालखंडांचें महत्त्व त्यांच्या लांबीरुंदीपेक्षां त्यापासून उत्पन्न होणाऱ्या परिणामांवरून ठरवावें लागतें. तसें माझें हिंगण्याच्या बाबतींत झालें, शिक्षणासाठीं कॉलेजचीं तीन वर्षें व पुढें शिक्षक व बोर्डिंग सुपरिंटेंडेंट् म्हणून वर्ष-सवावर्षच मी तेथें होतें. पण त्या काळांत मनांत रुजलेलीं ध्येयें व वाढलेले स्नेसंबंध चिरकाल टिकणारे झाले म्हणण्यास हरकत नाहीं. शिक्षणाचें कार्य हें जसें आयुष्याचें ध्येय ठरलें तसेंच मित्रपरिवारही सदोदित पाठीराखा होईलसा मिळाला. ज्या वेळीं सातारच्या कन्याशाळेची जबाबदारी घेण्याचें मीं आण्णांना अभिवचन दिलें त्या वेळीं माझे मित्रमंडळापैकीं कोणाचाच सल्ला मला घेतां आला नाहीं. दिपवाळीचे सुटींत सर्व घरोघर गेलेले! कन्याशाळेची सुरवात त्यांना प्रथम वर्तमानपत्रावरूनच कळली. तरी पण स्वतःची कार्यक्षमता अजमावतांना माझ्या मित्रांची मदत मला मिळाल्याखेरीज राहणार नाहीं ही माझी मनोमन साक्ष होतीच व ती खरी ठरली. माझ्या साहाय्यास येणाऱ्या साहाय्यकांची माहिती पुढें स्वतंत्र तऱ्हेनें सांगणें बरें!

## कन्याशाळेचें ध्येय व धोरण

महिला विद्यापीठाची कल्पना लोकप्रिय करावयाची यासाठीं कन्याशाळेची स्थापना केली. अर्थात् विद्यापीठाच्या परीक्षांसाठीं विद्यार्थिनी तयार करावयाच्या हें ध्येय. जिल्ह्याचे ठिकाणीं अशी स्वतंत्र

शाळा काढावयाचा प्रयोग नवीन म्हणून कितपत यशस्वी होईल याची कोणालाच खाली सांगतां येत नव्हती. याकरितां शाळेसाठीं 'मंडळ' स्थापून तें रजिस्टर करण्याचाही त्या वेळीं विचार झाला नाहीं. एक सल्लागारमंडळ मला सल्लामसलत देण्यास नेमण्यांत आलें होतें. शाळा टिकणार असें वाटल्यानंतर पुढें दुसरे वर्षाचे शेवटीं मंडळाची रीतसर निवडणूक करून तें नोंदविण्यांत आलें.

माझ्या ध्येयभूत कल्पनांत सरकारी मदत न घेतां शाळा चालविणें ही एक कल्पना होतीच. कारण हिंगण्याचे कॉलेजांत जातांना त्या संस्थेबद्दल मला आवडणारी एक गोष्ट म्हणजे आश्रमानें तोंपर्यंत कोणत्याही तऱ्हेची सरकारी मदत घेतलेली नव्हती. पुढें मी कॉलेजांत असतां एकदां इन्स्पेक्टरसाहेब शाळा व कॉलेज पाहावयास आले, व आजन्मसेवकांबरोबर या शिक्षणप्रयोगाबद्दल चर्चा चालली असतां त्यांनीं प्रश्न टाकला कीं, " इतका अभिनव प्रयत्न शिक्षणक्षेत्रांत तुम्ही करतां आहांत, कीं सरकार तुम्हांस खात्रीनें मदत करील. तुम्ही मदत मागत कां नाहीं ? "

आजन्मसेवकांपैकीं एक उत्साहाचे भरांत बोलून गेला कीं, " तुम्ही मदत द्याल तर आम्ही अवश्य मदत घेऊं." आणि व मग आजन्मसेवकमंडळाला या प्रश्नाचा विचार करणें प्राप्त झालें.

आजन्मसेवकांतही शेवटीं निर्णय झाला तो हाच कीं, सरकारकडे मदतीसाठीं तूर्त अर्ज करूं नये. ज्याप्रमाणें राजकारणांत न पडतां तटस्थ राहण्याचें आपलें धोरण आपण ठेवलें आहे, त्याचप्रमाणें सरकारकडून मदत घेऊन त्यांच्या शासनाखालीं आपण न जातां हा प्रयोग तटस्थ राहून करावा. पण हा निर्णय होईपर्यंत मध्यंतरीच्या काळांत ग्रँट घ्यावयाची कीं नाहीं या प्रश्नाच्या चर्चेनें वातावरण दुमदुमलें होतें. मी विद्यार्थिनी खरी, पण मजकडे चालक मंडळी भावी कार्यकर्ती या दृष्टीनें पाहत, व मलाही युनिव्हर्सिटीच्या प्रत्येक हालचालीकडे लक्ष द्यावेंसें वाटे. एक दिवशीं मला अतिशय वाईट वाटलें व मी

आण्णांना जाऊन भेटलें. मीं त्यांना म्हटलें, " आण्णा, मी विद्यार्थिनी खरीच पण बोलल्याखेरीज राहवत नाहीं. तुम्ही खरंच ग्रँट घेणार का ? दुसरीं कॉलेजें सोडून मी इकडे आलें ती, येथें 'राष्ट्रीय शिक्षण' सरकारचें शासन नसलेलें मिळेल असें मला वाटलें म्हणून."

आण्णा म्हणाले, " बाई ग ! मी सुद्धां तुझ्याइतकाच सरकारी ग्रँट घेण्याच्या विरुद्ध आहे. मी शक्य तितका विरोध करीन. पण संस्था बंदच पडण्याची वेळ आली तर माल सरकारी ग्रँट घेईन. पण त्यांत मला आनंद नाहीं. मदत न घेण्याची पराकाष्ठा करीन येवढें आश्वासन मी तुला देतों."

त्या वेळीं आश्रमाच्या चालकमंडळींतही तूर्त ग्रँटसाठीं प्रयत्न करूं नये असा निर्णय झाला; तसेंच पुढें विद्यापीठाच्या सेनेटनेंही सरकार-मान्यता मिळविण्याचा प्रश्न तहकूब केला होता.

सातारची शाळा सुरू करतांना माझी मनापासून इच्छा ही होती कीं, सरकारी मदत घेतल्याशिवाय शाळा चालवितां यावी. पण शाळा चालविली तर सरकारी मदत न घेतां चालवीन नाहीं तर बंद करीन, अशी मात्र माझी भूमिका नव्हती. मी एक आश्रमाची आजन्मसेविका होतें आणि राजकीय बाबतींत तटस्थतेची भूमिका राखण्यास बांधलेली होतें. सरकारी मदत न घेण्याचा निर्णय जाहीर करून शाळेस सुरवात करतें तर, तटस्थता मीं सोडली असा आक्षेप मजवर आमच्या मंडळाकडूनच आला असता. शिवाय माझी सातारला नेमणूक आश्रमानें मला परवानगी दिली म्हणून झालेली. आश्रम मला परत बोलावून घेता तर माझें काम अर्धवट राहावयाचें व धोरणही तसेंच सुटावयाचें ! आण्णांचा व सातारच्या सल्लागार-मंडळाचा कलही सरकारी ग्रँट घेऊं नयेच असा नव्हता. म्हणून 'सरकारी मदत न घेतां शाळा चालवितां आली तरच चालवावयाची नाहीं तर बंद करावयाची' अशी भूमिका मीं स्वीकारली नव्हती. इच्छा अशी कीं, आण्णांनीं सातारचें काम सर्वस्वी माझेवर सोपविलें

आहे. मी जर भरपूर वर्गणी जमवूं शकलें व थोड्या पैशावर स्वार्थत्यागानें काम करणारा शिक्षकवर्ग मिळवूं शकलें तर आपोआप शाळा स्वावलंबी होईल, व हें मीं करून दाखविल्यावर आण्णा, सल्लागारमंडळ अगर आजन्मसेवकमंडळ मला ग्रँट घ्याच असें म्हणणार नाहींत. तेव्हां आधीं उगीच वाद कां?

शाळेला सुरवात झाली त्या दिवशींच हा प्रश्न निघाला. आण्णा, बनुताई, घाणेकर, वाग्भट व मी अशी मंडळी माडीवर जमलों होतों. बोलतां बोलतां आण्णा म्हणाले, "हें पहा कमलाबाई! तुझी शाळा वर्षभर चालते असें झालें, कीं शाळा रजिस्टर करून शाळाखात्याकडून मदत मिळविण्याच्या खटपटीला लाग." १९२२ साल म्हणजे असहकारितेच्या चळवळीचा भर असलेले दिवस. घाणेकरांची राष्ट्रीय शाळा जोमांत चालू होती आणि ती टिकवितां येईल असा त्यांना विश्वास वाटत होता. आण्णांचे शब्द ऐकतांच घाणेकर एकदम उसळून मला म्हणाले, "तुम्ही असें जर कांहीं करणार असाल तर तुमचें आमचें जमणें शक्य नाहीं. तुम्ही सरकारी मदत न घेण्याचें आश्वासन द्याल तरच आम्ही मदत करूं."

"सरकारी मदत न घेण्याची पराकाष्ठा मी करणार असलें तरी, सरकारी मदत न घेण्याचा प्रसंग येण्यापेक्षां शाळा बंद करीन असें मी जाहीरही करीत नाहीं व म्हणतही नाहीं. माझी भूमिका ही आहे. तुम्हांस मदत करणें असेल तर करा; नाहीं तर माझ्या शक्तीनुसार जेवढें करतां येईल तेवढें करून मी शाळा चालविण्याचा प्रयत्न करीन." मीं उत्तर दिलें.

घाणेकर म्हणाले, "मग जितके दिवस तुमच्या शाळेस सरकारी मदत नसेल तितके दिवस आम्ही मदत करूं."

आणि तो वाद तितकाच राहिला.

शाळेला दोन वर्षें पुरीं झालीं त्या वेळीं वाढदिवसाचे समारंभास दरवर्षाप्रमाणें आण्णा आले होते. ते म्हणाले, "सुरवातीला वर्गणी

मिळाली तरी नेहमीं लोकांचेकडून पैसे मिळून शाळा चालणें कठीण. तरी शाळाखात्याकडे अर्ज करून मान्यता व ग्रँट यांचेसाठीं आतां-पासून खटपटीस लाग."

वर्गणी मिळविणें सोपें नसतें हें जरी मला अनुभवानें कळे, तरी अजूनही वाटे कीं, वर्गणी व महिलाविद्यापीठाची मदत यावर शाळा स्वावलंबी करतां येईल. माझी उमेद अजून खचली नव्हती. मीं म्हटलें, "हें कठीण आहे हें दिसत असलें तरी मला आणखी थोडा प्रयत्न करूं द्या. माझी खात्री पटली कीं हें जमत नाहीं, तर मी सरकारी मदतीकडे वळेन. पण मीं माझी पराकाष्ठा केली हें समाधान वाटण्या-इतका प्रयत्न मला करूं द्या."

"खुशाल कर." आण्णा म्हणाले, "आजच्या सभेंत लोकांना मी मदतीसाठीं विनंति करतों. विनंतीला जोर येण्यासाठीं माझे स्वतःचे शंभर रुपयेही देतों. पण मला वाटतें कीं, शेवटीं तुला सरकारी मदती-कडे वळावें लागेल."

त्या दिवशीं सभेमध्यें आण्णांनीं स्वतःची शंभर रुपयांची देणगी जाहीर केली व लोकांना शाळेला मदत करावयाची विनंति फार कळकळीनें केली. यानंतर सरकारी मदतीकडे न वळतां शाळा चाल-विण्याची खटपट आणखी तीन वर्षें मीं केली. पण शेवटीं हे प्रयत्न पुरे पडणार नाहींत असें मला आढळून आलें, व सहाव्या वर्षी शाळेनें सरकारी मदत घेतली.

शाळेला सुरवात करतांना आण्णांचा सल्ला असा होता कीं, एक एक जरी विद्यार्थिनी मिळाली तरी वरची इयत्ता काढावी व एन्ट्रन्स-ला विद्यार्थिनी पाठवाव्या. एन्ट्रन्सला विद्यार्थिनी जाऊं लागल्या म्हणजे शाळेची हायस्कूलपर्यंत प्रगति झाली असें मानून विद्यापीठाकडून ग्रँट देववितां येईल. या दृष्टीनें एक-दोनच विद्यार्थिनी मिळाल्या तरी त्यांचा वर्ग चालवून विद्यार्थिनी तयार करण्यांत आल्या. १९२५ मध्यें सौ. मालती काळे ही पहिली विद्यार्थिनी एन्ट्रन्स परीक्षा पास झाली.

त्याबरोबर विद्यापीठाकडे मान्यता व मदतीसाठीं अर्ज केला व विद्यापीठानें दोन्ही देऊन शाळेस स्थिरता येण्यास मदत केली. पुढें दरवर्षी विद्यार्थिनी परीक्षेस पाठविण्याची ही प्रथा चालू ठेवण्यास वेगवेगळे प्रयत्न करावे लागले. कन्याशाळेंत मराठी, गणित वगैरे शिकवावयास नेमण्यांत आलेल्या थर्ड इअर ट्रेन्ड शिक्षिका श्री. सीताबाई आडये यांची इंग्लिश शिकावयाची उमेद होती. तसेंच सातारा शहर म्यु० शाळेच्या हेडमिस्ट्रेस श्री. सोनूबाई कोल्वडेकर याही परीक्षेस बसण्याचा विचार करीत होत्या. दोघी काम करणाऱ्या शिक्षिका; तेव्हां त्यांच्यासाठीं सकाळीं वेगळा वर्ग चालवीत होतों. १९२२ सालीं शाळा सुरू झालेली; दरवर्षी एकएक इयत्ता वाढवीत गेलें म्हणजे पहिली एन्ट्रन्स परीक्षा २८-२९सालीं व्हावयाची. पण आम्हांस तर शक्य तितक्या लवकर म्हणजे १९२५ सालीं मुली एन्ट्रन्सला पाठवावयाच्या होत्या; त्यासाठीं अशा विद्यार्थिनी तयार कराव्या लागत. आणखी एक विद्यार्थिनी अशीच 'मागून आणली' होती. नेहमींप्रमाणें माझ्या घरची मदत येथेंही मला मिळाली. माझ्या एका पुतण्याचें त्याच वर्षी लग्न झालें असून ती मुलगी म्हणजे सौ. मालती देशपांडे, सांगलीच्या शाळेंत इंग्लिश सातवींत जाऊन तिनें पुढें शाळा सोडली होती. तिला शिकण्याची हौस व मला शिकविण्याची हौस. तिचे सासरे व माझे दीर आप्पासाहेब देशपांडे यांचेशीं पत्रव्यवहार करून तिनें सातारला यावें व उरलेली इयत्ता पुरी करावी असें आम्हीं ठरविलें. तिला प्रश्न पडला ऐच्छिक विषय काय घ्यावा? शेवटीं भूगोल हा ऐच्छिक विषय तिनें निवडला. अर्थात् तिला शिकविण्यासाठीं मला आधीं तो विषय तयार करावा लागला. मी शिकविणारी भली व ती शिकणारी भली! पण शेवटीं दोघींच्या प्रयत्नांस यश येऊन ती त्या वर्षी स्कूल लीव्हिंग सर्टिफिकेटची परीक्षा पास झाली. विद्यार्थिनी मिळविण्याचे व तयार करण्याचे हे प्रयत्न आठवले म्हणजे आतां हसू येतें. पण हौसेला मोल नाहीं. शिवाय आनंदाची गोष्ट म्हणजे माझे सहव्यवसायी शिक्षक रा. महाबळेश्वरकर, क्षीरसागर वगैरे सर्वच

त्या वेळीं या कामीं उत्साहानें मदत करीत. कारण सर्वांची इच्छा एकच व ती म्हणजे शाळेला लवकर हायस्कूलचा दर्जा मिळून विद्यापीठाची मान्यता मिळावी.

मला वाटत असे कीं, मुंबई विद्यापीठाला जोडलेल्या शाळांना तरी एकच 'ग्रँट्-इन्-एड्' म्हणजे सरकारी शाळाखात्याची मदत असते. तशीच आमचे शाळेस आमच्या विद्यापीठाची ग्रँट्-इन्-एड् मिळेल. एक तिसरा हिस्सा तो, एक तिसरा हिस्सा मुलींची फी, व एक तिसरा हिस्सा लोकांची वर्गणी यावर शाळा चालवितां येईल व सरकारी मदतीकडे वळण्याचें कारण पडणार नाहीं. फीचें उत्पन्न, मुलींची संख्या वाढून तिसरा हिस्सा होईपर्यंत शिक्षकांच्या व माझ्या पगाराचा अंश आम्ही शाळेस मदत म्हणून परत देऊं. परंतु पांच वर्षांच्या शेवटीं जेव्हां पांच वर्षांत मिळालेली देणगी, ती मिळविण्यास खर्ची पडणारे परिश्रम, व प्रत्येक ठिकाणीं पैशाच्या अपुरेपणामुळें होणारी ओढ व त्यामुळें शिक्षणावर होणारा परिणाम- या सर्व गोष्टींचा विचार केला, तेव्हां या मार्गानें जाणें शक्य होणार नाहीं असें वाटून मी सरकारी शाळाखात्याच्या मान्यतेकडे व मदतीकडे वळलें. पांच वर्षांत सुमारें दहा हजार रुपये वर्गणी गोळा केली. पहिल्या दोन वर्षांत सातारची वर्गणी पुष्कळ होती. पण पुढल्या वर्षांत सातारा जिल्ह्यांतील इतर गांवें, तसेंच मुंबई इलाख्यांतील व मराठी भाषा बोलली जाणाऱ्या इतर प्रांतांतील शहरांतून वर्गणीस जावें लागे. अशा शाळेचा प्रयोग अजून लोकांना नवीन असल्यानें लोक जरी वर्गणी देत, तरी किती दिवस असें चालेल हा प्रश्न होताच! त्या त्या गांवीं अशा शाळा निघाल्यावर साहजिकच मदत तिकडे गेली असती. शिवाय सातारा शहरांतील मुलींची शाळा-जिचा कराचीच्या अगर हुशंगाबादच्या मुलींना उपयोग होण्याचा संभव नाहीं- तिला कराची व हुशंगाबादच्या लोकांनीं मदत कां द्यावी असा प्रश्न पुढेंमागें निघाल्याखेरीज राहता ना! सातारा जिल्ह्यांतील तरी मुलींना उपयोग व्हावा या दृष्टीनें दोन वर्षांनंतर शाळेला वसतिगृहाची

जोड दिली. दहाबारा विद्यार्थिनी त्यांत आल्या, व दुसऱ्या सहाध्यापिका कृष्णाताई सीताबाई आणि मथूताई यांच्या मदतीनें तें चालविलें. तरी प्रत्येक ठिकाणीं अडचण येई ती पैशाची. अशी सुरवात करावयाची म्हणजे प्राथमिक खर्च लागतो. थोडें सामान, भांडीं व एक सोइस्कर घर एवढें तर हवेंच! देखरेख करणाऱ्या मेट्रनला कांहीं सन्मान्य वेतन तरी हवें. पण कांहींच नव्हतें. शाळेच्या जागेंतच शाळा सुटली म्हणजे वसतिगृह होई. किंवा वसतिगृहाचे जागेंतच शाळेचे वर्ग बसविले जात असें म्हणणें अधिक योग्य. जरूर तीं भांडीं डॉ. आगाशे यांनीं विकत घेऊन दिलीं व वसतिगृह बंद झाल्यावर तीं त्यांचेकडे परत केलीं. मेट्रनचें व सुपरिंटेंडेंटचें काम हीं हौसेचीं; पण या वेळचा कष्टाचा खराच पण आनंदाचा काळ अजूनही मिळाला तर हवासा वाटतो! संध्याकाळची प्रार्थना, सकाळचें प्रभातमंडळ, अजूनही एकादे वेळीं घेण्याची आठवण होते. पण नुसत्या हौसेनें होणाऱ्या कामांना शेवटीं मर्यादा पडते. जर मजजवळ वसतिगृहावर प्राथमिक खर्च करण्यास पैसे असते तर तें जास्त आकर्षक व रमणीय करतां आलें असतें. शाळेच्या खर्चाचीं दोन्ही तोंडेंच मिळवतांना जेथें विचार पडे, तेथें वसतिगृहावर जास्त खर्च कोठून करणार?

जी स्थिति वसतिगृहाची तीच शाळेची. शिक्षकवर्ग उत्साही असला तरी पैसे मिळवावयाची जबाबदारी घेणें कोणास शक्य होत नव्हतें. कमी पगारावर प्रथम काम करावयास त्यांनीं सुरवात केली, तरी किती वर्षें करणार? शाळेची सांपत्तिक स्थिति सुधारून आपले पगार पद्धतशीर सुरू व्हावें असें पुढें त्यांना वाटणारच. अशा स्थितींत सरकारी मदत न घेण्याचा निश्चय मी पुढें चालविणार म्हणजे शिक्षकांस दुसरीकडे पैसा मिळविण्याची ओढ लागून शाळेंतील कामाकडे लक्ष कमी राहणार. नवीन येणारी मंडळी तज्ज्ञ मिळणार नाहींत. मिळाली तरी एकदोन वर्षांवर टिकणार नाहींत. या सर्वांचा शाळेच्या कार्य-

क्षमतेवर परिणाम होईल असें मला पांच वर्षांच्या अनुभवांतीं वाटलें व मी सरकारी मदत घेण्याकडे वळलें.

व्यक्तिशः मला असेच दिवस–म्हणजे थोड्या पैशावर–काढतां आले असते. कारण माझ्यावरील जबाबदाऱ्या मर्यादित होत्या. पहिल्या दोन वर्षांत मीं कांहींच वेतन घेतलें नव्हतें. पुढें वीस-पंचवीस घेत घेत युरोपला जाते वेळीं मीं शाळा सोडली तेव्हां ३५ रुपये घेत असे. मनानें असा नियम केलेला होता कीं, शाळेंतील इतर शिक्षकांचें जें वेतन त्याहून जास्त घ्यावयाचें नाहीं. बाकीचा पगार परत करावयाचा. इतर शिक्षकांना, ज्यांचा संसार वाढता होता त्यांना, इतका पगार पुरणार कसा? त्यांचें स्केल त्यांना मिळणें अवश्य, असें वाटून मीं माझा सरकारी ग्रँट न घेण्याचा बेत बदलला. मनाला अर्थात् त्या वेळीं अतिशय वाईट वाटलें. माझी पात्रता कमी पडली. भोंवताल-च्या शिक्षकमंडळाच्या मनांत या कल्पना मी रुजवूं शकलें नाहीं. जे कोणी कार्यकर्ते हें करूं शकले आहेत त्यांचेपुढें आदरानें मस्तक लवविण्याची माझी तयारी आहे.

होणाऱ्या खर्चाचा तिसरा हिस्सा इतकें फीचें उत्पन्न होऊं लागल्या-वर पगारभरणा बंद करावयाचा, व पुढें जसजशी मुलींची संख्या वाढेल तसतशी वर्गणी गोळा करणें कमी करावयाचें, असें मी मनाशीं म्हणे. पण मुलींची संख्या जरी त्या वेळच्या परिस्थितीचे मानानें फार चांगली होती– म्हणजे १०० वर गेली होती– तरी अडीचशें-तीनशें मुली होई-पर्यंत उत्पन्नाचा व खर्चाचा मेळ बसणें शक्य नव्हतें. नवीन तऱ्हेचा अभ्यास. त्याकडे विद्यार्थिनींचीं व पालकांचीं मनें वळविणें हें एक काम; व दुसरें म्हणजे शाळेला शिक्षणसाहित्य, कार्यकुशल शिक्षकवर्ग, आणि आकर्षक शाळागृह मिळविणें. शाळेला सुरवात करतांना बाक नसले तर नसले, जागा असेल तशी चालेल, त्यासाठीं अडून बसावयाचें नव्हतें. पण जों जों वर्षें जाऊं लागलीं तसतशी या गोष्टींची जरूरी जास्त वाटूं लागली, व त्यालाच

जरूर तो पैसा मला पुरवितां येत नसे. पहिल्या दोन शाळेच्या जागा जशा मिळाल्या तशा घेतल्या. पहिल्या वर्षी भोरचे श्रीमंत बाबासाहेब पंतसचीव शाळा पाहावयास आले त्या वेळीं चितळे यांचे वाड्यांत शाळा होती. त्यांचा सत्कार करावयाचा तर सलग जागा तर हवी! शाळेच्या वर्गापुढें एक बखळ असून, एक पत्रे झांकण टाकलेली मांडव-वजा जागा होती. ती जागा त्यावर राडेरोडे पसरून आधीं सारखी केली व मग ठोकून त्यावर बैठक घातली. समोर पावसानें चिखल झालेला, तेव्हां अंगणाचे कडेला रचलेल्या मोडक्या विटा पसरून पाऊल-वाट तयार केली. आणि हें गड्यांचें काम पुरें करून मग शिक्षकाचा पेशा स्वीकारून सचिवांचें स्वागत करावयास पुढें गेलों. पुढच्या वर्षी औंधचे श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधि शाळा पाहावयास आले त्या वेळीं समारंभास जागा जरा जास्त बरी होती. म्हणजे त्या वर्षी चितळ्यांचा गोठा म्हणून वापरला जाणारा सोपा आम्हीं भाड्यानें घेतला होता, व म्हणून दगड, राडेरोडे रचण्याची आम्हांस जरूर न पडतां, नुसती जागा सारवून बैठक घालून आमची तयारी संपली! आणखी पुढें दोन वर्षांनीं इचलकरंजीचे अधिपति श्रीमंत बाबासाहेब घोरपडे शाळा पाहावयास आले त्या वेळीं त्याहून शाळा प्रगत स्थितींत होती. त्या वेळीं त्यांचा सत्कार आम्ही सरदार भुसकुटे यांच्या घरांत–उन्हानें पत्रे तापणाऱ्या का होईना–पण माडीवर करूं शकलों.

शाळेची पहिली इन्स्पेक्शन झाली त्या वेळीं असाच स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारावा लागला. शाळेची रंगसफेती दरवर्षाप्रमाणें व्हावयाची पण वाड्याचे मालक परगांवीं. आमचा प्रसंग कारभाऱ्याशीं. पत्र-व्यवहार होऊन काम पार पडतां जिकीर होई. इन्स्पेक्शनची तारीख ठरली, बाकी सर्व तयारी झाली; पण चुना उडालेल्या भिंतींकडे पाहून बरें वाटेना. सर्व शाळा नाहीं पण निदान ऑफिस तरी मनासारखें करावयाचें योजून आदले दिवशीं मी व वसतिगृहांतलि माझ्या एक-दोन विद्यार्थिनी उठलों. चुना विकत आणून दुपारीं चुन्याचे हात

भिंतीला दिले, रात्रीं जमीन व दर्शनी दरवाजाची जागा सारवून घेतली आणि सकाळीं बैठक घालून इन्स्पेक्टरांची वाट पाहत बसलों. सुरवातीच्या वर्षांत हें सर्व ठीक होतें. पण पांच वर्षांनंतर ही स्थिति बदलणें इष्ट होतें. शाळेंत येणाऱ्या मुलींना सुद्धां आपली शाळा नवीन आहे, आपलेजवळ साधनसामुग्री नाहीं हें सांगणें ठीक होतें. पण पुढें योग्य शाळागृह असणें इष्ट वाटे. खोल्यांचा आकार लांबट, चौकोनी, वेळेस कसाही चालेल पण वर उन्हांत फार तापणार नाहीं व पावसांत भिजणार नाहीं अगर कानठळ्या बसविणार नाहीं इतकें चांगलें आच्छादन तर हवें. शाळेस स्वतःची इमारत किंवा भरपूर भाडें देऊन चांगली जागा मिळवितां येईल इतके पैसे हवेत, व शाळेची स्थिति तर हातावर पोट असलेल्या गरीबाच्या कुटुंबाप्रमाणें. शाळेचें काम– साफसफाई राखणें– मोलकरीण करी. तेव्हां कांहीं बाहेरचें काम म्हणजे स्टेशनरी, पुस्तक-खरेदी, पत्रें रजिस्टर करणें, वगैरे कामें मी अगर शिक्षकवर्गच करी. शिक्षकवर्ग उत्साहानें या कामीं मदत करी. पाणी पिण्याचे माठ कुंभारवाड्यांतून स्वतःचे हातानें उचलून आणण्याचीं कामेंही शिक्षकांनीं मजबरोबर केलीं. एकादवेळ त्यांपैकींच एकाद्या शिक्षकाचा स्वाभिमान उसळून येई व तो म्हणे, "हें पहा, 'पत्रें रजिस्टर करणें' हें गड्याचें किंवा कारकुनाचें काम मला सांगू नका. तुम्हीं केळकरांची मुलगी. तुम्ही ग्रॅज्युएट. तेव्हां तुम्ही ज्या वेळीं हीं कामें करतां तेव्हां लोकांना तो स्वार्थत्याग वाटतो. पण आम्हीं हीं कामें केलीं म्हणजे आम्हीं पोटासाठीं करतों असें होतें." असेही नमुने केव्हां आढळत.

शाळेजवळ प्राथमिक खर्च करण्यास जर कांहीं भांडवल असतें तर जागेच्या व साधनसामुग्रीच्या अडचणी पुष्कळ कमी झाल्या असत्या. रोजचा खर्च चालविण्यासाठींच वर्गणी गोळा करीत वर्षभर हिंडावें लागे, व महिन्याचे पगार देऊन झाले म्हणजे अगदीं मोकळें वाटे. ही पगार देण्याची काळजी अगर जबाबदारी मला, बावीस सालापासून पसतीस सालीं शाळा अनाथबालिकाश्रमाच्या मंडळीचे स्वाधीन करीपर्यंत,

म्हणजे सुमारें तेरा वर्षें–परदेशीं गेलेलीं दोन वर्षें वजा करतां अकरा वर्षें–पुरली. पण या सर्व कालांत शिक्षकांना ज्या महिन्याचा पगार त्या महिन्यास दिला गेला. पुढच्या महिन्यापर्यंत थांबविलें गेलें नाहीं. चौतीस पसतीस सालीं फारच हलाखीची स्थिति आली त्या वेळीं स्वतःचे पांचशें घालून व तात्यांचेकडून सातशें रुपये घेऊन पगार पुरे केले.

हातावर पोट भरणाऱ्या मजुरांच्या जीवनाप्रमाणें ठेवलेल्या शाळेच्या या धोरणाबद्दल लोकांत दुमत होई. सातारा न्यू इंग्लिश स्कूलचे माजी सुपरिंटेंडेंट काका देवधर यांची व माझी कांहीं वेळां चर्चा होई. स्त्रियांच्या विद्यापीठाचा हा प्रयोग त्यांना तत्त्वतः पसंत नसे. पण प्रो. कर्वे यांचा व त्यांचा फार जुना ऋणानुबंध. शिवाय मी त्यांच्या न्यू स्कूलमधील वर्षभराची का होईना पण विद्यार्थिनी. मुलांच्या शाळेंत जाऊन हायस्कूलचें शिक्षण पुरें करूं इच्छिणारी स्त्री म्हणजे त्या काळीं विदुषीच समजली जावयाची. तेव्हां त्या दृष्टीनेंही त्यांची प्रथम मजबद्दल व म्हणून पुढें माझे शाळेबद्दल सहानुभूति असे. मला येणाऱ्या अडचणींची मी वारंवार त्याचेजवळ चर्चा करी.

पैशाच्या पुरवठ्याचा आणि तदनुषंगिक अडचणींचा प्रश्न निघाला म्हणजे ते म्हणत, “हें तुमच्या संस्थेचें धोरण चुकतें आहे. तुम्ही आश्रमाच्या आजन्मसेविका; खरोखर त्याचेंच शिक्षणप्रसाराचें काम तुम्ही पुढें करीत आहां. तेव्हां पहिलीं कांहीं वर्षें त्यांनीं तुम्हांस पैशाची मदत करावयास हवी. आमचें न्यू इंग्लिश स्कूल आतां स्वावलंबी झालें आहे. पण त्याला प्रथम पैसा पुरविला तो पुण्याच्या सोसायटीनें. पैसा मिळवूं कसा व महिन्याचे पगार पुरे करूं कसा ही जबाबदारी साताऱ्च्या सुपरिंटेंडेंटवर कधीं नव्हती. माझी भूमिका अशी असे: तुम्हीं पाठविलेंत म्हणून सातारला गेलों. पैसे कमी पडत असतील तर शाळा बंद करावयास सांगा.”

मी म्हणे, “हें तुमच्या बाबतींत ठीक झालें. डी. इ. सोसायटीनें प्रथम शाळा काढण्याचें ठरवून मग तुम्हांस पाठविलें. येथें उलटी

सुरवात झाली आहे. आण्णांना स्फूर्ति झाली. ती पाहून मीं होकार दिला. मागाहून आण्णांनीं आजन्मसेवकमंडळापुढें प्रश्न ठेवून मला सातारला पाठविलें. आधीं खर्चाची चर्चा होती तर कदाचित् मंडळानें शाळा काढण्याचेंच ठरविलें नसतें. आणि ठरविलें असतें, तर मग माझे-वर जबाबदारी टाकली नसती." कारण पैसे खर्चीं टाकण्यायेवढा विश्वास माझे कर्तबगारीवर आजन्मसेवकमंडळ टाकूं शकत अगर इच्छीत नव्हतें. आणि या नव्या योजनेंत हें चांगलें जमलें होतें कीं, शाळा तर निघते आहे; पण एका आजन्मसेविकेला बिनपगारी रजा देण्यापलीकडे कोणतीही जबाबदारी संस्थेवर येत नाहीं. शाळा नीट चालली असती तर आजन्मसेविकेची ती कामगिरीच होती. नसती तर फार तर कमला-बाईना कांहीं करतां येत नाहीं असें ठरून आश्रमाच्या पुण्याईस धक्का लागत नव्हता. आश्रमावर पैशाची जबाबदारी नव्हती– अर्थात् शासन-सत्ता त्यानें आपलेकडे घेण्याचाही प्रश्न उद्भवत नव्हता. या योजनेबद्दल मला तेव्हांही वाईट वाटलें नाहीं व आतांही वाटत नाहीं. कारण पैशाची काळजी माझी कमी झाली असती हें खरें, पण इतर गोष्टींतील काळजी व मनाचा ताण वाढला असता. सर्व गोष्टींची जबाबदारी माझेवरच पडल्यानें आपणास कितपत काम करतां येतें याची माझी मला व इतरांनाही कल्पना आली व माझा आत्मविश्वास वाढला. इतरांनाही माझे हातून कांहीं विधायक काम होऊं शकेल असें वाटूं लागलें व त्याचें प्रत्यंतर पुढील उद्गारांत कळूं लागलें. कारण आमच्या मंडळाचे सभेचे वेळीं उद्गार निघत : " तुम्ही एक एक आजन्मसेवक स्वतंत्रपणें काम करा-वयास पाठवितां व त्यावर आपलें नियंत्रण ठेवीत नाहीं हें चांगलें नव्हे. मध्यवर्ती सत्ता त्यामुळें दुबळी होते. हे आजन्मसेवक आपापलीं राज्यें स्थापून उद्यां शिंदे-होळकर होणार." मलाही रागाची उसळी येई व मी म्हणे, " होय तर ! प्रथम मुलांना सांगायचं वार लावून विद्या करा, आणि त्यांची विद्या होऊन ते स्वतंत्र बनले म्हणजे म्हणायचं कीं, ते आईबापांना मानणार नाहींत. हें दुहेरी कसं चालणार ? प्रथम नाहीं

कोणाला असं वाटलं कीं, कमलाबाईंच्या शाळेला थोडी पैशाची मदत करावी व त्यांची काळजी कमी करावी." पण त्या वेळीं मला स्वतंत्रपणें काम करावयाची संधि मिळाली हेंच ठीक झालें. आजन्मसेवकमंडळाकडून पैशाची मदत झाली असती खरी, पण त्यांचें शासनही त्याबरोबर आलें असतें आणि प्रत्येक बारीक-सारीक गोष्टींत मार्गदर्शनाचा प्रश्न उद्भवून मी नवखी अननुभवी ती शेवटीं तशीच राहिलें असतें.

मनुष्य शहाणा असो कीं वेडा असो, आपल्या कार्याबद्दल थोडीशी निष्ठा त्याचे ठिकाणीं असेल तर, त्याला मोकळें सोडून त्याचे पद्धतीनें त्याला काम करूं द्यावें. म्हणजे प्रत्येक बारीक-सारीक गोष्ट जरी त्याचे हातून निर्दोष झाली नाहीं तरी एकंदरींत कामाची बेरीज बरीच जमेच्या खातीं पडते. आम्ही सहकारी मंडळी जमलों व या मागील गोष्टी निघाल्या म्हणजे मी म्हणतें, "सीताबाई! तुम्ही, मी व बनुताई आपण वेगवेगळ्या ठिकाणीं कामास गेलों हें फार चांगलें झालें. जर आपण हिंगण्यासच राहतों, तर आज एक स्वतंत्र काम पूर्ण केल्याचें समाधान जें आपणांस मिळत आहे तें मिळालें नसतें." सीताबाई म्हणतात, "होय, मलाही प्रथम हिंगणें सोडून मुंबईचें काम घेतांना वाईट वाटलें. पण आज वाटतें कीं, जें होतें तें आपल्या बऱ्याकरितांच होतें." आणि हेंच खरें. कारण आम्ही तिघी म्हणजे बनुताई वेड्या, मी अर्धवट, व सीताबाई चतुर शहाण्या असें बहुमतानें ठरलेलें. बनुताईंना हिंगण्याच्या शाळेचे व बोर्डिंगचे सुपरिंटेन्डेन्ट करून सर्वाधिकार देण्याचा ठरावच बोर्डात पास होता ना! मी अर्धवट व कल्पनेंत वावरणारी तरी मला सर्वाधिकार कदाचित् दिले गेले असते. कारण मी व्याख्यानें देण्यास उपयोगी. शिवाय 'केळकरांची मुलगी'. या बाई आमच्या संस्थेंत काम करीत आहेत हें लोकांना सांगावयास जरा बरें दिसतें. पण यासाठीं जरी मला सर्वाधिकार दिले गेले असते तरी ते मी नीट चालवितें कीं नाहीं हें रोजच्या रोज पाहण्यास

वर एक कमिटी नेमली गेली असती. सीताबाई सर्वानुमतें चतुर व शहाण्या. पण या कल्पनेमुळें त्यांना सर्वाधिकार मिळूनही अशी परिस्थिति हिंगण्यास निर्माण झाली कीं, त्यांना वर्ष दोन वर्षांत तें काम बदलण्याचा प्रसंग आला. या गोष्टीला वीस वर्षें व्हावयाला आलीं. आम्ही तिघी बाहेर पडलों. वीस वर्षांच्या शेवटीं प्रत्येकीच्या नांवें एक हायस्कूल—तीनशेंपर्यंत मुली असलेलें व स्वतःची इमारत असलेलें— जमा आहे! सातारा व बेळगांव येथें शाळागृहें तयार झालीं असून मुंबईसही सीताबाईंच्या हातून इमारत पुरी व्हावी अशीं लक्षणें दिसत आहेत.

एक वर्षानंतर हिंगण्याच्या संस्थेनें प्रि. ना. म. पटवर्धन यांना सातारा कन्याशाळेची इन्स्पेक्शन घेण्यास पाठविलें. पुढें एक वर्षानें म्हणजे नोव्हेंबर १९२५ मध्यें ठाकरसी विद्यापीठाचे इन्स्पेक्टर रा. रा. आपटे व भिडे यांनीं शाळेची पाहणी करून शाळेस मान्यता व ग्रँट देण्याबद्दल शिफारस केली. आणि पहिली ग्रँट पांचशें रुपये १९२५ सालीं मिळाली. पुढें १९२७ मध्यें सरकारी शाळाखात्याचे इन्स्पेक्टर रा. रा. चुणेकर व इन्स्पेक्ट्रेस् मिस् पेन यांची पाहणी होऊन सरकारी शाळाखात्याचा पहिला हप्ता हजार रुपये १९२८ सालीं हातीं आला.

अध्यापनक्षमता वाढवावयाची म्हणजे शिक्षकवर्ग अध्यापनशास्त्रांत तज्ज्ञ पाहिजे. सुरवातीला सर्वच मंडळी अनभिज्ञ. सुरवात आधीं सुपरिंटेन्डेन्टपासून. कारण जी. ए. झाल्यावर मी हिंगण्यास एक वर्षच शिक्षकाचें काम केलें होतें, आणि शिक्षणशास्त्राचा अभ्यास व अनुभव दोन्ही माझे खातीं जमा नव्हता. म्हणून सर्वांनाच या दृष्टीनें मदत द्यावयाचें ठरवून, तेथील ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपल् रा. रा. ना. ग. गाडगीळ यांचे देखरेखीखालीं आदर्शपाठांना मीं सुरवात केली. ही प्रथा पुढें दोन-तीन वर्षें चालू होती; व ट्रेनिंग कॉलेजचे पुढील प्रिन्सिपल् रा. रा. रा. स. जोशी, तसेंच शिक्षक रा. रा. किराणे, यांनींही या बाबतींत आम्हांस फार मदत केली. इंग्लिशखेरीज इतर विषयांना थर्ड इअर ट्रेन्ड अशा पेन्शनर शिक्षकांचा फार उपयोग होई. याखेरीज

व्हर्नाक्युलर फायनल परीक्षा, ड्रॉइंगच्या परीक्षा, नमस्कारांचे सामने, वक्तृत्वोत्तेजक समारंभ अशा ठिकाणीं विद्यार्थिनी पाठविल्या जात. गायनाचा शिक्षणक्रम रा. मटांगे यांच्या देखरेखीखालीं चांगला चालला असून ऐच्छिक गायन विषय बराच लोकप्रिय होत होता. १९२८ सालीं हिंगण्यास आण्णांची सत्तर वर्षांची ज्युबिली झाली त्या वेळीं विद्यापीठाच्या सर्व शाळांमधील विद्यार्थिनींच्या अनेक प्रकारच्या चढाओढी झाल्या. त्यांत गायन व वक्तृत्व यांत साताराच्या कन्याशाळेच्या मुली— अनुक्रमें कु. चंपा शाळिग्राम व कु. सीता उमराणी— यांना बक्षिसें मिळालीं.

म्हणतात ना, कीं 'लग्न पहावं करून व घर पहावं बांधून!' तसं मला म्हणावंसं वाटतं कीं, 'शाळा पाहावी काढून!' एकदां सुरवात केल्यावर कळतें. मोठ्या गोष्टींबरोबरच इतक्या बारीक बारीक गोष्टींकडे लक्ष द्यावें लागतें कीं सांगतां येत नाहीं. माझें अक्षर पहिल्यापासून फारसें चांगलें नव्हतेंच, व त्याहून वाईट हें कीं, चांगलें अक्षर असणें जरूर आहे असें मला वाटत नव्हतें! मोठ्या लोकांचीं अक्षरें वाईट असतात; तेव्हां न जाणो बाकीच्या तऱ्हेनें आपण पुढें मोठे झालों तर वाईट अक्षर तेवढें कमी पडूं नये! इतका जरी दूरवर विचार केला नव्हता, तरी 'त्यांत काय आहे एवढें अक्षरांत! पेपरांत विषयाचीं उत्तरें तर आपण चांगलीं लिहूं शकतों ना', अशी सुप्तवृत्ति असणें अगदीं शक्य आहे. पण चांगल्या अक्षराची मला खरी जरूरी पटली ती शाळेस सुरवात केल्यावर. पहिल्यानें मीं मुलींना कॉपी शिकविली त्या वेळीं त्यांचें अक्षर सुधारतांना वाटलें कीं, आपलेंही अक्षर चांगलें नाहीं आणि स्वतःचेंच अक्षर जर चांगलें नाहीं तर मुलींना बोलावयास आपणांस काय अधिकार आहे? पुढें चार महिने मीं खरोखरच कॉपी गिरविली. माझी बहीण वारणी या वर्षी पुण्यासच होती. हें ऐकून ती माझी चेष्टा करी आणि मला पत्रांत लिहीत असे कीं, "आक्का, मला पत्र लिहावयास तुला वेळ नसला तर तुझ्या कॉपी लिहिण्याच्या वेळांत, कॉपीसारख्या अक्षरांतच, मला

पत्र लिही." पण मुलींना सर्व गोष्टी आल्या पाहिजेत, व त्यासाठीं प्रथम त्या शिक्षकाला आल्या पाहिजेत या विचारानें प्रत्येक गोष्ट मीं स्वतः करण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थिनींच्या बरोबर समरस होतां आलें पाहिजे. नुसता गंभीरपणा पुरा पडत नाहीं. हसलें पाहिजे, त्यांच्या करमणुकींत सामील झालें पाहिजे, त्यांच्या कोट्या व विनोद कळला पाहिजे. प्रसंगीं त्यांच्यासारखें हेल काढून व वेडींवाकडीं तोंडें करून त्यांना बोलून दाखवितां आलें तर उत्तमच. विशेषतः खाल-च्या तीन इयत्तांना शिकवितांना याचा फार उपयोग होतो. ध्येय-वादाच्या शिकवणीचा चौथीपासून वरच्या इयत्तांत परिणाम होऊं शकतो. आणि या सर्व गोष्टींच्या अभ्यासानें आनंदी कसें व्हावयाचें हें मी शिकलें व माझ्या जीवनांतील आनंद वाढला. शाळेमुळें विद्या-र्थिनींना आणि शिक्षकांना काय फायदा झाला असेल तो त्यांचा त्यांना माहीत. माझा फायदा झाला तो हा!

कन्याशाळेच्या धोरणाबद्दल कांहीं मतभेद, व्यक्तिविषयक राग-लोभ, व त्यामुळें उठलेल्या लाटा, कांहींना या शिक्षणप्रसारामुळें वाटलेली भीति, व समाजांत स्वस्थता कशी राहील अशी आलेली शंका! यामुळें 'कन्याशाळा ही स्त्रियांना अनीतीच्या मार्गाकडे जोरानें नेणारी मोटारगाडी आहे' येथपर्यंत निघालेले उद्गार! इतकें सगळें वजा घालूनही जमेच्या बाजूला कांहीं उरत होतें व कन्याशाळेची उपयुक्तता लोकांना पटूं लागली होती. याचें प्रत्यंतर म्हणजे मुलींच्या संख्येंतील वाढ व दरवर्षीं गोळा होणारी मदत. मुलींची संख्या इतकी वाढेल हें सुरवातीला मलाच काय पण लोकांनाही वाटलें नव्हतें. सरकारी मदत घेण्याचा प्रश्न सुटेल इतकी वर्गणी जरी जमली नाहीं, तरी जमला तेवढा आकडा चालक व दाते या दोघांच्या अजमासा-पेक्षां जास्त होता. सातारा लोकल बोर्डातील व म्युनिसिपालिटींतील स्कूल बोर्डावर शाळेची सुपरिंटेंडेंट सभासद म्हणून माझी निवडणूक झाली, व कऱ्हाडच्या स्त्रियांतर्फे गणपति-उत्सवाचे वेळीं मला या

कामगिरीबद्दल मानपत्र देण्यांत आलें. गणपति-उत्सवांत कऱ्हाडच्या टिळक हायस्कूलतर्फे होणाऱ्या व्याख्यानमालेंत मी व्याख्यान देणार होतें, व त्या वेळीं कन्याशाळेच्या दहाबारा विद्यार्थिनींना घेऊन पुढें ओगलेवाडीचा कारखाना दाखविण्याचा बेत होता. कऱ्हाडास* आण्णासाहेब शिराळकरांचे येथें जाऊन उतरल्यावर हा मानपत्राचा बेत मला कळला. मला तें पटलें नाहीं. कारण मानपत्र घेण्याइतकी कामगिरी झाली असें मला स्वतःलाच वाटत नव्हतें. पण तेथें जाऊन पोंचल्यावर परत फिरणें शक्य नव्हतें. मानपत्रास उत्तर देतांना दोन गोष्टी मीं सांगितल्याचें स्मरतें : एक म्हणजे माझ्या कामाची सुरवात जरी ठीक झाली होती तरी दोन तीन-वर्षांचा काल त्याबद्दल मानपत्र देण्याघेण्यास अपुरा होता. शिवाय मीं केलेला स्वार्थत्याग खरोखर मला तशी संधि देणाऱ्या देशपांडे मंडळींचा होता.

शाळेला सरकारी मदत घ्यावयाची असें एकदां ठरविल्यावर माझें लक्ष दुसरीकडे वळलें. आतांपर्यंत शाळा चालविणें व पैसे गोळा करणें ह्या दोन्ही जबाबदाऱ्या सुपरिंटेन्डेन्टच्याच होत्या. त्यामुळें सुटींत वर्गणी गोळा करण्यास जावें लागेच, शिवाय शाळा चालू असतांही कांहीं वेळेला जावें लागे. त्यामुळें शाळेच्या अध्यापनांत व्यत्यय येणें अपरिहार्य होतें. पण नेहमीं असा व्यत्यय येऊं देणें बरें नव्हतें. श्री. पार्वतीबाई पळशीकर वर्गणी गोळा करूं लागल्यावर त्यांची आणि थोडी विद्यार्थिनींची मदत होई. तरी पण प्रचाराच्या कामाचा शाळेच्या दैनिक कामावर कांहीं परिणाम होईच. तेव्हां यापुढें हीं दोन्ही कामें वेगळीं करावीं असें मनांत येई. कु. गोदुबाई केतकर, पी.ए., या एक वर्ष शाळेंत शिक्षिका म्हणून होत्या. त्यांनीं एक वर्ष मजबरोबर सुपरिंटेन्डेन्टचें काम करावें, पुढें त्यांचेवर शाळेची जबाबदारी टाकून कन्याशाळामंडळाचे

* कऱ्हाडास गेलों तों हिंगण्याहून वामनराव जोशी आले. ते शिराळकरांच्या मुलांचे समर्थ विद्यालयांतील गुरु. त्यांचेंही व्याख्यान होऊन त्यांनाही मानपत्र दिलें गेलेंसें स्मरतें.

चिटणीस म्हणून मीं राहावें, वर्गणी गोळा करावी, व सातारा जिल्ह्यांत काम करणारी एक संघटनाच निर्माण करावी असें माझ्या मनांत होतें. शाळेला सुरवात करतांना दूर सारलेला पी. ए. चा अभ्यास पुन्हा मनांत डोकावूं लागला होता. चिटणिसाचें काम करून पी. ए. चा अभ्यास करणें शक्य झालें असतें. सातारा कन्याशाळेसाठीं आजन्मसेवक तयार करण्याचा एक लहानसा प्रयत्न यापूर्वीं मीं केला होता. शिक्षण हें जन्माचें कार्य समजून अल्पवेतन घेऊन काम करणारा शिक्षकवर्ग तयार करून त्यांची एक समिति करावयाची, व सातारा जिल्ह्यांतील प्रत्येक तालुक्याच्या गांवीं एक एक कन्याशाळा त्यांच्या मार्फत चालवावयाची असा बेत होता. रा. रा. बापूसाहेब काथवटे यांनीं वाईला कन्याशाळा काढण्याचें योजून मजकडे एका शिक्षिकेची मागणी केली. श्री. कृष्णाबाई वैशंपायन या सातारला विश्रांतीसाठीं आलेल्या होत्या. त्यांनीं वाईला जाऊन शाळेच्या कामास सुरवात केली. सल्लामसलतीसाठीं वाईकर मंडळींनीं मलाही त्यांचे सल्लागार-मंडळांत घेतलें होतें.

सातारला आण्णासाहेब बखले यांचे घरीं केतकर-बहिणी व कृष्णाताई राहत. वाईला कन्याशाळा सुरू झाली. कृष्णाताई शाळा चालविण्यास गेल्या व वाईच्या बखल्यांच्या वाड्यांत त्यांची राहण्याची सोय झाली. मी आण्णासाहेबांना विनोदानें म्हणे कीं, 'आण्णासाहेब, आपण एक परस्पर-करारच करून टाकूं या. सातारा जिल्ह्यांत मी गांवोगांवीं कन्याशाळा सुरू करायच्या. केतकर मुलींनीं अगर कन्याशाळेच्या इतर शिक्षिकांनीं त्या चालवावयाच्या, आणि तुम्हीं घरें विकत घेऊन त्यांत त्यांना राहण्यास जागा द्यावयाची. एकंदरींत मोठा आशादायी काल समोर दिसत असून, त्याच आनंदांत मी होतें.

कल्पनासाम्राज्यामध्यें आनंदांत गेलेल्या काळापेक्षांही जास्त आनंदाचा काळ म्हणजे विद्यार्थिनींबरोबर त्यांना शिकविण्यांत गेलेला. १९२३ सालीं जेव्हां पहिले वर्ग तयार झाले तेव्हां आम्हीं असें ठरविलें होतें कीं, एकेकानें एकेका वर्गाचे मुख्य शिक्षक व्हावयाचें. इंग्लिश विषय

घ्यावयाचा व दरवर्षी त्या वर्गास शिकवीत पुढें जात जात आपण 'ए, बी,सी,' पासून शिकविलेल्या मुली प्रवेशपरीक्षेस पाठवावयाच्या. अठ्ठावीस सालीं अशा तऱ्हेनें तयार केलेला पहिला वर्ग परीक्षेस जावयाचा होता. कोणतीही गोष्ट प्रथम होतांना तिचें कौतुक विशेष असतें. आम्ही विद्यापीठाच्या पहिल्या विद्यार्थिनी व पदवीधर म्हणून आमचें जसें कौतुक फार, तसेंच हा वर्ग कन्याशाळेचा पहिला म्हणून याचेंही कौतुक फार. यापैकीं एकादी मुलगी लग्न करून अगर अन्य कारणानें शाळा सोडून जाऊं लागली म्हणजे तिच्या मैत्रिणींबरोबर अध्यापक मंडळीसही गहिंवरून येई, व अद्यापही त्या विद्यार्थिनी भेटल्या म्हणजे जिव्हाळ्याचे नातेवाईक भेटल्याचा आनंद परस्परांना वाटतो. परीक्षेचें केंद्र त्या वेळीं एरंडवणा कॉलेजांत असे. तेव्हां मुली केव्हां जावयाच्या, त्यांच्याबरोबर कोण शिक्षक जावयाचे, हें सर्व ठरलें व त्यांना निरोप दिला. माझी खालच्या वर्गांतील एक विद्यार्थिनी म्हणे, "परीक्षेला मुली जावयाच्या म्हणजे तुम्हा सर्वांना येवढें काय वाटतें?" मीं म्हटलें, "कुसुम, हें तुला इतक्यांत कळणार नाहीं. पुढें तूं जेव्हां शाळा काढशील व तूं 'ए, बी, सी,' पासून शिकविलेल्या मुली जेव्हां एन्ट्रन्सच्या परीक्षेला जातील तेव्हां तुला हें कळेल."

आणि शिकवितांना रंग येई खराच. विद्यार्थिनींना मधून मधून रागवावें लागतेंच. अगदीं न रागावून चालत नाहीं. पण तें इतर वेळेला व इतर कारणांसाठीं व्हावें अशी इच्छा. विद्यार्थिनीनें कंटाळून यावें व शिस्त म्हणून तासाला बसावें आणि आपण कटुकर्तव्य म्हणून शिकवावें या गोष्टींचा मोठा तिटकारा वाटे, व हें शक्य तितकें मीं टाळलें आहे. आपल्या शिकवण्याकडे रागानें, शिस्तीच्या जोरावर लक्ष लावण्यास भाग पाडणें ही तर मला शिक्षकाच्या कलेची दिवाळखोरी वाटते. ऑगस्ट महिना चालू होता व इंग्लिश सातवीचा तास मी घेत होतें. त्या वर्षी नेमलेल्या निवडक उताऱ्यांपैकीं '*Face on the wall*' हा धडा चालला होता. लेखकानें भिंतीवरील दिसणाऱ्या चेहऱ्याचा मनुष्य

भेटला वगैरे सांगितलें तें कपोल-कल्पित होतें. पण सुरवातीला तें न कळून हें असें कसें झालें असें वाटून वाचक उत्सुकतेनें गोष्टीचा शेवट काय हें पाहत असतो. गोष्टीच्या अंताबद्दल प्रथम कांहीं एक कल्पना न देतां मी शेवटपर्यंत तसेंच शिकवीत गेलें. आणि शेवटीं लेखकाचें वाक्य "ही सर्व गोष्ट तुम्हांला सांगण्यासाठीं मीं अर्ध्या तासापूर्वीं रचिली" हें वाचतांच सर्व रहस्याचा उलगडा होऊन मुलींना मनापासून हसूं आलें. मैनाराणी गोडसे हसे. ती हसत म्हणाली कीं, "तरी मी आश्चर्य करीत होतें कीं, भिंतीवरील चेहऱ्याचा मनुष्य सापडतो कसा! आतां उलगडलें." सर्वंचजणी हसल्या व पुढचा तास केव्हां घ्यावयाचा व धडा कोणता सुरू करावयाचा तें सांगून मी घरीं आलें. त्या वेळीं मला जर कोणी सांगितलें असतें कीं, हा तुझा तास शेवटचा आहे, तसेंच आजचें शाळेंतून सुपरिंटेंडेंट या नात्यानें घरीं जाणेंही शेवटचेंच आहे, तर तें मला व इतरांना कोणालाच खरें वाटलें नसतें.

कारण दुसरे दिवशीं मला ताप आला. तो पुढें मुदतीचा ठरला. त्यामुळें येणारा अशक्तपणा आठ महिने टिकला. कोणतेंही जबाबदारीचें काम करणें अशक्य होऊन प्रकृति सुधारण्यासाठीं मी युरोपला गेलें आणि प्रागला असतांच माझी नेमणूक येरंडवण्याच्या कॉलेजांत प्रोफेसर म्हणून करण्याचें आजन्मसेवक-मंडळानें ठरविलें.

## परिशिष्ट

### [ या प्रकरणीं निवडक पत्रें ]

( १ ) थोरल्या भाऊजींचें अकोल्याहून आलेलें पत्र—

श्री.

आकोला, ता. ३-१०-२४

चि. कमळाबाई यांस,

अ. आ. वि. तुमचें ता. १३ चें पत्र व त्याबरोबर तुम्हांस कऱ्हाडास मिळालेलें तुम्हीं पाठविलेलें मानपत्र बरेच दिवसांपूर्वीं पोंचलें.

कऱ्हाडास तुमचा झालेला सन्मान व गौरव याची हकीगत वाचून जो आनंद झाला तो शब्दांनीं व्यक्त करणें शक्य नाहीं. याबद्दल तुमचें अभिनंदन यापूर्वींच करावयास पाहिजे होतें. तुम्ही स्वतःच मला मोठेपणा देऊन गौरव ताबडतोब कळविला व अशा रीतीनें तुम्हीं आपल्या आनंदाचे मला वाटेकरी केलें, हें तुम्हांस खरोखरीच भूषणावह आहे. मला उत्तर पाठविण्याची व स्वतःस झालेला आनंद दिग्दर्शित करण्याची इच्छा असून आज लिहूं उद्यां लिहूं असें करतां करतां, थोडें काम व थोडा आळस या कारणांनीं पत्र पाठविण्याचें लांबणीवर पडलें. तुमचा सन्मान व गौरव झाला असतां मी मुद्दाम उदासीन राहिलों, व अशा रीतीनें तुम्ही करीत असलेल्या उद्योगाविषयीं अप्रत्यक्षपणें असंमति दाखविली, अगर त्याबद्दल मला आनंद झाला नाहीं, असा गैरसमज करून घेणार नाहीं, अगर लिहितों तें केवळ औपचारिक आहे असें मानणार नाहीं, अशी आशा आहे.

तुम्ही करीत असलेल्या कामाची जाणीव स्त्रीवर्गास होत आहे ही विशेष आनंदाची गोष्ट आहे, व त्यामुळें तुम्हीं आरंभिलेलें कार्य जास्त उत्साहानें व नेटानें करण्यास तुम्हांस उमेद येईल अशी खात्री आहे. तुमच्या कृतीनें व कर्तबगारीनें तुमचा झालेला व होणारा सन्मान पाहण्यांत आम्हांस भूषण, कौतुक व अभिमान आहे. उत्तरोत्तर होणारा हा उत्कर्ष पाहण्यास ती. नानाकाका व ती. तात्या नाहींत यामुळें मनास खेद वाटतो. ते जर हयात असते तर त्यांस विशेष आनंद व कौतुक वाटलें असतें. तरी ती. काकी व तुमचे वडील-मातोश्री आहेत ही एक मोठी समाधानाची व आनंदाची गोष्ट आहे.

तुम्हीं पत्रांत दर्शविलेली माझ्याबद्दलची कृतज्ञताबुद्धि पाहून साहजिकच आनंद वाटला. पण तुम्हीं माझ्या केलेल्या स्तुतीस मी पात्र नाहीं. वास्तविक माझे हातून स्वार्थत्यागाचें कांहींच घडलें नाहीं व घडतही नाहीं. कदाचित् कांहीं अप्रत्यक्ष घडलें असेल असें जरी धरून चाललें तरी त्यांत माझे आभार मानण्यासारखें महत्त्वाचें तें खास नाहीं.

आपल्या हिंदुधर्मसमजुतीप्रमाणें तुमच्यावर अगदीं अल्पवयांतच जो दुर्धर प्रसंग दुर्दैवानें कोसळला त्यास तुम्हीं धैर्यानें तोंड देऊन, घरगुती अडचणींस न जुमानतां, आपलें शिक्षण पूर्ण करून तें सत्कारणीं लावण्याचा निःस्वार्थबुद्धीनें जो प्रयत्न चालविला आहे, तो खरोखरीच प्रशंसनीय व अभिनंदनीय आहे. त्यांत परमेश्वर तुम्हांस चांगलें यश देवो. तुम्हांस त्यांत चांगलें यश मिळालें म्हणजे चि. बाबूची एक इच्छा तुम्हीं पत्नीधर्माप्रमाणें पूर्ण केल्यासारखें होऊन त्याचे मृत आत्म्यास शांति मिळाल्यावांचून राहणार नाहीं.

तुमचा सुटींत इकडे येण्याचा विचार समजला. त्याचप्रमाणें इकडे येण्याच्या बाबतींत असलेल्या अडचणीही समजल्या. तुम्ही इकडे आल्यास आम्हां उभयतांस किती आनंद होईल हें लिहिण्याची जरूरी नाहीं. तरी पण वर्गणीचें काम करून वेळ उरेल तरच यावें. कऱ्हाडास जाऊन तुम्हांस तेथें चांगली वर्गणी मिळाल्यास त्यांत मला जास्त आनंद आहे.

चि. आबा दादा येथून सोमवारीं मुंबईस गेले. त्यांच्या येथें राहण्यानें आम्हांस व विशेषतः घरांतील मंडळींस बरीच करमणूक झाली. मंडळीचा उदासपणाही हळूहळू कमी होत चालला आहे. मुलीची (विमल) आठवण होऊन मनाच्या कळवळणाऱ्या वृत्ति नष्ट होणें शक्य नाहीं तरी कालावधीनें उदासपणा बराच कमी होईल. तुम्हां सर्वांस आपल्या प्रेमळ व गोड मुलीची वारंवार आठवण होणें साहजिक आहे. परंतु त्याचा काय उपयोग ? ज्याप्रमाणें ती संसारमलांतून विगत होऊन गेली त्याचप्रमाणें आपणही आपलें स्मृतिपटल तिच्याबद्दल विमल करावयाचें दुसरें काय ?

चि. मुकुंदास पूर्ववत् बरें वाटून तो व चि. सौ. सुशीलाबाई परत साताऱ्यास आल्याचें वाचून आनंद झाला. चि. वसंत आजारी असून चि. गीताबाई तेथें आल्याचें कळून मात्र काळजी वाटते. त्याचें प्रकृति-मान कळवावें.

चि. वाग्भट 'ऐक्या'च्या एकतानतेंत आहे तेव्हां त्यास तूर्त सविस्तर पत्र लिहून त्याचें ऐक्यांत बिघाड आणणें इष्ट नाहीं. तीं. काकी आदि थोर मंडळींस नमस्कार व लहानांस आशीर्वाद. कळावें.

आपला
**विष्णू**

* * *

(२) तात्यांचें पत्र.

श्री.

पुणें शहर, २९-६-१९२६

आशीर्वाद वि. चि. वाग्भट साताऱ्यास परत गेला. त्यानें (सेनेट) सभेची हकिगत सांगितली असेलच. नाथीबाई विद्यापीठ व शाळा वगैरे यांस बिनशर्त मान्यता मिळाल्यास घ्यावी. परंतु अशी मान्यता किंवा ग्रँट सरकार किंवा स्थानिक अधिकाऱ्यांकडून घ्यावयाची तर सिंडिकेटनें त्याबद्दल विचार करून व नियम करून आपलें धोरण ठरवावें, कोणाही शाळेनें स्वतंत्रपणें ग्रँट मागूं किंवा घेऊं नये, असें ठरलें. युनिव्हर्सिटीचे सभासदच आपल्या मुली या संस्थेंत पाठविणार नाहींत, तर सरकार तरी मान्यता काय म्हणून देईल? असा युक्तिवाद खाजगी भाषणांतून निघत होता. प्रि. कानिटकर हे मला आपण होऊन म्हणाले कीं, चॅन्सेलर, व्हाइस चॅन्सेलर नेमणें तें, ज्या सेनेटर लोकांनीं आपल्या मुली हल्लीं किंवा पूर्वीं या संस्थेंत घातल्या अशां-पैकींच नेमावे अशा बुद्धीनें यादी चाळून पाहतां फक्त चारच इसम लायक निघाले! असो.

मान्यतेच्या प्रश्नाचा नसला तरी ग्रँटच्या प्रश्नाचा निकाल लवकरच लागेलसें वाटतें. पदवीदानसमारंभाचे वेळीं सर एम्. व्ही. जोशी यांनीं आपले भाषणांत तुमचे नांवाचा मुद्दाम उल्लेख करून, पदवी-धरणींना तुमच्या स्वार्थत्यागाचें अनुकरण करण्यास सांगितलें, हें तुम्हीं

वाचलें असेलच. तुमचे स्वार्थत्यागाचा कांहीं तरी उपयोग झाला म्हणावयाचा इ. इ.

तात्या केळकर

* * *

( ३ ) नाना आठवले लिहितात,

येरंडवणें, १०-१२-२६

तुमच्या अस्वस्थतेचें एक बारकेंसें कारण म्हणजे मनाच्या विरुद्ध ग्रँट घ्यावी कीं नाहीं याविषयीं स्वतःच्या मनांत चाललेला झगडा, याविषयीं तुम्हीं लिहिलें आहे. हा प्रश्न खरोखर फार जुना आहे, व माझीं मतें तुमच्या दृष्टीनें दुसऱ्या म्हणजे 'लाचार व नेभळट' मार्गाचीं आहेत. पण आतां परिस्थिति बदलत आहे. परवां सहज दादा घरीं चहास आले होते ते बोलतांना म्हणाले, 'सातारच्या शाळेनें ग्रँट घ्यावी असें माझें मत आहे व कमळाबाईंचेंही यासंबंधीं कांहीं चाललें आहे. तात्पर्य काय, कट्टर खट्टर बनत आहेत !

मी ग्रँटला अनुकूल आहे पण सरकारशीं स्वाभिमानानें झगडून आपले पैसे आपणांस मिळवितां येतील असा आत्मविश्वास वाटतो म्हणून. ग्रँट घेतली म्हणजे मिंधें बनतें असें मला वाटत नाहीं. योग्य ठिकाणीं स्वाभिमानानें सरकारशीं भांडतां येईल असा आत्मविश्वास मला वाटतो. सरकारची ग्रँट घेणें हें Honourable co-operation होय. Responsive co-operation नव्हे. कारण दोघांचें दोष झाकण्यासाठीं दुसऱ्याचा उपयोग होऊं शकतो. पहिल्याचें योगानें खरें चांगलें हित सर्वांचें साधतां येतें.

तुमचें ध्येय काय ? मुलींना चांगलें कार्यक्षम शिक्षण देणें. मग त्यांत ग्रँट आडवी कोठें येते ? ग्रँट घेतल्याबरोबर तुम्ही मुलींस लाचारपणा शिकवणार नाहीं ना ? मग ग्रँट काय करणार ?

तुमचें ध्येय, जर वेडीवाकडी का होईना पण सरकारच्या मदती-**शिवाय** शाळा चालवावयाची, हें असेल तर मग निराळें. तेव्हां एकदां विचारानें ध्येय ठरलें म्हणजे मग आपल्या Sentiment चा व विशेषतः तें सारासार विचाराशीं विसंगत असेल तेव्हां सोडून देण्याचा स्वार्थत्याग व मनोधैर्य अंगीं पाहिजे. मग माझ्यासारखे लोक विनोदानें तुमची थट्टा करोत अगर उपहास करोत !

तुमच्या सहकारी मंडळींत तुम्ही एकट्याच या ग्रँट न घेण्याच्या मताच्या. म्हणजे तुमचे सहकारी सातारकर मिलही तुमच्या विरुद्धच. ग्रँटचा प्रश्न तात्त्विक दृष्ट्या सोडविला पाहिजे.

**नाना**

# कन्याशाळेचे साहाय्यक : : १२

कन्याशाळेला सुरवातीला दोन तीन तऱ्हेची मदत हवी होती. प्रत्यक्ष शिकविण्याचें काम करणें ही एक प्रत्यक्ष तऱ्हा. याखेरीज मुली पाठविणें व पैसे देणें या अप्रत्यक्ष तऱ्हा. याखेरीज गांवांतील लोकांची सहानुभूति व सल्लामसलत. कन्याशाळेच्या सुदैवानें रावसाहेब काळे, दादासाहेब करंदीकर, काकासाहेब देवधर आदि मंडळी पाठिंबा देणारी लाभली. इतरही मंडळींनीं मदत केली व अजूनही करीत आहेत.

प्रत्यक्षाप्रत्यक्ष मदतीसाठीं मी माझ्या मित्रमंडळाकडे वळलें व माझ्या विश्वासाप्रमाणें माझें मित्रमंडळ माझ्या मदतीस आलें.

पहिली गंगू. (सौ. गंगूबाई पटवर्धन.) गंगू व मी तीनही वर्षें कॉलेजांत एकदम शिकलों. व पुढें वर्ष दीड-वर्ष शिक्षकाचें व मेट्रनचें काम हिंगण्यास एकदम केलें. ती जास्त खेळाडू व आनंदी. मी जास्त वाचनाची शौकीन्, उत्साही खरी, पण उदास प्रवृत्तीची. तरी पण तिचें माझें फार जमे. वारज्याच्या शाळेच्या कामांतही मला तिची मदत होतीच. मी तिची वर्गभगिनी. शिवाय शिरवळास आमचे

घरींच तिचें लग्न झालेलें. तेव्हां नाना पटवर्धनांशीं मेहुणीचे नात्यानें विनोदानें थोडें कमजास्त बोलण्याचा हक्क सांगून मीं त्यांना लिहिलें, "आमची गंगू तुम्हांस दिली असली तरी एक वर्षपर्यंत माझी मला परत द्या." नुकताच त्यांनीं नवा संसार मांडला होता. तरी उभयतांचा विचार होऊन गंगूनें एक वर्ष साताऱ्यास यावें असें ठरलें.

महिलाश्रमांतील ती एक उत्साही शिक्षिका. स्वाभाविकच तेथील सुपरिंटेंडेंट रा. मोडक– हल्लीं सातारला आहेत ते– तिला सातारला जाऊं देण्यास नाखूष होते. प्रो. लागू त्या वेळीं महिलाश्रमांत इंग्लिश विषय शिकवीत. आणि पुढील वर्षासाठीं गंगू, सखूताई देवधर, वारूबाई शेवडे, रा. मोडक यांचे सहकार्यानें त्या विषयाचे शिक्षणांत कांहीं प्रयोग त्यांनीं करण्याचें योजिलें होतें. अर्थात् गंगू जाणार म्हणजे त्यांच्या या प्रयोगाच्या सांखळींतील एक महत्त्वाचा दुवा तुटण्यासारखें होतें. त्यांनीं व रा. मोडक यांनीं गंगूस फार गळ घातली. पण आमची गंगू काय एकवचनी. ती म्हणाली, "मीं एकदां कमलाबाईंना होकार दिला, आतां मी नकार देऊं शकत नाहीं. त्यांनींच नको म्हटलें तर राहीन." तेव्हां लागू म्हणाले, "आपण कमलाबाईंची खात्री पटवून देऊं व गंगूबाईंची महिलाश्रमास किती जरूर आहे हें त्यांना समजावून सांगूं." आणि हें मला समजाविण्यासाठीं उन्हाळ्याचे सुटींत पटवर्धनांचे घरीं रा. मोडक, प्रो. लागू व इतर शिक्षक मंडळी जमली. महिलाश्रमास जरूर आहे हें मला पटलें तरी, सातारच्या शाळेची घडी कशी बसवावयाची हा मजपुढील मुख्य प्रश्न होता. म्हणून शेवटीं गंगूला वचनमुक्त करण्याचें मीं नाकारलें. प्रो. लागूंचा उत्साहभंग झाला तरी त्यांनीं त्याबद्दल विषाद मानला नाहीं अगर माझेवर रागही धरला नाहीं. पण त्यांचा माझा योग असाच दिसतो. पुढेंही कॉलेजमध्यें शेवटीं त्यांनीं मजकडे प्रिन्सिपलशिप सोडूं नका म्हणून उत्साहानें शिष्टमंडळ आणावें, व मीं

तें मान्य करूं नये, असें घडलें. सातारला यावयाचें म्हणजे हिंगण्याचा पन्नास रुपये पगार सोडावयाचा व सातारला मी देईन ते वीस रुपये घ्यावयाचे. शिवाय बहीण बबन व मुलगी इंदु यांना बरोबर आणून खर्चास कमी पडणारे पैसे नाना पटवर्धनांनीं हिंगण्याहून पाठवावयाचे, असा उलटा हिशेब होणार होता. तसेंच वारज्याच्या शाळेची जबाबदारी नाना पटवर्धनांनीं आपल्या अंगावर घेतली होती ती वेगळीच. पण सर्वच वातावरण उत्साहानें भारलेलें होतें; व नवीन शाळेला सुरवात करून विद्यापीठाचें पाऊल पुढें पडण्यास आपण मदत करीत आहोंत हीच भावना सर्वांची असल्यानें, सर्वांना त्यांत आनंदच होता. कृष्णाताई वैशंपायनांचे बाबतींतही असेंच झालें. दादा दिवेकर यांची ती बहीण. त्यांना बोलवावयाचें योजून दादांनाही मीं पत्र लिहिलें. त्यांत लिहिलें होतें, "कृष्णाताईंना शाळेंत शिक्षकाचें काम करण्यास वर्षभर पाठवून द्या. मला वर्गणी भरपूर जमवितां आली तर त्यांना महिना पंधरा रुपये पगार मी देईन. जर मी वर्गणी मिळवूं शकलें नाहीं तर तुम्हीच, बहीण बोर्डिंगांत शिकते आहे अशी कल्पना करून, दरमहा पंधरा रुपये तिचे खर्चासाठीं पाठवावे." त्यांनींही नाना पटवर्धनांप्रमाणें माझी हिटलरशाही मान्य करून कृष्णाताईंना एक वर्ष पाठविलें. पहिल्या दीड वर्षांत शाळेचा जम चांगला बसला, व लोकांचा विश्वास ती संपादन करूं शकली, याचे श्रेयाचा मोठा वांटा माझ्या त्या वेळच्या निरलस व उत्साही सहकाऱ्यांकडे आहे.

कृष्णाताई परत गेल्या तेव्हां मीं दादांना लिहिलें कीं, "तुमची उसनी आणलेली बहीण परत पाठविली आहे. माल सुरक्षित पोंचल्याची रीतसर पावती पाठवावी." त्यांनींही रीतसर पावती लिहून कळविलें कीं, "बहिणीचें पार्सल पोंचलें. बाकी सर्व ठीक आहे. फक्त डोक्याचे स्क्रू मोटारचे धक्क्यानें ढिले झालेले दिसतात. पण येथल्या वातावरणांत ठोकून-ठाकून पुनरपि घट्ट होतील."

हिंगण्याच्या माझ्या कांहीं विद्यार्थिनींनाही आपण मदत करावी

असें वाटे, व त्याही थोडा वेळ येऊन शिकवून मदत करीत. एक विद्यार्थिनी अंबूताई सोमण लिहितात :—

" कमलाकाकी,

आज पुष्कळ दिवसांनीं तुम्हांस पत्र लिहीत आहे, पण याचा अर्थ तुमची आठवण होत नव्हती असा नव्हे. तुम्ही गतवर्षी सातारला गेलांत. तुम्ही नवीन शाळेच्या कामांत गुंतून गेलां असाल त्यामुळें तुम्हांस आमची आठवण कदाचित् होत नसेल, पण आम्हांस मात्र दररोज तुमची आठवण झाल्याखेरीज राहत नाहीं. आठवण होण्यास, प्रेम वाटण्यास, खरंच मनुष्यानें कांहीं द्यावेंघ्यावें का लागत असतें ? तुम्ही आमच्याशीं ज्या प्रेमानें बोलत होता, ज्या जिव्हाळ्यानें आम्हांस शिकवीत होतां, त्यानेंच आम्हांस इतकें बरें वाटे कीं, आम्ही परक्या ठिकाणीं आहों ह्याची विस्मृति पडे.

माझी प्रकृति यंदा नीट राहत नाहीं. तेव्हां हें वर्ष संपताच पुढच्या वर्षी पुन्हा अभ्यासास सुरवात न करतां विश्रांति घ्यावी असा विचार आहे. साताऱ्यास यावें असें मनांत येतें. जर तेथें आलें तर थोडेंसें तुमच्या शाळेंत काम द्याल काय ? मला तितकाच उद्योग होईल. नुसतें चोवीस तास मोकळें राहणें कंटाळवाणें होईल. तेव्हां तुमच्या शाळेस माझा कांहीं उपयोग होण्याजोगा असेल तर अवश्य कळवा म्हणजे मी सातारला येण्याचेंच निश्चित करीन."

पुढें त्या सातारला आल्या व त्यांनीं शाळेंत काम केलें. कन्याशाळेला मनापासून मदत करणारे आणखी एक गृहस्थ म्हणजे चिपळूणचे रा. रा. वासुनाना केतकर. आपल्या सर्व मुलींना त्यांनीं हिंगण्यास शिक्षण दिलें. त्यांची थोरली मुलगी गोदू ही गंगूप्रमाणेंच माझी वर्गभगिनी. त्यांच्या मुली शांताबाई आणि गोदूबाई यांनीं कन्याशाळेच्या पहिल्या दिवसांत अल्पवेतनावर काम करून मला फार मदत केली हें तर खरेंच; पण आणखी एक मदत वासुनानांना म्हणजे

मामांना मागण्याचा प्रसंग मला आला. कन्याशाळेच्या वसतिगृहास सुरवात करावयाची होती. कमींत कमी दहा विद्यार्थिनी असल्या-खेरीज बोर्डिंगास सुरवात करणें शक्य होत नव्हतें. केतकरांच्या सात मुली हिंगण्यास शिकत होत्याच. तेव्हां त्यांपैकीं दोन तीन मुली सातारला आमचे बोर्डिंगांत पाठविण्याबद्दल लिहिलें. मीं लिहिलें होतें, "तुम्हांस मुली पुष्कळ. एकदां बोर्डिंग सुरू झालें म्हणजे मागाहून वर्ष दोन वर्षांनीं मुली पुन्हा हिंगण्यास पाठविल्यात तरी माझी हरकत नाहीं. पण सुरवातीला जरूर आहे. तरी दोन मुली कांहीं दिवसांसाठीं उसन्या पाठवाव्या." तेहि लिहिणारे मोठे विनोदी. त्यांनीं लिहिलें :

श्री.

चिपळूण, ता. ११।१।२४

"श्री. कमलाताईंना सप्रेम नमस्कार वि. वि.—आपलें पत्र पावलें. मी कालच येथें आलों. आपण आम्हांस त्रास देण्यासाठीं पाहुणे पाठविलेत त्या दिवशीं मी त्यांना साहजिक भेटलों, आणि सर्व 'त्रासा'ला घरीं घेऊन गेलों. पोळ्या खाऊन पाहुण्यांबरोबरच पोटाला आणि गप्पागोष्टींमुळें तोंडाला फारच मजेदार 'त्रास' झाला. असाच 'त्रास' आपण कधीं कधीं देत व देववीत जावें अशी विनंति आहे.

गोष्ट हरदासी आहे. 'एका श्रीमंतानें संततीकरतां केलेल्या तपश्चर्येनें संतति देणारा देव प्रसन्न झाला. पण, त्याच्या 'सेफ'मध्यें 'स्पेअर माल' शिल्लक नव्हता. म्हणून श्रीमंतानें सुचविलें कीं, ज्या गरिबाला आधींच संतति पुष्कळ आहे, त्याच्या भावी अपत्यांतलें एक कमी करून तें मला द्यावें. कारण त्याला त्याची बहुधा जरूरी नसेल. जरूरी आहे कीं नाहीं तें उभयतांनीं जाऊन पाहण्याचें ठरलें. मुलांची आई अंथरूण घालून मुलांना निजवीत होती. मुलांना निजवीत असतांना ती म्हणाली, 'आणखी एकादें असतें तर

त्यालाही येथें जागा झाली असती.’ झालें! बाईला मुलें पुरेशीं झालीं नाहींत हें उघड झालें व अखेरीस श्रीमंताला अपत्य मिळालें नाहीं.’ झाली गोष्ट. माझ्याजवळ उसन्या देण्याइतक्या पुष्कळ मुली नाहींत. किंबहुना लोभी मनुष्याप्रमाणें मुदतींत आलेल्या हुंड्याही मी अजून पटवीत नाहीं. उसन्या देण्यासाठीं नसल्या, तरी एका बहिणीकडून दुसऱ्या बहिणीकडे लहान मुलींनीं कां जाऊं नये हें मला समजत नाहीं. आपण त्यांना त्या नात्यानें बोलवा म्हणजे त्या येतील. पण त्यासाठीं त्यांना त्यांच्या ‘आक्का’ची कबूली पाहिजे. ‘कमलाक्कांनीं’ ‘आक्कांना’ विचारावें आणि आपसांत जुळवून घ्यावें. ह्या मुद्द्याचा निकाल आपणांसारखा होणारसें दिसतें.”

घरची मदत विशेषच होती. किंबहुना कमलाबाईची शाळा असें म्हणण्याच्या ऐवजीं देशपांड्यांची शाळा असें म्हणणें जास्त शोभेल. मीं दोन वर्षें विनावेतन काम केलें खरें. पण माझ्या निर्वाहास कांहीं तरी खर्च लागत होताच. मीं कांहीं जेवणखाण सोडलें नव्हतें. शिवाय कन्याशाळेच्या अनुषंगानें इतरही खर्च करण्याचा व पैपाहुणा संभाळण्याचा प्रसंग येई, व त्याची तोशीस मध्यवर्ती कुटुंबावर पडे. माझ्या स्वार्थत्यागाची जाहिरात होई, पण हा स्वार्थत्याग करण्याची संधि देणाऱ्या माझ्या दिरांचा हा खरा त्याग म्हटला पाहिजे. कारण लोकदृष्टीनें ते नोकऱ्या व धंदा करून केवळ कुटुंब चालवीत होते. पण त्यांना सार्वजनिक कामाचें महत्त्व कळत होतें व म्हणूनच शाळेला त्यांनीं फार आपुलकीनें मदत केली. ज्या ज्या गांवीं माझे दीर बापूसाहेब असत त्या त्या गांवीं कन्याशाळेच्या प्रचारिकेला हटकून मदत मिळे. तसेंच पंढरपुरच्या वारींत माझे दुसरे दीर आप्पासाहेब वर्गणी मिळवून देण्यास मदत करीत. वाग्भटांनीं दरवर्षीं शंभर रुपयांप्रमाणें पांचशें रुपये दिले. शिवाय पहिल्या दोन-तीन वर्षांत जें कांहीं शाळेला कमी पडेल तें घरचें घेऊन जावयाचें, असें होई. जालन्याच्या माझ्या जाऊबाई दरवर्षी जालन्यास वर्गणी गोळा करीत. सुशीलाबाईंनीं भोरास

वर्गणी जमा केली. माझ्या मावससासूबाई कन्याशाळेच्या प्रचारिका झाल्या असून अजूनही त्यांचें काम चालू आहेच. माझी एक पुतणी डॉ. सौ. मालतीबाई घारपुरे ( दुर्गा देशपांडे ) हिनें शाळेंत शिकविणें, मुलींची आरोग्यदृष्ट्या तपासणी करणें इ. कामें केलीं. तसेंच बाकीच्या पुतण्यांनीं व सुनांनीं शाळेंत शिकून मदत केली. माझी एक आतेनणंद-भिमाक्का-आहे. जुनी म्हातारीबाई. इतरांचा उत्साह पाहून त्यांनाही वाटलें कीं, आपणही कांहीं मदत करावी. वसतिगृह सुरू करण्याचा प्रश्न निघाला तेव्हां मला हाक मारून त्या म्हणाल्या, " अग कमळा-बाई, तुमचं बोर्डिंग निघतं आहे. मी त्याला भाजीपाला तरी आणून देईन. दुसरी काय मदत माझ्यानें होणार! हवं तर अडेल तेव्हां स्वयंपाक करून देईन." थोडक्यांत म्हणजे घरांतल्या एकुलत्या एक मुलाचें जसें कोडकौतुक व्हावें तसें शाळेचें कोडकौतुक घरांतून झालें.

कांहीं मंडळी शाळेबद्दल व माझ्याबद्दल साशंकही होती. आमचे विसुभाऊ- महाबळेश्वरकर मास्तर- कन्याशाळेंत येण्याचा विचार करूं लागले त्या वेळीं, त्यांच्या कांहीं हितचिंतकांनीं त्यांना धोक्याची सूचना दिली होती कीं, " बाबारे संभाळ, तुला कमलाबाई चांगली वाटते खरी; पण ती पुण्याची, कोकणस्थाची, व केसरीकार केळकरांची मुलगी आहे. तिच्या शाळेला जरूर आहे तोंवर गोड बोलून ती तुझ्याकडून काम करून घेईल व पुढें सोडून देईल." या त्यांच्या अंदाजाची शहानिशा आतां त्यांची ते मनाशीं करतीलच!

माझा अध्यापनाचा काळ व माझ्या पुतण्यांच्या शिक्षणाचा काळ एकच आला. कोणती ना कोणती पुतणी माझेजवळ शाळाकॉलेजांत असेच. ती मला कमलाकाकी म्हणे. तिच्यामुळें तिच्या मैत्रिणी तसेंच म्हणत, व होतां होतां सर्व शाळा व कॉलेजच्या विद्यार्थिनींत तेंच नांव रूढ होई. हें नांव सुरू करणारी माझी पहिली पुतणी 'वारूवती', कॉलेजांत मी जी. ए. चे वर्गांत असतां, माझेजवळ माझेच खोलींत राही. ती मला 'कमलाकी' म्हणे. त्यामुळें माझ्या इतर कॉलेज-

भगिनी 'कमळा कुकडे' आदि मला गमतीनें 'कमलाकी' म्हणूं लागल्या. मला कांहीं तें आवडलें नाहीं. मीं थोडें चिडून सांगितलें, "मला तुम्ही कां 'काकी' म्हणतां? मला नाहीं तुम्हीं काकी म्हटलेलें आवडत!" कॉलेजच्या मुलीच त्या! मीं नको म्हटलें म्हणूनच त्यांनीं सर्वांनीं मुद्दाम 'काकी'* म्हणण्यास सुरवात केली. रागावलें नसतें तर दोन दिवसांनीं कदाचित् त्या विसरल्या असत्या. पुढें मीं रागावणें सोडून दिलें, पण नांव रूढ झालें तें टिकलें. आतां तर सवयीनें तें नांव मला आवडूं लागलें आहे!

महिलाश्रमाच्या बोर्डिंगांत माझ्या पुतण्या पूर्वीं होत्या. पण कन्याशाळा सुरू झाल्यानें यापुढें मुली बोर्डिंगांत ठेवण्याचें कारण न राहून माझ्या तिघी पुतण्या—तिघां दिरांच्या तीन मुली—सातारला आल्या. विमलला हिंगण्यास जाण्याची हौस. पण सातारला यायचें ठरल्यावर बोर्डिंग मिळत नाहीं म्हणून ती थोडी रागावलीच व म्हणाली,

---

* युरोपांत सुद्धां माझें 'काकी' हें नांव टिकलें. लंडनला किंग्ज कॉलेजमध्यें मथू केतकर व मी एका खोलींत राहत असूं. व माझ्या प्रागच्या मैत्रिणी मिस् फिशर व मिस् रॉडनिझ्झही तेव्हां तेथेंच होत्या. मथू जी खोलींत येई ती 'काकी काकी' करून हाक मारीत, कांहीं तरी सांगावयास धावतच येई. प्रागला गेल्यावर त्या दोघींनीं मला 'मिस् काकी' म्हणून हाक मारावयास सुरवात केली. त्या म्हणत, मिस् केतकर जर तुला 'काकी' म्हणते तर आम्हीं कां म्हणावयाचें नाहीं? पुढें त्यांना मला समजावून सांगावें लागलें कीं, जसें 'मामीचें लग्न झालेलें असतें तसें काकीचेंही झालेलें असतें व ती कधीं 'मिस् काकी' होत नाहीं. तेव्हां त्यांनीं 'मिस् काकी' म्हणणें सोडलें, पण त्याऐवजीं कौतुकानें काकुष्का म्हणूं लागल्या. 'ष्का' हा प्रत्यय झेक् भाषेंत 'लहानगा' आवडता या अर्थी असून 'काकुष्का' याचा अर्थ 'काकूबाळ' असा होतो.

" आतांच कां हो कन्याशाळा काढलीत ? आतां मला हिंगण्यास बोर्डिंगांत जावयास मिळणार नाहीं." इंग्लिश तिसरीपर्यंत तिचें शिक्षण झालें. मुलगी मोठी हुशार व महत्त्वाकांक्षी. अभ्यासांत तर ती चांगली होतीच, पण इतर मुलींच्यामध्यें क्वचित् सापडणारी महत्त्वाकांक्षा तिच्यांत असे. ती व सीता उमराणी एका वर्गांतील मैत्रिणी. दोघींचे बेत चालायचे कीं, आपण दोघी मोठ्या झालों म्हणजे अशाच कन्याशाळा काढावयाच्या. सीताची शाळा पुढें बेळगांवास निघालीच. पण विमल तिसऱ्या इयत्तेंतच तीन दिवसांच्या तापानें—मेनिंनजाइटिस होऊन—कालवश झाली! मुलीला समज वयाच्या मानानें फार. घरांतील सर्व मोठी मंडळी पंढरपूरचे वारीस गेलेली. वाग्भट व सुशिलाबाई मुकुंदाचे आजारासाठीं पुण्यास गेलेले. घरांत शाळेचीं मुलें-मुली व मी एवढींच. स्वयंपाक जेवणें करून, घराला कुलूप लावून, सर्वांनीं शाळेंत जायचें; आणि घरीं येतांच पुन्हा घरांतील कामास सुरवात करायची. अशा वेळीं घर व शाळा अशी दुहेरी जबाबदारी मजवर पडे. रात्रीं मी पोतेरें घालीत होतें व सर्व मुलें अभ्यासास माडीवर गेलीं होतीं. विमल मात्र कंदिलाशीं बसून खालीं वाकून लिहीत होती. मी तिजवर रागावलें, " अग माडीवर अभ्यासाला जा. इथं दिव्यापाशीं खालीं वाकून कां लिहितेस ? " " तुम्ही खालीं एकट्या काम करतां म्हणून मी येथें बसतें. तुमच्याचबरोबर मी वर येईन." मग माझ्या लक्षांत आलें कीं, मला काम पडतें हें लक्षांत घेऊन ही मला सोबत करण्यासाठीं बसली आहे. पुढें दोनच दिवसांनीं तिला ताप आला व त्यापुढें दोन दिवसांत ती वारली. थोरले भाऊजी व बाई अकोल्यास होतीं. तीं येऊं शकलीं नाहींत. सासूबाईंना व आप्पाकाकांना पंढरपुराहून मोटर पाठवून आणविलें; ती मंडळी शेवटच्या घटकेला येऊन पोंचली. तोंपर्यंत ती व मी. कसे तीन दिवस निघाले ते त्या वेळीं कळलें नाहीं! पण आतां आठवण झाली कीं मन बधिर होतें. या वेळीं विशेष मदत व आधार डॉक्टर आगाशे व घाणेकर यांचा! आठवड्याची परीक्षा

झाली होती. त्यांत 'वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृह्णाति नरोऽपराणि' या श्लोकाचा अर्थ विमलनें फार चांगला लिहिला होता व पेपरांत तिचा नंबरही पहिला होता. पण ती गेल्यावर पेपर तपासले गेले. या प्रसंगापासून घर व शाळा या दोहोंची एकदम जबाबदारी घेणें मीं सोडून दिलें.

महिलाविद्यापीठासाठीं शाळा काढली. तेव्हां सर्व मुली विद्यापीठाच्या परीक्षेस पाठवावयाच्या. ज्या वेळीं एकादी नवीन कल्पना रूढ करावयाची, त्या वेळीं त्या कल्पनेमागे व्रत समजून जाणारीं अशीं कांहीं माणसें तरी निघावीं लागतात. तरच ती कल्पना लोकप्रिय व रूढ होऊं शकते. विद्यापीठाच्या सुरवातीस असे कांहीं पालक होते कीं, ज्यांनीं याच विद्यापीठाकडे तत्त्वासाठीं म्हणून मुली पाठविल्या. केतकर, खरे, कुकडे, मराठे हे त्यांपैकीं कांहीं पालक होत. रा. रा. ग. स. मराठे यांच्या मुली पुण्याच्या कन्याशाळेंत व कॉलेजांत होत्याच. पैकीं एकीला म्हणजे कु. उषा मराठे (सौ. उषा बापट) हिजला एक वर्ष त्यांनीं सातारला कन्याशाळेंत पाठविली होती. तशाच निष्ठेनें कन्याशाळेंत मुली पाठविणारीं कांहीं घराणीं सातारच्या कन्याशाळेसही लाभलीं होतीं. गजेंद्रगडकर, शालिग्राम, दीक्षित हीं त्यांपैकीं कांहीं होत. तसेंच सातारचें आमचें देशपांडे घराणें. विद्यापीठास सुरवात झाल्यापासून शिक्षण घेणाऱ्या सर्व मुली या अभ्यासक्रमाकडेच होत्या. गोखले तात्या सातारला येऊन शाळा पाहून गेले. पुढें केव्हांही शाळेचा प्रश्न निघाला व मुलींची संख्या काय हें विचारावयाचें झालें म्हणजे ते म्हणत, "तुझ्या शाळेंत मुली किती? पण घरच्या मुली वजा करून मुलींची संख्या सांग. घरच्या मुलींना घरीं शिकविलें असतेस तें शाळेंत बसून शिकवितेस. त्या मुली म्हणजे कांहीं शाळा धरावयाची नाहीं."

माझी सर्वांत धाकटी पुतणी कुसुम हिच्या शिक्षणाचे वेळीं पुन्हा 'कर्वे मॅट्रिक कीं बॉंबे मॅट्रिक' हा प्रश्न उपस्थित झाला. माझ्या पुतण्यांचें– दादा, पंडितचें– म्हणणें कीं, सर्वच मुली आतांपर्यंत एकाच

विद्यापीठाच्या परीक्षेस गेल्या. आतां हिचे बाबतींत कांहीं बदल करा. तिला धीटपणा आला पाहिजे. मुंबईस एखाद्या बोर्डिंग स्कूलमध्यें ठेवा. विमलचे दुःखानें हळुवार झाल्यामुळें सौ. बाईचा कटाक्ष मुलगी स्वतःपासून दूर ठेवावयाची नाहीं. अभ्यासक्रम कोणताही द्या. त्याबद्दल त्यांचा आग्रह नव्हता. शेवटीं दोघांच्या मतभेदांत न्यू इंग्लिश स्कूलमध्यें मुलगी जाऊन तडजोड होईलसें वाटूं लागलें. कन्याशाळेची परिस्थिति या वेळीं फार बिकट झालेली. पैशाचा तुटवडा, मुलींची संख्या घटलेली, व शाळा चालू ठेवावी कीं बंद करावी याचाही विचार पडलेला! अशा वेळीं देशपांड्यांची मुलगी कन्याशाळा सोडून न्यू स्कूलांत जाणें म्हणजे आमचाच आमच्या शाळेवर विश्वास नाहींसें दाखवून चलबिचल होणाऱ्या लोकमताला अधिक बिचकविणें होतें.

शेवटीं मीं थोरल्या भाऊजींस सांगितलें, "तुम्हांस जर मुंबई युनिव्हर्सिटीकडे कुसुमला पाठवावयाची असेल तर तो प्रश्न तुमचा आहे. न्यू स्कूलमध्यें तिला पाठवावयास इतर वेळीं मीं हरकत घेतली नसती. पण आतांपर्यंत आपण सर्व इतक्या एकमतानें वागत आलों आहोंत कीं, लोकांना आपलीं मतें वेगळीं असूं शकतात हें सांगूनही पटणार नाहीं. तुमची मुलगी कन्याशाळा सोडून न्यू स्कूलांत जाते याचा अर्थ तुम्हांस कन्याशाळेची शाश्वती वाटत नाहीं व तुमची सहानुभूतीही नाहीं असा होईल. तुम्हांस मुलगी दुसऱ्या युनिव्हर्सिटीकडे पाठवावयाचीच तर तिला पुण्यास अगर मुंबईस ठेवा. साताऱ्यास नको. जर कन्याशाळेची नाव मध्येंच बुडावयाची असेल तर तिच्यावर पडणारी शेवटची काडी निदान आपल्या घरांतली नसावी."

त्यांना ही माझी विचारप्रणाली पटली असावी. कारण त्यांनीं कुसुमला कन्याशाळेंत पाठविली येवढेंच नव्हे, तर पुढें ती प्रवेश-परीक्षेला जाण्याचे वेळीं मॅट्रिक परीक्षेची सोय कन्याशाळेंत झाली असूनही त्यांनीं तिला तिकडे न पाठवितां जी. ए. कडे पाठविली.

कन्याशाळेच्या सल्लागारमंडळावर अखेरपर्यंत ते होते व त्यांच्या शांत, विचारी व न्यायी स्वभावाचा कन्याशाळेला फार उपयोग झाला.

वाग्भट, घाणेकर, व डॉ. आगाशे यांनींच प्रथम शाळा सुरू करण्याची उचल केली; तेव्हां मला मदत करणें हें त्यांचें एक प्रकारें कर्तव्यच होतें, व म्हणून प्रत्येक प्रसंगीं त्यांची मदत मला हक्कानें मिळे. रा. रा. भाऊसाहेब सोमण, डॉ. आठल्ये यांनीं पूर्वी मदत केली व अजूनही करीत आहेतच. इतरही अनेकांनीं साहाय्य, निदान सहानुभूति दाखवून मदत केली.

सुरवातीचे प्रमुख साहाय्यक म्हणजे दादासाहेब करंदीकर! शाळा स्थापन करावयाचें ठरतांच आण्णा म्हणाले, 'प्रथम दादासाहेबांचेकडे चला.' त्यांच्या मदतीबद्दल आम्ही साशंक होतों. पण त्यांनीं प्रथम जरी उलट तपासणी केल्याप्रमाणें प्रश्न विचारले, तरी नंतर स्वतःची जागा देऊं करून सहानुभूति दाखविली. शंभर रुपये देणगी दिली व पहिले खजिनदारही झाले. पुढें वर्ष दोन वर्षांनंतर आम्ही हिशेब-तपासनिसाकडून हिशेब तपासून घेऊं लागलों; पण पहिले हिशेब तपासनीस दादासाहेबच होते. अद्यापपर्यंत हिंगण्यास केलेल्या कामांत हिशेबाची जबाबदारी मजवर आलेली नव्हती, त्यामुळें ही माहिती मला नवीनच होत होती. प्रत्येक गोष्ट बारकाईनें पाहण्याची त्यांची वृत्ति, कोणत्याही गोष्टीचें भरपूर स्पष्टीकरण मिळाल्याखेरीज पुढें न जाण्याची तऱ्हा, यामुळें त्यांचेकडून हिशेब तपासून घेणें म्हणजे हिशेब लिहावयास शिकणेंच होतें. हिशेबपद्धति मला कळलीच, पण आणखी एक अप्रत्यक्ष फायदा म्हणजे आण्णांची खात्री पटली. हिशेब व एकंदर शाळेचें काम नीट असल्याबद्दल त्यांनीं आण्णांना सांगितलें. कारण पुढें एक दिवस आण्णांनींच सांगितलें कीं, "दादासाहेबच सांगत होते आक्का हिशेब चांगले ठेवते. तेव्हां ते खास नीट ठेवले जात असतील."

दादासाहेबांनीं मला घरीं राहावयासच आमंत्रण दिलें होतें. मी राहावयास गेलें नाहीं पण हवें तेव्हां जेवावयास जाण्याचा हक्क

माल बजावीत असे. "हिशेब तपासून घ्यावयास केव्हां येऊं?" मी विचारी.

"सकाळीं ८ वाजतां ये" ते सांगत, "पण पहिले काम संपलें नाहीं तर तुला थांबावें लागेल. उद्यां नाहीं जमलें तर मी पुढें आठ दिवस परगांवीं जातों आहे त्यानंतर."

मी म्हणे, "मी आठ वाजतां येतें. साडेदहापर्यंतही थांबेन व आणखी उशीर झाला तर तुमचे घरीं जेवूनच परस्पर शाळेंत जाईन."

मला वाटे दोन तास वेळ जास्त मोडला तरी चालेल; पण हिशेब दादासाहेबांच्या बारकाव्यांतून तावून-सुलाखून निघूं देत. आणि दादासाहेबही आनंदानें तें काम करीत. एकदां कामाला सुरवात केल्यावर हेळसांड त्यांचेकडून होत नसे; व वेळोवेळीं त्यांचा मार्मिकपणा, रसिकपणा, प्रत्युत्पन्नमतित्व, व बुद्धीचें सर्वगामित्व दिसून येई. अमुक एक गृहस्थ शाळा पाहावयास आले त्यांच्या पानसुपारीचा खर्च तपासावयास लागले कीं, त्या प्रसंगानें त्याबद्दल स्वतःस माहिती असलेली जास्त माहिती सांगावी, केव्हां स्वतःच्या डायरींतले उतारे काढून दाखवावे असें चाले.

माझें 'गीत द्विदल' हें पुस्तक प्रसिद्ध केल्यानंतर त्यांना एक प्रत देण्यास मी गेलें. या वेळीं दादासाहेबांनीं आपल्या गंगोत्रीच्या यात्रेची हकिगत सांगितली. पत्नीसहवर्तमान आम्ही एका पर्वतशिखरावर चढलों, व तेथील सौंदर्य पाहून व खालीं गंगामाईचें पात्र पाहून आम्हांलाही स्फूर्ति झाली, व आम्हीं पुढील श्लोक लिहिले असें म्हणून त्यांनीं डायरी काढून ते मला वाचून दाखविले.

पाठक-हॉलमध्यें एकदां एका जाहीर सभेंत त्यांनीं 'कर्मधर्मसंयोग' या वाक्प्रचाराचें स्पष्टीकरण प्रसंगानुसार केलें होतें. कोणतीही गोष्ट अकारण होत नाहीं, असा बोलण्याचा रोख होता. ही समोर मेणबत्ती जळते आहे. जळणें हा तिचा धर्म आहे; पण मीं हात लावण्याचें कर्म केल्याखेरीज हात भाजणार नाहीं. हात लावणें हें माझें कर्म व

जाळणें हा मेणबत्तीचा धर्म. तेव्हां कर्मधर्मसंयोगानें म्हणजे सामान्य कल्पनेप्रमाणें उगीच एकाएकीं हात भाजणार नाहीं. 'कर्मधर्मसंयोग असा होता कीं,' असल्या वाक्यांचें मींही अनेकवार स्पष्टीकरण ऐकलें होतें. पण या वेळीं तें इतक्या सहजपणें दिलेलें मला वाटलें कीं, तें पूर्ण लक्षांत राहिलें.

त्यांचे चिरंजीव विठ्ठलराव हे बॅरिस्टर झाल्याची तार आली होती. दुसरे दिवशीं त्यांचे घरीं कांहीं कामानिमित्त मी गेलें होतें. स्वाभाविकच ते अतिशय उल्हसित होते. मींही विचारलें, "काय विठ्ठलराव आतां बॅरिस्टर झाले ना!"

"होय ग!" ते म्हणाले, "ही तुझी पेढे मागण्याची प्रस्तावना होय? अग, 'बालिश' तर तो इथेंच होताच, आतां आल्यावर त्याची 'टर' होणार आहे झालं!"

दादासाहेबांनीं बॅरिस्टर शब्दावर कोटी केली. तरी पण मुलाच्या यशाबद्दलचें कौतुक त्यांच्या डोळ्यांत प्रतिबिंबित झाल्याखेरीज राहिलें नाहीं.

पण या सर्व चतुरस्रतेच्या जोडीला त्यांच्या स्वभावांत जो एक बारकावा आला होता, व त्यामुळें उदारपणा जाऊन त्यांत जी फाटे फोडण्याची वृत्ति आली होती, त्यामुळें त्यांच्याबरोबर मतभेदाचे प्रसंगही फार आले व विरोधी भक्तीचेंच प्रदर्शन जास्त झालें.

शाळेची कल्पना सांगितल्याबरोबर त्यांनीं आपल्या घरांतील जागा देऊं केली;पण प्रत्यक्ष देतांना आपल्या शेजारच्या बंगल्यांतील माडी दिली. मुलींना खेळावयास मोकळी जागा पाहिजे या दृष्टीनें बंगल्यांतील जागा जास्त योग्य आम्हांलाही वाटली. शाळेचा उद्घाटनसमारंभ बंगल्यांतील माडींत– म्हणजे रा. रा. शंकरराव साठे यांच्या माडींत–झाला. पुढें १ नोव्हेंबरला शाळा सुरू झाल्यावर ती माडी साठे यांची म्हणून, त्या सर्व माडीपैकीं कडेची दोन खणी खोली प्रत्यक्ष मला दिली. त्यालाही मला हरकत वाटली नाहीं. कारण शाळेला मुली तरी त्या दोनचार

महिन्यांत जूनपर्यंत कुठें येणार होत्या! त्यांतून आल्याच असत्या तर मग मींही दादासाहेबांचेकडे जास्त मागणी जागेसाठीं केली असती. शाळा सुरू होऊन अशा प्रकारें दोन महिने झाल्यावर एके दिवशीं हिशेब तपासावयासाठीं त्यांचेकडे गेलें असतां त्यांनीं मला सांगितलें कीं, "अग आक्का, तुम्ही त्या माडींत शाळा चालवितां तिचा एकदां दत्तूनानाला विचारून भाडेपट्टा करून दे." मी हें ऐकून विचारांत पडलें. जागेसाठीं भाडेंखर्च नको म्हणून शाळा स्वतःच्या घरांतच सुरू करणार होतें. दादासाहेबांनीं स्वतःची जागा देऊं केल्यामुळें येथें आलें. येथें भाडें द्यावयाचें त्यापेक्षां स्वतःचें घर काय वाईट होतें? तेव्हां विचार करून असें ठरविलें कीं, भाडेंच द्यावयाचें तर मग दोन खणांच्या माडींत तीन वर्ग व चौथें ऑफिस ठेवण्यापेक्षां, स्वतंत्र जागा मोकळ्या अंगणासह मिळाली तर कां घेऊं नये? या वेळीं शाळेंत सुमारें बारा मुली असून पहिली, दुसरी व पांचवी अशा तीन वर्गांत त्यांची वाटणी झाली होती. तेव्हां शोध करतां रा. चितळे यांची जागा सलग– चार खोल्या व पुढें मोठी बखळ अशी– दरमहा बारा रुपये भाड्यानें घेतली. या जागेंत प्रत्येक वर्गाला एक स्वतंत्र खोली मिळून, शिवाय कन्याशाळेसाठीं परगांवांहून आलेल्या शिक्षिका श्री. कमलाबाई भावे यांचीही राहण्याची सोय होऊं शकली. आणि ही जागा मिळते आहे तेव्हां पुढील तारखेपासून शाळा तेथें घेऊन जाणार असें त्यांना सांगितलें. दादासाहेब यावर थोडेसे रागावले पण विशेष कांहीं बोलले नाहींत. खजिनदारीच्या कामाचा राजीनामा मात्र त्यांनीं 'वेळ होणार नाहीं' यासाठीं दिला.

हा प्रसंग किरकोळ होता, पण यापेक्षां मोठा व जाहीर रीतीनें त्यांचा शब्द डावलण्याचा प्रसंग पुन्हा वर्षाचे शेवटीं आला. शाळेचा पहिला वाढदिवस या रा. चितळे यांच्या जागेंतच साजरा झाला. गुरुवर्य आण्णाही समारंभास आले होते. मागील वर्षाप्रमाणेंच याही वर्षीं सर्वांनीं शंभर रुपये द्यावे, व अशा प्रकारें पांचशें रुपये देणगी पुरी

करून आश्रयदाते व्हावे अशी खटपट आम्हीं चालविली होती. त्याप्रमाणें वाग्भट, डॉ. आगाशे, भाऊसाहेब सोमण व रावसाहेब काळे यांनीं आपली देणगी द्यावयाचें कबूल केलें. त्याचप्रमाणें दादासाहेबांकडेही मीं मागणी केली. परंतु त्यांनीं देणगी देण्याचें मान्य केलें नाहीं. ते म्हणत, "शाळेला जास्त मदत करण्याची माझी इच्छा नाहीं, तुला हवें तर देतों." प्रत्यक्ष सभेचे वेळीं दादासाहेब बोलावयास उभे राहिले. प्रथम माझ्या एक वर्षाच्या कामगिरीबद्दल स्तुतिपर बोलून त्यांनीं प्रस्ताव केला कीं, "एका माणसास सामान्यतः पंधरा रुपये पुरतात. माझा एक मित्र आहे. त्याची इच्छा दरमहा पंधरा रुपयांप्रमाणें कमलाबाईंस एक वर्षभर द्यावयाची आहे. त्याप्रमाणें दरमहा पंधरा रुपये एक वर्षपर्यंत कमलाबाईंचे घरीं पोंचते होतील." या भाषणानें सर्वच मंडळींचा विरस झाला. मला राग आला कीं, मी शाळेला द्या म्हणत असतां शाळेला न देतां मला एकशेंऐशी रुपये काय म्हणून! वाटलें कीं आत्तांच उठून सभेंत सांगावें कीं, मी स्वतःसाठीं ते पैसे घेणार नाहीं. मी या विचारांत आहे तोंच वासुकाका तेथें आले व मला म्हणाले, "हें काय दादासाहेबांचें! तुम्हांला दरमहा पंधरा रुपये त्यांनीं द्यावयाचे म्हणजे आम्हांला काय वाटेल? तुम्हांला पगार मिळावा यासाठीं ही खटपट आम्ही करीत आहोंत कीं काय?"

तेव्हां त्यांच्या व माझ्या विचारानें ठरून मीं सभेंत उठून सांगितलें कीं, "दादासाहेबांनीं दरमहा पंधरा रुपये मला देऊं केलें; पण मागील वर्षाप्रमाणेंच आणखी एक वर्ष मीं विनावेतन काम करावयाचें ठरविलें आहे. त्यांनीं ते पैसे दिले तर शाळेंत जमा करण्यांत येतील."

मी भाषण संपवून पाठीमागें येतें तोंच रा. रा. सी. ग. देवधर, न्यू स्कूलचे सुपरिंटेंडेंट, हे मजकडे आले व मला म्हणाले, "तुम्हीं सांगितलेंत हें ठीक झालें. तुम्ही बोललां नसतां तर मीच उठून या दादासाहेबांनीं दिलेल्या पोटगीचा निषेध करणार होतों."

दादासाहेब अर्थातच फार रागावले. पुढें एका वेळीं यासंबंधीं घरीं

बोलणें चालू असतां ते म्हणाले, " तुम्हां मुलांत मी मिसळतों हेंच चुकतें. तुमच्या कल्पना वेगळ्या. आमच्या वेगळ्या. तुझ्या कामाबद्दल कौतुक वाटून बक्षिस म्हणून दिलें तर तो तुला अपमान वाटतो!"

मीं म्हटलें, " तुम्हीं कौतुकानें बक्षिस दिलेंत तर मला घ्यावयास हरकत वाटण्याचें कारण नाहीं. घरगुती नात्यानें द्याल तर घरीं मुकाट्यानें द्या. शाळेसाठीं द्यावयाचें तें शाळेंत जाहीर सभेंत द्या. शिवाय मला दिलेलें बक्षिस मीं शाळेला देतां उपयोगी नाहीं, हा तरी आग्रह काय ?"

तात्याही या संभाषणप्रसंगीं हजर होते. कांहीं कामानिमित्त ते त्या दिवशीं साताऱ्यास आले होते. ते म्हणाले, " दादासाहेब, हें तुम्हांलाच शोभतें! एका माणसाला दरमहा पंधरा रुपये पुरतात म्हणजे काय ? तुम्ही काय तिला पोटगी देतां ? आम्ही दोन्ही घरचीं माणसें तिला नाहींत का ? तुम्हांला शाळेला मदत करावयाची असली तर करा नाहीं तर करूं नका. पण मदत करण्याची ही कुठली तऱ्हा ?"

या प्रसंगामुळें स्वाभाविकच त्यांच्या माझ्यामध्यें एक प्रकारची तेढ निर्माण झाल्यासारखी झाली व ते शाळेबद्दल उदासीन असत. कांहीं झालें तरी दरमहा पंधरा रुपये मी देणारच असें सांगून त्यांनीं त्या वर्षी एकशेंऐशी रुपये दिले. कांहीं दिवसांनीं ही तेढ कमी झाली; पण उदासीन वृत्ति कायम राहिली. मींही पुढें असें ठरविलें कीं, पैशाच्या व्यवहाराखेरीज इतर बाबतींत त्यांच्या अनुभवाची मदत घ्यावयाची व त्यांप्रमाणें करीतही असे. मी युरोपांत प्रवासासाठीं जावयास निघाले त्या वेळीं कन्याशाळेंत जो निरोप देण्याचा समारंभ झाला त्या वेळींही ते मुद्दाम आले होते.

दुसरी उल्लेखनीय मदत म्हणजे न्यू इंग्लिश स्कूलचे सेवानिवृत्त अध्यापकप्रमुख सी. ग. देवधर यांची. आदर्श सुपरिंटेंडेंट म्हणून त्यांची प्रसिद्धि असे. शाळेमध्यें शिस्त असे पण कठोरपणाचा अभाव. मुलांना भीति वाटे पण आदर असे. शिकवणारे उत्तम. गांवामध्येंही देवधरांचे-

बद्दल आदराची भावना. स्वतःच्या तात्त्विक कल्पना लोकांच्या मनाविरुद्ध जाऊन आचरणांत आणल्या, तरी पण लोकमताला अकारण डावललें नाहीं. पुनर्विवाह करूनही जुन्या मंडळींत मिसळून राहूं शकले, व जुन्या लोकांचा आदर संपादन करूं शकले, म्हणून त्यांना आदर्श सुधारक म्हणत. मी त्यांची जुनी न्यू इं. स्कूलची विद्यार्थिनी; आण्णा व ते जुने स्नेही व जुने सुधारक; देवधरांचे पुनर्विवाहाचे वेळीं कन्यादान आण्णांनीं केलेलें; इतका ऋणानुबंध व आण्णांच्या संस्थांबद्दल सहानुभूति. स्त्रियांच्या वेगळ्या विद्यापीठाची कल्पना त्यांना इतकीशी पसंत नव्हती. तरी पण आण्णांचें कार्य म्हणून ते थोडी वार्षिक मदत देत. कन्याशाळा मीं सुरू केलेली, मला जरूर पडेल तेव्हां मी हक्कानें जाऊन त्यांना सल्लामसलत विचारीत असे. त्यांची मुलगी कमल (सौ. कमलाबाई चुणेकर) प्रीव्हिअस् होऊन एक वर्ष सातारला घरींच होती. त्या वेळीं तिलाही त्यांनीं शाळेंत काम करावयास पाठवून शाळेला मदत केली होतीच.

त्यांचा स्वभावविशेष म्हणजे शिस्तीवर कटाक्ष. विनाकारण घोळ घालीत बसणें व स्वतःचेपासून इतरांना त्रास देणें त्यांना आवडलें नाहीं. एकदां एक गोष्ट सांगितली कीं, ती तशी झालीच पाहिजे. उलट करण्याची काय, पण बोलण्याचीही कोणाची प्राज्ञा नव्हती. शेवटीं वर्ष सहा महिने त्यांची प्रकृति थकत होती. दिपवाळीचे सुटींतून सखूताई परत नगरास शाळेंत गेल्या त्या काकांच्या प्रकृतीची आशा सोडूनच. घरांत देवधरीणबाई एकट्या, मुलें लहान लहान; तेव्हां प्रसंगीं हाक मारण्यास मनुष्य असावा म्हणून त्या वेळचे न्यू इं. स्कूलचे सुपरिंटेंडेंट् प्रो. कुंभारे शाळेच्या शंकर शिपायास, रात्रीं झोपावयास देवधरांचे घरीं पाठवीत, पण तें देवधरांना कळूं न देतां. "मी सेवानिवृत्त झाल्यानंतर शाळेच्या गड्याला त्रास काय म्हणून? माझें दुखणें काय चार दिवसांत आटपेल किंवा चार महिनेही लांबेल" अशी त्यांची दृष्टि. मुलीच्या बाबतींत हाच नियम. "तूं शाळेचें काम सोडून येथें मजजवळ

१५

किती दिवस राहणार ? माझी शुश्रूषा होते आहे. तुझें काम तूं कर." असें ते म्हणत. पण आईला व मुलीला राहवतें थोडेंच. दर एक दिवसा-आड प्रकृतीची सविस्तर हकिगत कुंभारे यांनीं सखूताईंना कळवावी असें ठरलें. एकदां कुंभारे यांनींच त्यांचे प्रकृतीबद्दल निराश होऊन 'तुम्ही एकदां येऊंन भेटून जा' असें लिहिलें व दोन दिवसांची रजा घेऊन सखूताई आल्या.

नेहमींप्रमाणें मी जों त्यांचे घरीं जातें तों आईनीं व सखूताईनीं मला हाक मारून सांगितलें कीं, "तुम्ही आमचं एक काम करा. काकांना वर भेटून या. ते तुमच्यावर खूप रागावतील. त्याला होय होय म्हणा." मी माडीवरून काकांना भेटून आलें व म्हटलें, "आलें भेटून. पण काका तर कांहीं रागावले नव्हते. नीट बोलले. शाळेच्या एका कामाची आम्हीं चर्चा केली तेव्हांही नेहमींप्रमाणें बोलले" इत्यादि. "अहो हे सखूला पत्र लिहितात माझी प्रकृति चांगली आहे." आई म्हणाल्या, "पण कुंभाऱ्यांकडून आम्हीं तिला भेटून जाण्याला सुचाविलें. ही आल्याबरोबर मुळीं हे तिजवर रागावलेच; व लोकांच्या पत्रावरून तुमची प्रकृति जास्त बिघडली असें कळलें म्हणून आलें असें म्हणतांच जास्तच रागावले कीं, 'मी प्रकृति ठीक असें लिहीत असतां लोक असे कसे लिहितात?' 'अहो, गांवांत काय लोकांना माहीत नाहीं तुमची प्रकृति? कमलाबाई तिला लिहितात, रोज त्या तुमची प्रकृति बघून जातात. त्यांनीं लिहिलें असेल.' आणि हें मीं म्हटल्यावर ते तुमच्यावर रागावले आहेत. मीं त्यांना म्हटलें, 'सखू येऊं नये ती आली ही तिची चूक, तिला हवें तर बोला. पण कमलाबाईला—लोकांच्या मुलीला, तुम्ही कां बोलणार? येवढी शाळेची सुपरिंटेंडेंट ती. तिला तुम्ही बोलणार?' 'असली सुपरिंटेंडेंट म्हणून काय झालें? अशी काय ती मोठी आहे? ज्या वयाची सखू त्याच वयाची ती. तिला हा उद्योग कुणी सांगितला होता! आली म्हणजे मी तिला त्याबद्दल सांगणार.' कुंभाऱ्यांचं नांव सांगेन तर त्यांनाही बोलतील. ते त्यांचे विद्यार्थीच एक

वेळचे. पण त्यांनीं आमच्यासाठीं इतकी मदत करून पुन्हा बोलूनही घ्यावें! बरें, मीं लिहविलें म्हणेन तर मला म्हणतील, इतकीं वर्षे संसार करून हाच धीर शिकलांत ना! तसं म्हटलं तर आमचं खरंच काय चुकलं यांत? सखू येऊन गेली म्हणजे मला धीर वाटतो. तिलाही तिकडं काम सुचतं आहे का! पण यांचेपुढें आज विरुद्ध बोलायची सोय आहे का? असे दिवस त्यांच्या शब्दाबाहेर न जातां काढले बरं! आणि लोकांना वाटतं बाई जहांबाज." देवधरीणबाई गहिंवरून सांगूं लागल्या. "आजचं ठीक आहे. त्यांच्याविरुद्ध बोलणं बरोबर नाहीं. पण त्यावरून नेहमीं लोक म्हणतात तें चूक असं होणार नाहीं." मी म्हटलें–आतांपर्यंतचें वातावरण अगदीं मनस्तापाचें होतें, थोडे ते खालीं आले तर बरें ही माझी दृष्टि– "आईसाहेब हा बाकी विचार करण्याचाच प्रश्न आहे. जसं 'सखू हट्टी कीं करारी' हा एक प्रश्न तसाच हा दुसरा, अधिक जहांबाज कोण?" सखूताईनीं भर घातली आणि थोडा वेळ सर्वांनाच हसूं येऊन पहिला मानसिक ताण जरा कमी झाला.

पुढें एका आठवड्यांतच त्यांचें देहावसान होऊन सखूताईची तीच भेट शेवटची ठरली! आपल्यामुळें लोकांस त्रास झालेला त्यांना आवडला नाहीं. तसेंच स्वतःचे कामांत कोणी चाल्ढकल केलेली खपली नाहीं.

## रावसाहेब काळे व काळे कुटुंब

दादासाहेब करंदीकर व देवधर मास्तर यांचेप्रमाणेंच शाळेचे आणखी एक साहाय्यक म्हणजे रावसाहेब काळे. साताऱ्यांतील प्रागतिक व सुधारक पुढारी, कर्तबगार व श्रीमान् वकील, अशी त्यांची शाळेच्या सुरवातीस भूमिका होती. सेवासदन संस्था साताऱ्यांत सुरू झाली. तिला त्यांचा पाठिंबा व मदत त्या वेळीं होतीच; पण पुढें त्या संस्थेची सर्वच जबाबदारी त्यांचेवर पडली. कन्याशाळेला सुरवात केली तेव्हां रावसाहेबांची मदत मिळणार याबद्दल आम्हांस विश्वास वाटत होताच. त्यांनीं सल्लागार मंडळाच्या अध्यक्षाचें काम स्वीकारून पैसा, सल्लामसलत वगैरे सर्वच प्रकारें शाळेस मदत केली. कोणत्याही

प्रसंगीं त्यांचेकडे जा. योग्य सल्ला ते देत. पण त्यांच्या तापट स्वभावामुळें बोलणारालाच भीति वाटे, व दादासाहेब करंदीकरांशीं बोलतांना जें एक खेळीमेळीचें वातावरण उत्पन्न होई तें होत नसे. आपला एकादा शब्द केव्हां कमजास्त जाईल व रावसाहेब उसळतील हें सांगतां येत नसे. अशा तऱ्हेनें त्यांच्या रागाच्या तडाक्यांत सापडण्याचा प्रसंग मजवर आला नाहीं. उलट आले ते प्रसंग त्यांच्या सौजन्याच्या आविष्काराचेच आले. तरी पण भीतीचें दडपण मनावर राही हें खरें. एकदां संतापले म्हणजे नोकर, आतस्वकीय, स्नेही तर राहोच, वरिष्ठ अधिकारी– प्रत्यक्ष कोर्टांतील जज्ज– असला तरी त्याची हजेरी घेण्यास सोडीत नसत. यामुळें कोर्टांत संतापून विरुद्ध पक्षाच्या वकिलाच्या डोक्यांत कायद्याचें पुस्तक फेकल्याच्या आख्यायिका प्रसृत झाल्या. हा जसा तापटपणा, तसाच मनाचा हळवेपणा. दुसऱ्याच्या दुःखानें व्यथितही तितकेच तात्काल होत; व पुढें पुढें, विशेषतः पुत्रवियोगानंतर तर हा स्वभावविशेष फारच प्रामुख्यानें दृष्टोत्पत्तीस येऊं लागला. एकदां एक खुनाचा खटला चालवीत होते. आरोपीतर्फें वकील होते. शेवटीं दोन्ही वकिलांच्या भाषणाची वेळ आली. कोर्टानें सांगितलें कीं, वकीलसाहेब, अर्ध्या तासांत भाषण आवरा, मला पुढें संध्येस उठावयाचें आहे. रावसाहेबांना एकदम गहिंवर आला व ते म्हणाले, "अहो आरोपीच्या जन्म-मरणाचा प्रश्न आणि तुम्हांस या वेळीं स्नानसंध्या सुचते!" कोर्टही विरघळलें व त्यांनीं सांगितलें, "रावसाहेब स्नानसंध्या बाजूला ठेवतों. हवे तर दोन तास भाषण करा पण डोळे पुसा." यांतील उघड उघड दिसणारी अतिशयोक्ति जरी वजा केली तरी अशा प्रकारच्या आख्यायिका निर्माण व्हाव्या अशा तऱ्हेचा तापटपणा व हळवेपणा त्यांचे स्वभावांत होता हें खरें.

दुसरा त्यांचा स्वभावविशेष म्हणजे प्रांजलपणा. आपलें मत सरळ व स्पष्टपणें सांगून मोकळे होतील. दादासाहेब व रावसाहेब या दोघांच्याकडे माझ्या येरझारा, त्यामुळें दोघांचे स्वभावविशेष माझ्या

नजरेंत जास्त भरत. एक रसिकपणें अलंकारयुक्त भाषेंत भाषण करीत; पण शेवटीं त्यांना काय म्हणावयाचें आहे याची शंका ऐकणाराला उरेच. तर दुसरे थोड्याशा ताडफाड पद्धतीनें आपलें मत सांगून मोकळे होत, पण ऐकणाराला त्यांचें मत निःसंदिग्ध तऱ्हेनें कळे.

गोष्टी बोलूं लागले म्हणजे लहानमोठेपणा विसरून गोष्टींत समरस होण्याचा त्यांचा स्वभावही एकदां माझें प्रत्ययास आला. वाईच्या एका समारंभाहून ते सातारला परत येत होते. मलाही त्याच समारंभाहून वाईहून परत यावयाचें होतें म्हणून मीही त्यांचे मोटारींतच होतें. मोटरचें पेट्रोल मध्यंतरीं संपलें व ड्रायव्हरला शेजारच्या खेड्यांतून रॉकेल आणावें लागलें. सुमारें तासभर वेळ आम्हांस रस्त्याच्या कडेला बसून गप्पा मारीत काढावा लागला. या वेळीं तात्या सातारला वकिली करूं लागले तेव्हांच्या गोष्टी, आपल्या वकिलीच्या सुरवातीच्या गोष्टी, त्या वेळची त्यांची एक मुलगी असती तर माझेच वयाची असती इत्यादि अनेक गोष्टी त्यांचे बोलण्यांत आल्या.

पुत्रवियोगाचे धक्क्यांतून रावसाहेब कसे काय बाहेर पडतील अशी सर्वांना भीति वाटे. पण त्या दुःखांतून धैर्यानें ते बाहेर पडले इतकेंच नव्हे, तर सार्वजनिक कार्यांत जास्तच गढून गेले. याचें श्रेय त्यांना तर आहेच पण त्यापेक्षां जास्त त्यांच्या पत्नीला द्यावेंसें वाटतें. रावसाहेब जसे बाहेर तापट तसेच घरांतही होते. पण सर्व तऱ्हेच्या त्यांच्या रागापुढें टिकाव धरून, त्यांच्या इच्छेप्रमाणें वागून, शेवटीं त्यांच्या पत्नीनेंच त्यांना संकटकाळीं धीर दिला. सर्व गोष्टींबद्दल विचार करून त्यांची मतें बनलीं होतीं असें थोडेंच होतें. रावसाहेब सुधारक म्हणून त्या सुधारणावादी. रावसाहेब दुर्धारक असते तर त्याही तशाच होत्या. पतीच्या आवडीनिवडी त्याच आपल्या समजून त्यांत समरस होऊन जावयाचें ही परंपरागत शिकवण त्यांच्या हाडींमासीं खिळली होती; व रावसाहेबांना पटणारीं म्हणून सेवासदन वगैरे कामें प्रथम त्यांनीं स्वीकारलीं खरीं पण पुढें त्या स्वतःच त्यांत इतक्या गढून गेल्या होत्या कीं

'सेवासदनची व्यवस्था' ही गोष्ट पत्नीची अंतकाळची इच्छा समजून रावसाहेबांनीं पुरी केली.

एक दिवशीं सकाळींच कांहीं कामासाठीं काळे यांच्या घरीं मी गेलें होतें. रावसाहेबांना कांहीं किरकोळ बरें नव्हतें. त्याबद्दल सांगून वहिनी मला म्हणाल्या, "त्यांना काल रात्रभर झोप नव्हती. चैन पडत नव्हतें. तेव्हां जुन्यापुराण्या गोष्टी सांगून आम्हां वेळ काढला. सकाळीं मला म्हणाले, "मुलेंबाळें वेळेस नसलीं व बायको बरोबरीची असली तर एकलकोंडेपणा वाटत नाहीं; पण ज्यांना बायको सुद्धां नसेल– अशीं कांहीं उदाहरणें देऊन ते म्हणाले– त्यांचें आयुष्य किती एकलकोंडें व कंटाळवाणें होत असेल. तुम्ही आहांत म्हणून माझा जगांतला निम्मा तरी आनंद आहे." आणि हें अक्षरशः खरें होतें. वहिनींच्या मागें फार दिवस त्यांनीं तग धरला नाहीं.

वहिनींच्या शेवटच्या दुखण्यांत तर त्यांचा आगीसारखा तापट स्वभाव जाऊन ते लोण्यासारखे मृदु झाले होते. देवधरीणबाई वहिनींना दुखण्यांत भेटावयास गेल्या असतां रावसाहेबांची वहिनींच्या शुश्रूषेबद्दलची व बारीकसारीक इच्छाही पुरी करण्याबद्दलची तत्परता त्यांनीं पाहिली व निघतांना सांगितलें, "ताई! शेवटीं तुम्हीं जिंकलेंत. जन्मभर रावसाहेबांची मर्जी संभाळलीत, पण तेच रावसाहेब आज तुमचा शब्द झेलण्यास उभे आहेत."

वहिनींच्या पश्चात् सातारा सोडावयाचा रावसाहेबांनीं ठरविलें. सेवासदन व कन्याशाळा अशी जोड करून आपला वाडा त्यास देऊन त्याचें स्त्रीशिक्षण-मंदिर बनविलें. या योजनेस त्यांची कन्या ताई व जावई धनंजयराव गाडगीळ यांनीं पूर्ण अनुमति दिली इतकेंच नव्हे, तर मध्यें येणाऱ्या अडचणी मोठ्या कुशलतेनें दूर करून प्रत्यक्ष शाळा तेथें सुरू होण्यापर्यंत तड लावली; व एकंदरींत सर्वच काळे कुटुंब शाळेचे साहाय्यक झालें. योग्य वेळीं काळे यांचेकडून वाड्याची मदत न येती तर माझे नुसते परिश्रम शाळा टिकविण्यास पुरे पडते ना!

# कन्याशाळा भाग पांचवा : : १३

## कन्यादान

प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यांत, तसाच प्रत्येक संस्थेच्या आयुष्यांतही असा एक एक काळ येतो कीं, त्या वेळीं प्रत्येक गोष्ट प्रतिकूल होत जाते. अगदीं साडेसाती म्हणतात ना तशा प्रकारचा काळ! कन्याशाळेच्या जीवितक्रमांत १९२८ ते १९३५ हा सुमारें सात वर्षांचा काल तसाच होता. अठ्ठावीस सालच्या एप्रिलमध्यें शाळेंत पहिलीपासून शिकून तयार झालेला वर्ग प्रवेशपरीक्षेस गेला व स्वाभाविकच मला मनोराज्यें सुचूं लागलीं. एक, आजन्मशिक्षकांची संघटना निर्माण करून त्यामार्फत सातारा जिल्ह्यांतील प्रत्येक तालुक्याच्या गांवीं हायस्कुलें सुरू करावयाचीं; व दुसरें, सातारलाच कन्याशाळेला जोडून कॉलेजचे वर्ग सुरू करावयाचे. पुण्याच्या कॉलेजची मी कधीं प्रिन्सिपल् होईन असें मला शक्य वाटलें नव्हतें व त्या दृष्टीनें मीं कधीं इच्छाही केली नव्हती. जर कधीं प्रिन्सिपल् झालेंच तर स्वतः कॉलेज् सुरू करून त्याचे प्रिन्सिपल् व्हावयाचें असें मीं गप्पा निघाल्या म्हणजे म्हणत असे. आणि मध्यें खंड न पडतां तशीच शाळा मी चालवितें तर तें मनोराज्य अगदीं अशक्य नव्हतें हें आज, कॉलेजचे वर्ग तेथें सुरू झाले आहेत त्यावरून, म्हणावयास हरकत नाहीं.

आगगाडींत बसून खंडाळ्याच्या घाटांत वनश्री पाहण्यांत गुंगून

जावें व एकदम बोगद्यांत गाडी शिरावी म्हणजे प्रथम कांहीं क्षण एकदम अंधार वाटून अगदीं दिसेनासें होतें, व नंतर थोडें दिसूं लागलें तरी आपण यांतून बाहेर पडणार कीं नाहीं असा संदेह उत्पन्न होतो. शेवटच्ीं दोन वर्षें तेहतीस ते पसतीस सालांत शाळेचें काय होईल हें कोणालाच सांगतां येत नव्हतें. मी यूरोपांत असतां माझ्या सातारच्या सहकारी मंडळींनीं शाळा चालू ठेवण्याची शिकस्त केली. पण दिवसेंदिवस कमी पडणारी पैशाची मदत व चालकांत वारंवार होणारा बदल यामुळें एकदां जी घडी विसकटली ती कांहीं केल्या बसेना! मी यूरोपहून परत आलें तों त्यापूर्वींच आमच्या आजन्मसेवकमंडळानें माझी नेमणूक पुण्याच्या कॉलेजमध्यें प्रोफेसर म्हणून करावयाची असें योजलें होतें व त्याप्रमाणें मी येतांच कामावर रुजू झालें. पण तरी सुद्धां मीं सातारच्या शाळेकडे लक्ष पुरवावें अशी सातारच्या मंडळींची इच्छा होती व मला स्वतःलाही त्याखेरीज समाधान वाटणें शक्य नव्हतें. त्यामुळें ६ सप्टेंबर १९३१पासून कन्याशाळा-मंडळावर सभासद म्हणून नेमणूक करून घेऊन सेक्रेटरीचें काम मीं पत्करलें; व यायोगें प्रत्यक्ष अध्यापन व दैनिक व्यवस्था जरी नव्हे तरी योगक्षेमाची जबाबदारी मीं पत्करली. मध्यंतरीचा तीन वर्षांचा काळ म्हणजे माझे दृष्टीनें एक काळा पडदा वाटतो. या काळांत मीं शाळेची शक्य तितकी थोडी चौकशी केली. कारण, असें दिसून आलें होतें कीं, शारीरिक तशी मानसिक विश्रांतीचीही मला जरूरी होती. आजारांतून बरें वाटल्यानंतर, वर्ध्याहून थोडा हिशेब वगैरे तपासून पाठविला तरी तेवढ्यानेंही दोनदोन दिवस थकवा वाढतो असें दिसून आलें. तेव्हां शाळेच्या जबाबदारीची मनानें पूर्ण फारकत करण्याचें ठरवून, कन्याशाळेंतून यूरोपला जाण्यासाठीं निरोप घेऊन बाहेर पडलें ती शाळेची जबाबदारी विसरून. मध्यंतरीं शिक्षक व विद्यार्थिनी पत्रें लिहीत; पण ते कधीं शाळेचे प्रश्न विचारीत नसत व मी कधीं चौकशी करीत नसे. सातारच्या माझ्या सहकाऱ्यांनीं मी येईपर्यंत शाळा जगवावयाची येवढें ठरविलें होतें व तेवढें त्यांनीं केलें.

माझ्या गैरहजेरींत रा. वि. के. महाबळेश्वरकर, कु. गोदूबाई केतकर आणि कु. शांताबाई केतकर यांनीं शाळेचें मुख्याध्यापकाचें काम केलें. १९२८-२९ सालचा अहवाल कु. गोदूबाई केतकर यांनीं प्रसिद्ध केला असून त्या वर्षअखेर मुलींची संख्या ८० होती व पुढच्या १९२९-३० सालच्या अहवालांत--कु. शांताबाई केतकर यांनीं लिहिलेल्या—ती ९२ झाली होती. शाळाखातें व विद्यापीठ यांच्या देणग्या पूर्वींप्रमाणेंच असून प्रचारिका श्री. पार्वतीबाई पळशीकर यांनीं सातव्या वर्षी सुमारें ८७० रु. व आठव्या वर्षी सुमारें २५० वर्गणी गोळा केल्याचें लिहिलें आहे. सातवें वर्ष देणगीचे दृष्टीनें जास्त बरें व आठवें वर्ष मुलींच्या संख्येच्या दृष्टीनें बरें होतें. शांताबाईची प्रकृति मुळांतच अशक्त. सातारची पावसाळी हवा त्यांना जड जाई. मी परत येईपर्यंत तिनें कसा तरी नेट धरला होता पण मी येतांच सातारा सोडण्याचा विचार तिनें मला कळविला; व १५ ऑगस्ट १९३१ पासून तिला शाळेच्या कामांतून मोकळें करण्याचें सर्वांनीं ठरविलें. १९२४ सालीं जी. ए. होतांच शांता सातारला काम करण्यास आली व एकतीसपर्यंत म्हणजे सात वर्षें शाळेंत तिनें चांगलें काम केलें. प्रकृति बेताबाताची खरी; तरी पण नेमून दिलेलें काम व्यवस्थित करण्याची प्रवृत्ति व आनंदी स्वभाव यामुळें ती सर्वांना हवीशी वाटे. शाळेच्या अध्यापनाशिवाय हिशेब लिहिणें इत्यादि ऑफिसच्या कामांतही मला तिचा फार उपयोग झाला.

शांता शाळा सोडणार असें ठरल्यापासूनच आतां पुढें कोणाची नेमणूक करावी या दृष्टीनें मी विचार करूं लागलें. कन्याशाळेच्या शिक्षणविषयक धोरणाबद्दल आपलेपणा वाटणारी म्हणजे जी. ए. व पुन्हा थोड्या पगारावर काम करूं शकेल अशा अध्यापिकेच्या मी शोधांत होतें. मीनाक्षी सरदेसाई एकतीस सालींच जी. ए. झाली होती व तिच्या उत्साही स्वभावाची कल्पना मला थोडीबहुत होती. माझी पुतणी लीला व ती कॉलेजमध्यें तीन वर्षें एकदम शिकल्या असून दोघींचा स्नेह विशेष. दुसरें, माझा भाऊ बाबा केळकर याचेबरोबर

१९३० सालचे चळवळींत तिनें काम केलें होतें. बाबा व लीला या दोघांचेकडून तिची मिळालेली माहिती अशीच आशादायक. त्यामुळें तिलाच पत्र लिहिण्याचें मीं योजिलें, व तिनेंही येण्याचें लागलीच कबूल केलें, व येऊन १ सप्टेंबर १९३१ पासून २३ डिसेंबर १९३२ पर्यंत शाळेचें काम केलें. ग्रॅज्युएट् होऊन तीन चार महिनेच झालेले. अर्थात् तिला अध्यापनाचा अगर शाळा चालविण्याचा अनुभव नव्हताच; व तो नसणार हें समजूनच आम्ही चाललों होतों. कन्या-शाळेच्या मुख्य स्थानीं स्त्री असणें अवश्य. त्या योगानें शिस्तीचे प्रश्न सोडविण्यास बरें पडतें. शिवाय लोकांचा जास्ती विश्वास बसतो असें वाटे. परंतु मीनाक्षी अननुभवी असली तरी तडफ व हुशारी तिच्यांत होती, व शाळेंतील विसुभाऊ आदि शिक्षकांनीं तिला मदत करण्याचें आश्वासन दिलें होतें. अशा तऱ्हेच्या संस्थांतून काम करतांना जरूर असणारा ध्येयवाद व पैशाकडे न पाहतां कामाकडे दृष्टि देऊन थोड्या पगारावर काम करण्याची तयारी तिची होती. एक दोन वर्षांच्या अनुभवानें ती कामांत तयार होईल अशी माझी कल्पना, व त्यामुळें थोड्या आशेनें शाळेच्या भविष्याबद्दल मी विचार करूं लागलें.

मीनाक्षीमध्यें जरूर तो आत्मविश्वास होता. त्यामुळें शिकवितांना हें मला येईल कीं नाहीं असा विचार करीत न बसतां शिकवूं लागे. बऱ्या प्रकारचें यश तिनें मिळविलें व जास्त राहती तर ती चांगल्या अध्या-पकांपैकीं एक झाली असती. आपणाला न येणारी गोष्ट ती तितक्याच प्रांजलपणें कबूल करी. तिचा प्रांजलपणा व उत्साही स्वभाव यामुळें शिक्षकवर्गही तिच्यावर खूष होता. पण शिक्षण हें तिचें ध्येयच नव्हतें. तिचे बंधु रा. श्रीनिवासराव सरदेसाई यांचेमुळें तिचे मनांत कामगारांच्या चळवळीबद्दल आवड उत्पन्न होऊन तिला त्या क्षेत्रांत काम करावयाचें होतें; व त्या ध्येयकल्पनेंत ती गुंगून जाई. प्रत्यक्ष कामाला सुरवात करावयास अजून वेळ होता व या मध्यंतरीच्या काळांत ती सातारला आली होती. ती शाळेला लाभणार नाहीं हें मला लवकरच कळून चुकलें.

प्रत्येक आठदहा वर्षांनीं नवनव्या चळवळींची भरती सुरू होते. त्या लाटा त्या त्या काळांतील भावनाप्रधान विद्यार्थिवर्ग उचलतो, व त्यांत ध्येयनिष्ठ असतील त्यांचे त्या चळवळी हें जीवितकार्य होतें. १९१८ ते १९२० हा माझ्या विद्यार्थिदशेचा कालखंड. त्या वेळीं शिक्षणप्रसार, साक्षरता इ. गोष्टींकडे विद्यार्थ्यांचा ओढा दिसे. विद्यार्थि-परिषद, (Students' Federation) अशा कांहीं विद्यार्थि-संघटनाच्या चळवळीही होत्या. पण ती त्यांची सुरवात होती. असहकारितेचा भर ओसरला व कम्यूनिझमच्या चळवळीस भर येऊं लागला. या कालखंडांतील विद्यार्थिनींची प्रतिनिधि म्हणजे मीनाक्षी. त्या वेळीं जोरांत असलेल्या कम्यूनिझमच्या विचारानें भारावलेली. कांहीं वेळापुरतें तिनें हें शाळेचें काम स्वीकारलें होतें. पूर्वी हिशेब पाहण्याचें काम सुपरिंटेन्डेन्टच करी, पण मीनाक्षी अननुभवी म्हणून तिच्या कारकीर्दींत जमाखर्च रा. मटांगे यांचेकडे सोंपवला. तिला असल्या गोष्टींचें महत्त्वच वाटत नसे. एकदां मीं सातारला गेल्यावर जमाखर्चाची चौकशी केली. मटांगे म्हणाले, "अहो करूं काय? या पैशाची परचुंडी माझेपुढें ठेवतात व म्हणतात लिहा खर्च. व्हाउचर द्या म्हटलें म्हणजे म्हणतात व्हाउचर म्हणजे काय? मीं नाहीं कसली नोंद ठेवली आणि नोंद ठेवीत जा व पावत्या ठेवा म्हटलें म्हणजे म्हणतात मला नाहीं तें जमावयाचें. तुमचेजवळच पैसा ठेवीत जा. मीच तुमच्याकडून मागून घेईन."

यावरून तिला मीं म्हटलें, "मीनाक्षी, अग जमाखर्चाची माहिती करून घे एकदां. मटांगे जरी तुझ्यासाठीं जमाखर्च लिहीत असले तरी सुपरिंटेन्डेन्ट म्हणून शेवटीं सगळी जबाबदारी तुजवर आहे व तें तुला कळावयास पाहिजे."

"हें पहा कमलाबाई!" "ती म्हणे, माझें नाहीं असल्या गोष्टींत लक्ष लागत. शाळा चालविणें हें कांहीं माझें ध्येय नाहीं. मला आमच्या चळवळींत जायचें आहे."

"शाळा चालविली नाहींस आणि कुठेंही गेलीस तरी जमाखर्चाची माहिती हवी. तुमच्या मजुरांच्या चळवळीला तरी जमाखर्च कळूं नये असें का आहे? जीवितकार्य म्हणून करूं नको, पण व्यवहारांतील अवश्य व कोणत्याही कामांत उपयोगी गोष्ट म्हणून याची माहिती करून घे. तुमच्या चळवळींत सुद्धां याचा उपयोग आहेच."

"पण तें कांहीं मला जमत नाहीं." ती प्रांजलपणें सांगे व पुढें म्हणे, "कमलाबाई! तुम्हीच हें शिक्षणकार्य सोडा व आमच्या चळवळीला येऊन मिळा. आमचें राज्य झाल्यावर त्यांत शिक्षण होणारच; तेव्हां तुमच्यासारखीं माणसें आम्हांला हवींत."

मला हसूं येई व मी म्हणे, 'काळ पुढें जातो याची ही खूण.' काशीबाई देवधर वगैरे अगदीं पहिल्या कार्यकर्त्या स्त्रियांना अनाथ बालिकाश्रमाचें कार्यच वाढवावें असें वाटे. पण त्यांच्या पुढील मंडळींना कुमारिकांचे शिक्षणाखेरीज तें अपुरें वाटूं लागलें. मीं ज्या वेळीं कामाला सुरवात केली त्या वेळीं मला तरी केवळ विधवाशिक्षण व कुमारिकांचें शिक्षण कुठें पुरेसें वाटत होतें? माझी धाव होती साक्षरताप्रसाराकडे; मातृभाषेतून शिक्षण देणाऱ्या व राष्ट्रीय समजल्या जाणाऱ्या विद्यापीठाचें आमिष पुढें नसतें व त्या योगानें स्त्रियांचें दुय्यम शिक्षण वाढविण्यासाठीं निघणारीं हायस्कुलें दिसत नसतीं तर मी तरी नुसतें 'विधवांचें शिक्षण' करीत राहिलें नसतें. त्यानंतरची दहा वर्षांनीं तयार झालेली ही पिढी; यांना हें काम सुद्धां भरपूर नवें वाटत नाहीं.

"एकदां घेतलेलें काम सोडावयाचें नाहीं" असें मीं म्हटलें म्हणजे ती म्हणे, "कमळाबाई! खरंच का तुम्हांला आमच्या तत्त्वांत कांहींच अर्थ वाटत नाहीं? सगळींच टाकाऊ वाटतात?" मी म्हणे, "बाई ग! तुमचीं सर्वच तत्त्वें मला टाकाऊ वाटतात असें नाहीं. कांहींची उपयुक्तता पटते. पण प्रश्न आहे तो पहिलें काम सोडण्याचा. दहा वर्षांपूर्वीं एकदां आम्हीं शिक्षण हें जीवितकार्य ठरविलें. दरदहा वर्षांनीं अशा नवीन विचारांच्या लाटा येतात. प्रत्येक वेळेला नवी लाट दिसली कीं पहिली, एकदां

शपथपूर्वक स्वीकारलेली, कामगिरी सोडून कसें चालेल? आणखी दहा वर्षांनीं तुझ्या पुढच्या पिढीच्या मुलींनीं तुला सांगितलें कीं बाई ग! हें काम आतां करूं नको; आम्ही सांगतों तें नवें कर. तर तुला जोंपर्यंत तुझें काम उपयुक्त वाटत आहे तोंपर्यंत तूं तें सोडशील का? प्रश्न तुझें काम उपयुक्त आहे कीं नाहीं हा नसून, मीं जें काम स्वीकारिलें आहे तें इतकें टाकाऊ झालें आहे का कीं त्यांतून कांहीं उपयुक्त निघत नाहीं! मातृभाषेतून शिक्षण व्हावें या चळवळीच्याबद्दल भरपूर काम झालें आहे, व त्यांत उपयुक्त करतां येण्याजोगें कांहीं शिल्लक नाहीं, असें मला अजून वाटत नाहीं; व म्हणून मी तें सोडीत नाहीं. जगांत अनेक उपयुक्त गोष्टी आहेत, सगळ्याच करणें अगर दरवेळीं नवीन दिसेल तें करणें शक्य नाहीं. तेव्हां, एकदां आपण जें शपथपूर्वक स्वीकारलें तेंच शेवटपर्यंत करावें. यामुळें दरवेळीं उसळणाऱ्या लाटेवर आपण अग्रेसर म्हणून चमकूं शकणार नाहीं; पण एक काम पुरें केल्याचें समाधान मिळेल."

तिच्या तडफदार आणि मनांत येतांच बोलून मोकळे होण्याच्या स्वभावामुळें कांहीं विनोदप्रसंगही निर्माण झाले. शाळेचें वार्षिक संमेलन व्हावयाचें होतें. पुरुषांसाठीं एक व स्त्रियांसाठीं एक असे दोन दिवस कार्यक्रम असत; व दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमांत पुष्कळदां स्त्रियांची कथा ठेवीत असूं. हेतु असा कीं, अगदीं जुन्या बायकांनासुद्धां यावेंसें वाटावें. या वर्षीं सौ. मनोरमाबाई काथवटे यांचें कीर्तन ठरविलें होतें व श्री. सोनूबाई काळे त्यांची साथ करणार होत्या. संमेलनास दोन दिवस उरले. सोनूताईही त्याच दिवशीं कांहीं कामानिमित्त घरीं पाहुण्या आल्या होत्या. दुपारीं आम्ही सर्व मंडळी माडीवर बसलों असतां मीनाक्षी आली व एकदम तिनें बोलावयास सुरवात केली:

"कमलाबाई, ही परवांची कथा मला अगदीं नापसंत आहे, ही कथा होतां उपयोगी नाहीं."

"कां म्हणून?" मीं आश्चर्यचकित होऊन विचारलें.

" त्या मनोरमाबाई वेदान्त सांगतील तो खोटा आहे. जग खोटें, संसार खोटा, असें त्या सांगणार व स्वतः संसार करणार. हें खोटें तत्त्वज्ञान आहे. याचा प्रसार मला करावयाचा नाहीं."

मीं म्हटलें, " अशा तऱ्हेचे विचार त्यांत येतील; पण मुख्य आख्यान त्या एखाद्या कर्तबगार स्त्रीचें लावतील. स्त्रियांनीं शिक्षण घेऊन कर्तबगार व विचारी व्हावें असें सांगतील व हेंच आपल्याला हवें. स्त्रिया विचार करूं लागल्या म्हणजे या तत्त्वज्ञानाचे खरेखोटेपणाचा विचार त्यांनीं करावा."

ती म्हणे, " तें कांहीं नाहीं. मी कथेला विरोध करणार." मग मलाही जरा उग्र स्वरूप धारण करावें लागलें. तिच्या नवशिकेपणाचा फायदा घेऊन मीं म्हटलें, " तुला जर कथा नको होती, तर ज्या वेळीं कार्यक्रम ठरला त्या वेळीं तूं विरोध करावयाला हवा होतास. तेव्हां कार्यक्रम ठरूं दिलास. लोकांना कार्यक्रम कळविला, मनोरमाबाईंना आमंत्रण दिलें व आतां त्यांना काय म्हणून नाहीं म्हणावयाचें ? मी कन्याशाळामंडळाची सेक्रेटरी आहे. ठरल्याप्रमाणें मी सर्व कार्यक्रम घडवून आणणार. तुला हवें असलें तर तूं गैरहजर रहा."

आपण विरोध करायचा तर तो आधीं करावयास हवा होता हें मग तिच्या ध्यानांत आलें व म्हणून ठरल्याप्रमाणें कार्यक्रम करण्यास ती कबूल झाली. पण हा सर्व संवाद दहा मंडळींसमोर झाला व त्यांत सोनूताई होत्या त्यांनीं तो सर्व ऐकिला. रात्रीं औंधास जातांना त्या मला म्हणाल्या, " आज माझा आवाज बसला आहे. जर बरें वाटलें तर मनोरमाबाईंबरोबर येईन." याचा अर्थ मी येणार नाहीं व अर्थात् मी कां येत नाहीं हें कळलें म्हणजे त्याही येणार नाहींत असा मी समजलें. पण त्यांच्यासमोरच आमचा वाद झाल्याकारणानें त्यांची समजूत घालण्यांत अर्थ नव्हता. संमेलनाचा पहिला दिवस पार पडला व दुसऱ्या दिवसाच्या गोष्टी सुरू झाल्या. मीं म्हटलें, " उद्यां कथा

होणार नाहीं, आपल्याला कांहीं तरी दुसरी व्याख्यानाची तजवीज करावयास हवी."

" तें कां ? " मीनाक्षी आश्चर्यानें विचारूं लागली. " त्यांनीं कबूल केलें आहे कीं ! "

पण तूं सोनूताईंच्या समोर टीका केलीस. ज्याच्या घरीं पाहुणे जायचें त्याची नाखुषी कळल्यावर पाहुणा येईल कसा ? तूं सुपरिंटेन्डेन्ट. एक प्रकारें त्या तुझ्या पाहुण्या, कारण तुझ्या शाळेंत कीर्तन; तूं त्यांच्या तोंडावर त्यांचें कीर्तन नापसंत म्हटल्यावर त्यांनीं कां यावें ? आपण भांडलों तेव्हां सोनूताई तेथेंच होत्या.

" मग तुम्हीं मला कां तसें सुचाविलें नाहींत ?" ती गोंधळून म्हणाली.

" तूं सुचविण्याला मला सवड दिलीस का ? मला एकीकडे हाक मारून बोलतीस तर मीं सुचाविलें असतें."

" मग आतां काय करायचें ? "

" आतां आपण दोघींनीं बसून खूप हसायचें ! "

पण मीनाक्षीचा ओढा तिच्या चळवळीकडेच जास्त.

पुढें एक दिवशीं तिचें पत्र येऊन थडकलें.

दादर, ७-११-३

" कमलाबाई,

नमस्कार वि. उद्यां दुपारीं एकच्या एक्सप्रेसनें मी व लीला पुण्यास निघून येत आहों. पहिल्यानें तुमच्या गांवांतील घरांत येऊं. तेथून मग कॉलेजवर राहावयास जाऊं. आज पत्र लिहिण्याचें कारण विशेष महत्त्वाचें आहे. माझा या वर्षाच्या शेवटपर्यंत सातारला राहण्याचा बेत कायम झाला होता. पण येथें आल्यानंतर आमच्या कॉमरेड्सनीं येथील सर्व परिस्थिति मला समजावून सांगितली; त्यावरून आतां इकडे तिकडे कोठेंही वेळ न गमावतां शक्य तितक्या लवकर त्यांच्यांत भाग घेतला पाहिजे हें मला कळून आलें. म्हणून आतां

शाळा दिवाळीनंतर सुरू झाली कीं एक महिन्याची नोटीस देऊन मी येथें काम करूं लागणार आहे. माझ्या वागण्यामुळें शाळेच्या कामांत किती गोंधळ होणार आहे याची मला पूर्ण कल्पना आहे. पण अर्थात् मीं तें सध्यां सोडलें नाहीं तर येथील कामांतही तितकाच गोंधळ होईल. अशी परिस्थिति असल्यामुळें मला तसें करावें लागत आहे. जास्त भेटी अंतीं.

तुमची
**मीनाक्षी** ”

मीनाक्षी आल्यानंतर स्वाभाविकच पहिले दोन-चार महिने तिला माहिती होऊन जम बसण्यांत गेले. नोव्हेंबर ते एप्रिल ही सहामाही अनुभव घेण्यांत जाईल आणि खरी कामाची घडी बसणें ती जून ३२ पासून सुरू होणाऱ्या वर्षीं बसेल अशी आशा मला वाटूं लागली होती. कारण मीनाक्षीच्या नवीन व क्रांतिकारक वाटणाऱ्या मतामुळें व त्यांच्या वेळोवेळीं चालणाऱ्या प्रचारामुळें जरी सातारकर थोडे दचकले होते; तरी पण तिचा प्रांजलपणा व तडफ यामुळें ती असली तरी चालेल, पण शाळा चालावी असेंच सर्व म्हणत. परंतु जून उजाडण्या-पूर्वींच ठाकरसी इस्टेटीचे ट्रस्टी व विद्यापीठाचे चालक यांच्यामधील मतभेद पराकोटीला पोंचून त्याचें पर्यवसान साडेबावन हजारांची विद्यापीठाची मदत बंद होण्यांत झालें. या मध्यवर्ती उत्पाताचा कन्या-शाळेपर्यंत येऊन पोंचणारा धक्का म्हणजे शाळेची बाराशेंची ग्रँट बंद झाली. एक वर्ष सहाशेंच मिळाले व पुढील वर्षीं ग्रँट अजीबात बंद होण्याची नोटीस मिळाली. आधींच दरवर्षीं दोन हजार रुपयांची तूट वर्गणीनें भरून काढावी लागे त्यांत आणखी ही बाराशेंची भर पडणार! या पैशाच्या विवंचनेंत मी होतें तोंच, पुन्हा सुपरिंटेन्डेन्टचा बदल. एकदम बंद झालेल्या देणगीमुळें विद्यापीठाचें पुढें काय होणार याचीच शंका लोकांना वाटूं लागली होती. अर्थात् त्याच्या एका शाखेचें भवितव्य ठरल्यासारखेंच झालें; त्यांत दर वर्षाला नवी व्यवस्था. या

सर्वांचा परिणाम असा झाला कीं, आठव्या रिपोर्टांत नमूद झालेली मुलींची ९२ ही संख्या घटत घटत जानेवारी १९३३ मध्यें ३८ वर आली. देणगीच्या बाबतींत हीच स्थिति होऊन देणगीचा आकडा निम्यावर आला.

या वेळीं नवी योजना करतांना शिक्षण हेंच ज्याचें ध्येय आहे अशाच माणसाची निवड करावयाचें ठरवून त्या दृष्टीनें मी पाहूं लागलें. जून १९३२ पासून रा. रा. गो. रा. माटे हे शाळेंत कांहीं तास शिकवीत असत. त्यांच्या शिकविण्याचा लौकिक चांगला होता. ते एम्. ए., बी. टी. असून त्यांना काम करण्याची हौस होती. तेव्हां त्यांनाच मुख्याध्यापक करावयाचें ठरविण्यांत आलें व जानेवारी १९३३ पासून एप्रिल १९३५ पर्यंत सुमारें अडीच वर्षें त्यांनीं तें काम केलें. मुलींची संख्या वाढविणें, शिक्षण सुधारणें, शिस्त लावणें इ. अनेक गोष्टींकडे लक्ष पुरवून त्यांनीं एक-दीड वर्षांत शाळेचें स्वरूप सुधारलें; मुलींची संख्या ३८ ची ७८ पर्यंत आली. आशा वाटूं लागली कीं, स्वतःची इमारत व साधनसामुग्री जास्त असेल तर मुलींची संख्या आणखी वाढेल. अकरा वर्षें शाळा चालल्यानंतर डोंबाऱ्याच्या बिऱ्हाडाप्रमाणें पाठीवर सामान घेऊन हिंडावयाचें भटक्याचें जीवन पुरें झालें. स्वतःच्या इमारतीनें स्थायिकपणा वाटतो. या दृष्टीनेंही जलमंदिराजवळील गोजराबाईसाहेबांचा वाडा म्हणून ओळखला जाणारा माजगांवकरांचा वाडा व जुन्या राजवाड्यासमोरची– म्हणजे हल्लींच्या कोर्टासमोरील– मोकळी बखळ घेण्याची बरीच खटपट केली पण जमलें नाहीं. ती मोकळी जागा कन्याशाळेस देण्याचा ठराव म्युनिसिपालिटींत नापास झाला. पण हा जागेचा प्रश्न पुढच्या वर्षीं अकल्पित तऱ्हेनें सुटला.

या दोन-अडीच वर्षांत, विशेषतः शेवटच्या दीड वर्षांत, जाचणारा प्रश्न पैशाचा. दोन हजारांची वार्षिक देणगी मिळवावी लागेच. त्यांत विद्यापीठाची ग्रँट सुमारें बाराशें बंद झाली. म्हणजे दरवर्षीं तीन हजार रुपये आणावे कसे हा प्रश्न पडे. रा. माटे यांची नेमणूक करतांना

१६

दुसरें एक धोरण स्वीकारलें होतें— म्हणजे पहिलें एक सोडलें होतें— तें स्वार्थत्यागाच्या कल्पनेचें! विद्यापीठाच्या विद्यार्थिनींवर कन्याशाळेचा हक्क जास्त, व पोटापुरतें वेतन घेऊन विद्यापीठाचा शिक्षणक्रम लोकमान्य करा अशी आण्णांची सर्वांना शिकवणी. आतांपर्यंत कन्याशाळेच्या प्रमुख म्हणून आलेल्या स्त्रिया जी. ए. च होत्या, तेव्हां त्यांना ही शाळेची परिस्थिति पटे व त्या कमी पगारावर काम करण्याचें स्वीकारीत. येथपर्यंत पगाराचा आकडा चाळीस रुपयांच्या पुढें गेलेला नव्हता. पण रा. माटे यांचे वेळीं हें धोरण सोडून त्यांच्या पदवीप्रमाणें त्यांना इतर कोठेंही जो पगार मिळाला असता तो देण्याचें ठरविलें. इतर स्त्रीप्रमुखांप्रमाणें विद्यापीठाचा त्यांचेवर हक्क नव्हता. शिवाय गरिबींतून स्वकष्टानें शिक्षण पुरें करून प्रपंचाची जबाबदारी स्वीकारलेल्या व्यक्तीवर पुन्हा लागलीच दुसरें दडपण आणणें मला पसंत नव्हतें व त्यांनींही तें पतकरिलें नसतें. पहिल्या वर्ष-दीडवर्षांत पैसे मिळवावयाची बरीच खटपट त्यांनीं केली, पण पुढें ते कंटाळले; व पैसे ठरल्या तारखेस मिळत असतील तरच मी बाकीचें काम करीन, नाहीं तर शाळा सोडून जाईन, असें धोरण त्यांनीं स्वीकारलें. चारशें-साडेचारशें रुपये दर महिना उभे करावे लागत. विशेषतः वर्ष अखेरीस ग्रँट हातांत येईपर्यंतचे चार-पांच महिने ही अडचण फार भासे. कन्याशाळा-मंडळाचे माझेखेरीज आणखी सभासद तीन. ते म्हणजे कै. रावबहादुर काळे, रा. सोमण व डॉ. आगाशे. यांनीं बरीच रक्कम अगोदर दिली होती. शिवाय ते तरी दरमहा पडणारी तूट कशी व किती दिवस भरून काढणार? कन्याशाळा एवढी एकच संस्था त्यांच्या दातृत्वावर अवलंबून नसून, अनेक संस्थांपैकीं ती एक होती. शिवाय विद्यापीठावरील संकट केव्हां दूर होईल व किती दिवस ही तूट भरून काढावी लागेल हें कळत नव्हतें. माझी सांपत्तिक स्थिति त्यांच्या मानानें अगदींच क्षुद्र. तुलना करण्याचेंही कारण नाहीं. पण कन्याशाळा काढण्यांत मींच पुढाकार घेतलेला व माझी एकमेव कृति

म्हणजेच कन्याशाळा! इतके दिवस श्रम करून वाढविलेली संस्था एकदम बंद करावी हें मनाला पटत नसे. विद्यापीठाच्या चाललेल्या भांडणामुळें, आम्हां विद्यापीठांतील काम करणारांचे पगारही कमी झाले होते; व मला दरमहा ७५ रुपये १ मे १९३२ पासून मिळत होते. पण रा. माटे यांना अडचण पडूं द्यावयाची नाहीं असें योजून, पडेल ती तूट दरमहा तीस रुपयांपर्यंत माझ्या पगारांतून मी भरून काढूं लागलें. ग्रँटचा हप्ता वर्षअखेर येणार. तोंवर पैसे पाहिजेत म्हणून सातशें रुपये तात्यांचेकडून उसने घेऊन तेही पाठविले. माझी जिकीर पाहिली म्हणजे तात्या रागावत व म्हणत, "जेथली शाळा तेथल्या पैशावर चालावी हें योग्य. साताऱ्च्या लोकांना जरूरी नसली तर शाळा बंद पडेल. तूं पुण्याहून पैसे पाठविणार किती व शाळा चालणार कशी?" कन्याशाळा बंद करण्याची कल्पनाच मला पटत नसे. पण नुसत्या कल्पनेवर जगणार किती! याच वेळीं आपला राहता वाडा कन्या-शाळेस देण्याचा मनोदयही रावबहादुर काळे यांनीं निश्चित केला होता. रा. माटे व इतर मंडळी जर थोडी पैशाची घस सोसण्यास व पैशाची जबाबदारी घेण्याला तयार झाली असती तर मीही माझ्या पगारापैकीं निम्मा म्हणजे दरमहा तीस-पसतीस रुपये पूर्वींप्रमाणेंच पाठविण्यास तयार झालें असतें. परंतु दुसऱ्या कोणाचीच तयारी नसतां माझ्या देणगीनें फार तर एका शिक्षकाचा पगार भागला असता. शिवाय शाळेचें दैन्य पुन्हा कायमच! शेवटीं मन कठोर केलें, फेब्रुवारी महिन्यांत मंडळाचे सभेंत पुढील वर्षापासून शाळा बंद करण्याचा ठराव केला, व सर्व शिक्षकांस सूचना दिल्या.

मनुष्य आजारी असतांना त्याचा आजार वाढत वाढत पराकोटीला जातो; पण आयुष्य शिल्लक असल्यास तेथपासून दुखण्यास उतार पडतो. तसेंच शाळेच्या बाबतींत झालें. पूर्वींच्या सर्व परिस्थितींत एकच बरी गोष्ट म्हणजे वाड्याची आलेली काळे यांची देणगी व तीच पुढें शाळा वांचविण्यास कारण झाली.

शाळेच्या स्थितीबद्दल चर्चा निघाली म्हणजे पुष्कळ वेळीं अशा सूचना लोक करीत कीं, शाळा सरकारी मुंबई विद्यापीठास जोडावी म्हणजे मुलींची संख्या वाढेल व सांपत्तिक स्थिति सुधारेल. पण मला हें पटत नसे व चालकांपैकीं कांहीं मंडळींनाही पटत नसे. कारण महिला विद्यापीठाचा राष्ट्रीय शिक्षणक्रम लोकमान्य व्हावा या हेतूनें शाळा काढलेली. सुरवातीला जोमांत चाललेली. मध्यंतरीं संकटें न येतीं तर तसाच जोम टिकला असता. विद्यापीठाची ग्रँट् बंद होती त्या तीन वर्षांतही मॅट्रिकचा शिक्षणक्रम सुरू करण्याच्या सूचना येत. पण विद्यापीठासाठीं सुरू झालेल्या पहिल्या शाळेनें त्याच्या अडचणीच्या दिवसांत धोरण बदलणें म्हणजे विद्यापीठाच्या स्थैर्याबद्दल आमचाच विश्वास नाहीं असें दाखविणें असें मला वाटे, व मीं त्या सूचनेला कसून विरोध करी. मुंबई विद्यापीठाकडे जावयाचें होतें तर सुरवातीपासून इतक्या पैशाच्या अडचणी सोसावयाचें कारण नव्हतें. त्या एका विशिष्ट ध्येयानें सोसल्या होत्या. मला आशा वाटे कीं, हेही दिवस जातील व विद्यापीठावरील संकट दूर होतांच पुन्हा पूर्वीप्रमाणें ग्रँट् सुरू होईल. सरकारी ग्रँटच्या जोडीला विद्यापीठाच्या ग्रँटची शाश्वती असती तर उरलेल्या पैशाची जबाबदारी उचलण्यास जास्त धीर येता. पण विद्यापीठावरील संकट दूर झाल्यावर परिस्थिति बदलली. या शाळा म्हणजे आपली मत-प्रणाली प्रसृत करणारीं आपलीं केंद्रें आहेत ही भावना सुटून, पैशा-साठीं आसावलेलीं भुकेलीं माणसें आहेत असें वाटून, ओंळीबरोबर येईल ती पळी घ्यावी, नको असली सातारकरांना शाळा तर त्यांनीं बंद करावी, अशी विचारसरणी ऐकूं येऊं लागली. विद्यापीठाचा शिक्षणक्रम असतांही सरकारी इन्स्पेक्टर कॅमेरान् यांची सहानुभूति यापेक्षां जास्त मिळाली होती. सिंडिकेटचे कांहीं सभासद व कुलपति यांना भेटून ही सर्व परिस्थिति सांगितली. पण तेही कांहीं करूं शकले नाहींत. शेवटीं सदतीस सालीं मोठ्या नाखुषीनें मॅट्रिकचा शिक्षणक्रम सुरू करण्याची योजना करण्यांत आली, व एकोणचाळीस सालीं

पहिली तुकडी मॅट्रिकला गेली. दुसरा शिक्षणक्रम सुरू झाल्याबरोबर मात्र एकदम पुढच्या वर्षाच्या अंदाजपत्रकाचे वेळीं सिंडिकेटमध्यें ज्या शाळा केवळ आमचा शिक्षणक्रम ठेवतात त्यांचा आम्ही प्रथम विचार करूं, कारण त्या संस्था एकनिष्ठ ( loyal ) आहेत, अशी विचार-सरणी आली. चंचल संस्थांत ( disloyal ) कन्याशाळेची गणना झाली. Adding insult to injury म्हणतात तें असें. शाळेची भरभराट आहे, मुलींची संख्या वाढते आहे, पण ज्या ध्येयानें शाळा सुरू झाली तें संपूर्णतया टिकलें नाहीं, ही जाणीव होऊन अजून दुःख होतें आणि ज्या विद्यापीठासाठीं हें सर्व सोसलें त्याची बेपर्वाई पाहिली म्हणजे तर दुःखांत संतापाची भर पडते.

रावबहादुर काळे हे कन्याशाळा-मंडळाचे अध्यक्ष व सौ. सत्यभामाबाई काळे याही मंडळाच्या जुन्या सभासद. शिवाय सातारच्या सेवासदन संस्थेंत सुरवातीपासून त्या प्रामुख्यानें भाग घेत, व पुढें तर त्या संस्थेची सर्वच जबाबदारी त्यांचेवर पडली होती. चौतीस सालच्या सुरवातीपासूनच वहिनींची ( सौ. सत्यभामाबाई ) प्रकृति बिघडली व ता. ७ जुलै १९३४ रोजीं त्यांचें देहावसान झालें. शेवटच्या दिवसांतही सेवासदन कसें चालेल याची त्यांना काळजी वाटत असे. वहिनींचा शेवट म्हणजे आपल्याच आयुष्यक्रमाचा शेवट असें जणूं कांहीं रावसाहेबांस वाटे; व आपल्या इस्टेटीची व्यवस्था व सेवासदनची व्यवस्था काय करावी याचा विचार स्वाभाविक त्यांचे मनांत चाले. पत्नीच्या मृत्यूनंतर आपलें सातारचें जीवन संपलें असें मानून आपल्या वाड्याचें स्त्रीशिक्षण-मंदिरांत रूपांतर करावयाचें त्यांनीं योजिलें, व बाराव्या दिवशीं त्या योजनेचा प्रकट उच्चारही करून टाकला. स्त्रीशिक्षणमंदिरामध्यें स्त्रियांच्या शिक्षणाची सोय करावयाची, सेवासदन त्यांचे घरांत अगोदर चालू होतेंच, व कन्याशाळा चालू असेपर्यंत स्त्रीशिक्षण-मंदिरांत तिला जागा द्यावयाची असें त्यांनीं योजिलें. याबद्दल पुष्कळ वाटाघाटी होऊन शेवटीं असें ठरलें कीं, सेवासदन व

कन्याशाळा या दोन्ही संस्था चालविण्याची जबाबदारी एकाच मंडळानें घ्यावी, व संस्था बंद झाल्यास वाडा काळे इस्टेटीच्या विश्वस्तांकडे परत करावा. सेवासदन संस्थेचें काम म्हणजे शिवण, गायन व इंग्रजी भाषा शिक्षण हें बेताचें असलें तरी त्यालाही दरमहा वर्गणीची जरूरी असेच. तेव्हां सेवासदनाची जबाबदारी जास्ती घेणें म्हणजे आधींच पडणाऱ्या तीन हजारांच्या वार्षिक वर्गणीच्या बोजावर पांच-सहाशेंचा बोजा वाढविणें होतें. पण वाडा मध्यवस्तींत व स्वतःत्रा मिळाल्यानें शाळेला स्थायिकपणा लाभेल व मुलींची संख्या वाढेल. शिवाय नुसतें वर्षाचें घरभाडें म्हटलें तरी या जागेस आम्हांस सहाशें रुपये द्यावें लागले असते. या दृष्टीनें मला हें पटत होतें व इल्लींही ज्या वेळीं सेवासदन स्वावलंबी आहे कीं नाहीं याची चर्चा आमच्या हिंदु वुइडोज् होमच्या सभांत होतें तेव्हांही, मी असेंच म्हणत असे कीं सेवासदन संस्था हिशेबाचे दृष्टीनें जरी वेगळी म्हटली तरी चालवितांना कन्याशाळेचा तो एक भाग समजून चालवावी. शाळेमध्यें प्रत्येक इयत्ता जशी जमाखर्चाचे दृष्टीनें स्वयंपूर्ण आहे कीं काय हें आपण पाहत नाहीं, सर्व इयत्ता मिळून जमाखर्चाची मिळणी झाली म्हणजे पुरे असें समजतों, तसेंच सेवासदनचे बाबतींत करावें. कारण वहिनींना शेवटच्या रुग्णशय्येवर मनाला सदनची काळजी वाटत होती, व रावसाहेबांनाही कन्याशाळेपेक्षां सदनची व्यवस्था कशी करावी हाच प्रश्न पडला होता. ती नैतिक जबाबदारी त्यांना जास्त वाटे व त्यासाठीं नुसत्या सदनला ते वाडा देते तरीही त्यांना दोष देण्याचें कारण नव्हतें. कन्याशाळा काढण्याचा निश्चय करतांना प्रथम त्यांना मी विचारावयास गेलें नव्हतें. त्या दृष्टीनें सदनपेक्षां कन्याशाळा चालविण्याची त्यांचेवरील नैतिक जबाबदारी दुय्यम स्वरूपाची होती हें उघड आहे. पण शाळा काढण्याचें ठरविल्यानंतर मीं त्यांना मदत मागितली ती त्यांनीं सुरवातीपासून दिली, व प्रथमपासून शेवटपर्यंत कन्याशाळामंडळाचे ते अध्यक्ष झाले.

कन्याशाळेच्या अडचणीही त्यांना माहीत होत्याच. म्युनिसिपालिटी-कडे शाळेला जागा मिळविण्याच्या खटपटी त्यांचे सल्ल्यानेंच झाल्या होत्या. कन्याशाळेला जागेची वाण व सदनला कार्यचालकांची वाण होती. दोन्ही संस्थांची व्यवस्था एका मंडळीकडे दिल्यास सदनची व्यवस्था लावण्याची त्यांची जबाबदारीही पार पडत होती. म्हणून या सूचनेस त्यांनीं एकदम व मनःपूर्वक मान्यता दिली. आणि जून १३९९ पासून शाळा स्त्रीशिक्षण-मंदिरांत आणण्याचा विचार सुरू झाला. पण वाडा मिळूनही वार्षिक तीन हजार रुपये– दोन-तीन वर्षें मुलींची संख्या वाढेपर्यंत लागणार–तरी कसे जमवावयाचे हा प्रश्न सुटेना आणि शेवटीं जूनपासून शाळा बंद करावयाची असा ठराव मंडळानें फेब्रु-वारींत केला व शिक्षकांनाही त्याप्रमाणें कळविलें. हिंदु वुइडोज होम ही जबाबदारी घेऊं शकेल काय अशा अर्थाचें पत्र लिहिलें.

येथपासून परिस्थिति बदलावयास लागली. हिंगण्याचे आजन्मसेवक-मंडळामध्यें या परिस्थितीचा विचार होऊन शाळा चालविण्याची जबाबदारी हिंदु वुइडोज होमनें घ्यावी असा सूर निघूं लागला. कारण काळ्यांचा वाडा म्हणजे वीस-पंचवीस हजारांची मालमत्ता होती, व एकंदर जम बसविण्यासाठीं पहिल्या दोन वर्षांत लागणारे चार-पांच हजार रुपये प्रथम खर्च करण्याची त्यांची ऐपत होती. शिक्षणप्रसार करणें हेंच वुइडोज होमचें ध्येय असल्यानें तसें त्यांनीं केल्यास त्यांना कोणी दोषही दिला नसता, व म्हणून या मंडळीनें वाड्यासहित शाळा घेण्याची तयारी दर्शविली.

शाळेस वाडा मिळत आहे ही बातमी आधींच प्रसिद्ध झाली होती. पण वार्षिक खर्चाचा ताण न झेपून शाळा हिंगण्याच्या संस्थेकडे जात आहे असें प्रसिद्ध झाल्यानंतर पुन्हा सातारकरांनीं इतके दिवस चालविलेली संस्था परगांवच्या संस्थेस कां द्यावी? सातारकरांनींच ती चालविणें योग्य? असा प्रश्न निघून एक मंडळ सरदार आण्णासाहेब मुतालिक यांच्या अध्यक्षतेखालीं स्थापन झालें व त्यांनीं कांहीं योजना

केली. कर्मधर्मसंयोग असा कीं त्याच दिवशीं युनिव्हर्सिटी व ठाकरसी ट्रस्टी यांचेमध्यें समेट होऊन साडेबावन हजारांचें व्याज सुरू झाल्याचें प्रसिद्ध झालें! तेव्हां या नव्या मंडळींनीं पत्र लिहून कळविलें कीं, "समेट झाल्याची बातमी प्रसिद्ध झाली. आतां शाळेच्या जुन्या मंडळावर पहिल्याइतका बोजा पडणार नाहीं. कारण ग्रँट् सुरू होईल. तेव्हां आम्ही शाळेची जबाबदारी घेण्याचें रहित करतों. पण जुन्या मंडळास जरूर ती मदत आम्ही आनंदानें करूं."

रा. पंढरिनाथ घाणेकर, डॉ. आठल्ये इत्यादींनीं शाळेच्या शिक्षकांनीं पुढाकार घेतल्यास आम्ही मदत करूं असें आश्वासन देऊन आणखी एक प्रयत्न केला. शिक्षक असा किती पुढाकार घेणार व त्याग करणार? आणखी एक वर्षपर्यंत घेतों त्याहून पांच पांच रुपये कमी पगार घेऊन वाट पाहण्याला त्यांनीं तयारी दर्शविली; पण वर्गणी गोळा करण्याची जबाबदारी ते घेऊं शकत ना! इतर मंडळींनीं वर्गणी मिळवून द्यावी आणि शिक्षकांनीं एक वर्ष तसेंच काम करावें; व वर्षाचे शेवटीं यश येत नाहींसें वाटल्यास मग हिंगण्याचे मंडळीकडे शाळा द्यावी असा विचार सर्वांस पसंत वाटला. पण श्री. धनंजयराव गाडगीळ, सिंडिकेटचे सभासद व रावबहादुर काळे यांचे जामात, त्या दिवशीं तेथें हजर होतेच. समेटामुळें बदललेली परिस्थिति या मंडळीस त्यांनीं समजावून दिली. शिवाय पूर्वीप्रमाणें ग्रँट् मिळणें कसें कठीण हेंही सांगितलें. तेव्हां युनिव्हर्सिटीचा समेट झाल्यानें शाळेची परिस्थिति सुधारत नाहीं हें ध्यानांत घेतां एक वर्ष प्रयोग करण्यांत घालवून आधींच वाईट असलेली स्थिति जास्त वाईट होण्याचा धोका तरी कां घ्या? असा विचार करून या मंडळींनीं आपला विचार सोडला. शिवाय रावबहादुर काळे यांचीही इच्छा अशीच, कीं पत्नीचें स्मारक म्हणून जी गोष्ट होणार त्याची सुरवात स्थिर पायावर असावी. या दृष्टीनें त्यांना शाळा हिंगण्याच्या मंडळीचे वालीं करणें इष्ट वाटे, व शेवटीं सर्व गोष्टींचा विचार करून कन्या-

शाळा-मंडळानें तारीख १ मे १९३५ रोजीं शाळा आश्रमाचे स्वाधीन करून आपलें विसर्जन करण्याचें ठरविलें.

शाळा आश्रमाचे स्वाधीन करतांना पैशाची शिल्लक नव्हतीच. व्याजांतून बक्षिसें देण्यासाठीं म्हणून सातशें रुपयांची ठेव होती ती आश्रमाचे स्वाधीन केली, व पूर्वसंकेताप्रमाणें त्यांतील व्याजांतून इचल-करंजीकर, धडफळे, व मटांगे यांचीं बक्षिसें सातारा कन्याशाळेंत दिलीं जात आहेत. शाळेंत प्रथम काम करावयास आलेलीं माणसें शेवटपर्यंत टिकावीं अशी माझी हौस. परंतु सर्वच टिकणें शक्य होत नाहीं. अशा पहिल्या मंडळींपैकीं रा. महाबळेश्वरकर व रा. ठोंबरे हे असून त्यांना कन्याशाळामंडळानें कायम केलें होतें. आश्रमानें त्यांच्या पूर्वीच्या नोकरीचा काल मान्य केला; शिवाय त्यांना आश्रमाचे कायम शिक्षक करून, पेन्शन, प्रॉव्हिडंट फंड इत्यादीचा फायदा दिला. रा. माटे यांनीं पूर्वीप्रमाणेंच सुपरिंटेन्डेन्ट राहून शाळा चालवावी अशी सर्वांची इच्छा. परंतु आश्रमाच्या व त्यांच्या परस्पर अटी न जमून त्यांनीं दुसरीकडे जावयाचें ठरविलें.

शाळेच्या विद्यार्थिनींनीं शिक्षक म्हणून पुन्हा शाळेंत शिकवावयास येणें ही कौतुकाची गोष्ट वाटते. सौ. लीला करमरकर (कु. देशपांडे) व सौ. बिंदु पानवलकर (कु. सप्रे) या दोन विद्यार्थिनी जी. ए. होऊन थोडे दिवस शाळेंत काम करावयास आल्या. कु. इंदु परांजपे, जी. ए., ही शाळेंत कायमशिक्षिका असून चांगल्यापैकीं शिक्षक आहे. सौ. सुमित्रा सोहनी, जी. ए., (कु. सीता उमराणी) ही गुणवान् पण दुर्दैवी; व म्हणूनच माझी विशेष आवडती विद्यार्थिनी. आज बेळ-गांवास तिनें आदर्शकन्याशाळा नामक शाळा चालविली असून, तींत दोनशें-अडीचशें मुली आहेत, आणि शाळा महिलाविद्यापीठास व मुंबई विद्यापीठास जोडली आहे. वरील सर्व मुली कन्याशाळेंत पहिल्या इयत्तेपासून शिकून प्रवेशपरीक्षा पास झालेल्या व म्हणून शाळेच्या शंभर टक्के विद्यार्थिनी होत.

ता. १२ जुलै १९३५ रोजीं आषाढी एकादशीस कै. श्री. सौ. सत्यभामाबाई काळे यांचे वर्षश्राद्धदिनीं वाड्यांत शाळा सुरू होऊन, " कै. सौ. सत्यभामाबाई काळे स्त्रीशिक्षणमंदिर " असें वाड्याचें नांव प्रकट करण्यांत आलें. विद्यापीठाचे कुलपति व रावबहादुर काळे यांचे एक वेळचे सहाध्यायी सर सीताराम सुंदरराव पाटकर यांचे हस्तें हा समारंभ करण्यांत आला. तसेंच आश्रमाच्या मंडळीतर्फे होणारा शाळेचा हा पहिलाच समारंभ. त्यासाठीं आश्रमाच्या व्यवस्थापक-मंडळाचे अध्यक्ष रा. रा. बाबासाहेब कामत व उपाध्यक्ष डॉ. काकासाहेब सहस्रबुद्धे ही मंडळी व आश्रमाचे इतर आजन्मसेवकही मुद्दाम आले होते. तात्याही या समारंभास पुण्याहून आले होते. कारण शाळेबद्दलची माझी जिकीर ते पाहत होते व शाळेची ही नवीन व्यवस्था पाहून त्यांनाही बरें वाटलें. सर्व समारंभ फार चांगल्या तऱ्हेनें पार पडला. हा समारंभ म्हणजे माझ्या एका कार्याची पूर्तता होती. १९२२ सालीं आण्णांचे शब्दासाठीं भावनेनें भारून जाऊन मीं कन्याशाळेचें काम स्वीकारलें, एक वर्ष करून पाहण्याचा प्रयोग एक तप पुरवला. पण शेवटीं योग्य मंडळीच्या स्वाधीन शाळा झाली व इतके दिवसांचे श्रम व काळजी सुफल झाली. सहजच मला कृतार्थ झाल्यासारखें वाटलें.

## अहवालाचा शेवट

त्या वेळीं मीं वाचलेल्या व माझ्या हातून लिहिल्या गेलेल्या शेवटच्या अहवालाचा शेवट मीं पुढील तऱ्हेनें केला होताः—मुलींची संख्या वाढून शाळा पूर्वस्थितीला आली, योग्य व तज्ज्ञ अशा स्त्रीशिक्षणमंडळानें तिची जबाबदारी स्वीकारली, व आज स्वतःच्या जागेंत शाळा प्रवेश करीत आहे हें पाहून मला अतिशय समाधान होत आहे. नाटकांतील शेवटाप्रमाणें जर मला आतां कोणी विचारील कीं, 'किं ते भूयः प्रियं करवाणि' तर मी म्हणेन 'अतः परमपि प्रियमस्ति । तर्हीदमस्तु । ही कन्याशाळा चिरायु होवो ! '

# परिशिष्ट

## [ प्रस्तुत प्रकरणीं निवडक पत्रें ]

रा. माटे यांचें पत्र.

सातारा ता. ५।१२।३४.

सा. न. वि. वि.–आपलें पत्न व वीस रुपये मिळाले. ह्या महिन्याचा सर्वांचा पगार भागविला. गेल्या महिन्याचा पगार मी घेतला नाहीं. ह्या महिन्याचाही मिळेलसें वाटत नाहीं. कारण आतां मजजवळ १०-१२ रु. शिल्लक आहेत. माझा दोन महिन्यांचा पगार शाळेकडे आहे ही गोष्ट लक्षांत ठेवावी.

रावबहादुरांनीं बोलावल्यावरून आज त्यांचेकडे गेलों होतों. जून-मध्यें शाळा त्यांचे वाड्यांत न्यावी, एक वर्षभर प्रयोगादाखल शाळा तेथें भाडें न देतां ठेवावी, व तोंपर्यंत चिरस्थायित्व लाभेलसें दिसल्यास मग नांव बदलावें, तोंपर्यंत नांव बदलण्याची घाई करूं नये असें त्यांनीं मला सांगितलें. हें सगळें ठीक आहे. मला तें पटलें. पुण्यास आल्यावर ते आपणांशीं त्याबद्दल बोलतील. लिबरल फेडरेशनला येणाऱ्या लोकां-कडून वर्गणी गोळा करावी असें त्यांचें म्हणणें आहे. हें काम माझ्या हातून होणार नाहीं. आपणच तें करावें.

पुढच्या पगाराची विवंचना सुरू झाली आहे. मी गेले ३।४ महिने पैसे जमविण्याची शिकस्त करून पांच-सातशें रु. ( भाऊबीज धरून ) मिळवून दिले आहेत. ह्यापुढें हें काम माझ्या हातून होणार नाही. शिवाय ही सहामाही अभ्यासाची असल्यानें मला इतर चळवळी करणें शक्य नाहीं. मी आपला दोन महिन्यांचा पगार शाळेकडे अजून तसाच ठेवला आहे. ह्याच्यापेक्षां जास्त शाळेकरतां कांहीं करणें मला शक्य नाहीं. ज्या दिवशीं शिक्षकांना पगार देण्यास पैसे नाहींत असें होईल त्या दिवशीं मी राजीनामा देण्याचें ठरविलें आहे. आतां उघडपणें बोलण्याखेरीज गत्यंतर नाहीं. व्यक्तिशः व संघशः मी पैशाचा प्रश्न

प्रत्येकापुढें मांडला आहे पण त्याकडे आपणाखेरीज इतर कोणीही लक्ष दिलें नाहीं. मी ह्यापुढें मंडळाच्या सभासदांकडे पैसे मागावयास जाणार नाहीं. वरील प्रसंग २।३ जानेवारीला येईल असा रंग दिसतो. माझा आतां नाइलाज झाला आहे.

त्याचप्रमाणें शाळा पुढील वर्षीं मी चालवावी अशी इच्छा असल्यास ३००० रु. अगोदर बँकेंत ठेवावेत ही मी पहिली अट घालीन. सगळ्या मंडळींच्या नांवलौकिकावर विश्वास ठेवून यंदा मी चांगलाच फसलों आहे.

प्रश्नावलीचीं दोनतीनच उत्तरें आलीं. आठवणीदाखल पुन्हा लिहिणार आहे.

बाकी सर्व ठीक आहे. १९ ला सरकारी तपासणी होईल. कॉलेजला नाताळची सुटी केव्हां सुरू होते व सुटींत आपण इकडे येणार आहांत कीं नाहीं तें कळवावें. क. लो. अ. हे वि.

आपला

**गो. रा. माटे**

ता. क.—महाराजांच्याकडील नकार आला.

*　　　*　　　*

श्रीमती नाथीबाई दामोधर ठाकरसी
कॉलेज फॉर वुइमेन, कर्वे रोड, पुणें ४.
ता. ११ डिसेंबर १९३४

सौ. ताई, ( सौ. प्रमिलाबाई गाडगीळ ) यांस,

सा. न. वि. वि.— चार दिवसांपूर्वीं मी आपल्या घरीं आलें होतें त्या वेळीं कन्याशाळेसंबंधीं नानासाहेबांचेजवळ झालेलें बोलणें त्यांचेकडून आपणांस कळलें असेलच. आतां त्यापुढील हकीगत अशी :—

काल सकाळीं इरावती मि. कॅमेरॉन—एज्युकेशनल इन्स्पेक्टर— यांना कांहीं कामासाठीं भेटावयास गेली होती. त्या वेळीं तिनें सातारच्या

शाळेचा प्रश्न त्यांजवळ काढला. शाळा चालविण्यास चांगला अध्यापक—रा. माटे—शाळेला रावबहादुरांनीं दिलेला २५ हजारांचा वाडा वगैरे सर्व सांगून, केवळ नेहमींच्या खर्चाला कमी पडणाऱ्या पैशामुळें शाळा बंद करण्याचा प्रसंग येतो आहे वगैरे माहिती सांगितली. विशेषतः रा. ब. काळे यांनीं स्वतःचा वाडा दिला या गोष्टीचा त्याचे मनावर बराच परिणाम झाला, व एक-दोन वर्षांत मला शक्य ती मदत मी करण्याचा प्रयत्न करीन, जमल्यास या वर्षीही कांहीं ग्रँट जास्त देतां आली तर पाहीन, वगैरे तो बोलला.

दुपारीं बुक कमिटीची मीटिंग होती त्यासाठीं मी सेंट्रल बिल्डिंगमध्यें गेलें होतें. सभेचे वेळीं त्यांची गाठ पडली. येतांना त्यांजवळ मीं पुन्हा शाळेचा प्रश्न काढला. "तुम्हीं जर कसेंही करून दोन वर्षें शाळा जगवाल तर तोंपर्यंत मला काय मदत करतां येते तें मी पाहीन. यंदाच्या मार्चमध्यें काय करतां येईल हें जरी अनिश्चित असलें, तरी पुढच्या, १९३६ च्या, मार्चपर्यंत ग्रँट वाढवून मदत करतां येईल ती करीन. तुम्ही जर दोन वर्षें शाळा जगविण्याची खटपट कराल तर I'll also try to do my best for the school. If you are trying to do your mite I'll also do mine." असें त्यांनीं शेवटीं सांगितलें. यंदाही ग्रँटमध्यें वाढ होण्याची आशा वाटते व अशी वाढ झाली तर वर्षाचे खर्च जाऊन नवीन वर्षाचे सुरवातीस थोडीशी शिल्लक राहील. शिवाय तुमचे वाड्यांत शाळा आल्यानें घरभाड्याची बचत रुपये ३६० होईल ती देणगीच होय.

मध्यवर्तींत जागा, चांगलें फर्निचर, व ॲपरेटस् इत्यादि गोष्टींचा मुलींच्या व पालकांच्या मनावरही परिणाम होतो. एक शेवटचा उपाय म्हणून थोडासा अशा तऱ्हेनें खर्च करावा असें वाटतें. सर्व साधनसामुग्री व दोन वर्षें येणारी तूट भरून निघेल येवढी तयारी रा. माटे यांना करून द्यावी. पैशाची काळजी दूर झाली म्हणजे शाळेचा शिक्षणक्रम सुधारणें व मुलींची संख्या वाढविणें या गोष्टी करण्यास

रा. माटे यांना भरपूर वेळ मिळेल. तोंपर्यंत डिपार्टमेंटची ग्रँट् वाढेल, मुलींची संख्या वाढल्यानें फीचें उत्पन्न वाढेल, व मग जी कांहीं थोडी तूट राहील ती गोळा करण्याचें काम रा. माटे यांना सुलभ जाईल. तेव्हां दोन वर्षांनंतर सर्व जबाबदारी घेण्यास रा. माटे तयार होत असल्यास या दोन वर्षांच्या खर्चाची तरतूद सल्लागारमंडळानें त्यांना सुरवातीला करून द्यावी.

सल्लागारमंडळानें पांच हजार रुपये उभे केले तर दीड दोन हजारांची इक्विपमेंट व फर्निचर, आणि उरलेले तीन साडेतीन हजार दोन वर्षांत येणारी तूट भरून काढण्यास रा. माटे यांना द्यावे. हे पैसे शाळेला कर्ज म्हणून द्यावयाचे (पण मनाची तयारी मात्र परत आले नाहीं तर देणगी करण्याची ठेवावयाची) अशी माझी कल्पना आहे. आतां, हे पैसे कसे उभारावयाचे? सल्लागारमंडळाची सभासद मंडळी आम्ही चार. रावसाहेब, सोमण, आगाशे व मी. मी स्वतः एक हजार रुपये अशा तऱ्हेनें द्यावयास तयार आहे. रावसाहेबांनीं दोन हजार द्यावे अशी तुम्हांला व त्यांना विनंति करणार आहे. असे तीन हजार जमत असले तर, दुसऱ्या दोघांना विनंति करून दोन हजार रुपये मागावयाचे. एकाद्यानें एकाद दुसरा हजार घालण्यांत अर्थ नाहीं. सर्वांनीं घातले तर रक्कम उपयोगाची होईल. परंतु त्या दोघांना विचारण्यापूर्वीं प्रथम तुम्हांस विचारीत आहे. खरोखर तुमच्याकडून सबंध वाडा मिळाल्यानंतर तुम्हांस कोणत्याही तऱ्हेची तोशीस लावूं नये हें खरें. पण आजच्या परिस्थितींत तुम्हांसच त्रास देण्याचा प्रसंग येत आहे. आमचे दोघांचे तीन हजार जमले तर मग इतरांना आग्रह करणें सोपें होईल. तेव्हां वीसपंचवीस हजारांचा वाडा दिल्यानंतर दोन हजारांना आपण मागें घेणार नाहीं अशा समजुतीनें हें लिहिलें आहे.

प्रत्येकाच्या प्रापंचिक अडचणी लहानमोठ्या प्रमाणावर असावयाच्याच. सल्लागारमंडळाच्या इतर सभासदांच्याही त्या असणार तशा

रावसाहेबांच्याही असणार. पण त्यांतल्या त्यांत रावसाहेबांना हें जास्त शक्य होईल अशा समजुतीनें, त्यांना दोन हजारांची विनंति करणार आहे. तेव्हां हें शक्य आहे का ?

सविस्तर लिहिलें आहे. आपण उभयतां याचा विचार करून आपणांस हें पटत असलें तर आपणच माझे वतीनें रावसाहेबांना विनंति करावी. आपणांस विचार करण्यास स्वस्थ वेळ असावा म्हणून पत्रानें लिहीत आहे. आपलें उत्तर आल्यावर मग मी रावसाहेबांची भेट घेईन. कळावें, हे वि.

आपली
**कमलाबाई**

* * *

माटे यांचें पत्र

सातारा, ता. ४-३-३५

सा. न. वि. वि.—२०० रु. चा चेक मिळाला. पगार दिला. ग्रँट उद्यां परवां हातीं येईल. ७०० रु. चा श्री. तात्यासाहेब केळकरांच्या नांवचा चेक आपणाकडे २।४ दिवसांत पाठवून देतों. सौ. फडके यांचे पैसे पाठविलेच आहेत. रा. रा. विसुभाऊनीं आणखी आठ दिवसांची रजा मागितली आहे. रा. जोगांचें काय ठरलें तें कळविलें नाहीं. प्रि. ना. म. पटवर्धनांनीं मला तिकडे बोलविलें आहे. पण शाळेंत हल्लीं तीन शिक्षक गैरहजर आहेत म्हणून येतां येत नाहीं.

शाळेव्यातिरिक्त कांहीं इतर कारणांमुळें ही शाळा सोडून पुण्यास अगर इतरत्र कोठें तरी जाण्याच्या विचारांत आहे. Permanent servant होण्यास मी बिलकुल तयार नाहीं. एक आजन्मसेवक तरी होईन किंवा दोन वर्षें हंगामी नोकर म्हणून तरी राहीन. पण कायम नोकर म्हणून राहणार नाहीं.

येथील सर्व शिक्षकांच्या ऋणांतून मी आतां मुक्त झालों आहे.

आपण वेळचे वेळीं पैसे पाठविलेत म्हणूनच मला हें करतां आलें. त्यामुळेंच माझी अब्रू बचावली. आपले आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. क. आ.

गो. रा. माटे

## कन्याशाळामंडळाच्या २९ व्या सभेचा अहवाल

कन्याशाळामंडळाची जादा सभा रावबहादुर रावसाहेब काळे यांचे बंगल्यावर शनिवारीं रात्रीं नऊ वाजतां (ता. २०।४।१९३५ रोजीं) भरली होती. सभेस पुढील सभासदमंडळी हजर होती :

(१) रावब. रा. रा. काळे (२) रा. रा. गो. रा. माटे (३) रा. रा. वि. के. महाबळेश्वरकर (४) डॉ. कमलाबाई देशपांडे. रा. रा. रा. ग. सोमण हजर नव्हते. परंतु त्यांनीं आपलें मत डॉ. आठल्ये यांचे-जवळ सांगितलें होतें.

याशिवाय रा. शं. चिं. टोंबरे व रा. प. ना. जोग हे शिक्षक हजर होते. कन्याशाळेला मदत करण्यास सरदार मुतालिक प्रभृति जी मंडळी तयार झाली होती त्यांपैकीं निमंत्रण केलेल्या मंडळीमधून डॉ. वा. वि. आठल्ये व रा. पंढरिनाथ वामन घाणेकर हे ठाकरसी खटल्याच्या तडजोडीनें उत्पन्न झालेली परिस्थिति ऐकण्यासाठीं हजर होते. श्री. ना. दा. ठा. युनिव्हर्सिटीच्या सिंडिकेटचे सभासद रा. ध. रा. गाडगीळ यांनीं तडजोडीमुळें उत्पन्न झालेली परिस्थिति विशद करून सांगितली.

त्यामुळें पुढील ठराव करण्यांत आले :

(१) तडजोड झाल्यामुळें १२०० रु. ग्रँट सुरू होईलसें वाटत होतें पण ती सुरू होणें शक्य दिसत नाहीं, व त्यामुळें सांपत्तिक स्थिति सुद्धां जास्तच कठीण होईल. ही गोष्ट लक्षांत घेऊन काय करणें तें करावें. (२) दोन वर्षे कन्याशाळा चालविण्याचा प्रयोग म्हणून करून पाह-ण्यास अगर त्यासाठीं मदत करण्यास डॉ. आठल्ये, रा. घाणेकर व

सरदार मुतालिक प्रभृति मंडळी तयार झाली होती. त्याबद्दल शाळा त्यांची आभारी आहे. परंतु रावबहादुर काळे यांनीं शाळेला आपला वाडा आपल्या पत्नी कै. सत्यभामाबाई काळे यांचें स्मारक म्हणून देऊं केला असून, हें स्मारक शक्य तितकें चिरस्थायी स्वरूपाचें व्हावें व त्यासाठीं अनाथ बालिकाश्रमाकडेच कन्याशाळा देणें जास्त श्रेयस्कर आहे असें सर्वांचें मत पडल्यावरून, मंडळानें अनाथबालिकाश्रमाकडे कन्याशाळा द्यावयाचा पूर्वीचा ठराव कायम केला. सभेस हजर असलेले डॉ. वा. वि. आठल्ये व रा. पं. वा. घाणेकर यांना ही व्यवस्था पसंत होती.

सही—**आर. आर. काळे,**

अध्यक्ष

---

## 'प्रयाग' क्षेत्रीं : : १४

" My acknowledgments will not be complete without the mention of my father, Mr. N. C. Kelker, but for whose timely and spontaneous help my dream of a Doctorate of a European University would never have been realised."

माझा प्रबंध* मीं प्रसिद्ध केला तेव्हां त्याच्या प्रस्तावनेंत मी वरील वाक्य लिहिलें. कारण घडलेंच तसें. वर्ध्याला प्रकृति कशी सुधारावी या जिकीरींत मी होतें. तेथें मला एक मार्चला जर कोणी सांगितलें असतें कीं, पुढील महिन्याचे एक तारखेस तुम्ही लंडनला असाल तर मीं म्हटलें असतें कीं " अहो! मला एप्रिल फूल्च बनवावयाचें तर एक मार्चला काय म्हणून? पुण्याला एकटी जाऊं शकेन इतका सुद्धां प्रकृतीबद्दल विश्वास मला नाहीं तेथें मी लंडनला जाईन आणि मला कोणी जाऊं देईल हेंच अशक्य आहे." पण तेंच घडलें. आण्णांचा परदेशगमनाचा विचार सुरू झाला, व त्या खर्चासाठीं मंजुरी घेण्या-

* " The Child in Ancient India."

बद्दल सेनेटचे सभासदांकडे परिपत्रिकेनें विचारणा करण्यांत आली. मध्यवर्ती कायदेमंडळाचें अधिवेशन त्या वेळीं दिल्लीस सुरू होतें व त्यासाठीं तात्या दिल्लीला होते. सेनेटचे ते सभासद असल्यामुळें त्यांचेकडे ती परिपत्रिका गेली व मला वाटतें माझा प्रकृतीबद्दल ढासळलेला विश्वासच त्यांचे मनांत प्रेरणा करण्यास कारण झाला. वर्ध्यास मी नोव्हेंबरांत गेलें त्या वेळीं इतकी थकलें होतें कीं, पुण्याहून निघतांना तात्यांना सांगून जवळ जवळ निरोप घेऊन निघालें होतें. मीं म्हटलें, 'मी वर्ध्याला जातें खरी पण परत येईनसें वाटत नाहीं. कारण आजची शक्ति उद्यांला नाहीं इतका माझा थकवा दिवसेंदिवस वाढतो आहे.' आण्णा जात आहेत असें कळतांच तात्यांनीं मला लिहिलें कीं "तूं जात असलीस तर सहा महिने त्यांचेबरोबर प्रवासास जा. समुद्र-प्रवासानें प्रकृति सुधारेल. इंग्लंड युरोपांत हे दिवस हवेच्या दृष्टीनें उत्तम. विश्रांति घे. वाटल्यास कांहीं शाळा पाहून परत ये. यासाठीं पांच हजार रुपयांपर्यंत खर्च करण्यास मी तयार आहे."

पत्रांतील या अनपेक्षित मजकुरानें मला जणूं आनंदाचा धक्काच बसला. परदेशगमनाच्या प्रश्नाबद्दल वीस सालीं पुष्कळ भवति न भवति होऊन तीव्र आशा व निराशेचीं आंदोलनें झालीं होतीं. पूर्वीचा परदेशगमनाचा झगझगाट आतां माझे डोळ्यांसमोर नव्हता. प्रकृति बरी असती तर साताराची शाळा सोडून जावयाचेंही मीं कबूल केलें नसतें. पण आज हा योग मला इष्ट वाटला, इतरांचें मत अनुकूल पडलें, व आलेल्या संधीचा फायदा घ्यावयाचें ठरवून त्याबद्दल आण्णांना मीं हिंगण्यास व वाग्भटांना साताऱ्यास लिहिलें. एकादी गोष्ट व्हावयाची असली म्हणजे किती भराभरा सर्व जमून येतें याचा या वेळीं अनुभव आला. आण्णांनीं माझें पत्र पोंचतांच प्रथम आप्पा कर्वे यांस तार करून रावळपिंडी बोटींत जागा मुक्रर करविली व मग मला आपल्या संमतीचें पत्र लिहिलें. साताराची मंडळी कन्याशाळेच्या दृष्टीनें मोठीशी अनुकूल नव्हती. पण हा योग वारंवार येत नाहीं हें ओळखून मी परत

येईपर्यंत शाळेची जबाबदारी त्यांनीं पतकरिली. या सर्व प्राथमिक पत्र-व्यवहारांत एक आठवडा जाऊन सात तारखेचे सुमारास मी पुण्यास आलें. पुढें पासपोर्ट व सामानाची तयारी यास वेळ लागावयाचा. पण 'तुका म्हणे माझें। संतांवरी ओझें'. सीताबाई अण्णिगेरी यांनीं कपड्यांची तयारी करून दिली. पुष्कळदां जवळ राहिल्यापेक्षां दूर गेल्यानें स्नेह कसा वाढतो याचा या बाबतींत मला अनुभव आला. कन्याशाळा निघाल्यापासून अलीकडे पांचसहा वर्षांत सीताबाईंचा व माझा परिचय जास्त वाढला होता. त्यांनीं मला उत्साहानें मदत दिली व मलाही घ्यावीशी वाटली. गोखले तात्या त्या वेळीं कराचीस होते. भेट होण्याचाही संभव नव्हता. मी बोटींत बसल्याचें त्यांना वर्तमानपत्रांतून कळायचें. पण तेही नेमके त्याच वेळीं कामानिमित्त मुंबईस आले होते. अर्थात् पासपोर्ट मिळवून देण्याचें काम तात्यांनीं त्यांना सांगितलें. मुंबई, सातारा, या ठिकाणीं पत्रव्यवहार करण्यास स्वाभाविकच एक आठवडा लागला. सोळा तारखेस दुपारीं बोट निघणार, पण पंधरा तारखेस दुपारपर्यंत पासपोर्ट हातीं आला नव्हता! "नाहींच पासपोर्ट उद्यां मिळाला तर मी पुढें जातों तूं मागाहून ये" असें आण्णा कर्वे म्हणत. तात्या म्हणत, "जायचें तर उद्यां आण्णांचेबरोबर. नाहीं तर तूर्त विचार सोडून दे." दुसरे दिवशीं बाराचे सुमारास आण्णा सर्व मंडळीसह अलेक्झांड्रा डॉकवर आले व मी तेथें नाहीं म्हणून माझ्या पासपोर्टचें काय झालें याची चौकशी करूं लागले. पण मी त्यांच्या आधींच बोटीवर उभी होतें तेथूनच त्यांना सांगितलें 'आण्णा, मी आलें आहे.' "वा!" आण्णा म्हणाले, "माझी तयारी चार महिने चालू. तुम्हांला काल दुपारपर्यंत पासपोर्टही मिळाला नव्हता. आणि पुन्हा बोटीवर अगोदर तुम्हीच चढलांत का?"

पटवर्धन म्हणाले, "भाड्याचें तट्टू उशीरा निघालें तरी वेळेवर पोंचायचेंच."

आणि बोटीवर चढणें येवढीच शर्यत मानली तर मीं ती जिंकली

खरीच! पंधरा तारखेस संध्याकाळीं पासपोर्ट हातीं पडला त्यामुळें आतां-पर्यंत जाणें कीं न जाणें या चाललेल्या 'उन्हाळी-पावसाळीचे' खेळांत जाण्याच्या वतीनें निकाल झाला व मीं हिंदुस्थानचा किनारा सोडला.

विलायतेस जायचें कीं नाहीं हा प्रश्न सुटला खरा; पण कशासाठीं जावयाचें याचा निर्णय झाला नव्हता. दिल्लीहून तात्या मुंबईस आले व मी वर्ध्याहून मुंबईस आलें. तेव्हां समक्ष बोलणें सुरू झालें.

"तूं जाणार म्हणतेस पण जाऊन काय करणार?"

"गेल्यासारखें कांहीं तरी शिकून यावेंसें वाटतें. तें कांहीं पुणें मुंबई नव्हे, कीं पुन्हा दुसरी खेप करतां येईल. मी काय करणार हें आतांच सांगूं शकत नाहीं; पण कांहीं तरी करणार खास."

"कुठें तरी जाईन आणि कांहीं तरी करीन असल्या अनिश्चित कल्पना ठेवून जाऊं नको." तात्या म्हणाले, "अनुभवाला मी किंमत देतों डिग्रीला फारशी नाहीं. अभ्यासाच्या भानगडींत पडूं नको."

"पण अभ्यासाच्या भानगडीखेरीज परदेशगमन मला फुकट वाटत होतें. त्याला काय करणार!" मीं म्हटलें, "कांहीं न करतां परत यायचें तर जायचेंच कशाला?"

तात्या म्हणाले, "मग जाऊं नको. तूं परत वर्ध्याला जा मी दिल्लीला जातों."

आणि तात्यांच्या व माझ्या संभाषणांत प्रवृत्तिभेदानें नेहमीं असेंच घडतें. त्यांनीं एकादी व्यवहार्य व हिशोबी योजना सुचविली कीं ऐकल्याबरोबर मला कधींच पटत नाहीं. कांहीं तरी अव्यवहार्य पण कल्पनारम्य असलें म्हणजे मला तें जास्त आकर्षित करतें* व म्हणूनच

*बर्लिनला असतां एकदां दिनकर, इरावती, मथू, प्रताप व मी 'वीजन् जे' या सरोवराचे भोंवतीं असणाऱ्या वनांत वनविहारास गेलों होतों. गप्पागोष्टी होतां होतां करमणुकीचे सर्व प्रकार संपले, व नाव परत न्यावयास येण्यास अजून दोन तास अवकाश होता. तेव्हां

मी कांहीं आपल्या मतें योग्य गोष्ट समजून त्यांना सांगावयास गेलें म्हणजे पहिल्या प्रथम ते 'यांत कांहीं अर्थ नाहीं' म्हणून मला सांगतात.

मागाहून त्यांचा व्यवहार मला पटतो. अगर मी अव्यवहार्यपणें खरी पण एकदां टाकलेली उडी पाहून 'बरं, आतां केलं आहेस तर शेवटपर्यंत जा' असें तेही म्हणतात. तरी सांगितल्याबरोबर एकमेकांना एकमेकांच्या कल्पना पटल्या आहेत असें होत नाहीं. या वेळींही असेंच होऊं लागलें. पण मीं वाद सोडून दिला, व सहा महिने हिंडून वेगवेगळे देश व त्यांतील शाळा पाहावयाच्या येवढेंच तूर्त मान्य केलें. आणि मीं आग्रह तरी कशाच्या जोरावर धरावयाचा? कोणत्याही शिक्षणक्रमाची माहिती मिळविलेली नव्हती, त्यास लागणारा खर्च व

---

दिनकरनें एक खेळ सुचविला. तो म्हणाला, 'आपण एक सभा करूं या. सभेंत प्रत्येकानें आपल्या सद्गुणांचें वर्णन करावयाचें व मागाहून इतरांनीं त्यावर चर्चा करावयाची.' स्वतःचे सद्गुणाचें वर्णन करण्यास प्रत्येकास तीन मिनिटें दिलीं होतीं. पुढें होणाऱ्या चर्चेंत प्रत्येकानें ओळीनें भाग घ्यावयाचा होता; पण त्याला वेळाचें बंधन नव्हतें. या सद्गुणांची चर्चा इतकी मनोरंजक झाली कीं, वाट पाहण्याचे दोन तास तर संपलेच; पण घरीं पोंचेपर्यंत आणखी दोन तास त्यांत कसे गेले तें समजलें नाहीं. या सभेंत माझें वर्णन करतांना मीं माझें असेंच वर्णन केलें होतें व इतरांनीं चर्चेंत तें मान्य केलें होतें. दुसऱ्या दिवशीं इरावतीनें आपल्या एका मैत्रिणीला हा खेळ सांगितला, तेव्हां ती म्हणाली, "आश्चर्य आहे! प्रत्येकाच्या स्वभावावर इतरांनीं इतकी चर्चा करून तुमच्यापैकीं कोणीही चिडलें नाहीं व रडलें नाहीं!!" पुण्यास आमच्या घरींही हा खेळ आम्ही खेळलों व त्याबद्दल पश्चात्ताप करण्याची वेळ आली नाहीं. मात्र एकच नियम केला होता तो हा कीं, त्यांत भाग घेण्याची इच्छा नसेल त्याला इतरांबद्दल चर्चा ऐकण्यास बसूं द्यावयाचें नाहीं.

वेळ याची माहिती तयार नव्हती, शिवाय प्रकृतीचा नाहीं भरंवसा! प्रकृति न सुधारती तर सर्व तसेंच टाकून येणें प्राप्त होतें.

देश पाहण्याबद्दल ह्याच प्रकार. पासपोर्टसाठीं ऑफिसांत गेलों. गोखले तात्या म्हणाले, "कोणकोणत्या देशांचा व्हिसा ( परवानगी ) घ्यावयाचा?" मीं म्हटलें, "जितक्या घेतां येईल तितक्या साऱ्या देशांचीं नांवें लिहा. (कारण हा व्हिसा घेण्यास जास्त फी लागत नसे.) कोणास माहीत किती देशांत मी हिंडेन! आपली परवानगी काढून ठेवलेली असावी." म्हणून त्यांनीं व मी युरोपांतील चटदिशीं आठवलेल्या नॉर्वेस्वीडनपासून ग्रीसपर्यंत पुष्कळ देशांचीं नांवें लिहिलीं. रशियांत जाण्याची परवानगी त्या वेळीं हिंदुस्थानांत मिळत नसे म्हणून तो वगळला. झेकोस्लोव्हाकियाचें नांव दोघांनाही त्या वेळीं सुचलें नाहीं; आणि मौज अशी कीं, त्याच देशांत पुढें मी दोन वर्षें राहिलें व तेथें जाण्याची परवानगी पुढें जिनेव्हास घेतली.

ता. १ एप्रिल रोजीं आम्ही लंडन शहरीं पोंचलों. 'मार्सेय्' येथें बोट एक दिवस अगोदर आली. आम्हांस भेटण्यास दादांना बोलाविलें होतें. सहजच ते आमचे मागून मार्सेयला पोंचले. त्यामुळें तेथें एकदम सुरू झालेल्या फ्रेंच भाषेमुळें आण्णा व मी दोन तास गोंधळून गेलों. पण पुढें दादांची गाठ पडल्यावर आम्हांला वाटाड्या मिळाला व त्यांचेच-बरोबर आम्ही लंडनला आलों.

आण्णांचेबरोबर हिंडावें असा मूळचा विचार होता. पण नवीन हवा, नवीन वातावरण या सर्व नवेपणांत माझा जम बसेना. मालव्हर्न येथें एक प्राथमिक शिक्षकांची परिषद् होती तेथें आम्ही गेलों. तेथें युनिव्हर्सिटीच्या स्थापनेची माहिती सांगणारें आण्णांचें भाषण झालें. लंडनलाही झालेल्या कांहीं सभांत आण्णांचीं भाषणें झालीं व वर्गणी गोळा करण्याची खटपट झाली. पण हा ताण मला सहन होईना. म्हणून आइल ऑफ वाइट्मध्यें इंग्लंडांतील हिंदी लोकांचें संमेलन होतें तेथें जावयाचा विचार मीं रहित केला. इरावती सुटीनिमित्त

बर्लिनहून लंडनला आली होती ती आण्णांचेबरोबर गेली. एका योगाची मात्र मौज वाटते. लंडनला एका सभेंत आण्णांच्यानंतर मीं भाषण केलें, त्यांत शाळांची माहिती सांगतांना हुजुरपागेचा उल्लेख मीं केला होता. भाषण संपल्यावर श्रोत्यांपैकीं एक वृद्ध पारशी बाई मजकडे आल्या व म्हणाल्या, "तूं मघांशी वर्णन सांगितलेंस ती शाळा पुण्याचीच ना! माझी बहीण त्या शाळेची सुपरिंटेंडेंट होती." जास्त बोलतां असें आढळलें कीं, मी मराठी पहिली दुसरींत असतांना ज्यांना आम्ही 'मदर' म्हणत होतों व ज्यांच्यामुळें शाळा साहेबांची आहे असें मला वाटलें होतें, त्याच या मदर म्हणजे 'मिस् सोराबजी'. त्या पुढें म्हणाल्या, "माझी बहीण सध्यां लंडनला नाहीं; ती येतांच मी तुला कळवीन. आपली जुनी विद्यार्थिनी पाहून तिला फार आनंद होईल." पण तो योग पुढें आला नाहीं.

पॅरिसला असतांना दादा व मी चर्चा करीत होतों कीं मीं कोणत्या युनिव्हर्सिटींत जावें. जर्मन युनिव्हर्सिटींत अभ्यास करतां आला तर उत्तम असें मला वाटे. पुढें मीं म्हटलें, "अशा ठिकाणीं जायचें कीं जेथें आपलें कोणीही ओळखीचें–विशेषतः हिंदी मनुष्य नाहीं. ओळखीचीं माणसें असलीं कीं आपण थोडे तरी त्यांवर अवलंबून राहतों." आणि प्रत्यक्ष प्रागला गेल्यावर पुढें विंटरनिट्झ् यांचेकडून मला जेव्हां कळलें कीं मीच प्राग युनिव्हर्सिटींतील पहिली हिंदी व्यक्ति—तेव्हां मला माझें इच्छित अचानक पूर्ण झाल्याचा आनंद वाटला. युनिव्हर्सिटीची निवड करावयाची ती अर्थात् प्रोफेसरवरून करावयाची. प्रो. विंटरनिट्झ् हे आपल्या आजन्म व्यासंगामुळें व History of Indian Literature या ग्रंथामुळें आंतरराष्ट्रीय कीर्ति मिळवलेले विद्वान्. धर्मशास्त्रांचा विशेष व्यासंग. हिंदूंचे 'सोळा संस्कार' हा जो विषय निबंधासाठीं मीं मनाशीं योजला होता त्या विषयाचें उत्कृष्ट मार्गदर्शन ते करूं शकतील असें आम्हांस वाटलें.

प्रो. विंटरनिट्झ् पूर्वी हिंदुस्थानांत आले होते व शांतिनिकेतनमध्यें

त्यांनीं वर्षभर काम केलें होतें. पुण्याच्या भांडारकर रीसर्च इन्स्टिट्यूटलाही त्यांनीं भेट दिली होती. त्या वेळीं व पुन्हा लंडनला एका ओरिएन्टल परिषदेचे वेळींही त्यांचा व दादांचा संबंध आला होता. दादांनीं त्यांना लिहिलें कीं, " माझी एक विद्यार्थिनी पीएच्. डी. चा अभ्यास करूं इच्छिते. ती पदवीधर आहे. पण त्या विद्यापीठास अद्याप सरकारमान्यता नाहीं. तरी तुमचे विद्यापीठांत तिला प्रवेश मिळूं शकेल किंवा नाहीं ?"

त्यांनीं लिहिलें कीं, " आम्ही विद्यार्थी घेतांना त्याचा किती वर्षें व कोणत्या विषयांचा अभ्यास झाला आहे येवढें पाहतों; व आमच्या देशांत पीएच्. डी. चा अभ्यास करावयास येणाऱ्या विद्यार्थ्याएवढी जर त्याची पूर्वतयारी असेल तर आमचेकडे प्रवेश देतों. ब्रिटिश सरकार त्या विद्यापीठाला मान्यता देतें कीं नाहीं हें पाहण्याचें आम्हांस कारण नाहीं. आम्ही चीन, जपान किंवा इतरही देशांतील विद्यार्थी याच तत्त्वावर घेतों. चार वर्षें प्राथमिक शिक्षण, सात वर्षें दुय्यम शिक्षण, व पुढें तीनचार वर्षें उच्च शिक्षण घेतलें असेल, आणि त्यांत मातृभाषा, एक अर्वाचीन युरोपियन भाषा, व एक प्राचीन भाषा, यांचा अभ्यास भरपूर झाला असेल तर इंडॉलेजी या माझ्या विषयास मी विद्यार्थी घेऊं शकेन. युरोपांत जुनी भाषा म्हणून लॅटिनचा अभ्यास लागतो. पण संस्कृत ही लॅटिनच्या ऐवजीं समजून लॅटिन् शिकण्याची माफी मिळावी याबद्दल मी खटपट करून पाहतों."

या उत्तरानें कोठें जावयाचें व काय करावयाचें हा प्रश्न सुटला. इंग्लंडांत व स्कॉटलंडांत ज्या ज्या ठिकाणीं चौकशी करावी तेथें तेथें उत्तर मिळे कीं 'तुमची पदवी हिंदुस्थान सरकारनें मान्य केलेल्या युनिव्हर्सिटीची नाहीं तेव्हां तुम्हांस विद्यार्थी म्हणून प्रवेश देतां येत नाहीं.' शिक्षणशास्त्राच्या अभ्यासक्रमाबद्दलही असेंच उत्तर आलें. 'तुम्हांस व्याख्यानें ऐकण्याची परवानगी देऊं व फार तर शेवटीं एक वर्ष अभ्यास केला असल्याचें खाजगी सर्टिफिकेट देऊं.' सारांश असा कीं,

जोंपर्यंत तुम्ही ब्रिटिश सरकारच्या मान्यतेची अपेक्षा ठेवाल तोंवर ती न मिळतां दर ठिकाणीं अडवील! ब्रिटिश बेटें सोडून जगांत इतर कोठेंही जा तुम्हांस मार्ग मोकळा आहे. पॅरिसला सोर्बोनमध्यें मथूला प्रवेश मिळाला होता व मी राहतें तर मलाही मिळाला असता. पण माझ्या विषयाच्या दृष्टीनें पाहतां विंटरनिट्त्झ् यांचें मार्गदर्शन जास्त उपयोगीं पडणारें होतें. विंटरनिट्त्झनीं एकदां खटपट करण्याचें मान्य केल्यावर शेवटपर्यंत सर्व गोष्टींची त्यांनीं काळजी घेतली. मी प्रागला गेल्यावर एका सहामाहीनंतर त्यांनीं दादांना कळविलें कीं, "जरूर ती सर्व मदत मी तिला करीन. कारण इतके दिवस मिसेस देशपांडे ही तुमची विद्यार्थिनी होती. आतां ती माझी विद्यार्थिनी आहे."

प्रागला मुद्दामच मी युनिव्हर्सिटीचें कामकाज सुरू होण्यापूर्वीं एक महिनाभर आलें होतें. कारण परकी शहर. तेथील माहिती होण्यास व जर्मन भाषा वाढविण्यास वेळ हवा होता. पॅरिसला असतांना दादांचे-जवळ दोन-तीन महिने जर्मन भाषेचा अभ्यास केला होता. मला शिकविण्यापुरतें जर्मन भाषेचें प्राथमिक ज्ञान त्यांना होतें. पण पुढें जर्मन माणसांकडून शिकणें, विशेषतः संभाषणाचा सराव करणें, अवश्य होतें. पुस्तकी वाचन व व्यवहारांतील भाषण यांतील फरक वाटेंत एकदां उत्तम तऱ्हेनें कळला. आम्ही लेक कॉन्स्टन्स ओलांडून जर्मन हद्दींत ज्या गांवीं शिरलों तो गांव ग्राफ झेपेलिनचा. त्याच दिवशीं ग्राफ झेपेलिन विमान जगप्रदक्षिणा करून परत आलें होतें, व सर्व लोक एकाद्या जत्रेप्रमाणें विमान पाहावयास जात होते. आम्हीही त्या गर्दींत मिसळून 'झेपेलिन' पाहून आलों. स्टेशनकडे परत येतांना रस्ता चुकला, तेव्हां आपणांस जर्मन भाषा बोलतां येते या समजुतीनें मी वाटेंत एकदोघां लोकांना विचारूं लागलें. पण त्या लोकांना आमचें जर्मन समजेना व परस्थ मनुष्याचें भाषण जास्त शांतपणें ऐकून उत्तर देण्याचें सौजन्य त्या दक्षिणी जर्मन माणसांत दिसेना. शेवटीं कसा तरी रस्ता शोधून गाडी निघण्यापूर्वीं स्टेशनवर पोंचलों.

प्रागला आल्यावर मात्र 'कुठें तरी जाऊन कांहीं तरी करण्याचें' माझें ध्येय मला पुरें झाल्यासारखें वाटलें. मिसेस् विंटरनिट्त्झ्चे ओळखीनें माझी राहण्याची तात्पुरती सोय एका माजी प्रोफेसराचे स्त्रीचे घरीं करण्यांत आली, व मिस् फिशरचे मदतीनें माझी पुढची जागा मीं शोधली. जर्मन भाषा, त्यामुळें घरांत ठराविक वाक्यांपलीकडे भाषण नाहीं. बाहेर पडावें तों सर्व व्यवहार झेक् भाषेंत. दुकानें, उपाहारगृहें, यांवरील सर्व पाट्याही झेक् भाषेंत! जर्मन अभ्यासाला हा एक अडथळाच होता. बाजारांत गेलें म्हणजे बाहेर उभें राहून जिन्नस पाहावयाचा, तो खुणेनें दाखवावयाचा, हातानें किती पुष्कळ हवा तें सांगावयाचें व नोट पुढें ठेवावयाची. दुकानदारानें मोड परत दिल्यावर त्या जिनसाला काय पडलें असेल तें ठरवावयाचें! दोनचार दिवसांनीं मिस् फिशर येईल अगर आठ दिवसांनीं प्रो. विंटरनिट्त्झ् अगर प्रो. श्टाइन् भेटतील तेव्हां इंग्लिश बोलावयास तोंड उघडावयाचें! मराठीचा तर प्रश्नच नाहीं. तेवढ्या वेळापुरता मला इंग्लिशबद्दल मातृभाषेसारखा आपलेपणा वाटे आणि पुढें कांहीं महिन्यांनीं जेव्हां सर्व्हंट्स ऑफ इंडियाचे रा. वझे व कु. भिकुताई जोशी प्रागला आल्या व त्यांचेबरोबर दोन दिवस मराठी बोलावयास मिळालें, तेव्हां इतकें समाधान झालें कीं, मीं त्यांना म्हटलेंच कीं आज मला पोटभर जेवण मिळाल्याचें समाधान वाटतें आहे म्हणून.

पहिला महिना जरी प्रागला अशा एकाकी स्थितींत गेला तरी हळूहळू माझा जम बसला. मिस् एलिझाबेथ फिशरची व माझी लंडनला हॉलिडे कोर्सचे वेळीं ओळख झालेली. तिनें मला मी प्रागला गेल्यावर शक्य तितकी मदत करण्याचें कबूल केलें होतें व त्याप्रमाणें शेवटपर्यंत मदत केलीही. नवीन खोली तिचे घराजवळच घेतल्यानें दररोज संध्याकाळीं तिजकडे मी जाऊन बसत असे. ती मला जर्मन शिकवी व मीं तिला इंग्लिश शिकवावें. कांहीं दिवसांनीं तिची आई, बाप, बहिणी या सर्वांची व माझी पूर्ण ओळख होऊन मी मुळीं त्यांच्या घरचीच

एक झालें. मिसेस् फिशर मला आपली तिसरी मुलगी म्हणूं लागली, गरीब परंतु एक सत्त्वस्थ कुटुंब होतें तें. कापडाचें लहानसें दुकान बापाचें होतें. थोरली मुलगी एलिझाबेथ शिकवण्या करून व धाकटी मेरी टोप्या तयार करून प्रपंचास थोडा हातभार लावीत. आना म्हणून काम करणारी बाई. तीही आज तीस वर्षें घरांत नोकरी केलेली, तेव्हां तीही कुटुंबांतील पांचवें मनुष्यच होती. दोघी मुलींखेरीज इंग्लिश कोणासच येत नसे त्यामुळें मला जर्मन बोलण्याची सवय होण्यास मदत होई. हिंदुस्थान असो कीं युरोप खंड असो, मनुष्याचे गुणदोष सारखेच. फ्राऊ फिशरनें मला एकदां मुलगी म्हटल्यावर ती मला तसेंच वागवी. मला आवडणारा शाकाहाराचा जिन्नस मुद्दाम मजसाठीं राखून ठेवी. माझा वाढदिवस, तारीख लक्षांत ठेवून, तिनें केला; व त्या दिवशीं बटाटेवड्यांचें पक्वान्न केलें. मीं म्हटलें, " अहो आम्ही मोठ्या माणसाचे वाढदिवस इतके करीत नाहीं. लहान मुलांचे करतों. ती म्हणे, " तसें असेल. पण तूं आतां युरोपांत आहेस. माझ्या दोन मुलींचे वाढदिवस जसे मी करतें तसा तिसरीचा." नाताळच्या सणालाही मी त्यांच्या घरींच पाहुणी होतें. त्यांच्याकडे येणाऱ्या स्नेही मंडळींशीं माझी ओळख झाली व त्यांच्याबरोबर जेवणास व परत-भेटीसही मी जात असे. फार काय मिस् फिशरबरोबर तिच्या मामाच्या घरींही मी पाहुणी जाऊन राहून आलें. मीं पदवी घेतली त्या समारंभास सर्व फिशर कुटुंब हजर होतें. मी हिंदुस्थानला परत यावयास निघालें त्या दिवशीं शेवटचें जेवण त्यांचेकडे जेवून निघालें. आपण परगांवीं निघतांना देवाला नमस्कार करतों. त्याप्रमाणें फ्राऊ फिशर म्हणाली, " या घरांत तूं आतां पुन्हा केव्हां येशील ? तेव्हां सर्व घराचा निरोप घे व प्रत्येक खोलींत जाऊन शेवटचें दर्शन घे." मला शकुंतलेच्या लतावेलींच्या निरोपाचीच आठवण झाली त्या वेळीं ! शेवटीं स्टेशनवर मला सर्व मंडळी पोंचवावयास आली व अशा तऱ्हेनें तें सुखद स्वप्न संपलें. अजूनही त्यांचीं पत्रें येत व माझ्या ओळखीनें प्रागला गेलेल्या लोकांचा

अजून ती पाहुणचार करीत असे. ज्यू म्हणून पुढचीं वर्षे त्यांची त्रासांत गेलीं असावींत, आणि या युद्धकालांत त्यांचें काय झालें असेल याची कल्पनाच करवत नाहीं. माझी दुसरी मैत्रीण मिस् रॉडनिट्झ् हिनें 'निरोप' म्हणून कविता रचली होती, व तिनें आणि मिस् फिशरनें मिळून त्या कवितेचें रेकार्ड घेऊन मला दिलें आहे.

मला स्वभावतः फारसें बोलावयास लागत नाहीं. उलट, कोणी सारखें बोलूं लागलें तर ऐकायचा सुद्धां कंटाळा येतो. वादविवाद करावयास पूर्वीं आवडे व 'वादे वादे जायते तत्त्वबोधः' हें वचनही खरें वाटे. पण पुढें सातारला सकाळीं घाणेकर आले कीं त्यांची व वाग्भटांची जहाल-प्रागतिक, फेर-नाफेर इ. वादांना सुरवात व्हावयाची. शाळेच्या कामीं वाद. हिंगण्यास गेलें कीं तेथील वाद. असहकारितेचे वाद. टिळकपुल व ट्रस्टी वाद. एक का दोन म्हणून सांगावे? इतके वाद ऐकावे लागले कीं एक प्रकारची अढी निर्माण झाली. स्वतः तर वाद घालावासा वाटत नाहींच; पण इतर कोणी समोरासमोर जोरानें प्रश्नोत्तरें करूं लागलें तरी तेथून उठून जावेंसें वाटतें. वर्ध्याला* प्रकृति सुधारण्यास गेलें ती पुण्याकडले वाद व चर्चा नको म्हणून. हरदत्त

---

* एकदां मौज झाली. मी वर्ध्यास असतांना मुंबईस हिंदु-मुसलमानांचा दंगा सुरू झाला. वर्तमानपत्रांतून बातम्या आल्या. माझा पुतण्या दादा मुंबईस होता त्याचेंही संध्याकाळीं पत्र आलें. त्यानें लिहिलें होतें, 'आम्ही राहतों त्या भायखळ्याच्या बाजूला दंग्याचा जोर फार आहे. दोन दिवस चाळींतून बाहेरही पडतां आलें नाहीं. इ.' थोरले भाऊजींनीं मला विचारलें, "मुंबईला इतका दंगा आहे. तुम्ही बोललां कशा नाहीं? मला या चार दिवसांत जजमेंट लिहितांना पेपर पाहावयास वेळ झाला नाहीं. पण तुम्ही तर रोज 'टाइम्स' वाचतां ना!"

"टाइम्स मी रोज वाचतें हें खरें" मीं म्हटलें, "पण त्यांत पुण्या-

शर्मा हे माझे प्राग येथील सहाध्यायी. मी जितकी कमी बोलणारी तितके ते जास्त बोलणारे* व चर्चा करूं इच्छिणारे. ते मुळीं सांगतच कीं, मी फक्त झोपलें असलें व वाचीत असलें म्हणजे बोलत नाहीं. डिसेंबर जवळ येऊं लागला व हिंदुस्थानांतील कॉंग्रेसच्या ठरावांच्या बातम्या वर्तमानपत्रांतून येऊं लागल्या. भाऊजी उत्साहानें मला विचारीत, "या ठरावांतून मोठी चळवळ सुरू होईल असें नाहीं तुम्हांला वाटत?" मी म्हणे, "मला या कोणत्याच गोष्टी आवडत नाहींत" व असें म्हणून चर्चा टाळीत असे. शेवटीं कंटाळून मला कांहीं सांगण्यांत अर्थ नाहीं असें समजून मजबरोबर राजकारणाची चर्चा करण्याचा प्रयत्न त्यांनीं सोडून दिला. पण पुढें त्याच कॉंग्रेस-मध्यें स्वातंत्र्याचा ठराव पास झाला, व रात्रीं बारा वाजतां पंडित नेहरूंच्या हस्तें स्वातंत्र्याचें निशाण उभारलें गेलें. तेव्हां मात्र मला राहवेना, व त्या दिवसापासून वर्तमानपत्रांतील राजकारणविषयक मजकूर मी मुकाट्यानें वाचूं लागलें. पण शर्मा चर्चा करतील म्हणून त्यांना मात्र कळूं दिलें नाहीं.

दोघांच्या स्वभावांत फरक असला तरी आम्ही दोघें एका देशांतील होतों व दोघेंही अभ्यासाच्या ध्येयानें प्रेरित होतों. त्यामुळें एकमेकांचें

---

मुंबईकडल्या बातम्या वाचीत नाहीं. त्या सोडून देतें. सध्यां अफ-गाणिस्थानांत गडबड आहे. अमानुल्ला राज्यत्याग करतो आहे. त्यांपैकीं काय हवें तें सांगतें हवें तर.

*आमचे शर्मा जसे बोलके तसेच थोडे उतावळे होते व एकंदरींत पाश्चात्य वातावरण त्यांना फारसें मानवत नसे. प्रथम ते प्रागला आले तेव्हां मिसेस् विंटरनिटत्झनें त्यांची सोय आपल्या एका विश्वासू मैत्रिणीचे घरीं केली. दुसरे दिवशीं सकाळींच शर्मा भेटावयास आले व मिसेस् विंटरनिटत्झला सांगूं लागले कीं, 'तुमच्या त्या बाईनें मला फसविलें. वाईट फर्निचर दिलें. बिछाना तर इतका वाईट कीं माझे हाल झाले. रात्रभर झोप नाहीं. एकदां इकडे गठड्या बोचत तर एकदां

बरेंचसें सहकार्य होई. मधून मधून दोघे स्वयंपाक करून आपल्या जेवणाची आवडही पुरवीत असूं. एकदां आम्हीं कढी केली. कढीला फोडणी दिली व हिंग टाकला. त्या वासानें व मोहरी तडतडण्यानें त्यांची मालकीण धावत आली व आग लागली कीं काय म्हणून विचारूं लागली! प्रागला येण्यापूर्वीं पांच वर्षें दयानंद वैदिक कॉलेजांत त्यांनीं प्रोफेसर म्हणून काम केलें होतें. जर्मन भाषेचा हिंदुस्थानांत थोडा अभ्यास करून ते आले होते. शिवाय इतर अडचणीमुळें शक्य तितके लवकर परत जाऊं इच्छीत होते. युनिव्हर्सिटीचा नियम असा होता कीं, दोन टर्मपेक्षां कमी काळांत कोणासही परीक्षेस बसतां यावयाचें नाहीं. त्याप्रमाणें दोन सहामाही होतांच 'संन्यास' या विषयावरील प्रबंध पुरा करून ते हिंदुस्थानांत गेले. माझी सर्वच ताजी तयारी. शाळेच्या कामामुळें कॉलेजमधील विषयांचा संबंध आला नव्हता. जर्मन भाषेला सुरवात करून चारपांच महिनेच झाले होते. शिवाय दोन वर्षें पुरीं करून मग हिंदुस्थानांत जावयाचें असें ठरविलें होतें. त्यामुळें ते पदवी घेऊन गेले तरी माझ्या प्रबंधाला मीं सुरवातही केली नव्हती.

---

तिकडे." त्या म्हणाल्या, "असें कसें होईल? ती बाई फसविणार नाहीं. काय तुमच्या बिछान्याचें बिघडलें होतें?" मग त्यांनाच कल्पना सुचली. त्यांनीं आपल्या घरचे बिछाने दाखवून विचारलें "असे होते का?"

"होय." शर्मा म्हणाले.

मिसेस् विंटरनिट्झ् हसूं लागली व म्हणाली, "बाबा, हे तुझे हाल नव्हत. ही चैन होती. हे बिछाने पराचे आहेत (feather beds) याला मधून टांके घालीत नाहींत त्यामुळें पिसें एकत्र गोळा होतात पण तीं हातानें सारखीं करावयाचीं असतात. याला ऊब अतिशय असते व किमतही फार पडते." संध्याकाळीं प्रोफेसरांनीं आम्हांस ही गोष्ट सांगितली तेव्हां शर्मा, प्रो. ष्टाइन व मी– आम्ही सर्वजण खूप हसलों.

प्रागचें माझें दुसरें विश्रांतिस्थळ म्हणजे—पहिलें फिशर कुटुंब-प्रो. ष्टाइन. वस्तुतः ते आमचे प्रोफेसर पण वयानें लहान. प्रो. विंटरनिट्त्झ् यांचे तेही एक वेळचे विद्यार्थीच व आतां त्यांचे हाताखालीं लेक्चरर म्हणून काम करीत. प्रो. विंटरनिट्त्झ्जवळ मोकळेपणा वाटला तरी ते फार मोठे वाटत, व म्हणून प्रो. ष्टाइनच्या घरीं गप्पांना जसा रंग भरे तसा विंटरनिटत्झ्च्या घरीं येणें शक्य नव्हतें. डॉ. गेमपर्ट, शर्मा व मी यांनीं त्यांच्या धरीं उपनिषद् वाचावयास म्हणून जमावयाचें. थोड्या वेळानें उपनिषद् राही बाजूला व गोष्टींना सुरवात होई. शर्मा म्हणत, 'मला बोवा कंटाळा आला!' इतक्यांत ष्टाइनांना आदरातिथ्याची आठवण होई. मग थंडींत काकडत गेलों–कारण दुपारीं अकराची वेळ म्हटली तरी बर्फ पडूं लागलें म्हणजे हुडहुडी भरे–म्हणून कोणाला एक वाइनचा पेग भरून दे, कोणाला बिअर दे, अशी सुरवात होई. मला दोन्ही नको असत, तेव्हां ते म्हणत, "आतां तुमचें स्वागत करूं तरी कसें? तुम्ही दारू घेत नाहीं व बिअर घेत नाहीं." शेवटीं मला चहा मिळे. पण बिअरही मीं चाखलेली आहे. केव्हां शर्मांचे बरोबर त्यांना एकटें वाटूं नये म्हणून, केव्हां फिशर मंडळीबरोबर गेलें असतां, एकादा ग्लास बिअर मी घेत असे. पण कारल्याच्या भाजीप्रमाणें त्याच्या कडवटपणाबद्दल गोडी कधींच उत्पन्न झाली नाहीं.

प्रो. ष्टाइन हे जगांतील हालअपेष्टा पाहिलेले व त्यामुळें जगाचा व्यवहार ओळखणारे गृहस्थ. कोणतीही अडचण आली तर सरळ उठून त्यांचेकडे जावें. डोकें शांत ठेवून या वेळीं काय करणें इष्ट याचा बरोबर सल्ला मिळे. आनंदी दिसले तरी जगाचा बराचसा कडवटपणा त्यांनीं पचविला आहे असें प्रसंगोपात येणाऱ्या त्यांच्या कडवट उद्गारांवरून वाटे. १९१४ सालच्या युद्धामध्यें सक्तीनें लष्करभरती होऊन ते रणांगणावर जाऊनही आले होते. युद्धकालीन गोष्टी व युद्धोत्तर झालेल्या सुधारणा यांबद्दल मात्र त्यांना राग येई. मथू केतकर पॅरिसला राहिलेली. स्वाभाविक तिचा ओढा फ्रेंचांचेकडे. ती एका सुटींत

मजकडे राहावयास आली. ती व मी त्यांचेकडे गप्पा मारण्यास जात असूं. आणि मग ती फ्रेंचांची बाजू घेऊन बोलूं लागली म्हणजे यांचा डॉइश्लांट्चा ( जर्मनीचा ) अभिमान उसळून येई. पण त्याचबरोबर जर्मन राष्ट्रांतील अंतर्गत लढेही बाहेर पडत. जगाची कल्पना कीं कैझर विल्यम् हा आजच्या हिटलरप्रमाणें राष्ट्राचा नेता. पण तेव्हां तरी सर्व जर्मन त्याचेवर चिडलेले होते. "आम्हांला सांगितलें कीं चार महिन्यांत युद्धाचा निकाल होईल म्हणून, आणि लागलीं चार वर्षें. लोकांची उपासमार व हाल. शेवटीं पळून गेला. आम्हांला युद्धाच्या खाईत ढकललें मग आपण कां नाहीं युद्धांत मेला?" असें लोकमत दिसे.

मथू व मी एकमेकींत बोलतांना त्यांचे नांवावरून त्यांना धोंडोपंत ( श्टाइन् = धोंडा ) म्हणत असूं व एकदां त्यांचें नांव त्यांना सांगितलेंही. त्याचप्रमाणें विंटरनिट्त्झ् म्हणजे प्रो. हिवाळे, डॉ. गेमपर्ट म्हणजे डॉ. गणपत इत्यादि भाषांतरेंही सांगितलीं. आपल्या नेहमींच्या पद्धतीनें ते मोठ्यानें हसून म्हणाले, 'अहो, ही सर्व माया आहे. तुम्ही या देहाला वरून कोणतेंही नांव सांगितलेंत तरी आत्मा मूळ एकच ना!' उपनिषदें गीता इत्यादि त्यांनीं वाचलें असल्यानें त्यांतील परिभाषा योजणें त्यांना आवडे.

फिशरकुटुंब, प्रो. श्टाइन्, व प्रो. विंटरनिट्त्झ् यांचेमुळें प्रागबद्दलचा परकेपणा जाऊन मी तेथें रुळलें. जर्मन भाषेचा अभ्यास थोडा थोडा चालला होताच. जर्मन भाषा हिंदुस्थानांतच शिकून व सुदृढ प्रकृति घेऊन मी जातें, तर याच दोन वर्षांत किती तरी जास्त गोष्टी करतां आल्या असत्या. जर्मन भाषेचा प्राथमिक अभ्यास करण्यास कांहीं युरोप पाहावयास नको होता. पण सर्वच आयत्या वेळचा बेत त्यास इलाज नव्हता. प्रथम असामान्य* ( extra-ordinary ) विद्यार्थिनी म्हणून

* पहिल्यानें तात्पुरता प्रवेश मिळाला होता. अशा विद्यार्थ्यांना Special case म्हणून घेतलेलें असतें. मॅट्रिक्युलेशनचें सर्टिफिकेट मिळाल्यावर मग आम्ही खरे विद्यार्थी झालों. यासाठीं उपयोगांत

मला प्रवेश मिळाला. म्हणजे लेक्चर्स ऐकण्यास परवानगी मिळाली. पुढें आमचीं सर्व सर्टिफिकिटें दाखल केल्यानंतर— या वेळीं मला मराठी चौथीपासून जी. ए.पर्यंत सर्व सर्टिफिकिटें पाठवावीं लागलीं— आम्हांस मॅट्रिक्युलेशनचें सर्टिफिकेट मिळून मग आम्ही सामान्य विद्यार्थी झालों. मॅट्रिक्युलेशननंतर आठ टर्म भरल्या म्हणजे परीक्षेस बसण्याची परवानगी मिळते. बाहेरून आलेल्या विद्यार्थ्यांचा अभ्यास पाहून त्याला त्यापैकीं कांहीं टर्म्सची माफी देण्याचा युनिव्हर्सिटीचे कार्यकारी-मंडळास हक्क असतो; तरी पण कोणासही दोन टर्म्सपेक्षां कमी काळांत परीक्षेस बसतां यावयाचें नाहीं असा दुसरा नियम होता. इकडील अभ्यासक्रमाची पद्धति विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें जास्त सोईची वाटली. मॅट्रिक परीक्षेचे तीन चार प्रकार. एका प्रकारांत जुन्या भाषांचा अभ्यास जास्त. एका प्रकारांत अर्वाचीन भाषांचा अभ्यास जास्त. एका प्रकारांत यंत्रशास्त्र शेतकी इ. विषयांचा अभ्यास. डॉक्टरी वकिलीकडे जाणारा मनुष्य पहिल्या प्रकारचा शिक्षणक्रम घेतो. व्यापारांत जाणारास दुसरा प्रकार, व एंजिनिअरिंग, शेती इ. कडे जाणारा त्यापुढील प्रकारचा शिक्षणक्रम घेऊन मॅट्रिक होतो. मॅट्रिक झाल्यावर सर्वस्वी पालकावर अवलंबून राहून अभ्यास करणारे विद्यार्थी थोडे. बहुधा प्रत्येकजण कांहीं तरी कामधंदा नोकरी करतो, व ती करून टर्म भरतां येते. एका परीक्षेच्या सर्वच विषयांचीं व्याख्यानें एकदम ऐकलीं पाहिजेत असा नियम नाहीं. आपणास शक्य तेवढेच विषय घ्यावयाचे व तेवढ्यापुरतीच फी द्यावयाची. सर्व विषयांत टर्म भरून झाली म्हणजे मग परीक्षा. व्याख्यानें सकाळीं आठपासून रात्रीं आठपर्यंत असूं शकतात. एक व्याख्यान संपलें कीं मध्यें पंधरा मिनिटें विश्रांति व मग दुसरें व्याख्यान सुरू होतें. या पंधरा मिनिटांस ॲकडेमिशस्

आणलेले ausser ordentlich ( extra-ordinary ) व ordentlich ( ordinary ) म्हणजे असामान्य व सामान्य हे शब्द आपणांस गमतीचे वाटतात.

फीर्टल्* (विद्यालयीन पाव तास) असें म्हणतात. व्याख्यानेंही एक महिना चालून पुढें एक महिना बंद अशीं चालतात. या वेळीं वाचनालयें मात्र चालू असतात व विद्यार्थ्यांनीं वाचनालयांत जाऊन वाचावयाचें अशी अपेक्षा असते. मला तेथील विद्यापीठांतील सर्वांत आवडणारी गोष्ट म्हणजे सुसज्ज वाचनालयें. प्रत्येकास टेबल, खुर्ची, स्वतंत्र दिवा, हिंवाळ्यांत वाफेनें पुरविलेली उष्णता, व तेथें राखण्यांत येणारी शांतता यामुळें मन प्रसन्न होई. मला दोन वर्षांत परत यावयाचें होतें म्हणून मीं माझ्या तीनही विषयांचीं व्याख्यानें एका वेळींच ऐकलीं व परीक्षाही एकदम म्हणजे चौथ्या टर्ममध्यें दिल्या. पण तेथील विद्यार्थ्यांची अशी पद्धत नसे. ते म्हणत 'आम्ही एका टर्मला एक विषयाचें वाचन करतों व एक विषयाची परीक्षा देतों.'

या परीक्षेचा सर्व भर प्रबंधावर असतो. प्रबंध एकदां मुख्य प्रोफेसरानें मान्य केला म्हणजे मग दुय्यम विषयांच्या परीक्षा घेतात. एकंदर विषय तीन, त्यांतिकीं तत्त्वज्ञान हा आवश्यक प्रत्येकानें घेतलाच पाहिजे. दुसरा विषय ज्यांत प्रबंध लिहावयाचा तो. शिवाय तिसरा एक विषय घ्यावा लागतो; तो मीं 'शिक्षणशास्त्र' घेतला होता. पहिल्या व तिसऱ्या विषयांत फक्त तोंडी परीक्षा असते. शिक्षणशास्त्र विषय घेतल्यानें तेथील बऱ्याच शाळा पाहावयास मिळाल्या.

सर्व युनिव्हर्सिट्यांचें टर्मबाबतींत सहकार्य आहे. म्हणजे बर्लिनला एक टर्म एका प्रोफेसरचीं व्याख्यानें ऐकलीं व दुसरी टर्म प्रागला

---

* आम्ही प्रथमच प्रो. ष्टाइनच्याकडे गेलों. आठ वाजतां जायचें ठरलें होतें. पण घर सापडण्यास वेळ लागला तेव्हां दहा मिनिटें उशीर झाला. उशीराबद्दल दिलगिरी दाखवितांच ते म्हणाले, "छे! छे! हा इंग्लिश वक्तशीरपणा झाला. येथें तुम्ही आठ वाजतां येणार म्हटलंत म्हणजे, तुम्ही आठ ते सव्वाआठपर्यंत येणार असेंच आम्ही समजतों. तेव्हां माफी वगैरे मागूं नका."

घालविली तरी चालतें. त्यामुळें पुष्कळ विद्यार्थी युरोपखंडभर एकेका प्रोफेसराचीं व्याख्यानें ऐकण्यास हिंडत असतात. मात्र आठव्या टर्मला परीक्षा देण्यासाठीं आपल्या देशाच्या युनिव्हर्सिटींत येतात. कारण नोकरीमध्यें आपल्या देशाच्या पदवीधराचा क्रम पहिला असतो. परदेशस्थ पदवीधरास नोकरी देत नाहींत. मी प्रागला असतां डेन्मार्क, हॉलंड वगैरे देशांतून विद्यार्थी येऊन एक एक टर्म विंटर-निट्झचीं व्याख्यानें ऐकून गेले.

प्राग युनिव्हर्सिटी अतिशय जुनी. इंग्लंडांतील ऑक्स्फर्ड व केंब्रिज्, पॅरिसची सोरबोन् इ. विद्यापीठांच्या जोडीची. एक वेळ लॅटिन् भाषेंत सर्व व्यवहार चाले. प्रबंधही लॅटिनमध्यें लिहावा लागे, कारण बोध-भाषाच लॅटिन् होती. पण पुढें अर्वाचीन भाषांना महत्त्व आलें. जर्मन व झेक् या भाषा बोधभाषा म्हणून मान्य करण्यांत आल्या. आतां जर्मन युनिव्हर्सिटी व झेक् युनिव्हर्सिटी अशा दोन स्वतंत्र संस्था आहेत.

जर्मन लोकांना राज्य करावयाची पिढ्यान्‌पिढ्या सवय; परंतु मी गेलें त्या वेळीं जर्मन जित असून झेक् हे जेते होते. स्वाभाविकच दोन्ही संस्थांत एक प्रकारचा तुटकपणा दिसे. फिलॉसॉफिकल फॅकल्टीसमोर ( विद्यापीठाची तत्त्वज्ञानाची शाखा ) युद्धोत्तर काळामध्यें एक मोठें वर्तमानपत्र वाचनालय नवीनच बांधण्यांत आलें होतें. मी तेथें कधीं कधीं वाचावयास जाई. माझ्या जर्मन मित्रांना त्याबद्दल विचारतां ते म्हणत, 'आम्हांला नाहीं त्याची माहिती.' पुढच्या वर्षीं मी तेथील विद्यार्थिनींच्या आंतरराष्ट्रीय वसतिगृहामध्यें राहावयास गेलें. परदेशच्या विद्यार्थिनींसाठीं झेक सरकारनें हें मुद्दाम बांधलें असून तेथें जेवण व राहणें यासाठीं सरकारी स्कॉलरशिप मिळे. मला यांत जागा मिळत आहे असें जेव्हां मीं माझ्या प्रोफेसरांना सांगितलें तेव्हां त्यांना आश्चर्य वाटलें. प्रो. विंटरनिट्झ् म्हणाले, मला ह्या वसतिगृहाच्या अस्तित्वाची माहितीच नव्हती. या वसतिगृहांतील सर्व विद्यार्थिनी

झेक् युनिव्हर्सिटींत अभ्यास करीत. जर्मन युनिव्हर्सिटींत जाणारी मी एकटीच होतें.

अभ्यासाला सुरवात केली तेव्हां व्याख्यानें ऐकावयास जाऊन बसावयाचें. जर्मन भाषा कळत नव्हती पण कानावर येईल तेवढा कानाला संस्कार. जर्मन भाषेचा अभ्यास चालू केला होता. तसेंच माझा विषय जो Indology त्याबद्दल इंग्लिशमध्येंही वाचावयाजोगें पुष्कळ आहे. तेथून वाचावयास सुरवात केली. वर्षाच्या शेवटीं मात्र माझें भाषाविषयक ज्ञान व व्याख्यानांचा विषय यांची गाठ पडली व व्याख्यान मला कळूं लागलें. व्याख्यानाचे वेळीं सुरवातीस मी चेहऱ्यावर 'कांहीं एक परिणाम नाहीं' अशी बसे. शेवटीं एकदां विंटरनिट्झ्नीं-ही विचारलें कीं, " तुला वाटतें का, कीं चार टर्ममध्यें तुझा प्रबंध पुरा होईल ? " मीं होय म्हणून सांगितलें. प्रबंध मला लिहितां येईल याबद्दल मला विश्वास होता पण भाषेंतील प्रगति दाखविल्याखेरीज जास्त बोलण्यांत अर्थ नव्हता.

वर्गांतील व्याख्यानें सर्वसाधारण विषयांवर असत. पण प्रत्येक विद्यार्थ्याला प्रबंधाकरितां जें मार्गदर्शन होई तें खाजगी चर्चेत. सुरवातीला प्रबंधाचा आराखडा कच्चा तयार केला व त्या दृष्टीनें वाचनाला सुरवात झाली. पहिल्या वर्षीं मीं कांहीं लिहिलेंच नाहीं. दुसऱ्या वर्षाच्या सुरवातीस पहिलीं दोन प्रकरणें लिहिलीं. हीं प्रकरणें दाखविण्यास मी जाई तेव्हां खरी चर्चा होई. दोन गोष्टींवर प्रोफेसरांचा फार भर. एकाद्या विषयावर लिहितांना त्या विषयावर तत्पूर्वी जेवढें कांहीं लिहिलें गेलें असेल तें सर्व वाचलेलें असणें व कोणतेंही विधान आधाराखेरीज न करणें. त्यामुळें कोणतेंही वाक्य लिहिलें कीं आधार तयार ठेवावा लागे. 'सीमंतोन्नयन' हें प्रकरण मीं लिहिलें तें वाचून त्यांनीं सांगितलें, " *Why ! you can complete your thesis in this way* " यापुढें माझें काम भराभरा चालू झालें. सर्व निबंध, विशेषतः शेवटचा भाग, बालविवाहाच्या कालसंशोधनाचा वाचून त्यांना संतोष वाटला

असावा. त्यांनीं मला मुद्दाम बोलावून सांगितलें " I wish you continue to do this and make it your life-work, and not do it only for the doctorate."

मिसेस् विंटरनिट्त्झ्च्या उल्लेखाखेरीज प्रो. विंटरनिट्त्झ् यांचें वर्णन अपुरें होय. कर्तव्यदक्ष पत्नीचा ती एक आदर्श असे. घरांत गेलें कीं प्रत्येक ठिकाणीं तिच्या अस्तित्वाची खूण पटे. घरीं पाहुणे यावे व त्यांना आपल्या पाककौशल्यानें संतुष्ट करावें अशी इतर सुगृहिणींप्रमाणेंच हिला फार हौस. नवरा आपल्या अभ्यासांत दंग, तेव्हां त्याला संसाराची दगदग पडूं नये म्हणून सर्व गोष्टी आपण करी. इतक्या वेळां त्यांच्या घरीं गेलें पण एकही दिवस नवऱ्यास चहा करून दिल्याखेरीज ती बाहेर गेलेली पाहिली नाहीं. जणूं कांहीं आपण चहाचे वेळीं नसलों तर त्याची उपासमार होईल. ब्रेडचे किती तुकडे खावे हें सुद्धां त्याला कळत नाहीं असें तिला वाटे.* एक वर्ष हिंदुस्थानांत राहून प्रोफेसर परत गेले व इटालींत पोंचतांच आजारी पडले. तेव्हांपासून हिंदुस्थानच्या मलेरिआ-

---

* प्रोफेसर लोकांचा नादिष्टपणा, विसरभोळेपणा, व्यवहारशून्यता ही सर्व देशांत सारखीच समजली जाते. पॅरिसला प्रो. सिल्व्हांलेव्ही दर महिन्यास एक चहापार्टी आपल्या सेमिनार ( अभ्यासिका ) मध्यें देत. सर्व ओळखीच्या लोकांची एकदम गाठभेट व्हावी हा हेतु असे. दादा व मथू यांचेबरोबर मी एकदां या पार्टीस गेलें होतें. वेळ पांच ते सात होती. प्रोफेसरसाहेब सर्वांशीं बोलण्यांत गढून गेले होते. सात वाजले तशा मादाम लेव्ही उठल्या व प्रोफेसरांचे दोन्ही हात धरून घरीं घेऊन निघाल्या. पुढें मादाम, मागें प्रोफेसर चाललेले, पण लोकांच्याकडे तोंड करून व त्यांच्याशीं बोलणारा पाहुण्यांचा घोळका त्यांचे मागोमाग अशी ही माळका पाहून मीं हसत मथूला म्हटलें, "अग हें काय?" मथू म्हणाली, " त्यांना असंच न्यावं लागतं. नाहीं तर हे नादिष्टपणें घरीं जावयाचें विसरावयाचे."

ची तिनें इतकी धास्ती घेतली होती कीं, पुन्हा हिंदुस्थानांत जाण्याचें ती नांव काढूं देत नसे. एकदां असाच प्रश्न निघाला. तेव्हां त्यांनीं विचारतां तिनें सांगितलें कीं, "मी मेल्यावर हिंदुस्थानांत जा; तोंवर नाहीं." तरी पण हिंदुस्थानांतील लोक आले तर त्यांचा पाहुणचार ती मनापासून करी. सर शिवप्रसाद गुप्त, प्रो. विनयकुमार सरकार किंवा इतर कोणीही हिंदी लोक प्रागला गेले कीं, विंटरनिट्झ्च्या घरीं त्यांचें स्वागत व्हावयाचेंच, व आम्ही हिंदी म्हणून मला व शर्मांना आमंत्रण असावयाचेंच. मीं पदवी घेतली त्या वेळीं मिसेस् विंटरनिट्झ् आजारी होती. त्यामुळें पदवीदानसमारंभास ती येऊं शकली नाहीं. पण मला मुद्दाम घरीं बोलावून तिनें एक बांगडी बक्षिस दिली. हाच तिचा आजार पुढें वाढला व दोन वर्षांनीं त्यांतच तिचा अंत झाला.

येथील परीक्षेप्रमाणेंच पदवीदानसमारंभाचीही पद्धति वेगळी वाटली. एकदां प्रबंध मान्य झाला म्हणजे पुढें तोंडी परीक्षा सुरु होतात. तोंडी परीक्षेची वेळ प्रोफेसर व विद्यार्थी एकमेकांच्या सोईप्रमाणें ठरवितात. तत्त्वज्ञान व शिक्षणशास्त्र या विषयांच्या परीक्षांचा दिवस मीच त्या त्या प्रोफेसरांकडे जाऊन ठरवून आलें. तत्त्वज्ञानाचे प्रो. क्राउज् यांचेकडे जाण्यापूर्वी मी प्रो. श्टाइनांना भेटलें होतें. ते आपल्या नेहमींच्या चेष्टेखोरपणानें मला म्हणाले, "तेथें गेलांत म्हणजे तत्त्वज्ञानाची खूप स्तुति करा. मला तो विषय फार आवडतो असें त्यांना सांगा." मींही म्हटलें, "बरें तर असें सांगेन. I love Philosophy; for it's a useful thing for those who cannot do anything better." "Oh! don't do that!" ते एकदम उठून उभे राहून ओरडून म्हणाले, "Say it that way– I like Philosophy very much; but it is such a vast subject, that the more you read the more you realize how little you know of it."

पदवीदानसमारंभ वर्षांतून एकदां न होतां दर आठवड्यास होत

असतात व विद्यार्थ्यांच्या सोईप्रमाणें त्याच्या पदवीदानाचा दिवस ठरवितात! माझी बोट ट्रिएस्टहून १ मे रोजीं निघावयाची होती. म्हणून एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यांत होणाऱ्या 'प्रमोत्सिओन' ( Promotion—पदवीसमारंभ ) मध्यें मीं पदवी घेतली. ज्या शाखेचा विद्यार्थी असतो त्या शाखेच्या मुख्याचे हस्तें पदवी दिली जाते. त्या आठवड्यास चार विद्यार्थ्यांनीं पदवी घेतली. आम्हांस प्रो. विंटरनिट्झ् यांचे हस्तें मिळाली. तारीख व वेळ वर्तमानपत्रांत जाहीर होते व पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे इष्टमित्र व प्रोफेसर हजर राहतात. त्या प्रसंगाचा देखावा मध्ययुगीन होता तसाच कायम आहे. धर्मोपदेशकांप्रमाणें मोठमोठे झगे घालून डीन वगैरे अधिकारी मंडळी हजर असतात. प्रथम विद्यार्थ्यांचीं नांवें, त्यांचे विषय व गुण सांगितले जातात. येथें फर्स्ट क्लास, सेकंड क्लास असे वर्ग पाडीत नाहींत. युनिव्हर्सिटीचे दप्तरांत निकालपत्रक असतें त्यामध्यें विद्यार्थ्या-बद्दलचा शेरा* लिहिला जातो व हा शेरा त्या वेळीं सांगण्यांत येतो. पण छापील सर्टिफिकेटांत याचा उल्लेख करीत नाहींत. यानंतर हातांत दंड धारण केलेला व झगा घातलेला शिपाई असतो त्याचे पाठोपाठ विद्यार्थी सर्वांत उच्चासनावर बसलेल्या प्रमुखाकडे जातात. तेथें युनि-व्हर्सिटीचें चिन्ह जें गदा तें ठेवलेलें असतें, त्यावर हात ठेवून विद्यार्थी शपथ घेतो. ही शपथ लॅटिनमध्यें घ्यावयाची असते; व नंतर पदवीचा कागद विद्यार्थ्यास दिला जातो. पदवी मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्यापैकीं एकानें आभार मानावयाची पद्धति आहे. बाकीच्या तिघांपैकीं एकानें त्या तिघांचे वतीनें आभार मानले. मी हिंदुस्थानांतील विद्यार्थिनी म्हणून

---

* हे शेरे चार: Genug गेनुग् = बेताचा fair; gut गूट् = good चांगला; Sehr gut झेर गूट् = very good फार चांगला, व Ausgezeichnet आउसगेत्झाइखनेट् = Distinguished उत्कृष्ट. माझा शेरा ausgezeischnet हा होता. ]

मला स्वतंत्र आभार मानण्याची संधि मिळाली. आभारप्रदर्शक भाषण आधीं दोन दिवस मीं तयार केलें होतें; कारण जर्मन भाषेंत आयत्या वेळीं भाषण करणें मला जमलें नसतें. आणि श्रोत्यांचें अवधान आपण किती राखूं शकलों हें बोलणारास कळतें असें मानलें तर मला असें म्हणावेंसें वाटतें कीं, त्या दिवशीचें माझें भाषण छोटेंसेंच खरें पण अतिशय परिणामकारक झालें; व लागलीच ज्या आनंदानें प्रो. विंटरनिट्त्झ् यांनीं खुर्चीवरून उतरून माझें अभिनंदन केलें त्यांत त्याचें पूर्ण प्रतिबिंब मला पाहावयास सापडलें.

## परिशिष्ट

### [ प्रस्तुत प्रकरणीं कांहीं पत्रें ]

पत्र नं. १

554, Sadashiv Peth,
Poona City,
13th July 1929.

My Dear Akka,

I have received your letter dated 27th June, and I am surprised to find, you have not still received the letters, containing my replies to your specific questions. I remember to have repeated my replies once or twice, and I make it a point every week to ask Anna, whether he has posted the weekly letter to you. But I must accept the fact as you now report it; and perhaps, the reason why you have not received the replies you want is, that you have been shifting your residence between London and Paris, and the letters as addressed by Anna happened to be at cross purposes with your residence. Any way, I am sending this letter to your address C/o Thomas Cook and

Sons, London, as you are now returning to London after the 17th of July. I am also taking a further step and enclosing copies of this same letter, in letters addressed to three or four friends, so that any one of them, at any rate, may succeed in handing over to you my envelope enclosed in this letter.

I have no objection to your studying for the Doctorate at Paris or Prag, provided the whole amount of the expenditure on this tour of yours, including passage in and out, does not exceed Rs. 5,000 as originally estimated. In your last letter, you also have written to me, that you remember this estimate. Further, I would not like you to spend more than a year at the most even for the doctorate, including the days you have already spent abroad. But you have given me no details of either the month's expenditure, or the period of time that you would require for taking the degree or diploma of doctorate, from the time you begin to attend the courses of lectures or rather from September next, because you have already been out of India for nearly 5 months. I wonder if you can learn the German language and finish your studies for the doctorate within a year from March 1929, or within 7 months which remain at your disposal from September. I have already written to you, as you will see from the letters when you get them, that I do not really care whether you take

any diploma or degree. But on the other hand, if you feel enthusiastic over taking the doctorate, and are likely to feel your trip wasted without any degree or diploma, then I have no objection to your taking the degree or diploma. I have also no objection to your staying for some time longer than one year, if necessary for the degree. But there is naturally a limit to the cost that should be incurred for this purpose. You know, I would not mind a few hundred more than the estimate. But if it is going to be a longer course of studies which you are undertaking, and if having once stepped into it, you would have the temptation of not leaving the course unfinished, whatever the cost and duration of time, then, it would really be a matter for serious consideration. That is why I have been saying to you from the beginning, that I do not attach any importance to your degree or diploma. You have done good work without it already; and I am sure, you can do so even hereafter without it. It will be enough for me as return for the amount spent, if you definitely improve your health and come back free from the effects of the worry you have so far undergone in India in rearing up your school at Satara, and if you have seen the world a bit and got a broader outlook on life.

Yours affty

N. C. Kelkar

* * *

पत्र नं. २

Budec' ( Hostel for women )
Prague. ( wenzigova ulice' )
Czechoslovakia
8-9-29.

ती. तात्या,

सप्रेम नमस्कार वि. वि.—मागील पत्रांत लिहिल्याप्रमाणें मी ता. ५ रोजीं येथें आलें व आल्यावर आपली दोन्ही पत्रें ता. ८-८-२९ व १६-८-२९ चीं मिळालीं. पत्रांतील दोन्ही ड्राफ्ट् ( Thomas Cook Co. वरचे ३७ पौं. ७ शि. चे–) ( ड्राफ्ट् नंबर D 82326 ) पोंचले.

आता 'प्राग्' येथील शिक्षण व खर्च यासंबंधीं मजकूर.

डॉ. विंटरनिट्झ् यांची भेट घेतली. युनिव्हर्सिटींत प्रवेश मिळणें शक्य आहे व त्याची खटपट डॉ. विंटरनिट्झ् यांनीं सुरू केली आहे. युनिव्हर्सिटींत प्रवेश केल्यापासून Ph.D.चे परीक्षेस जाईपर्यंत आठ टर्म्स भराव्या लागतात. परंतु मी ग्रॅज्युएट असल्याकारणानें मला चार टर्म्स भराव्या लागतील. ( २ ) येथील विद्यार्थ्यांना लॅटिन् आवश्यक असतें. संस्कृत लॅटिनच्या जोडीचें मान्य झाल्यास मला लॅटिन् शिकण्याची माफी मिळेल. संस्कृत लॅटिनचे बरोबर मान्य केलें जावें अशी डॉ. विंटरनिट्झ् यांची खटपट आहे. हें जमेल तरच मी येथें राहीन. कारण लॅटिन् करावयाचें म्हटल्यास दीड वर्षांत अभ्यास होणार नाहीं. ( ३ ) फिलॉसफी हा आवश्यक विषय. Indology हा माझा ऐच्छिक निबंध लिहिण्याचा विषय व यांत मी हिंदुस्थानांत लिहिणार होतें तोच 'The Origin and Development of संस्कार' हा निबंध लिहिणार. याखेरीज इतिहास, इंग्लिश, व अध्यापनशास्त्र या तीन विषयांपैकीं एकादा ऐच्छिक घ्यावा लागतो तो मी अध्यापनशास्त्र घेणार आहे. ( ४ ) १ ऑक्टोबर ते फेब्रुवारी एक टर्म व मार्च ते जून दुसरी

टर्म– म्हणजे १९३१ च्या जूनअखेर माझी चौथी टर्म संपेल. (५) विद्यार्थ्याला चौथ्या टर्ममध्यें परीक्षा घेऊन मोकळे करतात. चौथी टर्म भरल्यानंतर परीक्षेसाठीं राहवून घेत नाहींत. (मार्चमध्यें माझ्या तिकिटाची मुदत संपते, व तोंपर्यंत मीं निबंध दिल्यास मला त्या वेळीं परीक्षा घेऊन मोकळें करणें कदाचित् शक्य होईल. पण मी जून १९३१ हीच मुदत धरून हिशेब करीत आहे.)

दुसरी बाब खर्चाची. येथील राहणी स्वताईची– मुंबई इतकी आहे. येथील 'क्रोन' हें नाणें सरासरी १। आणा किंमतीचें आहे. १२ क्रोन म्हणजे एक रुपया होईल. एका पौंडाचे क्रोन १५५-१६० यामध्यें बदलत असतात. हल्लींचा भाव १६३ आहे. पण आणखी महाग झाला तरी १५० धरावयास मुळींच हरकत नाहीं. ज्या Budec' (Hostel for Women) मध्यें मी तूर्त आहे तेथें मुलींना राहणें, जेवणें, स्नान वगैरे सर्वांसह जास्तींत जास्ती ६०० क्रोन व कमींत कमी ४५० क्रोन खर्च करावा लागतो. येथून एकाद्या जर्मन कुटुंबांत राहिलें तरी ६०० क्रोन पर्यंत चांगल्या आरामशीर तऱ्हेनें राहतां येईल. ६०० क्रोन म्हणजे १५० भावानें ४ पौंड व सध्यांच्या १५५ भावानें सरासरी ३ पौंड १८ शि. होतात. युनिव्हर्सिटीच्या लेक्चर्सची फी थोडी आहे. शेवटीं परीक्षेचे वेळेला मात्र जास्त द्यावी लागेल. वर पुस्तकें, फी, प्रवास इ. गोष्टींस महिना दोन पौंड भरपूर होतील. म्हणजे राहणें, जेवण, वर खर्च व प्रवासखर्च धरून सरासरी ६ पौंड महिना चांगले पुरतील. सप्टेंबर १९२९ ते जून १९३१ बावीस महिने होतात. महिना ६ पौंड म्हणजे २२ महिन्यास १३२ पौंड लागतील.

५००० रु. यांचे १३ १/२ चे भावानें हिशेब केल्यास ३७० पौं. ७ शि. (बरोबर ७ ११/१७ शि.) होतात. आतांपर्यंत

१०३ पौंड जाणें येणें तिकीट.
१०० पौंड येतांना बरोबर.
३७–२ ता. ८ ६/१ रोजीं पाठविले.
२४०–२

२४०—२ पौंड आपण पाठविले आहेत. त्यांपैकीं मीं स्वित्झर्लंडचा प्रवास वगैरे केला तो सर्व वजा करून आतां मजजवळ २४०—२ पैकीं २० पौंड शिल्लक आहेत.

३७० पौंड ७ शि. अपेक्षित खर्च.
२४० पौंड २ शि. झालेला खर्च. (यापैकीं मजजवळ २० पौंड
१३० पौंड ५ शि. व्हावयाचा खर्च. शिल्लक आहेत.)

१३० पौंड ५ शि. अधिक मजजवळील शिल्लक २० पौंड म्हणजे मला अजून १५० पौं. ५ शि. पर्यंत खर्च करण्यास हरकत नाहीं.
चालू महिना धरून माझा अंदाजी खर्च १३२ पौंड.
तिकिटांतील वाढ. (जूनमध्यें परत आल्यास) १० पौंड.
१४२ पौंड होतात.

खर्चांचा अंदाज मी जास्तींत जास्त धरून करीत आहें. प्रत्यक्ष खर्च याहून कमी येईल अशी माझी कल्पना आहे.

हें खर्च व शिक्षणक्रम यांबद्दल झालें. आतां आपण ज्या अपेक्षेनें मला इकडे पाठविलें त्याबद्दल. प्रवासास ५००० रु. पर्यंत खर्च करावा, व एक वर्षानें परत यावें, अशा आपल्या अपेक्षा आहेत व हें मला माहितही आहे. यूरोपचा प्रवास करावा व जमल्यास कांहीं डिग्री व डिप्लोमा घ्यावा अशी माझी इच्छा होती व मीं ती आपणांस लिहिलीहि होती. परंतु सुरवातीला माझे प्रकृतीचा मला भंरवसा नसल्यानें माझी दुसरी इच्छा फारशी जोरांत नव्हती. येथें येऊन हवा मानवते असें वाटून माझा मला आत्मविश्वास आल्यावर दुसऱ्या गोष्टीचा मी विशेष विचार करूं लागलें. आपल्या दोन अपेक्षांपैकीं पहिली अपेक्षा खर्चाची जमेल; तेवढ्या खर्चांत मला येथें अभ्यासक्रम पुरा करतां येईलसें वाटतें. असें वाटलें नसतें तर मीं हा विचारच केला नसता. कारण याहून अधिक सात-आठ हजारांपर्यंत खर्च करून हा अभ्यासक्रम करण्यायेवढी याची जरूरी नाहीं. एका प्रकारें ही शिक्षणांतील चैन

आहे, आवश्यकता नव्हे. परंतु अभ्यास न करतां मी परत आलें तरी प्रवासांत ५००० खर्च होणारच. तेव्हां तेवढ्याच खर्चांत परंतु थोड्या जास्त वेळांत जर Ph. D. होतां आलें तर कां होऊं नये ?

पुन्हा हिंदुस्थानांत येऊन कामास सुरवात करावयाची. कोणतेंही जबाबदारीचें काम करावयाचें म्हणजे त्याला एक प्रकारची मनाची समतोलवृत्ति राखावी लागते. मागच्या दुखण्यापासून ती माझी वृत्ति कमी झाली होती. आतां माझी पूर्वींची मनःस्थिति परत आली आहे असें वाटतें; परंतु अजून तिला स्थिरता आली पाहिजे. मनाची समता ढळण्याचा प्रसंग आल्यास मी विचारानें समता राखूं शकतें. परंतु त्यायोगें एक प्रकारचा मानसिक शीण आल्यासारखें वाटतें. तेव्हां आणखी कांहीं दिवस असे प्रसंगच येऊं न देणें इष्ट वाटतें. या प्रकारच्या मनःस्थितीला माझा आवडीचा अभ्यास ही उत्कृष्ट विश्रांति होईल. या सर्व दृष्टींनीं आपल्या दुसऱ्या अपेक्षेपेक्षां थोडें अधिक राहून अभ्यास करावा अशी इच्छा आहे. हट्ट मात्र नाहीं. पडत्या फळाची आज्ञा घेऊन निघालें. परंतु त्या फळाचा दुरुपयोग करावा अशी इच्छा नाहीं. मीं वर्षापेक्षां अधिक राहूं नयेच अशी आपली विशेष इच्छा असल्यास मी परत येईन. याबद्दल आपलें सविस्तर उत्तर द्यावें अशी इच्छा आहे.

लंडन युनिव्हर्सिटीचा 'हॉलिडे' कोर्स (phonetics वर्णोच्चारशास्त्राचा घेतला होता. त्याचें सर्टिफिकेट मिळालें. त्याचप्रमाणें लंडन युनिव्हर्सिटीची Proficiency in English ची परदेशीय लोकांसाठीं एक परीक्षा असते त्याला बसलें होतें. त्यांत पास झालें. तें सर्टिफिकेटही मिळेल. 'जर्मन'मध्यें अजून सांगण्यायेवढी प्रगति नाहीं. येथील एका जर्मन मुलीची लंडनला ओळख झाली होती ती मला जर्मन शिकविते व मी तिला इंग्लिश शिकवितें यामुळें जर्मन शिकण्याला खर्च पडत नाहीं. Proficiency in English च्या सर्टिफिकेटाचा या दृष्टीनें मला उपयोग होत आहे.

हें पत्र वाग्भट भावोजींस पाहण्यास पाठवावें. त्यांना याबद्दल मीं वेगळें पत्र लिहिलें नाहीं. सर्वांस यथायोग्य नमस्कार व आशीर्वाद.

आ.

**आक्का**

*　　　*　　　*

पत्र. नं. ३

श्री.

कार्ट रोड ९।१०.
सिमला, २।९।२९

आशीर्वाद वि.–तुमचें ता. ८ ऑगस्टचें पत्र मला येथें आजच मिळालें. तें सर्व नीट वाचून आतां त्याचें उत्तर लिहीत आहे. तुम्हीं लिहिलेली एकंदर हकिगत लक्षांत घेतां, तुम्हांस प्राग येथें जाऊन योजलेला अभ्यासक्रम पुरा करण्यास मी आनंदानें परवानगी देत आहे. तुमची प्रकृति, तुमचा उत्साह, अभ्यासपूर्ण होण्यास लागणारा काळ, व खर्चाचा अदमास या सर्व गोष्टी आम्हांस येथें बसून कळतील त्यापेक्षां तेथेंच तुम्हांस अधिक कळणार हें उघड आहे.

तुम्ही इकडे लवकर येऊन अमुकच कार्यक्रम इकडे स्वीकारावे असें आमचें म्हणणें केव्हांही नव्हतें. फक्त तुमची प्रकृति सुधारावी व योग्य वाटेल तो कार्यक्रम तुम्हीं स्वीकारावा असेंच आमचें म्हणणें होतें. येऊन जाऊन साताऱ्यास स्थापन केलेल्या शाळेविषयीं तुम्ही विशेष आस्था बाळगीत असां, तेव्हां कदाचित् परत येऊन तेंच कार्य पुन्हा सुरू कराल अशी आमची अपेक्षा होती इतकेंच. परंतु तें काम पुन्हा इतक्यांत हातीं घेण्याची तुमची उमेद नसल्यास तुम्हीं ठरविला तो विचार योग्यच आहे असें म्हटलें पाहिजे. असो.

ठरल्याप्रमाणें तुम्ही प्रागला गेला असाल किंवा लवकरच जाल. तरी आतां इतकेंच सांगणें आहे कीं, उमेदीनें पण प्रकृतीस संभाळून वाचणाऱ्या मुली हाताच्या बोटांवर मोजण्याएवढ्या निघाल्या. फार

पुढील अभ्यास करावा. खर्चाचे मर्यादेसंबंधानें मीं पूर्वी तुम्हांस वरचे-वर आठवण दिली ती सयुक्तिक होती असें तुम्हीही म्हणालच. परंतु आतां तुम्ही पुढील अभ्यास करणार झाल्यावर मी तुम्हांस ती मर्यादा घालीत नाहीं. तुम्ही सुज्ञ असल्याकारणानें जरूरीपेक्षां जास्त खर्च करणार नाहीं अशी माझी पक्की खात्री आहे. आणि उलट, तुम्हांस या उच्चप्रतीच्या महत्त्वाकांक्षेचे कामीं हजार-पांचशें रुपये अधिक खर्च आल्यास तो आनंदानें देण्यास मीही माघार घेणारा नाहीं अशी तुमची खात्री असेल. म्हणून आतां सांगावयाचें इतकेंच कीं, प्राग येथें गेल्यावर कोणत्याही तऱ्हेनें आपली आबाळ करून घेऊं नका. सुखानें रहा. खर्चाची काळजी बाळगून, मितव्यय फाजील करून, प्रकृतीला अपाय करूं नका. तुमच्या प्रकृतीपुढें व सुखापुढें मला पैशाची किंमत नाहीं. तुमच्यासारखी सत्प्रवृत्त मुलगी माझे पोटीं आली हें मी आपलें भाग्य समजतों. तुमची उमेद व आकांक्षा खचित तुम्हांस भूषणभूत आहे. जरी पांच हजारांवर आणखी हजार-पंधराशें लागले तरी खर्च करा, आणि परीक्षा देऊन, पण प्रकृतीस संभाळून, परत या असें तुम्हांस माझें प्रेमपूर्वक सांगणें आहे. चि. श्रीधरची काळजी तुम्हांस नको. तुम्ही फक्त आपल्या प्रकृतीची काळजी घ्या. एक वेळ अधिक पैसे खर्च होऊनही परीक्षा साध्य झाली नाहीं तरी मला त्याची परवा नाहीं. परंतु तुम्ही पूर्वीचा सर्व शारीरिक मानसिक खेद विसरून नवीन उमेदीनें पूर्वीहून अधिक लोकोपयोगी कार्य करण्यास यावें यांतच मला सर्व कांहीं आलें. अधिक काय लिहूं?

पूर्वीचे पांचशें रुपये पोंचले असतीलच. पुढें केव्हां लागतील तें आधीं वेळेवर लिहा. तुमचा पत्ता यत्किंचित् बदलण्यासारखा असला तरी कळवीत जा. पत्र लहानच का होईना, पण दर आठवड्यास पाठवीत जा. कळावें, हे आशीर्वाद.

तात्या केळकर.

* * *

II Opatovicka′ 8
Prague ( Czechoslovakia )
17th June 1931.

Dear Mrs. Deshpande,

Many thanks for your kind letter of 12-6. I was very pleased to hear that yau have been transferred to the Poona College for Women. I have no doubts that, with your energy and industry, you will do full justice to the work of a Sanskrit Professor, and soon get used to it. You will also remain in touch with Sanskrit Scholars, and have ample opportunity to continue your research work which you have so ably begun here in Prague.

I am sorry to say, Mrs. Winternitz has not yet recovered from her long illness. We are now staying in a Sanatorium with a beautiful garden where she at least can be in the open air, and enjoy the trees and flowers, and the sunshine. I am afraid, I shall not be able to go to the Congress of Orientalists in Holland, as I intended to.

With kindest regards and all good wishes to you in your next post, both from Mrs. Winternitz and myself.

Yours sincerely
M. Winternitz

* * *

New address :—
XIX, Cechova 15
Prague ( Czechoslovakia )
26-12-34

My Dear Mrs. Deshpande,

Many thanks for your very kind letter, remembering my 71st ( not 72nd, happily ) birth-day. It is

after many years, the very first birth-day on which all my children and grand-children were assembled. We are having a nice time together, though as you rightly guess, at least I feel the absence of dear Mrs. Winternitz more than ever.

I was exceedingly pleased to receive the first form of your printed thesis. Owing to the financial crisis and the retrenchments, we have not yet been able to print a second number of the 'Indologica Pragensiz.' Hence neither Dr. Gämpart's nor Dr. Sharma's thesis have yet been printed. So yours will be the first of the three to be published. The printing is very well done. Only a few corrections are needed, if it is still time to correct proofs.

I wish I could come to India once more. In fact, I should have come to Poona before this for the preparation of the critical edition of the Sabhā Parvan which I have promised for the great critical Edition. But I am afraid, the state of my health—I had some heart trouble at the beginning of this year—will now allow me to undertake such a long journey.

So let us hope that you will come to Europe again, and we may meet in Prague.

With kind regards and best wishes for the progress of your work.

Yours sincerely
M. Winternitz

Kind regards from my daughter and sons.

# एरंडवनांत : : १५

> “ वडाऱ्यांचा शेजार । गर्दभांचे कंठस्वर ।
> पाटाचा ओहळ सुंदर । वामभागीं वाहतसे ॥ १ ॥
> ऐशा सुंदर स्थानावर । उभारिलें हें रम्य मंदिर ।
> ‘श्री. ना. दा. ठा.’ नांव साचार । शिरोभागीं शोभतसे ” ॥ २ ॥

एरंडवनांतील एका उदयोन्मुख कवयित्रीला वरील ओळी स्फुरल्या. एरंडवण्याची कॉलेजची जागा म्हणजे मूळ खडक. टेकडीच्या उतरणीपासून कालव्यापर्यंत पसरलेला खडकाचा मोठा लांब रुंद पट्टा. भोंवतालीं वसति नव्हतीच. अर्थात् वडाऱ्यांसारख्या फिरत्या टोळ्यांना तेथें वसति करण्यास सोइस्कर वाटे. कॉलेजची इमारत तयार होऊन भोंवतालीं तारांचें कुंपण पडलें तरी शेजारीं अजून वडारांची वस्ती आहेच. आणि त्यांच्या गर्दभ वाहनांचे कर्णे (Horns) म्हणजे कंठस्वर मधून मधून ऐकूं येतात! कॉलेजच्या इमारतीसाठीं जागा सपाट करणें ती सुद्धां मातीची भर टाकून उंच करून घ्यावी लागली. कारण डोंगराचा खडकाळ उतार.* तेव्हां त्या खडकावर झाडें अजीबात नव्हती. आतां-

* तेहतीस सालीं पुण्यास पाऊस अतिशय पडला. कॉलेजच्या इमारतीच्या खालच्या खोल्या तळघरासारख्या आहेत. उतरणीवर इमारत

ही बाग करतांना प्रथम माती, पाणी व झाडें सर्वच विकत घ्यावें लागलें. पण तें घेऊन का होईना डोळ्यांना रम्य दिसेल अशा तऱ्हेची हिरवी हिरवळ व झाड-झाडोरा तेथें आतां विपुल तयार झाला आहे. कॉलेजच्या व्हरांड्यांत उभें राहिलें म्हणजे समोरचे टेकडीवरील पर्वतीचें मनोहर दृश्य आणि तेथपासून सुरवात होऊन, आपल्या कॉलेजच्या बागेपर्यंत येऊन पोंचलेला तो हिरवागार वृक्षराजियुत प्रदेश, याकडे पाहूं लागलें म्हणजे मन प्रसन्न होतें, व कॉलेजसाठीं पुण्यांतील ही जागा पसंत करणाऱ्या उदारधी दात्याला धन्यवाद देऊं लागतें.

१९२३ सालीं कॉलेजची इमारत तयार झाली व चोवीस सालीं कॉलेजचे वर्ग हिंगण्याहून एरंडवनांत आले. आपलें कॉलेज या दृष्टीनें जरी आवडत असलें तरी येथें मी कधीं शिक्षक म्हणून काम करावयास येईन असें वाटलें नव्हतें. माझ्या कल्पना सर्व सातारच्या कन्याशाळेभोंवतीं केंद्रित झाल्या होत्या; व कधीं प्रिन्सिपल झालेंच तर शाळेप्रमाणें स्वतः

---

बांधली गेली तेव्हां या खोल्यांच्या दोन्ही बाजूच्या भिंती खडकांत गेल्या. दुसऱ्या दोन बाजूंनीं मोकळी जागा असून तिकडूनच उजेड येतो. मी व इरावती दोघी प्रिन्सिपलचें व रजिस्ट्रारचें काम करूं लागलों होतों; व आमचीं दोघींचीं ऑफिसें या दोन खोल्यांत असत. एक दिवशीं नानांचें बोलावणें आलें. 'राजापूरच्या गंगाबाई भेटावयास आल्या आहेत; तरी ऑफिसांत लवकर बोलाविलें आहे.' कोण आलें असावें असा विचार करीत ऑफिसांत आलें तों ऑफिसांतील कडेच्या भिंतींतून पाण्याचे झरे लागलेले! पाऊस अतिशय, जमिनी खालीं व दोन्ही बाजूला खडक, त्यामुळें पाणी मुरण्यास वाव नाहीं. शेवटीं दगडांच्या चिरांतून पाणी वाहूं लागलें व आम्हांस राजापूरची गंगा भेटली. नानांचे मतें विद्यापीठांतील दोन्ही महत्त्वाच्या जागीं प्रथमच स्त्रियांची नेमणूक झाली म्हणून 'गंगाबाई' आमचे अभिनंदनास आली होती!

कॉलेज काढून व्हावयाचें असें मी प्रसंग आला म्हणजे म्हणत असे. आणि त्या दृष्टीनें अजूनही मला कन्याशाळेची सुपरिंटेंडेंट म्हणवून घेण्यांत जास्त अभिमान वाटतो. प्रागला पीएच्. डी.चा अभ्यासक्रम घेतला तो माझी एम्. ए.ची राहिलेली वाचनाची आवड पुरविण्यासाठीं व दोन वर्षें शांतपणें घालविण्यासाठीं. पण माझी परीक्षा होण्याचेपूर्वींच हिंगण्याच्या व येरंडवण्याच्या केंद्रांत अनेक क्रांत्या होऊं घातल्या होत्या, व त्यामुळें मला परीक्षा होऊन परत जातांच सातारचें काम सोडून येरंडवण्यास प्रोफेसरचें काम करावयास जावें लागणार असें दिसलें.

सातारच्या कन्याशाळेचें काम व पैशाची जबाबदारी आपणांस पुन्हा झेपेल काय याचा विचार मी करूं लागण्यापूर्वींच, मी हिंदुस्थानांत परत जातांच संस्कृतची प्रोफेसर म्हणून येरंडवण्यास काम करूं लागावें, अशाबद्दलची ठरलेली योजना आमच्या आजन्मसेवकमंडळाचे सेक्रेटरी प्रो. केळकर यांनीं मला कळविली. शिवाय असेंही कळविलें कीं, "येथील परिस्थिति भानगडीची झाली आहे, व स्त्रियांना जबाबदारीच्या जागा द्याव्यात अशी सिंडिकेटची विचारसरणी होऊं लागली आहे. आणि त्या दृष्टीनें तुम्ही परत येतांच प्रिन्सिपलचें काम तुमचेकडे येण्याचा संभव आहे. इरावतीबाईंची योजना रजिस्ट्रारचे जागीं झाली आहेच." इत्यादि. दादांनीं कॉलेज सोडून जावें व मीं त्यांचे जागीं प्रोफेसर म्हणून यावें ही घटनाही मला मोठीशी आनंददायक नव्हती. पुन्हा कॉलेजचें काम करतांना नानांचें व माझें कितपत सहकार्य होईल हाही प्रश्नच होता. पण एकदां आजन्मसेवक झाल्यावर मंडळाचे ठराव मान्य करणें प्राप्त होतें व त्याप्रमाणें मीं ते मान्य केले.

आवडीचे दृष्टीनें मला प्रोफेसरचें काम जास्त आवडे. श्री. केळकरांना मीं उत्तरांत लिहिलेंच कीं दोन कामांपैकीं प्रोफेसरचें शिकविण्याचें काम मला आवडेल; परंतु प्रिन्सिपलचें काम मला मनापासून आवडत

नाहीं. शिवाय स्त्रियांना प्रमुख जागा द्यावयाच्या या तत्त्वानुसार एकदम प्रिन्सिपल होणें यांतही मला मोठेंसें भूषण वाटत नाहीं. दादा, तात्या, नाना, आदि मंडळींच्या हाताखालीं आम्ही शिकलों. जन्मभर त्यांची प्रोफेसरी तीच. आणि मी मात्र 'कानामागून आली व तिखट झाली' या न्यायानें एकदम प्रिन्सिपल व्हावयाचें, त्यांच्यावरच शिस्त धरावयाची, हें मला मनानेंच पटत नसे. पण स्त्रियांची युनिव्हर्सिटी. त्यांत स्त्रियांना प्रमुख जागा मिळावयाच्या नाहींत तर कोठें ? व केव्हां तरी एकदां सुरवात करतांना अशी थोडीशी विसंगति होणारच. तेव्हां सिंडिकेटनें हें धोरण सुरू केलें म्हणजे सिंडिकेट चुकलें असें म्हणतां येत नाहीं.

हिंदुस्थानांत आल्याबरोबर नानांनीं हा प्रिन्सिपलचे कामाचा प्रश्न माझेपुढें मांडला. पण माझी तयारी नव्हती. कारण आतांपर्यंत माझें सर्व काम झालेलें शाळेंत. शाळेंत शिकविण्याच्या पद्धतीपेक्षां कॉलेजमध्यें शिकविण्याची पद्धति वेगळी व विषयही वेगळे. जरी थोड्याशा अनुभवानें मी शिकवूं शकेन असा आत्मविश्वास मला वाटत होता तरी अनुभव घेण्यास तर वेळ हवा. कॉलेजचे प्रोफेसरचें काम सतरा-अठरा तास म्हणजे पूर्वतयारी हिशेबांत घेतां दुप्पट-तिप्पट होणार होतें, व मला एकदम सर्वच विषय नवा त्यामुळें तयारींत बराच वेळ घालवावा लागणार होता. मुख्याधिकारी हा यशस्वी शिक्षक असेल तरच त्याचा इतर शिक्षकांवर वचक बसूं शकतो. शिकविण्याचे कामाचा स्वतःचा जम बसण्यापूर्वीं एकदम अधिकारपद स्वीकारून दुसऱ्याच्या चुका काढीत बसण्याचा मला तिटकारा वाटे, व म्हणून प्रोफेसरच्या कामाचा अंदाज येईपर्यंत प्रिन्सिपलचें काम स्वीकारणें मीं नाकारलें. त्या वर्षीं संस्कृत घेतलेल्या सर्व मुली पास झाल्या तरी दादांच्यासारख्या कसलेल्या प्राध्यापकाचे हाताखालीं शिकलेल्या मुलींना माझीं व्याख्यानें अपुरीं वाटावीं यांत आश्चर्य नाहीं. फार काय मला स्वतःलाच तीं अपुरीं वाटलीं. पण पुढच्या वर्षीं समाधानकारक

व्याख्यानें देतां येतील हा अंदाज मला आला; व पुढच्या वर्षी १ मे १९३२ रोजीं मीं प्रिन्सिपलचे कामाची जबाबदारी स्वीकारली.

मजबरोबर काम करणारे बहुतेक प्रोफेसर एक वेळचे माझेच शिक्षक होते. नाना, तात्या यांचे हाताखालीं तीन वर्षें मीं विद्यार्थिनी म्हणून काढलीं होतीं. प्रो. केळकर व प्रो. लागू यांचे तास जरी प्रत्यक्ष मजवर नव्हते, तरी मी कॉलेजांत असतांनाच ते तेथें शिकवावयास येऊं लागले व त्यांचे कांहीं तासही मीं विद्यार्थिनी या नात्यानें ऐकले. त्यांची माझी पहिली ओळख झाली ती ते प्रोफेसर व मी विद्यार्थिनी या नात्यानेंच. त्यामुळें आज ही मंडळी जरी माझे हाताखालीं काम करणारी झाली तरी मनानें मला कधीं आपण त्यांचेपेक्षां मोठ्या आहोंत असें वाटलें नाहीं. हाताखालचे प्रोफेसर म्हटले तरी एक वेळचे गुरुजन असें मनांत समजून मी त्यांच्याशीं वागलें व आपणच शिकवून तयार झालेली कॉलेजची विद्यार्थिनी कॉलेजची प्रिन्सिपल होते यांत आपलाच अप्रत्यक्ष गौरव त्यांनीं मानला. चांगलें सहकार्य होऊन 'उत्तम राज्यव्यवस्था कोणती? तर जीमध्यें कायद्याच्या कलमांचा बडगा फार थोडा वेळ उपयोगांत आणावा लागतो ती.' हा माझा आवडीचा सिद्धांत बराचसा अनुभवाला आला. प्रत्येक सहामाहींत कांहीं ठराविक निबंध लिहून व्हावें लागत. तेव्हां प्रो. जोशी म्हणजे तात्या विद्यार्थिनींना वर्गांत प्रथम प्रथम सांगत, "हें पहा, मुलींनो! ते निबंध पुरे झाले पाहिजेत. कमळाबाई माझ्या एक वेळच्या विद्यार्थिनी आहेत. जर निबंध अपुरे राहिले तर त्यांना मी अडचणींत आणीन. कारण मला बोलणें त्यांना जड जाईल; व न बोलतील तर दोष येईल. तेव्हां हें ओळखून मींच माझें काम नीट केलें पाहिजे."

नीट सहकार्य होण्यास आणखीही कांहीं गोष्टींची मदत झाली व त्या गोष्टी म्हणजे विद्यापीठावरील संकट. वेळ असता तर नानांचीं व माझीं जास्त भांडणें होतीं; पण या संकटामुळें आपसांतील मतभेद मागें पडून सर्वांचें लक्ष विद्यापीठाचें काम चालू कसें ठेवतां येईल

इकडे वेधलें. मी प्रागला होतें तेव्हांपासूनच सिंडिकेटमध्यें दोन मतपंथ होऊन वाद सुरू होते, व तेच वाढत जाऊन त्यांचें पर्यवसान फेब्रुवारी १९३२ मध्यें साडेबावन्न हजारांची वार्षिक मदत थांबण्यांत झालें!

मीं प्रिन्सिपलशिपचा अधिकार घेतला तो अशा अडचणीच्या परिस्थितींत. शिवाय माझी स्वतःची वेगळी काळजी म्हणजे सातारची कन्याशाळा. तेथीलही माझी जबाबदारी या संकटामुळें वाढली. मीनाक्षीनें सुपरिंटेंडेंटचें काम सोडलेलें, पैसे जमविण्याची आधींच काळजी, त्यांतही विद्यापीठावरील आलेल्या संकटानें बाराशें रुपयांची ग्रँट् बंद झालेली, ती भरून काढण्याची नवी काळजी. त्यामुळें मला तीन वर्षें फार त्रासाचीं गेलीं. कॉलेजच्या बाबतींत पैसे गोळा करण्याची जबाबदारी नव्हती. थोडे का होईनात, पण जे पैसे यावयाचे ते एका चेकनें येत. पगार खात्याप्रमाणें इतर खात्यांतही खर्चाचे बाबतींत हात आखडलेला; त्यामुळें नवीन खर्च करून कोणती सुधारणा करूं म्हणणें शक्यच नव्हतें. खर्च करण्यापेक्षां खर्च वांचविण्याचाच विचार जास्त करावा लागला. शिकविण्याचें 'फुल टाइम' प्रोफेसरचें काम, ऑफिसचें काम व वसतिगृहाच्या रेक्टरचें काम, हीं तीन मला दिवसभर पुरणारीं कामें होतीं. रेक्टरची नेमणूक करून घेणें पैशाचे काटकसरीमुळें शक्य नव्हतें. पुढें पसतीस सालीं पूर्वपरिस्थिति प्राप्त झाल्यावर मात्र मीं रेक्टर व संस्कृत शिकविण्यास आणखी एक लेक्चरर यांची नेमणूक जवळ जवळ हट्ट धरून करून घेतली.

या तिन्ही कामांतून जो वेळ मिळे तो सातारच्या शाळेकडे जाई. पुणें सातारच्या खेपा किती घातल्या याची मोजदाद नाहीं. मी विनोदानें म्हणेच कीं, माझा वेळ कोणत्याही घरापेक्षां मोटारींतच जास्त जातो. सुटी दोन दिवसांची आली कीं सातारला जाणें व सोमवारीं सकाळचे मोटारनें निघून दुपारच्या तासांना पुण्यास परत येणें, हें तर नित्यक्रमांतील होऊन बसलें होतें. पण प्रकृति चांगली असल्यामुळें हें सर्व झेपलें. पण सातारची शाळा सुरू करण्याचे आधीं ज्याप्रमाणें पी.ए.च्या

अभ्यासाची योजना मनाशीं होती पण वेळेचे अभावीं ती मागें पडली त्याचप्रमाणें, प्रागहून परत येतांना तेथें केलेलें काम पुढें चालू ठेवावयाच्या ज्या कांहीं योजना मनांत केल्या होत्या त्याही मागें पडल्या. प्रागला लिहिलेला 'प्रबंध' छापून प्रसिद्ध करावयाचा त्यालाही १९३६ साल उजाडलें. कॉलेजचें काम व कॉलेजवरच राहणें, यामुळें विद्यार्थिनींचा नेहमीं संबंध येई व तेंच मला आवडे. आमचे दादासाहेब करंदीकर नेहमीं म्हणत तें मला आठवतें. 'आपली प्रकृति व मनःस्थिति जर चांगली राखावयाची असेल तर नेहमीं आपल्यापेक्षां लहान वयाचे मंडळींत मिसळावें. त्या योगानें आपण मोठे होत आहोंत हें विसरून जातां येतें.' कॉलेजच्या कामांत मला सर्वांत आवडणारी गोष्ट म्हणजे विद्यार्थिनी. दोन एक वर्षांत माझ्या शिकविण्याच्या विषयांचा जम चांगला बसला व तास घेणें हा त्रास न वाटतां आनंद वाटूं लागला.

हें कॉलेजचें विद्यार्थिनींचें विश्व अर्थात् शाळेच्या विद्यार्थिनींच्या विश्वापेक्षां वेगळें असतें. येथील मुली वयानें मोठ्या, बुद्धि वाढलेली, त्या प्रमाणांत कार्यक्षमता वाढलेली. शाळेंतील 'चिमण्यां'प्रमाणें नुसती 'चिंवचिंव' करून त्या थांबत नाहींत. कावळ्याप्रमाणें 'कावकाव' करून वेळेस श्रोत्याचें डोकें फिरवतील, अगर मनांत आलें म्हणजे कोकिळेप्रमाणें आलाप घेऊन रसिकमनरंजनही करतील. कोकिळेचें 'प्रत्युत्पन्नमतित्व व परभृतिकत्व'ही यांचे ठिकाणीं पूर्ण वाढलेलें दिसतें. शाळेंतील मुलींच्या निरागस बडबडीनें आनंद मिळतो तर येथें बौद्धिक चर्चेची भूक भागते, वादविवादकौशल्य जास्त पाहावयास सापडतें. सर्वच मुलींच्यांत या गुणांची वाढ झालेली असते असें नव्हे. कांहीं नुसते वयानें वाढलेले व 'एरंडवन' हें जागेचें नांव सार्थ करणारे नमुनेही पाहावयास मिळतात. मुलींशीं बोलतांना मी पुष्कळदां सांगे कीं, " तुम्हांला वाटतें आपण कॉलेजकन्यका. मोठ्या मुली झालों. आम्हांला हक्क हवेत. तुम्हांस सर्व कळतें असें नुसतें वाटतें पण कळत मात्र

कांहीं नाहीं!" नवीन मुलगी कॉलेजांत आली म्हणजे पहिल्या सहामाहींत ती जरा नवीन असते म्हणून बेतानें वागतें. मग तिला हळूहळू हक्क कळूं लागतात. कॉलेजकन्यकेच्या हक्कांचें वारें द्वितीय वर्षांत डोक्यांत फार भरलेलें असतें. पुन्हा तिसऱ्या वर्षांत मुलगी आली म्हणजे परीक्षेची आठवण होते व पुढचें क्षितिज तिला दिसूं लागतें. कितीही दंगेखोर मुलगी असली तरी शेवटच्या सहामाहींत ती हळुवार बनते व कॉलेज सोडून जाण्याच्या कल्पनेनें जास्त आपलेपणानें वागूं लागते. कॉलेज सोडल्यावर मग तिला कॉलेजचा ओढा जास्तच वाटूं लागतो.

बत्तीस सालपासून पस्तीस सालपर्यंत आपल्या कॉलेजवर संकट आलें आहे ही जाणीव मुलींनाही असे. पस्तीस सालीं तडजोड झाल्यानंतर सर्वांनाच उत्साह वाटूं लागला व त्या वर्षीचें संमेलन फार मोठें झालें. विद्यापीठाचे चॅन्सेलर, लेडी ठाकरसी, व कांहीं सिंडिकेटचे सभासद मुंबईहून त्या वेळीं आले होते. त्या वेळच्या गव्हर्नरच्या पत्नी लेडी ब्रेबोर्न या अध्यक्ष होत्या.

पस्तीस सालपासून दोन वर्षेपर्यंत कु. कमलाबाई कौशांबी या लेक्चरर व रेक्टर होत्या. वय लहान, अनुभव नाहीं, स्वभाव संकोचित आणि भित्रा. एम्. ए. झाल्या म्हणून नोकरी करण्यास आल्या. रेक्टरच्या कामाला सुरवात केल्यानंतर दोन दिवसांनीं मजकडे आल्या व भीतभीत म्हणूं लागल्या, "मला खिडक्यांना पडदे लावावयाचे आहेत कोण लावून देईल?" मीं म्हटलें, "कमलाबाई, तुम्ही रेक्टर म्हणजे वसतिगृहावरच्या सर्वाधिकारी. सर्व गडीमाणसें तुमचींच आहेत. कोणालाही हाक मारून काम करून घ्या." वर्गांत गेल्या म्हणजे शिकवीत ठीक. पण कॉमनरूममध्यें किती प्राध्यापकांशीं त्या दोन वाक्यें बोलल्या असतील शंकाच आहे.

त्या जावयास निघाल्या तेव्हां कॉमनरूममध्यें त्यांचेसाठीं लहानशी चहा-पार्टी दिली. पार्टी संपल्यावर प्राध्यापक म्हणाले, 'आपण आज

कशाला चहा घेतों आहोंत?’ तेव्हां सांगावें लागलें कीं, “कडेच्या खुर्चीवर कांहीं न बोलतां बसल्या आहेत ना! त्या आपल्यापैकीं एक आहेत. दोन वर्षें त्या येथें होत्या व आतां अमेरिकेस जात आहेत.” कांहीं प्रोफेसरांची व त्यांची याच वेळीं प्रथम गाठ पडली.

पण बाहेर इतक्या भिडस्त असल्या तरी काम चांगलें करीत. मजबरोबर मात्र आल्या दिवसापासून त्या इतक्या मनमोकळ्या वागल्या कीं, त्या माझ्या घरांतल्याच एक आप्त वाटत. श्री. शांताबाई भाटवडेकर– माझ्या कॉलेजभगिनी– पुन्हा सुमारें पंधरा वर्षांनीं या प्रांतांत परत येऊन या वेळीं हिंगण्यास सुपरिंटेंडेंटचें काम करीत. आम्हीं तिघींनींही दोन वर्षें फारच आनंदांत घालविलीं.

मुली व वरिष्ठ यांच्यांत खेळीमेळीचें वातावरण असे. पोशाक बदलून मला ओळखतां येतें कीं नाहीं हें पाहावयास मुली मजकडे येत. एकाद्या मुलीला सर्वांनीं ‘बनवावयाचें’ ठरविल्यास तिला निरोप सांगण्याची कामगिरीहि मजकडे सोपवीत. उलट मुलींना आम्हीही केव्हां केव्हां ‘बनवीत’ असूं. एकदां नाना आठवले व मी यांची याबद्दल पैज लागली होती कीं, मुलींना ‘एप्रिल फूल’ कोण करतें. नानांनीं एका मुलीला बोलावून निरोप सांगितला कीं, “उद्यां मला माझ्या एका स्नेह्यांनीं चहास बोलाविलें आहे व येतील त्या कॉलेजच्या मुलींना घेऊन या म्हणून सांगितलें आहे. कोण येणार असतील त्यांनीं कमला-बाईंची परवानगी घेऊन यावें.”

मुली माझेकडून येऊन परवानगी घेऊन गेल्या. एकीमुळें दुसरी असें होतां होतां पंधरा वीस मुली नानांचेबरोबर निघाल्या. पुढें नाना व मागें मुली. नाना कालव्यावरून एक वळसा घेऊन मागचे वाटेनें माझे घरीं आले व हे माझे स्नेही यांचे घरीं आज चहा आहे म्हणून त्यांनीं मुलींना सांगितलें. उरलेल्या मुलींना जिज्ञासा होतीच. त्या गॅलरींतून पाहतच होत्या कीं नाना व मुली कोठें जाणार? पण माझे अंगणांतील चहाची तयारी पाहून त्यांना उलगडा झाला व

'एप्रिल फूल' होऊन येणाऱ्या मुली येऊन पोंचण्याच्या आंत त्याच चहास येऊन बसल्या.

१९३८ च्या एप्रिलपर्यंतचे कॉलेजवरचे दिवस आनंदाचे खरेच. पण त्याच सुटींत आजारी पडून मी रजेवर गेलें. जानेवारी १९३९मध्यें परत आलें; परंतु प्रकृतीमुळें पूर्वीचा उत्साह काम करण्यास वाटेना. शिवाय संस्थेच्या वातावरणांत कांहीं बदल होत आहेसें वाटूं लागलें होतें. काय बदलत आहे हें मलाही कळत नव्हतें. पण अनिष्ट बदलाची छाया जाणवूं लागली खरी.

एकादी होतकरू विद्यार्थिनी दिसली म्हणजे स्वाभाविकपणें माझें तिजकडे जास्त लक्ष ओढे; व विशेषतः ती माझ्या विषयाची म्हणजे, ऐच्छिक संस्कृत घेणारी असेल तर तिला तिचें संस्कृत जास्त वाढविण्यास मदत करावी, शक्य तर तिचेकडून पी. ए.चा अभ्यास करवून घ्यावा असें वाटे. पण बहुतेक विद्यार्थिनी जी. ए. होतांच घरीं जाऊन पुढें क्रमप्राप्त विवाहबद्ध होतात तर कांहीं शिक्षकांचे धंद्यांत पडतात. बहुतेकजणी परीक्षा होतांच पी. ए. चा अभ्यास करावयाचें ठरवून पुस्तकांच्या याद्या नेतात, पण ही प्रगति येथेंच थांबते.

कु. यमू देऊसकर या विद्यार्थिनीनें माझें असेंच लक्ष वेधून घेतलें होतें. मुलगी हुशार व अभ्यासू. कर्तव्याची जाणीव चांगली पण भित्री व भिडस्त. हुजुरपागेंतून मॅट्रिक झालेली. इतर मैत्रिणींबरोबर फर्ग्युसनमध्यें जावयाची; पण घरगुती अडचणी व इतर परिस्थिति यांचा विचार करून वडिलांनीं आमचे कॉलेजांत पाठविली. तिची हुशारी पाहून मला तिला मदत करावीसें वाटे. संस्कृतमध्यें तिला विशेष मदत देऊन तयार करावी ही इच्छा. पण तिचा मागें मागें राहण्याचा स्वभाव आड आला. 'सभेंत बोल', 'नाहीं'; 'संमेलनांत काम कर', 'नाहीं'; 'इतर एखादें जबाबदारीचें काम कर', 'नाहीं'. कशांत पुढाकार न घेतां अभ्यास करीत मागें मागें राही. कॉलेजच्या पोथींत तिचें वर्णन असें केलें होतें: " देउसकरांचा अभ्यास। मस्तकीं हात ठेवूनि गेले व्यास।

आणिक तयांचे रुपेरी केश। ख्यात होत सर्वांना ॥ १ ॥" पांच-सात मुलींच्या गटांत बसून गप्पा मारणें यांत ती जास्त गुंगे. अशा वेळीं उपदेशाचा परिणाम उलटा होतो म्हणून मीं तिजकडे दुर्लक्ष करावयाचें ठरविलें.

पसतीस सालीं तडजोड होऊन विद्यापीठाच्या कार्याचा गाडा सुरळीत चालू झाला व त्या वर्षीचें संमेलन फार मोठें झालें. मुलींचाही उत्साह विशेष. अर्थात् उत्साहाबरोबर आपापसांतील भांडणें आलींच. मुलींचे दोन गट झाले व सेक्रेटरीची निवडणूक करण्यापासून प्रत्येक बाबतींत चढाओढ चालली. हें उत्साहाचें वारें यमूपर्यंत पोंचलें. संमेलनाच्या कार्यकारी मंडळाच्या सभा माझे घरीं व्हावयाच्या. एका सभेचे वेळीं स्वागतमंडळाचे सभासदांचीं नांवें सुचविलीं गेलीं. यमूचें नांव निघतांच 'ती कांहीं काम करावयाची नाहीं, वगळा तिचें नांव' म्हणून मीं सांगितलें. पण आतां तिला हौस वाटत होती. दोन दिवसांनीं अभ्यासाच्या कांहीं गोष्टीवरून तिचा राग बाहेर पडला: "मला तुम्ही संधि देत नाहीं." ती म्हणाली. मला तेंच हवें होतें. मींही उलट विचारलें, "यमू, तुला इतक्या वेळां संधि देत गेलें पण तुझें लक्ष होतें का? इ." पुढें ती फार बदलली. सांगलीस कन्याशाळेंत काम करावयास ती गेली व सर्वांना कौतुक वाटेल इतका आपल्या कामाचा जम तिनें बसविला. तेथून लिहिलेल्या एका पत्रांत तिनें लिहिलें,

"कमलाकी, मागल्या वर्षीं मी जी. ए. होऊन घरीं राहिलें होतें. पण मोकळें राहावयाची सवय नाहीं. त्यामुळें तासाची वेळ होतांच कसें तरी होई व पुन्हा कॉलेजांत जावेंसें वाटे. तुमची वारंवार आठवण होई. कारण नुसत्या शिक्षकापेक्षां वेगळ्या दृष्टीनें तुम्ही आमचेकडे लक्ष ठेवीत होतां. आतां सांगलीस आल्यापासून तुम्ही कॉलेजांत सांगत होतां त्या गोष्टी मी करतें. वसतिगृहावर देखरेख करतें, शाळेंत शिकवितें, मुलींबरोबर खेळतें, फार काय— सभेंत

भाषण सुद्धां करतें. मी काम कसं करतें तें पाहायला सांगलीस केव्हां येतां ? इ."

तिचें शेवटचें पत्र मला एकेचाळीस सालीं आलें. तिनें मोठ्या आग्रहानें मला सांगलीस बोलाविलें होतें. कॉलेजच्या शेवटच्या भानगडींत व हिशेब-तपासणींत मी गुंतलें होतें. त्वकर उत्तर लिहिलें नाहीं; आणि पुढें लिहिलें तें तिला पोंचलें तेव्हां ती तें वाचण्याच्या स्थितींत नव्हती. नवज्वरानें आजारी पडून ती शेवटच्या बेशुद्धींत असतां तें पत्र तेथें गेलें व तिच्या वडिलांकडून मला त्याची पोंच आली. यमूनें सांगलीस कन्याशाळेंत काम किती छान केलें होतें हें सर्व सांगलीकर मंडळीच जास्त जाणत आहेत.

एकदां एका विद्यार्थिनीनें लिहिलें कीं, "मी शाळेंत काम करतांना कांहीं अडचणीचा प्रसंग आला म्हणजे तुमची फार आठवण होते." तेव्हां मीं तिला लिहिलें होतें—

" बाई ग ! आपल्या विद्यार्थ्यांना आपली आठवण कधीं कधीं होते हें शिक्षकाला पुढेंमागें कळणें हा शिक्षकाचा सर्वांत मोठा गौरव आहे. शिक्षकाच्या दुर्लक्षित दैन्यवाण्या जिण्यांत याहून जास्त कशाची अपेक्षा त्यानें करावी !"

कॉलेजच्या मुलींशीं होणाऱ्या खटक्यांचें स्वरूप ठराविक प्रकारचें असावयाचें. त्यांना आपल्या हक्कांना जपावें असें वाटतें. आपला स्वाभिमान, स्वातंत्र्य याला धक्का बसूं नयेसें वाटतें. चालकांना ह्या विद्यार्थ्यांच्या कल्पना मान्य असतात; पण हक्क, स्वाभिमान व स्वातंत्र्य यांच्या व्याख्या जरी दोघांच्या एकच असल्या तरी, त्या त्या प्रत्येक गोष्टीची सीमारेषा कोणती याबद्दल मतभेद होतो. कांहीं वेळां मुलींना त्यामुळें नाखूष करण्याचे प्रसंग येतात. पण असे प्रसंग येत तेव्हां मी म्हणे, " आज आम्ही चालक, शास्ते–म्हणजे तुमचें भाषेंत ऑथॉरिटी. आणि तुम्ही शासित—म्हणजे दलित—असें तुम्हांस वाटतें खरें; पण आणखी दहा वर्षांनीं तुम्हांस याचा अनुभव येईल. आज जरी तुम्ही

सुना असला तरी उद्यां सासवा होणारच आहां. त्यांनाही हें थोड्या काळानें पटतें.

विद्यार्थिनींत कांहीं ध्येयवादी असतात. चालू राजकारणांत भाग घेण्यासाठीं धडपडत असतात. भोंवतालीं ज्या लाटा उठतात त्या स्वाभाविक कॉलेजांत पोंचतात. अशा वेळीं त्यांच्या भावनेचा वेग आवरून त्यांना विचारप्रवण करण्याचें काम कठीण असतें. थोडी चकमकही उडते. पण अशा चकमकींत एक प्रकारचा आनंद असतो. भांडण झालें तरी चांगल्या कामाकरतां होतें व परस्परआदरांत वाढच होते. मला कांहीं विद्यार्थिनी अशा आठवतात कीं, त्यांना मी सर्वांत जास्त बोललें असेन. तरी पण सर्वांत जास्त त्याच मला आवडतात. मतें कोणतीं का असेनात जीं असतील त्याप्रमाणें प्रामाणिकपणें वागा येवढेंच मी त्यांना म्हणे.

एकदां, मला वाटतें स्वातंत्र्यदिन २६ जानेवारी हा होता, मुलींची इच्छा अशी कीं, कॉंग्रेसच्या आदेशाप्रमाणें झेंडावंदन व स्वातंत्र्याचे ठरावाचें वाचन करावें. पण तें कॉलेजचा अधिकृत कार्यक्रम म्हणून झालें पाहिजे. तें तसें होणें अर्थात् शक्य नव्हतें. रात्रीं कॉलेजच्या इमारतीच्या दर्शनी पायऱ्यांवर आमची एक सभा वसतिगृहांतील मुलींची झाली. वसतिगृहांतील प्रश्नांचा विचार करण्यासाठीं ज्या त्यांच्या जनरल बॉडीच्या अगर पंधरवड्याच्या चिटणिसांच्या सभा व्हावयाच्या त्या पुष्कळदां आम्ही चांदणें असलें म्हणजे या पायऱ्यांवर घेत असूं. इतर प्रश्नांची चर्चा झाल्यावर हा प्रश्न निघाला. कॉलेजला तो अधिकृत कार्यक्रम कसा करतां येत नाहीं वगैरे सांगून झालें. शेवटीं मीं त्यांना विचारलें कीं, "मला मान्य आहे कीं, कॉलेज हें करूं शकतें तर जास्त चांगलें होतें. पण तुमच्यावर असें बंधन नव्हतें ना, कीं तुम्हीं आपल्या खोलींत ही शपथ वाचूं नये? तुमची तळमळ मला मान्य आहे. पण त्या तळमळीमुळें किती मुलींनीं आज हा ठराव वाचला आहे?" आणि प्रत्येकीला विचारतां ठराव

वाचणाऱ्या मुली हाताच्या बोटांवर मोजण्याएवढ्या निघाल्या. फार काय, पुष्कळांना नक्की ठराव काय आहे हेंही माहीत नव्हतें. मग मीं तो ठराव त्यांना समजावून सांगितला व आम्हीं त्याची चर्चा केली. मनापासून एकादी गोष्ट करणाराला कोणतीच अडचण येत नाहीं. पण प्रत्येकाला देखावा व तदनुषंगिक दंगलच जास्त हवी असते. अर्थात् आमच्याच मुली अशा आहेत असें नव्हे, तर सगळीकडे विद्यार्थि सारखेच.

या पायऱ्यांवरील शेवटची सभा म्हणजे फेब्रुवारी १९४१ मध्यें पार्टिंग फीस्टच्या आधीं दोन-तीन दिवस झालेली. लहानसा प्रश्न, पण विद्यार्थ्यांच्या जगांत त्याला कोण महत्त्व येतें! पार्टिंग फीस्टची वेळ कोणती ठेवावयाची? रात्रीं आठ-साडेआठला सुरवात करावी (मग अकरा-बारा वाजेपर्यंत फीस्ट् चालावयाची) असें वसतिगृहाच्या मुली म्हणत. तर गांवांतल्या मुली म्हणत, "तुम्ही दरवेळीं आमची सोय पाहत नाहीं. सहाला सुरवात करून आठला संपवाल तर येऊं. आम्हांस रात्रीं घरीं जाण्यास उशीर होतो. नाहीं तर मुळींच कोणी येणार नाहीं." शेवटीं पुष्कळशी चर्चा होऊन सहाची वेळ नक्की ठरली. गांवांतल्या सर्व मुली आल्या व वसतिगृहांतीलही आल्या. माझ्या कारकीर्दींत नऊ संमेलनें व नऊ पार्टिंग फीस्ट्स झाल्या. कॉलेजचीं हीं दोन वार्षिक कार्येंच म्हणावयाचीं. अर्थात् मांडव घातला कीं जसें दोन्ही बाजूच्या करवल्यांच्या अंगांत वारें शिरावें तसें संमेलन म्हटलें कीं, मुलींचे गट पडून वादांना सुरवात होई. केव्हां केव्हां आदळआपटही होई. पण शेवटीं युक्तिवाद व 'आपलेंच संमेलन आहे' हें पटून सर्व मुली त्यांत भाग घेत. खरोखर या गोष्टी मुलींच्या व मुलींसाठीं करावयाच्या. प्राध्यापकांचा रागलोभ त्यांत मिसळण्याचें कारण नाहीं. प्राध्यापकही दरवर्षीं चांगलें सहकार्य करीत. शेवटच्या पार्टिंग फीस्टचे वेळीं मुलींमध्यें निकराचीं भांडणें होऊनही शेवटीं मुलींनीं समंजसपणा स्वीकारला, पण कांहीं प्राध्यापकांना मात्र आपला वरपक्षाप्रमाणें वरचढपक्ष आहे असें वाटून रागावून बसावेंसें वाटलें.

वसतिगृहांत राहणाऱ्या मुलींशीं होणाऱ्या खटक्यांचें कारण म्हणजे त्यांच्या ओळखी व गाठीभेटी. पालकांची इच्छा मुलींना शक्य तितका मोकळेपणा मिळावा अशी असते. पण तसा कांहीं प्रसंग घडल्यास तुम्हीं मुलीला इतकी स्वतंत्रता कां दिलीत असेंही त्यांना विचारावेंसें वाटतें. मीं काम करावयास सुरवात केली ती मुली या जबाबदार व्यक्ति असतात, त्यांचा योग्य तो मान ठेवला पाहिजे या भावनेनें. पहिल्या दोन वर्षांत एकाही मुलीचें पत्र तपासलें नाहीं अगर तिनें अमुक ठिकाणीं जातें म्हणून सांगितल्यास त्याबद्दल संशय मानला नाहीं. पण जसजशी मुलींची संख्या वाढली, वेगवेगळे मनुष्यस्वभावाचे नमुने येऊं लागले, व त्यांच्या मित्रपरिवाराचे द्वारें वेगवेगळे दाब (influences) त्यांचेवर परिणाम करीत आहेत असें दिसूं लागलें तसतशी जास्त जागरूक होण्याची जरूरी उत्पन्न झाली. एकदां एक विद्यार्थिनी मजकडे परवानगी मागावयास आली व सांगूं लागली, "आमचा एक स्नेही परदेशीं जात आहे तेव्हां त्याला पोंचवावयास मी मुंबईस जाऊं का?"

"तुम्ही आपल्या वडिलांना पत्र लिहा व त्यांची परवानगी आणा. त्यांचें अनुमतीचें पत्र आलें तर मी परवानगी देईन." मीं सांगितलें.

दोन दिवसांनीं तिच्या वडिलांचें पत्र आलें. रीतिप्रमाणें टपाल माझें हातीं आलें. मला त्यांत तिचे वडिलांचें पत्र दिसलें; पण तें न फोडतां मीं तसेंच तिजकडे पाठविलें. दुपारीं ती पत्र घेऊन मजकडे आली. मी कांहीं काम करीत होतें.

"काय लिहितात वडील?"

"त्यांची जाण्यास परवानगी आहे."

"मग जा आज दुपारच्या गाडीनें व दोन दिवसांत परत या."

ठरल्याप्रमाणें ती परत आली नाहीं. पण तीनचार दिवसांनीं तिच्या वडिलांचें पत्र मला येऊन थडकलें: "माझ्या मुलीला तुम्हीं मुंबईस जाण्याची परवानगी, मी नको म्हणत असतां कां दिलीत? मुंबईस ती

दुसऱ्याच ठिकाणीं गेली. त्याबद्दल आम्हांस पत्रें आलीं व त्यामुळें तिचे आईस फार दुःख झालें." मींहि उत्तर लिहिलें, "तुमची मुलगी हातांतील पत्रांतला खरा मजकूर सांगेल इतका विश्वास मीं तिचेवर टाकला ही माझी चूक खरी. पण विद्यार्थिनी हा कैदी नव्हे व प्रिन्सिपल हा जेलर नव्हे. तुमची मुलगी इतकी विश्वासास पात्र नसेल तर परत घेऊन जावी; तिची जबाबदारी मी घेऊं इच्छीत नाहीं."

हा विषय अत्यंत मनोरंजक व विचारप्रवर्तक होईल पण दिङ्मात्र दर्शन पुरे.

कितीही नियम असले व कितीही कसोशीनें त्याची अंमलबजावणी करावयाचें म्हटलें तरी त्यांतून पळवाटा निघूं शकतात; व नुसती नियमांचे आधारावर व्यवस्था ठेवूं पाहिली तर सिनेमांतील डाकू व डिटेक्टिव्हची अवस्था व्हावयाची. परस्परशब्दांचा विश्वास जितका जास्त उत्पन्न करतां येईल तितकें हितपरिणामी होतें. कोणतीही व्यक्ति विश्वसनीय नाहीं असें गृहीत धरून सुरवात करावी हें सावधगिरीचे दृष्टीनें उत्तम म्हटलें तरी, माझा स्वभाव मात्र उलट समजण्याचा. प्रत्येक व्यक्ति ही विरुद्ध अनुभव येईपर्यंत विश्वसनीय, शब्दांची किंमत ठेवणारी, असें मी धरून वागलें. थोडासा तोटा सुरवातीस यानें वाटला तरी परिणामीं हितकर होतें असा माझा विश्वास. मुलींच्या बाबतींत या माझ्या धोरणानें किरकोळ दोष घडले असतील; तरी एकंदरींत प्रतिकूल परिणाम झाला असें वाटलें नाहीं. पण माझ्या सहकाऱ्यांशीं वागतांना मात्र या धोरणाचे तोटे मला पुढें अनुभवावे लागले!

## परिशिष्ट १ लें

### [ प्रस्तुत प्रकरणीं निवडक पत्रें ]

पत्र नं. १ बेळगांव, जून १९३७

ती. कमलकाकी यांस,

सप्रेम नमस्कार वि. वि.—आज आपल्याला मुद्दाम पत्र लिहीत आहे.

कारण बेळगांवांत माझ्याबद्दल- अर्थात् नोकरीच्या घडामोडी होऊन- गांवांत सध्यां बोलण्याला तो एक विषय होऊन बसला आहे.

आतां तुम्हीं जशी आमची शाळा काढली तशी ही एक माझी शाळा झाली. अर्थात् तुमचा त्या वेळचा उत्साह मला क्षणोक्षणीं आठवतो. मन तसें करण्यास उड्या मारतें; पण शरीर त्याला मागें ओढतें. गुरुवारीं शाळा निघून आठ दिवस झाले. आज दहा दिवसांत पटावर १७ मुली आहेत. पहिल्या २ दिवस एकच होती. मी आतां शाळेला घेतलेल्या बंगल्यांत मागल्या बाजूस राहतें. बाकी मंडळी मुख्यत्वें गांवांत राहतात. मुली मिळविण्यासाठीं सारखें हिंडावें लागतें. मध्यंतरीं शाळा काढून दोन दिवस होतांच आळीपाळीनें माझ्या पायांना कांहीं तरी लागून जखमा होऊं लागल्यामुळें, आरंभिलेल्या कार्याचे पाय मोडतात कीं काय असें वाटूं लागलें. प्रथम पायावर फरशी पडली. लगेच दोन दिवसांनीं कांच घुसली. नंतर सायकलवरून नव्या शाळेला येण्याच्या धांदलींत पडून गुडघा फुटला. पण इतकें होऊनही शाळेचा पाय रुजला गेला असें आतां वाटत आहे. अजून मिळकत शक्यच नाहीं. उलट श्रम अत्यंत पाहिजेत. पाहूं काय होतें तें. कमलाकाकी, माझें आयुष्य इतरांच्याहून निराळें व अत्यंत struggling आहे असें मला वाटतें व भविष्याबद्दल कसलीच कल्पना अगर मनोरे रचतां येत नाहींत. बनुताईशीं विनाकारण भांडण हेंच या शाळेच्या जन्माचें कारण झालें. ही शाळा कधींच निघणार होती. पण जणूं कांहीं माझीच वाट पाहत होती. सध्यां कांहीं दिवस तरी तुमची सीता, तुमची अत्यंत छोटी प्रतिमा होऊं पाहत आहे. शक्य नाहीं. पण प्रयत्न आहे. कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन। आहेच. क.

तुमची

सौ. **सीता** (उमराणी)

ता. क.—शाळा मीं एकटीनेंच काढली नसून गर्दे आडनांवाचे एक

गृहस्थ जोडीदार आहेत. ते ऑर्गनायझर व हेड्. इतर स्टाफ् ६ मिळून ८ लोक सध्यां काम करीत आहेंत.

* * *

पत्र नं. २

ता. २१-७-४३ च्या पत्रांत सीता लिहिते, "मागें शाळेला इंग्रजी सातव्या इयत्तेला रेकॉग्निशन मिळाल्याचें कळविलेंच आहे. काय करूं! हल्लीं दुःखाप्रमाणें जास्त आनंदही मला सहन होत नाहीं म्हणून तुम्हांस लिहून आनंदाचा भार हलका केला.

शाळेंत सध्यां १७५ मुली असून प्राथमिक शाळेंत १०० मुली आहेत; शाळा ठीक आहे पण प्रकृति काम करूं देत नाहीं. आतांपर्यंत मला कशांतच यश आलें नाहीं तेव्हां शाळेंत तरी काय होतें कोण जाणे! असो. आतां सध्यां तरी शाळा छान चालली आहे.

आ.

**सुमित्रा सोहनी**

(सीता उमराणी)

* * *

पत्र नं. ३

सहस्रबुद्धे यांचा वाडा

जयेंद्रगंज, लष्कर ग्वालेर, २४-९-३५

ती. कमलाकाकींस सा. न. वि. वि.

गॅदरिंगचें आमंत्रण पोंचलें. येतां येणार नाहीं म्हणून भारीच वाईट वाटतें. अन् यंदा तर काय म्हणे 'गरबा डान्स' बसवला आहे. कित्येकदां अशी इच्छा होतें कीं, भुर्कन कॉलेजमध्यें यावें अन् गॅदरिंगचीं कामें करूं लागावींत! किती वेडी इच्छा! कालचक्र नेहमींच फिरणार अन् नव्या वसंताबरोबर वेलींवर नवीं फुलं येणार! पण तीं सारींच आपण खुडूं म्हटलं तर कसं होईल? कांहीं असो; यंदाचें गॅदरिंग

मोठ्या थाटाचें होणार. अन दिवसेंदिवस कॉलेजला नव्या उत्साहाच्या कर्तृत्ववान् विद्यार्थिनी लाभून कॉलेजची अशीच भरभराट होवो याखेरीज आमची दुसरी कोणती इच्छा असणार? मागच्या वर्षी गॅदरिंगच्या स्टेजचा पडदा झाला! यंदा कोणता नवा अलंकार चढवला?

कॉलेजच्या घटनेंत काय काय नवे फरक पडले? नव्या मुली प्रोफेसरांच्या दृष्टीनें कशा काय आहेत? आमच्यापेक्षां जास्त खट्याळ आहेत का?

माझ्यासंबंधीं लिहायचं म्हणजे, पहिला महिना नव्या नवलाचा पण फारच चमत्कारिक गेला. आपलं चिरपरिचित चिमणं जग सोडून अफाट जगांत प्रवेश करतांना पाखरांची जी भेदरलेली— बावरलेली अवस्था होते, तिची पूर्ण कल्पना आली. "दूर जाणें" हे शब्द दुरून साजरे असतात. आतां लीला कडुसकर कंपॅनिअन आली आहे. ८ दिवसांच्या परिचयावरून तरी मुलगी स्वभावानें सरळ-सालस असावीशी वाटते. शिवाय तुमची खाली होतीच. बघूं कसें काय जमतें तें. दुसरें म्हणजे सुदैवानें ती. गोदूताई फारच चांगल्या आहेत. तुमची आठवण करून देतात. त्यामुळें शाळेच्या बाबतींत ठीक चाललें आहे. विषय इतिहास, मराठी, इंग्लिश–७ वी ६ वीचे आहेत त्यामुळें जड जात नाहीं. सध्यां माधव जयंतीची (गेल्या महाराजांची) तयारी जोरांत सुरू आहे. त्यासाठीं भाषणें निबंध, रेसिटेशन वगैरे करून घेणें माझ्याकडे असल्यानें काम बरेंच आहे.

ग्वालेरसंबंधीं गोदूताईंनीं इतकें लिहिलें असेल कीं, मीं न लिहिलेलेंच बरें. राहणी अतिशय स्वस्त. जागा विपुल पण सोई बिलकुल नाहींत. अन् डीसेंट जागा मिळायला फारच त्रास पडतो. सोशल लाइफ जवळ जवळ नाहींच. एक बऱ्यापैकीं लायब्ररी आहे पण प्रेक्षणीय स्थळें खूपच आहेत. भव्य सुंदर इमारती, मोठे रस्ते, सुंदर फुलबागा पाहिल्या कीं राजधानीचें शहर असल्याची साक्ष पटते. अन् सर्वांत मौज म्हणजे इथले गुलाबाचे गेंद पाहिले कीं मात्र ग्वालेर सोडूं नयेसं वाटतं.

खरंच तुम्ही ग्वालेरला यायचा बेत म्हणे नक्की केलांत. खरंच का? माझ्याकडे यायचें कबूल केलें आहेत त्याची आठवण आहे ना!

गॅदरिंगच्या सामानाकरतां वर्गणी म्हणून रु. ५ सोबत धाडीत आहे. गुरुवर्य तात्या, पोंक्षे, आगाशे वगैरे सर्वांस नमस्कार सांगावा.

उत्तराची अपेक्षा केली तर?

आपली

**कमल दिघे**

* * *

पत्र नं. ४

सांगली, ता. २५-२-४१

सा. न. वि. वि.

फार दिवसांनीं उगीचच आपणांस पत्र पाठवणेची लहर आली, त्याचें कारण बऱ्याच अंशीं प्रो. नानासाहेबांची इन्स्पेक्शन आहे म्हणा!

डिसेंबरच्या सुटींत बंगलोरला महिला परिषद् झाली होती, त्या वेळीं येथील प्रतिनिधि म्हणून मी कु. कमलाताई पडळकर यांचेसह गेलें होतें. एके काळीं आपण या कार्यांत फार उत्साहानें भाग घेत होतां. त्यामुळें मला अशी आशा होती कीं तीन वर्षांनंतर आपल्याला बंगलोरला भेटण्यास मिळणार; पण निराशा झाली माझी. येतां येतां आम्ही म्हैसूर व इतर प्रेक्षणीय स्थळें पाहून आलों. येथें आल्यानंतर मात्र आतां जबाबदारीचें ओझें अधिकच जड झालें. सध्यां येथील म. परिषदेच्या आम्ही दोघी सेक्रेटरी आहों. नवीन सेक्रेटरी काय कार्य करून दाखवतात याकडे बऱ्याच 'दुड्ढाचार्यांचे' डोळे लागून राहिले आहेत. त्याच कार्याची रूपरेषा आंखण्याच्या कामांत आम्ही सध्यां गुंतलों आहों. या बाबतींत आपल्या अनुभवाचा सल्ला आपण आम्हांस देऊं शकाल काय?

शाळेचें काम आमच्या दृष्टीनें ठीक चाललें आहे. पुण्याच्या शाळांत

( मुलांत ) दिसणारा नीटनेटकेपणा, तरतरीतपणा, चुणचुणीतपणा व शिस्त येथें फार कमी प्रमाणांत आढळून येते. ती आम्हीं हळूहळू अंमलांत आणीत आहों, थोडें फार यश येत चाललें आहे. शाळेची संमेलनें, सभा, वाढदिवस वगैरे नेहमींप्रमाणें जोरांत चालू आहे. शाळेविषयीं झालेलें इतर मत श्री. नानासाहेब सांगतीलच.

वसतिगृहांत यंदा मुलींची संख्या फक्त बारा आहे. इतर कला-कौशल्याच्या कामांत मुली तरबेज आहेत. पण अभ्यासांत मात्र अगदीं मागासलेल्या. त्यामुळें बोर्डिंगचा शैक्षणिक बौद्धिक निकाल यंदा चांगलासा लागेल असें वाटत नाहीं.

कु. कमळाताईची एस्. टी. सी. परीक्षा मार्च १०, ११ ला पुण्यास आहे. मी पी. ए.चा अभ्यास कांहीं दिवस केला. परंतु शाळा, वसति-गृह, यांतून उरलेल्या वेळांत थोडीफार महिलांची चळवळ वगैरेमुळें वेळ फारच थोडा व तोही अनियमित मिळतो. व पी. ए. चे एकेक 'छन्दोरचना', 'ज्ञानेश्वरी', 'अमृतानुभव' वगैरे ग्रंथ मला तरी येतां जातां अभ्यासण्याइतके सोपे वाटले नाहींत. म्हणून मीं यंदा परीक्षेचा नाद सोडला. पुढील वर्षीं सुरवातीपासून करीन. कधीं तरी का होईना पी. ए. होणार व लेक्चरर होऊन आपल्याच कॉलेजांत निराळ्या नात्यानें पुन्हा येणार......पण घ्याल ना तुम्ही मला! प्रमिला जोशी आपणांस पुण्यांत भेटत असेल कधीं. कुसुम नाफडेचें लग्न झाल्याची वार्ता आहे.

प्रो. पोंक्षे, प्रो. तात्या, नानासाहेब, कर्वे युनिव्हर्सिटीचे किती तरी लाइफ मेंबर्स इकडे येऊन गेले. बेब्या* सुद्धां येऊन गेला. आपण कधीं येणार. आपणांस शक्य असेल व वेळ असेल तेव्हां आपण अवश्य याच. आम्हां दोघींनाही कोणी तरी नातलग भेटल्याइतका आनंद होईल. आपण फक्त मला कळवा. मग मी आपली सर्व व्यवस्था करतें.

---

* प्रो. आठवले यांचा मुलगा अरविंद नारायण आठवले.

प्रो. तात्या, प्रो. लगू, प्रो. पोंक्षे, डॉ. आगाशे, प्रो. केळकर व पिंपळखरे या सर्व गुरुवर्यांस माझा नमस्कार. सौ. सईताईंना पण नमस्कार.

कळावें, ही विज्ञापना.

आपली
**यमू देऊसकर**

* * *

पत्र नं. ९

२५७२ बी. खासबाग
कोल्हापूर २३-११-४१

ती. कमलाकींच्या चरणीं, कृ. सप्रेम सा. न. वि. वि.

कमलाकी !

खरं म्हणजे मीं गेल्या टर्मच्या आरंभींच तुम्हांला पत्र लिहायला हवं होतं. मी रत्नागिरी सोडून इकडे आल्यानंतर तुम्हांला कांहींच कळवलं नाहीं. याचा अर्थ असा नव्हता कीं विस्मरणामुळं हें घडलं. इथं 'गर्ल्स न्यू स्कूल' मध्यें हल्लीं मी हेडमिस्ट्रेसचं काम करतें. प्रथम कांहीं दिवस जबाब्दारी न् कामाचा नवीन व्याप यांतच मी दबून चूर झालें होतें. अगदीं खरंच ! अन् मग कॉलेजचं सारं काम पाहतांना तुम्ही काय करीत असाल असे विचार आरंभीं आरंभीं येत मनांत.

दिवाळीच्या सुटींत मी येथील 'स्टुडंट्स् यूनिअन'मध्यें साक्षरता-प्रसार, व्यायामाचा वर्ग, अभ्यासमंडळ यांत गढलें होतें.

माझी शाळा व स्टाफमधले लोक चांगले आहेत. गेल्या वर्षीं पहिलंच वर्ष असल्यामुळें शिकवितांना इतकासा आत्मविश्वास वाटत नसे. यंदा तो पुष्कळच वाटतो.

स्त्रियांच्या चळवळीकडे हल्लीं माझं मन लागलेलं आहे थोडंसं. त्या दृष्टीनं वाचन, विचार न् निरीक्षण झालं पाहिजे. अखिल भारतीय

महिला परिषदेशीं करवीर भगिनींचे संबंध यावेत असं वाटतं. त्या दृष्टीनं इथल्या भगिनीमंडळांत मी आतां शिरकाव करून घ्यावा म्हणतें.

अ. भा. म. परिषदेचा पत्ता मला हवा आहे. तो तुम्ही पाठवूं शकाल काय ? माझी कल्पना आहे कीं तुम्ही या संस्थेशीं जिव्हाळ्यानं निगडित झालेल्या आहांत. सांगली संस्थान महिलापरिषदेच्या तुम्ही अध्यक्ष होतां अशी माझी कल्पना आहे. खरी का ? मला त्यांचीं publications मागवावयाचीं आहेत, त्यामुळें मला भरपूर माहिती मिळेल नाहीं का ?

तुम्हांला कांहीं माहिती असेल तर कळवालच. आपण कांहीं तरी लोकांच्यासाठीं करावं असं आजकाल मला फार वाटतं. अन् का कोण जाणें, तुमच्यामुळं तुमच्या सहानुभूतीच्या शिंपणानं हें माझं रोपटं वाढीस लागणार असंही वाटतं. बरं, पाहूं या काय काय जमतं तें. नुसत्या वाटण्यावर गोष्टी थोड्याच घडून येतात ?

आपली शिष्या

**गंगू कुलकर्णी**

# परिशिष्ट २ रें

## कविसंमेलन

कोकिळेला कंठ फुटावा तशी कॉलेजच्या दिवसांत विद्यार्थिनींना काव्यस्फूर्ति होत असते. कांहींचा काव्यगुण वाढीला लागून पुढें त्या कवयित्री म्हणून प्रसिद्ध होतात. आमच्या कॉलेजच्या कवयित्री सौ. संजीवनी मराठे, सौ. पद्मा गोळे, सौ. उषा सुलाखे यांची बाहेरच्या जगांतही प्रसिद्धि असून त्यांच्या कवितेचा मासला इतरत्र मिळतो. पण कांहीं काव्य केवळ कॉलेजपुरतें व तत्कालीन महत्त्वाचें असतें. त्यांतील मौज कॉलेजनिवासी मंडळींनाच, तत्कालीन संदर्भ कळल्यानें, कळते. तरी पण पुढील नमुने मनोरंजक होतील.

१९३१ सालीं मी कॉलेजवर जाऊं लागलें तेव्हां मुलींचा कॅरम् हा अत्यंत आवडता खेळ असून त्याबद्दल पुढील गाणें सर्वांचें तोंडांत असे :

## कॅरम्

चला सुटी झाली, आतां कॅरम् आपण खेळायचा ॥ ध्रु० ॥
कमल इंदु चल, चल जातो वेळ।
बोर्ड नाहीं तरी जायाचा ॥ १ ॥
मी स्ट्राइक करीन, आणि घेईन क्वीन।
गेम तुम्हांवरी लावायचा ॥ २ ॥

इत्यादि वर्णन करून कवयित्री पुढें म्हणते,

आतां होईल बेल्, मग कोठूनि खेळ।
तास तात्यांचा नाहीं बुडवायचा ॥ ३ ॥

## आमचे प्राध्यापक

कवयित्री : कु. कृष्णा भांडारकर

जाति—पादाकुलक

श्री. ना. दा. ठा. कॉलेजामधीं।
कन्या जमती ज्ञानार्थी जधीं ॥
एकाग्र मनें विद्या शिकती।
सुरम्य वातावरणीं रमती ॥
शास्त्राध्यापन सुगम करूनी।
शिकविति नाना[1] विविध रितींनीं।
काव्यगायनीं सकलां गुंगवि।
मायदेव[2] मधुवचें सत्कवी ॥
दिव्य मराठी वादविवादें।
तसेंच मानसशास्त्रही मुदें ॥
शिकविति तात्या[3] हृत्कमल स्फुरे।
सुता डुलति तैं भान त्यां नुरे ॥
आँग्लवाङ्मयीं अतुल ज्ञान तें।
लागू[4] देत प्रमुदें सकलांतें ॥

---

१ प्रो. जोशी २ प्रो. नानासाहेब आठवले. ३ प्रो. वा. म. जोशी.
४ प्रो. लागू.

लौकिक ज्यांच्या चित्रकलेचा।
शिकवी पिंपळखरे[1] सुवाचा॥
इतिहास तसा अर्थशास्त्रही।
शिकवी पोंक्षे[2] वादें हसवी॥
समाजशास्त्रा द्रुततरगतिनें।
पहा केळकरे[3] दे शांतमनें॥
शरीर-सृष्टि-प्राणि-शास्त्र ही।
आम्हांला आगाशे[4] शिकवी॥
संस्कृतविदुषी कमलाबाई[5]।
प्रिन्सिपॉल असुनिही निगर्वी॥
काव्य नाटकें वेदहि शिकवी।
मातेसम सकलांस वागवी॥

## Marching Song

कॉलेजपे घंटा बजा है
ए लडकियों जलदी चलो
शुरू होगया लागूका उधर तास
नहि जायेंगे तो होंगे नाराज॥ १॥
मोटरमेंसे पोंक्षे उतरते हैं
अभीतक तुम इधर कैसे
जलदी जाव नहि तो 'Go out' कह देंगे
Essay को न भूलते ले जाव॥ २॥
घरमेंसे कमलाकी निकलती है
रघुवंश लेकर जलदी चलो
Regularly तास को Attend तुम करो
नहि तो होंगी वो बहुत नाराज॥ ३॥
आगाशेकी फटफट सुनाती है
चायको तुम जलदी पियो

---

१ प्रो. पिंपळखरे. २ प्रो. पोंक्षे. ३ प्रो. केळकर. ४ डॉ. आगाशे. ५ प्रि. कमलाबाई देशपांडे.

वरांडेमें होती है बूटकी खटखट
First year गडबड बंद करो ॥ ४ ॥
लागूके साथ केळकर उतर गये
तुम पेंसिलको अपने समाल
Fast lecture follow नही कर सकें
एक दिन कर देंगे कोर्स खलास ॥ ५ ॥
सायन्सकी लडकी मचाव झटपट
नानासाहेब उधर आगये
जोरजोरसे अज्जू बुलाता तुम्हें
तोभी तुम सब कैसी गाफिल ॥ ६ ॥
ड्राइंग मास्टर टांगेसे उतर पडे
वो दरवाजेमें है खडे
उनके बोलिमें है बहुतही मिठास
अब गाना हुवा ये खलास ॥ ७ ॥

**'Comrade'**

## वसतिगृहांतील कन्यका

कवयित्री—( **अनामिका** )

[ **सूचना**ः—ज्या शब्दांवर आंकडे असतील ते शब्द अगदीं खालीं पहावेत. ]

श्री

श्रीगणेशाय नमः । श्रीपाठशालाय नमः । वसतीगृहाय नमः । दोन्ही कर जोडूनी ॥ १ ॥ आतां नमूं वागीश्वरी । गुण वर्णाया दे वैखरी । वाहूं तुझिया चरणांवरी । वसतीगृहाचें वर्णन ॥ २ ॥ यमू बसली लिहावया । शकी बसली सांगावया । म्हणे तारा " मी हिंट्[२] द्यावया । राहे सदा तत्पर " ॥३॥ " आगाशे टिंगल न करतील । पोंक्षे ड्रायव्हर ठेवितील । परि या मुलींचा गोंधळ । कदाकाळीं थांबेना ॥४॥ गायनप्रिय जे असतील ।

१ प्रयोगशाळेंतील शिपाई. २ तरी बरें १२च्या नंतरची वेळ होती !

ते आपुलीं वाद्यें अपसारतील। परि या मुलींचा कोलाहल। ब्रह्मादिकां न आवरे" ॥ ५ ॥ ऐसे बहुत बोलली। हिंट् देउनी बहुत श्रमली। मंचकावरी पहुडली। गरीब बिचारी तारा पैं ॥ ६ ॥ पुरें आतां निरूपण। वसतीगृहाचें वर्णन। ऐका श्रोते सावधान। जन्म-मृत्यु टळतील ॥ ७ ॥ वडाऱ्यांचा छान शेजार। गर्दभांचे कंठस्वर। कालव्याचा ओहळ सुंदर। वामभागीं पसरला ॥ ८ ॥ अशा सुंदर स्थानावर। उभारलें हें भव्य मंदीर। श्री. ना. दा. ठा. कॉ. नांव साचार। त्यांतील कन्यका वर्णूं आतां ॥ ९ ॥ वाजला चाराचा गजर। पळपळ[1] कमळे! सत्वर। नाहींतरी येईल सागर। सत्वर पाणी धरावया ॥ १० ॥ बयो म्हणे "चंद्राबाई। टेनिसाची करा घाई। नाहींतरी लवलाही। पाळी संपोन जाईल" ॥ ११ ॥ लीलेस म्हणे विमला। लवकर पुस्तकें घेवोनि चला। कॉलेजावरी अभ्यासाला। आपण मिळोन जाऊ पैं ॥ १२ ॥ पिंगूताईचें पेटत्व। विमुताईचें ऑल राउंडत्व। तसाच कमळीचा हिशोब। कोण करील नाकबूल ॥ १३ ॥ होता सकाळचा प्रहर। आऊचें गाणें मधुर। आणि तेंही पेटीवर। ऐकुनि मन धालें हो ॥ २४ ॥ रामरंगीं रंगली। गानरूपी कमलिनी। षट्पदावली जेथें पातली। गानरस सेवावया ॥१५॥ देवांनीं मंथिला सागर। पांच रत्नें निघालीं वर। एकाहुनि एक सुंदर। प्रथा त्यांचीं न वर्णवे ॥ १६॥ पहिलें अद्‌भुत विशाल। परम कांतिमान सोज्ज्वल। जरी असे लाल लाल। टमेटो त्यास समजूं नये ॥ १७ ॥ द्वितीय रत्नाच्या कपाळा। कुंकुमाचा भव्य टिळा। जैशी बीजेची इंदुकळा। उत्तरोत्तर वाढतसे ॥ १८ ॥ ताराचें सुस्वर गायन। यमूची 'पोशी'[2] लहान। हासती सर्व थोर सान। विमू मारी फलांगा ॥१९॥ यमू बिचारी सापडली। बोलूं लागल्या[3] सर्वजणी। कांहीं कोणी कांहीं कोणी। दोष लाविती नानापरी ॥ २० ॥ कोणी म्हणे महा अर्क। कोणी म्हणे अति वात्रट। तसेच कोणी बावळट। म्हणोनि डोकें उठविती ॥ २१ ॥

---

१ शेवटीं ती गेली नाहींच म्हणा. २ 'वेणी', व्युत्पत्ति शोधण्याचा प्रयत्न न करणें बरें. ३ काय करते बिचारी!

देऊस्करांचा अभ्यास। मस्तकीं हात ठेवुनी गेले व्यास। तसेच त्यांचे रुपेरी केस। भुरळ पाडिती सर्वां हो॥ २२॥ नांव तारा मालण्डकर। मालवणची पक्की बिलंदर[1]। संस्कृत पंडित रेडकर। आरशी डोळ्यांवरी पैं॥ २३॥ अत्यंत नाजुक सुकुमार। शांता लेले भोळसर। जरी घड्याळ हातांत सुंदर। विचारी, 'किती वाजले हो'॥ २४॥ साने, गुप्ते महा धूर्त। वाटती कीं हे कोल्हे मूर्त। लुच्चेपणाची झाली शर्थ। सदा चाले नेत्रपल्लवी॥ २५॥ वाजले सात घड्याळांत। आगटे आरडे व्हरांड्यांत "इंदू यमू या खोलींत। भारीच बाई चेंगट"॥ २६॥ उमराणीचें वक्तृत्व। काशी जोशींचें नेतृत्व। केळकरांचें लेखचातुर्य। दशदिशीं भरूनि उरेल पैं॥ २७॥ साठे फार धीर गंभीर। परांजपे गाती 'प्रियाकर धर'। यमू जोशींचा हात तोंडावर। नेहमीं असे तत्पर॥ २८॥ सुकुमावती डांभारकर[3]। काव्यें करिती रोज अपार। कॉलेजावरी चक्कर अभ्यासास्तव मारिती॥ २९॥ अभिनयकुशल कमल। उमऱ्यॅणी म्हणे सुशील। जोशी हासे तालावर। सोसटे फोडी किंचाळ्या॥ ३०॥ अंबाडे मास्तर जैनाबादकर। भोळी 'फुलराणी' गोंधळेकर। तैसाच तिचा बारीक स्वर। कोकिळेस लाजवी हो॥ ३१॥

१ अशी कीं कांहीं विचारूं नका. २ नाहींतर काय म्हणावयाचें हो? ३ कृष्णा भांडारकर.

# एरंडवनांतील फलश्रुति : : १६

## पार्श्वभूमि

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।**

एका रुळावरून गाडी दुसऱ्या रुळावर घेणें म्हणजेच सांधेबदल. पण हा सांधेजोड ज्या ठिकाणीं बेमालूम साधला जातो त्या संधिकाळांतून जाणाऱ्या प्रवाशाला संधिकाल मोठा आल्हाददायक वाटतो. रात्रींतून दिवसाकडे व दिवसांतून रात्रीकडे विश्वचक्र नेणारा संधिकाल म्हणजे एक प्रकारचा सांधेबदलच. आगगाडीच्या बाबतींतला सांधेबद्दल दुःखद नसला तरी फारसा सुखद नसतो. समोरची सृष्टिशोभा पाहणाऱ्या माणसाला हलवून त्याच्या एकतानतेचा भंग तो करूं शकतो. स्टेशनजवळ पुष्कळशा रूळजोड्यांना भेटत भेटत जेव्हां का गाडी स्टेशनच्या मुख्य रूळजोडीवर येते तेव्हांचा खडखडाट असाच माणसाला हलवून सोडतो. पण संस्थांतून ज्या वेळीं व्यवस्थापक मंडळांत सांधेबदल होतो त्या वेळचा खटखडाट त्याहून मोठा असून, त्यांत सापडलेल्या माणसांना तो नुसतें हलवून नव्हे तर हादरवून सोडतो.

माझा एरंडवनांतील कालखंड म्हणजे असा संधिकाल म्हणावयास हरकत नाहीं. एकतीस सालीं मी प्राध्यापक म्हणून आलें. त्याचे आधींपासून विद्यापीठाला वार्षिक मदत देणारे ठाकरसींचे विश्वस्त व विद्यापीठाचा कारभार चालविण्याची जबाबदारी पार पाडणारें सिंडिकेट यांच्यामधील मतभेद भरास आले होते. मतभेदांना सुरवात झाली कशी, व त्यापेक्षां सुद्धां परस्पर अविश्वासाच्या छटा कोठें व कशा मिसळत गेल्या, हें सांगणें कठीण आहे. सर विठ्ठलदास यांचा व आण्णांचा प्रथम संबंध आला तो परस्परांच्याबद्दलच्या आदरानें व शेवटपर्यंत तो तसाच टिकला. सर विठ्ठलदास यांनीं देऊं केलेली पंधरा लाखांची देणगी भारतवर्षीय विद्यापीठाचे सेनेट सभेनें ता. १२।१३ जून १९२० रोजीं स्वीकारली व विद्यापीठाचे श्री. नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ असें नामकरण केलें. तेव्हांपासून १२ ऑगस्ट १९२२ रोजीं सर विठ्ठलदास यांचें देहावसान होईपर्यंत ते या विद्यापीठाचे कारभारांत सहानुभूतिपूर्वक लक्ष घालीत होते. आश्रमाच्या कार्यकर्त्यांनीं यापूर्वींच विद्यापीठाचें कार्य एक कॉलेज व कन्याशाळा पुण्यांत सुरू करून चालू केलेलें होतें. त्यांचेकडून त्या दोन्ही संस्था विद्यापीठाकडे घेतल्या, व त्यांचे ठाकरसी कॉलेज व ठाकरसी कन्याशाळा असें नामकरण केलें. आश्रमाच्याच कार्यकर्त्यांना हें काम चांगलें करतां येईल असा विश्वास वाटून, सिंडिकेटनें एक ठराव करून, या दोन्ही संस्था चालविण्याची जबाबदारी आश्रमाकडे दिली.* आणि आपल्या आईच्या

Dated 21st June 1920.

* To

The Secretary,
Hindu Widows' Home Association,
Hingne Budruk, Poona City.

Sir,

I am directed by the Syndicate of the University

नांवानें सुरू होणारें पहिलें कॉलेज तें शक्य तितकें भव्य व सुंदर असावें या इच्छेनें पुण्याच्या कॉलेजची जागा पसंत करणें, इमारतीचा नकाशा करणें, व कॉन्ट्रॅक्टर पसंत करणें हीं सर्व कामें सर विठ्ठलदास यांनीं जातीनें मन घालून केलीं. परंतु इमारत पुरी होऊन कॉलेज त्यांत सुरू झालेलें त्यांनीं पाहावें अशी दैवाची इच्छा नव्हती. कॉलेजच्या इमारतीस सुरवात झाली होती; परंतु कॉलेज त्या इमारतींत सुरू झालेलें पाहण्यास दुर्दैवानें सर विठ्ठलदास हयात राहिले नाहींत. कॉलेजप्रमाणें स्वतःसाठीं बांधीत असलेल्या प्रासादतुल्य पर्णकुटींतही त्यांची तीन दिवसांपेक्षां जास्त वसति झाली नाहीं म्हणतात. सर्व सुखसंपत्ति व कीर्ति इहलोकीं राहून ता. १२ ऑगस्ट १९२२ रोजीं त्यांचें देहावसान झालें.

त्यांच्या मृत्यूनंतर कांहीं वर्षें लेडी प्रेमलीलाबाई ठाकरसी या समाजांत फारशा मिसळत नसत. परंतु हळूहळू त्यांनीं सार्वजनिक

---

to inform you the conditions, subject to which the University-College and the University High School in Poona shall be entrusted to you. The conditions are given below :—

(a) That the Heads of the College and the High School shall be from the Life-workers of the H. W. Home.

(b) That the internal management and discipline of both the institutions shall be entirely left to a Board consisting of the life-workers of the Home working full time in the College, the Superintendent of the High School and three members appointed by the Syndicate.

(c) That the Annual Budget in detail of both the institutions shall be sanctioned by the Syndicate

कामांत लक्ष घालण्याचें ठरविलें. १९२५-२६ त ठाकरसी विश्वस्तांच्या प्रतिनिधि म्हणून सेनेट सभेमध्यें त्या आल्या, व तेव्हांपासून दरवर्षी प्रचंड बहुमतानें सेनेट त्यांना सिंडिकेटमध्यें निवडून देत असे. अशा तऱ्हेनें सुमारें १९२५ सालापासून त्या विद्यापीठाच्या सिंडिकेटमध्यें असून विद्यापीठाच्या कामाची सर्व माहिती करून घेत, व एकंदरींत विद्यापीठाचें, सिंडिकेट व ठाकरसी इस्टेटीचे विश्वस्त यांचें सहकार्य चांगलें चालू होतें.

असें असतां मतभेदांना सुरवात झाली कशी व कोठून? कांहीं लोक याची मीमांसा अशी करतात, कीं १९३० सालीं 'प्रिन्सिपल शहा' सर परशुरामभाऊ कॉलेज सोडून गेले, व त्या ठिकाणीं झालेल्या भांडणांतून दक्षिणी-गुजराथी वाद निघून त्याच्या झळा

---

and the accounts shall be audited by the University Auditors.

(d) That the appointments of the College Staff and the Superintendent of the High School shall be subject to the sanction of the Syndicate, who shall have the right of dispensing with the services of any member of the Staff, including Life-workers of the H. W. Home, who might be on the staff, for any reason they may think fit.

I request you to put these conditions before your Managing Committee and send me at your earliest convenience a copy of their Resolution of accepting these conditions.

I have the honour to be,
Sir,
Your most obdt. servant
Sd.—H. R. Diwekar,
Registrar.

इकडे आल्या. कांहीं सांगतात कीं, तीस-एकतीस सालीं गांधी व केळकर यांचा वाद झाला. केळकरांनीं गांधींची चळवळ उचलून धरली नाहीं त्यामुळें गुजराथी मंडळींचा केळकरांवर व महाराष्ट्रीयांवर राग होऊन, त्याचे पडसाद चोहींकडे उमटूं लागले त्यांतील हा एक पडसाद होय. पण वास्तविक दुसऱ्या एका कॉलेजांतील भांडण त्या संस्थेपासून सर्वस्वी दूर असलेल्या या विद्यापीठांत आलें कसें? तसेंच केळकर व गांधी यांचे राजकारणांतील वाद, राजकारणापासून अलिप्त राहण्यास शपथेनें बांधल्या गेलेल्या, या संस्थांतून उमटले कसे? हें समजणें कठीण वाटतें. कांहींच्या मतें हीं कारणें बरोबर नसून हें केवळ व्यक्तिविषयक भांडण होतें. लेडी ठाकरसी या सिंडिकेटमध्यें; तेव्हां सिंडिकेटमध्यें बहुमतानें झालेले निर्णय कांहीं अंशांनीं त्यांचेच म्हणावयास हरकत नाहीं. पण सिंडिकेटमधील बरेचसे निर्णय त्यांचे व्यक्तिविषयक मताविरुद्ध असावेत. उदाहरणार्थ, मुंबईस कॉलेज काढावें हा बाईंचा आग्रह. त्यासाठीं सिंडिकेटनें एक कमिटी नेमली. कमिटीचा रिपोर्ट प्रतिकूल पडला. या कमिटींत आठवले होते व बाईही होत्या. बाईनीं भिन्नमतपत्रिका लिहिली. आठवले कांहीं गोष्टी पुढें मांडीत. सिंडिकेटला त्या पटून निर्णय घेतला जाई. तेव्हां मतभेद झालाच तर तो सिंडिकेट व विश्वस्त यांचेमधील म्हणावा लागेल. पण जो एकादी गोष्ट जोरानें पुढें मांडतो त्याचें नांव त्याला मिळतें, या न्यायानें आग्रहानें एकादा प्रश्न पुढें मांडणारे आठवले म्हणजे रजिस्ट्रार व विश्वस्तांपैकीं त्यांचा दृष्टिकोन आग्रहानें पुढें मांडणाऱ्या बाई, यामुळें तें सिंडिकेट व ट्रस्टी यांमधील भांडण न समजलें जातां आठवले व बाई यांचेंच भांडण समजलें जाऊं लागलें. आणि या सर्वांत या दोघांच्या वैयक्तिक गुणावगुणांचा व आग्रही स्वभावाचाही अंश मिसळला नसेलच असें नाहीं. तेव्हां बाहेर सुरू असलेल्या राजकारणी वादळाचे वारे या राजकारणापासून अलिप्त असलेल्या संस्थेंतही शिरून तेथें वणवा निर्माण करते झाले अगर तेथेंच व्यक्तिनिष्ठ स्वभावविशेषांचें घर्षण होऊन अगोदरच

पेटलेले स्फुलिंग बाहेरच्या वादळानें फुलले हें नक्की सांगणें— निदान मला* तरी कठीण वाटतें.

पण कसेंही असो, शेवटच्या दोन वर्षांत सिंडिकेटमध्यें दोन भिन्न मतप्रवाह निर्माण झालेले असून,वातावरण कलुषित व परस्पर अविश्वासाचें झालें होतें. त्यांत खटका होण्याचा प्रसंग आठवले व बाई यांचा येई व तें अपरिहार्य होतें. कारण ज्याला रोज काम करावयाचें असतें त्यालाच होय नाहीं म्हणावें लागतें व वाईटपणा येतो. बाईच्या दृष्टीनें-ही तसेंच म्हणतां येईल. ज्याला पैसे पदरचे उचलून द्यावयाचे त्यालाच घासाघीस घालण्याचा प्रसंग. सिंडिकेटच्या बाकीच्या सभासदांनीं, 'असें मत दिलें' किंवा 'तसें मत दिलें' तरी सभा झाली कीं त्यांचें काम संपलें, ठराव अमलांत आणणें रजिस्ट्रारचेंच काम.

रजिस्ट्रार ही एक स्त्री असली तर ही सर्व परिस्थिति बदलेल असें वाटून म्हणा, किंवा उघड 'आठवले नकोत' म्हणण्याऐवजीं 'स्त्रियांना महत्त्वाच्या जागा द्याव्यात' असें म्हणणें जास्त बरें असें वाटून म्हणा, 'स्त्रियांना महत्त्वाच्या जागा द्याव्या' अशी मागणी पुढें येऊं लागली. इरावती या वेळीं नुकतीच जर्मनीहून परत आली होती. तेव्हांचे चॅन्सेलर सर चुनिलाल मेहता यांनीं तिलाच रजिस्ट्रार म्हणून बोलावून यांतून तोड काढण्याचें योजिलें!

सर चुनिलाल यांनीं जर्मनीस जाण्याकरतां कांहीं पैसे (रु.३०००) बिनव्याजीं दिले होते व इरावती जातांना, परत आल्यावर तिनें ठाकरसी युनिव्हर्सिटीमध्यें यावें अशी त्यांची किंवा इतरही कोणाची कल्पना नव्हती. ती परत आल्यानंतर मात्र ती रजिस्ट्रार झाल्यास बाई म्हणून, हिंदु विडोज होमची सभासद नाहीं म्हणून, किंवा जुन्या कारभाराशीं

* कारण या सर्व काळांत मी सातारा, वर्धा व प्राग येथें माझ्या वेगळ्या कामांत गुंतलें होतें; व सिंडिकेटशीं माझा प्रत्यक्ष संबंध येत नव्हता.

कांहीं एक संबंध नसलेली व्यक्ति म्हणून, कदाचित् विकोपास जाऊं पाहणारें भांडण मिटेल अशी चुनिलाल यांना आशा वाटली व त्यांनीं तिला आग्रह केला. त्यांनीं केलेल्या मदतीमुळें व पूर्वीच्या ओळखी-मुळें हा त्यांचा आग्रह मोडणें इरावतीला अशक्य झालें.

आश्रमाच्या कार्यकर्त्यांनीं युनिव्हर्सिटी काढली, लहानाची मोठी केली, रजिस्ट्रार, कॉलेजांतील प्राध्यापक इ० महत्त्वाचीं कामें त्यांनींच केलीं. सेनेटमध्येंही आश्रमाचे बहुतेक आजन्मसेवक या ना त्या मतदारसंघाकडून निवडून गेलेले. अशा स्थितींत युनिव्हर्सिटी ही आश्रमानेंच चालविलेली एक संस्था राहावी व तींतील अधिकाराच्या जागा आपल्यालाच मिळाव्या अशी एक विचारसरणी उघड नसली तरी अप्रत्यक्ष अशी प्रचलित होती. इरावती रजिस्ट्रार झाली तेव्हां पुष्कळ आजन्मसेवकांना ही गोष्ट नापसंत होती व ही नापसंती इरावतीच्या एकदम स्पष्टपणें नजरेसही आली.*

रोजच्या कारभारांत कॉलेजांतील प्राध्यापक असलेले आजन्म-सेवक आण्णा वगैरे मंडळींशीं संबंध येणार, व आपण जोंपर्यंत आश्रमाच्या आजन्मसेवकांपैकीं एक नाहीं तोंपर्यंत एकंदर वातावरण सहानुभूतीचें राहणार नाहीं, अशी तिची खात्री झाली व त्यामुळेंच तिनें आश्रमाचें आजन्मसेवकत्व पत्करण्याचें ठरवलें. त्यामुळें खरोखर तिचा महिना रु. २५ प्रमाणें तोटाच होत होता. कारण आजन्मसेवक त्या वेळीं युनिव्हर्सिटीकडून जास्त पगार घेत तरी त्यापैकीं दरमहा रु. २५ आश्रमाकडे भरीत असत.

असो. इरावतीच्या नेमणुकीनें लेडी ठाकरसी यांची मागणी पुरी

---

*एका आजन्मसेवकानें तर तिला हें स्पष्ट शब्दांत सांगितलें व ती एक अनाहूत अशी पाहुणी असल्याचें दाखवून दिलें. शक्य तर तिनें ह्या वेळीं देखील पाय मागें घेतला असता. पण सर चुनिलालला तिनें वचन दिलें होतें तें मोडणें शक्य नव्हतें.

होणार होती. शिवाय इरावती आण्णांची सून. तेव्हां कर्वे मंडळींना तिजबद्दल वैषम्य वाटणार नाहीं अशी कल्पना. दोन्ही बाजूच्या मंडळींना समाधान वाटेल अशी नेमणूक त्यांनीं आपलेकडून केली. परंतु या योगानें इष्ट फलनिष्पत्ति झाली नाहींच. आश्रमाचे कार्यकर्ते यांनीं इरावतीबाईस आश्रमाचे आजन्मसेवक होण्याबद्दल प्रश्न टाकला व दोघांचा विचारविनिमय होऊन इरावती पुढें रजिस्ट्रारचे जागीं नेमणूक झाल्यानंतर आश्रमाची आजन्मसेविका झाली.

सप्टेंबर १९३० मध्यें दिनकर कर्वे व इरावती बर्लिनला होतीं व त्या वेळीं मला सुटी असल्यामुळें मी प्रागहून बर्लिनला गेलें होतें. एकदां गप्पा मारीत बसलों असतां, हिंदुस्थानांत गेल्यावर काय करावयाचें याच्या गोष्टी निघाल्या. बोलतां बोलतां इरावती म्हणाली, " माझी इच्छा येथें मी शिकलें तें माझें काम पुढें चालू राहावें अशी आहे. पण चुनिलाल म्हणाले तर मला इतर कांहीं काम करावें लागेल. पण कांहीं झालें तरी मी हिंगण्याची आजन्मसेवक होणार नाहीं." आणि तें खरें होतें. 'जी. ए.–बी. ए' वादांत ती बी. ए ची बाजू उचलणारी. तेव्हांपर्यंत इरावतीचा आण्णांच्या संस्थांशीं संबंध आला नव्हता व त्यांतील राजकारण तर तिला माहीत नव्हतेंच. अशा तऱ्हेच्या संस्था म्हणजे मिशनरी पद्धतीच्या असें ती म्हणे व त्यांबद्दल तिला मुळींच सहानुभूति नसे. असें असतां हिंदुस्थानास पोंचल्याचें तिचें जें पत्र आलें तें वाचून मी थक्कच झालें. ती लिहिते—

" आलों २८ तारखेला १२ वाजतां दुपारीं, व चुनिलालचा दुपारीं दोन वाजतां भेटण्याबद्दलचा निरोप! घाईघाईनें घरीं जाऊन जेवून दिनकर व मी लगलीच चुनिलालकडे गेलों. त्यांनीं एकंदर युनिव्हर्सिटीबद्दल बोलणें काढलें व मीं रजिस्ट्रार व्हावें असें सुचविलें. मीं सांगितलें तिथें असलेल्या मंडळीचें मन मोडून रजिस्ट्रार होण्यास मला आवडणार नाहीं. शिवाय तुम्ही त्यांच्या युनिव्हर्सिटींतल्या; Ph. D. होऊन येणार. तेव्हां तुमचा Claim मोठा. आणि रजिस्ट्रारशिप म्हणजे

आठ तास शुद्ध कारकुनी. माझ्या मनांत शक्य असल्यास शिकविण्याचें काम करावें व वेळांत वेळ काढून research करावा. त्यांचें म्हणणें पडलें कीं, युनिव्हर्सिटीची स्थिति वाईट. तेव्हां शक्य तितकें चांगलें काम करणारे लोक त्यांना पाहिजेत व होतां होईल तों बायकांना Executive Posts द्याव्या. शेवटीं ते म्हणाले, नाना आठवल्यांशीं याबद्दल बोलून काय तें ठरव. 'त्याच्या दुसऱ्या दिवशीं पुण्यास आल्यावर नानांशीं सविस्तर बोलणें झालें. लेडी ठाकरसींचा नानांवर फार राग. त्यांच्या मनांत नानांच्या जागीं दुसरा रजिस्ट्रार नेमावयाचा. पुण्याच्या कन्याशाळेंत सध्यां ४०० मुली जातात त्या २०० च घेऊन, पुण्यांतला खर्च कमी करून, मुंबईला गुजराथी मुलींसाठीं एक कॉलेज काढावें. शेवटीं असें ठरलें, कीं मीं चुनिलालच्या म्हणण्याप्रमाणें whole time रजिस्ट्रार व्हावें. एक ॲसिस्टंट रजिस्ट्रार नेमून घेऊन त्यानें सर्व routine work करावें. कारण रजिस्ट्रार ही elective post आहे. त्याशिवाय मीं life-member व्हावें व पांच-सहा तास कॉलेजांत काम करून नंतर रजिस्ट्रार म्हणून Supervision करावी. तूं आल्यावर तुला रजिस्ट्रार व्हावयाची इच्छा असल्यास तूं माझ्या जागीं यावें किंवा कॉलेजची Principal किंवा कन्याशाळेची सुपरिंटेंडेंट, तुझ्या मनास येईल तें करावें. तूं परत येऊन प्रागमध्यें जो उत्साह आहे त्या उत्साहानें परत काम करावें म्हणजे छान होईल. युरोपांत तुझी जी मैत्री मीं संपादन केली ती Co-worker म्हणून टिकावी; व ही जागा मिळावी, ती जागा मिळावी ह्या असूयेनें त्यांत वितुष्ट येऊं नये अशी मनःपूर्वक इच्छा आहे. शिवाय तूं सान्निध्यांत असलीस तर तुझी ध्येयप्रधानता थोडीशी माझ्याही अंगांत येईल."

वरील पत्रांतील life member होण्याच्या वाक्यानें मी तर गोंधळून गेलें. उत्तरांत मीं तिला लिहिलें कीं, " बाई ग ! बाकी सगळें ठीक. पण कांहीं झालें तरी हिंगण्याची आजन्मसेवक होणार नाहीं असें चार महिन्यांपूर्वीं म्हणणारी तूं आज इतकी कशी बदललीस ?

तुला खरोखर त्या कामाबद्दल इतका तिटकारा असेल तर आजन्मसेवक होऊं नको."

याच सुमारास प्रो. केळकरांचें मला पत्र आलें होतें त्यांनाही मीं हेच विचार कळविले होते. त्या पत्राचे उत्तरांत केळकर लिहितात :

ता. २७-२-३१

"सौ. इरावतीबाईच्या बाबतींतील तुमचे विचार माझ्या विचारांशीं बरेच जुळत आहेत हें वाचून बरें वाटलें. महत्त्वाचा मतभेद येवढाच आहे कीं, आपण गृहीत धरतां त्याप्रमाणें आज निरनिराळीं कामें करीत असलेलीं माणसें रजिस्ट्रारच्या जागेपासून कायम दूर राहण्याइतकीं बहोत खूष आहेत काय? आपल्या स्वतःवरून जग पारखण्याची तुमची कल्पना निदान येथें तरी चुकीची ठरेल अशी माझी खात्री आहे. परंतु हा वाद येथेंच मिटता घेणें भाग आहे. कारण रा. आठवले यांनीं ता. १।२।३१ पासून राजिनामा दिला व त्यांचे जागीं सौ. इरावतीबाई रुजूही झाल्या. आश्रमाच्या परवानगीनें व सेनेटच्या निवडणुकीनें त्यांस मिळालेली जागा उभयपक्षांस न कळवतां ते कां सोडतात व कशी सोडतात, व अशा तऱ्हेनें आजपर्यंत आश्रमाचा असलेला युनिव्हर्सिटीशीं निकट संबंध भंगू देतात, याचें कारण सांगू शकाल काय? आतां या गोष्टीमुळें आम्हांस येणारा कमीपणा झाकण्याकरितां सौ. इरावतीबाईंना आम्हीं सेविका म्हणून मान्य करावें हें ओघानेंच आलें. आमची इच्छा असो वा कांहींही असो! इतकें केलें तरी एकदां पडलेला अनिष्ट पायंडा (precedent) नाहींसा होतो असेंही नाहीं. ही जागा निवडणुकीनें भरावयाची; त्यांत सौ. इरावतीबाईंना यश आलें नाहीं तर आश्रमानें त्यांना काय काम द्यावयाचें? कॉलेजांत आणखी नवीन विषय वाढून त्यांच्या कृर्तत्वास वाव मिळेल असें पांच-दहा वर्षें तरी शक्य नाहीं व इतरत्र त्यांस समाधानी वाटेल असें दिसत नाहीं."

मीं पुण्यास आल्यावर इरावतीला विचारलें कीं "तूं आजन्मसेवक होण्याचें कां ठरविलेंस?" तिनें सांगितलें कीं, "आश्रमाची आजन्म-सेविका न होतें तर आप्तस्वकीयांचाच विरोध स्वीकारावा लागता; पाण्यांत राहून माशाशीं वैर करणें बरें नाहीं."

आतांपर्यंत विद्यापीठाशीं संबंध नाहीं, सहानुभूति नाहीं असें मनुष्य एकदम रजिस्ट्रारचे जागीं यावें याबद्दल आश्रमाच्या कार्यकर्त्यांना, तसेंच विद्यापीठाचे पूर्वीपासून काम करीत असलेल्या गृहीतागमांना वैषम्य वाटावें हें अगदीं सहज होतें, व त्यासाठींच तिला ही जागा नको होती. उलट चुनिलालांचा आग्रह त्याच कारणासाठीं होता. आश्रमाचे कार्यकर्ते व इतर गृहीतागमा, त्या आश्रमाच्या सेवक नसल्या तरी दुरून लोकांना, तसेंच सर चुनिलालांनाही, एका पक्षाच्या वाटत, व दोन्ही पक्षांशीं संबंध नसलेली तिऱ्हाईत म्हणून त्यांनीं तिला आग्रह केला. इरावती म्हणत होती, "अहो! मला चेक कसा लिहावा हें सुद्धां अजून माहीत नाहीं; मला कां कामाचा आग्रह?" चुनिलालनीं सांगितलें कीं, सध्यां अडचणीची वेळ आहे. एक वर्षानें परिस्थिति बदलली तर वर्षानें काम सोड हवें तर. शिवाय नाना कॉलेजमध्यें आहेत ते तुला सर्व मदत देतील. आश्रमाच्या इतर कार्यकर्त्यांना कांहीं वाटलें असो– नानांनीं आपली जागा राजिनामा देऊन तिला दिली येवढेंच नव्हे, तर पुढें कामाची माहिती होईपर्यंत मनःपूर्वक मदतही केली. पण पुढच्याच वर्षीं परिस्थिति जास्त बिघडून ग्रँट बंद झाली व तंटा सुरू झाला. या वेळीं 'चुनिलालसाठीं मी आलें. ते जर राजिनामा देतात तर मी तरी कशाला येथें राहून वाईटपणा घेऊं व तुमचें भांडण भांडूं' असें तिलाही म्हणतां आलें असतें. पण अशा संकटकाळीं सोडून जाणें बरें नाहीं म्हणून ती राहिली. कार्यवाहाचें काम धीरानें करून सर्व संकट पार पडेपर्यंत तिनें वाट पाहिली. रजिस्ट्रारची जागा सोडली तरी निदान समाजशास्त्राच्या अध्यापकाची तरी जागा स्वीकारावी असा सिंडिकेटनें तिला आग्रह केला होता, पण तिनें तो मान्य केला

नाहीं. आश्रमाच्या शिडीनें चढून जाऊन शेवटीं तडजोडीचे वेळीं मिळालेली सतरा वर्षांची विद्यापीठाची नोकरी टिकवून, आश्रमाच्या आजन्मसेवकत्वाची शिडी कापून टाकती तर कोण हिला नको म्हणणार होतें? उलट हिंगण्याचें आजन्मसेवकत्व मला आवडत नाहीं असें सांगणें हें विद्यापीठांत टिकण्यास एक जास्तच अनुकूल कारण झालें असतें. परंतु तोही गैरफायदा तिनें घेतला नाहीं व ज्या विद्यापीठाच्या कारणासाठीं तिनें आश्रमाशीं संबंध जोडला तें संपतांच आश्रमाशीं आपण समरस होत नाहीं हें ओळखून दोन्हीकडे राजि-नामा दिला. यांतील प्रांजलपणा व निर्लोभीपणा तरी मान्य केला पाहिजे.*

---

*सांपत्तिक दृष्टीनें इरावतीचा काडीमात्र फायदा झाला नाहीं. प्रथम चुनिलालजवळ निदान रु. १०० पगार मिळेल असें ठरलें असूनही पुढें रु. ७५ वरच तिनें नोकरी केली. विद्यापीठाची ग्रँट बंद झाल्यावर तिनें इतर आजन्मसेवकांप्रमाणें कधीं रु. ७०, कधीं रु. ६० असाही पगार घेऊन काम केलें. कोर्टांतील तडजोडींत युनिव्हर्सिटीचें ऑफिस मुंबईस नेण्याचें ठरल्यावर ताबडतोबच रजिस्ट्रारची जागा सोडण्याची तिनें तयारी दर्शविली, कारण पुण्याचें घर सोडून तेथें राहणें तिला शक्य नव्हतें. पण मुंबईस निदान ६ महिने तरी नीट व्यवस्था लागेपर्यंत तिनें काम चालू ठेवावें असा सिंडिकेटनें आग्रह केल्यामुळें तिनें जून १९३६ अखेर मुंबईस राहून तें काम चालविलें.

नंतर आपल्या शिक्षणास अनुरूप असें काम आश्रमांत नाहीं, केवळ शाळेंत शिक्षिकेचें अगर बोर्डिंग सुपरिंटेंडेंटचें काम करून एक जागा अडवणें तिला प्रशस्त वाटेना; व ज्याकरतां आपण आजन्मसेवकत्व पत्करलें तें रजिस्ट्रारचेंच काम आपण सोडल्यामुळें आजन्मसेवक राहणेंही योग्य नाहीं; असें वाटून तिनें आजन्मसेवकत्वाचा राजिनामा दिला. त्या वेळपर्यंत अनेक आजन्मसेवकांनीं मतभेद विकोपाला जाऊन

पण आजन्मसेवक होण्याची शपथ घेणें व सोडणें हा पोरखेळ झाला. आपणांस पटत नसेल तर आधीं शपथ घेऊं नये व एकदां घेतली तर मोडूं नये, असेंच लोक म्हणणार. तसेंच दुसरा प्रश्न हा कीं, एकादें मनुष्य तुमच्या कार्याशीं एकरूप होत नाहीं हें स्पष्टपणें दिसत असतां व सांगत असतां, आश्रम व विद्यापीठाचें बाह्यतः एकीकरण लोकांना दर्शविण्यासाठीं त्याला आग्रह करणें हा तरी व्यापारच नव्हे का? पोरखेळ नसावा तसा व्यापारही नसावा. शपथेचें महत्त्व कमी होतें, त्याचें गांभीर्य जातें, या दृष्टीनें लोकांनीं या पोरखेळास दोष दिला तरी सर्व अंतःस्थ स्थिति माहिती असणाऱ्या आजन्मसेवकांनीं तरी दोष देऊं नये.

आश्रमाचा कार्यकर्ता नको म्हणून लेडी ठाकरसी या प्रयत्न करीत असतां, शेवटीं नेमली गेलेली स्त्री रजिस्ट्रार ही, मागून आश्रमाची आजन्मसेविका झाली असें दाखवून आश्रमाच्या कार्यकर्त्यांचा थोडा वेळ नैतिक विजय झाला. तरी परस्परमनें जास्तच कलुषित झालीं, व या नेमणुकीमुळें सहकार्य सुगम होईल ही आशा निष्फळ झाली. या सर्वांचा परिणाम म्हणजे २५ फेब्रुवारी १९३२ रोजीं ठाकरसी इस्टेटीच्या

---

भांडून संस्थेंतून निरोप घेतला होता, पण त्या वेळीं कधींही न घेतला गेलेला रु. १००० दंड इरावतीकडून पूर्णतया वसूल केला गेला. फार तर काय ज्या सभेंत इरावतीकडून दंड वसूल करावा असें ठरलें त्याच सभेंत बाळूबाई खरे यांचाही राजिनामा मंजूर झाला पण त्यांचेकडून अगदींच कमी दंड घेण्यांत आला. अशा रीतीनें इरावतीला युनिव्ह-र्सिटी व आश्रम ह्यांच्याशीं संबंध असल्यामुळें सांपत्तिक तर फायदा झाला नाहींच उलट तिच्या विषयाच्या अभ्यासाला लावतां आलीं असतीं अशीं पांच-सहा वर्षें निवळ कचेरीच्या कामांत घालविल्यामुळें पुढें तिला जेथें तेथें "शैक्षणिक कामाचा कांहींच अनुभव नाहीं" असा आक्षेप सहन करावा लागला. आतां तिला तिच्या अनुरूप जागा मिळाली आहे ही त्यांतल्या त्यांत आनंदाची गोष्ट आहे.

ट्रस्टींनीं विद्यापीठाला असलेली आपली वार्षिक साडेबावन हजारांची मदत बंद केली.

"सर विठ्ठलदास ठाकरसींनीं १९२० सालीं देणगी देतांना ज्या अटी घातल्या होत्या त्या इतक्या वर्षांत पुऱ्या झाल्या नाहींत व त्या दृष्टीनें कार्यकर्ते समाधानकारक काम करीत नाहींत, म्हणून आम्ही वार्षिक हते बंद करीत आहोंत" अशी विश्वस्तांची भूमिका होती.

पंधरा लाखांची देणगी देतांना सर विठ्ठलदास यांनीं ता. ११ मे १९२० च्या पत्रांत* लिहिलेलें होतें कीं, ही रक्कम युनिव्हर्सिटीचे सनदशीर मंडळीचे ताब्यांत पुढील अटी पुऱ्या झाल्यावर देण्यांत येईल :

(१) युनिव्हर्सिटीनें सरकारकडून सनद (charter) अगर अशा तऱ्हेची मान्यता मिळवावी कीं त्यामुळें विद्यापीठ चिरस्थायी होऊन लोकांना तें तसें झाल्याचा विश्वास उत्पन्न होईल. किंवा,

(२) या पंधरा लाखांच्या रकमेच्या जोडीला तितकीच पंधरा लाखांची रक्कम विद्यापीठानें लोकांकडून गोळा करावी; कारण त्या योगानें लोकांचा विद्यापीठाच्या स्थैर्याबद्दल विश्वास व्यक्त होईल.

अर्थात् ह्या गोष्टी त्वकर होणें नाहीं. तेव्हां या घडेपर्यंत, योग्य काल पर्यंत (for a reasonable length of time), वाट पाहण्यास आपण तयार आहोंत व तोंपर्यंत मूळ रकमेचा तावा दिला नाहीं तरी त्याचें व्याज आपण दरवर्षी देत राहूं.

याखेरीज (१) तयार होणाऱ्या सेनेटमध्यें सर्व जातींना—विशेषतः दक्षिणी व गुजराथी—योग्य प्रतिनिधित्व मिळेल अशी त्याची घटना व्हावी. (२) वेगवेगळ्या जातींच्या विद्यार्थिनींवर रक्कम योग्य

---

*सर विठ्ठलदास ठाकरसी यांची ता. ११ मे १९२० व १२ जून १९२० रोजीं लिहिलेलीं पत्रें व ता. १९ जून १९२० रोजीं उपसूचनांसह पास झालेला मूळ सेनेटचा ठराव हीं सर्व श्री. ना. दा. ठाकरसी विद्यापीठाचे कॅलेंडर (१९३७) मध्यें छापिलीं आहेत.

प्रमाणांत खर्च व्हावी. (३) शाळांनाही मदत देत जावी कारण शाळांतूनच कॉलेजकडे मुली येणार. (४) विद्यापीठाचें केंद्र पुढें मागें शक्य तर मुंबईस नेण्यांत यावें. कारण दक्षिणी व गुजराथी मंडळीस तें शहर सारखेंच मध्यवर्ती आहे. अशा तऱ्हेच्या कांहीं सूचना योग्य कार्य होण्याच्या दृष्टीनें त्यांनीं केल्या होत्या.

तारीख १२ जून १९२० रोजीं लिहिलेल्या दुसऱ्या पत्रांत सर विठ्ठलदास यांनीं आपल्या पहिल्या पत्रांतील अटींचें जास्त स्पष्टीकरण केलें होतें. या पत्राचा त्याच महिन्यांत १९ जून रोजीं झालेल्या सेनेटमध्यें विचार होऊन कांहीं उपसूचना त्यावर सुचविण्यांत आल्या, व त्या उपसूचनांसह मूळ अटी मान्य करण्यास तयार असल्याचें सेनेटनें एका ठरावानें सांगितलें. सर विठ्ठलदास यांनीं उपसूचनांसह आलेल्या या अटींना मान्यता दिली व शिवाय असेंही ठरवून घेतलें कीं, युनिव्हर्सिटीच्या उत्पन्नांतून मुंबईचें कॉलेज व कन्याशाळा, तसेंच पुण्याचें कॉलेज व कन्याशाळा या चार संस्थांसाठीं प्रथम खर्च करावा व मग उरलेल्या रकमेंत इतर शाळा-कॉलेजांना मदत द्यावी.

ठाकरसी कॉलेजसाठीं येरंडवण्यास जागा खरेदी व इमारत बांधणी या कामांस सर विठ्ठलदास यांनीं सुमारें दोन लाख रुपये बिनव्याजीं दिले. १९२३ सालीं ही इमारत पुरी झाली व हें कर्ज वर्गणी गोळा करून प्रो. कर्वे यांनीं १९२८ सालपर्यंत फेडून टाकलें. ठाकरसी कन्याशाळेलाही अशीच ४० हजारांची देणगी इमारतीसाठीं आफ्रिकेंतील रहिवासी कै. डॉ. लांडे यांचेकडून मिळून १९२६ सालीं कन्याशाळेची इमारत तयार झाली.

१९२४ सालीं मुंबईस ठाकरसी कन्याशाळेची सुरवात होऊन गुजराथी व मराठी अशा दोन्ही शाखा सुरू करण्याचा प्रयत्न झाला. पण पुढें वनिताविश्राम या संस्थेकडे गुजराथी शाखा सोपविण्यांत येऊन मराठी शाखा श्री. सीताबाई अण्णिगेरी यांचे नेतृत्वाखालीं चालू राहिली.

मुंबईस कॉलेज सुरू करावें व विद्यापीठाचें ऑफिस मुंबईस न्यावें

याबद्दल ठाकरसी बाईंचा आग्रह. " मुंबईस कॉलेज सुरू करण्यायेवढी परिस्थिति अजून आली नाहीं. कॉलेज सुरू करावयाचें तर तें भरपूर साधनसामुग्रीसह सुसज्ज असलें तर उपयोग. नुसतें नांवाचें असून काय उपयोग ?" अशी सिंडिकेटची विचारसरणी. शिवाय मुलींची संख्या अजून पुण्याच्याच कॉलेजांत भरपूर नाहीं ती मुंबईस कोठून होणार! मुंबईचें गुजराथी हायस्कूलही अजून जोर धरीत नाहीं. तेव्हां कॉलेजची गुजराथी शाखा सुद्धां काढण्याची वेळ आली नव्हती.

लेडी ठाकरसी यांचा अंतःस्थ विचार असा असावा कीं, मुंबईस कॉलेज न गेल्यानें गुजराथी समाजास या विद्यापीठाचा जितका फायदा व्हावा तितका होत नाहीं. शिवाय पुण्यास विद्यापीठ असल्यानें स्वाभाविकच त्यावर आश्रमाच्या कार्यकर्त्यांचें व दक्षिणी लोकांचें वर्चस्व राहतें. मुंबईस विद्यापीठाचें केंद्र गेल्यास ठाकरसी इस्टेटीच्या ट्रस्टींना त्यांत जास्त लक्ष घालतां येईल व गुजराथी मंडळाचें वर्चस्व राहील. पैसा जर गुजराथी लोकांचा तर त्याचे खर्चावर गुजराथी मंडळाचें लक्ष असावें व त्या पैशाचा गुजराथी मंडळींना शक्य तितका फायदा व्हावासें वाटावें हें ओघानेंच आलें.

उलट " आम्हीं विद्यापीठ सुरू केलें तेव्हां आम्हांसच त्याचे हितसंबंध राखणें बरोबर कळतें; गुजराथी लोकांना त्याचा उपयोग झाला पाहिजे हें योग्यच आहे, परंतु त्यांच्या शाळांची स्थिति अजून इतकी आली नाहीं. उगीच कसें तरी कॉलेज काढून शिक्षणाचा दर्जा कमी करण्यास आम्ही तयार नाहीं." अशी रजिस्ट्रार आदि कार्यकर्त्यांची भूमिका. कार्यकर्ता एक व पैशाची मदत देणारा एक अशा दोन व्यक्ति एकत्र आल्या तरीही, परस्पर मनें जमतील तर आंधळ्या-लंगड्याच्या गोष्टीसारखी कामाची प्रगतीच होईल. पण जर का वितुष्ट येईल तर नवीन काम तर होणारच नाहीं, पण झालेलें कामही दोन्ही पक्षांच्या ओढाताणींत नामशेष होण्याची वेळ येईल. या भांडणांत अशीच स्थिति

झाली व थोडा वेळ सुरू झालेल्या कॉलेजादि संस्था कशा चालतील अशी काळजी पडली.

एकदां भांडण सुरू झाल्यावर त्यांत वेगवेगळे प्रवाह मिसळतातच. गुजराथी-मराठीवाद, पुणें-मुंबईवाद हे त्यांत सामावले; व कांहीं काळ मुख्य कारणें बाजूला राहून या मुद्द्यांवरच चर्चा लोकांत सुरू झाली.

ट्रस्टींचा आक्षेप असा कीं, "हल्लींच्या कार्यकर्त्यांनीं मनापासून काम केलें नाहीं व कै. सर विठ्ठलदास यांच्या अटी पुऱ्या केल्या नाहींत. विद्यापीठाचें ऑफिस मुंबईस नेलें नाहींच. शिवाय सरकारची सनद अगर मान्यता मिळविणें तेंही केलें नाहीं, किंवा त्याचेऐवजीं पंधरा लाखांची वर्गणी गोळा करावयास हवी होती ती केली नाहीं. १९२० पासून १९३२ पर्यंत सुमारें बारा वर्षांचा काळ गेला. हा काळ या कामास भरपूर होता (*reasonable period of time*). फुकटचे पैसे मिळत आहेत ते शक्य तितके आपल्या संस्थांकडे कसे ओढावयाचे तें यांना कळतें. शिवाय आम्ही आश्रयदाते असतां आमच्या सूचना न ऐकतां चढेलपणें वागतात. नोकर ते नोकर व वर शिरजोर." उलट प्रत्यक्ष कार्यकर्त्यांना वाटत असणार, कीं "आम्हीं सुरवातीस येवढा स्वार्थत्याग करून कल्पना काढली, सर विठ्ठलदास यांस आवडली म्हणून त्यांनीं देणगी दिली. शिक्षणकार्य हें आमचें जीवितकार्य आहे यांत तुम्हा व्यापारी ट्रस्टींना काय कळतें?"

सरकारी सनद मिळविण्याच्या आक्षेपाबद्दलचें उत्तर उघड आहे. १९२० सालीं ठाकरसींकडून देणगी आली व अट घातली गेली. पण त्याच वेळीं असहकारितेची चळवळ सुरू झाली. लोकमताची अनुकूलता मिळवावयाची व शिवाय सरकारी सनद मिळवावयाची या दोन गोष्टी त्या वेळीं परस्परविरुद्ध होत्या. तेव्हां सेनेटनेंच विचार करून असें धोरण ठरविले कीं, या कामीं तूर्त गप्प बसावें, व दुसरी पंधरा लाखांची वर्गणी गोळा करण्याकडेच लक्ष द्यावें. कॉलेजची इमारत बांधावयास घेतलेलें सुमारें दोन लाखांचें कर्ज फेडण्यासच

१९२८ साल आलें. आतांपर्यंत ६ लाख गोळा केले असून ग्रँट बंद झाली त्या वेळीं कर्ज फेडून सरासरी २ लाख फंड शिल्लक होता. तेव्हां प्रयत्न केला नाहीं अगर करावयाचें मनांत नाहीं असें कसें म्हणतां येईल? शिवाय पंधरा लाख रुपये शिल्लक पडावयास बारा वर्षांचा काळ फारच अपुरा आहे. पैसे मिळविणें किती कठीण आहे हें लक्षांत घेऊन कै. सर विठ्ठलदासांनींच आपल्या अटींतील 'योग्य काळांत' (within a reasonable period of time) हे शब्द कमी केले होते.

दुसरें— मातृभाषेंतून शिक्षण, ललित कलांचें शिक्षण, इत्यादि नव्या कल्पना लोकांच्या गळीं उतरवावयाच्या आहेत त्याला वेळ लागतो. जे दुर्धारक ते मुळीं स्त्री-शिक्षणच नको म्हणत; पण जे सुधारक लोक स्त्रियांना शिक्षण हवें म्हणणारे आहेत, त्यांना तरी स्त्रियांना वेगळें शिक्षण, मराठींतून शिक्षण असल्या गोष्टी कुठें पटत होत्या? याचें एकच गमक म्हणजे सुधारक, स्त्रीशिक्षणाचे कैवारी, म्हणविणाऱ्यांच्या मुली इकडे आल्या नाहींत. अगोदर सुरू असलेल्या स्त्रीशिक्षणसंस्थांनीं या शिक्षणक्रमास उचलून धरलें नाहीं. फार काय विद्यापीठाचे सेनेट-सिंडिकेटवर असणारी मंडळीसुद्धां आण्णांची युनिव्हर्सिटी म्हणून इतर मदत करतील, वेळस पैसे उचलून देतील, पण आपल्या मुली विद्यापीठांत पाठविणार नाहींत. ही परिस्थिति पूर्वींच होती असें नव्हे तर आजही आहे. आजही सेनेट-सिंडिकेटवर काम करणारीं व विद्यापीठाचीं साहाय्यक माणसें, अनन्यभक्त समजले जाणारे प्राध्यापक, फार काय "पालकांनो, आपल्या मुली या विद्यापीठांत पाठवा" म्हणून जाहीर पत्रकें छापणारे व लोकांना मुक्तकंठानें फुकट उपदेश करणारे प्रचारक या सर्वांच्या नांवांची यादी, आणि त्यांच्यापैकीं कितीजणांनीं आपल्या मुलीबाळी या विद्यापीठाकडे पाठविल्या त्यांची यादी, या समोरासमोर छापून प्रसिद्ध केल्या तर ती तुलना फार उद्बोधक होईल!

आश्रमाच्या चालकांनीं मात्र १९२० सालपासून १९४० सालपर्यंत

वीस वर्षें या विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाचा एकनिष्ठेनें पुरस्कार केला. कार्यकर्त्यांनीं आपल्या मुलीबाळी इकडेच पाठविल्या व शाळेंतही हाच शिक्षणक्रम ठेविला. जोंपर्यंत विद्यापीठाच्या पुण्याच्या संस्था म्हणजे शाळा व कॉलेज् चालविण्याची जबाबदारी त्यांची होती, तोंपर्यंत व पुढेंही पांचसहा वर्षें द्विधावृत्ति* दाखविली नाहीं. लेडी ठाकरसी यांचीही या कामाबद्दल भक्ति निःसंशय दिसते. कारण स्वतःच्या खर्चानें पर्णकुटीवर शाळा चालवून त्या आपल्या आश्रित व आप्त मुली इकडे पाठवीत असतात.

*हल्लीं मात्र आश्रमानें १९४२ सालापासून बॉंबे मॅट्रिकला मुली पाठविण्यास सुरवात केली आहे. आतांपर्यंत वाट पाहिली. या विद्यापीठाची कल्पना लोकप्रिय होत नाहीं, शिवाय ती लोकप्रिय करण्याची आतां आपलेवर जबाबदारीही नाहीं असें म्हणून व्यवहारी दृष्टीनें—ज्या मालाला मागणी त्याचा पुरवठा या न्यायानें—आश्रमानें ठाकरसी विद्यापीठाचे जोडीला मुंबई विद्यापीठाचा अभ्यास सुरू केला. हें करण्यांत आपलेकडील कार्यकारित्व गेलें म्हणून असें केलें असा दोष पदरीं घ्यावा लागतो. या दोषापेक्षांही तत्त्वनिष्ठता राहत नाहीं हा आक्षेप मोठा ठरतो. विद्यापीठाची कल्पना, एका नव्या पण खऱ्या तत्त्वाची सुरवात म्हणून आण्णांनीं काढली व आश्रमानें उचलली. अर्थात् एक प्रकारें आश्रम हा विद्यापीठाचे पितृस्थानीं आहे. ज्यांनीं कल्पना प्रसृत केली त्यांनींच ती सोडूं नये. मुंबई विद्यापीठाचा शिक्षणक्रम सुरू केला नाहीं तर आश्रम बुडतो, अशी स्थिति असती तर एक असो. या प्रश्नाचा विचार आश्रमाच्या आजन्मसेवक-मंडळांत व व्यवस्थापक मंडळांत झाला त्या वेळीं मला विरोध करणें तो मीं केला. पण सर्वांचेंच मत तसें पडलें. उलट विद्यापीठाच्या नव्या राजवटींत आश्रमाचे एकंदर कार्यक्रमाची व विद्यापीठाशीं संबंध आलेल्या त्याच्या प्रत्येक सेवकाची इतकी हेटाळणी—अपमान—झाला आहे कीं, विद्यापीठाचे चालकवर्गांचेही बाजूनें फार थोडें बोलतां येईल.

अशा स्थितींत मुलींची संख्या वाढली नाहीं तरी आश्रमानें मनःपूर्वक काम केलें नाहीं असें म्हणणें बरोबर नाहीं. खरोखर बारापंधरा वर्षांचा काळ या कामास थोडा होता तेव्हां अटी पुऱ्या केल्या नाहींत म्हणून वार्षिक व्याजाचा हप्ता बंद करणें बरोबर नव्हतें. तडजोडीनंतर ज्या तऱ्हेनें त्यांनीं आपलें बहुमत केलें तसें बहुमत करून सर्व गोष्टी मनाप्रमाणें करून घेणें आधींही शक्य होतें. ही व्याजाची मदत तुटलेला मध्यंतरीचा तीन वर्षांचा काळ फार काळजीचा गेला. तडजोड करण्याचे खाजगी प्रयत्नही झाले पण ते सारे अयशस्वी ठरले. एकदां सर विश्वेश्वर अय्या हे लेडी ठाकरसी यांचे घरीं पाहुणे आले होते. त्या वादविवादांत त्यांनीं लक्ष घालून तडजोड होते का तें पाहण्याचें ठरलें. त्यांचेकडे बोलणें करण्यास पर्णकुटीवर आमचे तात्या (केळकर) व धनंजयराव गाडगीळ गेले. पूर्वीपासूनची माहिती असणारे म्हणून नाना आठवले यांनाही त्यांनीं बरोबर नेलें होतें. वर बाईंना निरोप पाठविला. पण आठवले असतील तर त्यांचेबरोबर बैठकींत बाई चर्चा करण्यास तयार नव्हत्या. आठवले यांना खालीं मोटारमध्यें बसवून वर जाणें तात्या व गाडगीळ यांना असमानास्पद वाटलें व म्हणून कांहींही चर्चा न करतां तिघेजण परत आले!

१९३४ सालीं महात्मा गांधी पुण्यास हरिजनकार्यासाठीं आले होते. तारीख १९ ते २७ जूनचे दरम्यान त्यांचा मुक्काम शेठ करसनदास मूळजी धरमसी यांचे बंगल्यावर होता. आठवले यांनीं त्यांना भेटून त्यांनीं याबद्दल मध्यस्थी करावी अशीही खटपट केली. परंतु त्यांनीं या बाबतींत पडण्याचें मान्य केलें नाहीं. इतरही कांहीं प्रयत्न झाले परंतु कोणताच सुफल झाला नाहीं. तेव्हां ट्रस्टींच्यावर फिर्याद करावी असें ठरलें. यापूर्वी वार्षिक हप्ता ट्रस्टींना थोपवून धरण्याचा अधिकार आहे काय? काम समाधानकारक झालें कीं नाहीं हें कोण ठरविणार? इत्यादि गोष्टींचा निकाल करून घेण्यासाठीं ॲडव्होकेट जनरलकडे दावा दाखल करण्यांत आलेला होताच.

कोर्टाच्या कामाच्या नेहमींच्या पद्धतीनें या पहिल्या दाव्याच्या सुनावणीस इतका विलंब लागूं लागला कीं, तीन वर्षांची मुदत संपून उशीर लागल्यानें ( time bar ) काम फुकट जाण्याची वेळ आली. तेव्हां दुसरा दावा सिंडिकेटनें केला व या दुसऱ्या दाव्याची सुनावणी सुरू असतांच, कोर्टांत उभयपक्षांची तडजोड झाली व तडजोडीस कोर्टानें मान्यता दिली. तडजोडीमध्यें मुख्यतः पुढील अटींचा समावेश होता :*

( १ ) ठाकरसी इस्टेटीच्या विश्वस्तांनीं १७ एप्रिल १९४२ चे पूर्वीं दर्शनी पंधरा लाखांच्या साडे तीन दराच्या नोटा विकत घेऊन त्याचा एक वेगळा ट्रस्ट करावा.

( २ ) तो ट्रस्ट होईपर्यंत दरवर्षीं चार हप्त्यांनीं साडे बावन्न हजार रुपये युनिव्हर्सिटीला द्यावे.

( ३ ) अशा तऱ्हेची रक्कम बाजूला काढून ठेवल्यानंतर त्यावरील व्याज युनिव्हर्सिटीस देत राहावें, व ही रक्कम युनिव्हर्सिटीस संपूर्णतया देऊन टाकीपर्यंत हा व्याज देण्याचा क्रम अखंड चालावा ( In perpetuity ).

( ४ ) विश्वस्तांनीं तीन वर्षांचें राहिलेलें व्याज म्हणजे सुमारें एक लक्ष पासष्ट हजार नऊशें सोळा रुपये, शेंकडा चार रुपये व्याजासह, विद्यापीठास द्यावे.

( ५ ) १७ एप्रिल १९३७ पूर्वीं या रकमेचा, म्हणजे तीन वर्षांचे व्याजाचा उपयोग ठाकरसी कॉलेज व विद्यापीठ यांजसाठीं मुंबईस जागा खरेदी करण्याकडे करावा.

( ५ ) ( अ ) १ जानेवारी १९३६ पासून विद्यापीठाचें ऑफिस मुंबईस नेण्यांत यावें.

इत्यादि बऱ्याच अटी होत्या.

पंधरा लाखांची रक्कम ताब्यांत मिळेपर्यंत साडेबावन्न हजार रुपये

---

* श्री. ना. दा. ठाकरसी विद्यापीठ कॅलेंडर– प्रास्ताविक पान XVI.

वार्षिक व्याज अविच्छिन्न मिळणें व मुंबईस विद्यापीठाचें केंद्र नेणें या दोन सर्वांत महत्त्वाच्या अटी होत. त्याखेरीज लेडी ठाकरसी यांना तहाहयात सिंडिकेटवर सभासद म्हणून नेमलें जाणें ही एक अट असून विद्यापीठानें आपल्या चारी संस्थांचीं ( दोन शाळा व दोन कॉलेजें ) आपणच व्यवस्था पाहावी ही एक दुसरी महत्त्वाची अट होय. या अटीमुळें आश्रमाकडे पूर्वी येणारी पुण्याच्या शाळा-कॉलेजांची जबाबदारी आतां सिंडिकेटकडे गेली, व येथूनच पुढच्या मतभेदांचें बीज पेरलें गेलें.

१७ एप्रिल १९३५ रोजीं तडजोड झाल्यानंतर मे महिन्यांत सिंडिकेटच्या सभा पुण्यास कॉलेजमध्यें झाल्या, व पुढची व्यवस्था ठरविली गेली. आतांपर्यंत आश्रमाकडे जबाबदारी असल्यानें आश्रमानें कॉलेजमध्यें काम करण्यास उपयोगी असे आजन्मसेवक करून घेतले होते. पण आतां सिंडिकेटनें आश्रमाशीं करार करून कॉलेजांत व विद्यापीठाचे संस्थांत काम करणाऱ्या लोकांना फक्त कांहीं वर्षें उसने म्हणून नेमून घेतलें. नेमून घेतांना दृष्टि अशी होती कीं आजन्मसेवकांचा नोकरीचा जो वीस वर्षांतील थोडा उरलेला काळ, तो पुरा होतांच त्यानें विद्यापीठाच्या नोकरींतूनच सेवानिवृत्त व्हावें. यायोगानें विद्यापीठाच्या संस्थांतील सातत्य न मोडतां सांधेजोड बेमालूम होईल व आश्रमाशीं पूर्वी केलेली व्यवस्था बदलल्यानें आश्रमांचें नुकसान होणार नाहीं. या योजनेप्रमाणें पुणें कॉलेजमध्यें काम करणारे आजन्मसेवक आम्ही चार. पैकीं आठवले व केळकर हे १९४१ सालीं आणि मी व प्रा. जोशी हे १९४३ मध्यें सेवानिवृत्त व्हावयाचे. याखेरीज पुणें कन्याशाळा, मुंबई कन्याशाळा व विद्यापीठाचे ऑफिस यामध्यें श्री. वारूबाई शेवडे, श्री. सीताबाई अण्णिगेरी, श्री. गंगूबाई तांबोळे, प्रो. मायदेव व सौ. इरावती कर्वे ही मंडळी काम करीत होती त्यांचीही अशाच तऱ्हेची नोकरीची मुदत ठरविली होती. आश्रमाचा सर्वांत शेवटचा सेवक म्हणजे श्री. सीताबाई अण्णिगेरी या १९४४

सालीं सेवानिवृत्त व्हावयाच्या. कॉलेजमध्यें काम करणाऱ्या इतर प्राध्यापकांचीही अशीच कांहीं वर्षांपुरती नेमणूक झाली होती. (उदा. डॉ. आगाशे १९४५ पर्यंत, रा. पोंक्षे १९३९ पर्यंत चार वर्षें, रा. पिंपळखरे एक वर्ष इ. ) म्हणजे १९३५ सालीं तडजोड झाल्यानंतर काम करणारी मंडळी तीच कायम राहणार होती. त्यांपैकीं दरवेळीं कांहीं मंडळी सेवानिवृत्त होत होत १९४३ सालीं म्हणजे तडजोडीनंतर ८ वर्षांनीं पुण्याच्या कॉलेजांतून शेवटचा आजन्मसेवक सेवानिवृत्त व्हावयाचा आणि आश्रम व कॉलेज यांचा संबंध संपावयाचा. कोणताही बदल एकदम होऊं नये, संस्थेंतील व्यवस्थेस शक्य तितका कमीच धक्का बसावा, या दृष्टीने यांत नांव ठेवण्याजोगें नव्हतें. परंतु आतां कॉलेजांतील कार्यकर्ते पूर्वीप्रमाणें आजन्मसेवक या नात्यानें व्यवस्थापकवर्गात मोडत नसून करारी नोकर झाले होते.

विद्यापीठाचें केंद्र मुंबईस नेण्यांत आलें यांत आपला विजय वाटून मुंबईकरांचे व गुजराथी मंडळींचेंही लक्ष आतां विद्यापीठाकडे वळलें. खरोखर यांत विजय वाटण्याचें कारण नव्हतें. कारण मुद्दाम त्यांना कोणी वगळलें नव्हतें. वर्गणीदार होऊन मताचा हक्क मिळविणें, आपणांस इष्ट तो उमेदवार सेनेटमध्यें निवडून आणणें, या तऱ्हेनें आपलें माताधिक्य करणें, व त्या जोरावर आपल्या मताप्रमाणें गोष्टी घडवून आणणें, याला पूर्वींही कोणी बंदी केली नव्हती. हे सनदशीर मार्ग आतांप्रमाणें तेव्हांही मोकळे होतेच. पण पूर्वी त्यांना या विद्यापीठाचें महत्त्व वाटलें नसावें. मुंबईस कॉलेज निघूनही त्यांतील दक्षिणी मुलींच्या संख्येपेक्षां गुजराथी मुलींची संख्या बरींच वर्षें कमीच असे. शिवाय आतांही बहुधा ती जास्त नसावी. असतील तर दोन्ही समान, दोन-चारांचा इकडे तिकडे फरक. मराठी कन्याशाळा— इतर मराठी शाळा असूनही— जोरांत वाढली, पण गुजराथी शाळा सर्व खर्च करण्यास विद्यापीठ तयार असतांही चालूं शकली नाहीं व मग वनिताविश्रामकडे तें काम दिलें. याचें आणखीही एक कारण असूं

शकेल कीं, नोकरी करून पोट भरणाऱ्या दक्षिणी समाजाला परीक्षांचे जें महत्त्व वाटतें तें व्यापार करणाऱ्या गुजराथी समाजाला वाटत नाहीं. मुलांच्या शिक्षणांत हें उघड दिसतें. तेव्हां मुलींच्या शिक्षणांत तें जास्त प्रमाणांत दिसणार यांत आश्चर्य कसलें? पण नावडतीचें मीठ अळणी ना! गुजराथी मुलींना जास्त शिक्षणाचें पण त्यापेक्षांही परीक्षांचें महत्त्व वाटत नसे. हा दोषही जणूं दक्षिणी पुणेरी कार्य-कर्त्यांचा! तेव्हां आतां आपलें वर्चस्व स्थापावयाचें, व इतके दिवस पैसे खाऊन बसलेल्या या लोकांच्या हातांतून ही व्यवस्था काढून घेऊन शक्य तितका आपल्या समाजाचा फायदा झाला पाहिजे, असें त्यांस वाटूं लागलें. मताधिक्य करण्याच्या नेहमींच्या सूक्तासूक्त मार्गांचा अवलंब झाला. वर्गणीदार वाढले अगर वाढविले.

आपल्या मनाप्रमाणें सेनेट व त्या सेनेटमधून आपल्या पसंतीच्या उमेदवारांच्या नांवांच्या याद्या फिरवून आपल्या इच्छेप्रमाणें सिंडिकेट निवडून आणलें गेलें. ज्या सभासदांखेरीज पूर्वी सिंडिकेटची सभा खोळंबत असे ते सभासद आतां सिंडिकेटमध्यें निवडून येणें मुष्किल पडूं लागलें. हें सर्व लेडी ठाकरसी व ठाकरसी विश्वस्त यांच्या मना-प्रमाणें झालें. तरी त्याबद्दल कोणी विषाद मानण्याचें कारण नव्हतें. निवडून आलेले सभासद जोंवर विद्यापीठाची प्रगति करण्यासाठींच झटणार तोंवर त्यांत वाईट काय? विजयाचा व सत्ता चालविण्याचा हा आनंद कांहीं दिवसांनीं ओसरल्यावर कार्याच्या उपयुक्ततेकडे साहजिकच त्यांचें लक्ष लागणार.

परंतु या आनंदांत पूर्वीच्या लोकांबद्दल अकारण तुच्छता मिसळूं लागली. एक प्रकारचा अविश्वास निर्माण झाला. कोणतीही गोष्ट योग्यायोग्य पाहण्यापेक्षां 'ती सांगतो आहे कोण' यावर निकाल* अवलंबूं लागला.

* १९४० सालीं सौ. दीक्षित यांची मराठीच्या प्राध्यापक म्हणून

नोकर म्हटला तरी त्यावरही किमान विश्वास टाकावा लागतो. पण येथील प्रवृत्ति अशी कीं, आश्रमाचा आजन्मसेवक सांगतो आहे ना! मग हटकून त्याच्या सांगण्याविरुद्ध निर्णय व्हावयाचा. नुसता विद्यापीठाचा नोकर असेल तर तो थोडासा विश्वासार्ह. आणि "एक वेळ आश्रमाचा सेवक होतों खरा; पण आतां मात्र माझी अनन्य-भक्ति विद्यापीठाकडेच आहे" असें सांगेल तो त्याहून विश्वासार्ह.

'काप गेले पण भोकें राहिलीं' म्हणतात ना! तशी गत झाली.

---

नेमणूक करावी अशी पुण्याच्या बोर्डानें शिफारस केली होती. बोर्डाचे चेअरमन सिंडिकेटचे सभेस गैरहजर होते. तेव्हां बोर्डाचा दृष्टिकोन सेक्रेटरी या नात्यानें समजावून सांगणें मजकडे आलें.

"इतके पुष्कळ अर्ज आहेत. गुणांचे दृष्टीनें कांहीं पुरुषांचेही अर्ज तितकेच चांगले आहेत असें असतां या बाईंची शिफारस प्रथम कां?" प्रश्न.

"स्त्रियांची नेमणूक शक्य तोंवर करावयाची असें बोर्डाचें व सिंडिकेटचें धोरण आहे म्हणून." उत्तर.

सर्वांना हें पटलें. आणखी एक दोन स्त्रियांचे अर्ज होते. "मग या दुसऱ्या दोन अर्जदारांपेक्षां हाच कां पसंत केला?"

दुसऱ्या दोन अर्जदारांपेक्षां "यांची त्या विषयांतील पारंगतता बोर्डाचे सभासदांना पटली म्हणून. त्या मराठींतील एक नामांकित लेखिका आहेत." पण सभेच्या चेअरमनांना हें उत्तर पटेना. इतक्यांत प्रो. गजेंद्रगडकर यांनीं हेंच सांगितलें कीं, 'या बाई मराठी विषयांत पारंगत नामांकित लेखक आहेत.' आणि त्यांची नेमणूक झाली. नुसतें मी सांगून किंवा बोर्ड म्हणतें असें सांगून खात्री पटत नव्हती. त्याला 'गजेंद्रगडकर' लागले. माझ्यापेक्षां गजेंद्रगडकरांनीं कांहीं वेगळीं कारणें दिलीं असतीं तर एक असो. व्यक्तिविषयक विश्वास अविश्वास तो हा असा.

भांडण संपलें. तडजोड झाली. पुन्हा दोन्ही पक्षांची मंडळी एकत्र येऊन काम करूं लागली. पण मागच्या वादांतील शब्दांच्या जखमा शिल्लक होत्या. त्यांना धक्का बसल्यास त्या जागृत होत व स्वार्थसाधु हितशत्रु तेवढा धक्का बसविण्याची खबरदारी घेत.

पुण्याच्या बाबतींत हें विशेषच होऊं लागलें. कारण पूर्वींचे सर्व कार्यकर्ते पुण्याचेच ना! आणि याच वेळीं जर कांहीं पुण्याचीच अगदीं त्यांच्यापैकींच मंडळी येऊन सांगूं लागली कीं, "असा त्रास ही पुण्याची मंडळी देतात तर त्यावर विश्वास ठेवण्यास कां बरें वाटूं नये? पुण्याच्याच मंडळीच्या तक्रारीमुळें आम्हांस यांत लक्ष घालावें लागतें असें दिसून पुन्हा कार्यकर्त्यांनीं उलट कांहीं तक्रार केल्यास "काय बोवा तुम्ही पुण्याचे लोक व तुमचीं पुण्याचीं भांडणें!" असाही तिऱ्हाईतपणाचा आव आणून उत्तर देतां येतें. जणूं कांहीं मुंबईस व इतरत्र पूर्वी कधीं भांडणें नव्हतीं व आजही नाहींत. शिवाय हीं पुण्याचीं भांडणें निर्माण होण्यास आपणां मुंबईच्या लोकांचा म्हणजे सिंडिकेटच्या दृष्टीचा एकांगीपणा कारण आहे हें कोणी लक्षांतच घेत नसे. न्यायदेवता आंधळी असते असा लोकसंकेत आहे. त्याप्रमाणें खरोखर ती आंधळी असती तरी पुरवती; पण एकाक्ष नसती तर जास्त बरें होतें.

एकच काय असे अनेक अनुभव आले. प्रो. आठवले यांचें सायन्स खातें. तेच कॉलेजचे प्रिन्सिपल व विद्यापीठाचे रजिस्ट्रार. त्यांनीं कॉलेज सुरू झाल्यापासून सायन्स खात्यांत वीस वर्षे काय खर्च केला हें त्यांना पूर्वी विचारणार कोण? शिवाय या खात्याला खर्च फार. लायब्ररीचा उपयोग सर्वांना होतो तर सायन्सचा कांहीं थोडया मुलींना. खर्च मात्र लायब्ररी व लॅबोरेटरीवर सारखाच. तेव्हां सायन्स हा विषयच कमी करावा असें कांहींजणांना वाटूं लागलें. नवीन सुधारलेल्या अभ्यासक्रमांत सायन्स विषय कमी होणार असें ऐकिवांत आहे. सायन्स ऐच्छिक घेणाऱ्या मुली थोडया. कारण प्रयोगाचा

(practical) ताण त्यांना जास्त वाटे. शिवाय १९३६ सालाचे पुढें या मुलींची संख्या जास्तच रोडावली. एन्ट्रन्सला दोन ऐच्छिक विषय पूर्वीं असत. त्यामुळें पूर्वीं मुली एन्ट्रन्सला सायन्स व गणित घेत. १९३७ सालचे योजनेप्रमाणेंच एका ऐच्छिक विषयाचे दोन पेपर झाले तेव्हां सायन्स घेणाऱ्या मुलींना दोन्ही पेपर सायन्सचे घ्यावे लागून गणिताचा भाग फारच थोडा तयार होई. त्यामुळें पुढें कॉलेजांत सायन्स विषय जरूर त्या गणिताचे अभावीं पूर्वीपेक्षांही कठीण वाटूं लागला.

सायन्सकडे मुली १९३६ चे पुढें रोडावण्याचीं खरीं कारणें वरील. पण सर्वांना असें वाटूं लागलें कीं, विषयाला खर्च फार व उपयोग थोडा, तेव्हां अजीबात ऐच्छिक सायन्स बंद कां करूं नये? तात्त्विक वाद. यांत खरोखर कोणाचें कसेंही मत पडलें तरी बरेंवाईट वाटण्याचें कारण नसावें. सिंडिकेटचे बहुतेक सभासद सायन्स नको म्हणणारे. गाडगीळ सायन्स नको म्हणणारे, मी सायन्स हवें म्हणणारी. आठवल्यांच्यासाठीं सायन्स हवें म्हणण्यास आठवले कांहीं विद्यापीठांत जन्मभर नोकर राहणार नव्हते. सौ. गंगूबाई पटवर्धन या नुकत्याच पुण्याच्या कन्याशाळेंत सुपरिंटेन्डेन्ट म्हणून आल्या होत्या. योग असा कीं, ज्या वर्षीं सायन्स हा ऐच्छिक विषय कॉलेजमध्यें बंद करावा असें ठरलें, त्याच वर्षीं कन्याशाळेंत ऐच्छिक सायन्स घेणाऱ्या बऱ्याच मुली असून त्यांपैकीं चारपांच कॉलेजांत सायन्स घेऊं इच्छीत होत्या. कॉलेजमधून सायन्स बंद करावयाचें तर शाळांमधून दोन वर्षें आधीं त्याची सूचना हवी होती. ती दिली गेली असती म्हणजे त्यामुळें मुलींनीं पुढचा विचार करून सायन्स हवें तर घेतलें असतें. या मुलींचें नुकसान होईल या दृष्टीनें गंगूबाईंनीं खटपट केली तेव्हां त्यांच्या कांहीं हितचिंतकांनीं त्यांना जाऊन सल्ला दिला, "हें पहा गंगूबाई! तुमच्याबद्दल सिंडिकेटचें व वरिष्ठांचें मत चांगलें आहे; तेव्हां तुम्ही या सायन्सच्या वादांत कां पडतां व सायन्सची बाजू उचलणाऱ्या आश्रमाच्या कार्यकर्त्यांशीं आपला संबंध कां जोडतां?"

"सायन्स विषय असावा असें मला वाटतें व म्हणून मुलींसाठीं

मी खटपट करतें. सायन्स विषय ठेवा म्हणण्याचा व वरिष्ठांचें मत वाईट होण्याचा संबंध काय?" गंगूबाई म्हणाल्या. पुढच्या वर्षी विद्यापीठाचे कारकुनानें दिलेल्या आंकड्यामुळें जेव्हां चौकशी कमिटी नेमली तेव्हां माझ्या कांहीं हितचिंतक म्हणविणारांनीं मला असाच सल्ला दिला होता; "तुम्ही कशाला सारें तपशील बसतां. माझ्या कारकीर्दीतील माहिती तेवढी मी सांगू शकेन म्हणा व मोकळ्या व्हा."

पण सायन्स या विषयापेक्षां त्या विषयाच्या प्रोफेसरवरूनच त्याची उपयुक्तता ठरत होती.

१९३९-४० सालीं सायन्सला मुलगी नव्हती तेव्हां १९४० जूनपासून सायन्स ऐच्छिकला नवीन मुली घेऊं नयेत व लॅबोरेटरी बंद ठेवावी असा ठराव झाला. प्रो. आठवले यांनाही सहा महिन्यांची नोटीस देऊन १९४१ ऐवजीं १९४० मध्येंच जावयास सांगितलें. पण पुन्हा सेनेट सभेचे वेळीं या प्रश्नाचा फेरविचार होऊन आश्रमाशीं केलेला करार वर्षासाठीं मोडणें नैतिक दृष्ट्या बरें नाहीं; तेव्हां आठवले यांना कांहीं तरी तात्पुरतें काम द्यावें व मूळ करार संपेपर्यंत म्हणजे १९४१ जूनपर्यंत ठेवावें असें ठरलें.

याच वर्षांचा उपयोग लॅबोरेटरी, लायब्ररी व डेडस्टॉक फर्निचर या तीन खात्यासंबंधींची जिज्ञासा पूर्ण करण्यांत करून घेण्यांत आला. कॉलेजच्या वीस वर्षांपैकीं पहिली अकरा वर्षांची कारकीर्द आठवल्यांची. तेव्हां सर्वच खात्यांची जबाबदारी त्यांच्यावर व पुढच्या नऊ वर्षांत लॅबोरेटरी खातें त्यांचेंच. सायन्सकडे मुली थोड्या व खर्चाचा आंकडा नेहमीं मोठा तेव्हां असें कां हें कळण्याची खुमखुम होतीच व ते आहेत तोंवरच याचा उलगडा झाला तर बरें असें वाटणें सहजच आलें. रजिस्ट्रारनें आपला हेडक्लार्क पाठवून तीनही खात्यांची तपासणी ११ नोव्हेंबर १९४० रोजीं करविली व तेथपासून एका विनोदप्रसंगास सुरवात झाली.

---

# एरंडवनांतील फलश्रुति : : १७

## फलश्रुति

आमचे शिनुमामा लहानपणीं बिरबल-बादशहाच्या गोष्टी सांगत असत आम्हांला, त्याची आठवण होते आतां. बिरबल एकदां बादशहाकडे गेला आणि म्हणाला, "हुजूर, मी तीर्थयात्रेस जाऊन आलों. वाराणशी क्षेत्र पाहिलें. वाराणशीचा राज्यकारभारही पाहिला. फार चोख व्यवस्था!"

"असें!" बादशाहा आनंदून म्हणाले, "मग आपल्या राज्यांत तीच शिस्त लावून द्या तर," आणि बिरबलच्या देखरेखीखालीं नवी व्यवस्था सुरू झाली. आधीं याद्या करा. आपल्याजवळ काय आहे, तें केव्हां घेतलें व खर्च होऊन केव्हां संपलें, सगळें कसें यादी पाहिल्याबरोबर एकदम कळलें पाहिजे. जुन्या याद्या निघून तपासणी सुरू झाली. पण मुख्य राजवाड्याच्या मुदपाकखान्यांतच अंदाधुंदी दिसून आली. आजपर्यंत बारा वर्षांत धान्य विकत घेतलें बारा हजारांचें पण शिल्लक पहावें तों हजार-पांचशेंचें सुद्धां नाहीं. रोज भाजीभाला येतो वीस-पंचवीस रुपयांचा; पण बारा वर्षांत शिल्लक शून्य. दररोज

दहा जुड्या कोथिंबीर येतें पण आज शिल्लक एक काडी नाहीं. शिवाय याद्यांत लिहिलेली नाहीं. पंचवीस हजार रुपये खर्चून दोन विहिरी खणल्या त्या विहिरींची नोंद राजवाड्याच्या सामानांत नाहीं. एकंदरींत मुदपाकखान्यांत गोंधळ. धातूच्या भांड्याकुंड्यांखेरीज कांहीं शिल्लक नाहीं. ही अंदाधुंदी बादशहास दाखवितांच बादशहा रागावले व राजवाड्यांतील सर्व नोकरांस काढून टाकलें. इतक्यांत नवीन पद्धतीनें तयार झालेल्या याद्या आल्या. सामानाच्या याद्यांनाच पुरवणी म्हणून नोकरांच्या याद्या जोडल्या होत्या. "हें पहा बिरबल," बादशहा याद्या पाहून म्हणाले, "या नोकरांच्या नांवामागें सुरवातीची तारीख आहेच; त्यांचे नांवापुढें 'खर्ची पडले' असा शेरा देऊन आजची तारीख लिहा. आपलें काम कसें चोख पाहिजे!"

आमच्या युनिव्हर्सिटीच्या सामानसुमानाच्या मोजदाद करण्याच्या पद्धतीची आठवण झाली म्हणजे आज वरील गोष्ट आठवून हसूं येतें. पण प्रत्यक्ष अनुभव घेतांना आठवणही झाली नाहीं व हसूं तर आलें नाहींच नाहीं! या वर्षांतील तो काळ अत्यंत तापदायक गेला. बरें, या अकारण झालेल्या त्रासाबद्दल जाब कुणाला विचारावयाचा. संस्थेची पत केव्हांही व्यक्तीपेक्षां मोठी. व्यक्तीला झालेल्या त्रासाबद्दल संस्थेनें दखल दाखविली असें होऊन वळचणीचें पाणी आढ्याला कधीं गेलें आहे का?

विद्यापीठाच्या सर्व शाळा-कॉलेजांत एकच रजिस्टरें ठेवण्याची पद्धति असावी या हेतूनें म्हणा, सायन्स खातें बंद होणार त्याच्या वीस वर्षांत झालेल्या जमाखर्चाची माहिती व्हावी म्हणून म्हणा, किंवा कांहीं कारणानें सायन्स खात्याच्या पूर्वीच्या व्यवस्थेबद्दल मनांत संशय उत्पन्न झाल्यानें म्हणा, सर्व संस्थांच्या सामानसुमानाच्या याद्या (रजिस्टरें) तपासाव्या असें ठरलें.

सिंडिकेटनें ठराव लिहितांना मात्र असा लिहिला होता:—आपल्या संस्थांतून हिशेब, रजिस्टरें व सर्व कागदपत्र हे ठेवण्याची पद्धति

व्यवस्थित आहे कीं नाहीं हें पाहणें, हें विद्यापाठाच्या मुख्य कचेरीचें काम आहे. या कामासाठीं निदान दोन वर्षांतून एकदां कचेरीनें आपला अनुभवी मनुष्य पाठवावा इ.

या सिंडिकेटच्या ठरावानुसार १९३९ सालीं कचेरीचा कारकून येऊन एकदां सर्व याद्या, हिशेबाच्या वह्या व व्हाउचरें पाहून गेला परंतु प्रत्यक्ष सामानमोजणी व्हावयाची होती. ती सामानमोजणी करण्यासाठीं ११ नोव्हेंबर १९४० रोजीं पुन्हा कारकूनसाहेब पुण्यास आले व एक आठवडा या कामीं त्यांनीं खर्च केला. त्याच दिवशीं कॉलेज सुरू झालें होतें व मला त्यांचा निरोप कळला होता कीं मी तीन वाजतां कॉलेजवर येतों. कॉलेजचा पहिला दिवसच असल्यानें 'कॉमनरूम' सभा इ. सर्व कामें लवकर संपलीं होतीं, व्याख्यानेंही नव्हतीं, पण कारकून येणार म्हणून मी थांबलें होतें. पांच वाजेपर्यंत मीं वाट पाहिली व शेवटीं ते आले नाहींत म्हणून बाहेर गेलें. दुसऱ्या दिवशीं कॉलेजच्या कारकुनानें मला सांगितलें की, तपासनीस फार उशीरा आले व म्हणाले कीं, मी आतां उद्यांच येईन.*

दुसऱ्या दिवशीं म्हणजे १२ तारखेस तपासनीस दुपारीं दीड वाजतां आले. आज मात्र मी कामाच्या गर्दींत होतें कारण तास सुरू झाले असून पांच वाजतां कॉलेजच्या बोर्डाची सभा होती त्याच्या तयारींत मी होतें. मधले सुटींत चहाचे वेळीं त्यांना जरूर ती माहिती मीं सांगितली व घाईघाईनें उठून बोर्डापुढें ठेवावयाचें पत्र लिहिलें. "प्रिन्सिपलशिप मला प्रकृतीमुळें झेपत नाहीं तरी पुढील वर्षापासून मला फक्त संस्कृतच्या प्राध्यापकाचें कामच पुरें, प्रिन्सिपलच्या कामाची सोय

* पुढें पांचसहा दिवसांनीं मला कळलें कीं कारकूनसाहेब साडेतीन चारच्या आंतच आले होते; पण ऑफिसच्या दारांतच त्याना दोन मोटरवाले प्राध्यापक भेटले व त्यांच्या मोटारींत बसून हितगुज होतांना उशीर झाला व त्यामुळें प्रिन्सिपलला भेटण्यास वेळ उरला नाहीं.

वेगळी करावी इ." हेंच पत्र लिहून मीं या सभेपुढें ठेवलें. कॉलेजचा कारकून व मी दोघें या सभेकडे गुंतलों असल्यानें तो दिवस त्यांनीं पुन्हा व्हाउचरें तपासण्यांत खर्च केला. पुढचे दिवशीं सामान प्रत्यक्ष पाहण्याची वेळ आली. तेव्हां मीं त्यांना सांगितलें कीं, मीं नानांना सांगून ठेवलें आहे. तुम्हांस जेव्हां लॅबोरेटरी तपासावयाची असेल तेव्हां कळवा म्हणजे नाना येऊन तुम्हांस हवी ती माहिती देतील." त्या दिवशीं त्यांनीं मला होकार दिला. पण दुसरे दिवशीं म्हणाले, "मला नानांना बोलावून माहिती विचारण्याचा संकोच वाटतो. पुन्हा सामानांत कांहीं चुकलें तर मग जबाबदारी कोणावर येणार? इ०" नानांना तपासनिसाप्रमाणें प्रश्न विचारण्याचा संकोच वाटतो असें त्यांनीं म्हणणें मला सहज वाटलें. कारण रजिस्ट्रार असतांना नानांनींच त्यांना नोकरीवर लावून घेतलें होतें व त्यांना ऑफिसच्या कामाची शिकवण दिली होती. आठवड्याच्या उरल्या दिवसांत लॅबोरेटरी, डेड स्टॉक, फर्निचर वगैरे सर्व सामान कारकून व गडी यांचे मदतीनें तपासून १७-१८ तारखेस तपासनीस कारकूनसाहेब परत मुंबईस गेले.

तपासणी झाली; आतां रीतीप्रमाणें रजिस्ट्रारचें पत्र येईल व याद्या ठेवण्याच्या पद्धतींत काय बदल करावा याबद्दल सूचना येतील अशा अपेक्षेंत मी होतें तों एक दिवशीं सिंडिकेटच्या सभेची नोटीस व त्याला जोडलेली सभेच्या कामकाजाची यादी हातांत पडली. कामकाजाच्या यादींत एक काम होतें "तपासनिसाचे अहवालाचा विचार." कोणताही अहवाल वरिष्ठ कौन्सिलपुढें विचारास जाण्यापूर्वी प्रथम त्या खात्याचा जबाबदार प्रोफेसर व प्रिन्सिपल यांचें त्याबद्दल म्हणणें ऐकून घेणें व त्यांच्या स्पष्टीकरणासह तो पुढें मांडणें जरूर असतें. पण या वेळीं तसें केलें नव्हतें. अहवाल मीं अजून वाचलेला नाहीं तेव्हां कांहीं माहिती पुरविण्याची वेळ आली तर एकदम काय सांगणार? म्हणून रजिस्ट्रारला पत्र लिहून अहवालाची प्रत ताबडतोब मीं मागितली. पण अहवाल अजून तयार होत आहे असें उत्तर आलें

व पुढें सभेचे आधीं एकदोन दिवस अहवाल माझे हातांत पडला. अहवालांत कारकुनानें लिहिलें होतें कीं, "१९२० सालापासून हिशेबाच्या वह्या होत्या, कांहीं व्हाउचरांना बिलें जोडलेलीं नव्हतीं, सामानाच्या याद्या नवीनच तयार केल्या होत्या इ०" पुढें डेड स्टॉक, फर्निचर वगैरे सामान यादीप्रमाणें आहे असें लिहिलें होतें. पण हें सर्व लिखाण गौण होतें. तपासणीचा मुख्य रोख लॅबोरेटरीवर होता. त्याबद्दल कारकुनानें लिहिलें होतें* कीं, लॅबोरेटरी मोडून गुंडाळून ठेवली आहे. सिंडिकेटनें सायन्स विषय बंद केला तेव्हां ठरलें होतें कीं सायन्स बंद झालें तरी लॅबोरेटरी माल आहे तशीच ठेवावी; अशासाठीं कीं, कोणी प्रेक्षक आला तर त्याला, त्याचप्रमाणें सरकारी इन्स्पेक्शन होईल त्या वेळीं त्या इन्स्पेक्टरांनाही ती एकदम दाखवितां यावी. प्रिन्सिपलला विचारतां त्यांनीं सांगितलें कीं, असा या ठरावाचा अर्थ मी समजत नाहीं. आम्हांस योग्य सूचना द्या म्हणजे इन्स्पेक्शनसाठीं लॅबोरेटरी तयार ठेवतां येईल. आज वर्गांनाच जागा पुरत नसतां केवळ एक सबंध हॉल लॅबोरेटरीसाठीं मला गुंतवून ठेवतां येत नाहीं. इ."

यानंतर डेड स्टॉक व लॅबोरेटरी खात्याचे वीस वर्षांचे आंकडे दिले असून प्रत्येक वर्षीं खर्च केलेल्या सामानापैकीं किती किंमतीचा माल आहे व किती किंमतीचा गेला अगर हरवला हें दिलें होतें.

---

* "As regards the Laboratory, I have to mention that it is disorganized, disconnected and dis-mantled. When the question of discontinuing the subject of Physical Science at the Poona College was discussed in the meeting of the Syndicate, the Principal was given to understand to keep the laboratory in proper order etc. etc."

(From the Report of the Head cleak of the University.)

१९२०-१९३९ पर्यंतचा लॅबोरेटरी खात्याचा खर्च :

| एकंदर खर्च. (Total purchase value uptodate i. e. 1920-1939) | असलेल्या सामानाची किंमत. (Purchase value of the stock existing today) | हरवलेल्या अगर गेलेल्या सामानाची किंमत. (Purchase value of the stock non-existing) |
|---|---|---|
| रु. ३२,३५७-१०-० | रु. ९,६०५-१३-० | रु. २२,७५१-१३-० |

शिवाय हरवलेल्या सामानापैकीं सुमारें रु. ९००० च्या व्हाउचरांच्या जोडीला बिलें जोडलेलीं नाहींत. त्यामुळें त्याचा तपशील कळत नाहीं."

या कारकुनाच्या अहवालावर रजिस्ट्रारनें सणसणीत भाष्य लिहिलें होतें.*

---

* "The Principal was asked to keep the Laboratory in order and without any intimation to the office some of it was dismantled.

*　　　*　　　*

If all these years the College could be managed without the space, how could the Principal raise at this stage the question of accommodation?

I think this state of things requires careful handling by the Syndicate. I suggest that a Committee may be appointed to do all that is necessary in the matter. I think it would be impossible to carry on administration if things are managed in this manner and with this attitude.

I may mention that Prof. N. M. Athavale was not on the premises at the time of the inspection.

I suggest that a person higher in position and expert in the subject should be appointed to do the work.

" लॅबोरेटरी व्यवस्थित रीतीनें ठेवण्याबद्दल प्रिन्सिपलला सांगितलें असतां मुख्य ऑफिसला कळविल्याखेरीज तिनें ती आवरून कशी टाकली ? डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन यांची पाहणी होऊन, सायन्स बंद करावयाचें कीं नाहीं ह्या प्रश्नाचा निकाल होईपर्यंत ती तशीच ठेवावयास हवी होती. इतके दिवस कॉलेजांतील जागा वर्गांना पुरी पडत असतां यंदाच अपुरी कशी पडूं लागली ? केवळ तपासनीस तेथें जाऊन आल्यामुळेंच हें आम्हांस कळलें." इ. इ. पुष्कळच भाष्य.

इन्स्पेक्शनचे वेळीं प्रो. आठवले कॉलेजवर हजर नव्हते.

ह्या सर्व परिस्थितीचा सिंडिकेटनें अतिशय काळजीपूर्वक विचार केला पाहिजे. एक कमिटी नेमून तिनें ह्या बाबतींत जरूर तें सर्व केलें पाहिजे. असल्या रीतीनें व असल्या बेपर्वाईनें जर गोष्टी घडूं लागल्या तर संस्थेचा कारभार चालविणें अशक्य होईल. लॅबोरेटरीबद्दल आधीं कांहीं बोलणें बरोबर होणार नाहीं. पण सायन्सचा प्रोफेसर सेवा-निवृत्त होण्यापूर्वीं एक तज्ज्ञ नेमावा. प्रो. आठवल्यांना हजर राहण्यास लावावें. वीस वर्षांमध्यें खरेदी केलेले प्रत्येक उपकरण योग्य कारणा-साठींच होतें कीं काय तें त्यांनीं तज्ज्ञाला समजावून द्यावें. आणि अशा तऱ्हेनें घडलें तरच लॅबोरेटरीची खरी स्थिति कळणें शक्य आहे."

प्रयोगशाळेवर वीस वर्षांत खर्च झाला सुमारें बत्तीस हजार; त्यापैकीं सुमारें २२ हजारांचें सामान शिल्लक नाहीं; आणि पैकीं पुन्हा सुमारें नऊ हजारांच्या व्हाउचरांना बिलें जोडलेलीं नसल्यामुळें ती मुळांत खरेदी कशाची होती तें कळण्यास मार्ग नाहीं. पुन्हा या सर्व गोष्टींचें स्पष्टी-करण देणारे आठवले. —कारण ते प्रिन्सिपल असतांनाच ही सर्व नऊ

---

Full charge should be taken from the Professor of Physics and Chemistry before he retires and he should be asked to be present all the time in the College when the expert would be there.

( Extracts from the Registrar's note. )

हजारांची खरेदी होती.—ते हजर राहत नाहींत. आणखी प्रयोगशाळा पाहावी तर प्रिन्सिपलनें गुंडाळून ठेवलेली. नुसत्या ओळीनें या गोष्टी एकापुढें एक वाचल्या म्हणजे भीति वाटणें स्वाभाविक होतें. त्याचा परिणाम होऊन सर्वांचीं डोकीं चढलीं व रजिस्ट्रारचें भाष्य त्याच तारेंत लिहिलें होतें.

सिंडिकेटनें हें रजिस्ट्रारचें भाष्य प्रिन्सिपलचें स्पष्टीकरण येईपर्यंत कडेला सारलें व पुढें त्याचें कारणच पडलें नाहीं. तरी पण बुकपोस्टानें हें लिखाण सिंडिकेटच्या सभासदांकडे गेलें होतें. इतरही सर्व ठिकाणीं त्याची वाच्यता झाली व भोंवतालचें वातावरण कलुषित होण्यास भरपूर मदत होऊन प्रोफेसर व प्रिन्सिपलला व्हावयाचा त्रास तो चुकला नाहीं.

आठवले हजर नाहींत हें पाहून राग येण्यास आणखी एक कारण होतें. पुढच्या वर्षापासून सायन्स विषय बंद करावा असें मागचे वर्षी ठरून प्रो. आठवल्यांना त्याप्रमाणें नोटीसही दिली होती. पण सिंडिकेटनें वर्षअखेर पुन्हा या प्रश्नाचा विचार केला व ठरविलें कीं, 'काम असो वा नसो' आठवले यांची नेमणूक जून १९४१ पर्यंत आश्रमाशीं केलेल्या करारप्रमाणें आहे तेव्हां नैतिकदृष्ट्या करार मोडणें बरें नाहीं. सायन्स विषय नसला तरी त्यांना जून १९४१ पर्यंत प्रोफेसर म्हणून ठेवून पगार द्यावा. सिंडिकेटनें पैशाकडे न पाहतां 'नैतिकदृष्ट्या योग्य' म्हणून ठरवलें खरें, पण प्रत्यक्ष काम चालविणाऱ्यांना त्याबद्दल रुखरुख लागलेली असावी. ठराव करते वेळीं सिंडिकेटचे सभासद मला म्हणत, "द्या हो त्यांना कांहीं तरी काम." मी म्हणे, "अहो, सायन्स बंद झाल्यावर त्यांना काम काय सांगूं? माझे तास कमी करून त्यांना ऋग्वेद, काव्यप्रकाश शिकवावयास देऊं? का कारकून कमी करून हिशेब लिहिण्यास बसवूं? त्यांना देण्याजोगें काम मजजवळ नाहीं." कॉलेजपासून जवळ पांच मिनिटांचे वाटेवर त्यांचे खाजगी वर्कशॉप आहे तेथें ते काम करीत व इकडचा

पगार घेऊन तिकडे काम करीत तें इतरांना बरें वाटत नसे. 'आठवले हजर नाहींत' यांतील खोच तीच होती. आमचा पगार घेऊन काम करणारा एवढा मोठा सरकारकून तपासणीस येतो व हा पगार घेऊन कांहीं एक काम न करणारा प्रोफेसर मात्र अकरा ते चार कॉलेजवर त्या वेळीं नसतो म्हणजे काय!

मला तरी या वीस वर्षांच्या आंकड्यांबद्दल, हरवलेल्या सामानाबद्दल एकदम कसें काय सांगतां येणार होतें. तेव्हां स्वतः हिशेब पाहण्यास वेळ मागून घ्यावयाचें ठरवून मी सिंडिकेटचे सभेसाठीं मुंबईस गेलें.

सिंडिकेटच्या सभेचें वातावरणही हा प्रश्न निघतांच एकदम गंभीर झालें. रा. गाडगीळांनीं मात्र प्रश्न काढला कीं, या प्रश्नाचा विचार होण्यापूर्वीं प्रिन्सिपलचें म्हणणें याबद्दल काय आहे तें कळलें पाहिजे. रजिस्ट्रारनें तें म्हणणें विचारलें नव्हतें. म्हणून प्रिन्सिपलनें पंधरा दिवसांत स्पष्टीकरण पाठवावें व त्या स्पष्टीकरणासह मग नेमल्या गेलेल्या चौकशी कमिटीकडे सर्व प्रकरण चौकशीसाठीं जावें असें ठरलें. पण कांहीं तरी गफलत व विद्यापीठाचें नुकसान झालें आहे याबद्दल सर्वांची खात्री दिसली. कारण रजिस्ट्रारनें सुचविलेल्या मुद्द्यांचा ठरावांत* समावेश झाला. सभेंतील अत्यंत जबाबदार व्यक्तींनींच ठराव लिहितांना

---

***Syndicate's Resolution Dated 30th Nov. 1940**

It was resolved that a Committee of the following members be appointed to consider the clerk's report and the remarks thereon of heads of institutions concerned after their receipt; and

(a) to ascertain exactly the loss, if any, caused to the University in the past;

(b) to suggest the manner in which it should be recouped;

उद्गार काढले—"चौकशी कमिटीनें नुकसान किती झालें तें ठरवावें-अर्थात् झालें असल्यास (to ascertain the loss, if any) काय करायचें 'if any लिहून! पण लिहा झालें."

सिंडिकेटच्या सभेहून पुण्यास परत आलें ती प्रथम १९२० सालपासूनच्या कीर्द-खतावण्या घेऊन हिशेब तपासावयास बसलें व तपासनिसाचा रिपोर्ट कडेला सारून स्वतः तीनही खात्यांची आवकजावक काढली. माझ्या आंकड्यांत व तपासनिसाचे आंकड्यांत कांहींच मेळ बसेना. माझ्या हिशेबाप्रमाणें प्रयोगशाळेवर खर्च झाला होता सुमारें एकतीस हजार, व सामान शिल्लक होतें सुमारें वीस हजारांचें. इतर खात्यांचीही तीच स्थिति. तेव्हां तपासनिसाची पद्धतच कांहीं चुकली आहे अशी खाली होऊन त्याप्रमाणें मीं रजिस्ट्रारकडे कळविलें.† शिवाय विद्यापीठाचें व कॉलेजचे हिशेब-तपासनीस मेसर्स ओक आणि कं. यांचेकडून डेकस्टाक् फर्निचर व प्रयोगशाळा या दोन खात्यांचे वीस वर्षांचे हिशेब तपासून घेऊन शिवाय सामानमोजणीही करविली.

---

(c) also the ways and means by which every such loss be avoided in the future.

The Committee, if necessary, may investigate the matter by personal visits and may also take the assistance of any expert.

Members of the Committee:

(1) Prin. D. R. Gadgil, M. A., M. Lit.
(2) Mr. K. C. Desai, B. A., LL. B.
(3) Prof. A. B. Gajendragadkar, M. A.

† "I fail to understand the principle, which the Head Clerk was guided by in checking the registers and accounts. The figures seem to me to be inacccurate and misleading." (Principal's Statement.)

लॅबोरेटरी : विद्यापीठाचे तपासनिसाचे पद्धतीप्रमाणें:—

| Total purchase value upto date i. e. 1920-1939. (एकंदर खर्च) | Purchase value of stock existing today. (असलेल्या सामानाची किंमत) | Purchase value of the stock non-existing (गेलेल्या सामानाची किंमत) |
|---|---|---|
| Rs. 32357-10-0 | Rs. 9605-13-0 | Rs. 22751-13-0 |

विद्यापीठाचे व कॉलेजचे हिशेबतपासनीस जी. एम्. ओक आणि कं. यांचे तपासणीप्रमाणें:—

The total expenditure for all these years amounts to Rs. 31285-12-0 analysed as under :—

| | | |
|---|---|---|
| 1 Cost of Laboratory apparatus etc. in existence. | Rs. | 19564-12-6 |
| 2 Cost of Laboratory Apparatus etc. semi permanent in minor apparatus etc. | ,, | 1092-0-0 |
| 3 Cost of non-existing apparatus like Accumulators, Dynamos, Switch Board etc. | ,, | 1463-0-0 |
| 4 Cost of non-existing apparatus i. e. glassware etc. | ,, | 3533-6-6 |
| 6 Laboratory expenses, maintenance, acid, petrol, ice etc. | ,, | 3856-7-0 |
| 7 Extra expenditure not relating to Laboratory i.e. furniture, peon's pay etc. | ,, | 1776-2-0 |
| Total | Rs. | 31285-12-0 |

सिंडिकेटनें कमिटी नेमली त्यांत तीन सभासद होते. (१) रा. रा. के. सी. देसाई (२) प्रो. गजेंद्रगडकर व (३) प्रि. गाडगीळ. पैकीं गाडगीळ आलेच नाहींत. पण रा. देसाई व गजेंद्रगडकर ता. ८

फेब्रुवारी १९४१ रोजीं पुण्यास आले व त्यांनीं सर्व तपासणी व चौकशी केली. मुख्य प्रश्न होता नऊ हजारांच्या व्हाउचरांच्या जोडीला असणाऱ्या बिलांचा. परदेशी कंपन्यांशीं पत्रव्यवहार. बिलें एकदम येत व हप्त्याहप्त्यानें पैसे पाठविले जात. म्हणून एका व्हाउचरच्या जोडीला बिल न लावतां तीं त्या कंपनीच्या पत्रव्यवहाराच्या फाइलीला लाविलेलीं होतीं. पहिल्या तपासणींत तपासनिसानें व्हाउचरांच्या फाइली मागितल्या, आम्हीं दिल्या. अमुक बिलें त्याचे मागें हवींत तीं दाखवा असें नानांना म्हणता तर तींही दाखविलीं असतीं; पण वरचा देखावा होता फक्त सामानाच्या याद्या ठेवण्याची पद्धत लावून देण्याचा. तेव्हां हे प्रश्न नानांना विचारणें त्याला जड वाटलें म्हणा, किंवा आम्हांस विनाकारण सावध करणें नको म्हणून म्हणा, त्यानें नानांची भेट टाळली. हीं बिलें चौकशी कमिटीला दाखवितांच पहिला मुद्दा संपला व सभासदांचें पूर्ण समाधान झालें.

पुढें लॅबोरेटरी मोडून टाकण्याचा प्रश्न निघाला. सायन्स विषय शिकविला जाई तेव्हां प्रयोगशाळेंत टेबलावर कांहीं कांच सामान असे, तराजू ( Balance ) असे; तें सर्व सामान मीं तिथल्याच कपाटांत टाकून कुलुपें लावलीं. योग असा कीं याच वर्षीं 'प्रथम वर्षाचे (F. Y. A.) वर्गांत त्रेचाळीस मुली आल्या व पहिला वर्ग पुरेना तेव्हां कॉलेजच्या इमारतीच्या दुसऱ्या टोकाला डोमेस्टिक सायन्स या विषयाचा वर्ग होता त्यांतील कपाटें व सामानसामुग्री या प्रयोगशाळेंत ठेवली व डोमेस्टिक सायन्सचे तास या प्रयोगशाळेंत सुरू केले व पहिला हॉल प्रथम वर्षाचे वर्गास दिला. आमचे तपासनीस कारकूनसाहेब तपासणीला हॉलमध्यें गेले असतील तेव्हां त्यांना दिसलें कीं फळ्याचें तोंड या दिशेला होतें तें त्या दिशेला झालें व इकडचीं डेस्कें तिकडे ठेविलीं. झालें! त्यांनीं रिपोर्ट केला कीं, " Laboratory is disorganised dismantled and disconnected " व रजिस्ट्रारनें त्यावर भाष्य लिहिलें. प्रयोगशाळा पाहून देसाई म्हणाले, " Opinions differ.

In my opinion this is better arrangement." रा. गजेंद्र-गडकर म्हणाले, "आमची कल्पना झाली होती कीं, तुम्ही सर्व सामान बांधून गुंडाळून ठेवलें. पण तसें तर कांहींच दिसत नाहीं."

माझे आंकडे चौकशी कमिटीनें मान्य केले खरे; पण कारकुनाच्या बेरजा तरी अशा झाल्या कशा हें कळण्याची मला जिज्ञासा होती व सुदैवानें ती अचानक पुरी झाली. चौकशी कमिटीचे सभासद आपले कागद टेबलावर विसरून गेले. आणि कारकुनानें तयार केलेले वीसही वर्षांचे आंकडे— सायक्लोस्टाइलवर छापलेले— मागाहून टेबलावरील कागद आवरतांना माझे हातीं आले. चौकशी कमिटीचे सभासद तीन. सिंडिकेटच्या पंधरा सभासदांस या प्रती वाटावयाच्या म्हटल्या तरी दोन वेळां टाइप केल्या असल्या तर काम झालें असतें. असें असतां पंधराच्या किती तरी पट प्रती— जणुं कांहीं सेनेटच्या सभासदांस वाटावयासाठीं तयार कराव्या त्याप्रमाणें— सायक्लोस्टाइलवर कां छापल्या गेल्या हा मला प्रश्न पडला. बरें, प्रत्यक्ष चौकशीचे वेळीं कमिटीचे सभासदांचे हातांत प्रती. मजजवळ नाहीं. म्हणून मीं एक मागितली असतां कारकुनानें जास्त प्रत नाहीं म्हणून सांगितलें होतें. या प्रतींवरून मात्र स्वच्छ प्रकाश पडला.

लॅबोरेटरींत काय किंवा इतर खात्यांत काय खर्च होणारा प्रत्येक पैसा टिकाऊ स्वरूपाच्या सामानावर खर्च होत नसतो. कांहीं खर्च 'बुडीत खर्च' अगर 'कामचलाऊ खर्च' (Current) म्हणून होतो. लॅबोरेटरींत तर हा खर्च फार असतो. विकत घेतलेलीं रसायन द्रव्यें, पेट्रोल, रॉकेल, हीं केव्हांही दोन वर्षांनीं सापडणें कठीण. कांच सामान तसेंच. त्यांत फूटतूट फार. तेव्हां प्रथम असला बिनटिकाऊ खर्च वेगळा काढून, टिकाऊ स्वरूपाच्या सामानावर खर्च वीस वर्षांत झाला किती तें काढावयास हवें; व त्यापैकीं आतां आहे काय व गेलें किती हें पाहून मग सायन्सच्या प्रोफेसरांस अगर प्रिन्सिपलला जो काय दोष देणें तो द्यावयास हवा.

पण तपासनिसांची पद्धति सरधोपट. दोन कॉलम केलेले. एकांत असलेल्या सामानाची किंमत व एकांत नसलेल्या म्हणजे हरवलेल्या सामानाची किंमत. हरवलेल्या सामानांत काय काय यावें? वीस सालापासून डिसेक्शनला आणलेले बेडूक व ससे, प्रयोगास लागणारें बर्फ, रसायनें, पेट्रोल, डिस्टिल्ड वॉटर, सामान विकत आणल्यास हमालाला दिलेली मजुरी, गाडीभाडें; पण यानेंही किती रकमा वाढणार? पांचशें रुपयांची कंपनीची पावती, त्या पावतीवर कीर्दींतील नंबर व कीर्दींत तपशील, 'सूक्ष्मदर्शक यंत्र विकत आणलें. आज तें यंत्र सुस्थितींत आहे व रोज वापरांत आहे पण कारकुनाचे बेरजेंत पांचशें रुपयांचें सामान हरवलें. पावतीवरील अक्षर लागलें नाहीं कीं गेली रकम हरवल्या सामानाचे कॉलमांत. अशा प्रकारें रकमा वाढताहेत व नुकसानीच्या भीतीनें सर्वांच्या पोटांत गोळा उभा राहतो आहे असा नमुना. इतर खात्यांतही अशीच मौज आहे. पण लॅबोरेटरी खात्यांत झालेल्या शोभेनें त्याबद्दल कोणी प्रश्नच काढीत नाहीं. सहाशें रुपये खर्चून कॉलेजभोंवतीं तारांचें कुंपण घातलें, कॉलेजला दीडदोनशेंचें लोखंडी फाटक केलें, विजेच्या बॅटरी ठेवण्यासाठीं लाकडी पार्टिशन केलें, कॉलेजला रंग दिला. पण कारकुनाच्या यादीप्रमाणें या सर्व रकमा 'सामान हरवलें' या सदरांत. कारण सामानाच्या याद्यांत कपाटें, खुर्च्या यांच्या खालीं तारेचें कुंपण लोखंडी फाटक, भिंतीचा रंग यांचीं नांवें आम्हीं लिहिलीं नव्हतीं ना!

विद्यापीठाचे ऑफिसांतून आलेला हा सर्वांत जुना व अनुभवी मुख्य कारकून. हें त्याचें हिशेबाचे पद्धतीबद्दल व प्रयोगशाळेबद्दल ज्ञान! पण रजिस्ट्रार तर जास्त जबाबदार व माहितगार समजावयाची ना! त्यांना तर कांहीं शंका यावी कीं नाहीं, कीं पुण्याच्या लॅबोरेटरीला चालचलाऊ खर्च (current) कांहीं कसा लागला नाहीं? बरें, कॉलेजच्या वह्या रजिस्ट्रारचे ऑफिसांत होत्या, त्या व कारकुनानें काढलेले आंकडे तरी किती जमतात हें तरी तावातावानें भाष्य लिहिण्यापूर्वीं

ताडून पहावें.* आणि इतका भयंकर रिपोर्ट रजिस्ट्रारनें केलेला असतां ऑफिसांत तयार झालेले आंकडे जबाबदार व्यक्तींनींही डोळयाखालीं कां घातले नाहींत? त्यांना ही चालूचलाऊ खर्चाची कल्पना नसावी! पण पुणें कॉलेजच्या लोकांच्याबद्दल जास्त खात्री करून घेण्याची जरूरच त्यांना वाटली नाहीं.

चौकशी कमिटी व वार्षिक इन्स्पेक्शन हीं सर्व संपण्यास दुपारचे तीन वाजले. नंतर मी व माझा सहकारी जेवावयास बसलों. जेवतांना मीं म्हटलें, "झालें, आपण सहीसलामत सुटणार यांतून. पण बिचारा क्लार्क मात्र अशी मूर्खासारखी तपासणी केल्याबद्दल बोलून घेणार व अडचणींत सापडणार."

"मला कांहीं होणार नाहीं असें ते मला म्हणत होते," माझा सहकारी म्हणाला, "ते म्हणाले, मला काय? मी हुकुमाबरहुकूम वागलों. मजजवळ पत्रें आहेत."

---

* कॉलेजच्या डेडस्टॉक् फर्निचर, लॅबोरेटरी इ. खात्यांच्या वह्या मागील वर्षाची तपासणी झाल्यानंतर रजिस्ट्रारचे ऑफिसांत मागून नेल्या असून सुमारें पांच महिने त्या तेथेंच होत्या. पुन्हा तपासनीस व रजिस्ट्रार यांनीं आपापलीं भाष्यें लिहिलीं तेव्हांही त्या त्यांच्या ऑफिसांतच होत्या. वह्यांवरून त्यांना पुढील माहिती कळली असती

| | | |
|---|---|---|
| 1 Physical Laboratory apparatus worth | | Rs. 11381-7-3 |
| 2 Chemical ,, | ,, worth | ,, 2898-10-0 |
| 3 Biological ,, | ,, worth | ,, 5266-14-0 |
| | | ,, 19546-15-3 |

शिवाय तपासनिसानें आम्हांस न विचारतां लिहिविलेल्या सामानांतील **चुकीच्या वस्तु** व किंमती. Rs. 4233- 4-9

ही नोंद दुबार झाली होती.

"तपासणी करण्याचा हुकूम असेल हो! पण मूर्खासारखी तपासणी कर असा का हुकूम होता?" मीं म्हटलें. "बरें, दिसेल आतां असेल तें."

चौकशी कमिटीच्या सभासदांनीं मीं दिलेली माहिती शांतपणानें ऐकून घेतली, स्वतःची खात्री केली व नंतर नानांना व मला कोणताही दोष न देतां आमच्याबद्दल आपल्या वृत्तांतांत दोन चांगलेच उद्गार काढले* याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावेसे वाटतात.

पण येवढा डोंगर पोखरला व उंदीर सुद्धां निघाला नाहीं. आणि असा निष्कारण गोंधळ उत्पन्न करणारा रिपोर्ट तपासनिसानें लिहिला कसा याचा विचार न करता पुन्हा तपासनिसाचेंच समर्थन करण्याचा चौकशी कमिटीनें प्रयत्न केला आहे तो मात्र पटत नाहीं. ते म्हणतात,

(१) कांहीं तरी उभयपक्षीं गैरसमजूत होऊन कॉलेजच्या अधिकाऱ्यांचें सहकार्य तपासनिसास मिळालें नाहीं. त्यानें प्रत्येक गोष्टीचें स्पष्टीकरण विचारलें असतें तर हा भीतिदायक अहवाल निर्माण झाला नसता.

---

* (1) We, therefore, desire to report that no suspicion whatsoever attaches to Prof. Athavale in the matter of purchases of apparatuses and materials etc. and in the matter of maintenance of his department.

(2) In January 1941 Principal Dr. Mrs. Deshpande arranged for the audit of Furniture, Deadstock and Repairs accounts and also of the Laboratory Apparatus as mentioned above, and expenses accounts from 1920 to June 1939 by a firm of qualified and Registered Accountants. Their report shows that there is nothing wrong with these accounts covering a period of over twenty years. For both these arrangements, which cost her quite a lot of troubles, she deserves a word of appreciation.

( २ ) तपासनिसास पुण्यास भरपूर वेळ नव्हता. पुण्याहून माहिती गोळा करून आणून मुंबईस अहवाल लिहिला म्हणून असें झालें असेल. हीं कारणें बरोबर दिसत नाहींत.

( १ ) तपासनिसाची पुण्यास जाऊन काय करावयाचें याबद्दल गैरसमजूत नव्हती. रजिस्ट्रार त्यांना पाठवितांना मला लिहिते, (४ ऑगस्ट १९३९ चें पत्र) "I am sending senior member of the staff with complete instructions etc." मीं स्वतः त्यांची वाट पाहण्यांत दोन तास फुकट घालविले व पुढेंही जरूर ती माहिती देण्यास तयार होतें. नानांना तर त्यांनीं मुद्दामच टाळलें. प्रो. आठवले हजर नव्हते याबद्दल रजिस्ट्रारनें खरमरीत टीका केली त्या वेळीं आठवले मुद्दाम आले नाहींत असें नव्हे, मलाच त्यांना बोलाविण्याचा संकोच वाटला* हें त्यांनीं रजिस्ट्रारला स्पष्टपणें सांगणें अगर स्वतःचे रिपोर्टांत लिहिणें हें त्यांचें कर्तव्य होतें.

---

* ( तपासनिसाची ऑफिस-तपासणी– वेळापत्रक– चौकशी कमिटीस सादर केलेलें ) लॅबोरेटरीचें सामान तपासाल तेव्हां प्रो. आठवले यांना बोलावून घ्या, मीं त्यांना कळवून ठेविलें आहे, ते येतील असें मीं सुरवातीला सांगितलें होतें. पहिले दिवशीं त्यांनीं होय म्हणून सांगितलें. दुसऱ्या दिवशीं त्यांचें माझें पुढील संभाषण झालें.

प्र.:—प्रो. आठवले यांना बरोबर हिंडविण्यास मला संकोच वाटतो. तेव्हां अज्जूला ( Laboratory peon ) बरोबर घेऊन लॅबोरेटरी तपासली तर चालेल कीं नाहीं ?

उ:—हें काम खरोखर तज्ज्ञांचें आहे. मलासुद्धां लॅबोरेटरी तपासतां येणार नाहीं. तुम्ही तरी लॅबोरेटरी काय तपासणार ? फार तर प्रत्येक वस्तूचें नांव समजून घ्याल. तेवढी माहिती अज्जूही तुम्हांला देईल.

प्र.:—एकादा जिन्नस मला भलताच सांगितला व न समजल्यामुळें

( २ ) वेळाचें कारण बरोबर नाहीं. हिशेब तपासावयाची पद्धति चूक होती. पद्धति बरोबर ठरवावयास वेळ लागत नाहीं. डोकें लागतें. वीस वर्षांचे आंकडे त्यांनीं १९३९ सालच्या तपासणींतच उतरून नेले होते.

तपासणीला वेळ भरपूर होता. त्यांच्या कामाचें वेळापत्रकच मीं चौकशी कमिटीला पाठवून दिलें होतें. चौकशी चालू होती. न्यायनिवाडा व्हावयाचा होता. मीं पाठवून दिलेल्या माहितीची शहानिशा कां केली नाहीं ? मीं खोटी माहिती पुरविली असें ठरलें असतें तर होतेंच तुमच्या न्यायासनासमोर उभी शिक्षा भोगावयाला!

या ऑफिसतपासणीमुळें अतिशय गोंधळ निर्माण झाला. या कारकुनाच्या तपासणींतून काय निघणार आहे याची कल्पना मी व आठवले यांचे पूर्वीच आमच्या प्राध्यापकांस होती व त्या वेळच्या कारकून, रजिट्रार व सिंडिकेट यांचे पहिल्या कल्पनेप्रमाणें आम्ही त्यांतून टपका घेतल्याखेरीज सुटत नाहीं असें सर्वांस वाटत होतें. स्वाभाविकच पूर्वी उत्पन्न होऊं लागलेली बेपर्वाई जास्त वाढण्यास त्यानें मदत झाली. पण एकदां चौकशी कमिटी येऊन गेल्यावर निकालच लवकर प्रसिद्ध होईना.

---

तो आहे असें मीं गृहित धरलें व पुढें तो चुकीचा ठरला तर ती जबाबदारी मजवर येईल कीं नाहीं ?

उः—होय येईल. कारकुनांनीं लॅबोरेटरी पाहिली तेव्हां तो जिन्नस आम्हीं दाखविला होता असें दुसऱ्यांना म्हणतां येईल.

प्र.:—मग मायदेवच येऊन कां लॅबोरेटरी तपासीत नाहींत ? आपण तेथें बसून माझ्यावर कां ढकलतात ? मग मी काय करूं ?

उ.:—तें मी कसें सांगणार. तुम्हांला बरें वाटेल तें करा.

प्र.:—मग मी अज्जूला मला सामान दाखविण्यास सांगतों. जेथें अडचण पडेल तेथें नानांना विचारीन.

प्रो. आठवले हजर कां राहिले नाहींत या प्रश्नाला महत्त्व प्राप्त झालें आहे म्हणून त्यांचें व माझें भाषण सविस्तर दिलें आहे. भाषण बहुतेक बुधवार ता. १३ अगर गुरुवार ता. १४ रोजीं झालें.

'या चौकशी कमिटीचा निकाल काय तो एकदां प्रसिद्ध करा, एकाद्या माणसावर अशी संशयाची तलवार लटकत ठेवणें बरें नव्हे' अशीं पत्रें वरिष्ठांना लिहिण्याचा प्रसंग आठवले यांजवर आला. शेवटीं सिंडिकेटच्चे सभेचे वेळीं चौकशी कमिटीचा रिपोर्ट विचारास आला त्या वेळीं तो इतका झटपट पास झाला कीं सांगतां सोय नाहीं. तोटा झाला. तो भरून कसा घ्यावा, पुढें तोटा होणें कसें टाळावें इ. अनेक प्रश्न होते. 'नुकसान झालें, नुकसान झालें' असे भीतीचे कर्णे वाजत असतां हा एकदम 'सब ठीक' चा इशारा कसा? म्हणजे मूळ तपासनिसाची तर कांहीं चूक नव्हती ना! असें कोणासही वाटलें नाहीं. तो दिवस एकंदरींत राजिनामा देण्याचा होता. आधीं एका प्राध्यापकाचे बाबतींत चॅन्सेलर-साहेबांचा व माझा खटका उडून त्यांच्या अन्यायी बोलण्याची चीड येऊन मीं नोकरीचा राजिनामा दिलाच होता. तो वादाचा प्रश्न संपला व निरोप घेऊन आलेल्या एका माणसाशीं बोलण्यास मी विद्यापीठाचे कचेरींतून व्हरांड्यांत आलें. बोलून चारपांच मिनिटांत परत जातें तों चौकशी कमिटीचा प्रश्न सभेपुढें निघून पासही होऊन गेलेला. सभेचे वेळीं तो टाइप होत होता. अर्ध्या सभेंत तो सभासदांस आणून दिला. अर्थात् सर्व वाचला जाणें शक्यच नव्हतें व प्रिन्सिपल नसतां पास केला. प्रिन्सिपलचा मुख्य प्रश्न त्यांत आहे, ती येईपर्यंत थांबण्याचीही जरूरी कोणास वाटली नाहीं. आधीं खटका उडाला नसता तर या प्रश्नावर पुढें उडाला असता व मीं राजिनामा दिला असता. कारण या प्रकरणाबद्दल माझा मनाशीं निर्णय ठरला होता व एप्रिल ४१ चे तिसऱ्या आठवड्यांत लेडी ठाकरसी यांना भेटावयास गेलें त्या वेळीं त्यांना मीं तसें सांगितलेंही होतें.

बोर्डानें ठराव करून एका प्राध्यापकाबद्दल सक्तीनें **Confidential report** लिहविला व तो लिहिला जाण्याची सर्व परिस्थिति चॅन्सेलरसाहेबांस व सिंडिकेटच्या इतर सभासदांस समजावून सांगण्याचें काम लेडी ठाकरसी यांचेवर सोपविलें. लेडी ठाकरसी यांनीं असा प्रश्न

पुढें मांडला कीं, कमलाबाई जर पुन्हा प्रिन्सिपलशिप घेतील तर मी ही खटपट करीन. या बाबतींत दोन दिवस विचार करून माझा निर्णय त्यांना कळविण्यास मी गेलें त्या वेळीं आमचें याबद्दल बोलणें झालें. त्यांची इच्छा अशी कीं, मीं काम सोडूं नये, राहावें; पण "विश्वास नाहीं, शब्दाला किंमत नाहीं" अशी स्थिति पत्करून माझी राहण्याची तयारी नव्हती. त्या वेळीं मीं त्यांना सांगितलें होतें कीं, माझें राहणें आणखी एका गोष्टीवर अवलंबून आहे. मी चौकशी कमिटीच्या रिपोर्टाची वाट पहात आहे. हिशेबतपासनीस व रजिस्ट्रार यांना असा वेड्यासारखा रिपोर्ट केल्याबद्दल समज मिळाली पाहिजे; तसें होईल तरच मी राहीन.

या सर्व प्रकरणांत मुख्य राग आठवल्यांवर. पण मी प्रिन्सिपल; मला त्यांत गोवल्याखेरीज एकट्या प्रोफेसर आठवल्यांच्या खात्याची तपासणी शक्य नाहीं. तेव्हां स्थानमाहात्म्यामुळें त्या सर्व त्रासास नानांचे-प्रमाणें मलाही तोंड द्यावें लागलें. रात्रभर डोळ्यांसमोर नाचतील इतक्या बेरजा करीत बसावें लागलें व एकंदर ऑफिसच्या कामाचा वीट आला. ही शोभा ठाकरसी कॉलेजच्या पहिल्या प्रिन्सिपलची व त्यांच्या अनुषंगानें माझीही. पण याखेरीज आणखी स्वतंत्र असा त्रासही मला झाला. तो त्रास व हा त्रास ही माझी म्हणजे दुसऱ्या प्रिन्सिपलची कहाणी व तिसऱ्या प्रिन्सिपलची पुढें घडलेली हकिगत म्हणजे तात्यांची शोकांतिका.

१९३२ च्या १ मे रोजीं प्रिन्सिपलचें काम मीं सुरू केलें त्या वेळीं मतभेद अगोदरच पराकोटीला जाऊन भांडण सुरू होतें व फेब्रुवारी मध्येंच ठाकरसी ट्रस्टींनीं व्याजाचे हप्ते बंद केले होते. अंदाजपत्रकांत छाटाछाट, पगार कमी करणें वगैरे सर्व गोष्टी होऊन आणीबाणीची परिस्थिति जाहीर झाली होती. सिंडिकेटमध्यें मीं पाऊल टाकलें तें अशा स्थितींत. त्यामुळें माझें कोणाबद्दल बरेंवाईट मत बनलें नव्हतें व इतरांचें मजबद्दल बरेंवाईट मत बनण्यास सवड नव्हती. अर्थात् आश्रमाची एक आजन्मसेविका म्हणून जो कांहीं पूर्वग्रह, दोष अगर

राग माझे वाट्याला येणार असेल तो मला नाकारावयाचा नव्हता; अगर नव्या सूर्याला नमस्कार करण्यासाठीं आश्रमाचें आजन्मसेवकत्व सोडून विद्यापीठाचें स्वीकारावयाचें नव्हतें.

१९३२ सालापासून १९४० पर्यंत प्रिन्सिपल या नात्यानें माझीं पहिलीं आठ वर्षें चांगलीं गेलीं. ३२ ते ३५ सालपर्यंत जुनें सिंडिकेट व जुनें बोर्ड होतें. तेथें भांडण नव्हतें. सर्वांचें लक्ष बाहेरच्या मोठ्या भांडणाकडे लागलें होतें. तडजोड होऊन ३५ सालीं नवें सिंडिकेट व नवें बोर्ड आलें. तेथेंही १९३९-४० सालपर्यंत सर्व ठीक चाललें होतें. मजबरोबर काम करणारा माझा सहकारीवर्गही मजबद्दल असंतुष्ट नव्हता. नव्या बोर्डांतील सभासदांशीं माझे सुरवातीस एकदोन खटके झाले, पण पुढें शेवटपर्यंत मला बोर्डाची सहानुभूति व पाठिंबाच होता. सिंडिकेटमध्यें माझ्याशीं भांडणाचे प्रसंग येणार पुण्याच्या कॉलेजमध्यें महत्त्वाचे प्रश्न निघतील तेव्हां; व असे प्रश्न येऊं लागले १९३९ सालापासून पुढें. येवढें मात्र होतें कीं, पुण्याच्या कॉलेजचा प्रिन्सिपल म्हणून नेमून आलेल्या सभासदाचे मतास सिंडिकेटचे सभेंत फारसा मान कोणी देत नसे. पस्तीस सालापासूनचें सिंडिकेट जवळ जवळ सर्व गुजराथी लोकांचें असे. आण्णा व्हाइस चॅन्सेलर म्हणून व मी प्रिन्सिपल म्हणून त्यांत होतों. क्वचित् जोशी निवडून येत. रा. गाडगीळ सिंडिकेटमध्यें नेहमीं असत. प्रसंगीं ते सर्वांत जास्त, पहिल्या नंबरचीं मतें मिळून निवडून येत. पण पुढें सिंडिकेटच्या सभासदांच्या निवडणुकीसाठीं याद्या फिरूं लागल्या व कांहीं वेळ त्यांनाही निवडणुकींत अपयश आलें. गाडगिळांच्या मताला आमच्या मतापेक्षां थोडा जास्त मान असे. पण पुढें तोही गेला, व शेवटीं पुण्यास कॉलेजच्या व कन्याशाळेच्या बोर्डाचे ते चेअरमन असतां त्यांच्या सल्लामसलतीकडे इतकें दुर्लक्ष होऊं लागलें कीं, 'मला काय दुसरा उद्योग नाहीं म्हणून तुमच्या विद्यापीठांत मी काम करतों' असें म्हणून कंटाळून त्यांनीं राजिनामा दिला. मुंबईच्या दाक्षिणी मंडळीपैकीं एक गजेंद्रगडकर मात्र त्या

निवडणुकीच्या यादींत असत. आम्हा पुण्याच्या सभासदांचे मतास फारसा मान नसेच, कारण आम्ही अल्पसंख्याक. बहुधा आम्ही अनुकूल मतें देऊं ते ठराव नापासच व्हावयाचे. पण हा विचारसरणींत पडणारा फरक आम्हा व्यक्तींवर राग असल्यामुळें मुद्दाम होत होता असें प्रथम नव्हतें. याबद्दल दोष कोणास द्यावयाचा! प्राध्यापकांशीं बोलतांना व इतर वेळींही मी म्हणे कीं, मी सिंडिकेटची सभासद असलें तरी माझें सिंडिकेटमध्यें चालतें असें समजूं नका. १९३८ सालच्या एप्रिल-मध्यें माझी प्रकृति बिघडली व त्या वर्षांतील बरेच दिवस मी रजेवर होतें. १९३९ चे सुरवातीस मी पुन्हा कामावर आलें. आल्यावर येवढें मात्र वाटूं लागलें कीं, वातावरणांत कांहीं तरी फरक होत आहेत. काय व कसे हें मलाही नक्की सांगतां येत नव्हतें; पण वाटूं लागलें मात्र निश्चितपणें. प्रकृति संपूर्णतया बरी नव्हतीच. त्यामुळें स्वतःचें अध्यापन व ऑफिसचें ठराविक कामच आवरतांना पुरेवाट होई व इतर गोष्टींकडे लक्ष देण्यास ताकद उरत नसे.

या वेळीं कांहीं प्राध्यापकांनीं आपणांस कायम करावें अशा तऱ्हेचा सिंडिकेटकडे केलेला अर्ज मला आणून दिला. विचार करून मींही त्याला अनुकूलता दर्शविण्याचें योजिलें. माझी या बाबतींत दृष्टि अशी होती: ऋचाळीस सालापर्यंत आश्रमाचे सर्व कार्यकर्ते कॉलेजमधून सेवानिवृत्त होत होते. त्या वेळीं सर्वच मंडळी नवी येणार. अशा वेळीं या मंडळीपैकीं कांहीं मंडळी कायम झालेली असतील तर सातत्य टिकेल. थोड्या थोड्या दिवसांचे मुदतीसाठीं म्हणून का होईना, ओळीनें आठदहा वर्षें ही मंडळी कॉलेजांत काम करीत होती. पुष्कळ दिवस ओळीनें नेमणूक होत गेल्यानें मनुष्याची स्वाभाविक अपेक्षा निर्माण झालेली असते कीं, आपणांस आतां कायम करावें. त्यांचेपेक्षां जास्त तज्ज्ञ माणसें त्यांचे विषयांत मिळालीं नसतीं असें नव्हे. परंतु नवीन माणसें येणार व तीं टिकणार कशावरून? जरा जास्त पगाराची नोकरी दिसली कीं त्यांनीं जाऊं नये असें आमच्या विद्यापीठांत तरी

काय आमिष होतें ? शिवाय पुष्कळ दिवस एके ठिकाणीं काम केल्यानें त्या संस्थेबद्दल एक आपलेपणा उत्पन्न झालेला असतो तोही उपयोगी पडतो. कायम झाल्यास जास्त समाधानानें कामें होतील. तेव्हां आपण जाण्यापूर्वी त्यांना कायम करावें, उरलेलीं दोन-चार वर्षे सर्वांचेबरोबर खेळीमेळीनें काम करावें व सेवानिवृत्त व्हावें. त्यांची मीं शिफारस केली असती तरी बोर्ड अगर सिंडिकेटमध्यें काय होईल याची मला खात्री नव्हती. पण विचार करून मीं माझी दिशा ठरविली होती. तिघांना अर्धेच काम कॉलेजांत होतें. अर्धे काम करणाऱ्या मंडळींना कायम करून पुढें घोटाळे जास्त होतात म्हणून बोर्ड विरुद्ध होतें. पण सिंडिकेटमध्यें अनुकूलता मिळून तो ठराव पास झाला व त्यांच्या प्रॉव्हिडंट फंडाचीही सोय झाली. या तिघांपैकीं एकाचें म्हणजे डोमेस्टिक सायन्सच्या प्राध्यापकाचे सर्व कॉलेजांत शिकविण्याचे विषयच अर्ध्या प्रोफेसरच्या कामाइतके. तेव्हां पुढें सबंध काम मिळेल कीं नाहीं ही अडचण त्यांचे बाबतींत नव्हती. पगाराबद्दल त्यांची कांहीं मागणी होती त्याचाही बोर्डानें त्यांना अनुकूल असा निर्णय घेतला. म्हणजे तिघांपैकीं एकाच्या सर्व मागण्या पुऱ्या झाल्या. दुसरा प्रश्न संस्कृत व इंग्लिशचे अर्धा वेळ काम करणाऱ्या लेक्चररचा. मी त्रेचाळीस सालीं सेवानिवृत्त झाल्यानंतर माझे जागीं त्यांना सबंध काम मिळण्याचा संभव होता व तो लक्षांत घेऊनच त्यांनीं आज अर्धे काम असलें तरी कायम करण्याबद्दल मागणी केली होती. त्यांनीं कायम करण्याचा अर्ज केला तेव्हां मराठी ऐच्छिक निघण्याचा प्रश्न बेमुदत बंद पडला होता. पुढचे वर्षी अकल्पित तऱ्हेनें सायन्स विषय बंद करण्याचें व प्रो. आठवल्यांना १९४० जूनपासून सेवानिवृत्त करावयाचें ठरलें म्हणून पुढच्या वर्षी अंदाजपत्रकांत बचत होणार. तेव्हां ऐच्छिक मराठी सुरू करण्याचा प्रश्न आला. सायन्स बंद न होतें तर आहे या मुलींच्या संख्येंत वाढ होईपर्यंत मराठी ऐच्छिक सुरू होत नव्हतें. तेव्हां मी जाईपर्यंत त्यांनीं अर्ध्या कामावर असंतुष्ट होण्याचें कारण नव्हतें; व माझेमागें त्यांना

पुरें काम देण्यास बोर्डाचा विरोध येईलसें वाटत नव्हतें. इंग्लिश विषयाचे ते एम्. ए. तोंपर्यंत झाले असते तर तेंही काम दोन-तीन वर्षांनीं त्यांना मिळण्याचा संभव नव्हताच असें नाहीं. उरले तिसरे इतिहास व अर्थशास्त्राचे प्राध्यापक. यांचेबद्दल मात्र दुमत होतें. तरी पण त्यांना 'सबंध काम' मिळण्याबद्दल मीं बोर्डात अनुकूलता दर्शविण्याचें मनांत योजिलें होतें.

यापैकीं पहिली गोष्ट म्हणजे त्यांना 'कायम करणें', ती घडून आली. आतां प्राध्यापकांना समाधान वाटावें व वातावरण जास्त चांगलें व्हावें अशी माझी अपेक्षा. पण येथें मात्र माझी मनुष्यस्वभावाची पारख अजीबात चुकली व बोर्डाचे कांहीं सभासदांनीं दुरून केलेली स्वभाव-परीक्षा अचूक ठरली. कायम झाल्यानें समाधान तर वाढलेंच नाहीं, उलट आतांपर्यंत कायम करतील कीं नाहीं या संशयामुळें दबून राहि-लेले स्वभावदोष उसळून बाहेर आले, व आतां काय आम्ही कायम नोकर ! आश्रमाचीं माणसें हीं भाडोत्री. त्यांची काय पर्वा करावयाची ही वृत्ति वाढली. कायम झाल्यापासून दोनचार महिन्यांतच वाऱ्याची बदललेली दिशा मला जाणवली. दुसऱ्या सहामाहींत फेब्रुवारी महिन्यांत दरवर्षी पार्टिंग फीस्ट होत असे. व्याख्यानें संपलीं, आतां पुढच्या वर्षीं पुन्हा शैक्षणिक कार्य सुरू, म्हणून प्राध्यापक व विद्यार्थिनी यांची ही मेजवानी होई व मोठ्या उत्साहानें सर्वजण त्यांत भाग घेत. या वर्षीं म्हणजे १९४० सालीं ही पार्टी २० फेब्रुवारीस झाली. प्रो. आठवले सेवानिवृत्त व्हावयाचे १९४१ च्या जूनमध्यें. पण सायन्स विषय बंद झाल्यामुळें त्यांना १९४० जूनपासून सेवानिवृत्त होण्याची सूचना विद्यापीठानें दिली होती, त्यामुळें त्यांचे दृष्टीनें ही शेवटची पार्टी होती. सेवानिवृत्त करण्याची ही तऱ्हा त्यांना बरीच बोचली होती व त्यांचें भाषण बरेंच भावनायुक्त झालें. शेवटीं मींही भाषण करतांना सांगितलें होतें, "जुनीं माणसें जातात, नवीं येत असतात. आज या विद्यार्थिनी आहेत. 'चिमण्यांचा थापा उडावा' तशा याही

एक-दोन वर्षांत उडून जाऊन नव्या येतील. कुणास माहीत पुढचे वर्षीं मी तरी येथें असेन का?" कारण प्रकृतीमुळें आपणांस काम झेपत नाहीं तेव्हां तें सोडावें असे विचार अलीकडे मनांत येत त्यांचा उद्‌गार येथें बाहेर पडला. पण सर्वांनीं मिळून अशी आनंदानें साजरी केलेली पार्टी हीच शेवटची याची त्या वेळीं मलाही कल्पना झाली नाहीं.

नुकत्याच कायम झालेल्या प्राध्यापकांनीं या वेळीं जणूं आनंदांत भर घालण्यासाठीं एक आभारप्रदर्शक पत्र याच वेळीं मला आणून दिलें. आभाराचा भावार्थ जरा अतिशयोक्त होता. असा कीं, केवळ तुम्हीं केलेंत म्हणूनच आम्ही कायम झालों.*

पुढें एका प्राध्यापकानें समक्ष बोलतांना त्या आभाराचा उच्चार केला, तेव्हां मीं म्हटलें, " माफ करा. तुमचें पत्र वाचलें तेव्हांच मी हें स्पष्ट कळविणार होतें, पण आभारप्रदर्शक पत्रांतील शब्दांचा कीस काढणें बरें नाहीं म्हणून थांबलें. या नेमणुकीचें श्रेय मीं मजकडे घेतलें असतें. पण केव्हां? माझें म्हणणें† ऐकून सिंडिकेटनें तुम्हांस कायम केलें असतें तर. पण ती समजूत वेगळ्याच मार्गानें पटली होती.

---

* Extract from the said professors' letter dated 20th Feb. 1940:

In our opinion this consideration shown to us is attributable to your sincere efforts on our behalf and we feel it our duty to offer you our best thanks for the same. We do realise that without your advocacy and support, the satisfactory solution of the problem would have been well-nigh impossible under present conditions.

† सिंडिकेटचे सभेंत हा प्रश्न निघाला तेव्हां प्रथम ज्या कॉलेजमधील हा प्रश्न त्या प्रिन्सिपलला बोर्डाचे सभेची हकिगत, प्रिन्सिपलचें मत वगैरे विचारून मग चर्चेस सुरवात व्हावी. पण चर्चेंत तें प्रथम कोणी

"छे! छे! असें कसें होईल" ते म्हणाले, "तुम्हींच हें केलें असें आम्ही समजतों. बहुमत तुमच्या बाजूचें नसलें म्हणून काय झालें. तुम्हांस जें वाटलें तें स्पष्ट तुम्हीं मांडलेंत हेंच आम्ही जास्त समजतों. आम्हीं त्या पत्रांतला शब्द न् शब्द मनःपूर्वक लिहिला आहे. नुसता उपचार नव्हे. निदान मी तरी मजबद्दल ग्वाही देऊं शकतों. केवळ तुम्ही होतां म्हणून हें झालें."

ही फेब्रुवारी १९४० मधली गोष्ट. त्या वेळचें सदरहू प्राध्यापकाचें भाषण वरकरणी असेल– कदाचित् मनापासूनही असेल. पण पुढें दोनच महिन्यांत ज्या गोष्टी घडल्या त्यावरून त्यांना असें कळलेलें दिसलें कीं, प्रिन्सिपलच्या मार्फत एकादी गोष्ट करण्यापेक्षां प्रिन्सिपलला टाळून केली, किंबहुना थोडा दोष देऊन केली तर वरिष्ठांकडे दाद लवकर लागते.

मागील वर्षीं म्हणजे १९३९ सालीं ऐच्छिक मराठी सुरू करण्याचा प्रश्न निघाला होता. जूनचे तिसऱ्या आठवड्यांत कॉलेज सुरू झालें व नवीन येणाऱ्या मुली ऐच्छिक मराठीची मागणी करूं लागल्या. ऐच्छिक विषयांची संख्या वाढल्यास त्यायोगें मुलींची संख्या

---

विचारलेंच् नाहीं. एकंदर ठराव पास होणारसें वाटत होतें तेव्हां मला त्यावर आक्षेप घेण्याचें अगर उलट बोलण्याचें कारण नव्हतें. किंवा अनुकूल बोलत असलांत तरी आधीं मला विचारून मग अनुकूल बोला असेंही सांगावेंसें वाटलें नाहीं. जवळजवळ मतमोजणीचे वेळीं एकानें विचारलें; पण याबद्दल प्रिन्सिपलला काय म्हणावयाचें आहे. ठराव पास झाला सभा, संपली तेव्हां मीं चौकशी केली कीं माझें म्हणणें जें मीं सविस्तर लेखी जोडलें होतें तें कोणी कोणी वाचलें होतें. त्यावर मला कळलें कीं तें कोणाही सभासदाकडे पाठविलेंच नव्हतें. अर्थात् या वेळीं सिंडिकेटचा निर्णय व माझें मत यांत फरक नव्हता. पण तें यदृच्छया घडलें.

वाढण्यास मदत होईल असें मला वाटे. बजेट तर एप्रिलमध्यें होऊन गेलेलें. तेव्हां तात्पुरती कांहीं सोय करण्याचें मनांत आणून मीं सिंडिकेटला पत्र लिहिलें कीं, 'अजून सेनेटसमेंत बजेट पास व्हावयाचें आहे. तरी ऐच्छिक मराठी सुरू करण्याची परवानगी द्यावी व त्यासाठीं रु. ६०० ची जास्त सोय व्हावी. सिंडिकेटनें मला सांगितलें कीं या प्रश्नाचा बोर्डामध्यें प्रथम विचार झाल्यानंतर हें प्रकरण सिंडिकेटपुढें ठेवा. याचा अर्थ असा कीं, यंदा ऐच्छिक मराठी नको व रु. ६०० जास्तही देत नाहीं. त्या वर्षी मराठीची सोय झाली नाहीं. पुढें बोर्डा-पुढें माझी कल्पना मीं मांडली. "कॉलेजचें शिक्षण लोकप्रिय होण्यास गायन, मराठी आदि विषय वाढविले पाहिजेत. त्यासाठीं एकदम सोय करा म्हटलें तर प्रश्न येतो कीं मुली किती व ऐच्छिकें वाढवून खर्च करायचा किती? तेव्हां सध्यां कॉलेजांत असलेल्या संस्कृत, इंग्लिशचें अर्धें काम करणाऱ्या माणसास निम्में काम द्या. उरल्यापैकीं कांहीं मी घेईन, कांहीं जोशी घेतील, असें मिळून ऐच्छिक मराठी सुरू करा. तात्पुरतें आम्ही मराठी शिकवूं. पुढें प्रोफेसर नेमा." बोर्डांत या प्रश्नाची खूप चर्चा होऊन असें करूं नये असें ठरलें. बोर्डाचें म्हणणें असली काड्यामोड्याची सुरवात उपयोगी नाहीं. जेव्हां केव्हां ऐच्छिक मराठी सुरू कराल तेव्हां प्रथम ठराव करून, जाहिरात देऊन शक्य तितका नामवंत मराठीचा प्राध्यापक मिळवावा व मग सुरवात करावी. मातृ-भाषांचा अभ्यास हें ठाकरसी विद्यापीठाचें वैशिष्ट्य; व पुण्यासारखें मराठी भाषेचें केंद्र असें शहर. येथें ऐच्छिक मराठी सुरू व्हावयाचें तर तें तितक्याच जोमांत सुरू झालें पाहिजे. संस्कृतच्या प्रोफेसरांस थोडें काम, इंग्लिशच्या प्रोफेसरांस थोडें काम, असलें आम्हांस पटत नाहीं. दुसरें, एकदा अशी सुरवात केली म्हणजे एका अध्यापकाला तात्पुरतें एक वर्षी काम दिलें, आतां दुसऱ्या वर्षी करूं द्या, पुढें तिसऱ्या, असें होतें; व मग तो हक्कच वाटतो. आणि सामान्य मनुष्याला वहिवाटीमुळें कायम करावें लागतें व चांगला नामवंत प्राध्यापक

मिळविणें बाजूला पडतें. कॉलेजचा शैक्षणिक दर्जा वाढविण्यास प्राध्यापक वर्ग जितका वेचक मिळवाल तेवढा हवा."

अर्थात् यामुळें मराठी ऐच्छिक सुरू कसें करावयाचें याचा निर्णय झाला. ही १९३९ सालची हकिगत. १९४०-४१ सालचे बजेटाचा प्रश्न निघावयाचा तेव्हां रजिस्ट्रारचें पत्र आलें कीं, मागचे वर्षीचा तुमचा प्रश्न राहिला आहे तो बोर्डापुढें मांडावा. बोर्डानें पुन्हा विचार करून ऐच्छिक मराठी सुरू करावें व जाहिरात देऊन त्यासाठीं अर्ज मागवावे असा ठराव केला.

या वेळीं संस्कृत, इंग्लिशचें निम्में काम करणारे अध्यापक मजकडे आले व मला विचारूं लागले कीं नवीन ऐच्छिक मराठी सुरू होईल त्यांत मला निम्में काम मिळेल का? अर्थात् बोर्डानें एकदा दिशा ठरवून दिली आहे त्याप्रमाणें तुम्हांस तें काम देतां येणार नाहीं असें मला सांगावें लागलें. पण त्यांना सुचलें म्हणा कीं सुचविलें म्हणा, त्यांनीं सिंडिकेटकडे आपणांस मराठीचें काम मिळावें म्हणून अर्ज केला. नुसता अर्ज करते तरी हरकत नव्हती. पण त्यांतच जातां जातां प्रिन्सिपलला दोष. मला मागें मराठी शिकविण्यास देण्याचें आश्वासन दिलें व आतां नाहीं म्हणतात. मी कायम नव्हतों तेव्हां मराठी शिकविण्यास योग्य होतों व कायम होतांच मी संस्कृत व मराठी शिकविण्यास अपात्र* झालों कीं काय?"

---

* I may add that six months ago, when the college authorities wished to start the same vol. I was given to understand that I would be a full-timer and the new vol. could be managed with the present staff.

And now I am surprised to find that— I cannot be a full-timer as I was given to understand. I doubt whether I have lost competence to teach entire course of Sanskrit and some Marathi after I am made permanent by the Syndicate.

एकाद्या योजनेचा विचार करीत असतां सहजच तिची चर्चा सहकारी प्राध्यापकांजवळ करावी लागते. कांहीं वेळेला योजना अमलांत येतात; कांहीं वेळ येत नाहींत. अशा वेळेला केलेल्या चर्चा या नुसत्या चर्चा असतात, आश्वासनें नसतात. प्रिन्सिपल स्वतंत्रपणें कोणाला असें काम देण्याबद्दल वचन देऊं शकत नाहीं. नवें ऐच्छिक सुरू करण्याच्या पद्धतीबद्दल दोन विचारसरणी असूं शकतील व दुसरी विचारसरणी बोर्ड अगर सिंडिकेट यांचेपुढें मांडण्यास हरकत नसावी. पण जातां जातां प्रिन्सिपलला दोष कां व तोही केव्हां? तर एकटा प्रिन्सिपलच सहाभूतीनें त्यांची बाजू उचलून धरीत असतांना! हा अर्ज बोर्डापुढें आला तेव्हां बोर्डानें मला विचारलें, "आणि याच मंडळींना कायम करण्यास तुम्ही धडपडत होतां ना! कायम होण्याबरोबर या प्राध्यापकानें पहिली गोष्ट केली ती ही कीं, प्रिन्सिपलला दोष देऊन वरिष्ठांकडे अर्ज केला."

"होय. असें झालें खरें," असें म्हणण्याखेरीज मी तरी दुसरें काय उत्तर देणार! पुढें बोर्डानें जाहिरात देऊन अर्ज मागविण्याचेंच ठरविलें.

पुढें सिंडिकेटमध्यें हा प्रश्न निघाला तेव्हांही कॉलेजमध्यें आहेत त्या प्राध्यापकांमधून तजवीज होत नसेल तर जाहिरात देऊन अर्ज मागवावे असा ठराव झाला व या प्राध्यापकाबद्दल प्रिन्सिपलला कांहीं वाटत असेल तर तिनें त्याची सोय करावी अशी सूचना बोलतांना दिली गेली. पण सूचना दिली तरी प्रिन्सिपल काम कसें देणार. कारण नवीन ऐच्छिक विषयासाठीं प्राध्यापकाची शिफारस करणें हें बोर्डाचें काम होतें. आहेत याच इतर विषयांचे मंडळींना ऐच्छिक मराठी द्यावयाचें नाहीं असें ठरलें होतें. सिंडिकेटनें अमुक एका अध्यापकास मराठी विषयाचें काम द्यावें असा स्पष्टच ठराव केला असता तर वेगळें. प्रि. गाडगीळ बोर्डाचे चेअरमन् त्यांना हा ठराव मीं कळविला. त्यांनीं सांगितलें कीं, आहेत त्या प्राध्यापकांमधूनच मराठीच्या अध्यापनाची सोय होते कीं नाहीं याचा आम्हीं विचार केला आहे व तशी होऊं

शकत नाहीं असें आमचें मत आहे. तरी तुम्हीं जाहिरात द्यावी. त्याप्रमाणें जाहिरात केव्हां द्यावयाची वगैरे सूचना प्रो. जोशांना देऊन मी उन्हाळ्याचे सुटींत कोकणांत गेलें. कारण माझे गैरहजेरींत प्रो. जोशी माझे ऑफिसचें काम पाहणार होते.

येथपासून खऱ्या भानगडींना सुरवात झाली. प्राध्यापकांना एकदम एक कॉमनरूम सभा घेण्याची जरूरी वाटली. प्रो. जोशी यांच्या सरळपणाचा व भिडस्तपणाचा फायदा घेऊन त्यांनीं त्यांना सभा घेण्यास भाग पाडलें. जोशी कॉमनरूमची अधिकृत ( formal ) सभा घेण्यास कबूल नव्हते म्हणून ही सभा अनधिकृत ( informal ) झाली. सभेनें सदरहू अध्यापकाला मराठी शिकवावयास द्यावें अशा आशयाचा ठराव पास केला व तो परस्पर वरिष्ठमंडळाकडे पाठविलाही. प्रो. जोशी मत न देतां तटस्थ राहिले.

ही एप्रिल १९४० मधली हकिगत. ता. २० फेब्रुवारी १९४० रोजीं या प्राध्यापकांनीं लिहिलेलें पत्र मनःपूर्वक होतें असें मानावयाचें तर या बाबतींत त्यांनीं मला टाळण्याचें कारण नव्हतें. मी परगांवाहून येईपर्यंत थांबण्यास व मला पत्रानें विचारण्यासही कांहीं हरकत नव्हती. माझी त्यांचे बाबतींत सहानुभूतीची भूमिका होती. या विषयांत मतभेद झाला असता तरी त्यांचें म्हणणें मला बोर्डाकडे व सिंडिकेटकडे पाठविणेंच होतें; पण मी नसलेली बरी असाच त्यांचे गुरूचा त्यांना सल्ला होता व म्हणून त्यांनीं मला मुद्दाम टाळलें. कायम झालों. आतां प्रिन्सिपलची जास्त फिकीर करण्याचें कारण नाहीं. फार तर तक्रारी करतील. त्यामुळें कोणी एकदा कायम केलेलें बदलत नाहीं. ही सरळ विचारसरणी.

सभा झाल्यावर एकानें अगदीं काय साधीच गोष्ट घडली असें दाखवीत मला कळविण्याची शिष्टाई केली व लिहिलें, "कांहीं नाहीं हो कमळाबाई! घेतली झालें आम्हीं एक सभा. आतां तुम्ही पुण्यास आलांत कीं नाहीं म्हणजे आपण मराठी विषयाची वाटणी निश्चित

करूं व आपण सगळ्यांनीं शिफारस केली म्हणजे ती सिंडिकेट मान्य* करणारच!" कशाही मार्गानें असो पण त्यांना विश्वास उत्पन्न झाला होता कीं आपण करतों तें सिंडिकेटला पसंत आहे.

कोकणांतून परत आल्यावर अशी अनधिकृत सभा कां घेतली याबद्दल बहुतेक प्राध्यापकांचे जवळ मीं चर्चा केली. कोणी कांहीं, कोणी कांहीं कारणें सांगितलीं. पैकीं एकानें सांगितलें कीं,

(१) सदरहू अध्यापकास काम मिळावें अशी चॅन्सेलरसाहेबांची इच्छा होती म्हणून आम्हीं ही सभा केली.

(२) तुमचेच एक माजी सहकारी या खटाटोपांत आहेत.

यानंतर जून १९४० पासून ज्या गोष्टी घडल्या त्या पाहतां या प्राध्यापकांचे ठिकाणीं उत्पन्न झालेला वरिष्ठ मंडळाबद्दलचा विश्वास बरोबर होता असें दिसलें.

पण कॉलेजच्या ज्या अनन्यभक्तासाठीं हा अनधिकृत सभेचा खटाटोप झाला त्याच अध्यापकानें याच महिन्यांत याहून बरी नोकरी मिळतांच ती पतकरिली व कॉलेज सुरू होण्याचे दिवशीं राजिनामा पाठविला. रीतीप्रमाणें दुसरीकडे अर्ज करतांना प्रिन्सिपलच्या मार्फत अर्ज करणें व महिन्याची सूचना देणें हे साधे शिष्टाचारही त्यानें पाळले नाहींत.

राजिनामा चॅन्सेलरसाहेबांकडे पाठवून पुढें काय करावयाचें, या मोकळ्या झालेल्या इंग्लिश-संस्कृत part-time लेक्चररचे जागेसाठीं

---

* 30 April 1940.

I am confidant that if we put our heads together we shall reach definite conclusions and submit a clear cut scheme to the Board, which they are bound to approve. The next step is easy, for the Syndicate will be only too glad to have such a scheme presented to them. They will lap it up eagerly.

जाहिरात द्यावयाची कीं नाहीं याबद्दल मीं पत्रानें सूचना मागतांच, त्याचें कांहीं उत्तर न देतां, अनधिकृत सभेची हकिगत बोर्डाला कळविली होती कीं नाहीं याबद्दलच एक प्रश्नमालिका उत्तरासाठीं आली. जणूं कांहीं प्रिन्सिपलनें अनधिकृत सभेची हकिगत बोर्डाला न कळवितांच 'मराठी'साठीं दडपून जाहिरात दिली होती व त्यामुळें हा बिचारा भक्ष गेला. जोंपर्यंत दुसरीकडे नोकरीला गेलेल्या माणसाला सिंडिकेट परत आणीत नव्हतें तोंपर्यंत जाहिरात देऊन अर्ज तर मागविण्यास हवेच होते. पण जाहिरातही अडून राहिली व त्यामुळें महिना दीड महिना कॉलेज सुरू; पण मुलींना तास मोकळे. कारण प्राध्यापकच नाहींत. या वेळीं इंग्लिश, मराठी, संस्कृत व ड्रॉइंग या चार विषयांची अशी स्थिति झाली. कारण सिंडिकेटनें मान्यता दिल्याखेरीज नेमणूक करावयाची नाहीं असें कळविल्यामुळें बाकीच्या दोन्ही जागाही थोडे दिवस मोकळ्या ठेवाव्या लागल्या. अनधिकृत सभेच्या शिफारशी बोर्डानें मानल्या नाहींत याबद्दल हा राग होता व तो प्रिन्सिपलवर निघत होता. यावरून प्राध्यापकांचेनव्यें उत्पन्न झालेला वरिष्ठ मंडळाबद्दलचा विश्वास बरोबर होता हें उघड दिसत होतें आणि त्या विश्वासांतच अनधिकृत सभेचें मूळ होतें. इतकें घडल्यानंतर प्राध्यापकांची बाजू उचलून धरण्याची मला वाटणारी माझी नैतिक जबाबदारी संपली व उरलेल्या तिसऱ्या प्राध्यापकाचे बाबतींत मीं तटस्थ राहण्याचें ठरविलें.

चॅन्सेलरसाहेबांनीं ही अनधिकृत सभा करण्यास सुचविलें असें म्हणणें अयोग्य होईल. सर्वाधिकार हातीं असतां त्यांना आडवळण घेण्याचें कारण काय? पण मध्यंतरीं कोणी तरी वरिष्ठांस आणि मुंबईच्या लोकांस जाऊन सांगावयाचें कीं, पुण्याच्या प्राध्यापकांचा असा कोंडमारा होतो आहे व इकडे पुण्याच्या प्राध्यापकांस सांगावयाचें कीं तुम्ही अमुक करा. अशी 'गडसासवड' लटपट झाली असणें अगदीं शक्य आहे. त्याचप्रमाणें नव्या सिंडिकेटच्या सभासदांचे मनांत असलेला

आश्रमाचे कार्यकर्त्यांबद्दलच्या पूर्वग्रहाचा फायदा घेऊन सांगावयाचें कीं हे आश्रमाचे लोक, यांची द्विधाभक्ति ( divided loyalties ) नोकरी विद्यापीठाची करतील व हित आश्रमाचे पाहतील. पण ही नवी मंडळी मात्र खरी एकनिष्ठ. विद्यापीठाचे केवळ अनन्यभक्त ( with undivided loyalties ) राहतील.

खालच्या अधिकारी मंडळाकडून इष्टप्राप्ति होत नाहीं असें दिसतां-च वरिष्ठ अधिकारी मंडळाकडे उघड अगर चोरून तक्रारी करून आपलें इष्ट साधावयाचें ही जगाची रहाटीच आहे. पण आपणापर्यंत येणाऱ्या गोष्टी ऐकून घेऊन त्यांतल्या मानावयाच्या किती, अशा प्रकारें, लपून लपून तक्रारी करणारांना आपण कितपत भर द्यावयाची व कोणतेंही मत बनविण्यापूर्वी आपणच नेमलेल्या अधिकाऱ्यांना याबद्दल विचारावयाचें, व चर्चा करावयाची हा विवेक वरिष्ठांनींच करावा लागतो. मी प्रिन्सिपल खरी पण आश्रमाची आजन्मसेविका; या दृष्टीनें माझें नांव एक काळ्या यादींत म्हणून मला बोलावून या विषयाची चर्चा करावीसें वाटलें नसेल. पण बोर्डाचे चेअरमन गाडगीळ तर होते. जवळ जवळ दहाबारा वर्षें गाडगीळ सिंडिकेटमध्यें कांहीं प्रमुख सभा-सदांपैकीं एक समजले जात, बहुतेक कमिट्यांत असत, व नेमणुका करण्यासाठीं ज्या कमिट्या नेमल्या जात त्यांत ते हटकून असावयाचेच. पण या 'अनन्यभक्तांचा' प्रश्न निघाल्यापासून ते नकोसे झाले. तेही नकोत तर बोर्डांतही प्रि. करमरकर, प्रि. पटेल आदि सभासद कांहीं थोडे नव्हते. पण इकडून तिकडून कळणाऱ्या माहितीखेरीज कोणा जबाबदार व्यक्तींना बोलावून त्यांच्याशीं या सर्व प्रश्नांची चर्चा करण्याची इच्छा वरिष्ठ अधिकाऱ्यांस कधींही झाली नाहीं.

१९३९ च्या जून मध्यें ऐच्छिक मराठीबद्दल मध्यंतरीं बोर्डाची सभा घेण्याइतका वेळ नव्हता म्हणून सिंडिकेटला थेट परवानगी विचारली तेव्हां बोर्डांत प्रथम हा प्रश्न काढून बोर्डाचें म्हणणें आम्हांस कळवा अशी सूचना आली. पुढें १० जानेवारी १९४० च्या रजिस्ट्रारचे

पत्रांत सांगणें हेंच कीं, कॉलेजची प्रत्येक गोष्ट बोर्डामार्फत बोर्डाच्या शिफारशींसह सिंडिकेटकडे* यावी. पण जून १९४० मध्यें ऐच्छिक मराठीच्या बाबतींत बोर्डाला विचारलें म्हणून चॅन्सेलरसाहेबांचा मज-वर राग; आणि येथपासून पुढें घडलें मात्र असें कीं, नेमणुकीबाबत बोर्डाची एकही शिफारस सिंडिकेटनें मान्य केली नाहीं. महिना महिना शिक्षकाखेरीज वर्ग मोकळे राहिले तरी चालेल पण सिंडिकेटचा ठराव झाल्याखेरीज पुढें मान्यता मिळेल म्हणून (in anticipation of sanction) नेमणूक करावयाची नाहीं अशा सूचना आल्या.

१८ फेब्रुवारी १९४० पासून जून १९४० पर्यंत चारपांच महिन्यांत इतक्या गोष्टी बदलल्या. अर्थात् या सर्वांचा परिणाम नवीन कायम झालेल्या प्राध्यापकांवर झाला नसता तरच आश्चर्य! इतर शिक्षकांसही वाटूं लागलें कीं आपलें आसन टिकवावयाचें असेल तर या नव्या मंडळीचे मर्जीनें वागलें पाहिजे. दिसायला गोष्टी किरकोळ म्हणून मी गप्प राहिलें. अशा स्थितींत यांनाही वाटूं लागलें कीं, प्रत्येक बारीक सारीक गोष्टही आम्हांलाच विचारून व्हावी, कारण आम्ही कायम नोकर व प्रिन्सिपल हा आश्रमाचा कार्यकर्ता म्हणजे भाडोत्री नोकर. वाऱ्याची ही बदललेली दिशा अनेक बारीकसारीक गोष्टींत मला पहिल्या सहामाहींत दिसली.

१९४०–४१ ची पहिली सहामाही संपली. दुसऱ्या सहामाहीच्या पहिल्याच दिवशीं विद्यापीठाचे तपासनीससाहेब प्रयोगशाळा आदि

---

* 10th January 1940.

"Such letters and any other matter suggestive of important changes must always be sent to the Syndicate through the Board with their recommendations. I think practically all matters should come through the Board unless of a very very urgent nature."

पाहावयास येऊन त्यांतून हिशेबाचें प्रकरण सुरू झालें. मागील वर्षा-पासून माझा प्रिन्सिपलचें काम सोडून फक्त प्रोफेसर म्हणून राहण्याचा विचार चालू होता तोही निश्चय ठरला व दुसऱ्या दिवशीच्या म्हणजे ता. १२ नोव्हेंबर १९४२ च्या बोर्डाचे सभेंत जूनपासून प्रिन्सिपलशिप नको म्हणून मीं अर्ज केला. पुढच्या पंधरा दिवसांत सरकारकुनाचा अहवाल सिंडिकेटपुढें येऊन या प्रकरणाचे सुरवातीस सांगितलेलें हिशेब-प्रकरण रंगूं लागलें. याच वेळीं पूर्वीचे इतिहासाचे प्रोफेसर सेवानिवृत्त होण्याचें ठरून पुढील वर्षीच्या व्यवस्थेचा प्रश्न निघाला. गतवर्षी कायम झालेल्या तिघांपैकीं एक अर्धा वेळ काम करणारे प्राध्यापक होते, त्यांनीं आपली त्या जागीं नेमणूक व्हावी म्हणून अर्ज केला. मागच्या अनुभवा-वरून मी आतां या बाबतींत तटस्थ होतें. जाहिरात देऊन अर्ज मागवावे व त्या अर्जांबरोबरच जुन्या, अर्धा वेळ काम करणाऱ्या प्राध्यापकाचे अर्जाचा विचार व्हावा अशी बोर्डानें शिफारस केली व त्यांना एकदम संपूर्ण काम देऊन मुख्य प्राध्यापक करण्याबद्दल स्पष्ट शब्दांत नापसंती व्यक्त केली. आतांपर्यंतच्या या वर्षांतील क्रमाप्रमाणें बोर्डाची शिफारस अमान्य होऊन सिंडिकेट त्यांना कायम करणार हें दिसत होतेंच. आणि तेही थोडा वेळ स्वस्थ बसते तर बोर्ड आणि सिंडिकेट यांच्यांत या नेमणुकी-वरून जास्त मतभेद झाला असता तरी व्यक्तिशः त्यांना कोणी दोष दिला नसता. परंतु बोर्डानें शिफारस न केल्यानें ते चिडले होते, व आपला राग कोठून तरी बाहेर काढण्याला व आपलें वरिष्ठमंडळांत वजन किती आहे व त्यामुळें बरोबरीचे प्राध्यापकही आपणाकडे कशा महत्त्वपूर्ण नजरेनें पाहतात हें दाखविण्याला कारणच शोधीत होते व त्यांना तसें कारण लवकरच मिळालें.

चौकशी कमिटीसाठीं हिशेब पाहणें, सामान तपासणें इत्यादि कामांत मी गुंतलें होतें, मला वेळ नव्हता. ८ फेब्रुवारी १९४१ रोजीं चौकशी कमिटीची बैठक. दरवर्षी पार्टिंग फीस्टची सेक्रेटरी नेमून व्यवस्था करावयाची हीच वेळ. तेव्हां प्रो. जोशांना मीं सांगितलें कीं

आतां मी कॉमनरूम मीटिंग घेत नाहीं. मला वेळही नाहीं व उत्साहही नाहीं. तुमच्यावरच हें काम मी सोपवितें. त्याप्रमाणें मुलींतून सेक्रेटरी निवडणें वगैरे कामें त्यांनीं करून काम सुरू केलें. यामध्यें प्राध्यापकांची कॉमनरूम सभा घेतली नाहीं हें कारण त्यांना सापडलें. प्रत्यक्ष पार्टीचे आधीं दोन दिवस त्याबद्दल उघड गडबड सुरू झाली. मुलींची सेक्रेटरी येऊन सांगूं लागली, इतिहासाचे प्राध्यापक पार्टीस येणार नाहींत. कारण त्या दिवशीं त्यांना मुंबईस जावयाचें आहे. 'आठ वाजतां' पार्टी झाली तरच ते येतील. त्यांना सोइस्कर पडेल असा दिवस बदलून घेण्याचीही मीं मुलींना परवानगी दिली. तेव्हां ती म्हणाली, " अंहं! कांहीं झालें तरी ते येणार नाहींत. कारण तारीख प्रथम ठरवितांना त्यांना विचारलें नव्हतें." इतरही वेगवेगळ्या ठिकाणांहून बातम्या, कीं सदरहू प्राध्यापक येणार नाहींत. पण त्यांचेकडून जोंपर्यंत प्रत्यक्ष तक्रार नव्हती तोंपर्यंत मीं वाट पाहण्याचें ठरविलें.

शेवटीं त्यांचे एक सहकारी मजकडे खाजगी विनंति करावयास आले. ते म्हणाले, " मला या पार्टीला यायची इच्छा आहे. कारण मी पुढच्या वर्षीं नसणार. तुम्हीही नसणार. तेव्हां असें कराना. कांहीं कारण काढून उद्यांची तारीख बदला. पुन्हा एकदा कॉमनरूम सभा घेऊन त्यांत तारीख ठरवा. मग मला येतां येईल.

मीं म्हटलें, " मीं यंदा कॉमनरूम सभा घेतली नाहीं हें खरें. कोणत्या किचकट व त्रासदायक कामांत मी आहे हें तुम्ही पाहतांच. असल्या चौकशा वीस पंचवीस वर्षांत एकादे वेळ होतात. असल्या प्रसंगांत मी असतां नाहीं घेतली एक वेळ सभा. आणि दर वेळीं सभा घेतों तेव्हां तरी सर्व निर्णय सभेंत होतो का? निकाल लागत नाहीं. शेवटीं प्रिन्सिपलनें आपल्या विचारानें निर्णय करावा असाच निर्णय जास्त वेळां झाला आहे. शिवाय प्रिन्सिपलला अडचणीचे वेळीं एकादी सभा बाजूस सारण्याचा अधिकार नसतो का?" ते म्हणाले, " याबद्दल सर्व प्राध्यापकांनीं लेखी तक्रार करावी अशी त्यांची खटपट होती. पण

बहुमत मिळालें नाहीं. पण खरा राग त्यांचा हा नाहीं. इतिहासाचे मुख्य प्राध्यापकाचे जागीं बोर्डानें त्यांची शिफारस केली नाहीं हा खरा राग व त्यामुळें चवताळून ते कांहीं तरी करताहेत."

"त्यांना वाईट वाटणें साहजिक आहे. पण तो राग या ठिकाणीं काढण्याचें कारण नाहीं. चौकशी कमिटीमुळें मलाही रजिस्ट्रारच्या ऑफिसचा अतिशय राग आला आहे. माझीही मनःस्थिति नीट नाहीं. पण कॉलेजच्या नेहमींच्या कामांत तें आणणें बरोबर नाहीं. मी पार्टीस येणार आहे, त्यांनींही यावें व तुम्हीही या पार्टीला. तुम्हांलाच मीं प्राध्यापकांच्या हक्कांचा मोठा अपहार केला असें वाटत असलें तर मात्र येऊं नका. नसेल तर अवश्य या." "मला कांहीं इतकी प्राध्यापकांचे हक्कावर गदा आलीसें वाटत नाहीं" ते म्हणाले, "पण ते गैरहजर राहणार व ते गैरहजर असतां मी हजर राहिलों तर ते रागावतील." थोडा वेळ थांबून ते पुढें म्हणाले, "That will be detrimental to my future prospects."

प्रिन्सिपलनें येवढी गोष्टसुद्धां स्वतः ठरविणें बरोबर नाहीं असें सर्वजण म्हणून अर्ज करते तर त्यांत मला येवढें वाटलें नसतें. तो अर्ज एकदा बोर्ड व सिंडिकेटपर्यंत जाऊन प्रिन्सिपलच्या अधिकाराच्या मर्यादा ठरल्या असत्या. पण 'ते रागावतील! ते रागावतील' हें सूत्र मी मागच्या सहामाहीपासून ऐकत होतें. आपलें कॉलेजांतील आसन अमुक एका प्राध्यापकाला संतुष्ट ठेवण्यावर आहे असें एकदां इतरांना वाटूं लागलें व त्यावर कॉलेजांत वागण्याचें तंत्र ठरूं लागलें म्हणजे कोणतीही शिस्त संस्थेच्या कामांत राहणें शक्य नाहीं, (व ही परिस्थिति माझ्या पश्चात् दोन वर्षांत वाढत आहेच.) खरें म्हणजे सहा वाजतां पार्टी घ्यावी कीं आठ वाजतां घ्यावी हा मुलींचा वादही प्राध्यापकांची ही मनोभूमिका पाठीमागें नसती तर इतका रंगता ना!

वरील प्राध्यापकांना पुन्हा मीं दुसरे दिवशीं कळविलें कीं, "तुमच्या मित्रांना त्यांचीं गैरहजर राहण्याचीं कारणें मला पत्रानें कळविण्यास

सांगा. त्याबद्दल मी दुपारीं ४ वाजेपर्यंत निर्णय घेतें." काय प्रिन्सिपल विरुद्ध तक्रारी आहेत त्या कळूं देत तरी एकदा. तक्रारी खऱ्या असतील तर लेखी देण्यास हरकत काय ?

त्यांची शिफारस झाली नाहीं हा खरा राग. हें कारण लेखी त्यांना देतां येत नव्हतें. पण कॉमनरूम सभा घेतली नाहीं हें कारण ते कळवूं शकले असते. प्रिन्सिपलच्या हक्काचे दृष्टीनें मला तें पटत नव्हतें व आजही पटत नाहीं.* पण माझे कारकीर्दीतील ही शेवटची पार्टी. १० मार्चला म्हणजे आणखी पंधरावीस दिवसांत माझें काम संपत होतें व प्रिन्सिपलशिपचे एकेक दिवस मोजण्याइतकी मी कंटाळलें होतें. खरोखरच ते ही तक्रार कळविते तर पार्टिंग फीस्ट बदलून तीच पार्टी प्रिन्सिपलची पार्टी म्हणून देण्याचें मीं ठरविलें होतें. कारण प्रिन्सिपल-शिप सोडतांना प्राध्यापक व विद्यार्थिनी यांना मी पुढें पार्टी देणार होतें ती आतांच दिली. पण माझा प्रयत्न खटका उडूं न देण्याचा होता व त्यांना तर खटका उडण्यास हवा होता ! त्याखेरीज त्यांच्या सामर्थ्याचें प्रदर्शन मुली व प्रिन्सिपलसमोर होणार कसें ?

---

* सिंडिकेटनें अजून या प्रश्नाचा विचार करावा व आपलें धोरण ठराव करून स्पष्ट करावें. 'कॉमनरूम सभा न घेतां, अडचणीच्या वेळींही एकादी गोष्ट स्वतःचे अधिकारांत करण्याचा प्रिन्सिपलला अधिकार नाहीं, असें धोरण ठरल्यास फार सोय होईल. कॉलेजांतील इकडचा वर्ग तिकडे बसविण्यासही विद्यापीठाचे रजिस्ट्रारला विचारा-वयाचें व तें बरोबर आहे कीं नाहीं हें त्याच्या कारकुनानें ठरवावयाचें. मग प्रिन्सिपलची जागा अजीबात रद्द करण्यास हरकत नाहीं. मुंबईहून हुकूम यावयाचा व त्याचा अर्थ अनधिकृत सभेंत (informal) प्राध्यापकांनीं करावयाचा. ते सांगतील तसें प्रिन्सिपलनें करावयाचें. मग एकादा कारकून तरी कशाला ? गडी नेमला तर तोही हें प्रिन्सि-पलचें काम फार पाडील, व खर्चांत फार मोठी बचत होईल.

मजवरील दैवी आपत्तींनींही या प्रसंगीं हातभार लावण्याचें मनांत आणलें होतें. पार्टिंग फीस्टचे दिवशींच म्हणजे २३ फेब्रुवारी रोजीं संध्याकाळीं माझे थोरले दीर बापूसाहेब, माझ्या जाऊबाई, सासूबाई आदि सर्व मंडळी कांहीं कार्यप्रसंगानें घरीं पाहुणी आली. छातीच्या दुखण्याचा विकार बापूसाहेबांस होता. तो दोनचार दिवसांत एकाएकीं वाढला व त्यांना तेथून हलविणें अशक्य होऊन बसलें. हेंच दुखणें पुढें वाढत गेलें व १४ मार्च १९४० रोजीं कॉलेजवर माझे घरींच त्यांचें देहावसान झालें. बापूसाहेब हे आमचे घराचा मुख्य आधार. मागें ८० वर्षांची वृद्ध आई व दुखणाईत बायको. या प्रसंगीं धीर धरून उभें राहणें व इतरांस सावरून धरणें मजकडेच आलें. १५ तारखेस सिंडिकेटची सभा. घरांतील या परिस्थितीमुळें या सभेस मी जाऊं शकलें नाहीं. सर्वांच्या अपेक्षेप्रमाणें अर्धें काम करणाऱ्या इतिहासाच्या प्राध्यापकाची नेमणूक मुख्य प्राध्यापक म्हणून सिंडिकेटनें केली. माझाही राजिनामा याच सभेंत मंजूर झाला व पुढील वर्षापासून मी संस्कृतची प्राध्यापक झालें.

या वेळेपासून प्रि. गाडगीळ बोर्डाचा राजिनामा देऊन मोकळे झाले. तरी पण नवीन प्रिन्सिपल येईपर्यंत काम चालू ठेवणें मला प्राप्त होतें. याच महिन्यांत २५ मार्च रोजीं बोर्डाची बजेटसाठीं सभा होती. अजून सिंडिकेटकडून ठराव मजकडे आले नव्हते व आल्यानंतर रीतीप्रमाणें प्राध्यापकांस ठरावाच्या प्रती जाऊन त्यांना नेमणुका कळावयाच्या. अधिकृत तऱ्हेनें ही नेमणूक कोणाला कळली नव्हती. पण अनधिकृत पद्धतीवरच हल्लीं सर्व राज्यकारभार चालू होता. उपरोक्त प्राध्यापकांना खाजगी तऱ्हेनें ही नेमणूक कळली, व "मला पुढच्या वर्षीं फुलटाइम प्रोफेसरचें काम आहे. इतकेच तास मी काम करीन इ." पत्रें लिहिण्यास त्यांनीं सुरवात केली. जणूं कांहीं प्रिन्सिपलला व बोर्डाला यांना तास किती द्यावयाचे तें माहीत नव्हतें. पण मग सिंडिकेटमध्यें जणूं स्वतःला मिळालेल्या विजयाचें प्रदर्शन बोर्डापुढें व प्रिन्सिपलपुढें व्हावें कसें!

याचा सर्वांनाच राग आला. बोर्ड व सिंडिकेट हीं दोन्ही वरचीं कार्यकारी मंडळें. यांचे मतभेद नोकरांच्या नेमणुकांबाबत होतील किंवा नाहीं. त्यावरून नोकरानें आपली नोकराची भूमिका बदलून वरिष्ठांपुढें जयपराजयाचें प्रदर्शन करणें व त्यांना सूचना देण्यास सुरवात करणें योग्य नव्हे. अशी वागणूक सुरू झाल्यास कोणत्याही संस्थेंत शिस्त राहणार नाहीं. मी प्रिन्सिपलशिप् सोडल्यानें मला जरी ह्याचें आतां सोयरसुतक मानण्याचें कारण नव्हतें तरी कॉलेजच्या व्यवस्थेच्या दृष्टीनें याला आळा पडणें जरूर होतें. याला आळा घालण्यासाठीं बोर्डानें एक ठराव करून दरवर्षीं प्राध्यापकांचे वागणुकीबद्दल प्रिन्सिपलकडून (Confidential reports) मागण्याची पद्धति सुरू करण्याचें ठरविलें व या प्राध्यापकाचे बाबतींत अहवाल बोर्डाचे चेअरमननें शब्दयोजना करून बोर्डांतच लिहविला. नेमणूक झाल्यानंतर Confidential report जाणें चमत्कारिक दिसतें म्हणून येथील सर्व परिस्थिति चॅन्सेलरसाहेब व सिंडिकेटचे इतर सभासद यांना समजावून सांगण्याचें काम लेडी ठाकरसी यांचेकडे सोपविलें.

सिंडिकेटच्या सभेला सुरवात झाली. लेडी ठाकरसी आणि चॅन्सेलर व इतर सभासद यांची काय काय चर्चा झाली असेल ती असो, पण सभेचे पूर्वीं लेडी ठाकरसी यांनीं मला बोलावून सांगितलें कीं, “मला काय करायचें तें मीं केलें. काय होईल तें पहा. मला मात्र दोष देऊं नका.” सभेचा एकंदर रंगही फारसें ऐकून न घेण्याचाच होता. बोर्डांत दोन मतें नव्हतीं व बोर्ड पुनः पुन्हा त्या प्रश्नावर जोर देत होतें; तेव्हां खरें म्हणजे बोर्डाचे कांहीं सभासद व सिंडिकेटचे कांहीं सभासद यांची कमिटी नेमून या प्रकरणाचा सर्व बाजूंनीं विचार करायचा किंवा आणखी एक चौकशी कमिटी नेमावयाची. पण ठराव मागून आला या एका आक्षेपानें तो उडवून दिला गेला, त्याचा विचार करायचा नाहीं असा ठराव झाला; व अशी रिपोर्टाची पद्धति बोर्डानें सुरू केली याबद्दल बोर्डालाच दोष देण्यांत येऊन

सिंडिकेटनें कळविल्याखेरीज ही Confidential report ची पद्धति सुरू करूं नये असाहि आणखी ठराव पडला. लेडी ठाकरसी यांचे खेरीज बोर्डाचा दुसरा सभासद सिंडिकेटमध्यें नाहीं तेव्हां ठरावाची माहिती देणें मजकडेच आलें. व ठराव बोर्डानें लिहिला तरी प्रिन्सिपलचा रिपोर्ट म्हणूनच लिहिला. रिपोर्ट वाचून मुळीं चॅन्सेलरसाहेब संतापलेच व "it's a plot, you have damned him" म्हणून त्यांनीं मला सांगितलें. परिस्थितीचें स्पष्टीकरण देऊं लागलें तर तें ऐकून घेईनात. "मी फक्त तुम्हांला एक प्रश्न विचारतों. तुम्ही गतवर्षी त्यांचेबद्दल अनुकूल लिहिलें होतें कीं नाहीं. तेवढें फक्त उत्तर द्या."

तेवढें उत्तर अर्थात् "होय लिहिलें होतें. पण पुढील वर्षांतील परिस्थिति बदलली आहे." झालें. कोर्टाचे पद्धतीप्रमाणें साक्षीदाराला अडवून अनुकूल उत्तर काढून घेऊन त्यांचें म्हणणें तात्पुरतें खरें केलें व मीच अकारण द्वेषानें (?) मत बदलतें आहे असा देखावा निर्माण केला गेला. पण माझें म्हणणें काळानें खरें करून दाखविलें आहे. पुढच्या वर्षीं जर वेगळ्या गोष्टी घडल्याच तर त्या पुन्हा विचारांत घ्यावयाच्या नाहींत असें कसें होईल? खुद्द चॅन्सेलरसाहेबांनींच त्यांची बाजू आतांपर्यंत घेतली होती तरी पण त्यांना सुद्धां याच्या पुढच्याच सभेंत त्याच प्राध्यापकाला नव्या प्रिन्सिपलची बिनशर्त माफी मागण्यास लावून ताकीद देण्याचा प्रसंग कां आला? पुढच्या सभेंत मी असतें व जागांची अदलाबदल झाली असती तर मलाही नसतें का विचारतां आलें? "काय हो! या माणसाला तुम्ही सपशेल माफी मागावयास लावून ताकीद कां देतां? मागच्याच सभेंत त्याची बाजू घेऊन तुम्ही प्रिन्सिपलला बोललां होतां कीं नाहीं? प्रिन्सिपलनें त्याची नुसती अपकीर्ति (damned) केली असेल तर तुम्हीं सिंडिकेटचा ठराव करून त्या अपकीर्तीवर शिक्कामोर्तब कां करतां? प्रिन्सिपलला पुरें बोलूं देणें व तिच्या सूचना काय आहेत तें ऐकणें येवढें सौजन्य तरी तुम्हीं तिच्या बाबतींत दाखविलेंत का?"

या सभेंतही मी विचारूं शकलें असतें, "चॅन्सेलरसाहेब, कट-कट ज्याला म्हणतां येईल तो तुमच्याच छायेंत वाढतो आहे व तुमच्याच नांवावर विकतो आहे." पण उलट उत्तर देऊन चॅन्सेलरचा अपमान होऊं नये म्हणून थांबलें. कारण सुनेचा पाय लागला तरी सुनेनेंच नमस्कार करावयाचा व सासूचा पाय लागला तरी सुनेनेंच नमस्कार करावयाचा. मुंबईहून चिथावणी मिळून प्राध्यापकांची अनधिकृत सभा होते तो कट नव्हे, अमुक प्रोफेसरास नाखूष केलें तर वरचे वशिले तुटतात या विचारानें चार प्राध्यापक मिळून पार्टीला येत नाहींत तो कट नव्हे, विद्यापीठाचे सरकारकून व रजिस्ट्रार हलगर्जीपणानें, दूषित पूर्वग्रहानें अवास्तव रिपोर्ट लिहून आजी व माजी दोघां प्रिन्सिपलवर बालंट आणून त्यांची जन्माची कामगिरी धुळींत मिळविण्याची वेळ आणतात तो कट नव्हे, आणि बोर्डानें फेरविचार करा म्हणून ठराव* केला तर तो कट काय? आणि तो कट करतात कोण? तर लेडी ठाकरसी, प्रि. करमरकर, प्रि. पटेल व इरावतीबाई! प्रिन्सिपलशिप मीं आधीं सोडलीच होती. अन्यायाचे शब्द ऐकून नोकरी करण्याची मला जरूर नव्हती. म्हणून त्याच वेळीं प्रोफेसरचे कामाचाही राजिनामा देऊन मी मोकळी झालें.

माझे मागून प्रिन्सिपलचे जागीं प्राध्यापक जोशी यांची नेमणूक करण्यांत आली. ता. २४ मे १९४१ रोजीं त्यांची नेमणूक झाली व

---

* माझा प्रिन्सिपलशिपचा राजिनामा मंजूरही झाला आहे असें असतां मला आतां असा रिपोर्ट करण्यास कां भाग पाडतां? शिवाय या रिपोर्टाचा सिंडिकेटमध्यें विचार होणें शक्य नाहीं असें प्रिन्सिपल सांगत असतां बोर्डानें मुद्दाम ठराव करून रिपोर्ट करण्यास सांगितलें व सर्व वर्षभराची परिस्थिति पुढें मांडून प्रिन्सिपलनें रिपोर्ट लिहिण्याबद्दल आपली अनिच्छा दर्शविल्यावर चेअरमननें बोर्डाचे सभेंत-अर्थात् प्रिन्सिपलचा रिपोर्ट म्हणून- हा रिपोर्ट लिहविला.

ता. ३ जून १९४१ रोजीं त्यांनीं राजिनामा पाठविला. कारण आतां आपणांस कोणीही शास्ता नाहीं, जणूं कांहीं 'निर्वीरमुर्वीतलं' झालें आहे, असें प्राध्यापकांना वाटूं लागलें. आम्हीं कांहीं केलें तरी सिंडिकेट विचार करणार नाहीं असें सहजच त्यांना वाटलें व तें वाटणें जोशांना पुण्यास आल्याबरोबरच जाणवलें. पुण्यास आल्या दिवशीं त्यांनीं काम पाहावयास सुरवात केली. कांहीं नवीन नेमणुका झाल्या होत्या ती मंडळी भेटावयास येऊं लागली. मागचे इतिहास-अर्थशास्त्राचे part-timer आतां मुख्य प्राध्यापक झाले होते व उरलेल्या निम्या कामासाठीं एका अध्यापिकेची नेमणूक झाली होती. ही नवी अध्यापिका प्रिन्सिपलला जाऊन भेटली व शिकविण्याच्या विषयांबद्दल चौकशी करूं लागली. जोशांनीं पत्र देऊन तिला उपरोक्त प्राध्यापकांना भेटावयास सांगितलें, व त्यांना लिहिलें कीं, "या नव्या अध्यापिकेला तुम्ही कोणते विषय घ्यावयाचे याची माहिती द्या." त्यांनीं तिरसटपणें घरीं भेटावयास आलेल्या अध्यापिकेला जवळ जवळ घालवून दिलें व जोशांना एक मासलेवाईक पत्र लिहिलें. पहिल्या दिवसाची ही सुरवात व सहकाऱ्यांची अशी वृत्ति पाहून काम करणें कठीण होणार असें त्यांना दिसलें व ३ जूनला आपला राजिनामा, वरील प्राध्यापकाचे पत्रासह पाठवून दिला. प्राध्यापकाचे पत्रांतील भाषाच इतकी बिनतोड होती, कीं तिचें समर्थन करणें सिंडिकेटच्या सभासदांस कठीण वाटलें असावें. शिवाय दुसऱ्याच दिवशीं सेनेटची सभा. त्यांत इरावतीबाईनीं सिंडिकेटच्या कारभाराची चौकशी करण्यास कमिटी नेमावी असा पाठविलेला ठराव चर्चेस निघणार होता. प्राध्यापकाचें हें पत्रही तेथें वाटलें जावयाचें; तेव्हां हें पत्र लिहिणाऱ्या प्राध्यापकानें प्रिन्सिपलची बिनशर्त माफी मागावी असा ठराव झाला. शिवाय जोशांना प्रिन्सिपलचे कामांत पाठिंबा देण्याचेंही आश्वासन* सिंडिकेटनें देऊन त्यांना

* Text of the resolutions of the Syndicate, passed in a Meeting held on 18th June 1941 :

आपला राजिनामा मागें घेण्यास लाविलें. मिळालेल्या आश्वासनामुळें जोशांनीं राजिनामा मागें घेतला खरा; पण वरिष्ठांचा फारसा पाठिंबा प्रत्यक्ष व्यवहारांत त्यांना मिळाला नाहीं. सिंडिकेटनें एवढें केलें कीं, बोर्डांतील कांहीं मंडळी बदलून व त्यांचे जागीं नवी मुंबईची सिंडिकेटमधील मंडळी नेमून बोर्ड व सिंडिकेट यांचें एकमत होईल व गतवर्षीप्रमाणें बोर्ड विरुद्ध सिंडिकेट असा देखावा दिसणार नाहीं एवढी खबरदारी घेतली. पण प्रिन्सिपलचे शब्दास मान द्यावयाचा नाहीं हें धोरण बदललें नाहीं. यामुळें सहकाऱ्यांची बेपर्वाई जास्तच वाढली. आतांपर्यंत फक्त उद्धटपणें पत्रें येत; आतां तोंडावर उद्धटपणें बोलून "माझ्याबद्दल असा शेरा लिहितां! Do you know what your superiors think of you?" असें प्रिन्सपलला तोंडावर विचारण्यापर्यंत प्राध्यापकांची मजल गेली. आणि कां जाऊं नये? प्रत्येक गोष्टींत प्रिन्सिपलचा शब्द खालीं पडेल असेच निर्णय झाले होते.

---

(a) With regard to Prof. V. M. Joshi's resignation as Officiating Principal of the S. N. D. Thackersey College for Women, Poona, it was resolved that Prof. V. M. Joshi be requested to withdraw his resignation and that the Syndicate assures him of its full support in the discharge of his duties as the Officiating Principal of the College.

(b) It was resolved that the said professor be informed that the Syndicate entirely disapproves of the tone of his correspondence with Prof. V. M. Joshi and requires him to send an unqualified appology to Prof. V. M. Joshi, M. A. The Syndicate further warns the above-mentioned professor that absence of co-operation with the Principal will be taken serious note of.

१६ जून १९४१ रोजीं कॉलेज सुरू झालें. कॉलेजचे तास चालू होण्याचे वेळीं एक गृहस्थ कॉमनरूममध्यें आले व एक पत्र दाखवून म्हणाले, " मला कामावर रुजू करून घ्या. मला तुमचे कॉलेजांत रुजू होण्याबद्दल हें आलेलें रजिस्ट्रारचें पत्र." जोशांना सांगावें लागलें कीं, मी प्रिन्सिपल आहे तेव्हां माझेमार्फत तुम्हांस नेमणुकीचें पत्र अजून जावयाचें आहे. तुम्हांला परस्पर पत्र आलें असलें तरी तुम्हांला रुजू करून घेण्याबद्दल मला रजिस्ट्रारकडून पत्र आलेलें नाहीं. मी आज तुम्हांस रुजू करून घेत नाहीं व काम देत नाहीं. बोर्डानें तुमची शिफारस केली असली तरी १८ तारखेस सिंडिकेटची सभा आहे त्या वेळीं तुमची नेमणूक तेथें पक्की ठरेल व मग मी तुम्हांस रुजू करून घेईन."

कोणाचीही नेमणूक सिंडिकेटनें ठराव केल्याशिवाय ( in anticipation of sanction ) करावयाची नाहीं अशी मागच्या वर्षी प्रथा होती, त्याबद्दल लेखी हुकूम होता व त्या दृष्टीनें प्रिन्सिपल्नें केलें तें योग्यच होतें. प्रस्तुत गृहस्थ मागील वर्षी संस्कृत व इंग्लिश शिकवून निम्में काम ( part time ) करीत. या वर्षी त्यांना संपूर्ण काम– संस्कृत– द्यावें अशी बोर्डानें शिफारस केली होती. पण ही नेमणूक १६ तारखेस कॉलेज सुरू झालें त्या दिवसापासून न होतां १८ तारखेस सिंडिकेटची सभा होईल तेव्हांपासून व्हावी असें म्हटलें होतें.

या गृहस्थांनीं आपणास १६ तारखेस रुजू करून घेतलें नाहीं म्हणून प्रिन्सिपलविरुद्ध तक्रार अर्ज केला. शिवाय आपण मागील सहामाहींत काम करीत होतों तेव्हां आपली नेमणूक 'मागून पुढें चालू' समजून सुटीचा पगार द्यावा, आणि पगारवाढ व्हावी इ. अनेक मागण्या केल्या होत्या. सिंडिकेटनें '१६ तारखेस नेमणूक केली' असें प्रिन्सिपलला म्हणण्यास भाग पाडलें. नुसता शब्दाचाच प्रश्न होता. कारण १६ व १८ दोन्ही तारखा मागेंच होऊन गेल्या होत्या. बरें मग १६ तारखेस नेमणूक म्हणजे सहामाहीच्या सुरवातीपासून झाली म्हणजे 'मागून पुढें चालू'

म्हणावी; व त्यांचे मागणीप्रमाणें सुटीचा पगार तरी द्यावा. पण नवीन नेमणूक झाली असें म्हणून पगार माल दिला नाहीं. मग प्रिन्सिपलचा शब्द मोडून त्याला चूक ठरविण्यांत तरी अर्थ काय होता? पण सिंडि-केटच्या कारभारांत सर्वांत किंमत कशाला नसेल तर प्रिन्सिपलच्या शब्दाला.

माझ्यानंतर जोशी प्रिन्सिपल झाले हें पुष्कळ सहकाऱ्यांना आवडलें नव्हतेंच. कांहींची समजूत तर अशी कीं, जोशांना प्रिन्सिपल होण्याची हौस व म्हणून त्यांनीं मला चुकीचा सल्ला दिला* व जणूं कांहीं त्या सल्ल्यामुळें मीं राजिनामा दिला. खरें असें कीं त्या मंडळींना जोशीही नको होते व मीही नको होतें. प्रिन्सिपलशिपपासून कॉलेजची सर्व जबाबदारी घेण्याची त्यांची तयारी होती. पण तें जमलें नाहीं, जोशीच शेवटीं प्रिन्सिपल झाले म्हणून कमलाबाई गेल्याबद्दल नक्राश्रु.

---

* मीं सिंडिकेटमध्यें तोंडी राजिनामा दिला असें कळल्यामुळें एका सहकाऱ्यानें सहानुभूति दाखविण्याच्या मिषानें लिहिलें :

29th April 1943.

"The situation is really tragic, and I practically feel it as I believe I have done my best to present a very clear picture to you and to save you both from your own headlong career (or neck-break?) and also from your friends and advisers. Not even your worst opponent believes that left to your own-self you should have gone to these lengths and the only reasonable supposition is that you received wrong advice from your friends and advisers, who for reasons, best known to them, left you alone to face the music, when the moment came.

I am afraid some of your friends and advisers of yours were Haribhau's advisers too.

५ जुलै १९४१ रोजीं कॉलेजचा वाढदिवस झाला. या वेळीं माझ्या राजिनाम्याचा फेरविचार व्हावा व मीं पुन्हा प्रिन्सिपल व्हावें असे विचार सेनेट सभेनंतर सिंडिकेटच्या सभासदांत होऊन मला परत बोलविण्याचें ठरलें होतें व मी परत येण्याचा योग होता. वाढदिवसाचे सभेचे दिवशीं शेवटीं जोशांनीं उघड सांगितलें कीं, " कमळाबाई केव्हांही येऊं देत मी प्रिन्सिपलशिप त्यांना देण्यास तयार आहे."

इतरांना कांहीं वाटो, त्यांना प्रिन्सिपलशिपचा मोठा मोह होता असें मला वाटत नाहीं. त्यांनीं प्रिन्सिपल असणें यानें भर पडली असती तर ठाकरसी कॉलेजच्या वैभवांत पडावयाची. ठाकरसी कॉलेजच्या प्रिन्सिपलशिपनें त्यांच्या मान्यतेंत भर पडणार नव्हती. लोक त्यांना यापूर्वी मानीत असत तें पुढेंमागें चुकून मिळणाऱ्या ठाकरसी कॉलेजच्या प्रिन्सिपलशिपमुळें नव्हे तर त्यांच्या विद्वत्तेमुळें व त्याहीपेक्षां त्यांच्या सौजन्यामुळें व अजातशत्रुत्वामुळें. पण 'पश्यति पित्तोपहतः शशिशुभ्रं शंखमपि पीतम्' याला कोण काय करणार !

प्राध्यापकांचें सहकार्य नाहीं, सहानुभूति नाहीं. जो तो तास शिकवून झाला कीं उपरणें झाडून मोकळा ! इतर सभा, कार्यक्रम यांना शक्य तितका टाळा. भावना अशी कीं, करूं दे काम पिन्सिपलला. घेताहेत ना मान पिन्सिपलशिपचा !

ज्युबिलीचें काम करण्यांत पुढाकार. कारण तें वरिष्ठांपर्यंत कळतें. पण तेंही करतांना प्रिन्सिपलला शक्य तोंवर कडेला सारून दुर्लक्ष करून करायचें. इतर ठिकाणीं असहकार. कोठपर्यंत ? आण्णांना बनारस विद्यापीठानें डॉक्टर ही पदवी देऊन सन्मान केला. त्यांचे अभिनंदनाप्रीत्यर्थ कॉलेजांत सभा झाली. त्यांत सभेंत बोलावयाला कोणी प्राध्यापक तयार नाहीं. एकानें मोठ्या मिनतवारीनें होकार दिला. कारण जोशांशीं सहकार्य होतें ना ! अखिल महाराष्ट्रांत प्रो. जोशांचा षष्ठ्यब्दिपूर्तिसमारंभ साजरा झाला. पहिला समारंभ खाजगी तऱ्हेनें कॉलेजच्या मुलींनीं केला. पंक्तीला जेवावयास इतर

प्राध्यापकांस आमंत्रण दिलें. पण शेवटीं जेवावयाचे वेळीं तात्या एकटे. कांहींजण आपण कोणत्याच शुभ प्रसंगीं हजर राहत नाहीं या सबबीवर आले नसावे, कांहींनीं इतर सबबी सांगितल्या, कांहीं आठ वाजेपर्यंत कॉलेजवर खेळून जेवणाची तयारी झालेली पाहून निघून गेले. कोणी प्राध्यापक चुकून हजर असले तर कोणास ठाऊक. तात्यांचे मनास आनंद, दुःख दोन्हीं वाटलीं. दुसरे दिवशीं सकाळीं तात्या आमचे घरीं आले व आनंद, दुःख दोन्ही सांगून त्यांनीं मनस्ताप कमी केला. पुण्यांतील सर्व शिक्षणसंस्थांनीं गोखले हालमधील सार्वजनिक वाढदिवस समारंभांत जोशांचे गळ्यांत हार घातले; पण त्यांच्या कॉलेजचा अधिकृत हार त्यांत नव्हता. जो गळ्यांत पडला तो विद्यार्थिनींचा स्वयंस्फूर्तीनें आलेला. प्रिन्सिपल कांहीं स्वतःच्या कॉलेजतर्फे स्वतःला हार पाठवीत नाहीं. या वेळींही कॉमनरूमची अनधिकृत सभा घेऊन कॉलेजतर्फे हार पाठविण्याची त्यांचे सहकाऱ्यांस जरूर वाटली नाहीं.

दोन वर्षे अशींच निघालीं. दुसऱ्या वर्षाच्या शेवटीं पुन्हा नेमणुकांचा प्रश्न. पुढें नेमणुका चालू राहण्याबद्दल प्राध्यापकांचे अर्ज आले. दोन वर्षे प्रिन्सिपलच्या हाताखालीं कामें झालेलीं; तेव्हां अर्जावर शेरे देण्याचा प्रसंग आला. जे शेरे दिले होते त्याच्या बरोबरविरुद्ध तऱ्हेनें नेमणुका करण्याची बोर्डानें शिफारस केली व याच वेळीं एका प्राध्यापिकेनें संतापून प्रिन्सिपलला विचारलें, "माझ्या कामावर असा शेरा देतां! Do you know what your superiors think of you?" "They might think me to be a devil, but that is not my concern, when I write the remarks." अशा अर्थाचें उत्तर मीं दिलें असें जोशांनीं मला या बाबतींत सांगितलें. या प्राध्यापिकेनें आणखीही कांहीं तक्रारी प्रिन्सिपल विरुद्ध चेअरमनकडे केल्या. तें पत्र उघडेंच अर्जाला जोडून त्याच्या शेवटीं लिहिलें कीं हें प्रिन्सिपलनें वाचण्यासाठीं नाहीं; व पाठवून दिलें प्रिन्सिपलकडे. पत्र

अर्थात् मीं डोळ्यांनीं पाहिलेलें नाहीं पण हें पत्र (a nasty letter) अत्यंत वाईट होतें असें जोशी म्हणत. त्या पत्रांत व इतरही ठिकाणीं संभाषणांत प्रिन्सिपलवर अश्लाध्य (?) आरोप असल्याची लोकवार्ता आहे. रजिस्ट्रारकडेही निनांवी पत्रें गेलीं. काय असेल तें खरें. पण तेंव्हांपासून त्यांची झोप गेली असें त्यांचे सर्व स्नेही सांगतात. त्यांच्या सहनशीलतेची परमावधि झाली व या प्राध्यापिकेची नेमणूक कराल तर राजिनामा देतों असें त्यांना निक्षून सांगावें लागलें.

दोन वर्षें त्रास चालू होताच. पण या शेवटच्या नेमणुकांचे बाबतींत घडलेल्या गोष्टी त्यांचे मनास अत्यंत लागल्या. आधींच प्रकृति खालावत चाललेली. या वेळीं त्यांना ताप येत होता. सिंडिकेटमध्यें पुन्हा कदाचित् हा नेमणुकीचा प्रश्न निघेल व मी गैरहजर राहिलों तर माझी बाजू कमकुवत आहे असा त्याचा अर्थ होईल, म्हणून मी सभेस जाणार आहे असें ते म्हणाले व मुंबईस जावयास निघाले.

आगगाडींतच ते बेशुद्ध झाले व त्यांना त्यांचे बंधूंचें घरीं पोंचाविलें. हें दुखणें वाढत वाढत त्यांतच न्यूमोनिआ झाला. ता. १८ जुलै १९४३ रोजीं मी त्यांना भेटावयास गेलें तों पहिलें वाक्य हेंच— "कमलाबाई! काय turn आली पहा. सरळ retire झालों असतों!" स्वतःबद्दल असले आक्षेप यावेत याचेंच त्यांना अत्यंत दुःख झालें. दुखण्यांत व त्यापूर्वींही प्रत्येकाजवळ असले उद्‌गार ते काढीत असत व अमुक नेमणूक झाली का म्हणून तापांतही विचारीत असत—आम्ही सर्व म्हणत असूं, "तात्या, तुमच्या नोकरीच्या सुरवातीला असें कोणी म्हणतें तर एक असो. पण आतां तुम्ही सेवानिवृत्त होणार, तुमची साठ वर्षांची ज्युबिली झाली, व आतांच निनांवी पत्रांना प्रथम सुरवात होते काय! या वेळीं असे आक्षेप कोणी घेईल तर म्हणणारा वेडा." आणि त्यांच्या तत्त्वज्ञानप्रवण मनाला हें कळत नव्हतें असें नव्हे. पण एकेक वेळ येते. शारीरिक व्याधि व कॉलेजवरील इतर मंडळींच्या वागणुकीनें होणारा मानसिक ताप दोन वर्षें चालू होताच. त्यांत या गोष्टींची भर

पंडली; शांत व स्थितप्रज्ञ समजल्या गेलेल्या त्या सज्जन माणसाच्या मनाची समता ढळली व पंचवीस वर्षें कॉलेजची एकनिष्ठपणें सेवा केलेला हा आदर्श शिक्षक, सहकाऱ्यांच्या सहानुभूतिशून्य वातावरणांत, वरिष्ठांच्या नैतिक आधाराच्या अभावीं होणारे प्रिन्सिपलशिपचे हाल भोगून तळमळत्या मनःस्थितींत मृत्युमुखीं पडला.

---

# परिशिष्ट १

## Sample of detailed figures cyclostyled for the use of the Committee.

| Purchase Value (Rs. As. P.) | Value of the stock existing *Year 1925* | Value of the stock non-existing and details (Rs. As. P.) | |
|---|---|---|---|
| 400 12 2 | | 400 12 2 | No clear from the Voucher. |
| 5 2 0 | | 5 2 0 | Rabbits, Ammonia |
| 291 0 0 | | 291 0 0 | V. No. 107 only receipt. |
| 12 4 9 | | 12 4 9 | Cooly Charges. |
| 483 6 8 | | 483 6 8 | Draft Sent. No details. |
| 297 3 0 | | 297 3 0 | Rubber Tubes, Battery & Duty. |
| 109 0 0 | | 109 0 0 | Chemicals. |
| 1598 12 7 | | 1598 12 7 | |

*Year 1926*

| Rs. | As. | P. | | Rs. | As. | P. | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 2 | 0 | | 3 | 2 | 0 | Copper Sulphate |
| 43 | 0 | 0 | | 43 | 0 | 0 | Charges for Drawing Maps. |
| 537 | 1 | 0 | | 537 | 1 | 0 | V. No. 76. |
| 31 | 9 | 0 | 31 9 0 | | | | |
| 23 | 8 | 0 | | 23 | 8 | 0 | Cooly hire. |
| 40 | 0 | 0 | 40 0 0 | | | | |
| 9 | 12 | 0 | | 9 | 12 | 0 | Copper filings. |
| 60 | 0 | 0 | 60 0 0 | | | | |
| 6 | 2 | 0 | | 6 | 2 | 0 | Alcohol etc. |
| 40 | 13 | 0 | | 40 | 13 | 0 | Chemicals: |
| 123 | 0 | 0 | | 123 | 0 | 0 | Rubber, Switch board, Wire etc. |
| 768 | 7 | 9 | | 768 | 7 | 9 | Coils, Rubber Tubes, Wire, Razors etc. |
| 1686 | 6 | 9 | 131 9 0 | 1554 | 13 | 9 | |

No Comment is necessary to show the incorrectness and absurd nature of items put in the last column.

('Statement regarding the investigation carried out by the Syndicate' या प्रो. आठवले यांनीं छापलेल्या पत्रकावरून)

# परिशिष्ट २

## Audit of Furniture, Deadstock and Repair Accounts

" We have vouched the whole account item by item in detail from 1920 to 1939 and we were able to vouch and verify every item as shown debited in the

account correctly and explanations were forthcoming for all items ( or debits ) from the college authorities concerned along with complete vouchers, bills etc. from the year 1920 to 1939 except a few items of a small amount.

Only because all such record is properly kept we could get every explanation, voucher etc., for every item to our satisfaction, at this stage.

The total expenditure for all these years amounts to Rs. 17368–1–9 analysed as under :

| | |
|---|---|
| ( a ) Cost of furniture and deadstock | Rs. 9,176-7-9 |
| ( b ) Labour expenses wages etc. | Rs. 1,494-5-5 |
| ( c ) Repairs, renewals, additions to buildings, electric installation, fencing etc. | Rs. 6,697-4-7 |
| *Total Rs.* | 17,368-1-9 |

Out of this total expenditure item under sub-head 'A' was personally inspected, checked and verified by us and all these items, for which cost of Rs. 9,176-7-9 has been debited to furniture and deadstock account as and when purchased, were found in existence, most of them in use, only few being non-serviceable.

It is needless to say how careful the Staff in charge should have been when we could inspect particularly all item prior to 1932 even at such a late stage and lying in serviceable condition. AND LAST we feel sure that the present misunderstanding as reported to would not have, at all, arisen if the inspection of these accounts had in the first place been entrusted to any qualified accountants competent to deal with such questions."

Sd./– G. M. OAK & Co.
Registered Accountants & Auditors.

## Audit of Laboratory Apparatus and Expenses Accounts

( First two paragraphs are similar to those as quoted above. )

" The total expenditure on this item for all these years has been properly classified under the different Sub-heads of expenses for every year and is shown appended hereto; vide appendix 'A'.

The total expenditure for all these years amounts to Rs. 31285–12–0 analysed as under :

| | | |
|---|---|---|
| ( a ) Cost of Laboratory Apparatus etc. in existence | Rs. | 19,564-12-6 |
| ( b ) Cost of Laboratory Apparatus etc. semi-permanent in minor apparatus | ,, | 1,092–0–0 |
| ( c ) Cost of non-existing apparatus like Accumulators, Dynamos, Switch Board etc. | ,, | 1,463–0–0 |
| ( d ) Cost of non-existing apparatus i. e. glass-were etc. | ,, | 3,533–6–6 |
| ( e ) Laboratory expenses, maintenance–acid, petrol, ice etc. | ,, | 3,856–7–0 |
| ( f ) Extra expenditure– not relating to Laboratory i. e. Furniture, Peons' pay etc. | ,, | 1,776–2–0 |
| Total | Rs. | 31,285-12-0 |

The last three paras are similar to those quoted above. The Auditors have checked all items in 'a' and 'b' above and have vouched that they are in existence. The Dynamo and Switch board have been sold and therefore non-existing."

# परिशिष्ट ३

## प्रि. गाडगीळ यांचा राजिनामा

Yerandavana, Poona 4.
30-3-41

To

The Registrar,
S. N. D. T. University.

Madam,

I write this to inform you that in view of the resolutions passed by the Syndicate on the recent recommendations of the Poona College Board of Management I find myself unable any longer to serve on any body, committee or authority of the University. I have felt for some time that the Syndicate does not value the advice of the Poona Boards or trust the heads of institutions in this place. The action of the Syndicate in the matter of appointments or the note that the Registrar was allowed to circulate to members of the Syndicate exemplify this. It would also seem that employees in University Institutions can approach higher authorities and be listened to without any proper enquiries being thought necessary from the heads in the matter. This naturally leads to intrigue and indiscipline. I feel it necessary to resign at this juncture as both the Poona Boards have to make immediate recommendations *re*: important appointments and I could not participate in this business. Also I feel that the step I take may make it possible for the Poona institutions to be run smoothly

according to the ideas of the Syndicate and by people who enjoy this confidence.

Yours truly,
Sd./- D. R. GADGIL

## परिशिष्ट ४

### [ प्रि. कमलाबाई देशपांडे यांच्या राजिनाम्यामधील कांहीं उतारे ]

× × ×

The Report of the Committee shows that there was absolutely no loss and the Committee could not find any fault with the arrangement or the management– as also with the purchases of the apparatus– of the Laboratory. The world of difference between the two reports, the 'alarmist' report of the clerk on one hand and the 'all clear' report of the Investigation Committee on the other hand, makes one suspicious as to the method and the motive behind the inspection by the clerk. It is obvious that either the clerk did not know his job or if he did, he was negligent to the utmost. Naturally one would have expected the Syndicate to take the clerk and the Registrar to account for their almost criminal negligence and the high-handed and insulting note, written against the Professor and the Principal, who incidently happen to be higher in grade. But strangely enough, the report and the acceptance of it by the Syndicate without any comment, have completely absolved the clerk from any blame what-so-ever. The Committee, as well as the Syndicate, have kept

silent on the note of the Registrar, which caused the Principal and the Professor concerned, unnecessary worry by its irresponsible allegations, keeping the sword of the Investigation Committee hanging over them for one complete term.

The policy of the Syndicate pursued during the last year as regards the recommendations from the Principal and the Board of Management seems full of prejudice. The Syndicate could not look eye to eye with the Principal; not only that, any change in the views of the Principal, due to change in circumstances and the new experiences about certain persons, was taken to be her unpardonable inconsistancy– as if the Syndicate were sure of the unchangeability of circumstances and the infallibility of certain persons; and any support of the Board to the Principal's views was apparently to be interpretted as a 'plot'. Whenever any question regarding the administration of the College was to be considered, the tendency was to make light of the negligence, arrogance and indiscipline of the person– whether he be a professor, a registrar or a clerk in the University– as against the Principal. The meagre respect shown to several recommendations of the Principal and the Board does not seem to be a sound policy, though the Syndicate, technically, have the power of rejecting their recommendations. Under the circumstances I feel that it is not desirable to continue in the service of the University any longer– though the work for this University has been the only aim in my life these twenty four years, since the day I

entered the portals of my Alma Mater as an humble college student, and I hereby signify my desire to retire from the service of the University.

## परिशिष्ट ५

### [ प्रि. जोशी यांनीं देऊं केलेल्या राजिनाम्यामधील कांहीं उतारे ]

× × ×

3rd June 1941

But I now realise from an incident ( which I shall relate on a separate piece of paper as an appendix to this letter, ) that I shall have to face an attitude of suspicion and legalism from some of my colleagues, which may eventually bring me into trouble. The incident in itself is not very serious; it is almost petty, but it indicates a certain attitude and a certain temperament and I fear it gives a fore-taste of what I might expect in the future. As I want to pass the remaining two years of my service quietly and without involving myself in situations which might disturb my peace of mind, I wish to humbly submit after mature consideration that the Syndicate should relieve me of the Officiating Principalship, which I fear would possibily bring me into conflict with some of my colleagues and which would, therefore, cause much mental trouble and worry. The fact is that misunderstandings, accidental circumstances, and temperamental peculiarities have combined to create a situation fraught with possibilities of disharmony and strife.

I shall not, however, stress the point of view of my personal interest in refusing what might possibly

prove 'a crown of thorns'. I have, however, to stress the view that it would not be in the interests of the Poona College to have me as its head in the present unhappy circumstances.

I do not fear much trouble if I continue as a Professor; for a professor has no executive functions and has not to take decisions which sometimes may be agreeable to some members of the staff and disagreeable to others. A Professor can very well pull on with persons, whose point of view or general attitude might not coincide with those of some members of the staff.

# अखेर ! :: १८

काळ बदलला म्हणजे सर्वच बदलतें. घर फिरलें म्हणजे घराचे वासेसुद्धां फिरतात ना! भोंवतालच्या जगांतील उलथापालथ पाहिली म्हणजे संस्थेंतील आपल्या उन्नति-अवनतीचें हसूं येतें माणसाला! चक्रनेमिक्रम चालावयाचाच! आज मोलवान् अवश्य वाटणारीं माणसें उद्यां अडगळीप्रमाणें वाटावयाचीं—नव्हे घातक वाटावयाचीं! त्याचें नाहीं मला इतकें वाटत. सिंडिकेट तर काय पूर्वस्थितीला अनभिज्ञ, पैशानें माणसाचें मोल करणारी, जुनीं खोडें काढून टाकून नवीन स्वतःला झेपणारीं माणसें नेमून घेण्यास उत्सुक, व नृपांगणगत खलमार्गें आलेल्या माहितीवर विश्वसून दूषितपूर्वग्रहानें भारावलेली. त्याचें नाहीं मला इतकें वाटत. युद्धाला उभें राहिलें म्हणजे इतके वार लागायचेच!

* * *

मला दुःख झालें तें आण्णांच्या (कर्वे) तटस्थ धोरणाचें! सर्व गोष्टी डोळ्यांसमोर होत असतां त्यांनीं एक अक्षर बोलूं नये! पुण्यास त्यांची माझी गाठ पडल्यावर त्यांना मी खूप बोललें, “ आण्णा, मला तुमच्या गप्प बसण्याचा राग येतो. इतरांनीं आमचा उपहास करावा,

पाटकरांनीं संतापून वाटेल तें बोलावें, आणि तुम्हीं खालीं मान घालून बसून राहावें! मला तुमची दयामाया नको; स्पष्ट मत पाहिजे. खरो-खरच मीं प्लॉट केला इ. तुम्हांला खरें वाटत असेल तर तसें स्पष्ट सांगा. माझ्या चुकीमुळें मला मरण यावयाचें असेल तर तें तुमच्या तोंडच्या शब्दानें येऊं द्या. तुमच्या साक्षीनें व इतरांच्या हातून नको. माझा दोष वाटत नसेल तर तसेंही स्पष्ट सांगा.

"तुमच्या शब्दाला सिंडिकेटमध्यें किंमत किती आहे हें मला कळतें. पण कांहीं वेळां उपयोग असो नसो, स्वतःचें मत स्पष्टपणें व्यक्त करण्याला महत्त्व असतें. तुमचें मत व्यक्त होऊनही मग हा प्रसंग येता तर मला तेवढेंच दुःखांत सुख वाटलें असतें.

"मी या कार्याकडे वळलें ती तुमच्यावरील निष्ठेनें. त्या वेळीं सर विठ्ठलदासांची ग्रँट् नव्हती, लेडी ठाकरसी नव्हत्या, व पाटकरही नव्हते. तेव्हां त्यांच्या शब्दापेक्षां मला तुमच्या शब्दाचें सुखदुःख जास्त.

"तुमच्याबरोबर २५ वर्षें काढलीं, तुमच्या व माझ्या इच्छेचा विरोध आला तेथें स्वतःची इच्छा बाजूला सारली, आणि नुसता स्पष्ट मताचा उच्चार आमचेसाठीं तुम्हांला करवत नाहीं! मग सिंडिकेटमध्यें राहूं तरी नका. त्यामुळें आम्हांला अन्याय होतो. लोकांना वाटतें आण्णांच्या समक्ष या गोष्टी घडतात तेव्हां चालतें तें सर्व ठीकच आहे."

या सर्व प्रकरणांत पाटकरांनीं आण्णांना विचारावयास हरकत नव्हती, कीं 'तुम्ही पुण्यास तेथें राहतां. काय परिस्थिति आहे?' आणि असेल त्यांतून मार्ग दोघांच्या विचारानें निघणें अशक्य नव्हतें. पण पाटकरांना विचारावेंसें वाटलें नाहीं आणि आण्णांचा बिनबोलका स्वभाव तर प्रसिद्धच आहे.

* * *

१९४१ च्या जून महिन्याच्या पहिल्या तारखेस कामाची जबाबदारी तात्यांच्यावर (प्रो. जोशी) सोपवून दोन तपें ज्यांत गुंगून काढलीं त्या कामाचा मीं निरोप घेतला. १९१७ पासून जें एक कार्य आपलें म्हटलें

त्याचा ऋणानुबंध संपला. 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' या तत्त्वाचा इतका जिवंत साक्षात्कार मलाच का होत असेल ? सर्व जन्म श्रम करून शेवटीं निष्फलता पदरांत घेण्याचा प्रसंग काय आजपर्यंत थोड्यांना आला आहे!

या सांध्यावरून त्या सांध्यावर गाडी जातांना होणाऱ्या खडखडाटाप्रमाणें संस्थेंतही अधिकारक्रांति होतांना पूर्वीच्या कार्यकर्त्या सेवकांबद्दल इतका अविश्वास, हेटाळणी व अन्याय झाला तर त्यांत नवल नाहीं !

* * *

'नवी विटी नवें राज्य' हें चालायचेंच; पण शब्दांच्या किंमती बदलतात ना! पूर्वी काम केलेला, अनुभव घेतलेला मनुष्य पुढें काम करावयास येणाऱ्या माणसांपेक्षां कमी मोलाचा ठरतो. पूर्वी केलेल्या त्यागापेक्षां नवीन येणारी देणगी उपयुक्त असते. मागच्या गोष्टींचा उपयोग संपलेला असतो. नवीन गोष्टींचा उपयोग होण्याची आशा असते. कुणास माहीत हें गुप्तवरदानही ठरणार असेल. 'कालोह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी' म्हणून पाठ फिरवून चालूं लागेन सुद्धां. पण काल अनंत निरवधि असला तरी, माझें व्यक्तीचें आयुष्य सांत सावधिच आहे. आयुष्याच्या उत्कृष्ट कालांतील खर्चे झालेलीं हीं चोवीस वर्षे बुडीत खातीं खर्चीं पडावयाचीं. Value of the Stock non-existing या विद्यापीठाच्या सदरांतच त्याचें स्थान! विपुल पृथ्वींतील इतर गोष्टींकडे वळेन, पण त्यांतही व्यक्तिगत मर्यादा या गेलेल्या कालखंडामुळें पडणार! ही चोवीस वर्षांची तूट भरून निघणें नाहीं. आणि त्याचीही पर्वा न करतां पाठ फिरविली व दुसऱ्या कार्यक्षेत्रांत पदार्पण केलें तरी, पहिले जोडलेले पाश तुटावे कसे! शिवाय स्वतः काम सोडलें म्हणजे तें काम वाईट होत नाहीं. इतके दिवस प्रत्येक क्षणाचा व कणाचा ज्यासाठीं उपयोग केला, त्याची प्रगति आतां थांबावी असें तरी कसें मनांत येणार! माझा संबंध तुटला तरी तुटो, पुढील मंडळीचे

हातून का होईना हें कार्य असेंच चालत राहूं दे, व त्याची प्रगति होत आहे असें ऐकूं येऊं दे म्हणजे झालें.

**दूरच्या देशींचा, शीतळ वारा आला**
**सुखी मीं आयकिला भाईराय।**
**हाणे मी घालत्यें तुम्हांला आंगणांत**
**भावाची आणा मात चिमण्यांनो ।।**

*　　　*　　　*

पण चढउतार प्रत्येक गोष्टीला असतो. त्याप्रमाणें या प्रकरणांतही झालें. इरावतीनें १८ जून १९४१ रोजीं होणाऱ्या सेनेट सभेपुढें एक ठराव पाठविला होता कीं, सिंडिकेटच्या कारभाराची चौकशी करावी. त्यामुळें सेनेटमध्यें होणारी चर्चा टाळण्यासाठीं म्हणा–किंवा खरोखरच वर्षभर घडलेल्या ज्या गोष्टी मोठ्याशा समर्थनीय नाहींत त्यांचा फेरविचार व्हावा या इच्छेनें म्हणा– सिंडिकेटमधल्याच कांहीं मंडळींना तडजोड व्हावीसें वाटलें. त्यांनीं इरावती, डॉ. परांजपे व डॉ. सहस्रबुद्धे आदि मंडळींना बोलावून विचारविनिमय केला; आणि परांजपे, सहस्रबुद्धे व इरावती यांनीं मला येऊन सांगितलें कीं, "सर्व गोष्टींचा फेरविचार करण्याचें आश्वासन सिंडिकेटच्या सभासदांनीं दिलें आहे, व त्या गोष्टी होत असतील तर कमलाबाईंना आम्ही राजिनामा परत घेण्यास सांगूं असें आम्हीं त्यांना आश्वासन दिलें आहे. तरी तसें झाल्यास तुम्ही परत गेलें पाहिजे. आमचा शब्द गेलेला आहे." दुसरें असें मला कळलें कीं, आण्णांनींही या वाटाघाटींत भाग घेतला होता व त्यामुळें माझ्या दुःखाची धारही कमी झाली. इतके वर्षांचा संबंध सलोख्यानें संपावा ही तर इच्छा व त्यासाठीं परत जाण्यास मलाही हरकत वाटली नसती. कारण संस्थेवर राग नव्हता. तेथें स्वाभिमान संभाळून काम करणें कठीण झालें म्हणून राग; माणसें वागविण्याच्या पद्धतीवर राग. पण एकदा तुटलेला भाग सांधणें जड असतें. वर झालेल्या वाटाघाटीनुसार २२ जून १९४१ रोजीं रजिस्ट्रारचें एक पत्र

माझे नांवचें इरावतीबाईंचे पत्त्यावर आलें. इरावती, डॉ. परांजपे व डॉ. सहस्रबुद्धे यांना तें पत्र बरोबर नाहीं, म्हणजे त्यांच्या वाटाघाटींत ठरलेल्या योजनेनुसार वाटलें नाहीं, अपमानास्पद वाटलें. त्यांचा आणखी कांहीं पत्रव्यवहार झाला. ज्या मनमोकळेपणें प्रथम वाटाघाटी झाल्या होत्या, तो मनमोकळेपणा पुढील उत्तरांत त्यांना वाटेना. तेव्हां मीं परत जावें हा आग्रह त्यांनीं सोडला.

अशा स्थितींत पुन्हा परत जाणें बरें नाहीं, पण माझें म्हणणें तरी काय आहे हें एकदा सविस्तर कळविलेलें असावें म्हणून एक ( Confidential ) पत्र रजिस्ट्रारला लिहून मी मोकळी झालें. कारण आतांपर्यंत भावनेनें गोष्टी करीत होतें तेव्हां इतर विचार नव्हते. तुम्ही अगदीं मोठ्या उदारपणानें मला नोकरीसाठीं अर्ज करण्याची परवानगी देणार! अर्ज कोणीही करूं शकतो. त्याला परवानगी कशाला? पण आतां पुन्हा अर्ज करून नोकर म्हणून दोन वर्षांसाठीं परत जावयाचें? पुन्हा ज्या तक्रारी होत्या त्या दूर होतील कीं नाहीं ही खात्री नाहीं. नोकराच्याच भाषेंत बोलायचें तर मलाही नाहीं का म्हणतां येत, कीं अशी काय मोठी पगाराची व मानाची नोकरी आहे, कीं त्यासाठीं याचना करण्याचा मोह व्हावा!

माझे मागून प्रो. जोशांची प्रिन्सिपल म्हणून नेमणूक झाली व दोन वर्षें त्यांनीं काम केलें. मीं परत जाणें न जाणें याला इतकें महत्त्व नाहीं. पण सिंडिकेटच्या प्रिन्सिपलला वागविण्याच्या धोरणांत बदल होता तर मला स्वतः परत गेल्याइतका आनंद वाटला असता. नाहीं तरी आणखी दोन वर्षांनीं मी सोडून जाणारच होतें. पण मग तो अटीचा प्रश्न होऊन बसला. एकंदर होत आहे हें बरें नाहीं असें जरी सिंडिकेटच्या कांहीं सभासदांना वाटलें असलें, तरी सिंडिकेट सभेच्या इभ्रतीला धक्का न लागूं देतां गेलेल्या माणसास परत कसें बोलवावें हें त्यांना जमलें नाहीं म्हणा, अगर जमवावेंसें वाटलें नाहीं म्हणा. आणि माझ्या दृष्टीनें पाहतां ज्या मंडळीपासून मला न्यायाची वागणूक

मिळण्याबद्दलचा माझा विश्वास एकदा ढळला, त्यांचेकडेच पुन्हा अर्ज करून उरलेलीं दोन वर्षे नोकरी करीत बसावयाची व अविश्वासाच्या वातावरणांत राहून पुन्हा केव्हां एकादी चौकशी कमिटी येते त्याची वाट पाहत बसावयाची मला अगदीं शिसारी आली होती.

माझ्या बाबतींत स्वीकारलेलें धोरण बरोबर नव्हतें अशी सिंडिकेटची खात्री झाली असती तर प्रो. जोशांच्या बाबतींत तरी त्याची पुनरावृत्ति झाली नसती. पण सिंडिकेटचें धोरण बदललें नाहीं. शाळा व कॉलेज येथील प्रमुखांवर व तेथें आपणच नेमलेल्या सल्लागार मंडळावर विश्वास टाकावयाचा नाहीं, इतर सांगतील तेंच खरें समजावयाचें, व प्रिन्सिपलला नैतिक पाठिंबा न देतां, तो म्हणेल त्याच्या हटकून विरुद्ध वागण्याची प्रथा जोंपर्यंत टिकेल तोंवर कोणाही स्वाभिमानी माणसाला तेथें काम करणें कठीण. प्रो. जोशांना झालेला त्रास पाहून मी परत गेलें नाहीं हें बरोबरच केलें असें पुन्हा एकदा मला वाटलें.

कॉलेजवर काम करणारे आश्रमाचे आजन्मसेवक व कार्यकर्ते आतां संपले व सांधेबदल पुरा झाला. पुढें सिंडिकेट हेंच धोरण ठेवणार कीं बदलणार हें आतां कालानें दिसेलच.

* * *

प्रकृति आधींपासून खालावत चाललीच होती. नोव्हेंबर १९४० मध्यें हिशेब-तपासणी प्रकरण सुरू झाल्यापासून कामाचा ताण पडला व मानसिक स्वास्थ्य बिघडलें. बाहेरील या भानगडी चालू असतांना याच वेळीं घरांतीलही योग असे जमून आले कीं, माझे थोरले दीर बापूसाहेब घरच्या सर्व मंडळीसह कॉलेजवर रहावयास आले असतां तेथेंच आजारी पडून ता. १४ मार्च १९४१ रोजीं कालवश झाले. त्यामुळें घरच्या काळज्या व जबाबदारी त्याच काळांत वाढली. माझी येवढीच इच्छा होती कीं, चौकशी कमिटीचा निकाल होण्याचे पूर्वी आजारी पडूं नये तेवढी मी टिकलें. पण जून-जुलैपासून जवळजवळ अंथरुणाला खिळून राहण्याची वेळ आली. आश्रमाची मी

आजन्मसेविका. अठरा वर्षें प्रत्यक्ष काम ( active service ) झालेलें. वीस वर्षें पुरीं होण्यास आणखी दोन वर्षें हवींत. पण असें आजारी पडत पडत काम करावयाचें म्हणजे दोन वर्षें प्रत्यक्ष काम होण्यास चार वर्षें काम करीत राहिलें पाहिजे होतें. पण आश्रमाच्या कार्यकर्त्यांचा व माझा विचारविनिमय होऊन एकमतानें असें ठरलें कीं, अठरा वर्षांनींच मला सेवानिवृत्त होण्याची परवानगी 'स्पेशल केस' म्हणून द्यावी. व व्यवस्थापक मंडळानेंही त्यास मान्यता दिली. आश्रमाच्या माझ्या सहकाऱ्यांची सहानुभूति अठरा वर्षांत कोठें कमी पडली असेल तीही या वेळीं मिळून त्याची भरपाई झाली, व पूर्ण समाधानानें ता. १ जून १९४२ पासून मी सेवानिवृत्त झालें. शेवटच्या एका वर्षाखेरीज बाकीच्या कालखंडाबद्दल माझ्या स्मृति पुष्कळच आनंददायक व समाधानकारक आहेत. प्रत्यक्ष काम करतांना मिळालेला आनंद तर कोठें गेला नाहीं. जगांत हसरे निर्माल्य काय थोडे आहेत!

अथांग अफाट धोंधावें संचित । प्रवाहपतित मी तों एक ।
नेई तेथें जाई कशा विचारावें । सुखासुख त्यांत कांहीं ना सामावें ।
संचित उसळे; उसळो ! कोसळो । सौख्यदीप मळो न त्या योगें ।
मालवूं शकेना संचित उसळी । अन्तर्दीप जळीं मार्ग दावी ।
अंतरीच्या सौख्यें मार्ग सुखावीन । संचित मलीन प्रकाशेल ॥

---

## परिशिष्ट क्रमांक १

( मीं रजिट्रारला पाठविलेलें खासगी-पत्र )

( Confidental )

Dear Miss Laxmibai Thackersey,

( a ) In view of the informal discussion that took place between Dr. R. P. Paranjapye, R. B. Dr. D. L. Sahasrabuddhe and Dr. Mrs. Iravatibai Karve on the one hand and the Chancellor, the Vice-Chancellor, Lady Premlilabai V. Thackersey, D. B. K. M. Javeri and D. B. H. L. Kaji on the other hand.

( b ) in view of the letter No. nil ( Demi-official ) dated 22nd June, 1941, addressed by the Registrar to me

( c ) and further in view of the explanatory letter written by D. B. H. L. Kaji and D. B. K. M. Javeri to Dr. R. P. Paranjapye, R. B. D. L. Sahasrabuddhe and Dr. Mrs. Iravatibai Karve dated 28th June 1941,

I wish to perfectly make it clear that re-opening of the subject of my resignation, which was given and accepted, does not at all originate with me, as seems to be wrongly presumed in the letter written by the Registrar.

Nor had I asked Dr. R. P. Paranjapye and the others to intercede in this affair on my behalf in order to make it easy for me ( ! ) to withdraw my resignation, as if I was repenting and regretting internally the step I had taken.

The fact is that I believed I was, for my part, perfectly right in giving my resignation because that was the only course open to me to express my resentment, against the injustice done to me and to vindicate my self-respect.

Messrs Paranjapye, Sahasrabuddhe and Mrs. Karve, however, had judged of the merits of the controversy for themselves independently; and being actuated by the interests of the University, they of their own accord took the initiative, which led in the Senate meeting to their interview with Messrs Kaji and Javeri.

My position is simply that the Syndicate should do

full justice to me and if that is done, it will not be inconsistent with my self-respect to revive my cherished connection with the College.

I understand that the Chancellor, the Vice-Chancellor and the above members of the Syndicate have come to realise that injustice has been done to me in dealing with the various incidents, leading to my resignation. I have, therefore, to request you to inform the Chancellor and the Syndicate that I shall be prepared to consider my decision to sever my connection with the University if the Syndicate can see their way to bring about the following :

1. The Syndicate should pass a resolution stating clearly that not only there was no loss to the University but that the Dead-stock and the Laboratory Apparatus accounts were kept in an entirely satisfactory manner.

2. That the clerk, who submitted the report on the "non-existent" stock and which later on caused the appointment of an Investigation Committee be severely reprimanded for his misleading report.

3. The 'then' Registrar be also severely reprimanded for not allowing the Principal to make her report on the clerk's statements, and for assuming the correctness of those statements and writing an insulting note on the same, without studying the material which she had at hand.

4. The said professor be given a severe warning about his attitude of insubordination and non-cooperation with the Principal.

I am sending herewith a statement in support of these four points.

Yours faithfully,
KAMALABAI DESHPANDE

## परिशिष्ट क्रमांक २

डॉ. कमलाबाई देशपांडे, पुणें ४ ता. १५-७-४२

सा. न. वि. वि.

आजन्मसेवकमंडळाच्या ता. २८ जून १९४२ रोजीं भरलेल्या सभेंत आपणांबद्दल पुढील ठराव करण्यांत आला आहे तो आपणांस कळवीत आहे.

" डॉ. कमलाबाई देशपांडे यांना प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें संस्थेंतील पूर्ण नोकरी होण्यापूर्वींच सेवानिवृत्त व्हावें लागलें व त्यामुळें संस्थेला त्यांच्या बहुमोल सेवेला मुकावें लागलें याबद्दल आजन्मसेवकमंडळास अतिशय वाईट वाटत आहे. त्यांची विद्वत्ता, कर्तृत्व व मनमिळाऊ स्वभाव यांचा संस्थेच्या कार्याला अतिशय उपयोग झाला असून, संस्था त्याबद्दल नेहमीं कृतज्ञ राहील. सातारच्या कन्याशाळेची संस्थापना व जोपासना अत्यंत अल्प वेतनावर करून त्यांनीं संस्थेच्या कार्याचा बाहेर प्रसार केला. भारतवर्षीय महिला विद्यापीठाच्या पुणें येथील कॉलेजवरील प्रिन्सिपलशिप त्यांना पूर्णपणें करतां आली असती तर त्यांच्या कर्तृत्वाचा जास्त उपयोग होऊन संस्थेच्या लौकिकांत अधिक भर पडली असती. त्यांचें उर्वरित आयुष्य सुखांत व आनंदांत जाऊन त्यांच्या कर्तृत्वांत भर पडो अशी इच्छा आहे." कळावें,

आपली
**गंगूबाई तांबोळे**
चिटणीस, आजन्मसेवक-मंडळ, हिंगणें.

# परिशिष्ट क्रमांक ३

ता. ४ जून १९४२

डॉ. कमलाबाई देशपांडे, कराची

सा. न. वि. वि.

अनाथबालिकाश्रम मंडळीच्या व्यवस्थापक मंडळाच्या ता. ३० मे १९४२ रोजीं भरलेल्या सभेंत आपणांबद्दल पुढील ठराव करण्यांत आला आहे तो आपणांस कळवीत आहे.

" डॉ. कमलाबाई देशपांडे या ता. १-६-१९४२ पासून अनाथबालिकाश्रम संस्थेंतून सेवानिवृत्त होत आहेत याबद्दल व्यवस्थापक मंडळास फार वाईट वाटत आहे. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें त्यांच्या सेवेची पूर्ण मुदत भरण्यापूर्वी त्यांना सेवानिवृत्त व्हावें लागत असून, त्यांच्या सेवेला संस्थेला मुकावें लागत आहे ही खेदाची गोष्ट होय. सातारा कन्याशाळेच्या स्थापनेच्या व जोपासनेच्या बाबतींत अत्यंत अल्प वेतनावर त्यांनीं परिश्रमपूर्वक केलेली सेवा संस्था विसरणें शक्य नाहीं. भारतवर्षीय महिला विद्यापीठाच्या पुणें येथील महिला पाठशाळेंतील मुख्याध्यापिका म्हणूनही त्यांनीं उत्तम रीतीनें काम केलें ही गोष्ट भूषणावह आहे. त्यांच्या प्रकृतीस आराम वाटून त्यांना दीर्घायु लाभो व त्यांचे हातून इतर क्षेत्रांतही अशीच भरीव कामगिरी होवो अशी संस्थेची इच्छा आहे. कळावें.

आपला

**भा. धों. कर्वे,**

चिटणीस.

# पुरवणी

मागील एकदोन प्रकरणांतील विवेचनावरून माझ्या राजिनाम्यास कारणीभूत होणारी मतभेदाची पार्श्वभूमि वाचकांच्या लक्षांत येईलच. माझ्या राजिनाम्याची बाब वैयक्तिक. तथापि महिला विद्यापीठाच्या कार्याशीं संबंध आलेले दोन मुख्य घटक, म्हणजे हिंगणें येथील अनाथ बालिकाश्रमाची मंडळी व मुंबईचे विद्यापीठाचे अधिकारी, यांच्यांतील मतभेद बोधप्रद असून त्यांना सार्वजनिक महत्त्व आहे म्हणून त्यांचें संकलित स्वरूप खालीं दिलें आहे.

( १ ) गुरुवर्य कर्वे यांच्या स्त्रीशिक्षणविषयक कार्याबद्दल कै. सर विठ्ठलदास ठाकरसी यांना असीम आदर होता. जगाचा प्रवास करतांना त्यांनीं जपानची स्त्रियांची युनिव्हर्सिटी पाहिली होती व त्यामुळें अशा तऱ्हेचें काम हिंदुस्थानांतही व्हावें अशी त्यांना इच्छा उत्पन्न झाली.

( २ ) कर्वे यांनीं अखिल भारतीय महिला विद्यापीठाची नुकतीच स्थापना केली होती. तेव्हां कर्वेच आपलें इष्ट कार्य पुरें करतील असें वाटून त्यांनीं कर्वे यांनीं काढलेल्या विद्यापीठासच पंधरा लाखांची देणगी दिली व त्याचें श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ असें नामकरण करविलें.

( ३ ) आपले आईचें नांवानें पुणें येथें एक शाळा व कॉलेज, तसेंच मुंबई येथें एक शाळा व कॉलेज विद्यापीठाचे खर्चानें चालावें अशी त्यांची इच्छा होती. तसेंच दाक्षिणी व गुजराथी लोकांना मध्यवर्ती होईल अशा मुंबई शहरीं पुढें मागें विद्यापीठाची मुख्य कचेरी न्यावी अशीही त्यांची इच्छा होती.

( ४ ) विद्यापीठाचें कार्य हें आपलें जीवितकार्य म्हणून करणारी 'आश्रमा'ची मंडळी तयार असून अगोदरपासूनच त्या कामांत ती गुंतली होती. तेव्हां सिंडिकेटनें एका ठरावानें पुण्याच्या शाळा-कॉलेज-ची सर्व जबाबदारी अनाथ बालिकाश्रम संस्थेकडे सोपविली. रजिस्ट्रार वगैरे मंडळी सुरवातीपासून अनाथ बालिकाश्रमाची होती. तीही तशीच चालू राहिली.

( ५ ) कै. सर विठ्ठलदास ठाकरसी यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी लेडी प्रेमलीलाबाई ठाकरसी या सिंडिकेटमध्यें आल्या व सर्व कामकाजांत लक्ष घालूं लागल्या. प्रथम चारपांच वर्षें परिस्थिति नीट होती. पुढें ठाकरसी ट्रस्टी व लेडी प्रेमलीलाबाई यांच्या मनांत वैषम्य आलें. त्यांना वाटूं लागलें कीं विद्यापीठाची मुख्य कचेरी पुण्यास असल्यानें सर्व सत्ता पुणेंकर महाराष्ट्रीयांच्या हातीं जाते. आणि प्रो. कर्वे हे झाले तरी पुणेंकर महाराष्ट्रीयच! पैसा एका समाजाचा आणि वर्चस्व दुसऱ्या समाजाच्या हातीं. पुण्याच्या कॉलेजनें फक्त दाक्षिणी मुलींची सोय होते.

( ६ ) तेव्हां वेळेस पुण्याचें कॉलेज मोडूनही मुंबईस काढावें. कारण तेथें दाक्षिणी व गुजराथी दोन्ही मुलींची सोय होईल.

( ७ ) पण सिंडिकेटमध्यें ह्याला अनुकूलता मिळेना. सिंडिकेटचें मत पडलें कीं, अजून मुंबईस कॉलेज काढण्याची वेळ आली नाहीं. इतरही मतभेद झाले. तेव्हां सिंडिकेट व रजिस्ट्रार, व तो ज्या संस्थेचा आजन्मसेवक आहे तें हिंदु वुइडोज होम, हेच अडथळे आहेत. यांच्या हातीं सत्ता आहे तोंवर हें घडणें कठीण असें वाटून विद्यापीठाची वार्षिक मदत बंद करण्याचें ठाकरसी ट्रस्टींनीं ठरविलें.

(८) पण हे अडथळे खरे होते असें क्षणभर मानलें तरी, देणगी बंद करण्याचें कारण नव्हतें. सेनेट-सिंडिकेटमध्यें बहुमत, जसें पुढें करण्यांत आलें तसें, करून ह्या गोष्टी बदलणें शक्य होतें. रजिस्ट्रार हा सेनेटमध्यें निवडून येई. पुण्याच्या शाळा-कॉलेजची अनाथ बालिकाश्रमाचे मंडळीकडे दिलेली व्यवस्था सिंडिकेटनें एका ठरावानें दिलेली होती. सिंडिकेट वेगळ्या मताचें येतें तर या सर्व गोष्टी बदलून घेणें शक्य होतें. पण तें न करतां देणगी बंद केली गेली. यावरून विद्यापीठाचें काम समाधानकारक होणें शक्य नव्हतें, का कांहीं गुजराथी पत्रकांत सुचविल्याप्रमाणें इतर ज्ञातींकडे कांहीं प्रमाणांत खर्च होणारी ही देणगी अजीबात बंद करून सर्वस्वी गुजराथी ज्ञातीला उपयोग होईल अशा कार्याकडे वळवावी ही खरी आंतील इच्छा होती, हें कळत नाहीं. (परिशिष्ट १ पहा.)

(९) ठाकरसी ट्रस्टींवर एक फिर्याद ॲडव्होकेट जनरलकडे दाखल केली गेली होती. शिवाय खाजगी तडजोडीचे प्रयत्न चाललेच होते पण ते सर्व निष्फळ झाले. (परिशिष्ट २ पहा.)

(१०) तडजोड होईना व पहिल्या फिर्यादीचा निकालही होईना. मुदत संपून काम (time bar) फुकट जाण्याची भीति वाटूं लागली तेव्हां सिंडिकेटनें दुसरी फिर्याद दाखल केली व तिचें काम सुरू असतांनाच कोर्टांत जडजोड झाली.

(११) तडजोडींत एका प्रश्नाचा निकाल सिंडिकेटला अनुकूल झाला. तो म्हणजे ट्रस्टींना व्याज बंद करतां येत नाहीं. पंधरा लाखांची देणगी सिंडिकेटचें ताब्यांत देईपर्यंत त्याचें व्याज चिरकाल (in perpetuity) विद्यापीठास ट्रस्टींनीं दिलें पाहिजे. दुसरा निकाल ट्रस्टींना अनुकूल. तो म्हणजे विद्यापीठाची कचेरी मुंबईस न्यावी व पुण्याच्या शाळा-कॉलेजांची व्यवस्था अनाथ बालिकाश्रमाकडे न देतां सिंडिकेटनेंच पाहावी.

(१२) या नव्या योजनेमुळें पूर्वी पुण्याच्या शाळा-कॉलेजांत काम

करणारे आश्रमाचे आजन्मसेवक संस्था-चालक न राहून विद्यापीठाकडे मुदतीच्या करारानें काम करणारे नोकर बनले.

( १३ ) यानंतर विद्यापीठाच्या सेनेटमध्यें बहुमत करण्याचे कसून प्रयत्न झाले. सर्व ठिकाणीं होतात त्या सूक्ष्मासूक्ष्म मार्गांचा अवलंब झाला व ट्रस्टींचें मताधिक्य असणारें सेनेट व सिंडिकेट तयार झालें.

( १४ ) १९४३ चे जूनमध्यें आश्रमाच्या सर्व आजन्मसेवकांची पुण्याच्या कॉलेजांतून सेवानिवृत्ति व्हावयाची व आश्रमाचा आणि कॉलेजचा संबंध तुटावयाचा. तडजोड झाली तरी पूर्वीच्या भांडणांतील परस्पर पूर्वग्रह कायम होतेच. विद्यापीठांत आपलें नोकरीचें आसन स्थिर करूं इच्छिणारांकडून या पूर्वग्रहाचा पूर्ण फायदा घेण्यांत आला. आश्रमाच्या आजन्मसेवक असलेल्या प्रिन्सिपलच्या शिफारशीपेक्षां त्याच्याविरुद्ध पोंचविलेल्या तक्रारीच जास्त उपयोगी पडतात असा त्यांना अनुभव आला व व्यक्तिशः लायकीपेक्षां आश्रमाचा आजन्मसेवक नसणें हा गुणच जास्त उपयुक्त होऊं लागला.

( १५ ) पुण्याच्या कॉलेजकरतां एक स्थानिक सल्लागार मंडळ होतें. परंतु नवीन मंडळी कायम करण्याचा प्रश्न निघाल्यापासून त्यांच्या शिफारशी धुडकावून त्याचा पदोपदीं अपमान करण्यांत येऊं लागला. यामुळें शेवटीं प्रि. धनंजयराव गाडगीळ यांनीं या मंडळाचा राजिनामा दिला.

( १६ ) प्रो. आठवले हे आश्रमाचे आजन्मसेवक, विद्यापीठाचे रजिस्ट्रार व पुणें कॉलेजचे पहिले प्रिन्सिपल. त्यांचा सायन्स विषय मुली थोड्या व खर्च फार या कारणासाठीं बंद करण्यांत आला व त्यांना मुदत संपण्यापूर्वींच एक वर्ष ( म्हणजे १९४० जूनला ) सेवा-निवृत्त करावयाचें सिंडिकेटनें ठरविलें. पण पुन्हा फेरविचार होऊन आश्रमाशीं केलेला करार मोडणें 'नैतिक दृष्ट्या' बरें नाहीं असें सिंडिकेटला वाटलें व काम असो कीं नसो आणखी एक वर्ष ( १९४१ जूनपर्यंत ) त्यांचा पगार चालू रहावासें ठरलें. वर्षभर पगार मिळाला

खरा पण त्यांतच 'प्रयोगशाळेच्या तपासणी'चा फार्स निघाला व अत्यंत मनस्ताप त्यांना सोसावा लागला.

(१७) आश्रमाची आजन्मसेविका असलेली अशी कॉलेजची दुसरी प्रिन्सिपल मी स्वतः. दिवसेंदिवस खालावणाऱ्या प्रकृतीमुळें माझी मुदत १९४३ जूनपर्यंत होती तरी मी १९४१ जूनपासूनच प्रिन्सिपलशिप नको, नुसतें प्राध्यापकाचें काम पुरें, असा अर्ज सहा महिने आधींच (नोव्हेंबर १९४० मध्यें) केला होता. पण १९४१ जून येईपर्यंतच अनेक गोष्टी घडल्या. दुसऱ्या प्रकरणांत वर्णन केलेली प्रयोगशाळेच्या तपासणीची हास्यास्पद व अपमानास्पद कारवाई, बोर्डानें केलेल्या ठरावाचा विचारसुद्धां न करण्याइतकी सिंडिकेटनें दाखविलेली बेपर्वाई, त्या सर्व वर्षभर सिंडिकेटनें व चॅन्सेलरसाहेबांनीं दाखविलेलें अविश्वासाचें धोरण, व शेवटच्या सभेंत बोलले गेलेले अन्यायाचे शब्द या सर्वांचा राग येऊन मी प्रिन्सिपलशिपच्या जोडीला विद्यापीठाच्या नोकरीचाही राजिनामा दिला.

(१८) आश्रमाचे आजन्मसेवक असलेले असे कॉलेजचे तिसरे तात्पुरते (Officiating) प्रिन्सिपल प्रो. जोशी. यांच्या कारकीर्दीची सुरवातच राजिनाम्यापासून झाली. एका प्राध्यापकानें पहिलेंच पत्र इतकें उपमर्दकारक लिहिलें कीं, त्यामुळें नको ही प्रिन्सिपलशिप म्हणून त्यांनीं राजिनामा दिला. सिंडिकेटनें त्या प्राध्यापकाकडून बिनशर्त माफी मागवून जोशांना मदत करण्याचें आश्वासन दिलें. पण विश्वास दाखविण्याचें धोरण पुढें राहिलें नाहीं; व त्यांच्या कारकीर्दीचा शेवटही राजिनाम्याच्या भाषेंतच झाला. कांहीं प्राध्यापकांनीं त्यांचेविरुद्ध तक्रार-अर्ज करून शिवाय कांहीं अश्लाघ्य आरोप केले. त्यामुळें मृत्यु आला म्हणणें चुकीचें होईल; पण शेवटच्या दुखण्यांत या कॉलेजच्या गोष्टींचें शल्य त्यांना सारखें बोचत होतें यांत शंका नाहीं. मृत्यूमुळें मुदत संपण्यापूर्वीं पंधरा-वीस दिवस अगोदरच त्यांची सेवानिवृत्ति झाली.

# पुरवणी परिशिष्ट क्रमांक १

## महिला विद्यापीठावरील संकट

(मंगळवार २८ फेब्रुवारी १९३३, केसरी पृष्ठ नं. १० वरून)

रा. केसरीकर्ते यांसः—

सा. न. वि. वि.

पुणें येथील भारत महिला विद्यापीठाला कै. सर विठ्ठलदास ठाकरसी यांनीं १५ लक्ष रुपयांची देणगी कांहीं शर्तीवर देऊं केली होती. रकमेचें सुमारें ५२ हजार रुपये व्याजाचें उत्पन्न या विद्यापीठाच्या खर्चाला गतवर्षापर्यंत मिळत होतें. परंतु सर विठ्ठलदास यांच्या मिळकतीच्या ट्रस्टींनीं ही व्याजाची रक्कम विद्यापीठाला आपण यापुढें देणार नाहीं असें कळविलें. खुद्द विद्यापीठातर्फे चाललेल्या, व विद्यापीठाकडून मिळालेल्या देणग्यांच्या आधारावर चाललेल्या, शिक्षणसंस्थांवर हें किती मोठें संकट येऊन पडलें याची कल्पना अशा संस्था चालविणारांना सहजच येईल. अर्थात् हें प्रकरण असेंच सोडून चालणें विद्यापीठाला शक्य नाहीं म्हणून कांहीं तरी तडजोड निघावी, गैरसमज दूर व्हावे, अशाविषयीं खासगी प्रयत्न बरेच झाले. पण ते एकतर्फी ठरले. शेवटीं कायदेपंडितांचा सल्ला घेऊन हें प्रकरण हायकोर्टांत न्यावें लागणार असें म्हणतात, व मग तेथें काय निकाल लागेल तो खरा!

अशी फिर्याद करणें प्रो. कर्वे यांच्या अगदीं जिवावर आलें होतें. कारण एवढ्या उदार आश्रयदात्याच्या वारसांविरुद्ध व ट्रस्टींविरुद्ध तक्रार घेऊन कोर्टांत जाणें हें दिसण्यांत अगदीं कृतघ्नपणासारखें दिसतें. शिवाय खुद्द सर विठ्ठलदास यांच्या पत्नींनीं व्यक्तिशः प्रो. कर्वे यांच्यासारख्या मनुष्यावरही संशयास्पद आरोप करण्यास कमी केलें नाहीं असें म्हणतात! यामुळें ही देणगी फुकट गेली तर गेली, पण तिजबरोबर आपला स्वाभिमान खर्ची घालूं नये, असें ठरवून प्रो. कर्वे यांनीं आपल्या आत्मविश्वासू पद्धतीप्रमाणें, वेगळ्या देणग्यांकरितां विनंति-

पत्रही प्रसिद्ध केलें आहे. परंतु महिला विद्यापीठाची सिंडिकेट ही अर्थातच या प्रश्नाकडे सरळ व्यवहाराच्या दृष्टीनें पाहणार. सर विठ्ठलदास यांच्या ट्रस्टींना देणगीचा करार मोडतां येत नाहीं असा कायदेपंडितांचा सल्ला मिळाला असल्यामुळें, सिंडिकेटनें कोर्टाचा राजमार्ग पत्करला असें दिसतें. हें प्रकरण प्रत्यक्ष कोर्टांत जाऊं घातल्यावर त्यासंबंधीं कोणी आपले खासगी अभिप्राय देण्यांत कांहीं अर्थ नाहीं. तथापि नुकतेच अहमदाबाद येथून, ठाकरसी ट्रस्टींच्या प्रेरणेनें लिहून प्रसिद्ध केलेलें एक पत्रक आमचे हातीं आलें आहे. म्हणून या विषयासंबंधानें दोन शब्द लिहावेसे वाटतात.

## विद्यापीठावरील आक्षेप

हें पत्रक निनांवी आहे. तथापि 'गुजराथ समाज-सुधारणा-समितीनें त्या पत्रकाबरोबर आपलेंही एक पत्र जोडून ठिकठिकाणीं पाठविलें आहे. या पत्रांत ट्रस्टींची तरफदारी करून त्यांनीं केलें तें योग्यच केलें असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे; आणि महिला विद्यापीठाच्या चालकांनीं पुष्कळ चुका केल्यामुळें ही स्थिति आली असें दर्शविलें आहे. या पत्रकांत घेतलेले मुख्य आपेक्ष असे कीं, (१) विद्यापीठाची कचेरी शक्य तितक्या लवकर पुण्याहून मुंबईस न्यावी, ती नेली नाहीं. त्याकारितां विनाकारण सबबी सांगितल्या आहेत. हें न होण्याचें कारण विद्यापीठाच्या शिक्षणसंस्थेंत हिंगणें येथील अनाथ बालिकाश्रमांतील शिक्षकांची सोय कर्वे यांना करावयाची होती. या शिक्षकांची निष्ठा जी आश्रमासंबंधानें ती विद्यापीठासंबंधानें राहूं शकत नाहीं. आणि पगार विद्यापीठाचा घ्यावा व हित आश्रमाचें पाहावें अशी विसंगति उत्पन्न होते. (२) नांवाप्रमाणें हें विद्यापीठ सर्व हिंदुस्थानचें असें करावें तें करण्यांत आलें नाहीं. (३) मुंबईस जितक्या लवकर विद्यापीठाचें कॉलेज काढावयास पाहिजे होतें तितक्या लवकर तें काढलें नाहीं. (४) सोळा वर्षांत जितकी अपेक्षा होती तितकी बाहेरची वर्गणी जमविली नाहीं. (५) विद्यापीठांतून निघाव्या तितक्या पदवीधारिणी

निघाल्या नाहींत. (६) नवीन शिक्षणसंस्था काढाव्या त्या काढल्या नाहींत. सुरत, बडोदें, अहमदाबाद येथील संस्था पूर्वींच्याच होत्या. (७) विद्यापीठाचें काम लोकप्रिय नाहीं व सरकारला पटेल असेंही नाहीं. म्हणून त्यांजकडून चार्टर मिळविण्याची आशा नाहीं. (८) विद्यापीठाच्या सेनेट-सिंडिकेटवर गुजराथी सभासद असावे तितके नसतात. (९) विद्यापीठानें देशी भाषेंतून पुस्तकें करावीं तितकीं निर्माण केलीं नाहींत. (१०) परीक्षा घेण्याची पद्धति सदोष आहे.

वरील सर्व आक्षेपांना योग्य उत्तरें देतां येतील. परंतु आतां तसें करीत बसण्यांत अर्थ नाहीं. तथापि या पत्रकाच्या शेवटीं जीं एकदोन वाक्यें आहेत तीं आम्हांला महत्त्वाचीं वाटतात. पत्रकाचा लेखक म्हणतो "विद्यापीठाच्या चालकांनीं अधिक कार्यक्षम बनावें व उत्साहानें कार्य करावें या हेतूनें मीं हें सर्व लिहिलें आहे. पण तसें न घडेल तर जनतेनें हें विद्यापीठ सोडून देऊन, दुसरें एखादें निर्माण करावें. मग तें अखिल भारतीय होवो किंवा फक्त मुंबई इलाख्यापुरतें होवो. पण जें होईल तें खरें होईल; भ्रामक होणार नाहीं. त्याला हवे तितके उत्साही कार्यक्षम लोक मिळतील. आणि मग सर विठ्ठलदास यांच्या ट्रस्टींना ती वार्षिक ५२ हजारांची देणगी या नव्या संस्थेला देतां येईल."

## तडजोडीची सूचना

हें सर्व लक्षांत घेऊन आम्हांला अशी सूचना करावीशी वाटते कीं, जबाबदारीच्या स्वराज्यांत एक प्रधानमंडळ जाऊन दुसरें प्रधानमंडळ नेमिलें जातें, व नवें प्रधानमंडळ पहिल्याची जागा व त्याबरोबर सर्व जबाबदारी पत्करतें. त्याप्रमाणें या विद्यापीठाच्या कामींही कां होऊं नये ? व कोर्टांतील चौकशी कां थांबूं नये ? सर विठ्ठलदास यांच्या ट्रस्टींनीं सरळ पुढें येऊन आपल्या पसंतीचें म्हणून जें कार्यकारी मंडळ असेल तें सुचवावें. आणि विद्यापीठाच्या सेनेटनें या नव्या कार्यकारी प्रधानमंडळाला रीतसर निवडून पुढें कांहीं काळपर्यंत सर्व व्यवस्था

त्यांचे स्वाधीन करावी. तसेंच अनाथ बालिकाश्रमाच्या शिक्षकांनीं, आपण जरूर तर बाजूला होऊन, या मंडळानें हवे ते नवे शिक्षक नेमावे असें पुढें येऊन सांगावें. सर विठ्ठलदास ठाकरसी यांचा विश्वास प्रो. धोंडोपंत कर्वे व अनाथ बालिकाश्रम यांच्यावर होता तसा त्यांच्या ट्रस्टींचा नाहीं हें उघड आहे. शिवाय लेडी ठाकरसी यांच्या मानापमानाचे प्रश्न बरेच उत्पन्न झाले आहेत. अशा वेळीं जुनें विद्यापीठ मोडून नवें विद्यापीठ स्थापण्याऐवजीं जबाबदारीच्या पद्धतिवर नवें प्रधानमंडळ किंवा कार्यकारी मंडळच नेमलेलें काय वाईट? म्हणजे मग या पत्रकांत आजच्या चालकांवर घेतलेले आक्षेप कितपत सकारण आहेत, व नवे चालक झाले तरी ते हे आक्षेप आपल्या कामांतून कितपत काढून टाकूं शकतील, हे आपोआप कळेल.

## प्रांतिक अभिमान वाढला

आमच्या समजुतीप्रमाणें या प्रकरणांत गुजराथी-मराठी हा प्रांतिक अभिमान वखेड्याला बराच कारण झाला आहे. सर विठ्ठलदास जिवंत होते तेव्हां अशा क्षुद्र विचारांना थारा मिळाला नव्हता. केवळ कर्वे यांची योग्यता व कर्तृत्व सर विठ्ठलदास यांच्या डोळयांत भरून गेल्यामुळें त्यांना गुजराथी-दक्षिणी हा भेद दिसलाच नाहीं. आणि आतां तो त्यांच्या ट्रस्टींना दिसूं लागला. एवढ्या मोठ्या देणगीचा फायदा मुख्यतः महाराष्ट्रीय लोकांना मिळतो असा गौण विचार जर खरोखरच उत्पन्न झाला असेल, तर विद्यापीठाच्या महाराष्ट्रीय चालकांनीं बाजूला सरून प्रांजलपणानें विद्यापीठ गुजराथी चालकवर्गाच्या स्वाधीन करावें. म्हणजे मग विद्यापीठ लोकप्रिय किती होतें, सर्व देशांत त्याला मान्यता किती मिळते, गुजराथी विद्यार्थिनींची संख्या किती वाढते, इतक्या थोड्या पगारावर विद्वान् नामांकित शिक्षक कसे मिळतात, या सर्व गोष्टी आपोआपच कळून येतील.

विधायक स्वरूपाच्या कामांत मत्सर बुद्धीला जबाबदारीसारखें औषध नाहीं. शिवाय सर विठ्ठलदास यांच्या देणगीच्या भांडवलाची हल्लीं

किंमत किती राहिली आहे, तिचें वार्षिक व्याज किती येतें, व या सार्वजनिक कार्याकडे हें सर्वच्या सर्व ट्रस्टी लावूं इच्छितात कीं नाहीं हेंही कळेल. 'राज्य' मागेतोंपर्यंत ठीक असतें. पण 'राज्य अंगावर आलें' म्हणजे मग तितकें सोपें नसतें हा अनुभव सर्वत्र आहे. अनाथ बालिकाश्रमानें जिवापाड मेहनत घेऊन आज सोळा वर्षे हें कार्य कसें केलें हें प्रसिद्ध आहे. पण नांवाप्रमाणेंच अखिल हिंदुस्थान देशांतील स्त्रियांच्या विशिष्ट शिक्षणाचें कार्य जर या संस्थेच्या हातून व्हावयाचें आहे, तर कार्यकारी मंडळाचा खांदेबद्दल झाला तर त्यांत काय वावगें ! किंबहुना प्रो. कर्वे व त्यांच्यावर निष्ठा असलेला हल्लींचा चालकवर्ग यांच्या स्वार्थनिरक्षेप सेवेचें महत्त्व स्पष्टपणें लोकांना कळण्याला, उमगण्याला, जबाबदार राज्य-पद्धतीला अनुसरून कार्यधुरेखालीं खांदेबद्दल हाच उत्तम मार्ग दिसतो.

एक हितचिंतक

( न. चिं. केळकर )

## पुरवणी परिशिष्ट क्रमांक २

### 'पत्रव्यवहार (गतगोष्टींची पुरवणी)'

या न. चिं. केळकर यांच्या पुस्तकांतून घेतलेलीं

### पत्रें ९१४, ९१५, ९१६

पत्र नं ९१४

[ १९३५, सर विश्वेश्वर अय्या, मुंबई, यांचें न. चिं. केळकर यांस पत्र ]

"मुंबईस श्री. पाटकरांच्यासह प्रो. कर्वे व आपणांस भेटून इं. वु. युनिव्हर्सिटी वादाचा निकाल करण्यास लेडी ठाकरसी कबूल आहेत. या महिन्यामध्यें आपण एखादी तारीख यासाठीं ठरवाल काय ? पण माझी सूचना अशी आहे कीं, लेडी ठाकरसी व आपण अशा दोघां सुज्ञ माणसांनीं जर या प्रश्नाची प्रत्यक्ष भेटून चर्चा केली तर त्याचा निर्णय चटकन् लागल्याशिवाय राहणार नाहीं. आपण लेडी ठाकरसींच्याशीं या बाबतींत कृपा करून जरूर बोलावें. प्रत्रोत्तर लवकर यावें."

पत्र नं. ११५

[ २३ फेब्रुवारी १९३५, धों. के. कर्वे, पुणें, यांचें न. चिं. केळकर यांस पत्र ]

"ठाकरसी ट्रस्टींच्याशीं समेट घडविण्याचा आणखी निष्फळ प्रयत्न करण्याच्या भरीस सर विश्वेश्वर अय्या पडत आहेत. त्यांत मला अर्थ दिसत नाहीं. म्हणून त्यांना मीं खुलासेवार पत्र धाडलें आहे त्याची कॉपी आपल्या अवलोकनार्थ धाडीत आहें. तें पत्र असें आहे—

"केळकरांच्याशीं आपल्या झालेल्या पत्रव्यवहारासंबंधीं मला पुढील कांहीं गोष्टींचा खुलासा करावयाचा आहे.

"लेडी ठाकरसी यांनीं युनिव्हर्सिटीच्या प्रतिनिधींबरोबर कांहीं अटी मान्य केल्या होत्या. याविषयींचा निर्णय सेनेटनें सिंडिकेटकडे सोपविला. सिंडिकेटमध्यें कांहीं समासदांनीं असा आग्रह धरला कीं, ग्रँटची उरलेली बाकी कायमनिधीकडे जमा केली जावी. आणि मुंबईस ऑफिस करण्यासाठीं नवीन इमारत विकत अगर भाड्यानें त्यांच्या इच्छेबरहुकूम घ्यावयाची असल्यास लेडी ठाकरसींनीं कबूल केलेल्या ५०,००० रु. खेरीज आणखी ५०,००० रु. ची रक्कम द्यावी. मगच युनिव्हर्सिटीचें केंद्र पुण्याहून मुंबईस लागलीच हालविणें शक्य होईल. या मुद्द्यावरचा निर्णय ॲडव्होकेट जनरलांकडे सोपवावा व बाकीचे मुद्दे आम्हांला मान्य आहेत असें सिंडिकेटनें ठरविलें.

निर्णय ॲडव्होकेट जनरलांकडे सोपविण्यास लेडी ठाकरसी कबूल नव्हत्या. असें पाहून सिंडिकेटनें तत्पूर्वीं लेडी ठाकरसी व युनिव्ह-र्सिटीचे प्रतिनिधि यांच्यामध्यें झालेल्या कराराप्रमाणें वागण्याचें ठरविलें.

परंतु लेडी ठाकरसींनीं आतां दोन महत्त्वाच्या बाबी नाकारल्या त्या अशा—

( १ ) श्री. गाडगीळ, कामत प्रभृतींसह चार्टर्ड अकौंटंट्स्नीं हिशेब-तपासणी करणें.

( २ ) ७॥ लाखांच्या इस्टेटीवर अधिकार युनिव्हर्सिटीला देणें.

सिंडिकेट यासाठीं तीन वर्षांची मुदत द्यावयास तयार होती; पण लेडी ठाकरसींनीं १ वर्षांतच त्या इस्टेटीचा ताबा देण्याचें ठरविलें होतें.

आतां समेट फिसकटला त्याचें कारण कराराप्रमाणें वागण्यास सिंडिकेटची हरकत हें नसून लेडी ठाकरसींनीं अटी मोडण्यास प्रारंभ केला हें होय.

चॅन्सेलर व मी यांच्या वचनामुळें सिंडिकेट या कराराप्रमाणें वागण्यास कबूल होती. परंतु लेडी ठाकरसींनीं हा करार फिसकटविल्यानें आतां त्याच अटींवर पुन्हा समेट करण्यास सेनेट किंवा सिंडिकेट तयार होईलसें वाटत नाहीं.

यामुळें समेटाचा मार्ग अधिकच बिकट होऊन बसला आहे."

पत्र नं. ९१६

[ १९३५, सर एम् विश्वेश्वर अय्या, म्हैसूर, यांचें केळकर यांस पत्र ]

आपली दुपारची भेट समेट करण्याच्या दृष्टीनें अयशस्वी झाली. गेल्या महिन्याच्या २० तारखेला न्या. पाटकरांच्या घरीं प्रो. काजी व इतर लोकांनीं या विषयाबद्दल ऊहापोह केला होता. पण लेडी ठाकरसींच्या अटी युनिव्हर्सिटीला मान्य न झाल्यानें निर्णय झाला नाहीं. आतां पुन्हा जर या कामीं वाटाघाट करण्याचा विचार निघाला तर युनिव्हर्सिटीच्या काय अटी आहेत तें त्यांनीं लेडी ठाकरसींना कळवावें. या बाबतींत आणखी कांहीं घडल्यास आपण लेडी ठाकरसींना कळवाल काय ?"

---